नामदार

गोपाळ कृष्ण गोखले

पु. पां. गोखले

नामदार

गोपाळ कृष्ण गोखले

यांचे चरित्र

पु. पां. गोखले

नीलकंठ प्रकाशन, पुणें ९

प्रकाशक :
प्रकाश दामोदर रानडे
नीलकंठ प्रकाशन,
१६४३ (नवा) सदाशिव पेठ,
टिळक रोड, पुणे ९

© घु. पां. गोखले

प्रथमावृत्ती : १९ फेब्रुवारी १९६९

किंमत : दहा रुपये

मुद्रक :
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय,
२९१ शनिवार पेठ,
पुणे २

समर्पण

" अभ्यासेचि प्रगट व्हावें ।
नाहीं तरी झाकोन असावें ।
प्रकट होऊन नासावें ।
हें बरें नव्हे ॥ "

या व्रताने आचरणाऱ्या
देशभक्तांस सादर समर्पण

पु. पां. गोखले

प्रास्ताविक

इसवी सन १९६६ च्या १९ फेब्रुवारीस नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या मृत्यूस पन्नास वर्षे पूर्ण होऊन एक्कावन्नावे वर्ष लागत आहे. म्हणजे ही त्यांची एक्कावन्नावी पुण्यतिथी. तसेच ता. ९ मे १९६६ रोजी त्यांची जन्मशताब्दी येत आहे. या अपूर्व योगाच्या निमित्ताने त्यांचे चरित्र सादर वर्णावे या विचाराने हे पुस्तक लिहीत आहे.

नामदार गोखले यांनी 'हिंदुस्थानचे ग्लॅडस्टन' म्हणून जी कीर्ती मिळविली आहे ती विधिमंडळात व इतरत्र केलेल्या आपल्या अभ्यासपूर्ण अर्थसंकल्पीय भाषणांनी. 'अभ्यासेचि प्रकट व्हावें' हा मुळी नामदार गोखले यांचा दण्डकच होता. त्यामुळे आणि राजकारणात हिंदुस्थानला निश्चितपणे प्रगत ठेवून त्याच्या प्रतिष्ठोन्नतीसाठी त्यांनी चालविलेल्या प्रयत्न-सातत्यामुळेच डिझरायलीच्या कारकीर्दीपासून दूरदर्शीपणाने अर्थसंकल्पीय चिकित्सा कार्यक्षमतेने करणाऱ्या व आयर्लंडच्या राजकीय स्वातंत्र्यासाठी प्रयत्नसातत्य साधणाऱ्या अभ्याससिद्ध ग्लॅडस्टनशी ना. गोखले यांची तुलना करण्यात येते. फार काय कविवर्य सेसिल (१९१४) याने त्या वेळी स्पष्टच म्हटले होते की, "गोखले इंग्लंडात जन्मले असते तर ते इंग्लंडचे पंतप्रधानही झाले असते."

अशा थोर पुरुषाचे 'चरित्र पहा जरा' म्हणून विवेकी जन आपल्या मनाला उपदेश करतात तेव्हा एवढाच बोध सापडतो की, स्वतःच्या स्वार्थापेक्षा समाजाच्या स्नेहार्द्रतेने जीवनातील कर्तव्ये माणसाने करीत राहिले पाहिजे. निसर्ग-लीलांप्रमाणेच मानवसमाजातील शुद्ध, शूर व शहाण्या पुरुषार्थींच्या प्रतिमांनी जनसामान्यांच्या जीवनाची घडण होत असते. त्यांच्यापैकी कोणाच्याही पावलावर पाऊल टाकून जावयाचे ठरविले तर त्याला कळून चुकते की, "अहंभाव हा मानसींचा विरेना। तया ज्ञान हे अन्न पोटीं जिरेना॥" म्हणून समाजसन्मुख सात्त्विकतेने कर्तव्याची वाटचाल करताना "यज्ञासाठीं भूमी। नांगरीता धन्या। सांपडली कन्या। सीतादेवी॥" असा आनंदोत्सव झाला पाहिजे. देवपूजा, संगतिकरण आणि दान यांनी यज्ञाची सांगता होते. उत्कट, भव्य तितुके ज्यांच्यापासून घेता येते त्या गुरुजनांचा आदर राखावा, सगळ्यांना बरोबर घेऊन सहकाराने, समन्वयाने आणि सहजीवनाने (आणि तसे जमतच नसेल तर सर्वेषाम् अविरोधेन) कार्यसिद्धी करावी आणि समाजस्वास्थ्य राखावे आणि तसे करताना ज्या उणीवा असतील त्या शक्य तेवढ्या भरून काढण्यासाठी आपल्याजवळ असलेल्या कायिक, वाचिक, बौद्धिक, आर्थिक वा संघटक सामर्थ्यांची

देणगी त्यांना जिव्हाळ्याने द्यावी. कर्तव्ययज्ञाची ही परिपाठी म्हणजेच जीवनाचे अध्यात्मीकरण होय. नामदार गोखले यांच्या भारत-सेवेचे हे प्रबोधन होते. हेच प्रबोधन प्रकट करण्याचा अल्पसा प्रयत्न त्यांच्या जन्मशताब्दीची संधी साधून मी करीत आहे.

हा माझा प्रयत्न प्रकाशात आणून जनसेवेला लावण्यात 'नीलकंठ प्रकाशन'चे श्री. दामूअण्णा रानडे यांनी जी कळकळ दाखविली तीबद्दल त्यांचे आभार मानून मोकळे होणे बरे नव्हे. त्यांचे व माझे मित्र श्री. दयार्णव कोपर्डेकर यांचेही ऋण तसेच ठेवून घेत आहे. या पुस्तकाची मुद्रणप्रत तयार करून देण्याचे काम चि. सुनंदा सहस्रबुद्धे आणि चि. शांताराम विनायक पुरोहित यांनी केले. या जिकीरीच्या कामाबद्दल या दोघांचे मी आभार मानतो. नामदार गोखले यांचे पुतणे श्री. शंकरराव गोखले यांनी मोठ्या आपुलकीने दुर्मिळ फोटो व हस्ताक्षर पुरवून व अनेकविध माहिती पुरवून जे सहाय्य केले त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करून नामदार गोखले यांची ही वाङ्मयी पूजा वाचकांनी गोड मानून घ्यावी अशी अभिवादनपूर्वक प्रार्थना करतो.

कराड
ता. १८ फेब्रुवारी १९६६

बाबूराव गोखले

♣ ♣ ♣

अनुक्रमणिका

१.	पार्श्वभूमी	... ...	१
२.	कुलवृतान्त	... ...	६
३.	रम्य ते बालपण	... ...	९
४.	कॉलेज-जीवन	... ...	१४
५.	रोजगाराची सुरुवात	... ...	१९
६.	वादळ-वारे	... ...	२४
७.	शिक्षण-सेवा	... ...	३०
८.	राजकारणी उमेदवारी	... ...	३४
९.	पुण्याची काँग्रेस	... ...	४०
१०.	सार्वजनिक सभा सोडली	... ...	४३
११.	डेक्कनसभा	... ...	४५
१२.	वेल्बी-कमिशनपुढील साक्ष	... ...	४७
१३.	दृष्ट लागली	... ...	५१
१४.	मुंबई विधिमंडळात	... ...	५७
१५.	वरिष्ठ विधिमंडळात	... ...	६०
१६.	न्या. रानडे-स्मारक	... ...	७१
१७.	भारत-सेवक-समाजाची स्थापना	... ...	७३
१८.	इंग्लंडात शिष्टाई	... ...	८१
१९.	वाराणसीची काँग्रेस	... ...	८६
२०.	कलकत्ता येथील काँग्रेस	... ...	९१
२१.	इंग्लंडची तिसरी सफर	... ...	९४
२२.	उत्तर हिंदुस्थानात दौरा	... ...	९६
२३.	सुरतेला सुरत गेली !	... ...	९९
२४.	मोर्ले-मिंटो सुधारणा	... ...	१०६
२५.	मानापमान	... ...	११०
२६.	तोतयाचे बंड : आफ्रिकेतील हिंदी	... ...	११७
२७.	पब्लिक सर्व्हिस कमिशन	... ...	१२५

२८. ना. गोखले यांचे इच्छापत्र १२९
२९. संयुक्त काँग्रेससाठी धडपड १३५
३०. संन्याशाचा संसार १४१
३१. भारत-सेवकाचे सम्यग्दर्शन १५४
३२. लोकदृष्टीतून भारत-सेवक गोखले १६४
३३. स्नेहशील भारत-सेवक गोखले १६८
३४. ना. गोखले यांचे विवेकदर्शन १८९
३५. ना. गोखले यांची कर्तृत्वप्रतिष्ठा २०१
३६. ना. गोखले यांस अभिवादन २०७
३७. ना. गोखले यांचा जीवनवृत्तान्त २१३

नामदार गोपाळ कृष्ण गोखले

जन्म : ९ मे १८६६

मृत्यू : १९ फेब्रुवारी १९१५

१ : पार्श्वभूमी

कोणत्याही राष्ट्राचे वैभव तेथल्या सैनिकांच्या वीरश्रीत, त्या देशाच्या मुत्सद्द्यांच्या समर्थ कारभार-कुशलतेत आणि बौद्धिक व तात्त्विक क्षेत्रे किंवा संगीतादि कला यांमधे तेथल्या जनसामान्यांनी केलेल्या वा दाखविलेल्या कर्तृत्वात प्रतीत होत असते. यासाठी इतिहासाचा हात पाठीवर घेऊन वर्तमानाशी समरस होत होत भविष्याच्या उज्ज्वलतेवर नजर ठेवून चालणारे नेतृत्व देशाला हवे असते. हिंदुस्थानच्या इतिहासातील ब्रिटिश रियासतीत ज्यांच्या जीवनचरित्राने ही प्रचंड राष्ट्रीय जबाबदारी सांभाळली अशा वंदनीयांपैकीच भारत-सेवक नामदार गोपाळ कृष्ण गोखले हे एक होत.

गोपाळ कृष्ण गोखले एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात–१८६६ मध्ये–जन्मास आले. तत्पूर्व कालाचे सिंहावलोकन केले असता निरीक्षकाला कार्य आढळते ? एकोणिसाव्या शतकाची पहिली पंचविशी स्वराज्याचा ऱ्हास व परकीय राजसत्तेची स्थापना यात गेली. दुसऱ्या पंचविशीत परकीय सत्तेचा विस्तार घडला. हिंदी कार्यकर्तृत्वाचा समूळ फडशा उडाला व लोक किंकर्तव्यमूढ झाले; तिसऱ्या पंचविशीत तर ब्रिटिश राजसत्तेचे नव तेज आणि देशातील कळाहीन जीवन यातील विरोध परवशतेमुळे तत्कालीन जाणकारांना विशेषच तीव्रतेने भासू लागला. परकीय सत्तेचे पवाडे गाणाऱ्या भाटांचा एक वर्गच निर्माण झाला. १८५७ साली एका बाजूने परकीय सत्ता उलथून टाकण्याचा एक जोरदार प्रयत्न झाला, पण तो फसला; दुसऱ्या बाजूने देशात विद्यापीठांची स्थापना होऊन एक ज्ञानसंपन्न पिढी निर्माण झाली. परवशतेचे वास्तव भेसूर स्वरूप तिच्या स्पष्टपणे प्रत्ययास आले. त्या शतकाच्या चवथ्या पंचविशीच्या मध्यास–१८८५ साली,–काँग्रेसची स्थापना होऊन लोकचळवळीस मूर्त स्वरूप प्राप्त होऊ लागले. गोपाळ कृष्ण गोखले यांचा जन्म सत्तावन्नच्या बंडानंतर नऊ वर्षांनी झालेला. काँग्रेसच्या जन्माच्या वेळी ते आपल्या ऐन भरात येऊ लागले होते आणि विसावे शतक उंबरठ्यावर असताना त्यांच्या कर्तृत्वाचे खास ठसे उमट्ट लागले होते.

व्हिक्टोरिया राणीच्या १८५८ च्या जाहीरनाम्याने हिंदुस्थानातला ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार संपुष्टात आला व राजकारणात एक नवेच पर्व सुरू

झाले. ब्रिटिशांशिवाय आपणास सत-गत नाही, असा ग्रह ज्यांनी करून घेतला होता, त्या विचारवंतांनीच, ईस्ट इंडिया कंपनीच्या कारकीर्दीतच नव्या परिस्थितीशी जुळते घेण्यास सुरुवात केलीच होती. सातारच्या प्रतापसिंह महाराजांनी किंवा जमखिंडी–सांगलीचे पटवर्धन अशा सरदारांनी नव्या राज्यकर्त्यांकडून धन्यवाद मिळवल्याची उदाहरणे कशास सांगावयास हवीत ? प्रजेस सुस्थिर जीवनाचा लाभ मिळावा म्हणून ईस्ट इंडिया कंपनीने पुष्कळशा सुधारणांना प्रारंभ केलाच होता. १८२७ त मुंबई सरकारने एक राज्यकारभार–नियमावली जाहीर केली. ती नियमावली म्हणजे एकोणिसाव्या शतकातल्या भावी राज्यकारभाराचा 'श्रीगणेशा'च म्हणता येईल. १८३७ पासून राज्यकारभाराची भाषा सर्व हिंदुस्थानभर इंग्रजीच ठरली. १८५८ च्या जाहीरनाम्यात इंग्लंडच्या राणीने "प्रजेचा संतोष तेच आमचे पारितोषिक होय" असे उद्‌गार काढताच हिंदुस्थानचा ब्रिटिशांकडील कबजा हा एक दैवदत्त विश्वासनिधी आहे, अशी समजूत सर्वत्र पसरली. कारण १८३६ मध्ये ब्रिटिशांनी ठगांचा बंदोबस्त केला होता; १८४१ मध्ये माणसांची गुलाम म्हणून होणारी खरेदी-विक्री बंद केली होती; १८४५ त भाडेपट्ट्याचा कायदा केला होता; १८७१ त शिक्षण व स्वास्थ्यसंरक्षण ही खाती प्रांतिक सरकारांच्या स्वाधीन करण्यात आली आणि १८८३ मध्ये जमीनसुधारणा कायदा आणि युरोपियनांचे खटले भारतीय न्यायाधीशांनी चालविण्यास मुभा देणारे इल्बर्ट बिल पास झाले होते. लोकहितवादी देशमुख, न्या. रानडे आदि मंडळींचे मत असेच पडत गेले की, ब्रिटिशांपासून पुष्कळ चांगल्या गोष्टी शिकण्यासारख्या आहेत; त्या चांगल्या गोष्टींच्या अनुकरणामुळे हिंदुस्थानला आपली प्रगती निश्चित करून घेता येईल. त्या प्रगतीच्या जोरावरच आपल्या पूर्वापार सांस्कृतिक वैभवानिशी आणि कर्तृत्वानिशी हिंदुस्थान जगातील पुरोगामी राष्ट्रांच्या मांडीला मांडी लावून बसू शकेल. राजकीय गुंतागुंतीमुळे बाहेरच्या अफाट जगाशी व त्या जगातील बहुविध संस्कृतीशी हिंदुस्थानची फारकत झाली होती. ती इंग्रजी राजवटीमुळे दूर झाली, हा एक परमेश्वरी प्रसादच घडला, असेही ती मंडळी मानीत. पण म्हणून त्यांना हिंदुस्थानच्या मानेवरील परकीय सत्तेचे जू मंजूर होते, असे मानण्याचे कारण नाही. तथापि, ब्रिटिशांचे ते जोखड बंडाबखेड्यांनी फेकून देण्याची ताकद हिंदुस्थानात आहे, असेही त्यांना बिलकुल वाटत नव्हते. "इंग्रजी शिकलेले हिंदुस्थानवासीय ब्रिटिशांकडे प्रथम राजकीय हक्कांची मागणी करतील आणि शेवटी ते हक्क ब्रिटिशांपासून हिसकावून घेतील." (ज्ञानोदय १५ मे १८४९) असे या मंडळींचे भाकीत होते. या भाकिताच्या पूर्ततेचा काळ फार लांब नव्हता. १० ऑगस्ट १८६४ च्या ज्ञानप्रकाशानेच प्रश्न केला की, "लोकसंपर्कापासून अलिप्त असलेले आणि राज्यकारभार कशाशी खातात हे

ज्यांना ठाऊकच नाही असे जे लोक इलाख्या-इलाख्याच्या कौन्सिलातून भरताड म्हणून घेतलेले आहेत, त्यांची लायकी तरी काय ?" पुढे अशाच प्रश्नांची झोड वारंवार झडू लागल्यामुळे सरकार व प्रजा यांचे दुवे जोडणारी एक संस्था निर्माण करावी, अशी एक कल्पना पुढे आली. त्या संस्थेने सरकारी धोरणातील सद्धेतू लोकांना समजावून द्यावेत आणि लोकांच्या आशा-आकांक्षा, इच्छा-अपेक्षा-हक्क यांची सरकारास जाणीव द्यावी, एकंदर परिस्थितीचा आढावा घेऊन कर्तव्याकर्तव्यांचे मार्गदर्शन उभयतांस करावे. वसईचे गोविंद बाबाजी जोशी यांनी प्रथम महाराष्ट्रामध्ये व नंतर हिंदुस्थानभर सार्वजनिक सभांचे एक प्रकारचे जाळे विणले. २ एप्रिल १८७० रोजी पुण्यास स्थापन झालेल्या सार्वजनिक सभेने भारतवासीयांचे "राजकारणी भले" हेच आपले ध्येय असल्याचे जाहीर केले.

बडोद्याच्या मल्हारराव गायकवाडांवरील तोहमतीची चौकशी साध्या ब्रिटिश न्यायासनामार्फत करण्याचे सरकारने ठरविले. त्या वेळी पुणे सार्वजनिक सभेची कसदार सेवा लोकप्रत्ययास आली. कारण समान प्रतिष्ठावंताकडून न्याय्य चौकशी झाली पाहिजे हे तत्त्व या प्रकरणी सार्वजनिक सभेच्या प्रखर आग्रहाखातर लॉर्ड नॉर्थब्रुक या व्हाइसरॉयांना अमलात आणावे लागले. सार्वजनिक सभेच्या कार्यकर्त्यांनी १८७४ व १८७६ च्या दुष्काळात भुके-कंगाल अवस्थेत मरणारांच्या तोंडी अन्नाचा घास घालण्याचे कष्ट जसे घेतले, तसेच स्वदेशीचे व्रतहा लोकांना शिकविले. सार्वजनिक सभेचे चिटणीस गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका हे खादीच्या पोशाखातच १८७६ च्या दिल्ली दरबाराला प्रथम बिनदिक्कत हजर राहिले. इंग्लंडच्या प्रजाजनांइतके हक्क भारतीय प्रजाजनांना हवेत अशी स्पष्ट मागणी पुणे-सार्वजनिक सभेनेच व्हिक्टोरिया राणीला दिलेल्या मानपत्रात केली होती. अशा तऱ्हेने शांति-प्रधान चळवळी करणारी ती सार्वजनिक सभा म्हणजे १८६७ साली स्थापन झालेल्या पुणे असोसिएशनचे एक विकसित स्वरूप होते.

एवढे मात्र खरे की, अशा तऱ्हेने चळवळी करणारे लोक राणीच्या जाहीर-नामा जेवढा ग्राह्य मानीत, तेवढा तो स्वतः राज्यकर्तेच मानीत नसत. १८६० मध्ये आपापली शस्त्रास्त्रे सरकारच्या चावडीवर आणून देण्याचे हुकूम झाल्यावर, कुरकुर न करता लोकांनी ती बहुतेक ठिकाणी सरकार-स्वाधीन केली. आणि तरीही १८७१ त इंडियन पीनल कोडात १२४ अ कलम जेव्हा सरकारने स्थिरविले, तेव्हा त्याचे प्रयोजन लोकांच्या लक्षात येईना ! मग सार्वजनिक सभेमार्फत न्यायमूर्ती रानडे यांनी लोकांतर्फे जबाबदार कारभार व्हावा, अशी मागणी केली आणि सरकारला पन्नास रुपयांच्यावर वार्षिक करभार देणारांचे तरी प्रतिनिधी हिंदुस्थानातून ब्रिटिश पार्लमेंटात घ्यावेत व सर्व भारतीय प्रश्नांचा विचार त्या प्रतिनिधींच्याच सल्ल्याने व्हावा असे आग्रहाने सुचविले. १८७४ मधील सार्वजनिक

सभेच्या या मागणीप्रमाणेच १८७५ मध्ये शनिवारवाड्यापुढच्या एका व्याख्यानात वासुदेव बळवंत फडक्यांनीही याच प्रतिनिधित्वाची मागणी केली होती.

याच वेळी दुष्काळ लोकांचा अन्त पाहातच होता. लोक कर्जबाजारी होत होते. १८६६ पासून १८७३ पर्यंत तर शेतकऱ्यांच्या जमिनी भराभर सावकारांच्या घरात गेल्या. तरीही १८७६ साली दिल्ली-दरबार भरवून इंग्लंडची राणी हिंदुस्थानची बादशाहीण असल्याची ग्वाही फिरविण्याचा उपव्याप लॉर्ड लिटन यांनी बेदिक्कतपणे केलाच ! साहजिकच लोकांच्या असंतोषाची आग भडकली. तरीही शान्ति-सहकारवाद्यांचा विश्वास " इष्ट-काम-सिध्यर्थ " ब्रिटिश पार्लमेंटवरच असल्याकारणाने त्यांनी १८८४ साली कलकत्त्याचे लालमोहन घोष यांना पार्लमेंटमध्ये निवडून देण्याचे ठरविले. त्यासाठी विश्वनाथ नारायण मंडलीक यांनी मुंबई (शहर व) इलाख्यातून दहा हजार रुपये जमवून दिले. परिणामी त्या सर्व अपेक्षा हुकल्या; तरीही जगाला येवढे कळून चुकले की, आपल्या मायभूमीच्या सेवेसाठी हिंदुस्थानातील कोठलाही नागरिक आपल्या सांस्कृतिक व ऐतिहासिक बंधुत्वाची आठवण ठेवतो व एक होतो.

भारतातील तरुण देशभक्त आता जागरूक झाले होते. साहजिकच सरकारच्या एकंदरीत बेफिकिरीबद्दल व अरेरावीबद्दल त्यांनी टीकेची झोड उठविली. महाराष्ट्रात या तरुण देशभक्तांचे म्होरके विष्णुशास्त्री चिपळोणकर हे होते. अभ्यासपूर्ण दृष्टीने विष्णू कृष्णशास्त्रींना इंग्लंडचे जे लोकशाही वळण समजले होते त्याच्याशी हिंदुस्थानातील कारभार-व्यवस्था सर्वथैव विसंगत होती. म्हणून १८७४ पासून सुरू केलेल्या आपल्या ' निबंध-माले 'त सरकारी अरेरावी, राज्यकर्त्यांचे अंधानुकरण, आणि खुषमस्करी व लोकविलक्षण वागणुकीचे व्यर्थ चाळे अशा विषयांवर तरुण शास्त्रीबुवांनी कडकडून टीका केली. ब्रिटिश अधिकाऱ्यांचे पित्त स्वाभाविकपणेच खवळत गेले. मेजर जेकबने १८७६ च्या २४ सप्टेंबरच्या गॅझेटमध्ये एका लेखात सूचना केली की, पुणेरी ब्राह्मणांवर राजद्रोहाचे खटले भरावेत. अर्थात प्रत्यक्ष तसे काही झाले नाही, तरी १४ मार्च १८७८ रोजी मुद्रण-स्वातंत्र्याला काटेकोर मर्यादा आल्या. म्हणून पुणे सार्वजनिक सभेने मुंबई, कलकत्ता, आग्रा, लाहोर, इंदोर वगैरे ठिकाणी मुद्रक-संपादक-परिषदा घेतल्या. १७ नोव्हेंबर १८२४ च्या आपल्या दैनंदिनीत माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन याने लिहून ठेवले होते की, वृत्तपत्रांनी व नियतकालिकांनी लोकशिक्षण जरूर करावे पण त्यास राष्ट्रीयत्वाचे वळण लावू नये किंवा त्यांच्या राजकीय वगैरे आकांक्षा फुलवू नयेत, अशी भारतीय वृत्तपत्राबद्दल माझी अपेक्षा आहे. एल्फिन्स्टनच्या त्या अपेक्षापूर्तीसाठी लिटन साहेबांची धडपड होती. पण तीन वर्षांच्या सार्वजनिक सभेच्या चळवळीने १८८१ मध्ये लिटनचा तो मुद्रणविधी लॉर्ड ग्लॅड्स्टन यांनी बहुतांशाने मृतवत करून टाकला.

दरम्यान दख्खन-दंगे म्हणून कर्जबाजारी शेतकऱ्यांचे उठाव रोखे-फाडी-साठी झाले तरी सरकार 'बेमुर्वत' राहिल्याकारणाने, ते बेगुमान सरकारच उडवून लावण्यासाठी वासुदेव बळवंत फाडक्यांनी बंड उभारले होते. ते बंड फसले तरी शिक्षेस पात्र झालेल्या फडक्यांना सरकारी अधिकारी रस्त्याने नेत असता, लोक फडक्यांकडे कौतुकादरानेच पहात राहिले. भरीला, वायव्यसरहद्द प्रांतातील अंतः-करणे गुदमरून टाकणारी शेतकऱ्यांची दुःखे, गैरसोयीची व महागडी न्यायमंदिरे, भ्रष्ट व जुलमी पोलीस, महसुलाची जाचणी आणि जंगलच्या कायद्यांची काचणी अशा प्रकारांमुळे जनता क्रान्ति-ध्वजाच्या कक्षेत जात असल्याचे सर विल्यम वेडर्नबर्न यांना देखील दिसत होते. ए. ओ. ह्यूम यांच्या मतेही राजकीय असंतोष "गुप्तपणे" फैलावण्याच्या बेतात होता. त्याला सनदशीर वाट करून देण्यासाठीच मग १८८५ साली काँग्रेसची स्थापना झाली. मुंबईची प्रेसिडेन्सी असोसिएशन, कलकत्ता असोसिएशन, मद्रासची महाजन-सभा यांच्या देशसेवेचा रोख त्या घटनेला अनुकूलच होता.

स्वावलंबनाने स्वतःचे शिक्षण संपवून सार्वजनिक जीवनात गोखले यांनी पदार्पण केले त्या वेळच्या सर्वसामान्य परिस्थितीचे दर्शन हे असे होते.

☒ ☒ ☒

२ : कुलवृत्तान्त

रत्नागिरी जिल्ह्यात चिपळूण तालुक्यातील गुहागर पेट्यामधले वेळणेश्वर हे गोखल्यांचे मूळ गाव. येथून निरनिराळ्या काळी कोकणातील निरनिराळ्या गावी गोखले मंडळी जाऊन राहिली. वेळणेश्वर हा देव सर्व गोखल्यांचा कुलस्वामी असून, " यजुर्वेदस्य तैतीर्यशाखान्तर्गत– हिरण्यकेशी– शाखाध्यायी काश्यपगोत्रोत्पन्नोऽहम् । " असे सर्वच गोखले मंडळी म्हणत असत.

वेळणेश्वरच्या जगन्नाथ दादाजी गोखले यांनी काश्यप नदीच्या काठी मोठा मळा वसविला. जगन्नाथपंतांच्या पश्चात बाळाजी महादेव हे १७७३ त तेथे जाऊन राहिले. अतिशय कष्ट करून त्यांनी मळ्याचे उत्पन्न वाढविले. नंतर पेशवे सरकारात ताम्हनभर नजराणा देऊन ' मळा ' हा गाव सरकारी आज्ञेने त्यांनीच ताब्यात घेतला. तेव्हापासून त्या गावास ताम्हनमळा असे नाव पडले, असे म्हणतात. पण त्या गावी ' ताम्हनाची ' झाडे फार, म्हणूनच ताम्हनमळा हे नाव आले असावे हे अधिक स्वाभाविक वाटते. या ताम्हनमळ्याच्या बाळाजी महादेवांचे नातू विठ्ठल गणेश. हा पुरुष मोठा धाडसी, बुद्धिमान, शक्तिमान व व्यवहारचतुर होता. सर्व गावावर त्याचा वचक असे. त्याच्या कारकीर्दीत गाव शान्त, सुखी व स्वास्थ्याचा होता. व्यवहारातील रास्तपणा हा गोखले घराण्याचा विशेष.

विठ्ठल गणेशांचे नातू रघुनाथ व शंकर वासुदेव हे शेती करूनच असत. नवा गाव वसवून नवे हक्क मिळवावयाचे आणि मिळवलेले हक्क प्राणावर बेतले तरी सोडावयाचे नाहीत, ही कामगिरी त्या कालात लहानसहान नव्हे. अमेरिकेच्या इतिहासातच हे घडले आहे, असे नाही. महाराष्ट्र अशा उपक्रमांस पारखा नाही. उभे आहे ते पाडावे हे कर्तव्य ठरत असेल तर भावी हिताकरिता तसे करावेही. पण धड असेल ते पाडण्यात दिसून येणाऱ्या कर्तृत्वापेक्षा, " मोडली देवळे सांधावी " यात किंवा जे अस्तित्वात नाही ते उभारण्यात प्रगट होणारे कर्तृत्व अखेर श्रेष्ठ होय. निर्मिती आणि तिचे रक्षण यासच अधिक कौशल्य व स्वतंत्र बुद्धी लागते. चिपळूणपासून दहा मैलांवर ताम्हनमळा उभारणाऱ्या बाळाजी महादेवांचे कर्तृत्व, त्यांचे निपणतू गोपाळराव गोखले यांच्या ठायी प्रकट होईपर्यंत, ते फल्गू नदीसारखेच वाहात होते.

गोपाळरावांचे पणजे भास्कर बाळाजी व आजे श्रीधर भास्कर अशा दोन पिढ्यांनंतरही श्रीधरपंतांचे चिरंजीव कृष्णाजी व अंताजी हे दोघे बंधू शेती पहात एकत्रच राहात होते. कृष्णाजी हे लहानपणी आपल्या घरची गुरे राखीत असत. त्यांना फक्त मराठी लिहता-वाचता येत असे. प्रपंचाची ओढगस्त थांबवण्यासाठी पुढे त्यांनी कागलसंस्थानात कारकुनी पतकरली. ताम्हनमळ्यात केलेल्या हूडपणामुळे व क्वचित प्रसंगीच्या तामसीपणामुळे हे कृष्णाजी बरोबरीच्या मंडळीत 'वाघोबा' म्हणून ओळखले जात असत. ते दिवस ब्रिटिश रियासतीच्या सुरुवातीचे असल्याकारणाने, कृष्णाजी प्रथम कोल्हापुरासच इंग्रजी शिकण्याकरिता गेले; कारण सर्वात नजीक अशी तेथेच त्या शिक्षणाची सोय होती. कोल्हापुरास, महादेव गोविंद रानडे या पुढे "महाराष्ट्राचा महादेव" झालेल्या थोर गृहस्थांचे कृष्णराव हे सहाध्यायी होते. परंतु शिक्षणास लागणाऱ्या पैशाच्या दृष्टीने घरची अनुकूलता दिवसेंदिवस कमी पडत गेल्याने, कोल्हापुरासच मामलेदार असलेल्या आपल्या चुलत्यांच्या वशिल्याने ते कागल येथे कारकून म्हणून नौकरीस लागले व कागलकर होऊन बसले.

अंताजीपंत व कृष्णाजीपंत एवढीच श्रीधरपंतांच्या पहिल्या कुटुंबाची अपत्ये. कृष्णाजी चार महिन्यांचे असतानाच त्यांच्या माउलीने परलोकी प्रयाण केल्यामुळे, आईविणे पोरके झालेले हे अंताजी–कृष्णाजी शेवटपर्यंत एकत्र व एक विचाराने राहिले. त्यांच्या बंधुप्रेमाचा हाच वारसा पुढच्या पिढीतही चालू राहिला.

अंताजी व कृष्णाजी यांच्याशिवाय जयराम व माधव अशी आपली दोन लाडकी अपत्ये संगोपून श्रीधरपंत १८८९ साली सत्याहत्तराव्या वर्षी परलोकी गेले. स्वाभिमान, करारीपणा, पीळ, बाणेदारपणा आणि स्वावलंबन या गुणांचा वडिलार्जित वारसा श्रीधरपंतांनी चालविला होता. तो तसाच पुढिलांनाही दिला. तो चालवूनच कृष्णाजी ऊर्फ कृष्णराव कागलास आपले काम चालवू लागले. एकदा कोणी वरिष्ठ अंमलदार काम पाहण्यास आले असता, दहाजणांसमक्ष कृष्णाजीरावांस काही टाकून बोलले. आपले काम चोख असता हे घडल्यामुळे कृष्णरावामधील "वाघोबा" जागा झाला. तेव्हा जवळच्या मंडळींनी त्यांना आवरले ! पण तेव्हापासूनच वरिष्ठांची त्यांच्यावर मर्जी बसली व त्यांच्या खास बाणेदारपणामुळे त्यांच्यावरील वरिष्ठांचा विश्वास वाढला. चोखपणा व बाणेदारपणा यांच्या जोरावर कृष्णराव पुढे कागलचे फौजदार झाले.

कृष्णरावांच्या पत्नी सत्यभामाबाई. त्या चिपळूण तालुक्यातील ताम्हनमळ्यापासून आठ मैलांवर असणाऱ्या कोतळूक येथील ओक घराण्यातल्या. कोतळूकचे खोत भास्करपंत यांच्या कन्या वालुताई. त्यांना गणेश, निळू व हर्री

असे तीन भाऊ होते. सात्त्विक वृत्ती व दिलदारपणा हे ओकांचे विशेष. या विशेषांसह वालुताई (ओक) सौ. सत्यभामाबाई गोखले होऊन कृष्णरावांच्या गृहलक्ष्मी म्हणून सत्त्वशीलतेने लोकपरिचयाच्या झाल्या. कधी कोणास टाकून बोलणे किंवा दुरुत्तर करणे तर दूरच, पण अंगावर पडलेले काम निमूटपणे करावे, आपला संसार बिनबोभाट सारावा– सावरावा, कोणाचे उणे– उघडे दिसल्यास ते पोटात ठेवावे, शक्य तेथे पदराखाली झाकावे, वेळी– अवेळी आघात झाले– आले तर ते शान्तपणे सोसून शक्य तो सर्वांशी गुण्यागोविंदाने राहावे, अशी त्यांची वृत्ती होती. शाळेतल्या शिक्षणाचा गंध नसलेल्या या बाईंची स्मरणशक्ती विलक्षण होती. पतिनिष्ठा एवढी जाज्वल्य की, कृष्णराव गोखले १८७९ त परलोकवासी झाल्यावर त्यांचे एक नेसूचे धोतर, त्यानंतर एक तपाच्यावर, म्हणजे स्वतःच्या मृत्यूपर्यंत त्यांनी जवळ बाळगले होते !

सत्यभामा– कृष्णरावजी गोखल्यांच्या उदरी आलेले द्वितीय चिरंजीव म्हणजेच पुढे अद्वितीय देशसेवक ठरलेले भारत-सेवक नामदार गोपाळ कृष्ण गोखले !

३ : रम्य ते बालपण

कृष्णराव गोखले कागलास होते तरी सत्यभामाबाई बाळंतपणासाठी सासरी ताम्हनमळ्यासच जात. त्यांच्या सहा आपत्यांपैकी एका मुलाचा नि चार मुलींचे पाळणे तरी ताम्हनमळ्यासच हालले. उणीव नको, उखीर नको, असा स्वाभिमानाचा संसार करणारांना कोणाचेच मिंधे होणे आवडत नाही. तेथे सासुरवाडीचे किंवा व्याह्यामेव्हण्यांचे मिंधेपण कसे आवडणार ? तरीही गोपाळच्या वेळेला माहेरची मने दुखवायची नाहीत म्हणून सत्यभामाबाई कोतळुकास गेल्या होत्या. सत्यभामाबाईंचे दोघे बंधू साठ-साठ वर्षे पावेतो बळकटीने या जगात वावरले, ही गोष्ट लक्षात घेतली, तर गोपाळच्या दोन्ही बाजूंचे वाडवडील सामान्यतः प्रकृतीने निकोप व शरीराने सुदृढ होते, असे म्हणावयास हरकत नाही. कोतळुकास म्हणजे आपल्या आजोळी ओकांचे येथे ता. ९ मे १८६६ रोजी बुधवारी वैशाख कृष्ण नवमीस (शके १७८८) सूर्यास्ताचे सुमारास गोपाळाचा जन्म झाला. ज्योतिषशास्त्र दृष्ट्या गोपाळची जन्मकुंडली कोणास अभ्यासावयाची असल्यास ती अशी होती :



बाळबाळंतीण दोनच महिने माहेरास होती. तेथून ती नित्याच्या प्रमाणे ताम्हनमळ्यास जाऊन राहिली. चार-पाच महिने खेड्यातील वन्यसृष्टीचे मांडीवर आणि निष्पाप साधेपणाच्या परिसरात सौ. सत्यभामाबाईंचा गोपाळ रमला. त्या वेळी रत्नागिरी जिल्हा काही आजच्यासारखा एकरच्या एकर अन्नधान्ये पिकवीत नसे. त्या डोंगरी जिल्ह्यात ऐशी इंचांपेक्षाही दरसाल पावसाची सरासरी जास्त असूनही तेथे धनोत्पादन वा बागाईत फारसे नाही. तो फलसमृद्ध जिल्हा आहे. आंबे, पोफळी, साग, नारळी आणि अमसुले, फणसच त्या सागरतटीच्या

जिल्ह्यात मोप. स्वभावानुसार निर्व्याज सरळतेचा पान्हाच त्या कोकणदेवीने गोपाळाला पाजीला असेल, नाही ?

सात महिन्यांचा गोपाळ कागलास आला. वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत तो कागलासच खेळला, बागडला, वाढला आणि शिकलाही. त्याची आई त्याला इतर भावंडांमध्ये बसवून रामायण-महाभारतातल्या गोष्टी सांगे. पहाटेच्या प्रहरी साखरझोपेत असताना आणि रात्री झोपेसाठी अंगाई गाताना, सत्यभामाबाई देवादिकांची भक्तिपर गाणी म्हणत, त्यामुळे गोपाळच्या मनावर त्या सात्त्विक वाङ्मयाचे संस्कार होत गेले. अनुभविक आजा-आजी आणि खेळकर नातवंडे यांचा एकजीव मेळ घडून आला म्हणजे कुटुंबाच्या तेजस्वी व सात्त्विक परंपरा कायम टिकतात. पण ते बाळकडू मिळण्याचा योग कृष्णराव गोखल्यांच्या मुलांना नव्हता ! !

आईच्या वळणाने गोपाळात मुरलेला पापभीरुपणा मराठी शाळेपासूनच प्रत्ययास येऊ लागला. तिसरीत असताना, एके दिवशी पंतोजींनी अंकगणितातील एक उदाहरण घरून करून आणावयास दिले होते. दुसऱ्या दिवशी पंतोजींना आढळून आले की, वर्गातील बहुतेक मुलांना ते उदाहरण सुटले नव्हते; गोपाळने मात्र ते बरोबर करून आणले होते. म्हणून पंतोजींनी त्याची पाटी पाहून त्याला पहिल्या क्रमांकाची जागा दिली व शाबासकी देऊन ते त्याची वाखाणणी करू लागले. तो, गोपाळ आपला स्फुंदून, स्फुंदून मुसमुसून रडू लागलेला दिसला ! ! या चमत्काराचा कोणालाच उलगडा होईना. शेवटी पंतोजींनी गोपाळालाच जवळ घेऊन विचारले, 'अरे, तूं का रडतोस ? तुला काही होते आहे का ?' वात्सल्याच्या अशा प्रश्नांनी गोपाळास अधिकच उन्मळून आले. पंतोजींचे पाय धरून तो म्हणाला, 'मला पहिला क्रमांक कशाला ? नको ! माझ्याने तेथे बसवत नाही. ती जागा खरोखर माझी नाही. मी दुसऱ्याला विचारून ते उदाहरण सोडवून आणले होते. मला क्षमा करा.'

बालस्वभावाचा सरळपणा आणि हृदयाचा कोमलपणा जाणणाऱ्या त्या पंतोजींना गोपाळविषयी अधिकच जिव्हाळा वाटला. उदाहरण आपणच सोडविले हा ठसा पंतोजींच्या आणि मुलांच्या मनावर होऊ दिला, हेच पाप घडले, या जाणिवेने गोपाळ रडला ! पापाचरणाविषयीची आणि पुण्यकर्माविषयींची अशी जागरूकता हाच पुढे भारतसेवक नामदार गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या मनोवृत्तीचा स्थायीभाव बनला.

कागलच्या शाळेतील अभ्यास संपल्यावर गोपाळ आपला वडील भाऊ गोविंद ऊर्फ अण्णा यांच्याबरोबर १८७५ मध्ये शिक्षणासाठी कोल्हापुरास गेला. दोघेही इंग्रजी शिकू लागले. पुढे औंध संस्थानात कऱ्हाड न्यायालयातील प्रसिद्ध

वकील म्हणून नावाजलेले वासुदेवराव कुमठेकर जोशी आणि समर्थ विद्यालयाचे संस्थापक व राष्ट्रीय शिक्षणाचे प्रेरक म्हणून (१९००) पासून प्रसिद्धीस आलेले विष्णू गोविंद तथा अण्णासाहेब विजापूरकर हे गोखले–बंधूंचे खेळगडी झाले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या बोलीने बोलावयाचे, तर वाघिणीचे दूध पिण्याचे गोखलेबंधूंचे ते कार्य चालू असता ' जगाचा शिकारी ' त्यांच्या वाटेत आला ! १८७९ साली, म्हणजे गोपाळ अवघा तेराच वर्षांचा असताना, कागलास फौजदार असलेले त्यांचे तीर्थरूप कृष्णराव गोखले यांना वयाची बेचाळिशी उलटण्याच्या आतच मधुमेहाच्या विकाराचे निमित्त होऊन बहुमूत्राचा विकार जडल्याने व तो जोरावल्याने काळा–आधीन व्हावे लागले ! कृष्णरावांचा स्वभाव स्वतःच्या वाडवडिलांप्रमाणेच खर्चिक असल्याने त्यांच्याजवळ ब्रह्मस्व तर नव्हतेच, पण कुणगासुद्धा नव्हता, मग मायां कोठली ? अशा साधारण गरीबीच्या स्थितीतील कुटुंबावर कर्त्या पुरुषाचा मृत्यू ही खरोखर आकाशीची कुऱ्हाडच ठरते. सत्यभामाबाई एकट्या; जवळ दोघे मुलगे, पण त्यांचे शिक्षण अजून मिळकतीच्या मार्गी न लागलेले; शिवाय चार मुली; इतक्यांचा सांभाळ-संगोपन कसे व्हावयाचे ? कृष्णरावांचे सख्खे बंधू अनंतराव ऊर्फ अनंताजी ताम्हनमळ्यास कसेबसे घर सांभाळून होते. त्यांना गावच्या खोतीत एक पैशाचा हिस्सा. त्यामुळे मिळवत्या बंधूंचा मृत्यू हा त्यांनाही न सोसवणारा धक्का होता. तरी पण " वडिलपण धरावे, धाकुल्या सावरावे । अनहित न करावे, तूर्त (त्वरित) हाती धरावे. ॥ " ही जबाबदारी पार पाडलीच पाहिजे. " सदा सर्वदा देव सन्निध आहे । कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे ॥ " या समर्थवचनाचा अनुभव अशाच प्रसंगी येतो. त्यांनी कागल संस्थानचे त्या वेळचे कारभारी रावसाहेब विष्णू परशुराम वैद्य या परिचितांच्या मध्यस्थीने कृष्णराव गोखल्यांच्या मागे त्यांचा वडील मुलगा गोविंद यास कागलकरांकडून पंधरा रुपये (फक्त) दरमहाची कारकुनी लावून दिली; गोपाळाचे शिक्षण कोल्हापुरास चालू करून त्याचा भार गोविंदअण्णावर सोपविला आणि भावजयीस मुलींसह आपल्या घरी नेले.

अठरा वर्षांच्या गोविंदराव–अण्णांनी चुलत्यांच्या त्या योजनेस प्रेमाने व उमेदीने मान्यता दिली. आपले शिक्षण एक राहो, पण गोपाळाला शिकण्याची हौस आहे, तर त्याचे शिक्षण पुरे करावयाचे, असा अण्णांनी निश्चय केला. त्यामुळे चिरंजीव गोपाळाची विद्या होईपर्यंत त्यांना स्वतःच्या सुखाचा किंवा कसल्याही आरामाचा विचार सुचला नाही. छोटा पगार पण मोठा संसार सांभाळा-वयाचा असूनही, दरमहाच्या पंधरा रुपये प्राप्तीपैकी आठ रुपये गोपाळास पाठवून बाकीच्यात अण्णा आपला खाक्या चालवीत. स्वतःच्या पोटास चिमटा घेऊन अण्णा आपल्याला शिकावयास पैसे पाठवितात याची जाणीव कृतज्ञ गोपाळास होती. त्या लहान वयातही तो आपली गरीबी ओळखून वागत असे. " गोविंद–गोपाळ

हे दोघे बंधु " असे होते. कोल्हापूरच्या खाणावळीत जेवणाचे दरमहा साडेचार व चार रुपये असे दोन दर होते. गोपाळ सहजच दुसऱ्या दराचे जेवण घेई. त्यामुळे त्यास दही-दूध न मिळता साध्या ताकाचे फुळकवणी मिळे. पण अंथरूण पाहून पाय पसरणारा गोपाळ त्याची खंत का करील ? गरज भागावी व गरीबीही शक्य तो लोकांच्या डोळ्यांआड राहावी, या अब्रूदार राहणीने राहायचे तर असेच करावे लागते.

पण किती केले तरी ते वयच मोह होण्याचे होते. दोन-चार मित्रमंडळींसमवेत एकदा जेवत असता, गोपाळाने सर्वांबरोबर दही घेतले, अगदी मागून घेतले. तोच ताडकन् खाणावळवाला खेकसला—' चार रुपड्या देणार अन् दही मागणार ? ' लगेच गोपाळास जाग आली की, " नकळत पद अग्निवरी पडे । न करी दाह असे न कधी घडे ॥ " आणि झाल्या अवमानातून उंच मान राखण्यासाठी गोपाळही लागलाच खणखणला—' आजपासून मी साडेचारच्याच दराचे जेवणार आहे ! ' खाणावळवाल्याचे काय, बरेच झाले ! पण गोपाळाला आठ आण्यांची बचत करणेच भाग होते ! त्यासाठी सुट्टीच्या दिवशी उपास करून खाडे करावयाचे आणि जेवणखर्च चार रुपयांच्या मर्यादेतच राखावयाचा, अशी दक्षता गोपाळाने घेतली. मानीपणा आणि प्राप्त परिस्थितिसापेक्ष वर्तनसमन्वय याचे धडे गोपाळास लहानपणीच ध्यावे लागले आणि गरीबीतील व्यवहारांच्या टक्क्या-टोणप्यांनी अर्थसंकल्पशास्त्राचे बीजारोपण गोपाळाच्या मनी तेव्हापासूनच हळूहळू होत गेले.

असाच एकदा आणखी संगतीदोष गोपाळास सहज लागला. त्याच्या वर्गातील दूरच्या एका नातेवाईक मातबर मुलाने गोपाळाला आग्रहाने नाटकास नेले. पण दुसऱ्या दिवशी पटकन् नाटकाच्या तिकिटाचे पैसे मागितले. या सावकारी चोचल्याने गोपाळास " नाटक झाले जन्माचे ते । " असे होऊन गेले. दोन आणे ! पण ते सोळा आणे स्वाभिमानाला खाऊन टाकणार, असे पाहताच गोपाळने ते देऊन टाकले. पण विचार आला की, महिनाअखेर जमाखर्चाची तोंडमिळवणी करता आली नाही, तर घडलेल्या अविचारापायी तोंड कसे व कोठे लपवावयाचे ? म्हणून नगरपालिकेच्या रस्त्यावरील कंदिलाच्या उजेडात अभ्यास करून दोन आण्यांचे रॉकेल पुरेल इतके दिवस म्हणजे एक महिना गोपाळाने काढला. प्रसंग निभावला. असा हा ' धकाधकीचा मामला । सोसवेना अशक्ताला ॥ ' म्हणून धनदुर्बळ गोपाळाने पुढे वरच्या इयत्तांतील खर्च आपल्या आटोक्यात ठेवण्यासाठी खाणावळीलाच रामराम ठोकून ' स्वयंपाकाचा आराम ' घ्यावयास कमी केले नाही.

अशा कष्टासायासाने विद्यादेवीची उपासना करणारा गोपाळ आपले चुलते व मायबहिणी यांचेकडे ताम्हनमळ्यास सुट्टीत हटकून जावयाचाच. एका शिमग्याच्या

सुट्टीत गोविंद-गोपाळ हे दोघे बंधू गेले असता गावकऱ्यांच्याबरोबर सुरपाट्यांच्या डावात त्यांना सामील व्हावे लागले. गडी वाटले तेव्हा बंधूंचीही वाटणी झाली. गोपाळची बाजू पाट्या धरून होती तर गोविंदरावअण्णाची बाजू पाट्या फोडणार होती. डाव रंगात येताच, गोपाळच्या पाटीतून अण्णाला जावयाचा वक्त गुदरला. वडीलपणाचा मान राखून गोपाळने आपल्याला मुकाट जाऊ द्यावे असा इशारा झाला मात्र, गोपाळ सरळ म्हणाला, " अण्णा, त्यापेक्षा मी डाव सोडून जातो, पण माझ्या भीडूंचा मी विश्वासघात करणार नाही. " निर्मळ वर्तनाची चाड, वडीलधाऱ्यांची आदब राखण्याची दक्षता आणि कडक तत्त्वनिष्ठा ही मृदुल शब्दांनी व्यक्त करण्याची ही किमयाच, भारत सेवक गोखल्यांच्या सार्वजनिक जीवनात पुढे रूढ होऊन बसली.

शाळेतील क्रमिक पुस्तकांचा आणि त्यांच्या झरोक्यातून आजच्या व उद्याच्या जगाचा अभ्यास जसा गोपाळने चालविला होता, तसाच वास्तवाच्या अनुभवातून " जग अवघड, सुंदर " कसे आहे, याचाही अभ्यास तो करीत होता. या प्रकारे त्याचे प्रशालेचे शिक्षण १८८१ साली पुरे झाले आणि गोपाळ मुंबई विद्यापीठाची मॅट्रिक्युलेशनची परीक्षा उतरला. निर्णयाच्या दिवशी, तो कळेपर्यंत त्या कोवळ्या जीवाची केवढी उताविळी चालली होती ! अण्णांना कष्ट करावयास लावून त्यांच्यावर तब्बल दोन वर्षे आपण केवढा भार घातला आणि आता जर का नापासाचा टिळा लागला तर कर्तव्य-कुचराई आणि कृतघ्नता आपल्या माथी येणार, हा विचार गोपाळास बेचैन करीत होता. ज्ञानार्जनापेक्षा परीक्षेतील यश म्हणजेच सर्व मोक्ष असे दरिद्रजर्जरांना नेहमीच वाटत असते. त्याचबरोबर उतावीळपणा व घायकुती कह्यात ठेवावयास संयमाची तपश्चर्या करावी लागते. ती यापुढे गोपाळने जन्मभर केली. ज्या वेळी जे काम अंगावर अगर हातात असेल, त्या वेळी त्या कामावर सर्व मन केंद्रित झालेले असल्यामुळे ते साधले तर इतिकर्तव्यता झाली; फसले तर " व्यर्थ, वाया शिणणे " झाले, असे वाटावयाचे. हाच निष्ठावंत, साक्षेपी स्वभाव शेवटपर्यंत कायम राहिला.

✕ ✕ ✕

४ : कॉलेज-जीवन

वयाच्या पंधराव्या वर्षी गोपाळ मॅट्रिक झाला. यापुढे शिकण्याची इच्छा, आकांक्षा आणि आत्मविश्वास असला तरीसुद्धा "काही मेळवी मग जेवी। गुंतल्या लोकास उगवी॥" असे आपण केले नाही तर स्वार्थसाधनापलीकडे त्याला काही अर्थ उरणार नाही आणि आपली आई नि बहिणी कागल येथे आणवून स्वाभिमानाने नेटका प्रपंच करणाऱ्या आपल्या अण्णावर केवढा ताण बसेल, या कल्पनेनेच गोपाळ हादरला. पण त्याने आपले मन उघडे करण्याचा अवकाश, त्याच्या अण्णांनी त्याचे काही ऐकावयाचे नाही असे ठरवले. आणि एवढ्या कोवळ्या वयात मनासारखे शिकावयाचे सोडून आपल्या धाकट्या दिराने नौकरी करीत राहावे, हे गोविंदरावअण्णांच्या अर्धांगीसही बिलकुल मानवेना. तिनेच धीटपणे भाऊजीस बजावले की, "तुमचे वय हे आहे केवळ विद्या शिकोनि असण्याचे।"

मग काय! मॅट्रिक्युलेशन ऊर्फ प्रवेश परीक्षा १८८१ च्या डिसेंबरात पसार झालेला गोपाळ १८८२ च्या जानेवारीपासूनच कोल्हापूरच्या राजाराम कॉलेज-मधील पी. ई. च्या वर्गात दाखल झाला. पंचवीस-तीस वर्गबंधू आणि ज्ञानाची निरनिराळी साधने व क्षितिजे या कॉलेजच्या शिक्षणाच्या निमित्तानें त्या सर्वांच्याच डोळ्यापुढे चमकू लागलेली! तारुण्याच्या प्रारंभदशेतील त्या बापयांची रोज नवी स्वप्ने, नवी दृश्ये, नवे मनोरथ, नव्या आशा, नव्या अडचणी आणि त्यातील एकेकाने अगर सर्वांनी मिळून केलेला कल्लोळ—यांच्यातूनच राष्ट्राचे भावी वीर, धीर, योद्धे, मुत्सद्दी, कवी, शास्त्रज्ञ, तत्त्ववेत्ते वगैरे बाहेर पडत असतात. वि. गो. विजापूरकर यांना तेव्हा पी. ई. त "वन्स मोअर" परीक्षेने दिला असल्याकारणाने ते गोपाळ कृष्ण गोखले त्यांचे सहाध्यायी झाले होते. महाराष्ट्रात सन १८७४ पासून निबंधमालेने निर्मिलेल्या ज्ञानजागराच्या कालचक्राचे फेरे इतर सर्व तरुण विद्यार्थ्याप्रमाणेच गोपाळराव गोखले आता निरीक्षू—परीक्षू लागले.

लोकहितवादी, न्या. रानडे, ज्योतिराव फुले, कृष्णशास्त्री (थोरले) चिपळूणकर यांनी ब्रिटिश रियासतीच्या रोखाने आपल्यापरी लोकजागृती व

लोकशिक्षण यांचे जे उद्योग उभारले होते, त्यातूनच विष्णू कृष्ण (धाकटे) चिपळूणकर शास्त्रींच्या निबंधमालेने स्वाभिमानपूर्वक स्वतंत्र विचारसरणीचा ज्ञानजागर आरंभिला होता. निबंधमालेच्या सुरुवातीपासूनच्या दशकात, तिने केलेल्या ज्ञानजागराच्या सत्राने, कॉलेजातील तरुण विद्यार्थ्यांच्या मनात एकच एक विचार खळबळून गेला होता. राष्ट्रात "होते ते" व "असावे ते" यांचा "आहे ते" याच्याशी असलेला दारुण विरोध त्या ज्वलंत वृत्तीच्या तरुणांना देशसेवेच्या प्रत्यक्ष धकाधकीत ढकलू लागला होता. निदान, पाश्चात्त्य ज्ञानाचा व संस्कृतीचा परिचय करून देऊन लोकांना आत्मज्ञान व आत्मप्रत्यय आणून देण्यासाठी तरी आपले आयुष्य लोकशिक्षणाला वहावयाचे, अशा प्रतिज्ञेचे तरुण तयार झाले होते, होत होते. त्यातच संपूर्ण राष्ट्रीय स्वातंत्र्याशिवाय खरा तरणोपाय नाही, असा मनाशी सिद्धान्त बाळगून उद्योगास लागलेल्या, बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर, अशा मंडळींचा एक फड होता. अर्थातच पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना (१८८०) व केसरी-मराठा या वृत्तपत्रांचा जन्म ही या नव्या कालखंडाची निशाणी होती. मोठाले पगार आणि मोठाले अधिकार त्या वेळच्या सगळ्याच पदवीधरांच्या पाठीमागे भाटासारखे वा खुषमस्कऱ्यासारखे लागत. ऐहिक दृष्ट्या तो सर्वतोपरी शहाणपणाचा असा राजमान्यराजश्री व लोकमान्यलोकश्री मार्ग सोडून ही मंडळी स्वतंत्र विचाराने राष्ट्रधर्मासाठी फकीरी घेऊन बसली. त्या त्यांच्या धाडसाने सारा महाराष्ट्र निनादून गेला व कॉलेजातील विद्यार्थ्यांतून एक अभिमानी वर्ग उदय पावला. त्यातच गोपाळराव गोखले होते.

आणि अशातच 'केसरी'च्या १८८१ पासून सुरू झालेल्या गर्जनांनी जेव्हा का कोल्हापूरच्या कारभारी बर्व्यांचे अब्रूनुकसानीचे प्रकरण उद्भवले, तेव्हा टिळक-आगरकरांसारख्या देशकार्यरत पुरुषांवर ओढवलेले संकट महाराष्ट्राला स्वतःवर ओढवल्यासारखेच वाटले. मुंबईच्या हायकोर्टात टिळक-आगरकरांचा पक्ष मांडण्याचे वकीलपत्र मुंबईचे सिंह फिरोजशहा मेहता यांनी पतकरले होते. त्या खटल्याच्या खर्चाकरता निधी इतरत्र जमा होऊ लागले. मग कोल्हापुरातील तरुणांना तरी कसे राहवणार ? त्यातून बर्वे-प्रकरणाचा कोल्हापूरशी जिव्हाळ्याचा संबंध ! कोल्हापूरच्या छत्रपती शिवाजीराजांना वेडे ठरवून कारभाऱ्यांनी त्यांचा छळ चालविल्याचे नाना भिडेप्रभृती मंडळींनी केसरी–मराठ्यास कळविल्याने, छत्रपतींच्या कैवारानेच मराठा–केसरीचे अग्रलेख गरजले होते. टिळक-आगरकरांचे न्यू इंग्लिश स्कूलमधील सहकारी वामन शिवराम आपटे (संस्कृत कोशकर्ते) मूळ कोल्हापुरचेच ! पुण्यास निघालेल्या नव्या राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रशालेचे ते प्रमुख. त्यामुळे राजाराम कॉलेजातील विद्यार्थी विजेने भारल्यासारखे झाले होते. वस्तुतः गोपाळराव गोखले हे आपला अभ्यास बरा की आपण बरे अशा प्रवृत्तीचे, इतर

उठाठेवीत सहसा न पडणारे ! पण त्यांच्या या अव्यभिचारी व्यासंगवृत्तीलाही टिळक-आगरकरांच्या सेवेला धावल्याशिवाय राहवले नाही. राजाराम कॉलेजच्या त्या वेळच्या विद्यार्थ्यांनी शेक्स्पीअरचे " भ्रान्तिकृत चमत्कार " हे नाटक करून, त्याच्या उत्पन्नातून टिळक-आगरकर–खटल्यास निधी पाठविण्याचे ठरवले. त्या नाटकात गोसाविणीची भूमिका उत्तम तऱ्हेने पार पाडून गोपाळरावांनी आपल्या सार्वजनिक सेवेचा पहिला श्रीकार काढला, राष्ट्रीय कर्तव्याचा वाटा उचलला.

याशिवाय मात्र पी. ई. चे वर्ष गोपाळरावांनी अभ्यासमग्नतेनेच खर्च केले. परीक्षेची पुस्तके ते " वाचिलेचि वाचावे, पुनः पुन्हा । " या प्रथेत घालीत, त्यामुळे ती बहुधा मुखोद्गतच होत. त्यामुळेच पण गोपाळराव खुशालचेंडू विद्यार्थ्यांचे थट्टाविषय ठरत. पी. ई. च्या क्रमिकात सर वॉल्टर स्कॉट यांचे रोकबी (Rokeby) हे काव्य होते. त्यातले काही ब्रेक्, गर्डान् सारखे शब्द असलेले उतारे गोपाळरावाकडून संदर्भ–संकेत–जिज्ञासेने जणू विचारून, म्हणवून घेऊन खुशालचेंडू स्वतःची करमणूक करवून घेत. आपल्याभोवती जमणारी सर्वच माणसे सरळ, प्रामाणिक, विश्वासू आहेत असे समजून, गोपाळरावांनी त्या त्या शब्दांच्या अर्थान्तरातील वा विभक्तिकारकातील अगर सापेक्ष पद-विकृतीतील बारकावे सहकाऱ्यांना दाखवावेत आणि उतारे घडाघड म्हणूनच दाखवावेत. गोपाळरावांचा हा " सहज बोलणे, हित-उपदेश । " खरा; पण त्याचा फायदा तयार मालाचे गिऱ्हाईक असलेल्या बुद्धिमान धूर्तांनाच तेवढा होई. करमणूक-खोरांना त्याचे काय ? आणि " पाठ्या गोप्या " किंवा " पुस्तकी पोपट " म्हणून गोपाळरावांना सदानकदा हिणविणाऱ्या सवंगड्यांना " असाध्य ते साध्य करता सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ।। " हे मात्र गोपाळरावांच्यामुळे खास पटल्याशिवाय राहिले नाही. अभ्यासात तसे खेळातही गोपाळराव प्रयत्नवादी होते. क्रिकेट, टेनिस, बुद्धिबळे, पत्ते, बिलियर्ड कोणत्याही कामात आपण मागे पडता कामा नये, अशी गोपाळरावांची ईर्षा होती. त्यामुळे वेळापत्रक, योजनाबद्ध नि शिस्तीचा शिरस्ता आणि मनमोकळेपणा हा गोपाळरावांचा सराव व परिणामतः स्वभाव होत गेला. पुढे पुण्यास न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक असता १८८७ ते १८८९ या सालांत गोपाळरावांनी क्रिकेट खेळण्याचा नाद केला आणि 'सुधारका'त क्रिकेटसंबंधाने लेख लिहिले. १९०५ साली तर विलायतेहून परत येतांना बोटीवर बिलियर्ड खेळण्यात दंग असता, त्या युरोपियन खेळाचे आपणास एवढे प्रेम का, अशी कुतूहलपूर्वक चौकशी झाली असता, गोपाळरावांनी उत्तर केले–' कोणत्याही गोष्टीत हिंदी मनुष्य मागे पडत नाही, हे आम्ही जगाला दाखवून दिले पाहिजे.' यापुढे प्रकट झालेल्या गोपाळरावांच्या मनोरञ्जनेचा पाया ते " कॉलेज स्टूडंट " असतानाच रचला जात होता. त्यामुळे, " विसंगति कदा नसो । " अशी दक्षता ते कॉलेजपासूनच घेत आले. एवढेच नव्हे,

तर कोणाची थोडी जरी शिस्त ढिली झाली, तरी ती त्यांना खपेनाशी होऊ लागली. त्या संतापाच्या भरात ते हाताखालील लोकांना रागवतही. .पण अनुभवापोटी पुढे पुढे येत गेलेल्या विचारगांभीर्याने ते क्षमाशीलही झाले.

या क्रमणातून " प्रत्ययेचि पहावे । " ही गुणविकासाची दृष्टी येतायेताच १८८२ त पी. ई. होऊन १८८३ च्या जानेवारीत फर्स्ट बी. ए. च्या अभ्यासाकरिता गोपाळराव पुण्याच्या डेक्कन कॉलेजात गेले. कोल्हापूरच्या कॉलेजात त्या शिक्षणाची सोय नसल्याने त्यांचे पटवर्धन, करमरकर, कुलकर्णीप्रभृती सहकारीही डेक्कन कॉलेजात आले होते. दुसऱ्या सहामाहीत ' राजाराम 'मध्ये ती सोय होताच या सगळ्या कोल्हापूरकरांनी " पुनरागमनाय "च म्हणून प्रस्थान ठेवले आणि मग " ये रे माझ्या मागल्या " व्हावयास चुकले नाही. " रिफ्लेक्शन्स ऑन दि फ्रेंच रेव्होल्यूशन " या ग्रंथाची आवर्तने गोपाळरावांनी सुरू केली. प्रौढ डौलदार प्रमाणशुद्ध भाषेतील वीस-वीस, पंचवीस-पंचवीस ओळींचे प्रसंगानुसार उतारे गोपाळरावांच्या तोंडून कॉलेजातील वादविवाद-सभेत दर आठवड्यास श्रोत्यांच्या कानात घुमू लागले. १८८३ च्या डिसेंबरमध्ये गोपाळराव गोखले फर्स्ट बी. ए. पास झाले.

आता बी. ए. ला जावयाचे तर काही विषय आवश्यक व काही ऐच्छिक होते. आपली गती गणित विषयात चांगली आहे, असा आत्मविश्वास गोपाळरावांना असल्या कारणाने, त्यांनी गणित घेऊनच बी. ए. होण्याचे ठरविले. त्यासाठी प्रा. हॅथॉर्नवेट हे गणिती प्राध्यापक असलेल्या मुंबईच्या एल्फिन्स्टन् कॉलेजात गोपाळरावांनी नाव घातले. तेथे इंग्रजी शिकवण्यास डॉ. वर्डस्वर्थ हे दुसरे प्रसिद्ध प्राध्यापक गोपाळरावांना लाभले. त्या दोघांचीही छाप गोपाळरावांवर पडली व आपण त्यांचे त्यांना शोभण्यासारखे शिष्य आहोत, असे आपल्या त्या त्या विषयातील तरबेजीने गोपाळरावांनीही त्यास समाधान मिळवून दिले. तेथे गोपाळरावांना धोंडो केशव तथा अण्णासाहेब कर्वे (पुढे महर्षिपदाला चढलेले) हे सहाध्यायी लाभले व स्नेही झाले. अशा प्रसन्न वातावरणातच १८८४ च्या अखेरीस गोपाळराव दुसऱ्या श्रेणीत मुंबई विद्यापीठाचे बी. ए. झाले.

वडील बंधूंच्या स्वार्थत्यागपूर्वक साहाय्यावर, आणि त्यातही आपल्या भावजयीने आपल्या अंगावरचा एकेक अलंकार उतरून लंकेच्या पार्वतीची शोभा पत्करल्यानेच, महाविद्यालयीन शिक्षणाची मजल दर मजल मारणाऱ्या गोपाळरावांच्या चित्तात घरच्या विचाराने कशी कालवाकालव होत असेल हे फक्त गरीबीच्या गळाठ्यात वाढलेल्यांनाच समजणारे आहे. त्यात थोडीशी समाधानाची गोष्ट एवढीच होती की, बी. ए. ज्या वर्गात २० रुपयांची एक छोटी शिष्यवृत्ती गोपाळरावांना मिळाली होती. तिचा आणि आपण आपल्या अठराव्या वर्षी बी. ए. झालो या घटनेचा गोपाळरावांना थोडासा अभिमानही होता.

टिळक-आगरकरांच्या देशभक्तीसंबंधी जसा गोपाळरावांच्या अंतःकरणात आदर निर्माण झाला होता, तशीच आपल्या अल्पवयीन शैक्षणिक प्रतिष्ठेस कारण असणाऱ्या वडीधाऱ्यांबद्दल गोपाळरावांच्या अंतःकरणात कृतज्ञता निर्माण होऊन, गोपाळरावांच्या विद्येला विनयाची जोड मिळाली होती. आपले वडील बंधू व भावजय, आपली आई आणि अनंताजीपंतकाका व त्यांची मंडळी यांच्या चरणी गोपाळरावजींचा साष्टांग नमस्कार घडे तो साहजिकच होता. पण चारच महिन्यांचे असताना आपले वडील कृष्णराव हे आईवेगळे पोरके झाल्या कारणाने, त्यांचे दाईपण जिने केले, त्या आपल्या आजीसमान असलेल्या म्हाताऱ्या मोलकरणीलाही, कोकणात गेल्यावर, गोपाळराव साष्टांग नमस्कार घालीत असत ! " विद्या विनयेन शोभते । " ती अशी !

☒ ☒ ☒

५ : रोजगाराची सुरुवात

विद्यार्जनाचा समाप्तिकाळ हा माणसाच्या आयुष्यात स्थित्यंतराचा काळ असतो. बी. ए. झाल्यानंतर पुढे काय, याचा निश्चय गोपाळरावांना एकदम होईना. आपल्या गणितातील तरतरीतपणामुळे इंजिनिअरिंग कॉलेजात जाऊन एल्. सी. ई. (लायसेन्स्ड सिव्हिल इंजिनीअर) व्हावे असे त्यांना वाटे, तर विलायतेस जावे आणि आय्. सी. एस्. (इंडियन सिव्हिल सर्व्हंट्) होऊन यावे, असे दुसऱ्यांदा वाटे; स्वावलंबनाने स्वतंत्र असा वकिलीचा धंदा करता यावा, म्हणून एल्एल्. बी. होण्याकडे गोपाळरावांचा ओढा काही कमी नव्हता. मनाच्या अशा आंदोलित अवस्थेत गोपाळरावांनी खूपच हेलकावे खाल्ले. ते पुणे इंजिनिअरिंग कॉलेजात जाऊन बसले, पण पंधरवड्याच्या आतच तेथून ते परत फिरले. सनदी नोकरीची परीक्षा इंग्लंडहून पास होऊन येण्याच्या खर्चाकरिता, त्यांना कर्ज मिळवून देण्याची व्यवस्थाही एका हितचिंतकाने करू घातली होती. पण त्यायोगे जीवनात किती दिवस केवढा मिंधेपणा येईल, याचा नुसता हिशेब मनाशी करून ती दिशा गोपाळरावांनी सोडली. डेक्कन कॉलेजात ज्यूरीसप्रूडन्सचा वर्ग सुरू झाल्याचे पाहून, नौकरी करून स्वावलंबनाने वकील होण्याचा निर्णय गोपाळरावांनी घेतला. टिळक-आगरकरांच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये नौकरीसाठी त्यांनी व त्यांचे एक सहाध्यायी गणपतराव पटवर्धन यांनी खटपट केली. तिला यश येऊन पस्तीस रुपये दरमहावर ते तेथे रुजू झाले. दोघांचीही शिक्षकी व कायद्याचा अभ्यास अशा कार्यक्रमांची जुगलबंदी सुरू झाली.

न्यू इंग्लिश स्कूलमध्ये प्रथम चवथ्या इयत्तेस व पुढे पाचव्या इयत्तेला गोपाळराव इंग्रजी शिकवीत. शिकवावयाचा धडा चिकाटीने इतका तयार करून ते वर्गात शिरत की पुस्तक न उघडताच ते धड्याचा उलगडा शब्दशः करीत. ग्रे-कवीची 'एलजी' एका वर्षी शिकवावयाची असताना, तीमधील ओळींच्या ओळी पाठ म्हणून जेव्हा ते काही शब्दसौंदर्याच्या, कल्पनासौंदर्याच्या, भावनोत्कटतेच्या आणि अर्थसंपन्नतेच्या बहारी सांगू लागले तेव्हा विद्यार्थ्यांना " आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेकः । आश्चर्यवत् कश्चिदन्यः श्रृणोति ।। " असे होऊन गेल्यास नवल नाही. १८८६ त मॅट्रिकच्या वर्गाला ते गणित शिकवावयास होते. त्या वर्षी नऊ विद्यार्थी

गणित विषयाचे शिक्षण घेण्यास पसंत झाले होते. त्यात खेडचे (जि. पुणे) सीताराम देशपांडे हे एक होते. गणित विषयाबद्दल टिळक–गोखले या दोघांचीही ख्याती होती. एकदा विद्यार्थी बोलता बोलता, त्या दोघांमध्ये श्रेष्ठ कोण असा ऊहापोह करीत होते. तो गोपाळराव गोखल्यांच्या कानावर जाताच, त्यांनी विद्यार्थ्यांस दिलखुलास सांगितले की, "टिळक ते टिळक, त्यांची सर मला येणार नाही."

गोपाळराव गोखल्यांना नुकतीच मिसरूड फुटू लागलेली, त्यांचा गौरवर्ण, कोवळा चेहरा आणि विनयशीलता यांचा परिणाम त्यांच्या शिकवणीच्या धाटणी-बरोबरच विद्यार्थ्यांच्या मनावर फार अनुकूल होई. वर्गातील मुलांत मूल म्हणून शोभून जाण्यासारखा हा तरुण पुढे फर्ग्युसन कॉलेजात प्राध्यापक म्हणून शिकवू-सवरू लागल्यावर तर वयाने लहान, पण बुद्धीने तरतरीत अशा त्या मूर्तीचे विद्यार्थिजगात मोठेच कौतुक होते. फर्ग्युसन कॉलेजात गोखले गणित व इंग्रजी, येवढेच नव्हे तर इतिहास नि अर्थशास्त्र हे विषयही शिकवू लागले. पुढे पुढे तर ज्या विषयाला उद्या शिकवण्यास प्राध्यापक नसेल, त्याची तयारी रात्रभर करून गोखले तो विषय दुसऱ्या दिवशी वर्गात सराईतपणे शिकवू लागले. गोपाळराव गोखले म्हणजे "नडलेल्या विषयाचे प्राध्यापक" असे एक विनोदी समीकरणच काही दिवस होऊन बसले होते.

पण वकील व्हावयास निघालेले गोखले शिक्षकीत व प्राध्यापकीत रमून, रंगून, समरसून गेलेच कसे? त्याचे असे झाले की, त्या काळी शिक्षकीत, वकिलीत अगर प्रतिष्ठेच्या अशा कोणत्याही व्यवसायात इंग्रजी माध्यमावर जवळ-जवळ शंभर टक्के भर असल्याकारणाने, गोपाळरावांनी १८८५ साली इंग्रजी-भाषाप्रभुत्व मिळवण्याचा निश्चय केला. मिल्टनचे "स्वर्गच्युति" हे काव्य, तशीच बर्क–ग्लॅडस्टन–जॉन ब्राइट यांची भाषणे, वॉरन हेस्टिंग्ज याच्या पार्लमेंटपुढील चौकशीच्या वेळची हिंदुस्थानसंबंधीची वक्तव्ये–अशी शेलकी शेलकी इंग्रजी पुस्तके १८८५ व १८८६ या सालांत गोपाळराव गोखल्यांनी अशी आत्मसात केली की, सदाशिव पेठेतील विष्णूच्या देवळाजवळील आपल्या शेजाऱ्याच्या हाती पुस्तक देऊन आपल्या पाठान्तरात एक चूक निघाली तर, एक आणा दंड देण्याची होड मुद्दाम लावूनही गोखल्यांना कधी दंड द्यावा लागला नाही. पर्वती अगर अन्य निर्वान्त स्थळ मिळेल तेथे त्यांचे पाठान्तरमंदिर सुरूच व्हावयाचे! या ग्रंथपाठान्तराबरोबर इंग्रजी वृत्तपत्रांचे वाचन आणि पाठ्यपुस्तकांचे चिंतन चालू असतानाच त्यांचा ज्यूरिसप्रूडन्सचा अभ्यासही सुरू होताच. सर्वांचा संकलित व संकरित परिणाम असा झाला की, गोखल्यांच्या तोंडी उत्तम इंग्रजी खेळू लागली आणि प्रथम प्रथम तरी विचारापेक्षा भाषेचेच सौंदर्य त्यांच्या वक्तृत्वात प्रकट होऊ लागले. पंचभूतात्मक शरीर तयार झाल्यावरच त्यात जसे चैतन्य

खेळू-चमकू लागते तसेच मग गोपाळरावांच्या वक्तृत्वाचेही झाले. त्याचा पडताळा त्यांनी १८८५ च्या शेवटी शेवटी प्रत्यक्ष कोल्हापुरास दिलेल्या एका व्याख्यानानेच आला. कोल्हापूरचे रेसिडेंट ली-वॉर्नर यांच्या अध्यक्षतेखाली " ब्रिटिश रियासती-तील हिंदुस्थान " या विषयावर गोपाळराव गोखल्यांनी एक जाहीर व्याख्यान दिले. तेच त्यांचे पहिलेवहिले लोकव्याख्यान इतके उत्कृष्ट ठरले की ली–वॉर्नरनी त्याची ओतप्रोत स्तुती केली आणि कोल्हापूरला गोखले शिकत असता त्यांना " पाट्या गोप्या " म्हणणारांना, आपला विद्यालयबंधू " मॅगॅस्थेनिस " झाल्याचा अभिमान वाटला.

वकिलीस आवश्यक असलेल्या खंडनमंडणात्मक प्रभावी वक्तृत्वाची अशी तयारी चालू असताच, १८८५ साल संपत यावयाच्या बेतास ज्यूरीस-प्रूडन्समध्ये गोपाळराव गोखले व त्यांचे सहाध्यायी गणपतराव पटवर्धन हे दोघेही यशस्वी झाले. पुढे आता एल्एल्. बी. ची हजेरी मुंबईस भरावयाची होती. त्यासाठी गणपतराव पटवर्धनांनी मुंबईस डेरे दिले. गोपाळराव गोखल्यांनी मात्र पुणे हायस्कुलातील एक शिक्षक गोविंदराव केळकर यांची सोबत-साथ घेऊन वर्गाच्या दिवशी मुंबईस जावयाचे धोरण धरले आणि पुण्यासच कायद्याचा अभ्यास चालविला.

" भाग्यासी काय उणे रे । यत्नावाचोनि राहिले । " असे प्रचीतीचे समर्थ-बोलणे असल्याकारणाने, आपल्या न्यू इंग्लिश स्कूलमधील पगाराच्या भरतीला गोपाळराव गोखल्यांनी आणखीही एक उद्योग आरंभला होता. पुणे हायस्कुलातील देशपांडे या मास्तरांना सहकारी घेऊन त्यांनी पब्लिक सर्व्हिस कमिशन–क्लास काढला. त्यात गोखले–देशपांडे आळीपाळीने शिकवू लागले. या क्लासमधून गोपाळरावांना दरमहा पसतीसपासून त्रेचाळीस (देखील) रुपयांपर्यंत प्राप्ती होई. लहानपणापासून गरीबीत दिवस काढलेले, मोजके पैसे काटकसरीने खर्चण्याची सवय, त्यामुळे दरमहा सत्तर रुपये हाती येणाऱ्या गोपाळराव गोखल्यांनी स्वतःसाठी वीस रुपये ठेवून बाकी सारे आपल्या अण्णांकडे पाठवावयाचे निश्चित केले. ते कर्तव्याच्या, कृतज्ञतेच्या आणि जबाबदारीच्या दृष्टीने योग्य असेच होते.

अशा घाईगर्दीच्या, कामाच्या आणि प्राप्तीच्या धमालीत गोपाळराव गोखल्यांची दोन वर्षे चालली असता, त्यांची भाग्यभगवती आध्यात्मिक क्रांती घडवीत होती. ज्या " थोर " पुणे न्यू इंग्लिश स्कूलमध्ये गोपाळराव गोखले शिक्षक झाले होते, त्याचे आवार नवचैतन्याने भारलेले होते. न्यू इंग्लिश स्कूल आणिक केसरी–मराठा संस्थापून ज्ञानजागराचा कालखंड नव्याने निर्माण करणाऱ्या आणि त्यासाठी मृत्यू, तुरुंगवास, उपहास वगैरे दुर्धर संकटे अंगावर कोसळली असताही आपल्या ध्येयनिष्ठेत यत्किंचित कमतरता येऊ न देणाऱ्या

"ग्राज्वेटपंचायतनाच्या" पावन अशा प्रकाशाचे वातावरण तेथे होते. डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना होऊन महाराष्ट्राची मान उंचावली होती. आपटे, नामजोशी, आगरकर, टिळक अशी विभूतिमत् सत्त्वे तेथे मूर्तिमंत संचरत–वावरत होती. पाश्चात्यांच्या संपर्काने नितान्त आवश्यक झालेले शिक्षण गोरगरीबांच्या सहज आटोक्यात आणून सोडणे हेच संस्थेचे ध्येय आहे असे जरी संस्थेचे आद्य शंकराचार्य शोभणारे विणुशास्त्री चिपळूणकर सांगून गेले असले तरी वामनराव आपट्यांनी एज्युकेशन–कमिशनपुढे दिलेल्या आपल्या साक्षीत, हिंदुस्थानात नवीन पिढी कशी तेजस्वी निर्माण झाली़च पाहिजे, याच्या अपेक्षा मांडून राष्ट्राची रचना जर शाळाशाळांच्या वर्गावर्गातून होते, तर तेथे शिक्षण कोण्या तोलामोलाचे हवे, याच विचाराचे पायाशुद्ध विवरण केले होते. मग राजाराम कॉलेजात असल्यापासून गोपाळराव गोखल्यांच्या मनात उमललेला त्या देशभक्तासंबंधीचा पूज्यभाव आता फुलू लागणे साहजिक नव्हते काय? त्यामुळेच टिळक-आगरकरांच्या सांगीवरून केसरीत कसोशीने वर्तमानसार व मराठ्यात "युरोपातील सर्वराष्ट्रीय महायुद्ध" सारखी लोकप्रिय लेखमाला गोपाळराव गोखल्यांनी लिहिली होती. गोपाळरावांचे सगे–सहाध्यायी गणपतराव पटवर्धनांनी स्वानुभव सांगितला आहे की, सन १८८५–८६ साली टिळक-आगरकरांची व त्यातही टिळकांची जबरदस्त मोहिनी गोपाळरावजींच्या मनावर होती. १८८५ साली ज्युरीसप्रूडन्सची परीक्षा झाल्यावर टिळक, आगरकर, आपटे, धारप, गोळे, नामजोशी अशा डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या आधारस्तंभांनी व्यक्तिशः आणि सामूहिकरीत्या, अगदी सहज म्हणून, जेव्हा सोसायटीत सामील होण्याबद्दल सूचक प्रश्नांनी चौकशी चालविली, तेव्हा गोपाळरावांचे मन, विशेषतः टिळकांच्या शब्दाने, थोडे दिपल्यासारखेच झाले! सोसायटीच्या वाढत्या व्यापाचा आटोप सांभाळण्यासाठी हुशार, होतकरू, गुणी व कार्यक्षम तरुण वेचीत जाण्याकडे सोसायटीच्या संस्थापकांचे व चालकांचे साहजिकच लक्ष होते. म्हणून टिळकप्रभृतींच्या शब्दाला मान द्यावयाचा तर त्यांच्या मांडीला मांडी लावून बसण्याचा योग येणार तो भाग्यभगवतीचा प्रसाद! पण त्याचा आस्वाद घेण्याचे धाडस करण्यात आपण पायरीला पाय लावण्याचा प्रमाद तर करणार नाही ना, असा एक विकल्प गोपाळरावांच्या मनात काही काळ येत राहिला. कदाचित सूर्यासन्निध जाण्याची संधी आल्यावर अमावास्येचा जसा अनुभव चंद्राला येतो, तशी आपली अवस्था होईल की काय, असाही बागुलबुवा गोपाळरावांना क्षणभर वाटला असेल! पण या दोनही शंकांचे अनुभवाने निरसन होत गेले. "गुणी गुणान् वेत्ति" असा प्रत्ययबोध हळूहळू होऊ लागला. १८८६ साली गोखले व आगरकर या दोन गोपाळरावांचा सहवास-संवाद आयुष्यातील कार्यभागावर, जन्मसार्थक्यावर, भारतीयांच्या प्रस्तुत कर्तव्यावर पुष्कळच पुष्कळ झाला. आणि? अंतःकरणाची

ऋजुता, निरपेक्षता, आणि भरीला स्वार्थत्यागपूर्वक राष्ट्रसेवावृत्तीची साधुता, यांच्या प्रीतिसंगमावरील त्या संवादाने गोखल्यांच्या मनातील "हो–ना"चा वाद तुटला आणि तो संवाद हितकारी ठरला.

तरीही वडील बंधू वगैरेंची संमती मिळाल्याशिवाय गोपाळराव गोखले सोसायटीला मिळण्यास ठाम होकार देईनात. अखेर गोखल्यांच्या अण्णांची संमती मिळवण्यात आली. त्यासंबंधी १९१० साली (डॉ.) राजेंद्र प्रसादांशी कलकत्ता येथे झालेल्या संवादाचा उल्लेख राजेंद्रबाबूंनी आपल्या आत्मचरित्रात करताना, गोखले असे म्हणल्याचे सांगितले आहे की, "माझ्या घरच्या लोकांनी फार मोठ्या आशा बाळगल्या होत्या की, माझे शिक्षण झाल्यावर मी गडगंज मिळवीन आणि त्यांना सुखात ठेवीन. जेव्हा का त्यांच्या सर्व आशांवर थंडे पाणी शिंपडून मी देशसेवेला माझे जीवन अर्पण केले, त्या वेळी माझे बंधू इतके बेचैन झाले की, काही दिवस त्यांनी माझ्याशी बोलणेच वर्ज्य केले. पण लवकरच जेव्हा माझे जीवन-कार्य म्हणजे काय आहे, हे त्यांच्या नजरेस आले तेव्हा ते व दुसरीही मंडळी पहिल्यासारखीच माझ्यावर प्रेम करू लागली." तात्पर्य, थोरामोठ्यांचा शब्द मोडावयाचा नाही म्हणून थोड्या सक्तीच्या नैतिक खुषीने वडील बंधूंनी संमती दिल्यामुळे १८८६ च्या उत्तरार्धात गोपाळराव गोखले डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे एक घटक बनले. "सर्वेषां संमत्या" नव्हे तर "सर्वेषामविरोधेन"च भारतीय संस्कृतीचे धारक आपली कार्याची देवके ठेवतात. गोखल्यांनी तेच केले.

☒ ☒ ☒

६ : वादळ – वारे

डेक्कन एज्युकेशन सोसायटीत सामील झाल्याने आता गोपाळराव गोखल्यांना "ठायीची जोड" मिळाली. ती स्वीकारताना आपल्या गणपतरावदादा पटवर्धन-प्रभृती स्नेहांकितांना त्यांनी स्वच्छच सांगून टाकले की, "फिराल तुम्ही शिबिका-माजी अन् मी पायी चालेन।" आणि खरोखरच गोखले यापुढे निष्ठावंत भक्ताप्रमाणे "मार्गाधारे वर्तावे । विश्व मोहरे लावावे ॥" या आध्यात्मिक प्रेरणेने कामास लागले. १८८६ च्या अखेरीस व १८८७ च्या प्रारंभी गोपाळराव अंकगणिताचे पुस्तक इंग्रजीत लिहीत होते. ते पुरे झाल्यावर त्यांनी ते टिळकांस दाखवले आणि टिळकांनी ते पसंत करून "छापवा" म्हणून सांगितल्यावर गोखल्यांनी त्याची पहिली आवृत्ती "शिराळकर आणि मंडळी" या महाराष्ट्रीय प्रकाशकाकडून लोकांपुढे मांडली. गोखल्यांचे ते अंकगणित इतके लोकप्रिय झाले की, त्याची नवी आवृत्ती लवकरच निघाली व पुढे १८९६ साली ते मॅक्मिलन् कंपनीने घेतल्यावर त्याचा पद्धतशीर फैलाव सर्व हिंदुस्थानात व बाहेरही झाला. त्यायोगे गोखले यांस कंपनीकडून पंधराशे रुपयांचे वर्षासन मिळू लागले. सोसायटीचे आजन्म सभासद होण्यास संमती देण्यापूर्वीचा गोखल्यांच्या बुद्धीचा तो परिपक्व उद्योग असल्याकारणाने, त्या उद्योगाला पुस्तकरूप आले ते जरी गोखले सोसायटीत आजन्म सेवक झाल्यावर आले असले तरी त्या मूळ उद्योगाचेच वर्षासन गोखल्यांना मिळते आहे, हे जाणून ती प्राप्ती व्यक्तिशः घेण्याची मुभा सोसायटीने त्यांना त्यांच्या परिस्थितीचा विचार करूनच दिली असावी !

गोपाळरावजी गोखले डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सेवक झाल्यावर, फर्ग्युसन कॉलेजातील पी. ई. च्या वर्गास १८८७ त इंग्रजी शिकवू लागले. "सौदे" कृत नेल्सनचे चरित्र त्यांना शिकवणे आले. दर्यावर्दी राहणीचे व नौकानयनाचे सम्यग्ज्ञान असल्याशिवाय तो ग्रंथ शिकवणे कठीण ! समुद्र, गलबते, वादळे, तारवे, नाखवे, खलाशी यांच्यासंबंधी अगोदर आपल्याला स्पष्ट कल्पना याव्यात आणि "आडात असले तर पोहऱ्यात येणार" या न्यायाने त्या त्या कल्पना विद्यार्थ्यांना स्पष्ट देता याव्यात म्हणून गोखले वरचेवर मुंबईस जाऊन

तारवांच्या निरनिराळ्या भागांचे समक्ष "दर्शन हेळामात्रे" घेऊ लागले. "अचूक यत्न तो देवो।" हेच खरे.

त्राटिकाकर्ते प्रा. वासुदेवराव केळकर यांच्या जोडीने गोपाळराव गोखले इंग्रजी शिकवीत. पण केळकरांच्या सहृदयतेची व मार्मिकतेची ते तोड करू शकत नसत. शाळेतील अथवा कॉलेजातील सुटीच्या व सुट्टीच्या तासात ते काम मागून घेत अगर ग्रंथालय चाळीत बसत. टिळकांनी १८८९ मध्ये डे. ए. सोसायटीचा राजीनामा दिल्यावर कॉलेजमध्ये गोखले एक-दीड वर्ष गणितही 'घेत' होते. पुढे त्यांनी धोंडो केशव कर्वे यांना सोसायटीत आणल्यावर कर्व्यांच्याकडे गणित सोपवून ते इंग्रजी, इतिहास, अर्थशास्त्र 'घेऊ' लागले. १८८७ साली नेल्सनचे चरित्र शिकविताना गोपाळरावांना जशी अडचण पडली तशी ती पुढे पुढे पडेनाशी झाली. इंग्रजी बोलण्यात आणि शिकविण्यात ते उत्तरोत्तर तरबेज होऊ लागले. त्यांना इतिहासाची आणि अर्थशास्त्राची विशेष गोडी असल्याने त्या विषयांचे परिशीलन आणि "सार्वजनिक सभेच्या" निमित्ताने कराव्या लागणाऱ्या प्रश्नांचा अभ्यास हे परस्परांस पूरक ठरले.

१८९२ पासून तीन वर्षे गोपाळरावजी गोखल्यांस कॉलेजात शिकवण्याखेरीज, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचेच दुसरे काम करावे लागले. १८८० पासून प्रथम न्यू इंग्लिश स्कूलसाठी व पुढे डे. ए. सोसायटीसाठी द्रव्यनिधी जमविण्याचे काम माधवराव नामजोशी यांचेकडे होते. सरकारशी, इतर संस्थांशी आणि लोकांशी सोसायटीसंबंधाने जी खटपट करावयाची ती आपल्या अंगच्या खुबीने व प्रसंगावधानाने नामजोशींनी करावयाची असा शिरस्ता होता. "राखावीं बहुतांचीं अंतरें। भाग्य येते तदनंतरें॥" हे नामजोशी यांना इतके साधले होते की, त्यांनी सोसायटीसाठी पाऊण लाख रुपये निधी जमविला. फर्ग्युसन कॉलेज पूर्ण कॉलेज करावयास सरकारी परवानगी मिळण्याची चिन्हे दिसताच, कॉलेजकरता गावाबाहेर एक इमारत बांधण्याची व्यवस्था सोसायटीला करावी लागली. तिच्याकरिता वर्गणी जमविणे अवश्य होते, तरी त्याच सुमारास सोसायटीमध्ये अंतःकलहाने पेट घेतल्यामुळे १८९०–९१ मध्ये वर्गणीचे ते काम झालेच नाही. गोपाळराव गोखले सोसायटीत नवे होते. ते सोसायटीच्या "वडील मंडळीत" नव्हते. अंतःकलहाची हमरीतुमरी वडील मंडळीत चाले. फाजील घमेंडीमुळे अगर बरोबरीच्या दुसऱ्यांना तुच्छ लेखण्याच्या सामाजिक सवयीमुळे व लौकिक महत्त्वाकांक्षेमुळेच त्या हमरीतुमरी होत. गोपाळराव गोखल्यांचा जीव त्या हमरीतुमरीने पिळवटल्यासारखा होई. महाराष्ट्राच्या बोकांडी बसलेल्या त्या अहंकारभुताला पाश्चात्त्य संस्कृतीच्या संपर्कानेही कशी गती मिळाली नाही याचे गोखल्यांना सखेदाश्चर्य वाटे.

"मनुष्य पहावा बसून आणि जमीन पहावी कसून" अशी जुनी म्हण आहे. तिचे प्रत्यंतर विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या मृत्यूनंतरही (१७ मार्च १८८२) डे. ए. सोसायटीसारख्या संस्था आदर्श करणाऱ्या मंडळींत येऊ लागले. गोखले बी. ए. झाले त्या १८८४ च्या २४ ऑक्टोबरला डे. ए. सोसायटी स्थापन झाली. १८८५ झाली गोखले ज्यूरीसप्रूडन्सची परीक्षा पास झाले. त्याच्या प्रारंभी २२ जानेवारीला फर्ग्युसन कॉलेजचा शुभारंभ झाला आणि डिसेंबर २८ ला इंडियन नॅशनल काँग्रेस स्थापन झाली. तिच्या अधिवेशनाला पुण्याचे प्रतिनिधी म्हणून गोपाळराव आगरकर गेले होते. अशा जेसुइटपंथाच्या पद्धतीवर देशसेवा करावयास निघून चढत्या वाढत्या पदवीने संस्था चालविणाऱ्या महाभागांत पगारवाढ, अन्य-व्यावसायिक प्राप्ती यांसंबंधी खरोखर तंटे तरी व्हावेत का ? विष्णुशास्त्रींच्या पाठीमागे टिळक आणि आगरकर यांना लोक एकनाळ भावासारखे समजत होते. बोलला शब्द चाटणार नाही, लिहिला शब्द खुडणार नाही, टाकले पाऊल मागे घेणार नाही, या पिळाचे तरुण तयार करण्याकरिता ज्ञानजागराचे कंकण बांधून राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा करण्यासाठी बद्धपरिकर झालेली ही जोडी. बर्वे-प्रकरणानंतर डोंगरीच्या तुरुंगात यांच्या वाटाघाटी चालू असता यांचे मतभेद झाले. अर्थात तात्त्विकापेक्षा व्यावहारिकातील कोणत्या अंगावर विशेष भर द्यावा याबद्दलच ते होते. आपल्या देशाचे दुर्दैव सर्व बाजूंनी ओढवले याचे कारण एक पारतंत्र्य, ते नाहीसे झालेच पाहिजे, याबद्दल दुमत कोठेच नव्हते. आणि पारतंत्र्याचे एक सगळ्यांच्या डोळ्यात सलणारे शल्य जे परछत्र किंवा परकीय सत्ता ती उडवून लावावयाला हरएक उपायांनी सर्वोनीच झटले पाहिजे याबद्दल टिळक-आगरकरांचाच काय, पण दुसऱ्या कोणाही विचारवंत देशभक्तांचा मतभेद नव्हताच. तसेच जगाच्या नव्या जमान्यात हिंदुस्थानाला तारीखतागायत प्रतिष्ठेने जगता यावे म्हणून हिंदुस्थानातील जीवनप्रथाप्रणालीमध्ये आवश्यक ते फरक, भारतीय संस्कृतीस धरून, लोकांचे लोकांनीच करावयास हवेत याबद्दलही कोणाचे दुमत नव्हते. पण राजकीय पारतंत्र्य येण्यास व ते येथे शेकडो वर्षे स्थिर होऊन, अठराशे मैल लांबीच्या व तितक्याच रुंदीच्या या केदारेश्वरापासून कन्याकुमारी-पर्यंत व सोमनाथापासून जगन्नाथापर्यंत विस्तृत असलेल्या देशाचे सुंदर एक-जिनसीपण पार बिघडून टाकण्यास आपल्या ऐतिहासिक व सामाजिक परंपरेने जी कारणे झाली आहेत, त्यांचेही निर्मूलन राजकीय पारतंत्र्य हलविता हलविताच नेटाने केले पाहिजे असे गोपाळराव-आगरकरांचे म्हणणे होते; तर एकदा का राजकीय पारतंत्र्य पूर्ण जाऊन आपण आपल्या घरचे संपूर्ण मालक झालो की सगळे घर साफ करणे हातचा मळ आहे, असा टिळकांचा आग्रह होता. सुधारणांस नाव काही दिले तरी त्यांचे लक्ष्य एकच हवे की समाजाच्या व राष्ट्राच्या जीवनाचा "प्रवाहो चालला म्हणजे बरे. त्याला तुंब बसता कामा नये" याबद्दलही मतभेद

नव्हत्या. " असंतोषः श्रियो मूलम् " हे त्या सर्व सुधारणांचे व्यवहारसूत्र असावे, याबद्दलही वाद नव्हता. वाद होता तो, आंपल्या येथील सर्व दोषांचे गाठोडे बांधून त्याबद्दलचे विरोधाचे घण परकीय सत्तेच्या अंगोपांगांवर मारीत बसण्याचेच केवळ कार्य करावयाचे व ते संपल्यावर क्रांतिवादी सुधारणांकडे वळावयाचे व राजकीय क्रांती साधेपर्यंत दुसऱ्या सुधारणा ज्या करावयाच्या त्या करणे असल्यास त्या " सयुक्तिक, आवश्यक व सुकर " असतील तेवढ्याच करून लोकसंग्रहाच्या पाठिंब्यावर परकीय सत्तेला शह देत बसावयाचे ? का ? जसे सरकारछंदानुवर्तन करावयाचे नाही तसेच लोकछंदानुवर्तनही न करता, लोकांस तूर्त अप्रिय पण पथ्यकारक विचार सांगून, पारतंत्र्याच्या आगमनास व पोषणास कारण झालेले दोष राजकीय पारतंत्र्याबरोबरच नष्ट होतील अशी दक्षता घेऊन, राजकीय स्वातंत्र्य स्थिर करण्याची भूमिका जय्यत तयार करून ठेवावयाची ? नेतृत्वाच्या नेटकेपणावर असले प्रश्न सुटत असल्याकारणाने आणि दुसऱ्या विचार-धारेत परसत्तेबरोबरच स्वजनांतील पारंपरिकांचा असा दुहेरी रोष होण्याची भीती पुष्कळच असल्याकारणाने, त्या दुहेरी जाचात सापडून कदाचित् सर्व कार्याचाच विचका होईल, म्हणून पहिल्या विचारधारेला पाठिंबा मिळाला. परिणामी आगरकरांना केसरीचे संपादकत्व सोडावयास लागून २५ ऑक्टोबर १८८७ पासून टिळक हे मराठा–केसरीचे सर्वस्वी जबाबदार संचालक झाले.

पण डेक्कन एज्युकेशन सोसायटीत आता (१८८५ पासून) मराठा-केसरीशी संबंध नसलेलेही लोक आलेले होते आणि त्यांना व मूळच्या मंडळींसही सोसायटीच्या बाहेरील कामे करून सांभाळून सोसायटीतील कर्तव्ये पार पाडावयास भरपूर तकवा राहील की नाही हा एक प्रश्न होता; आणि सोसायटीबाहेरील प्राप्ती सोसायटीकडेच सर्व मंडळींनी जेसुइट तत्त्वाप्रमाणे जमा करावयास हवी, असा दुसरा प्रश्न हाता. सोसायटीच्या बाहेरची म्हणजे मराठा-केसरी चालविण्याची कामे करून सोसायटीतील कामे जशी चोख कर्तव्यनिष्ठेने येथपर्यंत साधली तशीच सोसायटीच्या प्रतिष्ठेला व कार्यक्षमतेला कमीपणा न येता दुसरीही काही काही लोकोपयोगी सेवेची कामे नव्याजुन्यांपैकी कोणाही सभासदाला करण्याचा आवाका असेल, तर त्याने बिघडणार तर काहीच नाही; उलट सोसायटीचा लौकिकच वाढेल, असे नव्या दमाच्या आणि आत्मविश्वासाच्या मंडळींचे म्हणणे होते. आणि केवळ समाजसेवाभावाने आपल्या अंगच्या गुणांचा उपयोग, (सोसायटीची प्रतिष्ठित कार्यक्षमता सांभाळून) होऊं देण्यात कोणाचीही हरकत असू नये, अशी ती विचारसरणी होती. सोसायटीच्या कामाव्यतिरिक्त जी समाजसेवा करावयाची ती आर्थिक मोबदल्यासाठी केली तर सोसायटीसंबंधाच्या कर्तव्यक्षमतेला शिथिलता येईल आणि तीच स्थिति बिनमोबदल्याने सेवा देतानाही काळ व परिश्रम यांच्या अप्रमाण व्ययानेही येईल. म्हणून सोसायटीबाहेरील सेवा मर्यादेतच

हवी याबद्दल कोठे मतभेद नव्हते. त्या सेवेबद्दल काही आहेर कोणी दिल्यास तो सोसायटीकडेच जमा व्हावा असेचं सर्वांचे म्हणणे होते. तथापि कोणी व्यक्ति-विशेषासाठी आखूनच देणगी दिली तर त्या दात्याच्या इच्छेस सोसायटीने का मान देऊ नये ? आणि अशाही स्थितीत सोसायटीशी आपण सलग्न आहो, म्हणूनच आपल्या विशेषांचा आविर्भाव आपल्याला सार्वजनिक सेवेत साधता आला, या कृतज्ञतेच्या जाणीवेने व्यक्तिविशेषासाठी स्वतःस मिळालेली देणगी त्या व्यक्तीने सोसायटीस दिली, अर्पण केली तर त्याच्याइतकी दुधात साखर दुसरी कोणती ? आणि हे सर्व केव्हा ? तर मूळ सोसायटीची परिस्थिती खणखणीत असेल तेव्हाच; एरवी सोसायटीच्या कार्यक्षमतेची व खणखणीतपणाची आबाळ कसल्याही परिस्थितीत होताच कामा नये म्हणून व्यक्ति-विशेषाचेही गौरव सोसायटीकडेच जमा व्हावे.

पण "शास्त्रात्प्रवृत्तिः शास्त्रान्निवृत्तिः" चोखपणे ठरवावयाची तर कसलीही किफायत प्रथम सोसायटीकडे जमा व्हावयास पाहिजे आणि तेथे सर्व पोक्त विचार होऊन, मग वरील बारकाव्यांनी विल्हे झाली तर झाली; जी काय होईल ती मान्य व्हावयास हवी, असा एक कर्तव्यकठोर आक्षेप वरील विचार-सरणीवर होता. त्याच धाटणीत असेही निघाले, की (आगरकरांसारख्या) गरीबाला संसारासाठी अधिक पैशांची गरज असेल तर, त्यास त्याची स्थिती लक्षात घेऊन जास्त पगार द्यावा, पण मुळात सोसायटी–स्थापनेच्या वेळी केलेला संकल्प मोडून टाकू नये. टिळकांची व त्यांच्या साथींची ही विचारसरणी खंबीर होती. तथापि, संस्थेची आर्थिक स्थिती चांगली असता सर्वांसच पगारवाढ होण्यात निःपक्षपातीपणा आहे; गरीबीच्या उणेपणामुळे अधिक पैसे घेऊन नियमाला अपवाद होऊन आपल्या संकल्पसंमत वा अभिजात स्वाभिमानाला नि बाणेदारपणाला का कमीपणा घ्यावयाचा ? दुःख, दारिद्र्य आणि धाक हे ज्यांच्या पाचवीलाच पुजलेले आहेत अगर सोसायटीच्या परिस्थितिसापेक्ष ती व्रते ज्यांनी अंगीकारली आहेत, त्यांचे सुख, स्वास्थ्य आणि धमक, सोसायटीची अनुकूल परिस्थिती असता, का वाढू नयेत ? जे काही करावयाचे ते सर्वांसाठी व्हावे, तरच करावयाचे, एरवी नाही, अशी विचारधारा आगरकरांच्या बाजूने जोरात येत असे. लोकशिक्षणार्थ व ज्ञानजागरासाठी काढलेली जेसुईटपद्धतीवरील संस्था कमीत कमी प्रतीवर सर्वांनी चालवावयाची, या तत्त्वाला बाध येतो, तेव्हा प्रसंगानुसार व संस्थेची अनुकूल स्थिती आहे म्हणून का होईना, कोणालाच तत्त्वभ्रष्ट व्हावे लागता कामा नये, असे टिळकांचे मत होते. संस्थेच्या प्रतिकूल वा सामान्य आर्थिक अवस्थेत पोट मारूनही काम करावयाचे याला कोणाचीच ना नव्हती; पण अनुकूल आर्थिक अवस्थेत सगळ्यांनी घेतला तरच खास स्वास्थ्य देईल एवढा तनखा घ्यावयास हरकत नसावी, असा आगरकरप्रभृतींचा विवेक होता. अशा या उभय विचारधारांतील

समतोल सांभाळावयाची ताकद सूक्ष्म दृष्टी असणाऱ्या मंडळींना असावयाची; तो काही नुसत्या संख्याबलाचा विषय नव्हे; हेच या वादातील खरे इंगित होते.

अशाच अनुषंगाने वामनराव आपट्यांच्या संस्कृत गाईड– डिक्शनरीबद्दल नि गोखले यांच्या अंकगणिताबद्दल व विशेषतः गोखल्यांनी, निर्वेतन का होईना, पण सार्वजनिक सभेतील काम पत्करल्याबद्दल सोसायटीच्या वडील मंडळींत ऊहापोह झाले. टिळकांच्या यंत्रशास्त्रावरील (Mechanics) पुस्तकाबद्दल कोणी नाव काढले नाही. आपट्यांसारखा विद्वान सोसायटीला हवाच म्हणून त्यांच्या प्रत्येक विद्वदुद्योगास सर्वांनी मान्यता देऊनच त्यांना घेतल्यामुळे, उत्साहभरीच्या उल्लेखापलिकडे त्याला गंभीर स्वरूप आले नाही. गोखल्यांबाबत तसे नव्हते. म्हणून, आपल्यामुळे टिळकांचे मतभेद होऊन टिळक सोसायटी सोडत असतील, तर टिळकांसारखा मोहरा सोसायटीने गमावण्यापेक्षा आपणच सोसायटी सोडावयास तयार आहोत, असे टिळकांचा राजीनामा आला असता, गोखल्यांनी सर्व "वडिलांपुढे" स्पष्ट केले. पण अशा गोष्टींचा काही उपयोग न होता, सगळेच आपापल्या मताला घट्ट धरून बसले आणि परिणामतः १८९० साली टिळकांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा कायमचा निरोप घेतला. टिळकांच्याबरोबर त्यांचे सहकारी नामजोशी व प्रा. पाटणकर हेही सोसायटी सोडून गेले. ते गेल्यावर, नामजोशींकडची जबाबदारी गोपाळराव गोखल्यांच्याकडे आली.

☒ ☒ ☒

७ : शिक्षण-सेवा

सोसायटीतील नामजोशांच्या जबाबदारीची धुरा गोपाळराव गोखल्यांनी खांद्यावर घेतल्याकारणाने, कॉलेजला सुट्टी लागली की काखेस झोळी लावून गोपाळराव वर्गणी गोळा करण्यासाठी फिरू लागले. नाना मतांच्या, नाना लोकांची गाठ घेणे, त्यांची समजूत घालणे व देशाच्या दृष्टीने डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या कार्याचे महत्त्व पटवून देणे ही कामे गोखल्यांना साहजिकच करावी लागली. गुलाब सुखवितो, पण त्याचेच काटे दुखवितात;, थोरांच्या ओळखी होतात, निरनिराळे विचारप्रवाह मेंदूवर आदळतात. "ब्राह्मणू हिंडता बरा।" असे अनुभव देणारा हा निधी जमविण्याचा उद्योग सर्व इलाखाभर वणवण हिंडून गोपाळरावांनी केला आणि हाती आले ते प्रत्येक तुळशीपत्र सोसायटीच्या चरणी कारणी लावले. १८९२ साली संपूर्ण आर्ट्स् कॉलेजचे स्वरूप फर्ग्युसनला आले. आणि त्या कॉलेजच्या नव्या इमारतीचा पाया घालण्यात आला. तीन वर्षांत सर्व इमारत पूर्ण झाली आणि त्या वेळी कॉलेजचे प्राचार्य असलेल्या गोपाळराव आगरकरांचे तोंडी उद्‌गार उमटले की, "राचिला ज्याचा पाया त्याची भली उभारणि झाली।" पुढे १८९५ पासून वसतिगृहे होऊन डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्वतःच्या पायावर उभी राहिली.

पण १८९५ च्या १७ जूनला गोपाळराव आगरकर वारले. त्यांच्या मृत्यूने लो. टिळकांसारखा हिमालय जर विरघळला, तर गोपाळराव गोखले-प्रभृतींना काय झाले असेल! पण आल्या प्रसंगाला तोंड देऊनच काळावर मात करावी लागते. तेव्हा डेक्कन कॉलेजचे प्रि. सेल्बी यांचे पट्टशिष्य गोविंद चिमणाजी भाटे हे आगरकरांच्या 'सुधारका'ने उत्स्फूर्त केलेले सद्‌गृहस्थ डे. ए. सोसायटी-साठी मिळवून गोखल्यांनी आगरकरांची रिकामी खुर्ची भरून काढली. फर्ग्युसन-मधील तर्कशास्त्र—तत्त्वज्ञान यांच्या शिकवणीचा धागा चालू राहिला. त्यापूर्वीच प्रा. वासुदेवराव केळकर यांच्या मृत्यूमुळे इंग्रजीच्या प्राध्यापकाची जागा रिकामी झाली होती ती कराचीच्या कॉलेजातील नाणावलेले व बायबलसदृश शुद्ध इंग्रजीचे निष्णात प्राध्यापक वैजनाथ काशिनाथ राजवाडे यांना देवबून गोखले यांनी विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या शैक्षणिक-क्षमता-कल्पनेची सांगता केली.

सन १८९६ साली गोपाळराव गोखले पदवीधरांतर्फे मुंबई विद्यापीठाचे फेलो म्हणून निवडून आले. हयातीच्या अखेरपर्यंत म्हणजे दीड तप ते त्या विद्यापीठाचे फेलो होतेच. कर्झनसाहेबांच्या युनिव्हर्सिटी–ॲक्टनंतर गोखल्यांस मुंबई विद्यापीठानेच फेलो नेमले. एक वर्ष सिंडिकेट्चेही ते सभासद होते. राजकारणाच्या वा अन्य जरूरीमुळे गोखले गैरहजर असले तर भाग वेगळा; पण शिक्षण हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय असल्या कारणाने, विद्यापीठातील वादविवादात ते अभ्यासपूर्वक लक्ष घालीत. लॉर्ड सिडनहॅम् (सर जॉर्ज क्लार्क) यांनी विद्यापीठातील अभ्यासक्रमातून इतिहास हा विषय काढून टाकण्याचा प्रयत्न केला. त्या प्रतिगामी धोरणाचा जोराने निषेध करताना गोखल्यांनी बजावले की, ज्या राष्ट्राला इतिहास नाही, त्याला भावी काळ घडविता येत नाही, हे अर्धसत्य आहे; पण ज्या राष्ट्राला इतिहास आहे, त्या राष्ट्राची भावी पिढी इतिहासाच्या अज्ञानात ठेवून, इतिहासाभ्यासाने येणाऱ्या आत्मविश्वासाला पारखी करावयाची आणि दुसऱ्याही देशाच्या इतिहासापासून मिळणारा बोध त्यांना घेऊ द्यावयाचा नाही, हे त्या राष्ट्राचे खच्चीकरण तर आहेच, पण पर्यायाने मानव्याचे अस्तित्वच संपुष्टात आणण्याचा तो राक्षसी डाव आहे. गोखल्यांच्या अशा प्रखर विरोधामुळेच विद्यापीठाच्या कारभारात चाललेल्या सरकारी ढवळाढवळीला आपोआपच पायबंद पडत गेला. पदवी परीक्षेस इतिहास हा विषय ठेवण्यासंबंधीचे गोपाळरावांचे हे मोठे संस्मरणीय भाषण आहे. राजनीतिशास्त्राचा अभ्यास आणि अर्थशास्त्र हा विषय बी. ए. ला आणि हिंदुस्थानची आर्थिक स्थिती हा विषय एम्. ए. ला ठेवण्यात गोपाळराव गोखल्यांचेच परिश्रम कारणीभूत झाले. ते इतिहास व इंग्रजी या विषयांचे विद्यापीठीय परीक्षकही कित्येक वर्षे होते. १८९६ साली "हल्लीचा शिक्षणक्रम" हे त्यांचे मुंबई ग्रॅज्युएट्स असोसिएशनपुढील व्याख्यान असेच साधार मार्गदर्शक म्हणून ख्याती पावले.

शैक्षणिक क्षेत्रात गोपाळरावजी गोखल्यांचे हे असे कार्य चालू असतानाच, १८८८ पासून सार्वजनिक सभेचे प्रमुख या नात्याने शिक्षणक्षेत्राबाहेरही सार्वजनिक सेवेचे त्यांचे कार्य सुरू झाले होते, त्याचाही व्याप व परिघ सारखा "प्रतिपच्चंद्रलेखेव" वाढत होता. १९०२ पासून वरिष्ठ विधिमंडळातील काम सुरू झाल्याने फर्ग्युसन कॉलेजमधील कामाचा संपर्क कमी कमी होऊ लागला. तेव्हा कॉलेजमधून १९ सप्टेंबर १९०२ रोजी त्यांनी निवृत्तिपूर्व रजा घेतली. साहजिकच विद्यार्थ्यांस गहिवर आला. इंग्रजी भाषा तिच्या असंख्य बारकाव्यासुद्धा मनोरंजकपणे शिकविणारा प्राध्यापक म्हणून, इतिहास–अर्थशास्त्रांचा अभ्यास देशोदेशींच्या समस्यांशी तुलना करून शिकवणारा आणि हिंदुस्थानच्या तरुणांनी नवा इतिहास किती साक्षेपाने, बारकाव्याने, शीलवंतपणाने आणि सावधानतेने घडविला पाहिजे हे साधकबाधक शक्तियुक्तीचा ऊहापोह करून सांगणारा प्राध्यापक

म्हणून विद्यार्थ्यांना गोखल्यांनी एक प्रकारचा लळाच लावला होता. असा प्राध्यापक आपणास सोडून जात असल्यामुळे फर्ग्युसनच्या विद्यार्थ्यांचे कंठ दाटून आले. १८९५ पासून गोखल्यांची कॉलेजात झालेली व्याख्याने म्हणजे ज्ञानाची सदावर्ते होती. एक अजोड सहकारी जाणार म्हणून गोखल्यांचे सहकारी प्राध्यापकही, काहीशा गुदमरलेल्या मनोवृत्तीत गेले. परंतु पुण्याचे गोखले मुंबई प्रांताचे होता होता, आता अखिल भारताचे होत आहेत, या त्यांच्या चढत्या वाढत्या पदवीने आनंद पावून फर्ग्युसनचे प्राध्यापक गोखले हिंदुस्थानच्या कारभाराची दिशा कशी असावी याचे शिक्षण परकीय नौकरशाहीला व पर्यायाने आपल्या देशबांधवांना देण्यासाठी जात आहेत, हा संतोष सर्वांनाच वाटत होता. याच आनंदमिश्रित भावनेने गोपाळराव गोखल्यांना १९ सप्टेंबर १९०२ रोजी मोठ्या सत्कार-समारंभाने निरोप देण्यात आला.

सत्कारास उत्तर देताना गोपाळराव गोखल्यांचे प्राध्यापकीय गोड व मृदू मन भरून आले. त्यांनी उत्तरादाखल त्या वेळी केलेले भाषण त्यांच्या अमर भाषणांपैकी एक असे गणले जाते. ज्या शिक्षणसंस्थेची सर्वतोपरी भरभराट व्हावी म्हणून आपल्या आयुष्यातील ऐन उमेदीची, उत्साहाची, लाथ मारू तेथे पाणी काढू अशा आत्मविश्वासाची, आणि प्रतिष्ठा, पैसा व कर्तृत्व करू अशा महत्त्वाकांक्षेची भरघोस वर्षेच वर्षे निरपेक्षपणे तन-मन-धन खर्चून ज्या शिक्षणसंस्थेच्या पायी आपण वाहिली, जेथे आपले सहकारी मित्र व उमलते विद्यार्थी पाहून, हेरून आपण जीवनात नवोनव रस घेत आलो आणि जेथे कर्त्या वडीलधाऱ्यांचा मान असल्यामुळे आपल्या दिलाची जपणूक व धोरणाची दखल, न सांगताच, घेतली जात होती ती संस्था सोडून जाताना, त्यांच्या साऱ्या जिव्हाळ्याच्या भावना, सर्व पूर्वस्मृती आणि आनुषंगिक दिव्ये, गोपाळराव गोखल्यांच्या मेंदूत एकदम जागृत झाली असली तर अस्वाभाविक काहीच नाही. आता ते लोकांपुढे जाणार होते; छातीवर स्वस्तिकाकार हात ठेवून वीरवृत्तीने देशहितासाठी झगडणार होते. स्वाभाविकपणेच तुफान दर्यात होडी लोटणाऱ्या कोळ्याची एक गोष्ट सांगून यशापयशाची पर्वा न करता आपले पवित्र कर्तव्य करण्यास आपण जात आहोत अशा शब्दात गोखल्यांनी सर्वांचा निरोप घेतला.

समारोपासाठी गोखले म्हणाले, "मला आशा आणि विश्वास आहे की, विद्यार्थी या संस्थेचे सदैव अभिमानीच राहतील. मी आपणास सोडून जाण्याच्या बेतात आहे आणि म्हणून मला आता फारसे मनात राखून न ठेवता बोलणे शक्य आहे. मी बहुतेक सर्व हिंदुस्थानभर फिरून आलो आहे आणि निरनिराळ्या ठिकाणच्या शिक्षणसंस्थांबद्दल मला साहजिकच विशेष गोडी वाटत आली आहे. पण आपल्या या कॉलेजसारखी संस्था देशभरात कोठेही नाही. भल्या साधन-श्रीमंत आणि पुराणतर परंपरा असलेल्या दुसऱ्या संस्था आहेत. पण माझे मित्र

श्री. परांजपे व श्री. राजवाडे यांच्यासारख्या पुरुषांच्या त्यागाने या महाविद्यालयाला खास स्वतःचीच म्हणून एक आगळ्या वैभवकळेची प्रभावळ लाभली आहे. ही संस्था एका 'कल्पनाकांक्षेची' प्रतिनिधी आहे आणि एका ध्येयपूर्तीची मूर्तिकार आहे, संस्थेचा मुख्य नैतिक जीवनरस आहे. कल्पनाकांक्षा अशी की, चालू युगातील हिंदुस्थानवासी बंधुभावाने एकत्र यावेत आणि आधिभौतिक हितसंबंधाचे सर्व विचार बाजूस सारून, केवळ धर्मक्षेत्रातच बहुधा आढळणाऱ्या जिव्हाळ्याने आणि कळकळीने सर्वसमान हेतुपूर्तीसाठी कार्याचा उठाव त्या सर्वांनीच करावा. ध्येयदृष्टी ही की, स्वयंसिद्धतेचा आदर्श ठेवून दुसरा कितीही आंपले बोजे उचलण्यास तयार असला तरी दुसऱ्यावर कमी, कमी, कमीच आणि आपणा स्वतावर अधिकाधिक मदार ठेवण्यास धीमेपणाने पण निश्चितपणाने आपण शिकले पाहिजे. तुम्ही या महाविद्यालयाचे विद्यार्थी या संस्थेचे हे स्वभाव-वैशिष्ट्य आपल्या डोळ्यासमोर आढळपणे ठेवाल—या संस्थेविषयीची तुमची भक्ती आणि कळकळ तिच्या कर्मयोगाचे महतीशी व उदात्ततेशी समरस होईल, तिच्यावर टीका करण्याकडे तुमच्या मनाचा कल झाल्यावर देखील, आपण जितक्या अदबीने आपल्या आईवडिलांचे दोष दाखवतो, तितक्याच प्रेमळ अदबीने तुम्ही बोलाल आणि या संस्थेच्या हितसंबंधांचा विकास व्हावा व तिच्या उपयुक्ततेचे नि प्रतिष्ठेचे क्षेत्र विस्तृत व्हावे म्हणून तुमच्या कुवतीप्रमाणे काय करता येईल ते करीत रहाल, असा मला विश्वास वाटतो.

आपल्यामधून मी आता जात आहे; तसा जाताना, मी माझ्या जीवनातील उत्कट कार्य (येथे मागे) ठेवून जात आहे अशी माझी भावना आहे. मला विश्वास वाटतो, की अन्य क्षेत्रात सहकारी कार्यकर्ते म्हणून माझी व तुमच्यापैकी काहींची तरी भेट होईल. तसेच, प्रसंगानुसार आपण या महाविद्यालयाच्या परिसीमेतही पुन्हा भेटू. ईश्वर या महाविद्यालयाचे व तुमचे सर्वांचे भले करो !"

८ : राजकारणी उमेदवारी

निजलेल्या महाराष्ट्राला नव्या काळाचा ज्ञानजागर द्यावा म्हणून १८७० पासून सामाजिक, राजकीय, औद्योगिक आदि चळवळींचे उत्स्फूर्तिस्थान एकच होते. बंदरातून सुटलेले आपल्या देशाचे तारू दर्याच्या आणि वावटळीच्या लहरीप्रमाणे वाहवत जाऊ न देता, ते सावकाश, बेताबेताने किनाऱ्याला आणून पोहोचविण्याचे अत्यंत कठीण धोरण निरलसपणे चालविणारी ती तपोमूर्ती म्हणजे " सर्वज्ञः स हि माधवः । " रानडे. त्या न्यायमूर्तींचा सहवास आणि शिष्यत्व लाभणारे स्वतःला धन्य समजत. त्या धन्यांतले धन्य होण्याचा योग गोपाळराव गोखले यांना ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीत समाविष्ट झाल्यावर, लवकरच आला.

गोपाळराव गोखल्यांचा उत्साह, कामाची हौस, ' उच्च-उत्तुंग-भव्य तितुके घ्यावे ' ही त्यांची अन्तःप्रेरणा, इत्यादी गुण डे. ए. सोसायटीच्या कामात गोपाळराव आगरकरांच्या लक्षात यावयास वेळ लागला नाही. " गुरुजनान् नमस्कुर्वाण " आणि " आशीर्वचनमपेक्षमाण " असे गोपाळराव गोखले " सर्वेषामविरोधेन " सोसायटीत आले; तेव्हा त्या मर्यादापुरुषोत्तमाच्या अंगी असलेल्या गुणांचे वृहत्तर चीज झाले तर न्यायमूर्तींच्या मार्गदर्शनाखालीच होईल, असा आशांकुर आगरकरांच्या दूरदृष्टीला आढळला. म्हणून न्यायमूर्तींबरोबर झालेल्या बोलण्यात एकदा आगरकरांनी गोखल्यांचे नाव काढले. ते ध्यानी घेऊन " लोक बहुत शोधावे । त्यांचे अधिकार जाणावे । जाणजाणोनि धरावे । जवळी-दूरी ।। " या व्रताच्या रानड्यांनी आपले मित्र शिवराम हरी ऊर्फ आबासाहेब साठे यांना गोखल्यांची गाठ घ्यावयास सांगितले. पुण्यात शनिवार पेठेत तांब्यांच्या वाड्यात आगरकर व गोखले हे बिऱ्हाड करून रहात होते; तेथे साठे आले आणि पहिल्याच भेटीत अकृत्रिम प्रेमाचा एक " जन्माचा सोबती " जोडून त्याला ते रानडे यांच्याकडे घेऊन गेले.

गोपाळराव गोखले न्यायमूर्ती रानड्यांच्याकडे गेले म्हणजे कोणाकडे गेले? आपल्या आधिभौतिक जन्माचे पितृत्व ज्यांच्याकडे नियतीने नेमले होते, त्या कृष्णाजी श्रीधर गोखल्यांचे वर्गबंधू माधव गोविंद रानडे होते, त्यांच्याकडे म्हणजे एकपरी आपले चुलत्याकडेच गेले. न्यायमूर्तींच्याकडे जाताच गोपाळराव गोखल्यांना

एका अलौकिक पुरुषश्रेष्ठाची व आपल्या आध्यात्मिक पितृतुल्य सद्गृहस्थांची ओळख पटल्याचा आनंद झाला. गुरूपासून मिळेल तेवढा घेणारा चेला आणि घेईल व पचेल. तितके देणारा वत्सल गुरू अशीच ही जोडी जमली. रामकृष्ण-परमहंस व स्वामी विवेकानंद यांच्या पूर्वी घडलेल्या एकमेळाप्रमाणेच रानडे–गोखल्यांचा हा एकमेळ झाला. १८८७ ते १८९१ ही चार वर्षे रानड्यांच्या हाताखाली गोखल्यांनी एकनाथाच्या निष्ठेने उमेदवारी केली. रानड्यांनी गोपाळ-रावांना प्रथम सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाकरिता एक इंग्रजी लेख लिहावयास सांगितला. " जोर असावा तो विचारसरणीत, मग भाषासरणीत नसला तरी चालेल ", " नामूलं लिख्यते किंचित् । " वा " उच्यते किंचित् । " या ब्रीदाने गोखल्यांनी तो लेख लिहिला, रानड्यांनी पसंत केल्यावर छापखान्याकडे दिला. त्यानंतर गोखल्यांनी शेकडो ' मेमोरिअले ' लिहिली, अर्ज केले, राजनीति–शास्त्रावरील पुष्कळ ग्रंथांचे परिशीलन केले, सरकारी रिपोर्टांचे रहस्य समजून घेतले. चापून, चोपून चोख आणि वक्तशीर काम ही रानड्यांची शिस्त " जाते घडि ही आपुली साधा, करा काय ते आता करा " अशी धारदार असे. तेच व्रत गोखल्यांनी उचलले. गोखल्यांची बुद्धिमत्ता, इंग्रजी बोलण्या–लिहिण्याची हातोटी, कोणत्याही विषयाचा साद्यंत अभ्यास, कमालीची मर्मग्राहकता आणि या सर्वांच्या जोडीला तितकीच विनयशीलता हे गुण ध्यानात घेऊन रानड्यांनी गोखल्यांना १८८८ मध्ये सार्वजनिक सभेचे चिटणीस म्हणून निवडून घेतले. चिटाणिसीचे ते काम गोखल्यांनी १८९६ पर्यंत अविरत परिश्रम घेऊन पार पाडले.

दरम्यान १८८८ च्या दसऱ्याला सुधारकाचार्य आगरकरांनी आपला सुधारक गोपाळराव गोखल्यांना जोडीस घेऊन सुरू केला होता. त्याच्या इंग्रजी विभागाचे संपादन-संगोपन सर्वस्वी गोखल्यांच्याकडे होते, ते त्यांनी १८९२ पर्यंत केले. लोकमताचे किरण प्रस्थापित राज्यकर्त्यांच्या डोळ्यावर पाडावयास आणि महाराष्ट्राबाहेरील बिगर–मराठी भारतीयांस महाराष्ट्राचे मनोगत कळावयास इंग्रजी माध्यमाचीच प्रथा आणि प्रसार असलेल्या त्या काल खंडात वृत्तपत्र-संपादनातही इंग्रजी विभागातही सहजच असाधारण महत्त्व प्राप्त झालेले होते. आणि म्हणून ज्यांना स्वतंत्र इंग्रजी पत्र काढण्याची आर्थिक ताकद नव्हती ते आगरकरांसारखे लोकशिक्षक मराठी–इंग्रजी–संपादनाचा संसार एकाच पत्रात दाटीवाटीने चालवीत. हिशेबाअंती दरमहा चार रुपये वाट्यास येणाऱ्या सुधारकाच्या संपादनातही गोखल्यांच्या राजकीय लिखाणाला विशेष महत्त्व येत होते. " Shame ! Shame ! My Lord, Shame ! " या मथळ्याचा गोखल्यांचा लेख त्या वेळचे राज्यपाल लॉर्ड रे यांना इतका आवडला की, ते स्वतः आवर्जून सुधारकाचे वर्गणीदार झाले. " नामूलं तथा नामूल्यं लिख्यते किंचित् । " हे चार्ल्स् ब्रॅड्लॉ, लॉर्ड रे, मोहडा–बिल् या लेखातून प्रत्ययास आलेले व्रत

गोखल्यांनी सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांतून घेतले होते. हिंदुस्थानच्या स्वराज्य-प्राप्तीतूनच अखेर पूर्व-पश्चिमेचे एकीकरण घडेल. सलोखा सहकार चिरंतन चालतील या विचारांचा स्पष्ट उच्चार करून त्यांनी त्या व्रताची सांगता केली.

शिक्षणाचा प्रसार जेथे फारसा झालेला नसतो तेथे लोकशिक्षणाचे प्रभावी साधन म्हणून लेख नव्हे तर व्याख्यानच प्रभावी ठरते. प्रा. गोखल्यांचे जाहीर सभेतील पुण्याचे पहिले भाषण मामलेदार–कमिशनसंबंधी कॉफर्ड-प्रकरणी १८८८ साली झाले. सभेला बॉम्बे गॅझीटियरचे संपादक मुद्दाम आले होते. त्यांनी त्या भाषणाची लेखी प्रत वाचली व त्याची फार प्रशंसा केली. मुंबईच्या टाइम्सनेही सभेतील अनेक वक्तव्यांपैकी श्री. गोखले यांच्या भाषणाचीच स्तुती केली.

कॉफर्ड-प्रकरण म्हणजे पुणे–विभागीय कमिशनरला–कॉफर्डला–अनेक मामलेदारांनी आणि मामलेदारांच्यामार्फत इतरांनी दिलेल्या लाचीच्या चौकशीचे प्रकरण. ते प्रकरण त्या वेळच्या मुंबई सरकारने ब्रिटिश इभ्रतीचा शुद्धपणा जगाच्या निदर्शनास आणण्यासाठी उपस्थित केले होते. अनीती आणि अन्याय इंग्रजी राजवटीस सहन होत नाहीत, तसल्या भ्रष्टाचारांचे निर्मूलन करण्यास ती कधी कचरत नाही, त्यात सरकारचे मोठाले अधिकारी गोवले जात असले तरीही इंग्रजी राजवट आपल्या कारभाराची न्यायनिष्ठा कायम राखते, हे सिद्ध करण्याचा तो उपक्रम होता. त्या वेळी मुंबईचे राज्यपाल लॉर्ड रे हे थोर मनाचे, दृढनिश्चयी व कर्तव्यदक्ष पुरुष होते. लाच खाण्याचा दुर्गुण नसता, तर कमिशनर क्रॉफर्ड हाही एक गरीबांचा कनवाळू व लेखणीचा खंबीर अधिकारी होता. पण आर्थिक दृष्टीनेच त्याच्या कारभारातील प्रत्येक लहान-मोठी गोष्ट होत असल्याने ते सरकारच्या अब्रूला मोठे लांच्छन आहे, असे लॉर्ड रे यांना दिसून आले. त्यांनी चौकशी–कमिशन नेमले. पण फौजदारी कायद्याच्या कचाट्यात सापडण्याचे भय अनेकांना वाटणार तेव्हा तो तपास पुरा कसा व्हावयाचा ? तेव्हा लॉर्ड रे यांनी पुरावा देणारांचे नुकसान होणार नाही असे आश्वासन दिले. मग मात्र बऱ्याच मामलेदारांनी आपण क्रॉफर्डला लाच दिल्याचे कबूल केले. कमिशनच्या निर्णयात कायद्याच्या काटेकोरपणाने मि. कॉफर्ड जरी दोषी ठरले नाहीत तरी त्यांच्यासंबंधाने कमिशनने खूपच प्रतिकूल अभिप्राय प्रकट केल्याने, त्यांना विलायतेस ठरीव वर्षासनावर प्रयाण करावे लागले. पण पुढे प्रश्न उपस्थित झाला दुसराच ! प्रत्यही लाच देणाऱ्या मामलेदाराकडून दैनंदिन कारभार पवित्र राहणार कसा ? तेव्हा त्या मामलेदारांनाच नोकरीतून दूर करा, अशी एक मोहीम सुरू झाली. रे साहेबांचे तर वचन होते की, पुरावा देणारांचे नुकसान होऊ देणार नाही. अशा स्थितीत मुंबई सरकारास लोकमताच्या पाठिंब्याशिवाय गत्यंतर नव्हते. प्रा. गोखल्यांनी भाषण केलेली पुण्याची सभा त्या पाठिंब्यासाठीच होती. रे साहेबांच्या म्हणजेच मुंबई सरकारच्या आश्वासनावर विसंबून दिलेल्या कबुली-जबाबामुळे मामलेदारादि

कोणाचेच नुकसान होणे रास्त नाही या बाजूचे गोखल्यांचे भाषण होते. त्या सभेस जावयास गोखले यांना दहा मिनिटे उशीर झाल्यामुळे, ते " भाषण झाले " असे धरून सभा पुढे चालू झाली होती. पण ते लिखित भाषण मुद्देसूद व खोचक असल्यामुळे चांगलेच नावाजले गेले. याच भाषणामुळे सर फिरोजशहा मेहतांचे लक्ष प्रथम गोखल्यांच्याकडे वळले.

गोपाळराव गोखले पुणे सार्वजनिक सभेचे चिटणीस. लोकसेवा साधण्यासाठी ज्ञान, निष्ठा आणि धैर्य यांचा त्रिवेणी संगम कसा साधावा हे त्याच सभेने प्रथम महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात दाखविले. गुंतागुंतीच्या प्रश्नात आकडेवारीच्या नेमकेपणाने बोलावयाची सवय त्या सभेनेच महाराष्ट्राला लावली. स्वाभाविकपणेच सार्वजनिक सभेस त्या वेळी सरकारात आणि लोकांत मोठी मान्यता प्राप्त झाली. कोणत्याही सार्वजनिक प्रश्नावर सर्वाआधी सभेचे म्हणणेच—लोकपक्षाचे मत—जावयाचे. सार्वजनिक सभेचे अर्ज किंवा लोकमतपत्रिका इतक्या कसोशीने मुद्देसूद तयार केलेल्या असत की, सरकारला पुष्कळ वेळा त्यातील म्हणणे खोडून काढणे दुरापास्त होत असे. सर्वाआधी सरकारी ठरावाची माहिती मिळवून त्यासंबंधाचे सभेचे म्हणणे एक—दोन दिवसांत छापून काढावयाचे; लोकमत वळवणे, फैलावणे व सरकारपुढे मांडणे हे तिहेरी काम सार्वजनिक सभेला करावे लागे आणि ते इतक्या कर्तव्यदक्षतेने होई की, हिंदुस्थानात तिला पहिल्या प्रतीची प्रतिष्ठा प्राप्त झाली. प्रथम सभेचे काम म्हणून आणि नंतर त्याच अनुषंगाने गोखल्यांचा संबंध देशातील बहुतेक चळवळींशी येऊ लागला. १८८८ पासूनच सार्वजनिक सभेचा कारभारी सभासद म्हणून आणि ' रानड्यांचा मनुष्य ' म्हणून गोखल्यांचा काँग्रेसशी संबंध सुरू झाला व तेथे उपस्थित होणाऱ्या प्रश्नांचा अभ्यास गोखल्यांना करावा लागला. १८८९ च्या मुंबई येथील काँग्रेसला सर चार्ल्स् ब्रॅडलॉ यांच्या हजेरीमुळे महत्त्व आले होते. त्या अधिवेशनात गोखल्यांचे काँग्रेसमधील पहिलेच भाषण झाले. वरिष्ठ विधिमंडळात (हिंदुस्थानच्या) पाठवावयाचे लोकप्रतिनिधी प्रांतिक विधिमंडळाच्या सभासदांनी निवडले असावेत असा विधिमंडळसुधाराचा ठराव लो. बाळ गंगाधर टिळकांनी मांडला व त्याला गोपाळराव गोखल्यांनी अनुमोदन दिले. तो ठराव त्या वेळी जरी बारगळला तरी १९१९ च्या मॉंट-फोर्ड सुधारणा येईपर्यंत व्यवहारतः कमजास्त प्रमाणात त्याच तत्त्वावर लोकप्रतिनिधी निवडले जात होते एवढे खरे. त्या ठरावावर अनेक थोरांमोठ्यांदेखत गोखल्यांनी केलेले भाषण सरस वठल्यामुळे लोक त्यांना " दख्खनचा उगवता तारा " मानू लागले. काहींनी तर त्यांची तुलना एकविसाव्या वर्षी पार्लमेंटात भाषण करणाऱ्या तरुण पिटशी केली. सन १८९० च्या कलकत्ता येथील फिरोजशहा मेहतांच्या अध्यक्षते खाली झालेल्या काँग्रेसमध्ये प्राप्तिकरास आळा घालावयाच्या ठरावावर गोखले यांनी केलेल्या भाषणाने तर काँग्रेसच्या पुढाऱ्यांवर त्यांची इतकी छाप पडली

की, ते "उद्याचा राजकारणी" म्हणून गोखल्यांच्याकडे आशेने पाहू लागले.

सन १८९२-९३ या दोनही वर्षी गोपाळराव गोखल्यांचा रावसाहेब रानड्यांशी साक्षात पुष्कळच संबंध आला. सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यात सार्वजनिक प्रश्नांची रोज शहानिशा व्हावयाची. हिंदुस्थानातील राजकीय चळवळीचे स्वरूप इतर देशांतील तशा चळवळीच्या स्वरूपाहून भिन्न का, इतर देशांनी अंगिकारिलेले मार्ग हिंदुस्थानला कितपत उपयोगी पडतील. आयर्लंड व हिंदुस्थान यांचे काही अंशी सादृश्य असूनही हिंदुस्थानला आयर्लंडसारखी चळवळ करणे का इष्ट नाही वगैरे विषयांचे मंथन घडून अखेर न्या. रानडे यांच्या हस्ते नवनीत निघावयाचे. त्यामुळे लोकधुरीणत्वाची तत्त्वे व ध्येयनिष्ठ लोकसेवेची वास्तववादी तत्त्वप्रणाली याच संदर्भात गोखल्यांना ज्ञात झाली. राजनीतीचे परिशीलनही एखाद्या कर्मठ तापस्याप्रमाणे गोखल्यांनी रानड्यांच्या पायापाशीच बसून केले. लोकांत जोम आहे, धैर्य आहे, धाडस व पराक्रम आहे याचा अर्थ आपण मृत नाही; आपण फक्त तो जोम योग्य मार्गाला लावावयाचा; ऊतू जाऊन निरुपयोगी होऊ द्यावयाचा नाही; लोकांच्या भावनांना रीतसर वळण न देता त्या पेटविल्याने अकारण आगडोंब उठतो व अंगीकृत कार्य भस्मसात होते, ते होऊ द्यावयाचे नाही, ही रानड्यांची शिकवण गोखल्यांनी आत्मसात केली.

हिंदुस्थानला पहिले राजकीय हक्क १८९२ मध्ये मिळाले आणि विधिमंडळाची नाममात्र सुधारणा झाली. १८९२ च्या १० जुलैस आनंदोत्सव नाटकगृहात सभा भरून दादाभाई नवरोजींना मानपत्र देण्यात आले, ते गोखल्यांनी वाचले. सभेनंतर अवलोकनार्थ ते दादाभाईंकडे विलायतेस पाठविण्यात आले. १८९३ मध्ये डिग्बी पुण्यास आले असता त्यांनाही दिलेले मानपत्र गोखल्यांनीच वाचले. दादाभाई नवरोजी ब्रिटिश पार्लमेंटात निवडून आलेले होते. त्यांच्या खटपटीने ब्रिटिश पार्लमेंटात मि. हर्बर्ट पॉल यांनी २ जून १८९३ रोजी सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षा इंग्लंडात व हिंदुस्थानात एकसमयावच्छेदेकरून व्हाव्यात आणि उत्तीर्णांचा दर्जा सारखा रहावा, असा ठराव आणला. या ठरावाला ग्लॅड्स्टन् यांची पुष्टी मिळाली. ठराव मान्य होताच दादाभाईंचा आनंद गगनात मावेना. अँग्लो-इंडियनांनी त्या ठरावाविरुद्ध कोल्हेकुई उठविली, परंतु त्या ठरावाला उचलून धरणाऱ्या सभा हिंदुस्थानात होऊ लागल्या. १५ जुलै १८९३ रोजी मुंबईस प्रेमजी कॉवसजी इन्स्टिट्यूटमध्ये फिरोजशहा मेहतांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या सभेत गोपाळराव गोखले यांनी केलेले भाषण १८९२ मधील तशाच सभेतील लष्करी खर्चावरील भाषणापेक्षा सरस ठरले. १८९४ च्या मद्रास काँग्रेसला रानड्यांच्याबरोबर गोखलेही गेले होते.

बेळगावास भरलेल्या आठव्या प्रांतिक परिषदेत ४ मे १८९५ रोजी रोजशहा मेहतांच्या अभिनंदनाचा ठराव गोखल्यांनी मांडला. हिंदुस्थानात

गाजलेले मेहता मुंबई नगरपालिकेचे जीव की प्राण होते. या वर्षी विशेष म्हणजे त्यांनी कलकत्त्याच्या वरिष्ठ विधिमंडळात सनदी नौकरांचे दोष सडेतोडपणे मांडून, सर जेम्स वेस्टलंडच्या मते " विधिमंडळात धोक्याचे वारे आणले " होते. याच संदर्भात कलकत्त्याच्या स्टेटस्मनने मेहतांचे अभिनंदन केले. प्रांतिक परिषदेशी गोखल्यांचा संबंध १८८८ पासूनच आला होता. पहिल्या प्रांतिक सभेचे तेच सेक्रेटरी होते. ते काम चार वर्षे केल्यावर गोखले, दिनशा एदलजी वाच्छा यांच्याबरोबर राष्ट्रीय सभेचे सेक्रेटरी झाले आणि १८९५ च्या पुणे काँग्रेसचे तर ते लोकमान्य टिळकांच्याबरोबर स्थानिक सेक्रेटरी म्हणून निवडले गेले. तोपर्यंत समाजजीवनात बरेच पाणी वाहिले होते.

लॉर्ड रे यांची कारकीर्द जाऊन मुंबईस लॉर्ड हॅरिसची कारकीर्द सुरू झाली. दुसऱ्या कारकीर्दीत अधिकच अनिष्ट प्रकार घडले. त्या कारकीर्दीत हिंदु-मुसलमानांच्या दंग्यासंबंधी न्यायाचा काटा समतोल ठेवण्याचे कठीण काम हॅरिस साहेबांच्या हातून निभले नाही. यासंबंधाने पुण्याच्या हिराबागेत प्राध्यापक गोखले यांनी हॅरिससाहेबांची चांगलीच आरती केली. रे व हॅरिस यांच्या शाही कारकीर्दीची तुलना करून, लोकांशी समचित्त होऊन त्यांची दाद घेणे हे पहिल्या कारकीर्दीसारखे घडले नाही; त्यामुळे हिंदु-मुसलमानांतील वैमनस्य अधिक पेटले. महाराष्ट्रात हिंदु-मुसलमान शेजारधर्माने राहून एकमेकांच्या सामाजिक व धार्मिक कार्यात मिसळतात, असा महाराष्ट्राचा लौकिक होता. तो १८९३–९४ साली पार गेला, हे गोखल्यांनी स्पष्ट केले. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला गणपत्युत्सव खरोखर सार्वजनिक जीवनाला बुद्धिवाद जोडून अध्यात्माची वाढ करण्यासाठी होता. पण मुसलमानांच्या ताबुताला तोडीस तोड म्हणून हिंदूंचा गणपति-उत्सव असा प्रचार काही शहाण्यांनी केला. त्यातून उत्सवाच्या अत्युत्साह्यांनीही भिन्नपक्षीय पुढाऱ्यांची गद्य-पद्य नालस्ती करण्याची पर्वणी साधून घेतली. प्राध्यापक गोखले व न्यायमूर्ती रानडे यांना त्यायोगे हळहळच वाटली. त्यातच पंडिता रमबाईंच्या शारदा-सदनात स्त्री-शिक्षण-प्रसाराच्या सोज्ज्वळ देखाव्यामागे होणारे ख्रिस्तीकरण, संमतिवयाच्या कायद्याच्या निमित्ताने खाजगी जीवनात शिरणारा परकीय सरकारचा हात, आणि काँग्रेसच्या मंडपाशी सामाजिक परिषदेचे साहचर्य असावे की नाही याबद्दल निर्माण झालेले मतभेद इत्यादी प्रश्नांनी महाराष्ट्रात १८९५ साली उग्रतम स्वरूप धारण केले ! !

गोपाळराव गोखल्यांच्या राजकारणी उमेदवारीत धकाधकीचे हे असे मामले सुरुवातीपासूनच येत होते. आता त्यांची ती उमेदवारी " अष्टा वर्षा " झाली होती. आणि म्हणून तत्कालीन रीतीरिवाजाप्रमाणे पहाटेपूर्वीचा तो काळोख लवकरच संपेल अशा स्वप्नरंजनात असतानाच पुणे-काँग्रेसची बैठक जवळ आली.

☒ ☒ ☒

९ : पुण्याची काँग्रेस

काँग्रेसच्या पुण्यास व्हावयाच्या बैठकीची तयारी १८९५ च्या जानेवारी–फेब्रुवारीपासून सुरू झाली. न्या. रानडे मुंबईला होते तरी त्यांची इच्छा होती की, पुण्याची काँग्रेसची बैठक सर्वोत्तम व्हावी. त्यासाठी पक्षभेद क्षणभर बाजूला ठेवून सर्वांनी हे कार्य एकोप्याने करावे म्हणजे महाराष्ट्राच्या बौद्धिक आदिपीठाचा लौकिक वाढेल.

लो. टिळकांसुद्धा पुण्याची सर्व तरुण मंडळी त्याच मताची होती. काँग्रेसच्या मंडपात सामाजिक परिषद भरविण्यासंबंधीच काय तो काही मंडळींचा वाद होता. राजकीय आणि सामाजिक दोन्ही प्रश्न एकाच देशातील लोकांसंबंधी असल्यामुळे व ते परस्पर बांधलेले असल्यामुळे एकाच मंडपात सोयीच्या दृष्टीने काँग्रेस व सामाजिक परिषद भरत. पण पुण्यास उठली ती वावटळ अगदीच निराळी. राजकीय सुधारणा आणि पारतंत्र्याला शह याबाबतीत सनातन्यांपासून सुधारकापर्यंत आणि नवथर तरुणापासून वृद्धतम अनुभविकापर्यंत सर्व एक विचाराचे होते. परंतु काँग्रेस संस्था ही लोकशाहीच्या तंत्रात सर्वसमावेशक होऊ शकते, तशी सामाजिक परिषद होऊ शकत नाही; कारण पौर्वात्य संस्कृती व पूर्वापार चालत आलेल्या सनातन रूढी चालविण्यात स्वाभिमानसंरक्षण आणि समाजस्वास्थ्य आहे, असे मानणारा समाज हा पाश्चात्य संस्कृतीचे कलम भारतीय संस्कृतीच्या वृक्षावर करून घ्यावे असे म्हणणाऱ्या समाजाशी समरस होऊ शकत नाही. सामाजिक परिषद ही लोकशाही मतस्वातंत्र्याच्या प्रतिष्ठापालनाने सर्वसंग्राहक होऊ शकत नाही, म्हणून सर्व-समावेशक काँग्रेसच्या मंडपात 'अल्पमतधारींच्या मतप्रणालीची सामाजिक परिषद घेऊ नये, घेतल्यास परिणाम इष्ट होणार नाहीत, असे सनातन्यांच्या तर्फे बजावण्यात येत होते. स्वाभाविकपणेच पुणे–काँग्रेसचे जोड-चिटणीस प्रा. गोपाळराव गोखले यांना काँग्रेसच्या निर्विघ्न सिद्धीविषयी चिंता वाटू लागली. स्वागतसमितीच्या घटनेपासून काँग्रेसच्या ऐन बैठकीत चर्चेस यावयाच्या विषयांपर्यंत दुफळी नडू लागली. तडजोडीचे तीन-चार प्रयत्न झाले. प्रा. गोखल्यांनी वाच्छांना केलेल्या तारेवरून मुंबईची मंडळी पुण्यास येऊन लो. टिळकप्रभृतींशी वाटाघाट करून गेली. पण जमच बसेना. त्यामुळे काँग्रेसच्या

बैठकीसाठी निधी जमविणेही प्रयासाचे होऊन बसले. काँग्रेसच्या अधिवेशनाच्या तयारीपासूनचे साद्यन्त वृत्त लोकांना द्यावे म्हणून " राष्ट्रसभासमाचार " हे पत्र गोखल्यांच्या संपादकत्वाखाली सुरू करण्यात आले. स्वागतसमितीचे सभासद होणे सर्व पक्षीयांना सुलभ व्हावे म्हणून त्यासाठीची शुल्कव्यवस्था दहा रुपयांवर आणून ठेवली होती. तरीही हुल्लडबाजांनी राळ उडविली की, काँग्रेसच्या मंडपात सामाजिक परिषद भरल्यास ऐनजिनसी मंडपच अग्नीच्या स्वाधीन झाल्याशिवाय राहणार नाही.

काँग्रेस यशस्वी व्हावी म्हणून मुद्दाम रजा घेऊन पुणे येथे आलेले न्या. रानडे बारीकसारीक गोष्टींत लक्ष देत होते, ते आता याही बाबतीत लोकमत पडताळू लागले. त्यांनी सर्व काँग्रेस-समित्यांची मते मागविली. त्यातील अर्ध्यापेक्षा अधिक मते सामाजिक परिषद काँग्रेसच्या मंडपात भरविण्यास अनुकूल होती. तेव्हा जाहीर सभा भरवून लोकमत पडताळावे असा बूट निघाला. परंतु स्वागत-मंडळ निवडण्याच्या सभेत पदाधिकारी येण्याच्या अगोदरच सामाजिक परिषदेचे विरोधक त्यांच्याही जागा अडवून बसले. लोकमताचा कौल हा मानलाच पाहिजे, पण तो सामंजस्याचा असला तर अधिक कार्यक्षम ठरतो; सामाजिक परिषदेत रूढीतील कार्यविपर्यस्तावर टीका होऊन नवीन प्रथांचा पुरस्कार करणारे लोक सनातन धर्मावर वा भारतीय संस्कृतीवर निखारे ठेवतात हा आक्षेप खरा नाही वगैरे समजुतीच्या गोष्टी होऊनही सामाजिक परिषदेला काँग्रेसच्या मंडपात मज्जाव झालाच पाहिजे, हा हेका कमी होण्याची चिन्हे दिसेनात, आणखीही एक विचारझोत पुढे आला. तो असा की, काँग्रेस जशी हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती, पारशी या सर्व भारतीयांची प्रातिनिधिक संस्था आहे, तशी सामाजिक परिषद कोठे आहे ? तिचा व्याप फक्त हिंदूंपुरताच मर्यादित नाही काय ? सर्वच भारतीय घटकांचा समान पातळीवर विचार करून सर्व धर्मीयांना एकच नियम ती कोठे लावते ? अशा तऱ्हेचे आक्षेप घेणारांना " सर्व धर्मी समानत्व मानणारी " नवी वर्तनस्मृती कितपत रुचली असती अगर रुचली असती तरी तिच्या उत्पादकांस ती निर्माण करण्याचा अधिकारच काय, असा प्रश्न उपस्थित झालाच नसता, याची कोठे शाश्वती होती ? ही सब गोलंकाराची चळवळ आहे असाच गिल्ला बहुधा सर्वच धर्मांच्या अनुयायांनी त्या वेळी केला असता. पण इतक्या खोलीवर जाऊन विद्वत्सभा भरविण्याचा तो प्रसंग नव्हता. आक्षेपकांना आपल्याच आक्षेपातून सूचित होणारा राष्ट्रधर्म संस्थापणारा एखादा प्रभुप्रेषित वा बुद्ध हवा होता अशीही गोष्टच नव्हती. तेव्हा सभेत फड मारण्याकरिता आलेल्या आक्षेपांना " फड नासोचि नेदावा " एवढेच उत्तर विचारवंत देतात, तसेच येथे झाले. भारतातील हिंदूंची म्हणजे बहुसंख्य जनतेची वैदिक संस्कृती सर्वश्रेष्ठ असून पाश्चात्त्य संस्कृतीच्या विज्ञानमय संपर्कोनंतर ती बहुसंख्य जनता आपली मूळ

संस्कृती कायम ठेवून जगाच्या नव्या जमान्यात टिकण्यासारख्या नव्या समाज-रचनेचा आश्रय आपल्या ऐतिहासिक समन्वय-समावेशक वृत्तीस धरून करील व समर्थ होईल, तर ते उदाहरण इतर धर्मीय आणि पंथीयही गिरवितील अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आणि त्या उत्तरांनी आक्षेपकांचे समाधान होईल असे समजण्यात काहीच अर्थ नव्हता. कालाचा, श्रमबुद्धींचा आणि संघटनाचातुरीचा अकारण व्यय करीत बसण्यात हशील नाही, हे हेरून न्या. रानड्यांनी सामाजिक परिषद काँग्रेसच्या मंडपात न भरवता निराळ्या ठिकाणी भरवण्याचा निर्णय घेऊन काँग्रेस अधिवेशनाच्या मुळावर आलेला विरोध निःसत्त्व करून टाकला. दरम्यान सामाजिक परिषदेच्या विरोधकांनी काँग्रेस-अधिवेशनाचे नियोजित अध्यक्ष सुरेन्द्रनाथ बानर्जी यांना पुण्यातील सर्व मंडपवाद कळविला होता; त्यावर वाद आणि दुफळी असेल तर मी पुण्यास अध्यक्ष व्हावयास येत नाही असे बाबूजींनी कळविले. पण न्या. रानड्यांच्या व्यवहारचातुरीमुळे, अगोदरच वादप्रश्न संपला असल्यामुळे, काँग्रेसचे अधिवेशन यथासांग पार पडण्याचा मार्ग मोकळा झाला होता.

या सगळ्या खटाटोपात " लोकांच्या बोलीने बोलावे । लोकांच्या चालीने चालावे ॥ " आणि ते सुद्धा " मानत मानत शिकवावे । शहाणे करून सोडावे । सकळ जन ॥ " अशा लोकसंग्रही धोरणाने चालणाऱ्या लो. टिळकांनी काँग्रेसच्या चिटणिशीचा राजीनामा दिला, हे कोणास बरे वाटले नाही. गोखल्यांच्या अगोदर दौंड स्टेशनवर आपले भाचे विद्वांस यांना पाठवून टिळकांनी सुरेंद्रबाबूंचे सर्वो-अगोदर स्वागत केले व काँग्रेसच्या यशस्वी अधिवेशनानंतर शिवाजीसंबंधी सुरेंद्र-नाथांचे जाहीर व्याख्यानही त्यांनी करवले. सामाजिक परिषदेचा वाद आवरल्यावर त्यांनी काँग्रेसला पंचवीसशे रुपयांची वर्गणी जमवून पाठविली. हे सर्व खरे असले तरी काँग्रेसच्या मंडपात सामाजिक परिषद भरली नाही हा विजय असेल तर कोणाचा, असा एक प्रश्न निघून तो टिळकांचाच होय असे सर्वसामान्यपणे समजण्यात येत होते. पण शब्दच्छलापासून ज्या घटना घडल्या त्या सर्वांनाच विचारान्ती विषण्ण करणाऱ्या होत्या. नेहमीच्या पद्धतीने काँग्रेसचे अधिवेशन आणि स्वतंत्र मंडपात भरलेली सामाजिक परिषद यशस्वी झाली. तत्त्वज्ञानाच्या रंगतीने एक वरकरणी भलेपणाचे चित्र सगळीकडे दिसले, पण विटलेली मने सांधली नाहीत ती नाहीच ! ! या काँग्रेसमध्ये गोखल्यांनी मिठाच्या करारावर १८८९ मधील भाषणाप्रमाणेच जहाल भाषण केले, ते मात्र हिंदुस्थानभर लोकांच्या मनी अध्यक्षांच्या भाषणाइतकेच ठसून राहिले होते.

ꕥ ꕥ ꕥ

१० : सार्वजनिक सभा सोडली

पुण्यास काँग्रेसचे अधिवेशन व्हावयाच्या त्या १८९५ सालातील १४ जुलैला सार्वजनिक सभेची वार्षिक बैठक भरणार होती. त्या साली लो. टिळकांनी सभेचे नवे सभासद मिळवून आपले बहुमत केले. नव्याजुन्या सव्वाशे सभासदांमध्ये टिळकांच्या बाजूने प्रचंड बहुमत होऊन नव्या व्यवस्थापक मंडळात जुन्या पदाधिकाऱ्यांपैकी प्रा. गोपाळराव गोखले तेवढे सेक्रेटरीच्या जागेवर राहिले. कालौघात पदाधिकाऱ्यांत असे बदल झाले तर लोकमतानुसार बदललेल्या रहाटगाडग्याने संस्थेच्या कार्यास आणि प्रतिष्ठेस पाणी चढत असेल तर बिघडले कोठे? ता. ६ ऑगस्ट रोजी केसरीला लिहिलेल्या पत्रात गोपाळराव गोखल्यांनी कबूलच केले होते की, नवीन सभासद करण्याच्या चढाओढीत "आमच्याने टिळकपक्षाशी कधीही बरोबरी करवणार नाही." पण राजकीय मते सर्वांची सारखीच आहेत. तर पक्षभेदापासून आजवर अलिप्त असलेल्या सार्वजनिक सभेत आजच दुही कशाला? सार्वजनिक सभेचे नवे अध्यक्ष महर्षी अण्णासाहेब पटवर्धन झाले किंवा अन्य कोणी पदाधिकारी झाले याने लोकशाही कारभाराच्या संस्थेत वस्तुतः काही बिघडू नये; कोठल्याही पदावर कोणी असला किंवा नसला तरी त्याच्या मनात असेल तर त्याला सार्वजनिक सेवा करावयास वाव असला पाहिजे. न्या. रानडे सार्वजनिक सभेच्या सभासदांच्या यादीत प्रत्यक्ष नसताना ते सार्वजनिक सभेचे आतापर्यंत बहिश्चर प्राण होतेच. १८७७ साली सभेने नौरोजी फर्दुमजी यास इंग्लंडात फिनान्स-कमिटीपुढे साक्ष देण्यास पाठविले होते, त्या वेळी त्यास त्या कामी सल्लामसलत देण्यास रानड्यांची नेमणूक केल्याचा उल्लेख सभेच्या दफ्तरी सापडतो, त्याशिवाय दुसरा कोठे उल्लेख तरी आहे काय? पण नव्या निवडणुकीत सरकारशी ऊठबस सहकार करणाऱ्या आणि सरकारधार्जिण्या तसेच अर्ज-विनंत्यांच्या मार्गाने राजकारण करणाऱ्या मंडळींना अल्पसंख्य करावयाचे असे ठरवूनच टिळकांनी सार्वजनिक सभेच्या निवडणुकी लढविल्या, ती अशी काळजी घेऊन की मुख्य चिटणीस प्रा. गोखले यांना धक्का न बसावा. टिळक-चरित्रकार न. चिं. केळकर त्यासंबंधी असे लिहितात की, "यातील कावा असा होता की, गोखल्यांना चिटणीस ठेवले तरी त्यांच्या पक्षाची पाळेमुळे तोडून टाकून, त्यांना अलग एकटे ठेवावयाचे. अशा स्थितीत ते राहिलेच तर आपले ताबेदार म्हणून राहतील व गेलेच तर आपल्या

पायाने गेले, आम्ही घालविले नाहीत, असे म्हणण्याची तयारी. ''

अशा काही वृत्तीचा संशय येऊनही पुण्याची काँग्रेस भरावयाची असल्याकारणाने तिचे स्थानिक चिटणीस या नात्याने प्रथम लक्ष त्या काँग्रेसच्या यशावर दिले पाहिजे म्हणून आणि रागालोभाचे प्रक्षोभ धुमसविण्यास किंवा शमविण्यास कालाइतके समर्थ दुसरे कोणीच नाही हे जाणून, तसेच १८९५ ची काँग्रेस पुण्याच्या सार्वलौकिक व ऐतिहासिक प्रतिष्ठेला साजेशा दिलजमाईने पार पडली तर सर्वच पुण्याला ते भूषण होणार हे ध्यानात घेऊन गोपाळराव गोखल्यांनी त्या कामी प्रयत्नपराकाष्ठा आरंभली. पण तेथे '' काँग्रेसच्या मंडपात सामाजिक परिषद भरू द्यावयाची नाही असा वाद होऊन, राजकारण किंवा समाजकारण यांचा फारसा अभ्यास नसलेल्या लोकांच्या भावनाशीलतेवर व संख्याधिक्यावर भाव देऊन आपला हेका पार पाडण्याचा उद्योग जाणत्यांनी करू नये, तसा उद्योग अंती सार्वजनिक जीवनाच्या गढुळतेस कारण होईल '' असे वस्तुतः गोपाळराव गोखल्यांना सुचवावयाचे असताना त्यांनी '' ब्रूट फोर्स '' हा शब्द वापरला. आणि मग ? मग काय, '' गोखले जनतेला पशू म्हणाले '' असा त्यांच्यावर हल्ला झाला. अखेर त्या शब्दाचा अर्थ लावण्याठी प्रिं. सेल्बींना पाचारण केले गेले. सेल्बींनी गोखले जनतेला पशू म्हणाले, या आरोपात अकलेचा भाग काहीच नाही असा अभिप्राय प्रगट केला. तरीही जनशक्तीला '' पशू '' असा शब्द सूचनेनेही जोडण्यात गोखल्यांनी जनतेचा अपमानच केला, हे शल्य कायमच राहिले. '' जनी जनार्दन असे । परी तो सज्जनी वसे । '' अशा गोडव्या वचनांनी आपले म्हणणे मांडणे त्या वेळी गोखल्यांना साधले नाही. परिणामी काँग्रेसच्या यशाकडे लक्ष देऊन, गोखल्यांना मूग गिळूनच बसावे लागले. काँग्रेसचे अधिवेशन यशस्वी झाले, सामाजिक परिषद काँग्रेसच्या मंडपाबाहेर भरली. झाले गेले ते गंगेला मिळाले असे मानून नंतरच सार्वजनिक जीवनाचा ओघ पहिल्यासारखा सुरू होईल, अशी गोपाळराव गोखल्यांची अपेक्षा होती, पण ती चुकली. म्हणून १८९६ च्या मार्चपासून सार्वजनिक सभेचा चिटणीस म्हणून त्यांनी रजा घेतली आणि शेवटी ऑगस्टमध्ये त्यांनी आपल्या पदाचा राजीनामाच दिला. त्या साली १५ ऑगस्ट रोजी झालेल्या वार्षिक सभेत गोपाळराव गोखल्यांच्या रिकाम्या जागी महाराष्ट्र कॉलेजातील प्राध्यापक शिवराम महादेव परांजपे या महाराष्ट्रभाषेच्या बाणभट्टास स्थानापन्न करण्यात आले.

अशा रीतीने सात, साडेसात वर्षे ज्या संस्थेत आपण, लोक आणि सरकार यांच्या संबंधाचा जोडदुवा होऊन सेवा केली आणि विधायक राजकारणाचे धडे गिरवून, '' तोंडी भीम बात । पण बसे जोडून हात ।। '' या अवस्थेतून समाजाला बाहेर काढणाऱ्या संस्थेची प्रतिष्ठा सांभाळली, ती संस्था सोडताना गोखल्यांच्या मनाला किती यातना झाल्या असतील बरे !

ꕥ ꕥ ꕥ

११ : डेक्कनसभा

सार्वजनिक सभेचा निरोप घेतल्यावर गोखले काहीसे अंतर्मुख बनले. त्यांच्या पक्षाच्या मंडळींनीही सार्वजनिक सभेतून हळूहळू पाय काढला. १८९६ च्या दिपवाळीच्या सुट्टीत न्या. रानडे पुणे येथे आले. गोखल्यांची बुद्धी राजकारणात विशेष चालते व न्यायमूर्तींच्यासारखेच तेही राजकारणात मोठे कार्यकर्ते होतील असे सर्वांना दिसून येऊ लागले होते. सर्वस्वी राजकारणात पडून नावारूपास येण्याची व देशसेवा करण्याची त्यांची योग्यता मुंबईचे सिंह फिरोजशहा मेहता यांनाही आतापर्यंतच्या गोखले यांच्या प्रत्यक्ष सेवेवरून पटली होती. संस्थेशिवाय वैयक्तिक कार्याला बळ व तेज नसते. सार्वजनिक सभेत काम करणे कोंडमाऱ्याचे न व्हावे म्हणून कालानुकूलतेची वाट पाहूनच गोखल्यांनी ती सोडली होती. तेव्हा एकाच ध्येयाने काम करणाऱ्या दोन संस्था प्रतिस्पर्धी संस्था म्हणून नांदूं नयेत या उद्देशाने नवीन तसलीच संस्था काढू नये असे न्या. रानडे मानीत होते तरी गोखल्यासारख्यांचा कर्तृत्वाची कुचंबणा होऊ नये आणि साधनेच्या विवेकदृष्ट विभिन्नतेला तेजाळावयास वाव हवा म्हणून गोखल्यांसारख्या काही दुसऱ्या मंडळींची जोड घेऊन १८९६ च्या ३१ ऑक्टोबरला, 'डेक्कनसभा' या नावाने एक नवी संस्था काढण्याचे त्यांनीच ठरविले. डेक्कनसभेच्या उद्देशपत्रिकेत रानडे–गोखले यांनी म्हटले आहे की, सार्वजनिक सभेशी असलेले जुने संबंध तोडताना दुःख वाटल्याचे नमूद करून कर्तव्य म्हणून ही नवी संस्था निघत आहे. त्या उद्देशपत्रिकेत उदारमतवादित्व आणि नेमस्तपणा हे दोन शब्द प्रमुख होते. दुष्प्राप्य वस्तूची हाव न धरता, धीरे धीरे पण व्यावहारिक प्रगतीची ठाम पावले टाकीत टाकीत उन्नतीच्या मार्गाने राष्ट्राचे राजकारण चालवावयाचे आणि देशातील लोकांना सर्व क्षेत्रात जात, वंश, धर्म, पंथ यांचा विचार न करता, माणसामाणसांचे न्याय्य संबंध सांभाळून आणि राज्यकर्त्यांशी राहावयाचे तेवढे कायदेशीरपणे राजनिष्ठ राहून त्याचप्रमाणे सगळ्यांना समानत्वाची वागणूक देऊन प्रत्येकास कर्तृत्वाचा सारखा वाव त्याच्या त्याच्या चढत्या वाढत्या, मगदुराप्रमाणे मिळावा अशी दक्षता घ्यावयाची, हे डेक्कनसभेचे धोरण रानड्यांनीच तयार केलेल्या उद्देशपत्रिकेत स्पष्ट झाले होते.

आपल्या ध्येय-धोरणास अनुसरून डेक्कनसभाही सार्वजनिक सभेप्रमाणे दुष्काळाबाबत अर्जे वगैरे पाठवू लागली व सरकारची या सभेला उत्तरेही सुरू झाली. एकसंबेकरांच्या काही चुकीमुळे पुढे सार्वजनिक सभा सरकारच्या गैरमर्जीस कारण झाली असली तरी सरकार तोपर्यंत डेक्कनसभेला सार्वजनिक सभेपेक्षा विशेष महत्त्व देत होते, असे दिसत नाही. १८९६ त प्लेग आणि दुष्काळ यांनी लोकांचा छळवाद मांडला होता. त्या दुःखविमोचनार्थ खटपट चालू असताच १८९७ साल उगवले आणि त्या साली सरकारने नेमलेल्या वेल्बी-कमिशनपुढे साक्ष देण्याकरिता, डेक्कनसभेचे चिटणीस प्रा. गोपाळराव गोखले विलायतेस गेले. तेथून पुढे डेक्कनसभेचे काम मंद गतीनेच चालले. त्यात १३ फेब्रुवारी १९०९ रोजी गोखल्यांनी फिरून तेज भरले; त्याच जोमावर आज तागायत ती सभा कार्यरत आहे.

☒ ☒ ☒

१२ : वेल्बीकमिशनपुढील साक्ष

इंग्लंडात १८९६ मध्ये कॉन्झर्वेटिव्ह पक्ष सत्तारूढ होता. रशियाच्या स्वारीच्या भीतीमुळे सैन्यखर्चासारख्या ज्या कर्जाचा बोजा वास्तविकरीत्या इंग्लंडवर पडणे न्याय्य होते, तो हिंदुस्थानच्या तिजोरीवर लादण्यात इंग्लंड हिंदुस्थानची लूटमार करीत आहे असा "हिंदुस्थानचे घोर दारिद्र्य" या आपल्या ग्रंथात दादाभाई नौरोजींनी उघड उघड आरोप केला होता. आपल्या म्हणण्याची शहानिशा ब्रिटिश सरकारने एका कमिशनमार्फत करवून योग्य ते उपाय योजावेत म्हणून पूर्वी १८७० मध्ये व पुढे डफरीनच्या कारकीर्दीत नेमले होते तसे दादाभाईंच्याच खटपटीने जे चौकशीकमिशन नेमण्यात आले, त्याचे अध्वर्यू वेल्बी असल्याकारणाने त्यास वेल्बी-कमिशन असे अभिधान प्राप्त झाले. जी. एन्. कर्झन, टी. आर. बुचनन, केनप्रभृतींच्या या कमिशनवर पार्लमेंटचे सभासद असलेले दादाभाई नवरोजी हेही एक सभासद होते. हिंदुस्थानातून या कमिशनपुढे साक्ष देण्यासाठी जी. सुब्रह्मण्यम् अय्यर, सुरेंद्रनाथ बानर्जी, डी. ई. वाच्छा आणि गोपाळराव गोखले जावयाचे होते. मुंबईचे दिनशा एदलजी वाच्छा हे कसलेले व नावाजलेले आकडेशास्त्रज्ञ; गोपाळराव गोखले जरी अजून तेव्हढे प्रसिद्ध नव्हते तरी न्यायमूर्ती रानड्यांच्या शिफारशीने गेली सहा वर्षे ते गणेश व्यंकटेश जोशी यांच्या हाताखाली आकडेशास्त्रात तयार झाले होते. वाच्छांच्या बरोबरीने मुंबई प्रेसिडेन्सी असोसिएशन आणि पुण्यास नुकतीच स्थापन झालेली डेक्कनसभा यांच्यातर्फे वेल्बी-कमिशनपुढे साक्ष देण्यासाठी गोपाळराव गोखले यांची निवड झाल्यावर, त्यांनी तीन महिने जय्यत तयारी चालविली आणि गणेश व्यंकटेश जोशी या त्यांच्या उस्तादाची अभ्यासाच्या बिनचूकपणाबद्दल खातरजमा झाल्यावरच, फडावर कुस्ती मारावयास जाणाऱ्या पहेलवानाप्रमाणे गोपाळराव गोखले वेल्बी-कमिशनपुढे साक्ष द्यावयास इंग्लंडकडे रवाना झाले.

प्रवासात आणि नंतरही आपल्या हाती घेतलेल्या कार्यातील यशःसिद्धीबद्दल प्रा. गोपाळराव गोखल्यांचे मन समुद्राच्या लाटांप्रमाणे हेलकावे खात होते. गोखले इंग्लंडमध्ये अगदी प्रथम वाच्छांकडेच राहिले. बायकापुरुषांमध्ये, ख्रिस्तीपारशांमध्ये मिळून वागण्याचा त्यांना अद्याप सराव नव्हता. याच प्रवासात कॅले

येथे बोटीवर कॅबिनच्या दाराचा मोठा धक्का त्यांच्या छातीला लागला होता, तो त्यांनी दोन दिवस वाच्छांकडे केम्ब्रिज लॉजमध्येही कसा तरी गुपचूप सोसला. तिसऱ्या दिवशी त्यांच्या छातीतील दुखणे जास्त झाले. अस्वस्थ होऊन गोखल्यांनी वाच्छा यांच्याजवळ नाइलाज म्हणून तोंड उघडले. वाच्छा कळवळले. त्यांनी शेजारीच रहात असेलच्या दादाभाई नवरोजींच्या कानावर सगळी हकीकत घातली. दादाभाईंनी डॉक्टराकडून गोखल्यांस तपासविले आणि गोखल्यांच्या शुश्रूषेस स्वतःच सुरुवात केली. गोपाळराव ओशाळले, लाजले, गोंधळले. हिंदुस्थानच्या राजकीय आजोबाला आपल्यासारख्या सामान्याची सेवा करावी लागते, याची त्यांना खंत वाटली. डॉक्टरांच्या सांगीप्रमाणे काही दिवसांसाठी अंथरुणावर पडून रहाणे आले. तेव्हा त्याच घरात रहाणाऱ्या फार ममताळू बाईंनी गोखल्यांची सेवा-शुश्रूषा अंगावर घेतली. ज्या शेरडिनने हिंदुस्थानची करुण कहाणी पूर्वी ईस्ट इंडिया कंपनीच्या कारकीर्दीत ब्रिटिश पार्लमेंटात सांगितली होती, त्याचीच वंशजा मिसेस कॉसग्रीव्ह या त्या बाई होत्या. तिच्यावरोबर बोलण्याने गोपाळराव गोखल्यांचा भिडस्तपणा मावळून तेथे नैसर्गिक मोकळेपणा आला. पंधरा एक दिवसांनी ते हिंडूफिरू लागले. जॉन मोर्ले यांचे राजकारणविषयक तत्त्वज्ञानी ग्रंथ गोखल्यांनी वाचले होते. ते मोर्लेची प्रत्यक्ष गाठ घेऊन आले. तसेच आयरिश पक्षाचा पुढारी जॉन रेडमंड याच्याशी बोलून आयरिश होमरूल चळवळीसंबंधी चर्चा करून गोखले पुष्कळ शिकले. इंग्लंडमधील अनेकानेक शिक्षणसंस्था आणि ब्रिटिश पार्लमेंटही त्यांनी पाहून घेतले. तेथे भरलेल्या शैक्षणिक कॉंग्रेसमध्ये गोपाळराव गोखल्यांनी " हिंदुस्थानातील स्त्रीशिक्षण " हा आपला निबंधही वाचला.

शेवटी, श्री. वाच्छांच्या साक्षीनंतर वेल्बी-कमिशनपुढे गोपाळराव गोखले यांची साक्ष झाली. त्या वेळी त्यांच्यातील (न्यायमूर्ती) रानडे–जोशी (ग. व्यं.)-चा विद्यार्थी आणि फर्ग्युसन कॉलेजातील प्राध्यापक जागरूक झाला होता. उलट-तपासणीच्या वेळी कित्येक प्रश्नांस त्यांनी दिलेले जबाब पाहून त्यांच्या अंगच्या संयमशीलतेने त्यांचा बराच बचाव केला, असे म्हणावे लागते. प्रा. गोखले यांनी न्या. रानडे यांच्या पोक्त व विचारी सल्ल्याने चांगलीच आगाऊ तयारी केली होती. तिची यथायोग्य मांडणी झाली. प्रथमारंभीच गोखल्यांनी कमिशनच्या नजरेस आणले की, ब्रिटिश साम्राज्याच्या इतर भागांत कर देणाऱ्या लोकांच्या संमतीने देशाच्या उत्पन्नाचा व्यय करण्यात येतो. हिंदुस्थानात तसे नाही; लष्करी खर्च, व्यापार, हुंडणावळ इत्यादी बाबतीत गोखल्यांनी माहितीची जी कोष्टके दिली त्यातील व एकंदर साक्षीतील मुख्य मुद्दा असा होता की, हिंदुस्थान सरकार जो खर्च करते त्यात राज्यकर्त्यांचा परकेपणा, परकीयांनी एतद्देशीयांना डावलून, हिंदुस्थानातील उचललेला नौकऱ्यांचा मक्ता आणि पूर्वेकडील देशात असलेले ब्रिटिश साम्राज्याचे राजकीय हितसंबंध इत्यादी गोष्टींमुळे हिंदी प्रजेच्या पैशाची

भलती नासाडी होते. ती बंद करावयाची, सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया या अनियंत्रित अधिकाऱ्याच्या सहाय्यास स्वतंत्र मताचे सल्लागार म्हणून त्याच्या कौन्सिलातील सभासद मुख्य प्रधानांनीच काही नियमित वर्षांचे नेमणुकीने नेमून द्यावे; हिंदुस्थानातल्या हिंदुस्थानात लोकपक्षीय अशा सर्व विधिमंडळाच्या सभासदांस अर्थसंकल्पावर मत देण्याचा अधिकार असावा व सरकारशी लोकपक्षीयांचा मतभेद झाला असता, त्यांचे म्हणणे ऐकून घेणारी व हिंदुस्थान सरकारच्यावर अंमलबजावणी करणारी अशी एक समिती विलायतेत असावी; तसेच संबंधित कायद्यात दुरुस्ती करून हिंदुस्थानचा ज्यात काडीइतका हितसंबंध नाही– अशा गोष्टीत हिंदुस्थानचा पैसा हिंदी प्रजेच्या मताविरुद्ध कधीही खर्चला जाणार नाही अशी खबरदारी घेण्यात यावी; हिंदुस्थानवर राजप्रतिनिधी– व्हॉइसरॉय–नेमणे असेल तो चांगला हिशोबनीस असावा व हिंदुस्थानातील संस्थानिक वगैरे लोकांशी व्यवहार ठेवण्याच्या पूर्वापार चालत आलेल्या त्या कपटपटू राजनीतिज्ञांच्या ब्रह्मघोटाळ्यात त्याने आपले मन न गुंतविता आपली आपण फडणिशी करावी; त्याचप्रमाणे हिंदुस्थानी व प्रांतिक सरकारे यांच्या वतीने बोलण्यास एक एक मुखत्यार पार्लमेंटमध्ये निवडून द्यावा.

दुसरा प्रश्न व्यापारासंबंधाचा. लॉर्ड वेल्बीसारख्या गृहस्थासही हिंदुस्थानातील आगगाडी वगैरे कारखाने आणि इंग्लंडांत प्रचलित असलेली अप्रतिबद्ध (खुल्या) व्यापाराची पद्धत यांच्या योगाने हिंदुस्थानचा नफा न होता, नुकसान कसे होते हे एकाएकी उमजले नाही. आम्हांला–हिंदुस्थानला–आगगाड्या हव्यात, परंतु त्या आमच्या शिलकी भांडवलातून होतील तरच. चहा वगैरेंची लागवड हिंदुस्थानात होऊ लागली खरी, परंतु तिचा सर्व फायदा जातो विलायतेला. तसेच व्यापारात पुढे आम्हांस उपयोगी पडेल, ते जमिनीचे सत्त्व आजच खर्चून जाते. इंग्रजी राज्याचा आमच्या लोकांवर एकंदरीने होणारा परिणाम असा होतो की, "आमच्या सर्व तऱ्हेच्या महत्त्वाकांक्षा विरून जाऊन उंबरांतल्या किड्यांप्रमाणे आमची स्थिती होते. मानाच्या आणि अधिकाराच्या लष्करी किंवा इतर जागा हल्लीच्या पद्धतीप्रमाणे आम्हांस कधीही मिळण्याची आशा नाही. आमच्या मनाची धाव आणि दृष्टीची फेक आकुंचित होऊन जाणार." अशा शब्दांत ना. गोखले यांनी आपले म्हणणे जोरदार पुराव्यानिशी कमिशनपुढे मांडले.

प्रा. गोपाळराव गोखल्यांनी आपल्या लेखी साक्षीचे (१) वसूल व जमाबंदी आणि त्यांचा ताबा नि त्याचे प्रमाण, (२) खर्च कोणत्या पद्धतीने व कसा होतो, व (३) इंग्लंड आणि हिंदुस्थान यांच्यामधील खर्चाची वाटणी कशी करावयाची,– असे तीन भाग केले होते. त्यांत सांगितले होते की, हिंदुस्थानातील बहुतेक सरकारी वसूल लष्कर, बड्याबड्या अंमलदारांचे लठ्ठ लठ्ठ पगार व निवृत्तिवेतने यांसाठीच

खर्च होतो; अगदीच अल्पभाग शिक्षण, आरोग्य, कालवे, शेती यांच्याकडे लागतो. ब्रिटिश व्यापारी आणि ब्रिटिश सरकार यांचेच हितसंबंध अग्रहक्काने पाहिले जातात आणि ज्यांच्यापासून कर मिळतात त्यांच्या हिताची वास्तपुस्तही करण्यात येत नाही. लढायांचे बेसुमार खर्च व त्यांचा बोजा गरीब बिचाऱ्या हिंदुस्थानवर पडतो. साम्राज्य वाढावयाचे ते इंग्लंडचे व पोटाला मरावयाचे हिंदुस्थानने !

बेल्व्रीकमिशनपुढे प्रा. गोपाळराव गोखल्यांची ता. १२ व १३ एप्रिल १८९७ रोजी झालेली साक्ष जगभर गाजली. दादाभाई नवरोजी, रमेशचंद्र दत्त, सर विल्यम् वेडर्नबर्न यांनी गोखल्यांची मुक्त कंठाने स्तुती केली. वेडर्नबर्न यांनी आपण होऊन गोखल्यांची ओळख करून घेतली आणि सरते शेवटपर्यंत गोखल्यांची राजकीय कामगिरीत त्यांना वेडर्नबर्न बिनमोल सहाय्य करीत राहिले. गोखल्यांचे गुरू न्यायमूर्ती रानडे हे पाहून समाधान पावले. गणेश व्यंकटेश जोशीही डोलू लागले. लोकमान्य टिळकांनी डेक्कनसभा काढल्याबद्दल न्यायमूर्तींना "हा म्हातारचळ की पोरखेळ ?" असा सवाल सात्त्विक संतापाच्या भरात केसरीच्या अग्रलेखात, टाकला होता. पण गोखल्यांच्या या साक्षीने गोखल्यांनी गुरुदीक्षेचे चीज केले व हिंदुस्थानची बाणी राखली असाच अभिप्राय त्याच लोकमान्यांनी व्यक्त केला. इत्यर्थ असा की, १८९७ हे साल गोपाळराव गोखल्यांच्या भावी उत्कर्षाचे, कामगिरीचे व कीर्तीचे पुण्याहवाचनच ठरले !

१३ : दृष्ट लागली !

दादाभाई नवरोजी, वेडर्नबर्न व डब्ल्यू. एस्. केन हे हिंदुस्थानकडे आपुलकीने पाहणारे तीन सभासद सत्ताधाऱ्यांचे अन्य अकरा प्रतिनिधी सभासद असलेले वेल्बी-कमिशन हिंदी कारभारातील खर्चाची टक्केवारी इंग्लंड आणि हिंदुस्थान यांच्यावर बसवावी यासाठी नेमण्यात आले होते. त्यांच्या रिपोर्टाला अन्यथा एवढे महत्त्व प्राप्त झाले नसते. पण प्रा. गोखल्यांच्या साक्षीने त्याला ऐतिहासिक महत्त्व निर्माण झाले. गोपाळराव गोखल्यांची ती कामगिरी कौतुकास्पद तर खरीच, पण त्याच अनन्यसाधारण कौतुकाचीच त्यांना जणू काही दृष्ट लागली !

गोखले इंग्लंडला गेल्यावर मागे पुणे, मुंबई, नाशिक, धारवाड, बेळगाव या शहरांत प्लेगने हलकल्लोळ करून सोडला. उघड्या व मोकळ्या स्वच्छ हवेत पण लोकसंपर्कालिप्त वसती व उंदराची लस टोचून घेणे हे त्या रोगावरचे उपाय. रोग अपरिचित आणि उपाय जालीम. अंमलबजावणीही सर्व भावना, सोय, सोयरिकी गुंडाळून ठेवून लष्करी कडकपणाची ! ज्या घरात रोग शिरला असेल ते घर धुवायचे त्यातील कपडे तर जाळावयाचे. त्यातच लोक आपण होऊन आजाराची बातमी देत नसत म्हणून सर्रास झडत्यांचे सत्र सुरू ! टोचून घेण्याचा जुलूम लोकांच्या सहनशक्तीपलीकडचा, ग्रांथिक सान्निपाताला लवकरात लवकर हटविण्यातच प्रजेचे कल्याण आहे या भावनेने सरकारी उपाययोजनेची तातडी. प्लेगचा रोगी असेल तेथून काढून तो अगदी एकीकडे ठेवणे, त्याच्या आप्तमंडळींना इतर लोकांपासून दूर करणे, जेथे प्लेगचा शिरकाव झाला असेल ती जागा समूळ पाडून टाकून किंवा इतर उपायांनी निर्दोष करणे, असले प्रकार सरकारी रीत्या सर्रास जारी होत होते.

लोकांनाही रोगाइतकेच उपायही अपरिचित. युरोपीय उपायच बाधतील की काय ही धास्ती. लोकांच्या धर्मसमजुती व सामाजिक चालीही भिन्न भिन्न ! हिंदुस्थानातील अविभक्त कुटुंबपद्धतीमुळेच काही झाले तरी माणसांनी एकमेकांना सोडू नये ही लोकांची उपजतबुद्धी. रुग्णाचे विष इतरांना संसर्गाने बाधू नये म्हणून इतर मंडळींनी दूर जाऊन रुग्णाला असहाय्य टाकणे हे तर हिंदी हृदयाला कधीच न मानवणारे. दुखणाइताची सेवाशुश्रूषा हा हिंदी जीवनाचा अतूट अवयवच

जणू ! युरोपियन विचारात वाढलेल्या सरकारला हे तितकेसे उमगले नाही. त्यामुळेच १७ फेब्रुवारी १८९७ पासून लोकभावनांना व लोकविनवणीला डावलून लष्कराकरवी कडक उपायांची अंमलबजावणी होत राहिली. पति-पत्नींची, माय-लेकरांची व भावा-बहिणींची ताटातूट होऊन लोकांच्या आतड्यांना पीळ बसू लागला. ते वैतागाने वेडे होऊ लागले. घरोघरी ही अवस्था झाली तशी ती पाहणारे, ऐकणारे जनसामान्यही भांबावले, गोंधळले, कावले आणि प्रसंगी बेफामही झाले !

घराघरांच्या तपासणीत घराघरांच्या पावित्र्याला, पूजास्थानाला व राखून ठेवलेल्या स्वच्छ सोवळ्याला भ्रष्टाकाराचा धक्का सोसावा लागला. देवघरात, ज़नानखान्यात, न्हाणीघरात, शयनगृहात आणि स्वयंपाकगृहात बेधडक शिरून बायकांच्या अंगास अधिकारी हात लावू लागल्यावर लोकांच्या तळपायाची आग मस्तकास गेली तर नवल काय ? घराचे कोनेकोपरेही बारीक नजरेने धुंडण्या-शोधण्याच्या हुकमांची तामिली करताना, डोळे मोहणाऱ्या वस्तु व भुरळ पाडणारे प्रसंग यांचे विलक्षण संयोग अनपेक्षितपणे घडले. ते अत्याचार – अनाचार पाहून वा ऐकून आतल्या आत करपून जाण्यापेक्षा सूड उगवण्याकडेच काही मेंदू असुरीपणे वळले असतील हेही मनुष्यस्वभावास सोडून नव्हते.

अशी ही हृदयात पेटलेली आग बाहेर पडावयाची वाट पहात असतानाच व्हिक्टोरिया राणीसाहेबांच्या राज्यारोहणाला साठ वर्षे झाली म्हणून सरकारने आनंदोत्सव आरंभला. मागे लॉर्ड लिटन यांनी देशात दुष्काळ थैमान घालीत असता, इंग्लंडची राणी ही हिंदुस्थानची बादशाहीण झाली म्हणून दिल्लीदरबार भरवला होता. त्याचीच ही पुनरावृत्ती होती. राज्यारोहणाच्या– ज्युबिलीच्या–२२ जूनच्या रात्री एकीकडे आनंदोत्सव चालले असता, पुण्यातील प्लेगच्या व्यवस्थेस नेमलेल्या दोन ब्रिटिश कामदारांचे, ते राजभुवनावरून चतुः-शृंगीच्या वाटेने परत येत असता, खून पडले ! जिकडे तिकडे हाहाःकार उडाला ! सर्व लोकांच्या तोंडचे पाणी पळाले ! पुण्यास जुलूम करणारा कलेक्टर रँड हा वाईस हिंदुमुसलमानांची भांडणे लावून लोकपुढाऱ्यांना उपमर्दाने वागवून आल्याबद्दल कुप्रसिद्धच होता. त्याचा काटा निघाला पाहिजे, असे किती तरी दिवस लोक कुजबुजत होते. पण त्याच्याबरोबर दुसरा जीव विनाकारण हरपल्या-बद्दल लोक चुकचुकत होते. तिकडे सरकारी यंत्रणाही रागाने बेफाम झाली. एकेका गोऱ्या जीवाबद्दल दहादहा एतद्देशियांची डोकी उडाली तरी हरकत नाही– पण खुनी प्रवृत्तीची पाळेमुळे खणून काढली पाहिजेत, असे कित्येक गोरे लोक बोलू लागले. ब्रिटिश राज्याची इभ्रत डळमळू लागल्याची आणि महाराष्ट्रात वासुदेव बळवंत फडक्यांच्या बंडाची पुनरावृत्ती निघत असल्याची इंग्लंडमध्ये पुष्कळांनी धास्ती घेतली.

गोपाळराव गोखले खुद्द पुण्याचे, त्यामुळे इंग्लंडात रँड व आयर्स्ट यांच्या खुनाबद्दल जो तो त्यांना विचारू लागला. मार्चपासून जूनपर्यंत ते इंग्लंडात होते. ते काय सांगणार ? त्यांना साक्षात काय माहिती होती ? १८९३ पासून पुण्यात चाललेल्या चाफेकरबंधूंच्या गोफण्या मारुती क्लबाची, त्यात चाललेल्या गुप्त सशस्त्रसंघटनेची अगर त्यातून अद्‌भुत होऊ पाहणाऱ्या क्रांतीची त्यांना सुतराम कल्पना नव्हती. आगरकरांच्या पाठीमागे 'सुधारक' पत्राचे संपादक झालेले वासुदेव बळवंत पटवर्धन (१८९५ साली) हॅम्लेट नाटकाहून परत घरी येत असता शनिवारवाड्याच्या मस्तानी दरवाजासमोर, पटवर्धनांच्या डोक्यावर मागच्या बाजूने सळई मारल्यामुळे त्यांचा दात पडला तो दामोदर चाफेकराच्या पराक्रमाने, सुधारकावरील रागाच्या भरात पडला, हेही गोखल्यांना काँग्रेस अधिवेशन यशस्वी करण्याच्या ध्यासात कळले नव्हते. तेथे बाकीचे काय ? नाही म्हणावयाला, पुण्यातील नऊ गृहस्थांची खाजगी पत्रे व सुधारकाचा एक अंक त्यांना मिळाला होता. त्या खाजगी पत्रांत, मालमत्ता व स्त्रियांची अब्रू धोक्यात असल्याचा, तोंडाने बोलावयाचीही लाज वाटेल अशा अंगावर शहारे आणणाऱ्या प्लेगबंदोबस्तातील कहाण्यांचा व सोजिरांच्या अमानुषत्वाचा पाढा वाचला गेला होता. ही पत्रे लिहिणारांमध्ये प्राध्यापक, वकील, कादंबरीकार, अशी अब्रूदार मंडळी होती. त्या पत्रांच्या आधारावर गोपाळराव गोखले इंग्लंडातील चौकसांना उत्तरे देत होते. दोघा ब्रिटिश कामगारांच्या खुनामुळे संतापलेले सरकार आता दंडपशाहीचा वरवंटा फिरवणार अशी भीती सर विल्यम वेडर्नबर्न, दादाभाई नवरोजी यांच्या-सारख्या हिंदुस्थानच्या हितचिंतकांना पडली. त्यांनी जून महिन्याच्या अखेरीस पार्लमेंटच्या लायब्ररीत गोपाळराव गोखल्यांशी सल्लामसलत करून पुण्यातील वस्तुस्थिती मँचेस्टर गार्डियन या इंग्लिश वृत्तपत्रात गोखल्यांनीच प्रसिद्ध करावी असे ठरले. त्याप्रमाणे २ जुलै १८९७ च्या मँचेस्टर गार्डियनमध्ये आपल्याजवळील पत्राच्या आधारे गोखल्यांनी तसे केले.

आणि ? अहो आश्चर्यम् ! घड्याळाच्या लंबकाप्रमाणे जनमनाचा क्षोभ हिंदी लोकांकडून सोजिरांकडे वळला. त्यांना हुकूम देणाऱ्या मुंबई-सरकारकडेही वळला ! एकंदरीने स्त्रीजातीविषयी इंग्रजी अंतःकरणाचे दाक्षिण्य मोठे ! त्यामुळे तर इंग्लंडातून मुंबई सरकारकडे चौकशीच्या तारा आल्या. मुंबई सरकारने— राज्यपाल लॉर्ड सँडर्स्ट यांनी पाच प्रश्नांच्या पत्रिका पुण्यातील सुमारे पाचशे गृहस्थांकडे पाठवून अत्याचाराचा पुरावा कोणापाशी आहे काय ? अशी ताबडतोब चौकशी केली. परंतु पूर्वीच्या क्रॉफर्ड-प्रकरणातील पुरावा देणारांची सरकारने भंबेरी उडविली होती ती ताजी असतांना आणि रँड-खुनाचे धागेदोरे मुंबई सरकारचा ब्रुइन्स हा चतुर गुप्तहेर जुळवीत असल्याचे कानावर असताना दार उघडून साक्ष घालावयास जाणार कोण ? गोपाळराव गोखल्यांना पत्रे लिहिणारे ते मातबरदेखील

तेरी चूप–मेरी चूप करून बसले; मग "इतरेषां तु का कथा?" साहजिकच मुंबई सरकारने गोखल्यांची मँचेस्टर गार्डियनमधील विधाने "दुष्टपणाची व केवळ रचीव आहेत, साफ खोटी आहेत," असे इंग्लंडास तारेनेच कळविले. त्याबरोबर इंग्लंडच्या लोकसभेत गोखल्यांना तिरस्करणीय असत्यभाषी असा शेरा मिळाला.

आता गोपाळराव गोखल्यांची स्थिती चमत्कारिक झाली. खोडसाळ, खोटी विधाने केल्याचा त्यांच्यावर आरोप असल्यामुळे वेल्बी-कमिशनपुढे त्यांनी दिलेल्या उत्कृष्ट साक्षीवर पूर्णपणे विरजण पडल्यासारखे झाले. ते मोठ्या उत्साहाने युरोपभर फिरणार होते. पण १८ जुलै १८९७ रोजी विषण्ण मनाने ते हिंदुस्थानास यावयास निघाले. ते एडनला येताच त्यांच्या हातात त्यांच्या मित्रांची काही पत्रे पडली "मेहेरबानी करून आमची नावे सांगू नका" अशी त्यात काकुळतीने विनवणी केली होती. नाही तरी, आपण केलेल्या विधानाची जबाबदारी आपणच नैतिकदृष्ट्या घेतली पाहिजे, आपल्या बातमीदारांची नावे सांगावयाची नाहीत, हे गोपाळराव गोखल्यांनी आपल्या मनाशी ठरविलेच होते. आपली मानखंडना झाली तेवढी पुरे, दुसऱ्यांची नको, निदान आपल्या कृतीमुळे तरी खास नको, हाच उदात्त विचार त्यांनी मनात धरला होता.

मुंबई बंदरात बोट लागल्यावर प्रथम गोखल्यांस मुंबईचे मि. व्हिन्सेंट हे पोलीसकमिशनर भेटले. गोपाळरावांनी त्यांस सांगून टाकले की, मी पुरावा प्रत्यक्ष गोळा करीन आणि मग काय ते जाहीर करीन. मग ते मुंबईस ३० जुलै रोजी उतरल्यावर न्या. रानडे यांना भेटून व त्यांचा सल्ला घेऊन पुण्यास आले. सर्व मित्रांच्या व पत्रलेखकांच्या त्यांनी गाठी घेतल्या. पुरावा देण्यास कोणी पुढे येईना. ता. २० जुलैच्या केसरीवरून लो. टिळक काही पुरावा गोळा करण्याच्या खटपटीत असावेत. पण सरकारने २७ जुलै रोजी त्यांना अटक करून त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरावयास काढल्याकारणाने त्यांचा काही उपयोग होणे शक्य नव्हते. आता काय करावे, अशी गोपाळराव गोखल्यांना पंचाईत पडली. 'सुधारका'तील १२ व १९ एप्रिल आणि १० मेच्या लेखाबद्दल डे. ए. सोसायटीचे अध्यक्ष, प्रि. सेल्बी गरम झाल्याकारणाने वासुदेवराव पटवर्धनांना एक वर्ष तरी अज्ञातवास भोगावयास लागण्याची भाषा ऐकत असताना, सोसायटीत ज्यांना आपणहून आणले, त्यांना पुढे करण्याने सोसायटीच्या नुकसानीस आपणच कारण झालो असे होणार आणि त्यांनी एडनला पाठविलेल्या पत्रातील करुण विनंतीला डावलल्याबद्दलही दोष येणार या विचाराने गोखले अस्वस्थ झाले. जेथे पुरावा देण्यास वकील गांगरले तेथे "लेखके कुळ समजावे।" हे कोठून जमावयाला? अशा स्थितीत, आपण तर आपल्या मँचेस्टर गार्डियनमधील

लेखाने सर्व युरोपियन राष्ट्रात इंग्लंडच्या शिपायांची नाचकी करून बसलो, आता विधाने पुराव्याच्या अभावी सिद्ध कशी करावयाची असा पेच गोखल्यांच्या-पुढे येऊन पडला.

गोपाळराव गोखल्यांनी मग साहजिकच गुरुचरणी धावं घेतली. ज्यांनी पत्रे लिहिली तेच जर पुरावा द्यावयास पुढे येत नाहीत, तर आता दुसऱ्यांनी पुरावा गोळा करून केलेली विधाने कायद्याच्या कोर्टात टिकली तरी पुराव्याचा नैतिक पाया निसटला तो निसटलाच आणि पुरावा पुढे करणाऱ्या अन्य लोकांचा व्यवहारतः मिंधेपणा तुमच्या वाट्याला आला, असे होणार. मुंबई सरकारने ऐकीव पुरावा मागूनही ज्या अर्थी कोणी तो त्या वेळी दिला नाही, त्याअर्थी जो काही आपला समाज आहे, तो तसाच घेऊन आपण चालले पाहिजे, असे स्पष्ट करून न्यायमूर्ती रानडे यांनी गोखले यांस जाहीर माफी मागण्याचा सल्ला दिला. गोखल्यांना तसे करणे कमीपणाचे वाटते आहे असे दिसताच न्यायमूर्तींनी उपदेशिले की– आपली चूक कबूल करणे यात मनाचा मोठेपणा आहे, मानखंडना नाही; सज्जन तुमचे कौतुकच करतील. आपल्या विधानास चिकटून राहून, होतील ते परिणाम भोगावयास गोखले तयार झाले होते. पण गोखल्यांनी पुण्यातील स्वतःच्या अनुभवावर ती विधाने केली असती, तर त्यांचे तसे करणेच बरोबर होते. मागे बर्वेप्रकरणात केसरीकार आगरकरांवर असाच प्रसंग आला असता, त्यांनी माफी मागितली होती, ती बर्वे यांनी स्वीकारली नाही; तसाच प्रकार मुंबई सरकारने केला तर मग होईल ती शिक्षा तुम्ही जरूर सोसा; पण पायाच निसटलेल्या विधानांचा अभिमान धरून विनाकारण छातीला माती लावू नका; असा रानड्यांनीच गोखल्यांना मनोधैर्याचा उत्कट मार्ग दाखवला, असे मोतीलाल घोष यांनी " ए स्टेप इन दि स्टीमर " या पुस्तकाच्या प्रस्तावनेत नमूद केले आहे. पीयूषकान्ती घोषांचीही तशीच साक्ष आहे. तेव्हा ता. ४ ऑगस्ट १८९७ रोजी टाईम्स ऑफ इंडिया आणि मँचेस्टर गार्डियनमधून सरकारची गोपाळराव गोखल्यांनी माफी मागितली आणि सरकारचे समाधान झाले ! इंग्लंडमधील पत्रांची तोंडे बंद पडली. या माफीच्या प्रकरणापासून गोखल्यांनी चांगलाच धडा घेतला. जबाबदारपणे व विचारपूर्वकच कोणतीही बारीकसारीक गोष्ट केली पाहिजे, याची ते दक्षता घेऊ लागले. " सहसा विदधीत न क्रियामविवेकः परमापदां पदम् । " हे त्यांच्या मनावर पक्के बिंबून गेले. अधिकारीवर्गास पटले की, गोखले हा पुरुष न्यायी आहे: इंग्लंडमधील लोकांचीही खात्री झाली की, या भारतपुत्राची दृष्टी सत्याकडेच आहे.

वैचारिक जगात असे घडले तरी इतरत्र मात्र गोपाळराव गोखले मिळमिळीत म्हणून मोजले गेले. पुण्यातील गणपति-उत्सवाच्या मेळ्यांतून त्यांची

टर उडविण्यात आली. मुक्ताबाईंनी अभंगात म्हटल्याप्रमाणे " सन्त जेणे व्हावे। तेणे जग-बोलणे सोसावे ॥ " तेव्हा आपल्या गुरूंचे उदाहरण डोळ्यांपुढे ठेवून गोपाळराव गोखल्यांनी जन-निंदेचे ते विष कंठी ठेवले. ते म्हणत, आपलेच दात व आपलेच ओठ !

सन १८९७ ची काँग्रेस वऱ्हाडात अमरावतीला भरावयाची होती. तेथे गोपाळरावांच्या वेल्बी-कमिशनपुढील साक्षीबद्दल गौरव व्हावयाचा ते बाजूलाच राहून त्यांच्या माफीबद्दल निषेध करावा असे प्रयत्न " जे का व्यर्थ परार्थहानि करिती ते कोण की। " असणारांनी करून पाहिले. त्यांना यश आले नाही. अमरावतीहून परत आल्यावर १८९८ मध्ये गोपाळरावांनी आपल्या माफीबद्दल आपल्यावर झालेल्या आरोपास सविस्तर उत्तर प्रसिद्ध केले. त्यात न्यायमूर्तींबद्दल नितान्त कृतज्ञता व्यक्त केली होती.

प्लेगची धाड दरसाल येतच होती. १८९८–९९ मध्येही ती आलीच. गोपाळरावांनी स्वयंसेवक-पथके उभारून, लस टोचून घेण्याचे महत्त्व पटवून आणि भोळ्या समजुतींना आळा घालून दुखणाइतांच्या शुश्रूषा केल्या व करवल्या. तेव्हा लॉर्ड सँडर्स्ट यांनी गोखल्यांची स्तुती केली. कारण त्या वेळचे प्लेग ऑफिसर कर्नल क्रग (हे पुढे हिंदुस्थानचे कमांडर इन् चीफ झाले) यांनी गोपाळरावांच्या कामाची फार प्रशंसा केली. सन १८९९ मध्ये इनॉक्युलेशन–चौकशी कमिशन सरकारने नेमले त्यात गोखल्यांची योजना झाली. धारवाड–बेळगावपर्यंतच्या लोकांच्या साक्षी घेऊन झाल्या. नीट व शास्त्रशुद्ध केल्यास इनॉक्युलेशन फायदेशीर असल्याचा अभिप्राय गोपाळराव गोखल्यांनी व्यक्त केला.

☒ ☒ ☒

१४ : मुंबई विधिमंडळात

माफी प्रकरणाने गोखल्यांची जनसामान्यात फार हेटाळणी होत असताही, ते लोकसेवेला लागले. याचे कारण स्वाभाविक चांगुलपणा, बुद्धीचा मोठेपणा, सेवोत्सुक कळकळ, सत्यनिष्ठा आणि आधिभौतिक भोगाविषयी नावड ही दैवी संपत होय. वेल्बी-कमिशनपुढील साक्षीने परसत्तेच्या नितान्त कैवाऱ्याशी दोन हात कसे करावेत याबद्दल गोपाळराव गोखल्यांना आत्मविश्वास आला होता. त्यांनी त्याचा काही उपयोग करण्याचे ठरविले. मुंबई इलाख्याच्या मध्यविभागातील सहा जिल्ह्यांच्या लोकल बोर्डाकडून निवडून जावयाचा एक लोकप्रतिनिधी मुंबई विधिमंडळात असे. याच मतदार संघातून १८९५ व १८९७ अशा दोन निवडणुकींत लो. टिळक निवडून गेले होते. १८९९ च्या निवडणुकीत ते सरकारच्या मागे लोकमत नसून स्वतांच्याच मागे आहे, असे दाखवण्याकरिता फिरून उभे राहिले असते. पण ६ सप्टेंबर १८९८ रोजी त्यांची बंधमुक्तता होऊन, निवडणुकीचा विचार करू लागण्यापूर्वीच गोपाळराव गोखल्यांची उमेदवारी जाहीर झाली होती. त्यामुळे दादासाहेब करंदीकरांसारखे टिळकांचे स्नेही देखील, गोखल्यांना शब्द दिल्यामुळे पेचात पडले असते, ते नको म्हणून व गोखल्यांसारख्या सनदशीर लढवय्याचा मार्ग रोखू नये म्हणून टिळकांनी निवडणुकीचा विचारच कानामागे टाकला. गोखल्यांना त्यामुळे निवडणूक सोपी झाली.

अगोदरच उमेदीचा तिशीतला तरुण, त्यातून क्रमणिकेत अभ्यासपूर्वक लक्ष घालणारा आणि परिणामकारक रीत्या चर्चेत भाग घेणारा म्हणून त्यांची हजेरी सर्वांस जाणवण्यासारखीच होती. दुष्काळ-प्रतिबंधक, लँड अलिनिएशन बिल आणि नगरपालिकांची कार्यवाही या तीन विषयांत प्रामुख्याने गोपाळराव गोखल्यांनी त्या वेळी लक्ष घातले. १८९६ च्या दुष्काळातून आलेल्या आपत्ती शेतकऱ्याला अजून डोके वर करून देत नव्हत्या. दुष्काळ-निवारण-कायदा होऊन बरीच वर्षे झाली होती तरी सरकारच्या चांगल्या उद्देशांनाही कार्यवाहीत स्थान नव्हते. मुंबई विधिमंडळात निवडून आल्यावर पहिल्याच (१९००) भाषणात गोपाळराव गोखल्यांनी दुष्काळपीडितांची कष्टप्रद दशा निवेदन केली आणि सरकारचे त्यासंबंधीचे कर्तव्य काय तेही सुचविले. त्यांनी आपली सर्व विधाने आकडे देऊन

सशास्त्र सिद्ध केली होती. अंमलदार कर कसा जुलमाने वसूल करतात, ज्यांच्याकडून कर वसूल होत नाही त्यांना धाक-दपडशा दाखवून त्यांचा कसा छळ करण्यात येतो हे खानदेश वगैरे जिल्ह्यातील प्रत्यक्ष उदाहरणांनी गोखल्यांनी सिद्ध केले. आपल्या राहत्या गावापासून मजुराला किंवा शेतकऱ्याला दुष्काळी कामासाठी लांबवर ताबलणे त्याला परवडत नाही असे सांगून गोखल्यांनी "अल्पप्रमाण–उद्योगधंदे" ज्या त्या स्थानिक क्षेत्रात सुरू करण्याबद्दल सूचना केल्या. लोकांच्या सुखदुःखांशी समरस होऊन त्यांची बाजू विधिमंडळात ठामपणे मांडणारा प्रतिनिधी लोकांना हवाच होता, तो गोखल्यांच्या रूपाने मिळाला !

ता. ३० मे १९०१ रोजी विधिमंडळात मुंबई सरकारने लँड अलिनिएशन-बिल आणले. त्याच्यावर हल्ला करण्यात वृत्तपत्रे, राजकीय संस्था व शेतकरीवर्ग जेवढा पुढे आला, त्यापेक्षाही त्या विधेयकाचे वाभाडे विधिमंडळातील सभासदांनी फार तडफेने काढले. मुंबई इलाख्यातील लहानमोठ्या जमिनी कर्जापायी सावकाराच्या घरात जात होत्या, त्याला आळा घालण्यासाठी ते विधेयक होते. बिचाऱ्या शेतकऱ्याने उभे पीक सावकारास गहाण द्यावे, पण जमीन त्यास देता यावयाची नाही, असा त्या विधेयकाचा रोख होता, पण मग शेतसाऱ्याची विल्हे कशी लागावयाची होती ? सरकारी सारा भरण्यास पैसे कमी पडतात, म्हणून पुष्कळांनी सावकारांची घरे उपसली होती. आपल्या शेतसाऱ्याच्या पायी स्वतः सरकारच सावकारांपेक्षाही सावकार झाले होते. जमिनीची तबदिली कायद्याने बंद करून सरतेशेवटी त्या जमिनी सावकाराऐवजी सरकारच बळकावणार हे गोखले-प्रभृती विधिमंडळांतील सभासदांनी अनुभवावरून सिद्ध केले. या वर्षी दिलेली सूट पुढील वर्षी वसूल करण्यात येते आणि अशा तऱ्हेने शेतकऱ्यांच्या माना या परंपरागत बाकी वसुलीत आवळल्या जातात असे सांगून गोखले यांनी बजावले की, "आमच्या शेतकऱ्यांच्या प्रस्तुत परिस्थितीत, त्यांच्या मानेभोवती थकबाकीची चक्की न ठेवता, त्या शेकऱ्यांना आपल्या जीवनाचा नव्यानेच शुभारंभ करावयास मिळाला पाहिजे." सातारा जिल्ह्यात तालुक्यांतील तलाठी वगैरे लोकांस सूल थकबाकीसह न केल्याबद्दल दंड ठोठावण्यात आले होते, त्याची चौकशी करण्याबद्दल गोखल्यांनी सरकारास सुचविले. उत्पादन-वाढीच्या योजना आखून व भू-तारण बँका काढून शेतकऱ्यांना कर्जमुक्त व संसारसुखी करा असेही गोखल्यांनी सूचित केले.

गोपाळराव गोखल्यांना १८९७ मध्ये इंग्लंडमध्ये गेल्यापासून वाटत होते की, दादाभाई नवरोजींप्रमाणे आपण ब्रिटिश पार्लमेंटात जाऊन हिंदुस्थानची सेवा करावी. न्या. रानड्यांनी त्यांना सांगितले की– तुम्ही तिकडे गेल्यावर येथील लोकांचे राजकीय शिक्षण कोण करणार ? साहजिकच रानडे–दिग्दर्शित लोक-सेवेलाच गोखल्यांनी मुंबई विधिमंडळातील सभासदत्व पत्करून सुरुवात केली.

सन १९०१ साली डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल बिलावर बोलताना गोपाळराव गोखल्यांनी अल्पसंख्य प्रतिनिधी व जातवार प्रतिनिधी सरकारने नियुक्त करावयाच्या भागाला कडकडून विरोध केला. या बिलाने होणाऱ्या पुच्छप्रगतीस त्यांचा विरोध होता. सदर विधेयक चिकित्सासमितीकडे गेल्यावर त्या चिकित्सा-समितीत गोखले असल्याकारणाने ते त्याचा समाचार घेऊ शकले. स्थानिक स्वराज्य-संस्थांत जातवार प्रतिनिधित्व देण्याच्या तत्त्वालाच गोखल्यांनी कडकडून विरोध केला. पण चिकित्सासमितीत आणि पुढे विधिमंडळाच्या बैठकीत त्यांनी "असे कोणते जातीय हितसंबंध आहेत की ते जातवारप्रतिनिधित्वाशिवाय सुखरूप राहणार नाहीत?" असा प्रश्न केला होता, तो अनुत्तरित राहिला तो राहिलाच! जातवार प्रतिनिधित्वाने माजवलेले गोंधळ राष्ट्राला भोवत रहावयाचे ते राहिलेच.

जमीन-तबदीली-बंदी विधेयकावरही लोकप्रतिनिधींचे म्हणणे सरकारने कोठे ऐकले होते? त्या विधेयकाची घाई न करता, सरकारने तूर्त ते तहकूब करून शेतकऱ्यांच्या कर्जवामाची व सावकारसंबंधांची सखोल चौकशी करावी ही गोखल्यांची सूचनाही मानण्यात आली नाही. ब्रिटिश राजवटीपेक्षा मुस्लीम राजवटीत शेतकरी अधिक कर्जबाजारी होता या सरकारी विधानाचा फडशा पाडून शेतकऱ्यांच्या हितासाठीच आपण सरकारला विरोध करीत आहोत असे बजावून सरकारच शेतकऱ्यांच्या कळवळ्याच्या देखाव्याखाली त्यांच्या जमिनींचे, सावकारावरही ताण करून, राष्ट्रीयीकरण नव्हे, सरकारीकरण साधण्याच्या नादात असल्याबद्दल गोपाळराव गोखल्यांनी सरकारास दोष लावला. त्यापेक्षा शेतकऱ्या-कडील सर्व कर्जे निवारण्याची सरकारने हमी घेऊन सरकारने शेतकी-बँका सुरू कराव्यात आणि मग जमीन-तबदीली-बंदीचा कायदा करावा, असेही गोखल्यांनी ठणकावून सांगितले.

पण गोपाळराव गोखले, फिरोजशहा मेहताप्रभृतींच्या विरोधाचा उपयोग झाला नाही, म्हणून सर भालचंद्र भाटवडेकर, गोकुळदास पारेख, दाजी आबाजी खरे आणि गोपाळराव गोखले ही मंडळी सरकारच्या निषेधार्थ फिरोजशहा मेहतांच्याबरोबर विधिमंडळाबाहेर पडली! मुंबई विधिमंडळाच्या लोकप्रतिनिधींनी दाखवलेला हा स्वाभिमान नि करारीपणा अत्यंत प्रशंसनीय ठरला. कारण सरकारने आपल्याच तोऱ्यात पसार करून घेतलेला तो कायदा कायदे-पुस्तकात केवळ मृताक्षर होऊन पडला आणि मुंबई लोकप्रतिनिधींच्या उदाहरणाने सार्वजनिक व सनदशीर आयुष्यक्रमात तेजस्वीपणा व भारदस्तपणा आला. सर्व हिंदुस्थानभर त्या बाणेदारपणाची तारीफच झाली.

☒ ☒ ☒

१५ : वरिष्ठ विधिमंडळात

" न्यायमूर्ती रानड्यांनी मला हाताशी धरले. त्यांच्या चरणाशी बसून शिकण्याची संधी मला मिळाली. म्हणूनच मला आज ही स्थिती प्राप्त झाली आहे. " असे उद्‌गार ना. गोपाळराव गोखल्यांनी पुण्याच्या हिराबागेतल्या सत्कारास उत्तर देताना काढले. डॉ. रा. गो. भांडारकर, सखारामभाऊ म्हस्के व न्या. रानडे अशी मंडळी सत्कारास हजर होती. १८९९ साली मुंबई विधिमंडळात निवडून आल्यावेळचा हा सत्कार गोखल्यांनी अपेक्षेबाहेर कारणी लावला, हे त्यांच्या मुंबई विधिमंडळातील कामगिरीवरून स्पष्ट झाले. पण तेही क्षेत्र आता त्यांच्या बैद्धिक कर्तृत्वाला अपुरे पडू लागले. त्यांची नजर साहजिकच कलकत्ता–सिमल्याच्या वरिष्ठ विधिमंडळाकडे वळू लागली.

वरिष्ठ विधिमंडळात निवडणुकीचा अधिकार मिळाल्यापासून सर फिरोजशहा मेहता येथे निवडून येत असत. १९०२ च्या निवडणुकीच्या वेळी गोखले यांच्या १५ जानेवारी १९०१ च्या विनंतिपत्रावरून मेहतांनी गोखले यांना पुढे करून तरुण पिढीविषयी गुणग्राहकता दाखविली. इब्राहिम रहिमतुल्ला व बम्मनजी पेटीट यांनीही गोखले यांच्यासाठी आपल्या उमेदवाऱ्या मेहतांच्या विनंतीवरून परत घेतल्या. मेहतांनी आपली जागा गोखल्यांना खाली करून दिल्यापासून एक तप गोखले तेथे होते. त्यांची जागा घ्यावी असे दुसऱ्या कोणास वाटेना. त्यांनी ती घ्यावी असेही कोणी म्हणेना. विधिमंडळातील त्यांची भाषणे तशीच माहितीने पूर्ण भरलेली व परिणामकारक असत. ते मृदुमोहक शब्दोच्चार करीत पण अतिशय तळमळीने भाषण करीत. प्रमेयांची, अनुमानांची बांधणी ते अवश्य त्या आधारनिशी करीत. त्यांचा शब्दन् शब्द आखीव-रेखीव असे. ठायी ठायी त्यांच्या चित्ताचा प्रांजलपणा प्रकट होई. त्या प्रासादिक वक्तव्याचा हेतू एकच म्हणजे तळमळीच्या विचारसणीने श्रोत्यांना आपलेसे करून टाकणे.

मोरोपंतांनी म्हटल्याप्रमाणे " कृताभ्यंगस्नाना कनकमणिभूषा– विरहिता । विराजे सिंदूरे धवलवसने भूपवनिता ॥ " अशी नामदार गोपाळराव गोखल्यांची मोहमयी वाणी होती. तरी कर्झनसारख्या तडफदार गव्हर्नर-जनरलच्या कारकीर्दीतील त्यांची भाषणे जोरदार व प्रतिपक्षास सपशेल पालथे घालणारी आणि

नामोहरम करून टाकणारी झाली. विधिमंडळाच्या बाहेर राहून सरकारवरील जळजळीत टीकेने व मथळ्यांनी वर्तमानपत्रांचे रकानेच्या रकाने भरण्यास अगर घंटे घंटे सभा चालवून वक्तृत्वाच्या फैरी झाडण्यास जेवढे धैर्य व जेवढा अभ्यास लागतो, तेव्हढेच प्रसंगी त्याच्याहून अधिक धैर्य व अधिक अभ्यास विधिमंडळातील अधिकाऱ्यांच्या आणि राज्यकर्त्या-सूत्रधारांच्या समोरासमोर, न्याय्य व सणसणीत टीका करावयास अवश्य असतो. ऑफिशियल सीक्रेट्स ॲक्ट, युनिव्हर्सिटी बिल्, व्हॅलिडेशन ॲक्ट, सिडिशस् मीटिंग्ज ॲक्ट वगैरे प्रसंगी नामदार गोखल्यांना केलेल्या सरकारच्या कानउघाडणीमुळे " स किं सखा साधु न शास्ति यो ऽधिप ?। हितान्नयः संश्रुणुते स किं प्रभुः ॥ " या न्यायाने नामदार गोखले साधु ठरले व सरकारचे पारडे हलके ठरले. सर मेस्टन म्हणतात– " मी सरकारच्या अंदाज-पत्रकांची नेहमी तरफदारी करावयाचा; गोखले त्याच्या चिंधड्या उडवीत असत. पण कधीही उतावीळपणे भडकून गोखले यांनी माझे मन दुखवले नाही. परिणामी मी व ते मित्र झालो. "

ना. गोखले यांच्या वक्तृत्वाच्या तेजाने विधिमंडळ दिपून गेले. १९१३ च्या मार्च १४ तारखेस सर गायफ्लीट्वुड विल्सन म्हणाले की, " विधिमंडळातील त्यांची भाषणे, त्यांनी सुचविलेले निरनिराळे उपाय, शेतकरी वगैरे वर्गास सुख व्हावे म्हणून त्यास वाटत असलेली तळमळ, त्यांच्यावरील करांचे ओझे कमी करावे म्हणून ते करीत असलेली खटपट, हे सर्व पाहिल्यावर ते प्रतिग्लॅड्स्टन् आहेत असे मला म्हणावेसे वाटते."

लॉर्ड कर्झन गेले व मिंटो आले. १९०६ साली लॉर्ड मोर्ले भारतमंत्री झाले; बॉंब प्रकरण हिंदुस्थानात धुमाकूळ घालू लागले. अशा वेळी वरिष्ठ विधि-मंडळात सरकारची कानउघडणी करून, साम्राज्यशाही सरकारच्या वंगभंगादिक दडपशाहीचा व लोकमत धाब्यावर बसवून कारभार करण्याची सरकारी धोरणच तरुणांना आतताईपणा करण्यास लावीत आहे, असे गोखल्यांनी सरकारास निक्षून बजावले.

ना. गोखल्यांचा वरिष्ठ विधिमंडळातील सर्वश्रेष्ठ महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्यांची अर्थसंकल्पावरील चिकित्सक भाषणे ! सरकारचा अर्थसंकल्प वाचून झाला रे झाला, की हा आकडेबहाद्दर त्यावर अशी काही झोड करी की सरकारास तोंड उघडता येऊ नये. सरकारासंबंधी व राज्यकारभाराबाबत आपले जे काही विचार असतील ते सर्व या वेळी गोखले बोलून टाकीत. सरकारच्या सर्व चुकांचा पाढा ते पुन्हा पुन्हा वाचीत. कारण कानी-कपाळी असे सतत ओरडत राहू, तरच हैदोस घालणाऱ्या सरकारचे आपल्या म्हणण्याकडे अल्पस्वल्प लक्ष जाईल अशी गोखल्यांची मनोमन धारणा होती.

जमीन–तबदिली–बंदीच्या विधेयकाबाबत सडेतोड भाषण करून गोखले

यांनी सरकारच्या निषेधार्थ सभात्याग केला तेव्हा खुद्द प्राचार्य सेल्बीसारख्यांनी त्यांच्या त्या वक्तव्याची खास पत्र धाडून प्रशंसा केली. वरिष्ठ विधिमंडळातील वादविवादास फिरोजशहा मेहतांनी नवे वळण लावले होते. लोकप्रतिनिधींच्या कार्यास नवा जोम भरला होता. मेहतांच्या जागी आलेल्या गोखल्यांनी तोच बाणेदारपणा पुढे चालवून मार्च १९०३ मधील अर्थसंकल्पावरील पहिल्याच भाषणाने नामदार मेहतांवरही ताण केली. सरकारी तिजोरीला कृत्रिम शिलका राहतात याचाच अर्थ असा की, सरकार रयतेकडून वाजवीपेक्षा अधिक करवसुली करते. तो करभार मान मोडणारा असतो. अलिकडे दोन-तीन वर्षे हिंदुस्थान सरकारसारख्या उधळ्या सरकारजवळ शिल्लक राहू लागते हे जगातील आठवे आश्चर्यच होय असे म्हणून गोखल्यांनी त्या सरकारची छेड काढली. सरकारची जावईखाती म्हणजे लष्कर व सनदी नौकर. त्यांच्या अवाढव्य खर्चापायी पाण्यासारखा पैसा खर्च झाला तरी तो खळगा भरतो कोठे ? १८८५ मध्ये तीस हजार सैन्य वाढविले. का ? तर म्हणे, रशियाचा बागुलबोवा आहे म्हणून ! बागुलबोवा दूरच, पण त्याआधीच भिऊन गेलेल्या सरकारने जे नवीन लष्कर ठेवले त्याचा खर्च चालावा म्हणून मात्र जनतेवर कर बसविण्यात येतात ! आणि रशियन पिशाच्चाची ती भीती नाहीशी झाली तरी हिंदुस्थानच्या छाताडावर नंगा नाच घालणाऱ्या करांच्या भुताला मात्र मूठमाती देण्यात येत नाही ! केवढी ही अप्रतिम लोककल्याणाची दक्षता ! कृत्रिम शिलका, कराचा बोजा आणि हिंदुस्थानची भरभराट होत असल्याचा सरकारी पोकळ दावा यावर गोखल्यांनी एकसारखे मर्माघात केल्याने सरकारी अधिकाऱ्यांची सर्व समर्थने पांगळी ठरू लागली. टांकसाळ सुधारा, कर कमी करा या गोखल्यांच्या सूचनांवर सरकारपक्षाला मात करताच आली नाही.

येथूनच ना. गोखले व लॉर्ड कर्झन यांचे दोन हात होण्यास सुरुवात झाली. अर्थसंकल्पावरील ती खर्ड्याची लढाई दरसाल पाहण्यास–अभ्यासण्यास किती तरी लोक आतुरतेने जमत. अर्थसंकल्पातील खाचाखोचा, आकडे तयार करण्यातील चुका आणि कारभाराचे धोरण यांच्यावर झणझणीत प्रकाश पाडणारे, त्या सर्व संबंधात लोकहितास अनुकूल असे उपाय सुचविणारे, आणि एकंदर रियासतीच्या कल्याणसाधनाचे खरे मार्ग आखून देणारी ना. गोखल्यांची भाषणे खरोखर अजोड असत ! गोखल्यांच्या रेखीव भाषणांचा असा परिणाम होत गेला की, गोखल्यांच्या या वर्षीच्या सूचना दुसऱ्या वर्षीच्या अर्थसंकल्पात स्वीकारलेल्या दिसत. मूळ तीन पैशांच्या मिठाच्या टोपलीची किंमत पाच आणे झाल्याने मिठावरील कर कमी करवून आणि शिक्षणाप्रीत्यर्थ अधिकाधिक पैसा खर्च करणे सरकारला भाग पाडून गोखले यांनी देशाचे अंतःकरण आपलेसे करून घेतले.

सन १९०३ सालचे अंदाजपत्रकावरील भाषण झाल्यावर ४ डिसेंबरच्या बैठकीत " सरकारी गुपितांच्या " कायद्यावर गोखल्यांनी सणसणीत टीका केली. १८८९ मध्ये हा कायदा सौम्य स्वरूपाचा सिमल्यात पास झाला होता. १९०३ च्या कायद्याने हिंदुस्थानात झारशाही निर्माण होईल. भारतीय कायदे पुस्तकाला अशा कायद्याचा विटाळही होऊ नये, असे ' इंग्लिशमन ' या पत्रानेही म्हटले होते. सरकार सर्व दिवाणी कारभार लष्करी पद्धतीवर नेत असल्याबद्दल ना. गोखल्यांनी दोष दिला. सरकारची बिंगे वर्तमानपत्रांनी चव्हाट्यावर आणली तर त्यास शिक्षा करण्याचा अधिकार त्या कायद्याने सरकारला मिळणार होता. लोकांच्या मतस्वातंत्र्यावर तो घाला आहे, हे गोखल्यांनी स्पष्ट केले.

याच (१९०३) वर्षीचे दुसरे महत्त्वाचे विधेयक विद्यापीठाच्या पुनर्घटनेचे. १९०० मध्ये कलकत्ता-विद्यापीठात चॅन्सेलर म्हणून कर्झनांचे भाषण झाल होते. त्यातून त्यांनी पदवीधरांना वळण लावण्याकरिता सदर विधेयक आणले होते. सर थॉमस रॅले यांच्या अध्यक्षतेखाली (१९०१) नेमलेल्या कमिशनने सदर विधेयकाची शिफारस केली होती. एकही खास एतद्देशीय सभासद नसलेले ते कमिशन म्हणजे भारतीय सदसद्विवेकशक्तीचा अपमान होता. आणि त्या कमिशनच्या एकांगी शिफारशीने आलेले विधेयक म्हणजे विद्यापीठाचे स्वातंत्र्य नष्ट करून त्यांचे सरकारीकरण करण्याचे कारस्थान होते. खाजगी शिक्षण-संस्थांना खच्ची करण्याचा तो प्रयत्न होता. तेव्हा सर्व विद्यापीठांबरोबर मुंबई विद्यापीठाचा एकमत, सर्वसंमत अभिप्राय सर फिरोजशहा मेहतांमार्फत सादर करण्यात आला. तरीही ते तसले विधेयक २ नोव्हेंबर रोजी मांडून कर्झनसाहेबांनी बरेच तोंडसुख घेतले. ना. गोपाळराव गोखल्यांनी व सर आशुतोष मुकर्जींनी अलौकिक विद्वत्तेने आणि बिनतोड कोटिक्रमाने त्या विधेयकाची चीरफाड केली. तरी पण तो कायदा पास होऊन, १९०४ मध्ये विद्यापीठातून, हायकोर्टामधील न्यायाधीश, सरकारनियुक्त सभासद, बिशप, मिशनरी यांचाच भरणा होण्याची सोय झाली ! !

सन १९०४ च्या अर्थसंकल्पावरील भाषणात त्या वर्षी वाढविण्यात आलेल्या लष्करी खर्चावर गोखल्यांनी टीका केली. सेनापतिसाहेबांनी हिंदुस्थानातील आंग्लपुत्रांना सैन्यात दाखल होण्यास आग्रहाने सांगितले, पण हिंदुपुत्रांस मात्र मज्जाव ! !

विद्यापीठ कायद्यातील चुकांचे समर्थन करणाऱ्या व्हॅलिडेटिंग ॲक्टसारख्या कायद्यातील सरकारच्या अरेरावी उतावीळपणावर व अहंमन्यतेवर निर्भीड टीका करून येईल तेवढा विरोध करण्याचे काम १९०५ मध्ये ना. गोखल्यांवरच आले. हिंदी लोकांना वरची अधिकारपदे देण्याच्या कामी ब्रिटिश सरकारच्या औदार्याची बरोबरी कधीही, कोठेही झालेली नाही, असे दाखविण्यासाठी आदल्या

वर्षीच सरकारने एक ठराव बाहेर काढला होता. त्यातील गणनाचा व आकड्यांचा कुटिलपणा सिद्ध करण्यासाठी सरकारी इतिवृत्तातून व आकड्यांच्या हिशोबी कोष्टकातून आवश्यक तेवढे आकडे गोखल्यांनी धुंडून काढले व तेच सरकारच्या तोंडावर फेकले. १८९४ मध्ये वरिष्ठ जागा सदैव युरोपियनांच्याकडेच हव्यात असे ठरविण्यात आले. त्याचा तीव्र धिक्कार करून समान वागणूक हीच का? असे विचारीत, हजार रुपये पगारावरील एकशेपंचवीस जागा भारतीयांना मिळावयाच्या, त्यातून एकशेआठचा भरल्या, तेथेही त्यातील त्र्याण्णव सेक्रेटरी ऑफ स्टेट्च्या मर्जीने! हा निःपक्षपातीपणाचा पुरावा काय? अशी गोखल्यांनी पृच्छा केली. हिंदी माणसाचा दर्जा आहे तसाच राहून कारभार ठाकठीक आणि तरतरीत चालावा, त्यात ढिलेपणा कोठे राहू नये, हिंदुस्थान म्हणजे ब्रिटिशांना राज्यकला, कारभारकला शिकण्याची शाळा व्हावी, असेच त्या कालचे सरकारी धोरण होते!! काही मर्यादेपलिकडे हिंदी माणसाला चढू दिले नाही तरच ब्रिटिश अंमल येथे हिंदुस्थानात चिरकाल राहील असा त्यांचा ठाम सिद्धान्त होता! राणीच्या जाहीरनाम्याचा उल्लेख कर्झनसाहेब अव्यवहार्य ताम्रपट असा उघडउघड करीत. ब्रिटिशांच्या कडक शापाखाली व चाबकाखाली हिंदुस्थानचे जीवन चालले पाहिजे या दिमाखाने व घमेंडीने कर्झनसाहेबांची एकंदर भाषणे होत. आपण सांगतो ते सत्य! हिंदु लोक खोटे बोलणारे आहेत असा सरळ शेरा कर्झनसाहेबांनी एकदा मारला होता. तेव्हा 'अमृतबझारपत्रिके'ने कोरियातील लॉर्ड कर्झन यांनी आपले वय चोरल्याची—आठवण देऊन कर्झनचे दात कर्झनच्या घशात घातले होते; याचा उल्लेख करावयास ना. गोखले यांनी सोडले नाही. लॉर्ड कर्झन यांनी वंगभंग करून आपल्या कारकीर्दीचा कळस केला! वंगीयांना चीड यावी आणि अपमान वाटावा अशा हिशेबानेच त्या फाळणीची अंमलबजावणी त्यांनी केली. त्यायोगे भावनाप्रधान वंगीय चिडले व बेफाम झाले. ब्रिटिशांच्या धोरणाचा प्रतिकार म्हणून परदेशी वस्तूंवर, ब्रिटिशांनी चालविलेल्या भल्याभल्या शिक्षणसंस्थांदि संस्थांवर त्यांनी बहिष्कार टाकला. तेव्हा चिडलेल्या सरकारने दडपशाही कायद्यांचे गिरमिट सुरू केले. कसल्याही चौकशीशिवाय पुढाऱ्यांची उचलबांगडी, राजद्रोहाच्या कायद्याची वाढती व्याप्ती, सभाबंदी, पोलिसी अधिकारांची वाढ इत्यादी अनेकविध सरकारी कायदेबाजीबाबत गोखल्यांनी कायदेमंडळाच्या चतुःसीमेत दिलेली लढत म्हणजे संसदीय चतुरस्र संचलनातील कुशलतेचा आदर्श होय. असा निर्वाळा पुढे लॉर्ड कर्झन यांनाच एका प्रसंगाने द्यावा लागला हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

मिंटोच्या कारकीर्दीतील १९०६ सालचे ना. गोखल्यांचे अर्थसंकल्पावरील पहिले भाषण मिंटोचा वेध घेऊन बसले! अगोदर १९०५-६ चे अर्थसंकल्प म्हणजे चिकित्सक गोखल्यांच्या १९०४ च्या अर्थसंकल्पावरील भाषणाचा प्रचंड

विजय होता. कारण गोखल्यांच्या सूचना त्यात बव्हंशाने स्वीकारलेल्या होत्या. जमिनीवरचा कर कमी करा, प्रयोगादाखल काही ठिकाणी तरी शेतकऱ्याच्यांना संपूर्ण ऋणमुक्त करा आणि मग जमीन विकण्याचे त्यांचे हक्क मर्यादित करा; इजिप्तात आहेत तशा शेतकरी पतपेढ्या स्थापा, पाटबंधारे सुधारा, शास्त्रीय शेतीला उत्तेजन द्या, उद्योगधंद्यांचे शिक्षण वाढवा, प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करा, आरोग्यवर्धक कामे हाती घ्या, या मागण्यांचा ना. गोखल्यांनी धोशाच लावला. मिठावरील कर १ रुपयाने कमी झाला तो मोर्ले यांच्या मताप्रमाणे पूर्णच बंद व्हावा अशी अपेक्षा १९०७ साली गोखल्यांनी व्यक्त केली. १९०७ साली सरकारने सभाबंदी कायदा आणला, त्याला तर गोखल्यांनी जोराचा विरोध करून निर्धाराने बजावले की, कर्झनच्या कारकीर्दीत ब्रिटिश सत्तेच्या स्वरूपाविषयी आणि भारतीय तरुणांनी आपल्यापुढे ठेवावयाच्या आदर्शासंबंधी व ध्येयासंबंधी, तरुण पिढीच्या कल्पनांची भलतीच उलथापालथ करून टाकली आहे. अशा वेळी दडपशाही उपयोगीच नाही. राज्यसत्ता माणसांना परकी तरी ती माणुसकीने संपूर्ण स्वदेशी हवी आहे हे सत्य ना. गोखले यांनी मिंटो, त्यांची अधिकारीप्रभावळ, विधिमंडळातील सभासद आणि त्यांच्या निमित्ताने हिंदुस्थानातील जनता व जग यांच्या निदर्शनास आणून दिले.

सन १९०८ च्या अर्थसंकल्पावरील भाषणात ना. गोखल्यांनी पुनः सरकारला इशारा दिला की, राज्यकारभारात सुधारणा करावयाच्या त्या लवकर करा; ही वेळ आणीबाणीचीच आहे. वेळीच सुधारणा जाहीर करून लोकांतील असंतोष व तीव्र निराशा दूर केली नाही, तर अडचणीच अडचणी उत्पन्न होतील. लॉर्ड मिंटोचे हृदय सहानुभूतीचे ! पण लॉर्ड कर्झनची तडफ जवळ नसल्यामुळे त्यांची पावले जपून पडावयाची. त्यामुळेच गोखल्यांच्या मागण्याप्रमाणे १९०८ च्या उत्तरार्धात सुधारणा जाहीर झाल्या ! त्या मोर्ले–मिंटो–रिफॉर्म्स या नावाने ओळखल्या जातात.

सन १९०८ ते १९१४ ही वर्षे गोखल्यांच्या " शिरावरील ओझ्यांनी खचलेली " होती. राज्यव्यवस्थेतील अगदी पायाचे दगड म्हणजे म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्डे. खराट्याचे स्वराज्य चालविणाऱ्या या संस्थांना स्वातंत्र्य देण्याकरिता खरेखुरे अधिकार–विभागणी–कमिशन ना. गोखल्यांनी मागितले होते ते मिळाले. यापुढे त्यांची साक्ष झाली. त्यानंतर ज्या सुधारणा अमलात आल्या त्या बहुतेक अंशी त्यांनीच सुचविलेल्या होत्या. त्यात मुसलमानांकरिता केलेली व्यवस्था तात्पुरती मान्य करण्यासाठी हिंदू पुढाऱ्यांची मने त्यांना वळवावी लागली. वाढत्या महागाईच्या चौकशीसाठी एक समिती नेमण्याची आवश्यकता गोखल्यांनी सरकारच्या निदर्शनाला आणली. गोखल्यांचे सर्वांत महत्त्वाचे काम म्हणजे

मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी (पूर्वीच्या ज्योतिराव फुल्यांच्या तत्त्वावर) सगळ्या हिंदुस्थानभर चळवळ करून तिच्या जोरावर हिंदुस्थान सरकारच्या विधिमंडळात १९१० त एक ठराव व १९११ साली एक विधेयक सप्रमाण मांडून सरकारचे शिक्षणविषयक धोरण त्यांनी बदलून घेतले हे होय. गोखल्यांचा तो ठराव किंवा ते विधेयक मान्य झाले नाही. पण गोखल्यांनी त्या प्रसंगीच्या भाषणांनी सरकार व सरकारपक्षीय सर्व सभासदांच्या मनाची पक्की खातरजमा झाली की, तत्त्वतः गोखलेच सर्वस्वी बरोबर आहेत. म्हणूनच शिक्षण-प्रसारासाठी मंजूर होणाऱ्या रकमा दरवर्षी वाढू लागल्या आणि शिक्षणसंस्थांना सरकारी अनुदाने सढळ हाताने मिळू लागली. त्याचे पहिले दृश्य फळ म्हणजे ७५ टक्के शाळांतून मुलांची संख्या दुप्पट झाली व प्राथमिक शिक्षणाकरिता दिल्ली दरबाराच्या (१९११) वेळी पन्नास लक्षांची देणगी जाहीर झाली. १९१२ साली तर ब्रिटिश पार्लेमेंटात हिंदुस्थानचे अंडर सेक्रेटरी मॉंटेग्यू यांनी ना. गोखल्यांचे अभिनंदन केले.

१९०२ मध्ये गोखले बोलले होते की, रुप्याच्या उतरत्या भावामुळे हुंडणावळीत फारच फरक पडत चालला आहे व हिंदुस्थान सरकारला विलायतेत पाठवाव्या लागणाऱ्या सर्व पैशांच्या बाबतीत पुष्कळ बचत होत आहे. इकडे देशात एकसारखे दुष्काळ पडत होते, दारिद्र्य वाढत होते, पण हिंदुस्थानची गंगाजळी मात्र दिवसेंदिवस भरत होती. वाढत्या शिलकेवरून अधिकारी मंडळी देशाची स्थिती सुधारल्याची बढाई मारीत होती. त्या कोटिक्रमाचा पोकळपणा दाखवून, सरासरीने दरसाल पाच कोटी शिल्लक उरत असल्यामुळे देशातील गरीब लोकांवरील कर कमी करा, असा गोखल्यांनी लकडा लावला. त्याप्रमाणे १९०३ साली मिठावरील कर दरमणी अडीच रुपयांचा दोन रुपये झाला, प्राप्तीवरील कराची मर्यादा पाचशे रुपयांच्या ऐवजी हजार रुपये प्राप्तीची धरली गेली; १९०५ साली मिठावरील कर दीड रुपया होता तो १९०७ साली एक रुपया दरमणी झाला. सारांश राज्यकारभाराचा कल लोकमतानुवर्ती करण्याचा नामदार गोखल्यांचा उद्देश हलके हलके साध्य होण्याची चिन्हे दिसू लागली.

१९१० च्या जानेवारीत मोर्ले-मिंटो सुधारणान्वये उत्साहपूर्ण विधिमंडळ भरले. या सुमारास आफ्रिकन सरकारने तेथे वसाहत करून राहणाऱ्या आशियातील लोकांविरुद्ध जुलमी कायदे केले होते. त्यांच्या मुळाशी मुदतबंदी वेठ होती. ती बंद करण्याचा ठराव ना. गोखले यांनी विधिमंडळाच्या बैठकीत मान्य करून घेतला. जिल्हाधिकाऱ्यांना सल्ला देण्यासाठी जिल्हामंडळे विनापवाद स्थापावीत हा गोखल्यांचा ठरावही मान्य झाला.

मोर्ले-मिंटो-रिफॉर्म्सखाली नव्या विधिमंडळात सरकारने पहिला जुलमी कायदा आणला तो म्हणजे (१९१० साली) वृत्तपत्रे—छापखाने—नियंत्रणाचा.

त्याच्या तोंडओळखीनेच गोखले हळहळले. त्यामुळे त्याची मुदत, तो जरूरीचा कायदा मानला तरी, तीन-एक वर्षांपेक्षा अधिक ठेवू नका म्हणून गोखल्यांनी सांगितले. वृत्तपत्रांनी आमच्या राष्ट्राची प्रगती केली आहे, राष्ट्रीय चैतन्य निर्माण केले आहे; त्यांच्या नरडीला नख लावू नका, असे आर्जवी भाषण गोखल्यांनी केले. या कायद्यावर गोखले तुटून पडले नाहीत म्हणून फिरोजशहा मेहतासुद्धा संतापले. त्यातील रहस्य 'लीडर'चे संपादक सी. वाय्. चिंतामणी यांनी फोडले ते असे – १९१० च्या खिस्तमसमध्ये गोखले अलाहाबादला काँग्रेससाठी गेले होते. त्यांनाच चिंतामणींनी प्रश्न केल्यावरून आपल्या अविरोधाची कूळकथा गोखल्यांनी सांगितली. गव्हर्नर-जनरलच्या कौन्सिलचे कार्यकारिणीचे सभासद सत्येंद्रप्रसन्न सिंह झाले होते. हिंदुस्थानचे पहिले-वहिले भारतीय एक्झिक्यूटिव्ह मेंबर ते ! त्यांच्याकडे कायदेखाते होते. त्या नात्याने इतर अनेक विधेयकांप्रमाणे हे वृत्तपत्रे-छापखाने-नियंत्रणाचे विधेयकही मांडणे कर्तव्य म्हणून त्यांच्याकडेच आले. सर्वांत लोकधिक्कारास कारणीभूत होणाऱ्या त्या विधेयकाशी आपल्या नावाचा संपर्कही नको असे होऊन त्यांनी लॉर्ड मिंटोंना, सेक्रेटरी ऑफ स्टेटकडे आपण राजीनामा देत असल्याची तार धाडण्यास विनंती केली. सत्येंद्रांनी आपला राजीनामा परत घ्यावा अशी काही तडजोड घडवून आणण्यास लॉर्ड मिंटोंनी आपल्या सेक्रेटरीस सांगितले. त्यांनी सर लॉरेन्स जेंकिन् व गोखलेच काही तोड काढतील तर काढावी अशी सूचना सेक्रेटरीस दिली. प्रथमच एक्झिक्युटिव्ह मेंबर नेमलेल्या भारतीयाने एक वर्षाच्या आतच राजीनामा दिला तर हक्क मागतात पण जबाबदाऱ्या पेलत नाहीत असा भारतीयांच्या नावाने सर्व जगभर डांगोरा होईल, अशी एक धास्ती होती. म्हणून मिंटोसाहेब विधेयकात थोडा बदल करावयासही तयार झाले. सत्येंद्रांनी राजीनामा परत घेतला नाही तर फिरून पन्नास वर्षे तसा अधिकार मिळण्याची आशा भारतीयांनी करू नये, असे मोर्ले यांचे मत पडले ! गोखले आणि लॉरेन्स यांनी विधेयकात मूलगामी फरक केला तरच सत्येंद्रांनी राजीनामा परत घ्यावा असे मत दिले. मिंटोंनी संमती दिली. तेव्हा गोखले आणि सत्येंद्र यांनी डोकी घासली. मूळ विधेयक एतद्देशीय पत्रांनाच काचात धरणारे होते. आता ते अँग्लोइंडियन पत्रांनाही लागू करण्यात आले. अस्तित्वात असलेल्या सगळ्या वृत्तपत्रांकडून व छापखान्यांकडून जामिनक्या घ्याव्या असे मुळात होते. ते बदलून कायदा झाल्यानंतर मर्यादा सोडणाराकडूनच जामीन घ्यावेत अशी दुरुस्ती केली आणि तरीही जरूर तेव्हा हायकोर्टाकडे दाद मागण्याची सवड ठेवली ! त्या सुधारणा पाहून व्हाइसरॉयांचे सर्व कौन्सिल जळफळले ! पण मिंटोंनीच नेट धरला. तथापि, विधेयक मांडावयाच्या वेळी सत्येंद्रांनी नवीच शर्त पुढे केली. ते म्हणाले, 'गोखले यांनी विधेयकास पाठिंबा द्यावा.' गोखल्यांनी नकार दिला. गोखले लोकप्रतिनिधी होते. आता सत्येंद्रांची

मर्जी राखून मिंटोंनी दुरुस्ती केल्यावर सत्येंद्रांना राजीनामा देणेही अव्यवहार्य होते; तटस्थ वा मूक राहणेही त्यांना अशक्य होते. तेव्हा गोखले यांनी आपण त्या विधेयकावर टीका केली तरी विरुद्ध मत देणार नाही, एवढे सत्येंद्रांना कबूल केले. सत्येंद्रांचे समाधान झाले.

सन १९११ साली सभाबंदीच्या कायद्याला सरकारने जीवदान दिले. ना. गोखल्यांनी जिवापाड विरोध केला, पण उपयोग झाला नाही. १९१२ साली फिरून प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याबद्दल ना. गोखले यांनी विधेयक मांडले. पण ते अमान्य झाले. हिंदुस्थानातील वाढत्या खर्चासंबंधी त्यांनी १९११ त एक ठराव मांडला होता. सरकारच्या सर्व खात्यांवर उत्पन्नापेक्षा खर्चाचे मान वाढते आहे व त्यास आळा घालणे आवश्यक आहे, असा त्या ठरावाचा आशय होता. तीस वर्षांतील जमेच्या व खर्चाच्या रकमांची तेरीज घेऊन गोखल्यांनी आपली बाजू मांडली होती. अर्थसचिव रसिक असल्याकारणाने तो ठराव मान्य झाला. सन १९१२ साली गोखल्यांची नेमणूक पब्लिक सर्व्हिस कमिशनवर दरमहा दोन हजार रुपयांवर होणार, तेव्हा त्यांना विधिमंडळाचे सभासद राहता येणार नाही, असा विधिमंडळात बूट निघाला असता, आपण पब्लिक सर्व्हिस-कमिशनवर काम करण्यासाठी सरकारकडून दमडीही पगार घेणार नाही असे स्पष्ट सांगून ना. गोखल्यांनी सगळ्यांची तोंडे बंद केली. त्याच (१९१२) सालच्या ७ मार्च रोजी ना. गोखले विधिमंडळात म्हणाले, "ना. अर्थमंत्र्यांनी एका वर्षाच्या अवधीत होऊ घातलेल्या घडामोडींचे काहीसे भयदायक चित्र रेखाटले आहे. त्यांनी आपल्याला इशारा दिला की, आकाश एकदम भरून येईल आणि सध्या अर्थखात्याची जी सुखासीन अवस्था आहे तिच्याऐवजी जादा कर लादणे त्याला आवश्यक होईल; आपण कदाचित एकाएकी निराळ्याच गोंधळात पडूं!! आकाश कोणत्या काळोखाने एक वर्षात भरून येऊन कसले कर लादायला लागण्याची भीती ना. अर्थसचिवांना होती हे स्वच्छ उकलून घेण्याचा ना. गोखल्यांनी प्रयत्न केला; पण ते जमले नाही. १२ डिसेंबर १९११ रोजी पंचम जॉर्ज बादशहा स्वतः हिंदुस्थानात येऊन त्यांचा दिल्लीस राज्यारोहण-समारंभ झाला आणि त्या वेळी त्यांनी कलकत्त्याची राजधानी दिल्लीस आणली व वज्रलेप म्हणून लॉर्ड कर्झननी म्हटलेला वंगभंग रद्द करून प्रजा संतुष्ट केली. मग आता कसला काळोख पसरणार होता? अनेक प्रकारे अर्थमंत्र्यांना छेडण्यात आले, पण ते अखेरपर्यंत गप्पच राहिले. त्यांच्या डोळ्यांपुढे जर्मनीच्या एरिच फॉ. लुडेन डॉर्फ या निष्काम कर्मयोग्याने १९०४ पासून जर्मन लष्करातील युयुत्सू सैन्याधिकाऱ्यांना सल्लामसलत देऊन जागतिक युद्धाची भट्टी पेटविण्याचे त्याचे बेत दिसत असतील काय? का लाला लजपतरायांना हिंदुस्थानात येण्याची बंदी केल्यामुळे त्यांच्या अमेरिकन वास्तव्यात नव्या हिंदी माणसांना अमेरिकेत व्यापार

करू द्यावयाचा नाही अशी बंदी झाल्याने असंतुष्ट होणाऱ्या पंजाबींच्या " गदर " चळवळीचे रणकंदन त्यांना दिसत होते ? १९०५ सालीच पॅरिस येथे शामजी कृष्ण-वर्मांनी इंडियन होमरूल लीग काढली; १९०७ च्या ऑगस्टमध्ये जर्मनीतील स्टूटगार्ड येथे कम्युनिस्टांच्या सभेत मॅडम कामांनी स्वतंत्र भारताचे निशाण फडकविले, जर्मन कैसरने मिशीला पीळ भरून " ज्याच्यावर सूर्य मावळत नाही असे साम्राज्य भोगण्याचा जर्मनीला का अधिकार असू नये ? " असा प्रश्न केला; हिंदुस्थान स्वतंत्र व्हावा म्हणून " प्राणादपि धनादपि " अशा निकरावर येऊन गुप्तचर झालेले काही हिंदुस्थानचे बेफाम तरुण आपापल्या संघटना उभारून परदेशांशी संधाने बांधण्याचा प्रयत्न करीत होते; या सर्व घटनांची संकलित परिणती मानव्याला हादरे देणाऱ्या स्वरूपात होईल अशी बातमी ब्रिटिश चार-चक्षूंनी मिळवल्यामुळेच इंग्लंडचे सरकार बिचकले, म्हणून हिंदुस्थानचेही सरकार बिचकून अर्थसचिव " भयकृत "च्या कल्पनेने चाचपडू लागले होते की काय ? प्रसंगच उद्भवला तर बादशहाचा प्रतिनिधी शत्रुहल्ल्यापासून सुखरूप असावा म्हणून राजधानी दिल्लीस आणली व रंगरूटभरती सोपी व्हावी म्हणून वंगभंग रद्द झाला ही " किं-वदन्ती " खरी की खोटी, हे तो दूरदृष्टीचा मुत्सद्दी अकाली कसे काय सांगणार ?

" ना. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या हातून वरिष्ठ विधिमंडळातील काम इतक्या उत्कृष्ट रीतीने झाले याचे एक कारण त्यांची बुद्धिमत्ता हे तर आहेच; परंतु त्यांचे लक्ष जगाच्या बहुमतापेक्षा कर्तव्याकडे होते. हे कारण पहिल्याहून अधिक महत्त्वाचे आहे. विधिमंडळात जाणे म्हणजे केवळ सरकारची मर्जी आपणावर बसावी यासाठी जावयाचे अशी त्यांची बुद्धी नव्हती. " असा अभिप्राय केसरीने व्यक्त केला आहे. देशाची तरफदारी करणाऱ्यांना सर्व खडान खडा माहिती असली पाहिजे असे ना. गोखले मानीत. ना. जगन्नाथ शंकरशेटनंतर हिंदी वरिष्ठ विधिमंडळात आणीबाणीच्या प्रसंगी व राजकीय अस्वस्थेमुळे क्षुब्ध झालेल्या वातावरणात कार्यद्याच्या प्रतिगामी स्वरूपाला आळा घालण्याचे काम ना. गोखल्यांनी केले. ज्यांच्यावर लोकांनी मदार ठेवू नये अशा अर्थाने ना–मदार गोपाळ कृष्ण गोखले नव्हते; पण नावापुरते म्हणजे कीर्ती वा प्रसिद्धी होण्या-पुरतेच विधिमंडळातील जागेचे धनी, या अर्थानेही ते नाम-दार नव्हते. तर बहुजनसमाजाच्या जीवनाचा सूक्ष्म अभ्यास करून त्याच्या अव्वल हिताच्याच प्रगतीसाठी आपल्या ' अकलेचा पवाड ' गोपाळ कृष्णांनी विधिमंडळातून व विधिमंडळाबाहेर एवढा घातला की, आखीव, रेखीव, कापीव आणि आदबशीर शब्दांनी गोपाळ कृष्ण गोखल्यांनी जनतेची आणि भारताची मांडलेली बाजू परकीय सत्तेला कडू कोयनेलासारखी मुकाट्याने गिळावीच लागे. शास्त्रीय पुस्तकी पांडित्याला जनतेच्या प्रत्यक्ष सुखदुःखांच्या छाननीची जोड दिल्याशिवाय विशाल

आमजनतेचे नि हिंदुस्थानच्या जागतिक प्रतिष्ठेचे खऱ्याखुऱ्या अर्थाने प्रतिनिधी कोणाही देशभक्तास होता यावयाचे नाही, असाच ना. गोखल्यांच्या मनाचा पिंड असल्याकारणाने, त्यांनी धीम्या धोरणाच्या मुत्सद्देगिरीने आपले व भारताचे जगात नाव केले. पारतंत्र्यातही हिंदुस्थान आपली नाम-प्रतिष्ठा प्राणपणाने जपतो हे गोखल्यांनी सिद्ध केल्यामुळेच भारताचे नामंदार म्हणजे नामदार गोपाळ कृष्ण गोखले हे समीकरण रूढ होऊन बसले. लॉर्ड कर्झन यांनी नामदारांच्या १९१५ तील मृत्यूनंतर असे उद्‌गार काढले की, " जगातील कोणत्याही प्रातिनिधिक संस्थेस ना. गोपाळराव गोखले ललामभूत झाले असते. इंग्लंडच्या हाऊस ऑफ कॉमन्स-मध्येही त्यांनी उच्च प्रतीचा गौरव मिळवला असता. "

✕ ✕ ✕

१६ : न्या. रानडे स्मारक

ना. गोपाळ कृष्ण गोखले यांचे विधिमंडळातील संपूर्ण तेजस्वी कतृत्व पहावयास त्यांचे आध्यात्मिक आणि राजकारणी गुरू न्या. रानडे हयात नव्हते. मुंबई विधिमंडळातील गोखल्यांची कामगिरी तेजस्वीपणे चालल्याचे त्यांनी पाहिले–ऐकले होते; पण विसाव्या शतकाला सुरुवात होऊन एक पंधरवडा लोटताच ता. १६ जानेवारी १९०१ रोजी त्यांना देवाघरचे बोलावणे आले. " रावसाहेबांच्या मृत्यूपासून एखाद्याच्या सर्वच जीवनावर सगळीकडून अंधार पसरावा तसे मला झाले आहे; आणि नवनवे सन्मान (सिटिझन् ऑफ दि इंडियन् एम्पायर C. I. E. सारखे) जरी मजकडे चालून येत असले, तरी त्यांनी माझ्या मनाला समाधान होत नाही; सुख तर नाहीच नाही. ज्या वेळी अभिनंदनांचे वर्षाव मजवर मित्रमंडळी करतात, तेव्हा जिव्हाळ्याच्या माणसाच्या स्मशानयात्रेहून परतलेल्या माणसाला मेजवानीचा आग्रह चालल्यासारखे मला भासते. अर्थात आपल्याला होणारी केवढीही न आवरणारी दुःखे अलग राखूनच अंगीकृत कर्तव्ये पार पाडलीच पाहिजेत. कर्तृत्वांचे आधारस्तंभ गेल्यामुळे, ते कर्तव्यपालन कितीही दुबळेपणाने होत राहिले तरी ते धीमेपणाने, निष्ठेने पुढे रेटलेच पाहिजे." ना. गोखल्यांच्या या उद्गारांत प्रतिबिंबित झाल्याप्रमाणे न्या. रानड्यांचा वारसा चालविणे सर्वांशी गोखल्यांच्या अंगावर पडले होते. रानडे वारल्याने देशभरच अंधार पडल्यासारखे झाले होते. देशातील सर्व कर्त्या माणसांना देशाच्या कामी, शक्य तर एकसूत्री गुंफून, त्यांच्या कर्तृत्वाचा फुलोरा देशाच्या उन्नतीच्या चरणी लावावयाचा, परिस्थितीचा पूर्ण विचार करून लोकांचे पाऊल भलत्या दिशेला पडू नये आणि कार्यकर्त्यांच्या सहकार–समन्वयाने जी काही राष्ट्राची एकजिनसी प्रगती निश्चित होईल, ती चढत्या वाढत्या पदवीने होते आहे, यावर लक्ष ठेवावयाचे आणि आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेमुळे सगळ्या हिंदुस्थानचे पुढारीपण करावयाचे– या व्रताची आपली गुरुमाउली आपणास सोडून जाताच त्या जगाचे रूपच पालटल्यासारखे गोपाळरावांस होऊन गेले. सूर्य मावळला, आणि त्यावर लावलेल्या दिव्यावर गुजराण करण्याची वेळ आली ! ! तरीही त्यांच्या कानांत तीच गुरुवाणी सांगत होती की, " कामाचे डोंगर पडले आहेत, खोरीकुदळी घेऊन कामास लागा.

अहर्निश देशकार्याचा ध्यास घेणारी खरी निष्ठावंत माणसे हवीत." त्यामुळेच डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नौकरीनंतर स्वतंत्रपणे देशकार्याला स्वतःस पूर्ण वाहून घेण्याचे गोखल्यांनी ठरविले, त्याकडेच आता गोपाळरावजी वळले.

रावसाहेब रानड्यांच्या उद्योगाचे स्वरूप सर्वव्यापी होते, तरी हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीसंबंधाने त्यांना विशेष काळजी वाटे. अर्थशास्त्राची तत्त्वे हिंदुस्थानास लागू करताना उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांचा सशास्त्र अभ्यास करण्याची, इंग्लंडास मान्य होणारे कित्येक अर्थशास्त्रसिद्धान्त हिंदुस्थानास का लागू पडणार नाहीत हे सिद्ध करण्याची आणि हिंदुस्थानसरकारच्या सांपत्तिक धोरणाचे त्या दृष्टीने परीक्षण करण्याची त्यांना मोठी आवड होती. रावसाहेबांचे स्मारक म्हणून पुणे येथे "रानडे एकॉनॉमिक इन्स्टिट्यूट" स्थापन करण्यासाठी गोपाळराव गोखल्यांनी एक लाख रुपये उभारण्याचे १९०५ साली ठरविले, ते त्या दृष्टीने योग्यच होते.

ती स्मारकसंस्था दुहेरी स्वरूपाची होती. तीत हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीचा व तदनुषंगिक इतर विषयांचा अभ्यास करण्यास साधने मिळावीत असा एक उद्देश होता. हे त्या संस्थेचे शैक्षणिक रूप होय. व्यवहाराच्या दृष्टीने, हिंदुस्थानची सांपत्तिक प्रगती होण्यास ज्या शोधांची मदत होईल असे शोध लावण्यास व प्रयोग करण्यास सापडावे म्हणून जोडलेली प्रयोगशाळा हे तिचे दुसरे स्वरूप. 'रानडे एकॉनामिक इन्स्टिट्यूट' सन १९१० साली साकार झाली आणि पुढे काळाच्या ओघात पुणे विद्यापीठ स्थापन झाल्यावर त्याने ती आपल्या संपूर्ण अखत्यारात घेतली.

न्यायमूर्ती रानड्यांचे दुसरे एक वाङ्मयस्मारक स्वतः त्यांचे जीवनचरित्र लिहून उभारावे अशी नामदार गोपाळराव गोखल्यांची तीव्र इच्छा होती. न्यायमूर्तींच्या गृहलक्ष्मी श्री. रमाबाई रानडे यांनी भक्तिभावाने "आमच्या आयुष्यातील आठवणी" हे आत्मवृत्त लिहून काढल्यावर त्याला ना. गोखल्यांनी प्रस्तावना लिहिली आणि मद्रास वगैरे ठिकाणी रानड्यांची स्मारके उभारली गेली, त्यांची उद्घाटनेही गोपाळराव गोखल्यांनी रानड्यांचे गुणगान करून व जीवनरहस्य सांगून केली. पण वरिष्ठ विधिमंडळात प्रवेश केल्यापासून, देशकार्याचा लकडा जो गोखल्यांच्या पाठीमागे लागला व जो त्यांनी जबाबदारीच्या कर्तव्य-बुद्धीने लावून घेतला, त्यातून त्यांना न्या. रानड्यांचे चरित्र लिहिण्याइतके स्वास्थ्य शेवटपर्यंत सापडले नाही, हे खरे! कीर्ति-प्रवचनापेक्षा कर्मयोगी आचरणाने शिष्याकरवीची पूजा गुरूंच्या आत्म्यालाही अधिक पसंत पडली असेल! पण गोपाळराव गोखल्यांच्या लेखणीतून साकार होणाऱ्या रानडे-चरित्राच्या प्रत्यय-बोधाला मराठी-इंग्रजी भाषा आणि रानडे-गोखल्यांच्या मागील पिढ्या मुकल्या हेही काही खोटे नाही.

☒ ☒ ☒

१७ : भारत-सेवक-समाजाची स्थापना

रानडे चरित्राची देणगी आपल्या मागील पिढ्यांस देणे ना. गोपाळराव गोखल्यांना जमले नाही तरी स्वतः गोखल्यातील गोखलेपण प्रत्ययाला आणून देणारी जी महान् देणगी गोपाळराव गोखल्यांनी हिंदुस्थानच्या स्वाधीन केली आहे, ती म्हणजे १९०५ च्या १२ जूनला त्यांनी केलेली आपल्या "भारत-सेवक-समाजाची" संस्थापना होय. "भूतमात्रांचे ठायीं । आपपर नेणोचि कांहीं ॥" अशा वृत्तीने "जो खांडावया घाव घाली । की लावणी जयानें केली । दोघा एकाचि सावली । वृक्ष दे जैसा॥" तसे वागून देवसेवा आणि लोकोपकार करण्याची भारतीय परंपरा व त्यासाठी मठा-आश्रमांच्या स्थापना-संचालना हजारो वर्षे हिंदुस्थानात होत असल्या तरी आधुनिक अर्थाने लोकसेवा आणि तिच्यासाठी संस्था-संगोपन आपल्याकडे फारसे घडत नव्हते. सगळ्या राष्ट्राच्या कल्याणाचा सूक्ष्मपणे एकजिनसी विचार करून "उदंड समुदाय करावे । युक्तिबुद्धिनें भरावे ॥" व "बहुत जनास चाळवी । नाना मंडळें हालवी ॥" असा समर्थ पुढारी होऊन देशाच्या राजकारणापासून तो जीवनाच्या सर्व अंगोपांगांत तेज भरीत रहावे, असा व्याप, आटोप, खटाटोप समर्थ रामदासांनी आपल्या काळी केला. "पुढीलांस" तो सांगून ठेवला हे खरे; पण त्यांच्या समकालीन शिष्यांनी जसा तो केला अगर त्यांच्यामागे ब्रह्मेंद्रस्वामींनी पहिल्या बाजीरावाच्या कारकीर्दीअखेर जसा तो गिरवला, तसा सातत्याने तो या राष्ट्रात धर धरून राहिलेला आढळला नाही. पण ब्रिटिशांची राजवट येथे सुरू झाल्यानंतर बरीक, राष्ट्राचे ऐहिक जीवन समृद्ध करण्याकरिता आपले जीवनही सेवाव्रताने बरबाद करून घेण्यासाठी लोक स्फूर्तीं घेऊ लागले आणि जगाच्या जीवनप्रवाहात आपले राष्ट्र मागे पडू नये म्हणून, त्याच्या सेवेसाठी सेवावृत्तींच्या संस्था संघटित करण्याकडे हिंदुस्थानातील विचारवंत दक्षतेने लक्ष पुरवू लागले.

न्यायमूर्ती रानड्यांच्या एक वेळच्या शब्दांनी आणि 'येशूचे सेवक' या संस्थेचा वृत्तान्त वाचून ज्या विचाराचा उदय गोपाळराव गोखल्यांच्या चित्तात झाला होता, त्याला मूर्तस्वरूप देऊन गोपाळराव गोखल्यांनी भारत-सेवक-समाजाची—सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीची—स्थापना केली, त्याच्या पायाचा दगड

न्या. रानडे यांचे स्नेही आणि पुणे सार्वजनिक सभेतील स्वतः गोखल्यांचे " वडीलपण धरून " झालेले सहकारी, आबासाहेब साठे यांच्या हस्ते बसवून त्याच्या संवर्धनाचा भार स्वतः गोखल्यांनी आपल्या अंगावर घेतला तो १२ जून १९०५ रोजी ! फर्ग्युसन कॉलेजच्या जवळील टेकडीवर उगवल्या सूर्याला साक्षी ठेवून दशदिशांच्या देखत प्रथम स्वतः गोपाळराव गोखल्यांनी भारतसेवाव्रताचा शपथविधी केला आणि मग तीच भारतसेवाव्रताची शपथ त्यांनी आपल्या मागोमाग श्री. नटेश अप्पाजी द्रविड, गोपाळ कृष्ण देवधर व अनंत विनायक तथा वामनराव पटवर्धन यांस दिली. आपले सर्व आयुष्य भारतभूमी-(हिंदुस्थान)-च्या सेवेस अर्पण करण्याची ती शपथ होती. आज या संस्थेत हिंदुस्थानच्या राजकीय, सांपत्तिक, सामाजिक स्थितीसंबंधीच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी एक मोठे ग्रंथालय आहे. भारतसेवेची ती खरी शाळा आहे. गोपाळराव गोखले दर पावसाळ्यात नवीन होतकरू सेवकास तेथे जमवून इष्ट कार्याचे वळण घालून देत असत. काँग्रेसची स्थापना होण्यापूर्वी बंगाली तरुणास उद्देशून ह्यूमसाहेबांनी काढलेल्या पत्रका-प्रमाणेच भारत-सेवक-समाजाचे ध्येय बहुतांशाने होते असे फिरोजशहा मेहतांचे चरित्रकार सर होमी मोदी सांगतात. ब्रिटिश–साम्राज्यान्तर्गत वसाहतीचा दर्जा हिंदुस्थानास शक्य तेवढ्या ताबडतोब प्राप्त करून देणे, त्यासाठी अविश्रांत श्रम व देशाची संघटना करणे, संकटे व मोह टाळून आपले कर्तव्य करीत राहणे, या सर्व गोष्टींची जाणीव जनतेस देण्याकरिता ऐहिक– सर्वसंगपरित्याग करून देशप्रेमाने जीवन व्यतीत करणाऱ्या " राजकारणी संन्याशांची " संस्था म्हणजे भारत-सेवकसमाज.

(१) आपल्या स्वतःच्या उदाहरणाने लोकांत खरीखुरी देशभक्ती उत्पन्न करणे आणि तदर्थ त्यांस स्वार्थत्याग करण्यास शिकविणे. (२) लोकांस राजकीय शिक्षण देणे आणि समाजात चळवळ करणे व लोकमत तयार करणे. (३) निर-निराळ्या धर्म-जातिजमातींतील विरोध काढून टाकून तेथे सलोखा व प्रेमभावना निर्माण करणे. (४) मागासलेल्या मंडळींत शिक्षणाचा फैलाव करणे, विशेषतः औद्योगिक व धंदेशिक्षणासंबंधी जास्त सुसंघटित प्रयत्न करणे. (५) पूर्वास्पृश्यांचा सर्वतोपरी सुधारणा करणे– या पाच उद्देशांनी विद्यार्थी, साधारणसभासद आणि प्रमुख, त्याचप्रमाणे संलग्नसभासद यांनी निष्काम कर्मयोगी होऊन देशसेवा करीत रहावयाचे ! प्रत्येक विद्यार्थ्यास पाच वर्षे शिक्षण मिळावयाचे; तीन सभासदांच्या सल्लागारमंडळाच्या सहकाराने प्रमुख (सभासद प्रमुख) संस्थेचे सर्व नियम व नियमन करणार; त्याच मंडळाच्या शिफारशीने कोणालाही सभासद होता येईल मात्र त्याने शपथ घ्यावयाची ती—

(अ) माझ्या डोळ्यापुढे सदैव देशाच्या कल्याणाची गोष्ट प्रथम राहील,

मजमध्ये जे काही उत्कट, भव्य आहे ते सर्व मी आपल्या देशाच्या सेवेस अर्पण करीन.

(आ) देशाची सेवा करताना स्वार्थ-लोलुपता मनाला येऊ येणार नाही.

(इ) सर्व हिंदी लोकांस मी भाऊ समजेन व सर्वांच्या उन्नतीसाठी पंथ, जाती वगैरे बाजूस ठेवून मी प्रयत्न करीन.

(ई) माझ्या किंवा माझ्या कुटुंबाच्यासाठी भारत-सेवक-समाज जे काही देईल त्यातच मी आनंद मानीन. स्वतःसाठी त्याहून अधिक पैसा मिळवण्याच्या भरीस मी पडणार नाही.

(उ) मी आपले वैयक्तिक आचरण पवित्रच पवित्र ठेवीन.

(ऊ) मी कोणाबरोबर खाजगी, व्यक्तिगत भांडणे भांडणार नाही.

(ऋ) भारत-सेवक-समाजाचे ध्येय मी सदोदित डोळ्यासमोर ठेवीन. शक्य तितक्या कळकळीने व उत्कटतेने मी समाजाच्या अभिवृद्धयर्थ प्रयत्न करीन. समाजाच्या ध्येयाला प्रतिकूल असे मी काहीसुद्धा करणार नाही.

अशा शपथबद्ध सभासदांच्या संघटनेची व तिच्याकडून निरलसपणे होणाऱ्या विधायक, शिस्तबद्ध आणि शास्त्रशुद्ध सेवाकार्याची गोपाळराव गोखल्यांना जवळ-जवळ गेले दशकभर आवश्यकता जाणवत होती. कारण, हिंदुस्थानच्या सार्वजनिक उभारीत १८९३ पासून जी नवजीवनाची आणि नवीन नवीन कृतिप्रणालींची उकळी सारखी फुटत होती, तिचे ध्येय हिंदुस्थानची प्रतिष्ठापूर्वक उन्नती हे एकच असले, तरी तिच्या साध्यासाठी देशात चार सरळ सरळ राजकीय पंथप्रणाल्या निर्माणच झाल्या होत्या त्या अशा :

(१) प्रस्तुतच्या हीन स्थितीचे परकी सत्ता हेच सर्वस्वी कारण असून स्वातंत्र्याखेरीज आपले दैन्य नाहीसे होण्यास दुसरे कोणतेही साधन नाही. हिंदुस्थानच्या तेहत्तीस कोटी लोकांपैकी प्रत्येक मनुष्याने आपापल्यापरी उद्योग केल्यास मूठभर राज्यकर्त्यांचा पाड तो काय ? स्वार्थत्यागाच्या फुलबागेतील वेचक कर्तृत्वाच्या फुलांचा हार तयार झाला की, स्वातंत्र्यदेवीची भारताच्या मंदिरातील सिंहासनावर प्रतिष्ठापना व्हावयास विलंब नाही. "साधना-नामनेकता" या नात्याने वाटेल त्या मार्गांनी आपली जीवघेणी परसत्ता उलथून पाडलीच पाहिजे. त्यासाठी गुप्तमंडळ्या, राजकीय खून, बॉम्ब यांचाही वापर करावयास हरकत नाही. या मताच्या लोकांना सत्ताविध्वंसक, अराजक, अनार्किस्ट, अत्याचारी अशी नावे मिळाली होती.

(२) दुसरा वर्ग क्रांतिकारकांचा. पहिल्या वर्गाचे हे गुरू वा ब्रह्मदेव. आपल्या अंगच्या विद्वत्तेच्या जोरावर, धूर्ततेने वागून, पहिल्या वर्गासारखे

ब्रिटिश रियासतीचे उघड शत्रुत्व हा वर्ग पतकरीत नव्हता. आपल्या भाषणांनी आणि लेखांनी तरुण उत्साही आणि भावनाप्रवाही पिढीवर उपदेशाने, व्यंजनेने, लक्षणेने, सादृश्याने, अनुमानाने, स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी जीवाच्या करारावर वा जीवाची कुरवंडी करून प्रयत्न करण्याचे महत्त्व, निकड आणि सामर्थ्यसंपन्नतेची साधने यांचा ठसा हा वर्ग उमटवीत असे. गंभीर आणि तात्त्विक विचारांचा पेहराव, पहारा आणि फेर त्याच्या शिकवणीत सदैव आढळावयाचा. हिंदुस्थानात प्रचलित असलेले सरकार आणि त्याशी संलग्न असणाऱ्या संस्था व व्यक्ती यांच्यावरील बहिष्कारापासून सर्व जालीम अशा उपायांचा पुरस्कार, परकीयांकडून स्वकीयांकडे द्रुततम सत्तान्तर होण्यासाठी, हा वर्ग वेळी-अवेळीसुद्धा करीत असे.

(३) तिसरा वर्ग असंतोषवाद्यांचा. स्वराज्य म्हणजे निर्भेळ स्वातंत्र्य प्राप्त झाल्याखेरीज देशाचे पाऊल कोणत्याही तऱ्हेने पुढे पडणारच नाही, असे याचे मत असे. पहिल्या दोन वर्गांपेक्षा हा वर्ग अधिक व्यवहारवादी. परकीय सत्तेशी जीवनव्यवहारासाठी प्रजेला अपरिहार्य तेवढा सगळा सहकार करावाच लागतो; तेव्हा तेवढाच काय तो करावा; बाकी सर्व ठिकाणी, ज्याला जितका जमेल त्याने तितका परकीय सत्तेला विरोधच विरोध प्रगट करावा, अशी या वर्गाची विचारसरणी. पहिल्या दोन वर्गांप्रमाणेच पण स्वतःचा आटोप सांभाळून परकीय सत्तेच्या तिरस्काराने, धिक्काराने आणि निदान नाखुषीच्या संदर्भाने सर्व व्यवहार चालविले पाहिजेत, असा या वर्गाचा कटाक्ष. परकीय सत्तेमुळे लोकांचा पदोपदी तेजोभंग होतो. तेव्हा राजकीय उन्नतीशिवाय औद्योगिक, सामाजिक व नैतिक उन्नती होणे शक्य नाही असा त्याचा ठाम सिद्धान्त. स्वावलंबन शक्य नसेलच तर मग परावलंबनाचा प्रतिकार आणि परावलंबन सुलभ किफायतीचा बहिष्कार ही या वर्गाची साधना. प्लेग, दुष्काळादि सार्वजनिक आपत्काली देखील ही साधना ढळता कामा नये, असा या वर्गाचा कडक दंडक !

(४) या तीन वर्गांशिवाय आणखी एक जो वर्ग होता तो हिंदुस्थान देशाची हीनदीन स्थिती गेली– घालविलीच पाहिजे, असेच मानणारा होता. त्यासाठी परकीय सत्ता गेली पाहिजे, पण ती जावयासाठी करावयाच्या प्रयत्नात, अगर प्रयत्नांती प्रतिष्ठित होणारी स्वकीय सत्ता सबल, शहाणी, शीलसंपन्न असली तरच ती टिकाव धरील, म्हणून ज्या कारणाने पारतंत्र्य आले त्याचे निर्मूलन होईल असे जनतेला शिक्षण देण्यात, समवायाने संघशक्ती निर्माण करीत करीत, परकीय सत्तेला " लोक राजी राखण्याचे सोंग " तरी करणे भाग असते, ते सजविण्याच्या (परसत्तेच्या) धडपडीत, स्वकीयांची सत्ता स्थापित व्हावी अशा अनुकूलतेचा, आपले ध्येयावर नजर देऊन, फायदा

उठविण्यास चुकू नये असे या वर्गाचे सरळ सरळ म्हणणे होते. जगाच्या नवीन जमान्यात, परकीय सत्ता गेल्यावरची नवी स्वदेशी राजवट लोकसंमत लोकशाहीचीच होणे अपरिहार्य असल्याकारणाने, समवायाने संघशक्ती वाढविण्यास अवसर मिळावा– मिळवावा म्हणून परकीय सत्तेचे नर्मसचित्व न करताच, तिच्या चुका तिच्या गळ्यात बांधून, तिला लोकानुकूल करीत जावे व प्रगतीची धीमी पावले खंबीरपणे दिवसेदिवस ठाम करीत असावे. असा विकास साधावा की, जागतिक घडामोडीत परकीय सत्तेने येथील आपला गाशा गुंडाळताच, भारतीयांना आपल्या देशाचा कारभार आपली छाप जगावर ठेवून खंबीरपणे करता यावा.

या चौथ्या वर्गाच्या प्रथाप्रणाली चालविणारे असे राजकारण प्रभावीपणाने करण्यासाठी व त्या द्वारा देशसेवा करण्यासाठी, भारतसेवक समाजाची गोखल्यांनी स्थापना करून पोटच्या पोरापेक्षाही गोपाळराव गोखल्यांनी त्या संस्थेला प्रिय मानले आणि तिला चालती, बोलती, कर्ती करून जणू स्वतःच स्वतःचे स्मारक करून ठेवले. आपले सर्व विवेकशुद्ध जीवन ओतून ना. गोपाळराव गोखल्यांनी सार्वजनिक जीवनाच्या व्यावहारिक अध्यात्मीकरणाचा एक आदर्श विष्णुबुवा ब्रह्मचाऱ्या–(१८२५–७१)-प्रमाणे निर्माण करून ठेविला. इंग्लंडमधील एका गरीब बाईच्या एका गिनीपासून भारतातील सर्व प्रांतीय समंजस धनिकांकडून गोपाळराव गोखले दरसाल त्या संस्थेसाठी निधी आणीत. आपल्या हयातीच्या शेवटच्या दहा वर्षांत आणि संस्थेच्या पहिल्या दशकात चोवीस सभासदांना दीक्षा देऊन त्यांना आंतरराष्ट्रीय राजकारणात व संघटनांत नावारूपाने विधायक कार्य करण्याची पात्रता गोपाळराव गोखल्यांनी प्राप्त करून दिली होती.

भारत-सेवक-समाजाच्या कार्यास गोपाळराव गोखल्यांच्या स्नेहल चाहत्यांनी सढळ हाताने मदत केली. म्हणूनच सुमारे तीन लाख रुपये खर्चून समाजासाठी इमारती, सभासदांना राहण्याच्या जागा, ग्रंथसंग्रह, छापखाना व वृत्तपत्रे एवढी साधने अस्तित्वात आली. भारत-सेवक-समाजाचा पात्रतासिद्ध सभासद होणारा गृहस्थ सामान्यपणे पदवीधर तरी असावा लागतोच. शिवाय त्यास देशहितासाठी झटण्याची तळमळ आणि स्वार्थत्यागाची ऊर्मी लागते. एखाद्या विशिष्ट जीवन-शाखेचा अभ्यास तितिक्षा व तपस्या करून आपल्या निष्काम–कर्मयोगाने लोकसेवा त्या सभासदास बजवावयाची असते. त्याच्या जीवनात देशभक्ती व धर्मश्रद्धा एकजीव होऊन बसल्या पाहिजेत. ना. गोखल्यांच्याच शब्दांत सांगावयाचे तर– "एखादे धर्मकृत्य करावयाचे झाल्यास ज्या चैतन्याने माणसे त्या कामास पुढे सरसावतात, त्याच चैतन्याने या ऐहिक देशकार्याच्याही कामी आपल्या देशबांधवांपैकी पुरेशा संख्येने तरुण मंडळींनी पुढे सरसावले पाहिजे ही एक आवश्यक

गोष्ट आहे. सार्वजनिक जीवनाचे अध्यात्मीकरण होणे जरूर आहे. सर्वांची अंतःकरणे देशप्रेमाने इतकी गच्च भरली पाहिजेत की, त्याच्यापुढे बाकी सर्व गोष्टी अगदी तुच्छ तुच्छ भासल्या पाहिजेत. मायभूमीसाठी यज्ञ करावयाची जी जी वेळ येईल, त्या त्या प्रत्येक वेळी आनंदच आनंद मानणारा जिव्हाळ्याचा देशाभिमान, अडचणीने किंवा संकटाने देखील स्वतःच्या ध्येयापासून यत्किंचितही माघार न घेणारे अंतःकरण, ईश्वरी इच्छामात्रावरील असा सखोल विश्वास की जो कशानेही डगमगणार नाही– या अशा गुणांनी सज्ज असणाऱ्या कार्यकर्त्याने आपल्या जीवन-कार्यास आरंभ करून स्वदेशाच्या सेवेत स्वतःला झिजण्यात आनंद मानला पाहिजे."

तात्पर्य, " सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचें । परंतु तेथें परमेश्वराचें । अधिष्ठान पाहिजे ॥ " या समर्थवचनात फार तथ्य आहे. परमेश्वर जसा " आहे तरी सर्वा ठायीं । पाहो जाता कोठेंच नाहीं ॥ " असा आहे, तसेच आपल्या कार्याने सर्वत्र असणारे पण सिद्धीवर नजर ठेवून प्रसिद्धिपराङ्मुख असे कार्यकर्ते उत्पन्न व्हावेत म्हणून भारत-सेवक-समाजाची निर्मिती होती व आहे.

नामदार गोपाळराव गोखल्यांच्या या उदाहरणावरून त्यांचे शिष्य जे महात्मा गांधी यांनीही पुढे आपल्या राजकारण-साधनेत असेच आश्रम काढले, त्याचप्रमाणे पंजाबचे प्रभावी देशभक्त लाला लजपतराय यांनी विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकाचे प्रारंभी लोकसेवक संघ – सर्वेंट्स् ऑफ् दि पीपल् सोसायटी – काढला. भारत-सेवक-समाजाची घटना आणि त्या घटनेनुसार आवश्यक ती वर्तननियमावली किंवा आचारसंहिता बनवून गोखल्यांनी ती सर फिरोजशहा मेहता आणि प्रि. सेल्बी यांच्या अभिप्रायार्थ पाठविली होती. एक प्रकारे या महत्त्वाच्या पण व्यक्तिपसंतीच्या गोष्टी बाजूला ठेवल्या तरी भारत-सेवक-समाजाची स्थापना ही एक अपूर्वाईच होती. कारण, भारत-सेवक-समाजाच्या घटक सभासदांनी आदिवासींची सेवा केली आहे; आंतरराष्ट्रीय क्षेत्रातही कामकऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे हाताळले आहेत; नद्यांचे पूर, अन्नांचे दुष्काळ आणि रोगांच्या साथी व धरणीकंप यांनी रंजल्या-गांजल्या जनतेची नम्रपणे जिवापाड सेवा केली आहे; स्त्रियांना शिक्षणाची क्षेत्रे उपलब्ध करून दिली आहेत; गोरगरीबांच्या नित्य जीवनातील आर्थिक विवंचना सहकारी पतपेढ्यांच्या द्वारा दूर केल्या आहेत. ना. श्रीनिवास शास्त्री, ठक्करबाप्पा, नारायण मल्हार जोशी, गोपाळ कृष्ण देवधर, आर. आर. बखले, श्रीधर गणेश वझे, नटेश अप्पाजी द्रविड, वामनराव पटवर्धन, हृदयनाथ कुंझरू, कोंडाप्पा राव, कृष्णाजी गणेश लिमये, ए. डी. मणी ही भारतसेवकांची नावेच अशी आहेत की, त्यांच्या बहुमोल भारतसेवेचे स्मरण होऊन कोणाही विचारवंताची मान आदराने लवलीच पाहिजे.

मुंबई, नागपूर, मद्रास आणि अलाहाबाद येथे भारत-सेवक-समाजाच्या शाखा स्थापन झालेल्या असून सातारच्या रा. व. रावजी रामचंद्र काळे यांनी पुण्याच्या मुख्य कचेरीतच ना. गोखल्यांच्या पुण्यस्मरणार्थ " गोखले स्कूल ऑफ पॉलिटिक्स अँड एकॉनॉमिक्स " ही संस्था आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ प्रा. धनंजयराव गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाखाली चालू केली. तीही दिगंतकीर्त आहे. " सदा कर्मयोगाचिया रे पदासी । रमा सेविते होउनी नित्य दासी ॥ " असाच या सर्व भारतसेवक योग्यांचा अनुभव आहे.

ना. गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या भारत-सेवक-समाजास जाऊन मिळावे असे महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, राजेंद्र प्रसाद अशा भल्याभल्यांच्या मनात आले यातच भारत-सेवक-समाजाच्या जीवनहेतूचे रहस्य साठविलेले आहे. टिकाऊपणाने सतत राष्ट्रसेवावृत्ती प्रवाहित ठेवणे ही भारताची मोठी गरज गोखल्यांच्या भारत-सेवक-समाजाने ओळखली आणि ती भागवली. भारत-सेवक-समाजाच्या आवश्यकतेसंबंधी गोखल्यांनीच नमूद केले आहे की :

हिंदुस्थानातील राष्ट्रबांधणीच्या कार्याच्या प्रगतीसाठी, त्याच एका कार्याला मिशनरी वृत्तीने वाहून घेणाऱ्या खास दीक्षित मंडळींच्या निष्ठावन्त परीश्रमांची नितान्त आवश्यकता आहे. आतापर्यंत झालेले कार्य हे खरोखरच मौलिक आहे. समसमान परंपरा आणि संबंध, समसमान आशा आणि आकांक्षा, फार काय, समसमान उणीदुणी यांच्या पायावर उभारलेल्या एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेची गेल्या पन्नास वर्षांतील वाढ नवलाचीच म्हणावी लागेल. आम्ही प्रथम भारतीय आहो आणि हिंदू, मुसलमान, पार्शी वा खिस्ती (असे कोणी तरी) मागाहून आहोत ही गोष्ट धीमे धीमे वाढत्या प्रमाणात प्रत्ययाला येत आहे; आणि जगाच्या राष्ट्रांत आपल्या महान भूतकाळाला साजेशा प्रतिष्ठेप्रत पोहोचू पाहणाऱ्या (संयुक्त व पुनर्जागृत अशा) हिंदुस्थानची कल्पना हे आता मूठभर कल्पक मनांचे केवळ एक वृथा स्वप्न राहिलेले नाही, तर उलट, ते (आता) समाजाचे मानले जावे अशा सुशिक्षित वर्गाचे – निश्चितपणे अंगीकारलेले ब्रीद आहे. शिक्षण (प्रसार) व स्थानिक स्वराज्य (संस्था) यांच्याबाबत शुभंकर प्रारंभ होऊन चुकला आहे; आणि उदारमतवादी कल्पनांच्या कक्षेत धीरेधीरे पण निश्चितपणे लोकातील सर्व थर येऊ लागले आहेत. सार्वजनिक जीवनाचे मोहरे दिवसेंदिवस विस्तृत होऊन मान्यता पावत आहेत. राष्ट्रीय सभांच्या आणि परिषदांच्या वार्षिक बैठकी, सार्वजनिक संस्थांचे व सभांचे कार्य, भारतीय वृत्तपत्रांच्या रकान्यांतील लेखने,—ही सर्व लोकांच्या नसानसांतून वाहणाऱ्या नवजीवनाची साक्ष देत आहेत. आतापर्यंत झालेली परिणती निःसंशय समाधानकारक आहे. पण त्याचा अर्थ एवढाच आहे की, जंगल साफसूफ झाले आहे, पाया बसला आहे. वरची इमारत उभाण्याचे महान कार्य अजून हाती घ्यावयाचे आहे. त्या

दिव्याच्या महतीला शोभेशा प्रमाणात प्रत्येक कार्यकर्ता त्यागास प्रवृत्त झाला आहे. जणू काही परिस्थितीची तीच एक भूक बनली आहे.

परिस्थितीच्या गरजा, जबाबदाऱ्या काही प्रमाणात पुऱ्या करण्याकरिता, पार पाडण्याकरिता भारत-सेवक-समाजाची स्थापना आहे. देशाचे कल्याण मनाशी धरूनच भारत-सेवक-समाजाचे सभासद ब्रिटिश-संबंधाला नियतीची गूढ लीला मानतात. आपल्या देशाला ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य मिळावे, आपल्या देशबांधवांना सर्वत्र उच्चतर जीवन लाभावे हे त्यांचे ध्येय आहे. हे ध्येय, त्याकारणी साजेशा त्यागवृत्तीशिवाय व वर्षानुवर्षे कळकळीने व धीमेपणाने केलेल्या प्रयत्नाशिवाय साध्य होणारे नाही, हे ते जाणतात. आता, सर्वसाधारणपणे आढळते त्यापेक्षा उच्च दर्जाचे शील आणि कर्तृत्व यांची निर्मिती व्हावी म्हणून अवश्य तो कर्मयोग आचरावाच लागणार. प्रगतिही प्रथम आस्ते कदमच होणार. भरीला मार्ग मोठ्या अडीअडचणींनी भरलेला आहे, परत फिरावे म्हणून अनेकदा मोह होईल, कार्याला हात घालणारांच्या निष्ठा कडवट निराशांनी वरचेवर कसाला लागतील, पण जर का कार्यकर्ते आपल्या वाटेने जाताना दुऱ्ळ्या छातीचे ठरले नाहीत, तर त्या साऱ्या दमचक्कीच्या परिश्रमांची परिणती यश ही एकच एक आहे. या कार्यातील यशाची एक एक नस म्हणजे धर्मकार्य ज्या वृत्तीने हाती घेण्यात येते त्याच वृत्तीनें या कार्याला वाहून घेण्यासाठी आमच्या देशबांधवांपैकी जरूर तेवढे संख्याबळ पुढे सरसावले पाहिजे. त्यांनी सार्वजनिक जीवनाला अध्यात्माची जोड दिलीच पाहिजे.

✕ ✕ ✕

१८ इंग्लंडात शिष्टाई

पुण्यातील प्लेगव्यवस्थेतील सरकारी अत्याचारांबद्दल आपल्या मित्रांच्या पत्रांवरून केलेली विधाने पुराव्याच्या अभावी गोखल्यांना सिद्ध न करता आल्याने, त्यांनी जी जाहीर माफी मागितली तिने त्यांना "लोक हा ओक धरिता धरवेना!" असाच अनुभव आला. काँग्रेसमध्ये १८८९ पासून त्यांची जी काही चढतीवाढती पदवी होती तिची बैठकच जणू ढासळली! १८९७ च्या अमरावती काँग्रेसच्या व्यासपीठावर तर त्यांना कोणी घेतले नाहीच; पण त्यांच्याकडे एखादा ठराव मांडण्याचे वा ठरावावर बोलण्याचेही आले नाही. आपल्यावाचून काही काँग्रेसचे नडत नाही याचीही खूणगाठ गोखल्यांनी आपल्या मनाशी बांधून ठेवलीच होती. सुमारे अर्धे तप त्यांना या "उभ्या-उभ्या वाट पहा आणि त्यातच सेवाभावी रहा" अशा अवस्थेत काढावी लागली. तथापि, प्रत्येक वर्षी काँग्रेसची विषय-नियामक समिती त्यांचा सल्ला घेतच असे.

सन १९०४ मध्ये लॉर्ड कर्झन यांनी बंगालची फाळणी करावयाचे ठरविल्यावर काँग्रेसश्रेष्ठींना आपोआपच ना. गोखल्यांकडे लक्ष द्यावेसे वाटले. हिंदुस्थानातील आणि इंग्लंडातील सरकारकडे जर कोणाचे हात पोचण्यासारखे असतील तर ते ना. गोपाळ कृष्ण गोखल्यांचेच आहेत, हे गोखल्यांच्या वरिष्ठ विधिमंडळातील कामगिरीवरून सर्वच काँग्रेसश्रेष्ठींना पटले आणि कर्झन करीत असलेला अन्याय हाणून पाडता आला नाही तरी त्यातून ओढवणाऱ्या जाचक अनर्थपरंपरा कमीत कमी तापदायक करणे, एवढे तरी नामदार गोखल्यांच्या वजनाने साधता येईल, असा विचार काँग्रेसश्रेष्ठींमधे उत्पन्न झाला होता. हा नेमस्ताग्रणींतील होतकरू वजनदार पुढारी असा बाजूला टाकला, तर आपलीच शक्ती त्या प्रमाणात कमी होत असल्याचा अनुभव सर फिरोजशहा प्रभृतींनाही आला असावा. म्हणून १९०४ च्या जुलै महिन्यात ना. गोपाळ कृष्ण गोखल्यांना काँग्रेसचे दुय्यम चिटणीस या स्थानावर घेऊन त्या साली होणाऱ्या काँग्रेस-अधिवेशनाचे "सूत उवाच" करावयास त्यांना धाडण्यात आले.

मुंबई विधिमंडळात दुष्काळग्रस्त लोकांची गोपाळराव गोखल्यांनी सांगितलेली कहाणी, नगरपालिका-कायद्यासंबंधी त्यांनी तेथे केलेले विवेचन,

वरिष्ठ विधिमंडळात सरकारी–गुपितांच्या कायद्यासंबंधी त्यांनी स्वीकारलेली निषेधपूर्वक विरोधाची भूमिका, विद्यापीठ–कायद्यात लोकपक्षीय सात्त्विक विचार-सरणीचा त्यांनी पाडलेला प्रभाव– यांमुळे हा लोकनेता, लोकांच्या हक्कांचा समर्थक, जेव्हा मद्रासेत गेला, तेव्हा त्याचे मद्रासी मंडळींनी आनंदभराने स्वागत केले. मैलपुरास न्या. रानडे–स्मारकाची इमारत उघडताना गोखल्यांचे झालेले भाषण हृदयस्पर्शीच होते. पुढे त्या सालच्या प्रत्यक्ष काँग्रेस अधिवेशनात ना. गोपाळराव गोखल्यांनी हिंदुस्थान सरकारच्या खजिन्यात सहा वर्षांत जी तीस कोटी रुपये शिल्लक पडली, त्या शिलकेच्या उपयोगासंबंधी असा ठराव मांडला की, निरनिराळ्या शास्त्रांचा सांगोपांग अभ्यास विद्यापीठातून व्हावा म्हणून त्यांना सरकारने नेमस्त देणग्या द्याव्यात. लॉर्ड कर्झन यांना हा ठराव असा झोंबला की, त्यांनी काँग्रेसला ही नसती उठाठेव कोणी सांगितली, अशी टीका तर केलीच, पण गोखल्यांनाही त्यांनी टोला दिला की "विद्यापीठे सरकारच्या ताब्यात द्यावयास काकू करणारांनी आता सरकारी खजिन्यावर का डोळा ठेवावा ? देशातील धनिकांकडे त्यांनी का पाहू नये ?" जणू सरकारी खजिन्यातील पैसा लोकांनी दिलेल्या करातील नव्हेच !! सरकारी तिजोरीत भरमसाठ शिलका उरतात तर कर कमी का करीत नाही ? असा सवाल करून विषयतज्ज्ञतेमुळे आपणास असे विचारण्याचा अधिकार थोडाफार आहेच आहे असे सांगून ना. गोखल्यांनी सरकारास असा फेर सवाल टाकला की, आधीच बेजबाबदारपणे अधिकार गाजविणारे सरकार हातात पैसा खुळखुळू लागताच जास्तच बेजबाबदारपणे वागू लागेल ना ? मद्रासच्या काँग्रेसमध्ये असे भाषण करताना आपल्या विधिमंडळातील ठरावाप्रमाणेच त्या काँग्रेसमधील ठरावाचीही वासलात सरकार लावील याची जाणीव गोपाळराव गोखल्यांस होतीच.

वेल्बीकमिशनपुढील आपल्या बाणेदार साक्षीमुळे आपले अभिनंदन काँग्रेसने करावयाचे ते आपल्या प्लेगसंबंधित माफी प्रकरणामुळे केले नाही, याचे ना. गोखल्यांना जेवढे वाईट वाटत नव्हते, त्याच्या किती तरी पट आपले साक्षीदार दिनशा एदलजी वाच्छा यांचे अभिनंदन विनाकारणच राहून गेले होते याबद्दल गोपाळरावांना वाईट वाटत होते आणि तरीही आपुलकीने काँग्रेसला प्रसंगानुसार सल्ला देण्यात त्यांनी कधीही कुचराई केली नाही. त्यांच्या अशा या तितिक्षेने चालणाऱ्या अखंड सेवावृत्तीमुळे १९०५ सालाने गोपाळराव गोखल्यांवर मागील सर्व वर्षांस मागेच टाकण्याची ईर्षा धरली असे दिसते ! सर दिनशा एदलजी वाच्छा यांच्या-बरोबर ते काँग्रेसचे सेक्रेटरी झालेच. तेव्हा तिकडे इंग्लंडात ब्रिटिश काँग्रेस कमिटी व तिने चालविलेले वर्तमानपत्र इंडिया यांच्या नाड्या १९०५ च्या सुमारास संपुष्टात आल्या होत्या, त्यांना संजीवनीचे घुटके–घोट पाजण्यासाठी हिंदुस्थानात त्या पत्राला वर्गणीदार मिळवून, जमवून देण्याचे काम गोखल्यांनी पत्करले आणि

ती जबाबदारी पार पाडली. इंग्लंडातील जनतेत हिंदुस्थानाबद्दल असलेले अज्ञान दूर करावे आणि हिंदुस्थानातील प्रचलित विषयांची माहिती इंडिया पत्रात छापून तिचा प्रसार पार्लमेंटातील सभासदांमध्ये करणे, सभांच्या व व्याख्यानांच्या द्वारे हिंदुस्थानातील चालू राज्यकारभाराच्या उणीवा ब्रिटिश जनतेस समजावून द्याव्या व ब्रिटिश पार्लमेंटातील उदारमनस्क प्रतिनिधींकडून हिंदुस्थानातील आणि हिंदुस्थानावरील अन्यायाबद्दल मंत्रिमंडळास प्रश्न विचारावे अशी बरीच सेवा ब्रिटिश काँग्रेस कमिटी करीत असे. तिच्या आर्थिक मजबुतीकडे मग दहा वर्षे ना. गोपाळराव गोखल्यांनी लक्ष पुरविले.

मुंबई येथे १९०४ च्या शेवटी काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन भरले असता, सर विल्यम वेडर्नबर्न यांनी असा ठराव मांडला की, हिंदुस्थानच्या प्रांताप्रांतातून प्रतिनिधी निवडून त्यांचे एक शिष्टमंडळ इंग्लंडास पाठवावे. आगामी (१९०५) वर्षात तेथे सार्वत्रिक निवडणुकी व्हावयाच्या असून तेथील लोकमताला हिंदुस्थान-संबंधी जागृती देण्याने, ब्रिटनमधील निवडणुकीवर हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीने परिणाम होईल. सदर ठरावास लो. टिळकांनी पाठिंबा दिला होता. त्या ठरावास अनुसरून ता. ३ मे १९०५ रोजी मुंबईस जाहीर सभा भरून मुंबई इलाख्याच्या तर्फे ना. गोपाळ कृष्ण गोखले यांस विलायतेस पाठविण्याचे ठरले. तेव्हा हिंदुस्थानातील काम बाजूस सारून (१९०५) सप्टेंबरात गोखले विलायतेस गेले. या वेळी बालफर मंत्रिमंडळाची सत्ता इंग्लंडमध्ये संपुष्टात आली होती.

ना. गोपाळराव गोखले यांच्या चारित्रातल्याप्रमाणेच हिंदुस्थानच्या इतिहासातही १९०५ हे वर्ष धांदलीचेच ठरले. पुढे पाच-सहा वर्षे हिंदुस्थानभर जी खळबळ व धुसफूस पसरली, तिचा प्रारंभ याच साली झाला. कर्झनसाहेबांनी करून ठेवलेल्या बंगभंगामुळे, बंगालमध्ये जे जे म्हणून ब्रिटिशकृत व परदेशी, ते बहिष्कृत मानण्याची मनोवृत्ती दृढ झाली. ब्रिटिश सरकार बोलून-चालून परदेशी, स्वतःचा फायदा आणि सत्ता बुडेल अशी गोष्ट ते कशी करतील ? हिंदी लोकांना निःशस्त्र, नेभळे ठेवणे हाच त्यांचा दंडक. 'बळी तो कान पिळी' हाच न्याय ते आचरणार. तेव्हा त्यांच्याजवळ "घाल गे बाई जोगवा" म्हणून जोगवा कसा मिळणार ? रेल्वे, तारायंत्रे, टपाल वगैरे सोयी त्यांनी मूलतः व मुख्यतः स्वतःच्या सुखरूपतेकरिता, सैन्य हवे तेव्हा हवे तेथे नेता यावे म्हणूनच केलेल्या ! असे विचार हळूहळू बंगीयच काय, पण अखिल भारतीय तरुणांच्या मनी दृढावले. त्यामुळे सरकारी यंत्रणेशी तिढ्याने-संघर्षाने वागणे आणि त्यातून होईल ती शिक्षा भोगणे हा एक पराक्रम आहे असे भारतीय तरुणांना वाटू लागले. वारा प्यालीं-खाल्लेली ती वासरे मग आटोक्यात थोडीच राहतात ? त्यामुळे वडीलधारे पुढारीपण निकामी ठरले. जिकडे तिकडे पुंडावा, निदान असंतोष हाच राष्ट्रीय

दिनक्रम होऊन चुकला. जहांबाज कर्झनशाहीची ही फलिते भारतीय जनसामान्यांच्या व ब्रिटिशांच्या दंडेली राजवटीच्याही अंगावर शेकल्याशिवाय राहिली नाहीत.

भारतीय तरुणांच्या मनी पेटलेल्या प्रक्षोभास दुखंड बंगालचे छोटे शहा सर ब्रूमफील्ड फुल्लर आणि इमर्सन यांच्या दडपशाहीतील खुळेपणाने इन्धन पुरवले. मग संपूर्ण निर्भेळ स्वातंत्र्याशिवाय तरणोपाय नाही, हा एकच धोशा तरुण मनांनी घेतला. तेव्हा सरकारने दडपशाहीचा कायदेशीर रोड-रोलर सुरू केला. म्हणून १९०४ च्या काँग्रेसने ठरविल्याप्रमाणे इंग्लंडात शिष्टाईस जाऊन कर्झनशाहीने घातलेला धुमाकूळ, हिंदुस्थानच्या वाढत्या राजकीय आकांक्षा आणि ताबडतोब व्हावयास पाहिजेतच त्या राजकीय सुधारणा यांचा प्रचार आणि प्रतिष्ठा, इंग्रज जनतेच्या मनावर ठसविण्यासाठी ता. १६ सप्टेंबर १९०५ रोजी म्हणजे भारत-सेवक-समाजाच्या स्थापनेनंतर तीनच महिन्यांनी आणि लॉर्ड कर्झन यांनी आपली बंगभंगाची राक्षसी कल्पना सार्थपणे साकार केल्यानंतर थोड्याच दिवसांनी गोपाळराव गोखले इंग्लंडात गेले. तेथे त्यांना पंजाबचे प्रतिनिधी देशभक्त लाला लजपतराय हे साथ व सहकार देण्यासाठी आलेच होते. इंग्लंडातील आपल्या पन्नास दिवसांच्या मुक्कामात गोपाळराव गोखल्यांनी पंचेचाळीस जाहीर व्याख्याने दिली. त्यांत हिंदुस्थानच्या हलाखीचे, दारिद्र्याचे, अज्ञानाचे व सरकारच्या अमानुष दडपेगिरीचे त्यांनी यथार्थ चित्र रेखाटले. ते पाहून–ऐकून इंग्लिश लोक चकित झाले. शंभर वर्षे राज्यकारभार केला आणि रयतेपैकी एक टक्काही मनुष्य लिहू–वाचू शकत नाही हे आठवे आश्चर्य नव्हे तर काय? असे प्रश्नचिन्ह ना. गोखल्यांनी इंग्लंडच्या विचारवन्तांपुढे उभे केले. गोपाळराव गोखल्यांचे ते सर्व विचार इंग्लंडमध्ये शान्तपणे ऐकले गेले याचे कारण मुंबई–कलकत्त्याच्या विधिमंडळांतून त्यांनी जबाबदारीनेच सरकारवर टीका केली, सरकारचा व लोकांचा विश्वास संपादन केला, असा लौकिक संपादन केला होता. 'सिटिझन् ऑफ दि इंडियन् एम्पायर' (C. I. E.) ही पदवी त्यांनी मिळविली होती. साहजिकच इंग्लंडमध्ये गोखले आत्मविश्वासाने बोलत होते. त्यांच्या विधिमंडळातील कामगिरीने वेल्बीकमिशनपुढे फर्डी साक्ष देणारे गोखले लोकांना आठवले व प्लेग अत्याचारां-बाबतच्या विधानाबद्दल माफी मागणारे गोखले लोकविस्मृतीत गेले. गोखल्यांना हे साधावयाचेच होते. फिरोजशहा मेहतांना १५ जानेवारी १९०१ रोजी लिहिलेल्या पत्रात गोखल्यांनी म्हटलेच होते की— "१८९७ च्या वावटळीत माझ्या डोक्यावर टीकांचा वर्षावच झाला! पण इंग्लंडमधील लोकसभेत जबाबदारांनी मजविषयी उच्चारलेले शब्द ज्या वेळी मी वाचले, त्या वेळी तापलेल्या सळईप्रमाणे ते माझ्या हृदयात घुसले आणि मनाचा आगडोंब उडाला. त्याच वेळी मी माझ्या मनाशी अशी खूणगाठ बांधली की, आपल्या करणीने ज्या इंग्लंडमधील हिंदुस्थानविषयक

चळवळीस धक्का बसला आहे, तीच चळवळ डे. ए. सोसायटीतील आजन्म सेवा-व्रताची परिपूर्णता होताच हाती घ्यावयाची."

ना. गोपाळराव गोखल्यांचा हा संकल्प साकार व सार्थ व्हावयाचा तर कर्झन-शाहीची दडपशाही, तिने प्रक्षुब्ध झालेली भारतीय तरुणांची मने, वंगभंगामुळे ब्रिटिश राजवटीला व जुन्या भारतीय नेतृत्वाला बसणारा धक्का हे सारेच इंग्लंडच्या लोकांपुढे मांडणे अपरिहार्य होते. त्याप्रमाणे हिंदुस्थानातील रावणराज्याचा पाढा गोखल्यांनी ब्रिटिश जनतेच्या हृदयात आणि मेंदूत चांगलाच भिनवला. तेव्हा त्यावर उपाय काय, असा ब्रिटिश जनता प्रश्न करील हे जाणून हिंदुस्थानात कोणत्या राजकीय सुधारणा तूर्त, पण तातडीने हव्यात व त्या व्यवहारशुद्ध कशा करता येतील हेही गोखले वेळोवेळी स्पष्ट करीत गेले. त्यामुळे त्यांच्या भाषणांचा इंग्लंडमध्ये निकोप परिणाम झाला. गोखले ब्रिटिश संसदीय सभासदांपु उदारमतवादीयांपुढे आणि लोकांमधील विचारी निवडकांपुढे भाषणे करीत; याउलट लाला लजपतराय सर्वसाधारणपणे बहुजनसमाजापुढे बोलत. त्यामुळे त्या दोघांचे प्रचार एकमेकांना पूरकच ठरले. त्यासाठी त्यांनी दिवसातून अठरा अठरा तास कामे केली. परिणामतः स्वदेशी परत येताना गोखल्यांना बोटीवरच आपल्या घशाचे ऑपरेशन करून घ्यावे लागले. हिंदुस्थानची बाजू नेटसपणाने आपण लहान-थोर ब्रिटिश जनतेपुढे स्वच्छ स्वच्छ मांडली, एवढेच गोखल्यांचे समाधान होते. ब्रिटिश मालावर हिंदुस्थानकडून पडू पाहणाऱ्या बहिष्काराची कल्पना मँचेस्टरच्या मजुरांना देताना गोखल्यांनी सांगितले की, त्याचा तुम्हांला राग येणारच, मात्र तो विनाकारण हिंदुस्थानच्या लोकांवरती काढू नका, तर बंगालची फाळणी करून भारतीयांवर अन्याय करणाऱ्या लोकांवर तो राग तुम्ही काढा.

अशा प्रकारे हिंदुस्थानची शिष्टाई करून ५ डिसेंबर १९०५ रोजी ना. गोपाळ कृष्ण गोखले सुखरूप हिंदुस्थानात परतले. लो. टिळकांनी एक भव्य जाहीर सभा भरवून पुण्यास त्यांचे हार्दिक स्वागत केले. त्याचप्रमाणे ना. गोखल्यांचा एक रंगीत फोटो केसरी-मराठ्याच्या तत्कालीन अंकाबरोबर लोकमान्यांनी जनतेत वाटला. सार्वजनिक व राष्ट्रीय जीवनात दिव्यता कशी ठेवावी हे लोकमान्यांनी स्वतःच उदाहरण घालून देऊन शिकवले ते असे. नाकारलेला न्याय किंवा लादलेला अन्याय याच्याविरुद्ध झगडणारा देशभक्त, आपला पक्ष कोणता का सांगेना, तो आपल्या जीवाभावाचा देशबंधू होय, हेच खरे.

✕ ✕ ✕

१९ : वाराणसीची काँग्रेस

" आम्हांला गोपाळ कृष्ण गोखलेच अध्यक्ष हवेत." असा हट्ट वाराणसीला १९०५ साली भरावयाच्या ठरलेल्या काँग्रेस-अधिवेशनाच्या स्वागतसमितीने घेतला होता. सन १८९७ पासून सहा वर्षे काँग्रेसमध्ये तोंड न उघडणारे व आपल्या वरिष्ठ विधिमंडळातील कामाच्या बोजामुळेच केवळ, १९०३ सालच्या काँग्रेस-अधिवेशनाला हजरही राहू न शकलेल्या गोपाळराव गोखल्यांच्याविषयीचा तो जिव्हाळा हे गोखल्यांच्या विधिमंडळातील लोक-नेतृत्वाला जनहृदयाने दिलेले संतोष-पारितोषिक होते. सप्टेंबर १९०५ मध्ये नामदार गोपाळराव गोखले विलायतेस शिष्टाईला गेले तेव्हाच त्यांना " आपण यंदाच्या काँग्रेस-अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून मुक्रर झाले आहात " हे कळविण्यात आले होते. उलट " राष्ट्राध्यक्षत्वाचा आपण माझ्यासारख्या चाळिशीही न उलटलेल्या व अनुभववृद्ध नसलेल्या माणसाला देऊ केलेला मान मला स्वीकारतांना संकोचच संकोच होतो आहे " असे ना. गोखल्यांनी तेव्हाच स्वागतसमितीला विनम्रपणे कळविले होते. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. कर्झनशाहीमुळे बऱ्याच भारतीय पुढाऱ्यांची मने राजकारणलाच नव्हे तर सार्वजनिक व राष्ट्रीय जीवनाला विटली होती. अशा वेळी काँग्रेसचे उद्देश व हेतू फिरून एकदा स्पष्टपणे हिंदुस्थानच्या विचारवंत प्रौढ मंडळींपुढे मांडून, अरेरावी सत्ता चालविण्यास सवकलेला ब्रिटिशांचा अधिकारीवर्ग काँग्रेसला विरुद्ध का आणि भारतीय काँग्रेसने कोणत्या राजकीय सुधारणांवर आपले सर्व बळ व लक्ष एकवटावे हे कर्तव्यप्राप्त म्हणून स्पष्ट सांगणे वाराणसी काँग्रेसच्या अध्यक्षांचे अपरिहार्य कर्तव्य होते. ते करण्यास समतोल मनाचा, सात्त्विक स्वभावाचा आणि देशसेवेने हिंदुस्थानच्या व जगाच्या लोकांचे डोळ्यासमोर असलेला ना. गोपाळराव गोखल्यांएवढा दुसरा नेता नव्हता. जुलूमशाहीचे वादळी वारे धिंगाणा घालीत असता, धीराने काँग्रेसची नौका सुखरूपपणे हाकारून न्यावयास " अचूक चुकेना कोठे " अशा कप्तानाची आवश्यकता होती. निर्मळ, निर्भयपणा, सर्व पक्षीयांना संभाळून घेण्याची हातोटी, वारा कोणत्या दिशेने वाहतो ते ओळखण्याची शक्ती आणि विशेष म्हणजे स्वदेशाच्या उत्कर्षाविषयी तळमळ हे न्यायमूर्ती दीक्षित प्रागतिक पंचशील आपल्या

अंगी मुरवून घेतलेले पुढारी ना. गोखले हेच लोकांना काँग्रेसचे कर्णधार म्हणून हवे होते. म्हणून गोखले काँग्रेसचे अध्यक्ष निवडले गेले. त्यामुळे इंग्लंडमधील शिष्टाई आटोपून पुण्यास आलेले नामदार गोखले मग सरळच थेट वाराणसी-(बनारस) कडे गेले.

वाराणसी येथील काँग्रेस-अधिवेशनांतील भारतसेवक नामदार गोपाळ कृष्ण गोखल्यांचे अध्यक्षीय भाषण कर्झनशाहीचा पूर्ण निषेध करणारे ठरले. त्यात त्यांनी कर्झनशाहीला औरंगजेबशाहीपेक्षाही 'प्रजापीडक' म्हणून संबोधिले व हिंदुस्थानला वसाहतीच्या स्वराज्याचा दर्जा देण्यातच इंग्लंडला तरणोपाय आहे, हे प्रथमदर्शनीच स्पष्ट केले. कर्झनसाहेबांची सुलतानशाही राज्यपद्धती स्वाभाविकपणे स्वतःच्याच अत्याचारांचा सुरुंग लावून अंती सपशेल कोसळल्याशिवाय राहणार नाही, असाही इशारा देण्यास गोखले कचरले नाहीत. वंगभंग–विरोधी चळवळीचे समर्थन करून " ही चळवळ राष्ट्राच्या इतिहासाला वेगळेच नवे स्वरूप देणारी आहे, या चळवळीने देशातील वाद संपून पूर्वी कधी झाली नव्हती इतकी पुढाऱ्या-पुढाऱ्यांत एकवाक्यता झाली आहे; पूर आला असता पाणी वेड्यावाकड्या रीतीने कोठेही शिरते त्याचप्रमाणे अशा प्रचंड चळवळीत योग्य मर्यादेचे उल्लंघन क्वचित् होणारच; जरी बंगाली लोकांची बेअब्रू झाली तरी ती सर्व आम्हा भारतीयांचीच होय, या भावनेने त्यास आपण सर्व मदत करू; एका विवक्षित हेतूने म्हणजे राज्यकर्त्या इंग्लंडच्या लोकांचे लक्ष वेधण्यासाठी बहिष्काराच्या शस्त्राचा उपयोग करण्यात आला आणि येत आहे तो या प्रसंगी अगदी योग्य असून विलायतेत त्याचा परिणाम चांगलाच झाला आहे; स्वदेशीकरिता झीज सोसली पाहिजे इत्यादि गोष्टी अध्यक्षांच्या भाषणांत प्रामुख्याने होत्या. हे भाषण इतके सणसणीत होते की, मुंबईचा टाइम्स म्हणाला, " गोखले यांनी नेमस्तपणा सोडला ही चूक झाली ! "

युवराजांच्या – पुढे १९१० साली पंचम जॉर्ज बादशहा झालेल्या– स्वागतपर ठरावाला " हिंदुस्थानातील राज्यपद्धती व्हिक्टोरिया राणीच्या जाहीरनाम्याप्रमाणे चालत नाही, असा काँग्रेसचा व म्हणूनच हिंदुस्थान देशाचा निरोप आपण आपले तीर्थरूपांना – सातवे एडवर्ड बादशहांना – कळवा " असे संदेश–शब्द जोडून तो ठराव संमत झाला. त्यायोगे बदललेल्या परिस्थित्यनुरूप काँग्रेस आपली विचार-धारा व कार्यपद्धती ठेवण्यास तयार असते, हे वाराणसी–अधिवेशनात सिद्ध झाले. राष्ट्रीय शिक्षण आणि हिंदु विद्यापीठ (पं. मदनमोहन मालवीय यांचे) यांची कार्ये तेथे जोरास लागली. बनारसच्या महाराजांचे हस्ते, स्वदेशीचे प्रदर्शन काँग्रेसला जोडून उघडण्यात आले होते. औद्योगिक परिषदेच्या मुख्य कार्यालाही तेथे पुष्कळच चालना मिळाली. अशा विविध व क्षेमकर वैशिष्ट्यांनी संजलेल्या वाराणसी–काँग्रेसचे मुख्य काम अध्यक्ष ना. गोखले यांनी कुशलतेनेच पार पाडले. स्वराज्याच्या प्रगतीसाठी १९०५ साली भारतसेवक

गोखल्यांनी चार दिशा आखल्या होत्या. त्यांनाच पुढील १९०६ च्या कलकत्ता येथील काँग्रेसमध्ये मुख्य ठरावांचे महत्त्व आले. असे डॉ. पट्टभीसीतारामय्यांनी आपल्या काँग्रेसच्या इतिहासात (१९३५) म्हटले आहे.

वाराणसी-काँग्रेसमध्ये भारत-सेवक गोखल्यांनी आणखी एक विशेष साधला. तो म्हणजे भारतातील नौकरशाहीच्या अहंमन्य मनोवृत्तीचे प्रतिबिंब असलेला लॉर्ड लिटन्‌चा " गुह्यात् गुह्य " खलिता जगजाहीर करून टाकला. १८८९ च्या आपल्या विधिमंडळांच्या सुधारणांवरील भाषणात गोखल्यांनी त्याचा ओझरता व सूचक असा उल्लेख केलाच होता. त्या खलित्यात राणीच्या जाहीरनाम्यासंबंधी लॉर्ड लिटन्‌ने म्हटले होते की, " आपण सर्व जाणतोच की, (भारतीयांच्या) या सर्व हक्कांच्या मागण्या व अपेक्षा कधीच पुऱ्या होऊ शकणार नाहीत. त्यांना प्रतिबंध करणे आणि वंचित करणे या दोहोंमधील निवड आपणास करावी लागत आली आहे. आणि आपण त्यातून अगदीच संकुचित असा सरळ मार्ग काढला आहे, ज्या अर्थी मी गुह्यात् गुह्य म्हणून लिहितो आहे, त्या अर्थी मला चुळबूळ न करता स्वच्छच म्हणावयाचे की, इंग्लंडचे सरकार व भारत सरकार या दोघांनाही प्रस्तुत परिस्थितीत समाधानकारक रीतीने ज्या आरोपांचे उत्तर देता येणार नाही, तो आरोप म्हणजे कानाला लागून दिलेल्या आपल्याच वचनांचे शब्द, जीवाला लागेसे मोडून टाकावयाचे. आपल्या हातातील प्रत्येक साधन आपण वापरत असतो." खरेच ! लिटन्‌शहांनी या " गुह्यात् गुह्य " खलित्यात म्हटल्याप्रमाणेच १८३३ आणि १८५८ ची आश्वासने मोडून टाकून ढोंग (Hypocracy) व दगाबाजी (Treachery) यांच्यामधील कडेवर राज्यकारभार चालल्याचा उल्लेख ज्या वेळी १८८९ साली गोखल्यांनी केला होता, त्या वेळी अँग्लो-इंडियन पत्रांनी त्या भाषणास Indignant speech असा शेरा मारला होता हे लक्षात असणारांना अरेराव कर्झनशाहीच्या तिटकाऱ्याने भारत-सेवक गोखल्यांनी नौकरशाहीच्या प्रवाही मनोवृत्तीचा स्फोट करून आपल्या देशबांधवांना जाग आणली हे यथायोग्यच केले, असे वाटल्याशिवाय राहिले नाही.

सर ब्रुमफील्ड फुल्लरच्या बेगुमान कारभारामुळे बेताल झालेला बंगाल फुल्लरला इंग्लंडला परत बोलावल्यामुळे थोडासा शान्त झाला तरी १९०६ साली काँग्रेस शान्तदान्त वातावरणात भरली नाही, हे लक्षात घेता वाराणसी काँग्रेसमध्ये गोखल्यांनी राखलेल्या गांभीर्याचे महत्त्व वाटावे हे स्वाभाविकच होते. हिंदुस्थानातील घोरत पडलेल्या राष्ट्रीयत्वास कर्झनशाहीने खडबडून जागे केले आणि बंगालच्या तरुणांनी ब्रिटिश रियासतीच्या विरुद्ध जो लढाऊ मर्दाईचा उठाव केला त्याने लॉर्ड कर्झन एवढा चिडला की, हिंदुस्थानच्या राष्ट्रीयत्वाचा जरासंध करण्याकरताच त्याने मुख्यतः बंगालच्या फाळणीचा डाव रचला. पूर्व बंगालमध्ये मुस्लीम वसाहत अधिक आहे हे पाहून वंगभंग करावा म्हणजे तेथे

हिंदु-मुसलमानांचे उभे दावे उभारण्यास सोपे जाईल या उद्देशाने, पण राज्य-कारभाराची सोय अशी सबब पुढे करून लॉर्ड कर्झनने तो उपद्व्याप केला. वास्तविक ऐतिहासिक परंपरेच्या धाग्यादोऱ्यांनी बोलाव्याचे तर लो. टिळकांनी ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरेच्या उत्थानासाठी जो शिवाजी-उत्सव सुरू केला होता त्याला कर्झनचा तो उतारा होता. चंद्रगुप्तानंतर अखिल हिंदुस्थानला अखंड राष्ट्र मानून त्याचा संजीवक झालेला शिवाजी, त्याचे कार्य पुरे करीत आणलेला पहिला बाजीराव आणि महादजी शिंदेप्रभृतींची परंपरा टिळक पुनरुज्जीवित करू पाहत होते. त्याला धक्का देण्याकरिताच भारतीय राष्ट्रीयत्वाच्या एकजिनसीपणाला भेग पाडण्याकरिताच मुस्लीमांची नवी वेगळेपणाची आव्यता निर्माण करण्याचा तो कर्झनचा फासा होता. "फोडा–झोडा"च्या ब्रिटिश धोरणातील तो एक पवित्रा होता. हे न समजण्या–ओळखण्याइतके हिंदुस्थानचे लोक मूर्ख नव्हते. बंगालचे लोकही बेगुमान वा बेसावध नव्हते. त्यांनी वंगभंगाच्या विरुद्ध पाचशे निषेधसभा भरवल्या होत्या आणि वंगभंग रद्द व्हावा म्हणून पन्नास-साठ हजार सह्यांचा अज इंग्लंडकडे पाठविला होता. तरीही १९०५ च्या ऑगस्टमध्ये विधिमंडळाच्या सिमला-बैठकीत वंगभंगाचे विधेयक संमत करून घेऊन लॉर्ड कर्झनने ऑक्टोबरपासून त्याची अंमलबजावणीही सुरू केली होती. लोकांचा प्रक्षोभ एवढा भयंकर होता की, वंगभंगाचा दिवस हा सर्वत्र सुतकासारखा पाळला गेला होता. अशा प्रक्षोभाच्या माऱ्यात काँग्रेसची नौका हाकारण्याचे कौशल्य गोखले यांना दाखवावयाचे होते आणि हिंदुस्थानातील सर्व दिशांकडून तेथे आलेल्या देशहितेच्छूंनी माना डोलवाव्या असेच कौशल्य ना. गोखल्यांनी दाखविले. "लोकांचे खच्चीकरण करून त्यांना असहाय्य करून सोडावयाचे असेच सरकारने म्हटल्यावर, नौकरशाहीशी कसल्याही तऱ्हेच्या सहकार्याचे नुसते नाव काढणेही चूकच ! लोकहित तेथे दिसणारच नाही, मग मिळणार कोठून ?" नामदार गोखल्यांच्या अशा अर्थाच्या उद्गारात राष्ट्राचे मनच स्पष्ट झाले असे सर्वांना वाटले. स्वदेशी व बहिष्कार यांचा त्यांनी केलेला पुरस्कार हाही तसाच वाटला. बाकी सर्व उपाय पार थकल्यावर बहिष्काराचा शस्त्र म्हणून उपयोग करावयाचा असे स्पष्ट करून ते सनदशीर साधन असल्याचे त्यांनी जाहीर केले. बहिष्काराचे शस्त्र पाजळण्यापूर्वी सर्वसामाईक संकटाची जाणीव सगळ्यांना हवी आणि ते शस्त्र पाजळणारांत चुकूनही दुजाभाव असता कामा नये, असेही आपले मत भारत-सेवक गोखल्यांनी स्वच्छ स्वच्छ मांडले होते. शेतकऱ्यांच्या झोपडीझोपडीतून पूर्वीसारखे हातमागाचे स्वसंपादित कापड निघावे हा एक उपाय गोखल्यांनी त्या वेळेस सुचविला होता. पण राष्ट्राची सर्वांत मोठी आवश्यकता प्रत्येक माणसाच्या बुद्धिस्वातंत्र्याची, कर्तव्यसाधनेची उंची वाढविण्याची आणि आपली सर्व सामर्थ्ये भरघोस करून एकंदर जीवनाचे नूतनीकरण, अध्यात्मीकरण आणि परिपूर्तीकरण या गोष्टींमध्ये

सामावलेली आहे, असे गोखल्यांनी सर्वांच्या मनावर ठसविले होते. ठरावांच्या बाबतीत रोमेशचंद्र दत्त, सुरेंद्रनाथ बानर्जी, लो. टिळक, लाला लजपतराय यांची एकमेळ संमती मिळवून मार्ग काढावयाचा होता. टिळक-लजपतरायांनी बहिष्काराच्या ठरावावर ताणून धरावयाचे नाही आणि तो ठराव बहुमताने पसंत झाल्याचे गोखल्यांनी अध्यक्ष या नात्याने जाहीर करावयाचे, अशी त्यातून वाट काढून सर्वांनी तसे केले. हे झाले युवराजांच्या आगमनावरील बहिष्कारासंबंधीच्या ठरावाबद्दल. पण तो वंगभंग रद्द करणाऱ्या मागणीचे ठरावाचाच एक पोटविभाग असल्यामुळे त्याची कड आपोआपच लागली.

२० : कलकत्ता येथील काँग्रेस

बंगालच्या तरुणांनी १९०५ साली काँग्रेसच्या वेळेस कमालीचा संयम पाळला तरी निर्भेळ स्वराज्याचा व ब्रिटनवरील निःशेष बहिष्काराचा त्यांचा पक्ष बंगाल्यात कमालीचा जोर धरून होता. नामदार दादाभाई नवरोजींच्या अध्यक्षतेखालील १९०६ च्या कलकत्ता येथील काँग्रेस-अधिवेशनात टिळकांची स्वराज्यचतुःसूत्री ठरावरूपांनी पसंत झाली. त्यात बहिष्काराच्या ठरावावर बोलणाऱ्या एका वक्त्याने बहिष्काराची व्याप्ती शाळा, माणसे वगैरेपर्यंत देखील पोहोचविल्याने ना. गोखल्यांनी बहिष्कार फक्त ब्रिटिश–मालापुरताच आहे, असे उठून सांगितले. पण अशाने कलकत्त्याच्या बैठकीत पक्षभेद विशेषच स्पष्ट झाला. नव्या पक्षाचा जोर तेथे बराच प्रभावी ठरला. मतभेदापेक्षा मार्गभेदाच्या भयंकरपणामुळे गोखल्यांना चिंता वाटू लागली. शान्तिब्रह्म दादाभाईंनी स्वराज्याचा सोज्ज्वळ मंत्र राष्ट्राला आपल्या अध्यक्षीय भाषणातून दिल्याकारणाने, आगीत तेल ओतल्याचा आरोप त्यांच्यावर इंग्लिशमन पत्राने केला. राष्ट्रीय शिक्षणाचा ठराव एकदम सर्वसंमत झाला. " खिशाला चाट लावून स्वदेशी " असा स्वदेशीचा ठराव घेण्याबद्दल लो. टिळकांचा आग्रह चालू असता, तो न मानला जाता, एतद्देशीय कुशलतेला उत्तेजन, स्वजनांचे बेकारी-निवारण आणि इतर देशांच्या बरोबरीने हिंदुस्थानलाही जीवन–साधना–निर्मिती करता येते, यांची सिद्धी म्हणून स्वदेशी व्रत पाळण्याची शिफारस करणारा सीधा ठराव पास झाला. बहिष्काराचा ठराव विलायती–मालाविरुद्धचा प्रमुखतः असून बंगालच्या फाळणीने आणि इतरत्रही दडपशाहीने जागृत झालेल्या भारतीयांच्या स्वाभिमानाच्या दृष्टीने तो यथायोग्य असल्याचा निर्वाळा सर्वच देत होते. पण बंगालने एकट्यानेच तेवढा बहिष्कार अमलात आणावा, इतरांनी नुसती तोंडी सहानुभूती दाखवावी, हे काही भारतीय एकजिनसीपणाचे व बंधुत्वाचे लक्षण नव्हे; बंगालची फाळणी हे एकच कारण बहिष्काराला असते, तरीही बंगालबद्दल कृतज्ञता व बंधुभाव इतर सर्व प्रांतीयांनी दाखविण्यातच राष्ट्राच्या एकीचे विश्वरूपदर्शन परकीय जुलूमशाहीला होणार आहे, असे म्हणणारेच बरोबर नव्हते काय? अगदी " यथायक्षस्तथा बलिः । " असे मोजकेपणाने चालावयाचे म्हटले तरी, फाळणी बंगालपुरती मर्यादित धरूनही, राष्ट्रीय गीतास व मिरवणुकीस बंदी वगैरे जुलूम

इतरत्र काय कमी होते ? पण १९०६ च्या काँग्रेसच्या ठरावात राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी, बहिष्कार व स्वराज्य यांचा तत्त्व म्हणून पुरस्कार करून प्रत्येक व्यक्तीने आणि प्रांताने आपापल्यापरी (म्हणजेच सर्व राष्ट्राने) आचरणाची झेप घ्यावी असा आदेश दिला गेला हे उघड आहे.

वाराणसी–काँग्रेसमध्ये जेथपर्यंत मजल गेली तेथून एक इंचभर परतावयाचे नाही या दृढ निश्चयाने कलकत्त्याच्या (१९०६) काँग्रेसचे अध्यक्षपद लाला लजपतराय यांना द्यावे, असे राष्ट्रीय पक्षाच्या जहालांचे मत होते. देशातील तरुणांना ते मनपसंत होते. पण तेवढ्याचमुळे काँग्रेसच्या जुन्या श्रेष्ठींना ते नापसंत होते. राष्ट्रांत वीरवृत्तीचा होऊ लागलेला आविष्कार हे सुचिन्ह मानणारे लो. टिळक महाराष्ट्राला पाठीशी घेऊन बंगालला पाठिंबा देत होते. कळकळीच्या राष्ट्रीयत्वाच्या भूमीकेवर बंगाल, महाराष्ट्र व पंजाब जिवात जीव घालून चालत होते. महाराष्ट्राचा मर्द इतिहास आणि शिवाजी यांचे पवाडे बंगाल गात होता. बंगालची विक्रम वैभवगीते महाराष्ट्र आळवीत होता आणि पंजाबच्या हौतात्म्याचे कौतुक सर्वत्र होत होते. लाल (लाला लजपतराय), बाल (बाळ गंगाधर टिळक), पाल (बाबू बिपिनचंद्र पाल) ही राष्ट्रीय त्रिमूर्ती तरुण मनांची आराध्यदेवता बनली होती. या भक्तिभावाने वाहून न जाता सुरेंद्रनाथ बानर्जी आणि सर फिरोजशहा मेहता सांगत होते की, ब्रिटिश लोकमत आणि ब्रिटिश सरकारमधील हिंदुस्थानचे सहानुभूतिक यांना आपलेसे करून घेण्याचे सारे प्रयत्न लालाजींच्या अध्यक्षपदाने नष्टप्राय होतील, अफलदायी होतील आणि काँग्रेसच्या स्वागतसमितीत पाल बाबूंपेक्षा सुरेंद्रांचा शब्द प्रमाण असल्यामुळे लालाजींचे नाव मागे पडले, मग टिळकांचे नाव काढणार कोण, कशाकरिता ? प्रागतिकांनाही आपण सुचवू ते नाव सर्वसंमत होईल असा आत्मविश्वास मुळीच वाटेना. तेव्हा त्यांनी इंग्लंडात असलेल्या राजकीय पितामहांचा धावा केला, आणि दादाभाई नवरोजींच्या प्रसन्नतेचे प्रसाद-फळ म्हणून कलकत्त्यास काँग्रेसची बैठक यशस्वी झाली. ना. गोपाळराव गोखले यांना दादाभाईंनी स्वागतसमितीची तार दाखविली होती आणि दादाभाईंनी अध्यक्षपदास संमती दिली म्हणूनच कलकत्त्यास " सर्वेषामविरोधेन " सगळे काही भागले.

स्वागतसमितीचे अध्यक्ष डॉ. राशबिहारी घोष हे होते. त्यांनी बंगालमधील सर्व जुलूमशाहीचा धिक्कार करून स्वदेशीच्या चळवळीला राजद्रोही म्हणणारांना बजावले की, " इंग्लंडच्या उण्यापुऱ्यासुद्धा इंग्लंडवर आमचे प्रेम असले तरी हिंदुस्थानवर आमचे सर्वाधिक प्रेम आहे. याला राजद्रोह म्हणावयाचे असेल तर, आम्ही राजद्रोही आहोत, हे म्हणण्यात आम्हांला अभिमान वाटतो." अध्यक्ष दादाभाई नवरोजींनी तर काय, वसाहतीच्या किंवा युनायटेड किंग्डमच्या धर्तीचे " शिष्ट ध्येयं स्वराज्यस्य " जाहीरच करून टाकले.

ब्रिटिश मुत्सद्द्यांच्या उदारमतवादित्वावरील दादाभाईंचा विश्वास या वेळी मावळत आला होता म्हणून त्यांनी हिंदुस्थानात उदय पावणाऱ्या नवचैतन्याचे हर्षभराने स्वागत केले. तरीही १९०६ मध्ये झालेला बहिष्काराचा ठराव १९०५ च्या ठरावाप्रमाणे वंगभंगाच्या निषेधाचा भाग म्हणूनच पास झाला आणि म्हणूनच ना. गोखले व पं. मदनमोहन मालवीय यांनी समाधान मानले. सर फिरोजशहा मेहतांस बहिष्कार हा शब्दच काँग्रेसच्या ठरावात नको होता. ते वाराणसी काँग्रेसला हजरच राहिले नव्हते आणि कलकत्ता काँग्रेसमधील ठराव दादाभाईंच्या नेतृत्वाखाली झाला, म्हणूनच ते काही बोलले नाहीत !!

कलकत्ता काँग्रेसच्या ठरावाप्रमाणे मग ब्रिटिश मालावर बहिष्कार पडू लागला. ब्रिटिश व्यापाराला त्याने झळ लागली तरी म्हणावी तशी झळ बिलकुल लागलेली दिसली नाही. स्वदेशीच्या शपथांबरीक सर्वत्र झाल्या आणि ब्रिटिश किंवा विलायती मालावरील बहिष्कार याचा अर्थ त्या मालाशिवाय आपण जीवन निभावू शकतो, एवढ्या थराला गेला ! तोडीस तोड म्हणून परदेशी मालाच्या जागी हिंदुस्थानात उत्पादन झाले नाही, कारखाने अगदीच अल्प निघाले, पण ते सरकारी अवकृपेने चालू शकले नाहीत. राष्ट्रीय शिक्षणाच्या संस्थाही फारच थोड्या निघाल्या, पण ज्या हाताच्या बोटांनीच मोजता येण्याजोग्या निघाल्या त्यांनी राष्ट्रीयत्वाची जोपासना सकस केली आणि एकंदर समाजाच्या मनोवृत्तीत पारतंत्र्याची चीड दिवसेंदिवस फोफावत गेली. भारतसेवक नामदार गोपाळ कृष्ण गोखले आणि त्यांचे प्रागतिक सहकारी यांची तरीही मनोमन खात्री होती की, हिंदुस्थान अजून स्वराज्याचा उघडउघड लढा द्यावयास समर्थ झाला नाही. असमर्थावस्थेत तो लढा दिला तर ते अवघड जाईल. म्हणून अजूनही ब्रिटिश-जनतेच्या सहानुभूतीवर आणि ब्रिटिश मुत्सद्द्यांच्या उदारमनस्कतेवर भर देऊन काही वर्षे तरी हिंदुस्थानने आपली स्वराज्याची चळवळ सनदशीर मार्गाने चालविली पाहिजे.

पण या मताला तरुण मंडळीत मान नव्हता. मग, भारतीय तरुण उत्साह-भराने स्वाभिमानपूर्वक स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय-शिक्षण आणि स्वराज्य या चतुःसूत्रीचा पुरस्कार करू लागले तर सरकारनेही आपली जुनी-नवी जुलूम-शाहीची धोरणे आणि हत्यारे पाजळण्यास सुरुवात केली !!

☒ ☒ ☒

२१ : इंग्लंडची तिसरी सफर

दादाभाई नवरोजींना कलकत्त्याच्या काँग्रेसचे मार्गदर्शक अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल स्वागत समितीची आलेली तार त्यांनी ना. गोखल्यांना दाखविली होती, याचे कारण गोखले त्या वेळी इंग्लंडमध्ये थोरा-मोठ्या ब्रिटिश मुत्सद्द्यांच्या गाठीभेटी घेण्यासाठी फिरत होते. बंगभंग आणि कर्झनशाही यांच्यामुळे भारतीय तरुण मने काय वळण घेत आहेत हे त्यांनी सामुदायिकरीत्या १९०५ च्या शिष्टाईत ब्रिटिश विचारवन्तांपुढे मांडले होते. या वर्षी (१९०६) ब्रिटिश पार्लमेंटाच्या दीडशे वजनदार सभासदांच्या गाठीभेटी घेऊन आणि हिंदुस्थानचे अंडरसेक्रेटरी एलिस व इंग्लंडचे मुख्य प्रधान सर हेन्री कॅंबेल-बॅनरमन यांसारख्या राजमंत्र्यांना व्यक्तिशः भेटून हिंदुस्थानला तातडीने कोणत्या राजकीय सुधारणा हव्यात, हे त्यांच्या मनावर बिंबवण्याचा नामदारांचा हेतू होता.

पण इकडे हिंदुस्थानात, बंगभंगाने चिडलेले बंगालचे अनभिषिक्त राजे सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्यासारखे पुढारी गिरफदार करण्यात आले; बंगाल प्रांतिक-परिषदेस मनाई करण्यात येऊन प्रतिनिधींवर पोलिसांनी लाठ्यांचा मुबलक प्रयोग केला; फुल्लरपुरस्कृत दडपशाहीमुळे, फाळणीने आधीच वेडा झालेला बंगाल अधिकच खवळला आणि गोपाळराव गोखल्यांना इंग्लंडमध्ये बंगालसंबंधी कित्येक सभांतून बोलावे लागले. ते गोखले बोललेच, पण वर त्यांनी सेक्रेटरी ऑफ् स्टेट फॉर इंडिया असलेल्या लॉर्ड मोर्ले यांच्या गाठी घेऊन परिस्थितीला स्फोटकता येऊ देऊ नका, असे कळकळीने बजावले. मोर्लेसाहेबही काही कमी नव्हते. त्यांनी हिंदुस्थानातील तरुणांनी अत्याचार थांबवले तर आपले सरकार हिंदुस्थानला राजकीय सुधारणा देईल, असे सांगितले. ना. गोखल्यांनी त्याबाबत आपण खटपट करू असे मोर्ले यांना आश्वासन दिले व आपल्या भारत-सेवक समाजातील सहकारी नटेश अप्पाजी द्रविड यांना तरुणांना शक्य तेवढे आवरण्याची खटपट टिळक-प्रभृतींनी करावी, अशी प्रयत्नांची दिशा आखण्यास लिहिले.

स्वतः गोखल्यांनी आपल्या खटपटीने व वजनाने सभाबंदीचा जारी झालेला कायदा रद्द करवला, राष्ट्रीय गीते व मिरवणुका यांवरील बंदी काढविली आणि स्वदेशी-बहिष्कारादि चळवळीच्या उपक्रमाने ज्या विद्यार्थ्यांना शाळा-

कॉलेजास मुकावे लागले होते, त्यांना फिरून विद्यार्जनाच्या संस्थांत प्रवेश मिळवून दिला. एवढेच नव्हे, तर सर बी. फुल्लरला इंग्लंडला परत बोलावण्याची व्यवस्था होईल हेही गोखल्यांनी पाहिले. तेणेकरून थोडा प्रक्षोभ कमी झाला. याशिवाय, ईस्ट इंडिया असोसिएशनपुढे इंपीरियल इन्स्टिट्यूटमध्ये ना. गोपाळराव-गोखल्यांनी "भारताच्या स्वराज्यावर" व्याख्यान देऊन ब्रिटिश राजवट, तिची वचने आणि ब्रिटिश राजवटीने आणलेले हिंदुस्थानचे दारिद्र्य इंग्लिश जनतेला उघडे करून दाखविले. गोखल्यांची इंग्लंडची तिसरी सफर अशा प्रकारे कारणी लागली व ते १४ सप्टेंबर १९०६ ला हिंदुस्थानात परतले.

२२ : उत्तर हिंदुस्थानात दौरा

कलकत्त्याच्या काँग्रेस अधिवेशनापूर्वी (१९०६) इंग्लंडमध्ये ना. गोखले गेले आणि तेथील विचारवन्त पार्लमेंट सभासदांच्या व लॉर्ड मोर्लेसारख्यांच्या भेटी घेऊन हिंदुस्थानात ताबडतोब करावयाच्या राजकीय सुधारणांचे महत्त्व पटवीत बसले. दादाभाई नवरोजींच्या अध्यक्षतेखाली कलकत्त्याचे काँग्रेस-अधिवेशन पार पडल्यावर ना. गोखले यांचे मन दुहेरी अर्थाने व्यथित झाले होते. एक तर ब्रिटिश जुलूमशाहीने तरुण मंडळींचा तोल सुटल्यामुळे ते बहिष्काराच्या चळवळीपासून गुप्त संघटना उभारून ब्रिटिश राजवट नेस्तनाबूद करण्याची भाषा करीत होते— आणि हे ना. गोखलेप्रभृतींच्या मते, आवाक्याबाहेरचे उत्थान होते. दुसरे असे की, ब्रिटिश रियासत नुसता वंगभंग करून थांबली नव्हती, तर ना. गोखले ज्या राजकीय सुधारणांसाठी खटपट करीत होते त्या सुधारणांत मुसलमानांना प्रत्येक लहानमोठ्या संस्थेत स्वतंत्र मतदारसंघ आणि स्वतंत्र प्रतिनिधित्व मिळावे, अशी मुस्लीम नेत्यांच्या मुखानेच जोराची मागणी व्हावी, असा डाव ब्रिटिश नोकरशाही रचीत असल्याचा कानोसा ना. गोखल्यांना लागला होता; त्यायोगे हिंदुस्थानातल्या हिंदुस्थानात ग्रामपंचायतीपासून वरिष्ठ विधिमंडळापर्यंत (कलकत्ता) सगळीकडे " हिंदु हिंदुस्थान " आणि " मुस्लीम हिंदुस्थान " असे सवते सुभे निर्माण होऊन हिंदुस्थानचे राष्ट्रीयत्व जरासंधासारखे दुभंगण्याचा रंग दिसत होता. बंगालप्रमाणेच पंजाबची फाळणी " कॉलनायझेशन बिलाच्या " नावाखाली प्रांतिक सरकारने करावयास घातली होती, एवढेच नव्हे तर त्या कॉलनायझेशन बिलाविरुद्ध पंजाबात सरदार अजितसिंग आणि लाला लजपराय यांनी उठाव करताच, ती जणु १८५७ च्या उठावाची पुनरावृत्ती असल्याचा धसका घेऊन पंजाबसरकारने अजितसिंग व लाला लजपतराय यांना १८१८ च्या रेग्युलेशनाखाली ता. ९ मे १९०७ रोजी मंडालेस हद्दपारही केले. आपल्या बेचाळिसाव्या वाढदिवसादिवशी लाला लजपतराय यांजवर झालेल्या त्या सरकारी रोषाने ना. गोखल्यासारख्या लालाजींच्या चाहत्यांना उद्वेग आणि संताप आल्याशिवाय कसा राहणार ?

पण काही झाले तरी हिंदुस्थानच्या लोकांनीच हिंदुस्थानवर येणाऱ्या

प्रसंगाला तोंड दिले पाहिजे म्हणून न्यायप्रिय लालाजींच्या हद्दपारीबद्दल विधिमंडळात ना. गोखल्यांनी जशी सरकारची सडेतोड हजेरी घेतली, तशीच आपल्याच तरुण देशबांधवांची व हिंदु-मुस्लीम जनतेची हिंदुस्थानच्या एकजिनसी राष्ट्रीयत्वाबद्दल खात्री पटवून, जनजागनजागर करण्याची प्रेरणाही कलकत्त्याची काँग्रेस संपल्यापासून ना. गोपाळराव गोखले सतत देत होते.

म्हणून १९०७ साली गोपाळराव गोखल्यांनी हिंदु-मुसलमानांच्या संख्येचा व भांडणाचा प्रश्न जेथे तीव्रतेने उभा राहणे शक्य आहे आणि बंगभंग नि कॉलनायझेशन बिलाचे परिणाम भोगावा लागणारा पंजाब ज्या उत्तरेकडील हिंदुस्थानात आहे, तेथे लोकांच्या ज्ञानजागरासाठी अभ्यासपूर्ण व्याख्यानांची मोहीम काढली. तरुण पिढीस उद्देशून प्रस्तुत व भावी हिंदुस्थानच्या राजकीय परिस्थितीसंबंधी व्याख्याने द्यावी व तरुणांच्या विचारास इष्ट वळण लावावे असा त्यांचा इरादा होता. बंगभंगामुळे ब्रिटिश राजवटीत मुसलमानांना "लाडक्या बिब्बीची" प्रतिष्ठा आल्याकारणाने, हिंदु-मुसलमानांतील दुहीने गोपाळराव गोखल्यांना कष्टी केले होते. गोखले यांनी मोहीम फेब्रुवारी १९०७ मध्ये सुरू केली आणि तेथपासून त्यांच्या व्याख्यानांचा इतका परिणाम होत गेला की, जेथे जेथे ते जात तेथे तेथे एखाद्या लोकप्रिय राजालाही मिळणार नाही असा मान त्यांस मिळत गेला. त्याबरोबर मुसलमानांच्या मनांतील अढीही बरीच कमी कमी होत गेली. पंजाब व संयुक्तप्रांत यांतून फेब्रुवारी महिन्यापासून, देशाची सद्यःस्थिती, स्वदेशी, हिंदु-मुस्लीम-ऐक्य आणि सुशिक्षितांचे कर्तव्य अशी त्या व्याख्यानांची चतुःसूत्री होती. आपण सर्व, प्रथम भारतीय आहोत आणि मग वाटले तर हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती, पारशी, शीख वगैरे आहोत ही वृत्ती प्रत्येक सुजाण अंतःकरणात बाणली गेली पाहिजे असे गोखले व्याख्यानांतून लोकांना सांगत होते. हिंदुस्थानला जगाच्या संस्कृतीत एक कार्य करावयाचे आहे व ते महत्त्वाचे कार्य म्हणजे जगाला प्रेम आणि सत्य यांचा धडा द्यावयाचा, आध्यात्मिक ज्ञान व्यवहार-शुद्ध करण्यास सर्वांस शिकवावयाचे! न्या. रानडे, स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ यांनी हेच उच्च स्वराने सांगितले आहे. आपण नवीन जगात-जमान्यात-शिरत असताना, औद्योगिक, शैक्षणिक, व्यापारविषयक कोणत्याही चळवळीत शिस्त, स्वार्थत्याग आणि कुशलता हे आपले गुण प्रामुख्याने चमकले पाहिजेत असा ना. गोखल्यांच्या व्याख्यानांचा रोख होता. अलाहाबादच्या व्याख्यानात ते स्पष्टच म्हणाले की, "युद्ध, परकीय राष्ट्राबरोबर युद्धविषयक संधान, बंड व अत्याचार या गोष्टी बगळून, बाकी अर्ज-विनंत्यांपासून तो थेट 'कर' न देण्या-पर्यंत सर्व काही सनदशीर आहे."

कलकत्त्याच्या काँग्रेसने पास केलेल्या ठरावांचे मर्म व अर्थ आपल्या श्रोत्यांना समजावून देऊन ना. गोखले जहाल मार्गाकडे जाण्यापासून तरुणांना

पराङ्मुख करीत होते. गोपाळराव गोखले त्या वेळी काँग्रेसचे सेक्रेटरी असल्याकारणाने त्यांच्यावर कामाचा बोजा जसा होता तशीच काँग्रेस शाबूद व सबल राखण्याची जबाबदारीही होती. राजकीय सुधारणा करण्याची जेवढी जलदी करता येईल तेवढी सरकारने करावी असा तगादाही सरकारच्या पाठीमागे त्यांना ठेवावयाचा होताच. त्याचबरोबर परकीय सत्तेने चालविलेल्या दडपशाहीने प्रक्षुब्ध झालेल्या लोकमताला ही गोखल्यांना तोंड द्यावयाचे होते आणि हे सर्व करताना आपली प्रकृती सांभाळून " राजपथ सोडुनी आडपथ धरावयाचा " नव्हता. थोडक्यात म्हणजे ते एक दिव्यच होते. ते नामदार गोखल्यांनी केले. गोपाळराव गोखल्यांच्या या दौऱ्यात हजारो लोक त्यांची मिरवणूक त्यांच्या गाडीचे घोडे सोडून व गाडी स्वतः ओढून काढीत. मुसलमान लोकांनीदेखील राजासारखे त्यांचे थाटाचे स्वागत केले. ना. गोपाळराव गोखले हे असे पहिलेच पुढारी होते खरे; पण या बडेजावाने ते फुगले नाहीत की चढेल झाले नाहीत.

✕ ✕ ✕

२३ : सुरतेला सुरत गेली !

पंजाबमधील व बंगालमधील दडपशाही व क्रांतिकारक अशा लोकांच्या चळवळी चालू असता मुंबई इलाख्याची प्रांतिक सभा सुरतेस (१९०७) झाली. पंजाबमध्ये जमीन-महसुलात वाढ कारण्यात आल्यामुळे, बारीदोआब या कालव्याच्या पाण्याचे दर वाढविण्यात आले. त्यास लोकांनी नकार दर्शविल्यामुळे, कॉलनायझेशन बिल माघारी घेण्यास लावण्याऐवजी लॉर्ड मिंटो यांनी सरदार अजितसिंग व लाला लजपतराय यांना मंडालेस हद्दपार केल्यामुळे, पंजाबमधील तरुणांना " मिंटो हिंदुस्थानात रहातो कसा ? " असे होऊन गेले होते. सिव्हिल अँड मिलिटरी गॅझीटने भारतीय सुशिक्षितांचा धिक्कार केला होता व एतद्देशीय पत्रांवर खटलेच-खटले भरण्याचा सरकारने सपाटा चालविला होता. त्यामुळे रावळपिंडी येथे दंगली झाल्या ! बंगालमध्ये त्या चालूच होत्या. शान्त डोक्यांतसुद्धा खळबळवून सोडणाऱ्या त्या अवस्थेत लो. टिळक हे सुरतेच्या प्रांतिक परिषदेस हजर राहू शकले नाहीत. आणि ता. २९ मार्च १९०७ रोजी सर फिरोजशहा मेहतांनी बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण हे दोन्ही ठराव मोठ्या शिताफीने वगळले. वऱ्हाडच्या प्रांतिक परिषदेत " वन्दे मातरम् "—सारख्या सर्वमान्य राष्ट्रगीतावर रणे माजली, अलाहाबादच्या प्रांतिक सभेत पं. मदनमोहन मालवीय यांनी दोनशे प्रतिनिधींस जागेच्या अभावी परवानगी दिली नाही. संयुक्तप्रांताच्या प्रकृतीस बहिष्कार मानवणार नाही असे त्यांचे मत होते. या सर्व घटनांवरून कलकत्ता काँग्रेसचे ठराव हाणून पाडण्यासाठी हे सर्व खटाटोप होते असे लोकमत होऊन बसले ! ! कारण कलकत्ता काँग्रेसचे सगळेच चक्कर आपण फिरवून टाकणार आहोत, असे फिरोजशहा मेहतांनी कलकत्ता काँग्रेस संपल्यावर लो. टिळकांना स्वच्छ सांगून टाकले होते.

कलकत्त्यानंतरची काँग्रेस लाहोरचे आमंत्रण येऊनही नागपुरास भरावयाची असे ठरले होते. पण नागपूरच्या स्वागतसमितीच्या बैठकीत जे " अश्लाघ्य वाक्पांडित्य " झाले त्यावरून तेथे काँग्रेस सुखरूप पार पडणार नाही म्हणून मुंबईस पुढाऱ्यांची एक सभा झाली. लो. टिळक तेथे हजर होते. त्या सभेत १९०७ ची काँग्रेस सुरतेस भरावयाची, असे जाहीर झाले. लो. टिळक व

दादासाहेब खापर्डे यांनी त्या गोष्टीस विरोध केला. परंतु नागपूरच्या प्रागतिकांनी केलेल्या तारातारीवरूनच सुरतेचा निर्णय बहुमताने घेण्यात आला होता. अध्यक्ष म्हणून राशबिहारी घोष यांचे नावही जाहीर झाले.

प्रागतिक आणि राष्ट्रीय पक्षातील या दुरंगी व तीव्र मतभेदाचा कानोसा असलेल्या इंग्रज सरकारने विधिमंडळातील गोखल्यांनी केलेल्या कानउघाडणीचा आदर राखण्याचे सोंग वठवून, इंग्रजी राजवटीच्या बंगाल्यात कोमिताला वगैरे ठिकाणी दंगे चालू असतानाच लाला लजपतरायांना ११ नोव्हेंबर १९०७ रोजी मोकळे केले.

सरकारची अपेक्षा साकार होऊ लागली. लालाजींची सुटका झाल्यावर काँग्रेसच्या अधिवेशनाला निराळाच रंग चढू लागला. सुरतेच्या राष्ट्रीयांनी लाला लजपतराय अध्यक्ष हवेत असा हट्ट धरला. ना. गोखल्यांनी प्रयत्न केला आणि दिलदार लालाजींनीच अध्यक्षस्थान नाकारले. मग राष्ट्रीय पक्षाने पूर्वनियोजित अध्यक्ष राशबिहारी घोष यांच्याबद्दलच्या नापसंतीची चळवळ सुरू केली. वरिष्ठ विधिमंडळात बिहारींनी राष्ट्रीयांच्या पुरोगामीपणाबद्दल अनुदार उद्‌गार काढले होते, ते त्यांना आता बांधू लागले. लालाजींच्या स्थानबद्धतेचा निषेध एकमुखी झाला पाहिजे असे सगळ्यांचेच म्हणणे. तेवढ्यासाठीच लालाजींना एकमुखाने अध्यक्ष निवडावे असे तरुण राष्ट्रीयांचे म्हणणे. पण स्वतः लालाजींची अध्यक्ष म्हणून निषेध-ठरावाच्या वेळी कुचंबणा होईल, ती टाळण्यासाठी त्यांच्या अध्यक्ष-पदाचा आग्रह धरू नये, असे ना. गोखलेप्रभृतींचे म्हणणे. तेव्हा वादाला आपणच कारणीभूत होऊ नये म्हणून स्वतः लालाजींनीच नकाराचा निकाल घेतला.

काँग्रेसपुढे यावयाच्या ठरावांची पत्रिका छापून झाल्यावर तिची एक प्रत लालाजींना व एक लो. टिळकांस देण्यात आली. कलकत्त्याचे (१९०६) ठराव जसेच्या तसे पास होणार असतील तर टिळक-लजपतरायांची काहीच तक्रार नव्हती. अध्यक्ष कोणी व्हावे याबद्दलही मग विरोध नव्हता. पण काँग्रेसचे सेक्रेटरी ना. गोखले हे त्याबद्दल सर्व सोळाशे प्रतिनिधींच्यातर्फे आगाऊ आश्वासन कसे देणार ? त्यांनी तसा प्रयत्न करू असेही आश्वासन देऊन स्वतःची सुटका वा गुंतवणूक करून घेतली नाही.

यथाक्रम ता. २७ डिसेंबर १९०७ ही उजाडली. दुपारी अडीच वाजता काँग्रेसच्या अधिवेशनास रीतसर सुरुवात झाली. स्वागताध्यक्ष श्री. मालवी यांचे भाषण झाल्यावर, अंबालाल सक्करलाल यांनी अध्यक्षांची सूचना मांडताना डॉ. राशबिहारी घोष यांचे नाव काढताच, "ना, ना" असा एकच आवाज चोहोकडून उठला ! या गलग्यातच सुरेंद्रनाथ बानर्जी दुजोऱ्याचे भाषण करू लागले. त्यांच्या तोंडच्या पहिल्याच वाक्यापासून गोंगाट सुरू झाला. स्वागताध्यक्षांनी

" शांति, शान्ति " म्हणून आर्जव– विनंती– काकुळती केली. पण व्यर्थ ! " गोष्टी या थराला आल्या अँ ! " असे सुरेंद्रांनी तेवढ्यात वाक्य उच्चारताच, " हो, हो, हो ! " असे प्रतिसाद आले. सभा बरखास्त झाली. " रात्रौ लो. टिळक गोखल्यांच्याकडे गेले पण गोखल्यांनी त्यांना झिडकारले," अशी खोटीच आवई दुसऱ्या दिवशी कोठून तरी पिकली. मग काय ? ता. २८ डिसेंबर रोजी फिरून काँग्रेस सभेस एक वाजता सुरुवात झाली. लो. टिळक यांनी स्वागताध्यक्ष मालवी यांजकडे एक चिठ्ठी दिली. ती न वाचताच, काँग्रेस बंद ठेवा या वा अशा अर्थाचीच ती आहे असे समजून, ती मालवींनी नियमबाह्य ठरविली ! आदले दिवशीचे अर्धवट राहिलेले सुरेंद्रांचे भाषण झाले. पं. मोतीलाल नेहरूंनी पाठिंबा दिला. मग अध्यक्षांच्या निवडीचा ठराव स्वागताध्यक्षांनी मतास टाकला. " ना, ना, ना !! हो, हो ! " च्या घोळात नकारघंटा फिकी पडल्याचे जाहीर करून राशबिहारी अध्यक्ष निवडले गेले, असे मालवींनी जाहीर केले.

डॉ. राशबिहारी घोष अध्यक्षस्थानापन्न होऊन आपल्या भाषणासाठी तोंड उघडणार तोच लो. टिळक मुख्य व्यासपीठावर एकदम ताठपणे चमकू लागले. मालवींनी चिठ्ठीची वासलात सांगितली. टिळक म्हणाले, " आपल्या बेगुमानीला मी काय करू ! मी अध्यक्षांच्या निवडणुकीसाठीच चिठ्ठी लिहिली होती तेव्हा मी हक्क बजावणार आहे. "

तेव्हा अध्यक्ष म्हणाले की, " आपण बेकायदेशीर वागत आहा, आपण जाग्यावर बसा ! " टिळकांनी उत्तर केले की, " प्रतिनिधींच्या न्यायबुद्धीपुढे मी माझे म्हणणे मांडणारच ! "

झाले ! मग एकच धुमाकूळ माजला ! एकदम लाव्याकाव्या सरसावून हाणामारी सुरूच झाली म्हणाना ! लो. टिळकांच्यावरही एक मनुष्य धावून आला असे दिसताच, ना. गोखले तडक पुढे झाले, मध्ये पडले व धावत्याला वारून उभे राहिले. तेवढ्यात कोणी तरी खुर्ची फेकून मारण्याचा प्रयत्न केला. तिच्या मागोमाग एक पुणेरी लाल जोडा फिरोजशहा मेहतांस चाटून सुरेंद्रनाथांना लागला. या वेळी ना. गोखले सात्त्विक संतापाने थरथर कापू लागले होते. इतक्यात पोलीस आले. मेहता, गोखलेप्रभृती मंडळी मागच्या दरवाजांनी बाहेर गेली. मंडपातून सगळ्या स्त्रिया बाहेर पडेपर्यंत टिळक जागेवर उभे होते. मग ते स्वपक्षीयांत गेले. पोलिसांनी काँग्रेस-मंडपाचा ताबा घेतला. ता. २८ डिसेंबर १८८५ ला मुंबई येथे जन्माला आलेल्या काँग्रेसची तिच्या २२ व्या वर्षी सुरत येथे ' सुरत ' पार गेली !

तरीही २८ डिसेंबरच्या सायंकाळी पुष्कळसे पुढारी एकत्र जमले. दादासाहेब करंदीकरांच्यासारखे अपवाद सोडले, तर राष्ट्रीयांतील बहुसंख्य मंडळींना

यांनी सरकारच्या निषेधार्थ सभात्याग केला तेव्हा खुद्द प्राचार्य सेल्बीसारख्यांनी त्यांच्या त्या वक्तव्याची खास पत्र धाडून प्रशंसा केली. वरिष्ठ विधिमंडळातील वादविवादास फिरोजशहा मेहतांनी नवे वळण लावले होते. लोकप्रतिनिधींच्या कार्यास नवा जोम भरला होता. मेहतांच्या जागी आलेल्या गोखल्यांनी तोच बाणेदारपणा पुढे चालवून मार्च १९०३ मधील अर्थसंकल्पावरील पहिल्याच भाषणाने नामदार मेहतांवरही ताण केली. सरकारी तिजोरीला कृत्रिम शिलका राहतात याचाच अर्थ असा की, सरकार रयतेकडून वाजवीपेक्षा अधिक करवसुली करते. तो करभार मान मोडणारा असतो. अलिकडे दोन-तीन वर्षे हिंदुस्थान सरकारसारख्या उधळ्या सरकारजवळ शिल्लक राहू लागते हे जगातील आठवे आश्चर्यच होय असे म्हणून गोखल्यांनी त्या सरकारची छेड काढली. सरकारची जावईखाती म्हणजे लष्कर व सनदी नौकर. त्यांच्या अवाढव्य खर्चापायी पाण्यासारखा पैसा खर्च झाला तरी तो खळगा भरतो कोठे ? १८८५ मध्ये तीस हजार सैन्य वाढविले. का ? तर म्हणे, रशियाचा बागुलबोवा आहे म्हणून ! बागुलबोवा दूरच, पण त्याआधीच भिऊन गेलेल्या सरकारने जे नवीन लष्कर ठेवले त्याचा खर्च चालावा म्हणून मात्र जनतेवर कर बसविण्यात येतात ! आणि रशियन पिशाच्चाची ती भीती नाहीशी झाली तरी हिंदुस्थानच्या छाताडावर नंगा नाच घालणाऱ्या करांच्या भुताला मात्र मूठमाती देण्यात येत नाही ! केवढी ही अप्रतिम लोककल्याणाची दक्षता ! कृत्रिम शिलका, कराचा बोजा आणि हिंदुस्थानची भरभराट होत असल्याचा सरकारी पोकळ दावा यावर गोखल्यांनी एकसारखे मर्माघात केल्याने सरकारी अधिकाऱ्यांची सर्व समर्थने पांगळी ठरू लागली. टांकसाळ सुधारा, कर कमी करा या गोखल्यांच्या सूचनांवर सरकारपक्षाला मात करताच आली नाही.

येथूनच ना. गोखले व लॉर्ड कर्झन यांचे दोन हात होण्यास सुरुवात झाली. अर्थसंकल्पावरील ती खर्ड्याची लढाई दरसाल पाहण्यास–अभ्यासण्यास किती तरी लोक आतुरतेने जमत. अर्थसंकल्पातील खाचाखोचा, आकडे तयार करण्यातील चुका आणि कारभाराचे धोरण यांच्यावर झणझणीत प्रकाश पाडणारे, त्या सर्व संबंधात लोकहितास अनुकूल असे उपाय सुचविणारे, आणि एकंदर रियासतीच्या कल्याणसाधनाचे खरे मार्ग आंखून देणारी ना. गोखल्यांची भाषणे खरोखर अजोड असत ! गोखल्यांच्या रेखीव भाषणांचा असा परिणाम होत गेला की, गोखल्यांच्या या वर्षीच्या सूचना दुसऱ्या वर्षीच्या अर्थसंकल्पात स्वीकारलेल्या दिसत. मूळ तीन पैशांच्या मिठाच्या टोपलीची किंमत पाच आणे झाल्याने मिठावरील कर कमी करवून आणि शिक्षणाप्रीत्यर्थ अधिकाधिक पैसा खर्च करणे सरकारला भाग पाडून गोखले यांनी देशाचे अंतःकरण आपलेसे करून घेतले.

सन १९०३ सालचे अंदाजपत्रकावरील भाषण झाल्यावर ४ डिसेंबरच्या बैठकीत " सरकारी गुपितांच्या " कायद्यावर गोखल्यांनी सणसणीत टीका केली. १८८९ मध्ये हा कायदा सौम्य स्वरूपाचा सिमल्यात पास झाला होता. १९०३ च्या कायद्याने हिंदुस्थानात झारशाही निर्माण होईल. भारतीय कायदे पुस्तकाला अशा कायद्याचा विटाळही होऊ नये, असे ' इंग्लिशमन ' या पत्रानेही म्हटले होते. सरकार सर्व दिवाणी कारभार लष्करी पद्धतीवर नेत असल्याबद्दल ना. गोखल्यांनी दोष दिला. सरकारची बिंगे वर्तमानपत्रांनी चव्हाट्यावर आणली तर त्यास शिक्षा करण्याचा अधिकार त्या कायद्याने सरकारला मिळणार होता. लोकांच्या मतस्वातंत्र्यावर तो घाला आहे, हे गोखल्यांनी स्पष्ट केले.

याच (१९०३) वर्षीचे दुसरे महत्त्वाचे विधेयक विद्यापीठाच्या पुनर्घटनेचे. १९०० मध्ये कलकत्ता-विद्यापीठात चॅन्सेलर म्हणून कर्झनांचे भाषण झाल होते. त्यातून त्यांनी पदवीधरांना वळण लावण्याकरिता सदर विधेयक आणले होते. सर थॉमस रॅले यांच्या अध्यक्षतेखाली (१९०१) नेमलेल्या कमिशनने सदर विधेयकाची शिफारस केली होती. एकही खास एतद्देशीय सभासद नसलेले ते कमिशन म्हणजे भारतीय सदसद्विवेकशक्तीचा अपमान होता. आणि त्या कमिशनच्या एकांगी शिफारशीने आलेले विधेयक म्हणजे विद्यापीठाचे स्वातंत्र्य नष्ट करून त्यांचे सरकारीकरण करण्याचे कारस्थान होते. खाजगी शिक्षण-संस्थांना खच्ची करण्याचा तो प्रयत्न होता. तेव्हा सर्व विद्यापीठांबरोबर मुंबई विद्यापीठाचा एकमत, सर्वसंमत अभिप्राय सर फिरोजशहा मेहतांमार्फत सादर करण्यात आला. तरीही ते तसले विधेयक २ नोव्हेंबर रोजी मांडून कर्झनसाहेबांनी बरेच तोंडसुख घेतले. ना. गोपाळराव गोखल्यांनी व सर आशुतोष मुकर्जींनी अलौकिक विद्वत्तेने आणि बिनतोड कोटिक्रमाने त्या विधेयकाची चीरफाड केली. तरी पण तो कायदा पास होऊन, १९०४ मध्ये विद्यापीठातून, हायकोर्टामधील न्यायाधीश, सरकारनियुक्त सभासद, बिशप, मिशनरी यांचाच भरणा होण्याची सोय झाली ! !

सन १९०४ च्या अर्थसंकल्पावरील भाषणात त्या वर्षी वाढविण्यात आलेल्या लष्करी खर्चावर गोखल्यांनी टीका केली. सेनापतिसाहेबांनी हिंदुस्थानातील आंग्लपुत्रांना सैन्यात दाखल होण्यास आग्रहाने सांगितले, पण हिंदुपुत्रांस मात्र मज्जाव ! !

विद्यापीठ कायद्यातील चुकांचे समर्थन करणाऱ्या व्हॅलिडेटिंग ॲक्टसारख्या कायद्यातील सरकारच्या अरेरावी उतावीळपणावर व अहंमन्यतेवर निर्भीड टीका करून येईल तेवढा विरोध करण्याचे काम १९०५ मध्ये ना. गोखल्यांवरच आले. हिंदी लोकांना वरची अधिकारपदे देण्याच्या कामी ब्रिटिश सरकारच्या औदार्याची बरोबरी कधीही, कोठेही झालेली नाही, असे दाखविण्यासाठी आदल्या

वर्षीच सरकारने एक ठराव बाहेर काढला होता. त्यातील गणनाचा व आकड्यांचा कुटिलपणा सिद्ध करण्यासाठी सरकारी इतिवृत्तातून व आकड्यांच्या हिशोबी कोष्टकातून आवश्यक तेवढे आकडे गोखल्यांनी धुंडून काढले व तेच सरकारच्या तोंडावर फेकले. १८९४ मध्ये वरिष्ठ जागा सदैव युरोपियनांच्याकडेच हव्यात असे ठरविण्यात आले. त्याचा तीव्र धिक्कार करून समान वागणूक हीच का? असे विचारीत, हजार रुपये पगारावरील एकशेपंचवीस जागा भारतीयांना मिळावयाच्या, त्यातून एकशेआठचा भरल्या, तेथेही त्यातील ब्राण्णव सेक्रेटरी ऑफ स्टेट्च्या मर्जीने! हा निःपक्षपातीपणाचा पुरावा काय? अशी गोखल्यांनी पृच्छा केली. हिंदी माणसाचा दर्जा आहे तसाच राहून कारभार ठाकठीक आणि तरतरीत चालावा, त्यात ढिलेपणा कोठे राहू नये, हिंदुस्थान म्हणजे ब्रिटिशांना राज्यकला, कारभारकला शिकण्याची शाळा व्हावी, असेच त्या कालचे सरकारी धोरण होते!! काही मर्यादेपलिकडे हिंदी माणसाला चढू दिले नाही तरच ब्रिटिश अंमल येथे हिंदुस्थानात चिरकाल राहील असा त्यांचा ठाम सिद्धान्त होता! राणीच्या जाहीरनाम्याचा उल्लेख कर्झनसाहेब अव्यवहार्य ताम्रपट असा उघडउघड करीत. ब्रिटिशांच्या कडक शापाखाली व चाबकाखाली हिंदुस्थानचे जीवन चालले पाहिजे या दिमाखाने व घमेंडीने कर्झनसाहेबांची एकंदर भाषणे होत. आपण सांगतो ते सत्य! हिंदु लोक खोटे बोलणारे आहेत असा सरळ शेरा कर्झनसाहेबांनी एकदा मारला होता. तेव्हा 'अमृतबझारपत्रिके'ने कोरियातील लॉर्ड कर्झन यांनी आपले वय चोरल्याची—आठवण देऊन कर्झनचे दात कर्झनच्या घशात घातले होते; याचा उल्लेख करावयास ना. गोखले यांनी सोडले नाही. लॉर्ड कर्झन यांनी वंगभंग करून आपल्या कारकीर्दीचा कळस केला! वंगीयांना चीड यावी आणि अपमान वाटावा अशा हिशेबानेच त्या फाळणीची अंमलबजावणी त्यांनी केली. त्यायोगे भावनाप्रधान वंगीय चिडले व बेफाम झाले. ब्रिटिशांच्या धोरणाचा प्रतिकार म्हणून परदेशी वस्तूंवर, ब्रिटिशांनी चालविलेल्या भल्याभल्या शिक्षणसंस्थांदि संस्थांवर त्यांनी बहिष्कार टाकला. तेव्हा चिडलेल्या सरकारने दडपशाही कायद्यांचे गिरमिट सुरू केले. कसल्याही चौकशीशिवाय पुढाऱ्यांची उचलबांगडी, राजद्रोहाच्या कायद्याची वाढती व्याप्ती, सभाबंदी, पोलिसी अधिकारांची वाढ इत्यादी अनेकविध सरकारी कायदेबाजीबाबत गोखल्यांनी कायदेमंडळाच्या चतुःसीमेत दिलेली लढत म्हणजे संसदीय चतुरस्र-संचलनातील कुशलतेचा आदर्श होय. असा निर्वाळा पुढे लॉर्ड कर्झन यांनाच एका प्रसंगाने द्यावा लागला हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

मिंटोच्या कारकीर्दीतील १९०६ सालचे ना. गोखल्यांचे अर्थसंकल्पावरील पहिले भाषण मिंटोचा वेध घेऊन बसले! अगोदर १९०५-६ चे अर्थसंकल्प म्हणजे चिकित्सक गोखल्यांच्या १९०४ च्या अर्थसंकल्पावरील भाषणाचा प्रचंड

विजय होता. कारण गोखल्यांच्या सूचना त्यात बव्हंशाने स्वीकारलेल्या होत्या. जमिनीवरचा कर कमी करा, प्रयोगादाखल काही ठिकाणी तरी शेतकऱ्याऱ्यांना संपूर्ण ऋणमुक्त करा आणि मग जमीन विक्रण्याचे त्यांचे हक्क मर्यादित करा; इजितात आहेत तशा शेतकरी पतपेढ्या स्थापा, पाटबंधारे सुधारा, शास्त्रीय शेतीला उत्तेजन द्या, उद्योगधंद्यांचे शिक्षण वाढवा, प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करा, आरोग्यवर्धक कामे हाती घ्या, या मागण्यांचा ना. गोखल्यांनी धोशाच लावला. मिठावरील कर १ रुपयाने कमी झाला तो मोर्ले यांच्या मताप्रमाणे पूर्णच बंद व्हावा अशी अपेक्षा १९०७ साली गोखल्यांनी व्यक्त केली. १९०७ साली सरकारने सभाबंदी कायदा आणला, त्याला तर गोखल्यांनी जोराचा विरोध करून निर्धाराने बजावले की, कर्झनच्या कारकीर्दीत ब्रिटिश सत्तेच्या स्वरूपाविषयी आणि भारतीय तरुणांनी आपल्यापुढे ठेवावयाच्या आदर्शासंबंधी व ध्येयासंबंधी, तरुण पिढीच्या कल्पनांची भलतीच उलथापालथ करून टाकली आहे. अशा वेळी दडपशाही उपयोगीच नाही. राज्यसत्ता माणसांना परकी तरी ती माणुसकीने संपूर्ण स्वदेशी हवी आहे हे सत्य ना. गोखले यांनी मिंटो, त्यांची अधिकारीप्रभावळ, विधिमंडळातील सभासद आणि त्यांच्या निमित्ताने हिंदुस्थानातील जनता व जग यांच्या निदर्शनास आणून दिले.

सन १९०८ च्या अर्थसंकल्पावरील भाषणात ना. गोखल्यांनी पुनः सरकारला इशारा दिला की, राज्यकारभारात सुधारणा करावयाच्या त्या लवकर करा; ही वेळ आणीबाणीचीच आहे. वेळीच सुधारणा जाहीर करून लोकांतील असंतोष व तीव्र निराशा दूर केली नाही, तर अडचणीच अडचणी उत्पन्न होतील. लॉर्ड मिंटोचे हृदय सहानुभूतीचे ! पण लॉर्ड कर्झनची तडफ जवळ नसल्यामुळे त्यांची पावले जपून पडावयाची. त्यामुळेच गोखल्यांच्या मागण्याप्रमाणे १९०८ च्या उत्तरार्धात सुधारणा जाहीर झाल्या ! त्या मोर्ले–मिंटो–रिफॉर्म्स या नावाने ओळखल्या जातात.

सन १९०८ ते १९१४ ही वर्षे गोखल्यांच्या " शिरावरील ओझ्यांनी खचलेली " होती. राज्यव्यवस्थेतील अगदी पायाचे दगड म्हणजे म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्डे. खराट्याचे स्वराज्य चालविणाऱ्या या संस्थांना स्वातंत्र्य देण्याकरिता खरेखुरे अधिकार–विभागणी–कमिशन ना. गोखल्यांनी मागितले होते ते मिळाले. यापुढे त्यांची साक्ष झाली. त्यानंतर ज्या सुधारणा अमलात आल्या त्या बहुतेक अंशी त्यांनीच सुचविलेल्या होत्या. त्यात मुसलमानांकरिता केलेली व्यवस्था तात्पुरती मान्य करण्यासाठी हिंदू पुढाऱ्यांची मने त्यांना वळवावी लागली. वाढत्या महागाईच्या चौकशीसाठी एक समिती नेमण्याची आवश्यकता गोखल्यांनी सरकारच्या निदर्शनाला आणली. गोखल्यांचे सर्वांत महत्त्वाचे काम म्हणजे

मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी (पूर्वीच्या ज्योतिराव फुल्यांच्या तत्त्वावर) सगळ्या हिंदुस्थानभर चळवळ करून तिच्या जोरावर हिंदुस्थान सरकारच्या विधिमंडळात १९१० त एक ठराव व १९११ साली एक विधेयक सप्रमाण मांडून सरकारचे शिक्षणविषयक धोरण त्यांनी बदलून घेतले हे होय. गोखल्यांचा तो ठराव किंवा ते विधेयक मान्य झाले नाही. पण गोखल्यांनी त्या प्रसंगीच्या भाषणांनी सरकार व सरकारपक्षीय सर्व सभासदांच्या मनाची पक्की खातरजमा झाली की, तत्त्वतः गोखलेच सर्वस्वी बरोबर आहेत. म्हणूनच शिक्षण-प्रसारासाठी मंजूर होणाऱ्या रकमा दरवर्षी वाढू लागल्या आणि शिक्षणसंस्थांना सरकारी अनुदाने सढळ हाताने मिळू लागली. त्याचे पहिले दृश्य फळ म्हणजे ७५ टक्के शाळांतून मुलांची संख्या दुप्पट झाली व प्राथमिक शिक्षणाकरिता दिल्ली दरबाराच्या (१९११) वेळी पन्नास लक्षांची देणगी जाहीर झाली. १९१२ साली तर ब्रिटिश पार्लमेंटात हिंदुस्थानचे अंडर सेक्रेटरी मॉंटेग्यू यांनी ना. गोखल्यांचे अभिनंदन केले.

१९०२ मध्ये गोखले बोलले होते की, रुप्याच्या उतरत्या भावामुळे हुंडणावळीत फारच फरक पडत चालला आहे व हिंदुस्थान सरकारला विलायतेत पाठवाव्या लागणाऱ्या सर्व पैशांच्या बाबतीत पुष्कळ बचत होत आहे. इकडे देशात एकसारखे दुष्काळ पडत होते, दारिद्र्य वाढत होते, पण हिंदुस्थानची गंगाजळी मात्र दिवसेंदिवस भरत होती. वाढत्या शिलकेवरून अधिकारी मंडळी देशाची स्थिती सुधारल्याची बढाई मारीत होती. त्या कोटिक्रमाचा पोकळपणा दाखवून, सरासरीने दरसाल पाच कोटी शिलक उरत असल्यामुळे देशातील गरीब लोकांवरील कर कमी करा, असा गोखल्यांनी लकडा लावला. त्याप्रमाणे १९०३ साली मिठावरील कर दरमणी अडीच रुपयांचा दोन रुपये झाला, प्राप्तीवरील कराची मर्यादा पाचशे रुपयांच्या ऐवजी हजार रुपये प्राप्तीची धरली गेली; १९०५ साली मिठावरील कर दीड रुपया होता तो १९०७ साली एक रुपया दरमणी झाला. सारांश राज्यकारभाराचा कल लोकमतानुवर्ती करण्याचा नामदार गोखल्यांचा उद्देश हलके हलके साध्य होण्याची चिन्हे दिसू लागली.

१९१० च्या जानेवारीत मोर्ले-मिंटो सुधारणान्वये उत्साहपूर्ण विधिमंडळ भरले. या सुमारास आफ्रिकन सरकारने तेथे वसाहत करून राहणाऱ्या आशियातील लोकांविरुद्ध जुलमी कायदे केले होते. त्यांच्या मुळाशी मुदतबंदी वेठ होती. ती बंद करण्याचा ठराव ना. गोखले यांनी विधिमंडळाच्या बैठकीत मान्य करून घेतला. जिल्हाधिकाऱ्यांना सल्ला देण्यासाठी जिल्हामंडळे विनापवाद स्थापावीत हा गोखल्यांचा ठरावही मान्य झाला.

मोर्ले-मिंटो-रिफॉर्म्सेखाली नव्या विधिमंडळात सरकारने पहिला जुलमी कायदा आणला तो म्हणजे (१९१० साली) वृत्तपत्रे–छापखाने–नियंत्रणाचा.

त्याच्या तोंडओळखीनेच गोखले हळहळले. त्यामुळे त्याची मुदत, तो जरूरीचा कायदा मानला तरी, तीन-एक वर्षांपेक्षा अधिक ठेवू नका म्हणून गोखल्यांनी सांगितले. वृत्तपत्रांनी आमच्या राष्ट्राची प्रगती केली आहे, राष्ट्रीय चैतन्य निर्माण केले आहे; त्यांच्या नरडीला नख लावू नका, असे आर्जवी भाषण गोखल्यांनी केले. या कायद्यावर गोखले तुटून पडले नाहीत म्हणून फिरोजशहा मेहतासुद्धा संतापले. त्यातील रहस्य 'लीडर'चे संपादक सी. वाय्. चिंतामणी यांनी फोडले ते असे – १९१० च्या ख्रिस्तमसमध्ये गोखले अलाहाबादला काँग्रेससाठी गेले होते. त्यांनाच चिंतामणींनी प्रश्न केल्यावरून आपल्या अविरोधाची कूळकथा गोखल्यांनी सांगितली. गव्हर्नर-जनरलच्या कौन्सिलचे कार्यकारिणीचे सभासद सत्येंद्रप्रसन्न सिंह झाले होते. हिंदुस्थानचे पहिले-वहिले भारतीय एक्झिक्यूटिव्ह मेंबर ते ! त्यांच्याकडे कायदेखाते होते. त्या नात्याने इतर अनेक विधेयकांप्रमाणे हे वृत्तपत्रे-छापखाने-नियंत्रणाचे विधेयकही मांडणे कर्तव्य म्हणून त्यांच्याकडेच आले. सर्वांत लोकधिक्कारास कारणीभूत होणाऱ्या त्या विधेयकाशी आपल्या नावाचा संपर्कही नको असे होऊन त्यांनी लॉर्ड मिंटोंना, सेक्रेटरी ऑफ स्टेटकडे आपण राजीनामा देत असल्याची तार धाडण्यास विनंती केली. सत्येंद्रांनी आपला राजीनामा परत घ्यावा अशी काही तडजोड घडवून आणण्यास लॉर्ड मिंटोंनी आपल्या सेक्रेटरीस सांगितले. त्यांनी सर लॉरेन्स जेंकिन् व गोखलेच काही तोड काढतील तर काढावी अशी सूचना सेक्रेटरीस दिली. प्रथमच एक्झिक्युटिव्ह मेंबर नेमलेल्या भारतीयाने एक वर्षाच्या आतच राजीनामा दिला तर हक्क मागतात पण जबाबदाऱ्या पेलत नाहीत असा भारतीयांच्या नावाने सर्व जगभर डांगोरा होईल, अशी एक धास्ती होती. म्हणून मिंटोसाहेब विधेयकात थोडा बदल करावयासही तयार झाले. सत्येंद्रांनी राजीनामा परत घेतला नाही तर फिरून पन्नास वर्षे तसा अधिकार मिळण्याची आशा भारतीयांनी करू नये, असे मोर्ले यांचे मत पडले ! गोखले आणि लॉरेन्स यांनी विधेयकात मूलगामी फरक केला तरच सत्येंद्रांनी राजीनामा परत घ्यावा असे मत दिले. मिंटोंनी संमती दिली. तेव्हा गोखले आणि सत्येंद्र यांनी डोकी घासली. मूळ विधेयक एतद्देशीय पत्रांनाच काचात धरणारे होते. आता ते अँग्लोइंडियन पत्रांनाही लागू करण्यात आले. अस्तित्वात असलेल्या सगळ्या वृत्तपत्रांकडून व छापखान्यांकडून जामिनक्या घ्याव्या असे मुळात होते. ते बदलून कायदा झाल्यानंतर मर्यादा सोडणाराकडूनच जामीन घ्यावेत अशी दुरुस्ती केली आणि तरीही जरूर तेव्हा हायकोर्टाकडे दाद मागण्याची सवड ठेवली ! त्या सुधारणा पाहून व्हाइसरॉयांचे सर्व कौन्सिल जळफळले ! पण मिंटोंनीच नेट धरला. तथापि, विधेयक मांडावयाच्या वेळी सत्येंद्रांनी नवीच शर्त पुढे केली. ते म्हणाले, 'गोखले यांनी विधेयकास पाठिंबा द्यावा.' गोखल्यांनी नकार दिला. गोखले लोकप्रतिनिधी होते. आता सत्येंद्रांची

मर्जी राखून मिंटोंनी दुरुस्ती केल्यावर सत्येंद्रांना राजीनामा देणेही अव्यवहार्य होते; तटस्थ वा मूक राहणेही त्यांना अशक्य होते. तेव्हा गोखले यांनी आपण त्या विधेयकावर टीका केली तरी विरुद्ध मत देणार नाही, एवढे सत्येंद्रांना कबूल केले. सत्येंद्रांचे समाधान झाले.

सन १९११ साली सभाबंदीच्या कायद्याला सरकारने जीवदान दिले. ना. गोखल्यांनी जिवापाड विरोध केला, पण उपयोग झाला नाही. १९१२ साली फिरून प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याबद्दल ना. गोखले यांनी विधेयक मांडले. पण ते अमान्य झाले. हिंदुस्थानातील वाढत्या खर्चासंबंधी त्यांनी १९११ त एक ठराव मांडला होता. सरकारच्या सर्व खात्यांवर उत्पन्नापेक्षा खर्चाचे मान वाढते आहे व त्यास आळा घालणे आवश्यक आहे, असा त्या ठरावाचा आशय होता. तीस वर्षांतील जमेच्या व खर्चाच्या रकमांची तेरीज घेऊन गोखल्यांनी आपली बाजू मांडली होती. अर्थसचिव रसिक असल्याकारणाने तो ठराव मान्य झाला. सन १९१२ साली गोखल्यांची नेमणूक पब्लिक सर्व्हिस कमिशनवर दरमहा दोन हजार रुपयांवर होणार, तेव्हा त्यांना विधिमंडळाचे सभासद राहता येणार नाही, असा विधिमंडळात बूट निघाला असता, आपण पब्लिक सर्व्हिस-कमिशनवर काम करण्यासाठी सरकारकडून दमडीही पगार घेणार नाही असे स्पष्ट सांगून ना. गोखल्यांनी सगळ्यांची तोंडे बंद केली. त्याच (१९१२) सालच्या ७ मार्च रोजी ना. गोखले विधिमंडळात म्हणाले, "ना. अर्थमंत्र्यांनी एका वर्षाच्या अवधीत होऊ घातलेल्या घडामोडींचे काहीसे भयदायक चित्र रेखाटले आहे. त्यांनी आपल्याला इशारा दिला की, आकाश एकदम भरून येईल आणि सध्या अर्थखात्याची जी सुखासीन अवस्था आहे तिच्याऐवजी जादा कर लादणे त्याला आवश्यक होईल; आपण कदाचित एकाएकी निराळ्याच गोंधळात पडूं!! आकाश कोणत्या काळोखाने एक वर्षात भरून येऊन कसले कर लादायला लागण्याची भीती ना. अर्थसचिवांना होती हे स्वच्छ उकलून घेण्याचा ना. गोखल्यांनी प्रयत्न केला; पण ते जमले नाही. १२ डिसेंबर १९११ रोजी पंचम जॉर्ज बादशहा स्वतः हिंदुस्थानात येऊन त्यांचा दिल्लीस राज्यारोहण-समारंभ झाला आणि त्या वेळी त्यांनी कलकत्त्याची राजधानी दिल्लीस आणली व वज्रलेप म्हणून लॉर्ड कर्झननी म्हटलेला बंगभंग रद्द करून प्रजा संतुष्ट केली. मग आता कसला काळोख पसरणार होता? अनेक प्रकारे अर्थमंत्र्यांना छेडण्यात आले, पण ते अखेरपर्यंत गप्पच राहिले. त्यांच्या डोळ्यांपुढे जर्मनीच्या एरिच फॉ. लुडेन डॉर्फ या निष्काम कर्मयोग्याने १९०४ पासून जर्मन लष्करातील युयुत्सू सैन्याधिकाऱ्यांना सल्लामसलत देऊन जागतिक युद्धाची भट्टी पेटविण्याचे त्याचे बेत दिसत असतील काय? का लाला लजपतरायांना हिंदुस्थानात येण्याची बंदी केल्यामुळे त्यांच्या अमेरिकन वास्तव्यात नव्या हिंदी माणसांना अमेरिकेत व्यापार

करू द्यावयाचा नाही अशी बंदी झाल्याने असंतुष्ट होणाऱ्या पंजाबींच्या " गदर " चळवळीचे रणकंदन त्यांना दिसत होते ? १९०५ सालीच पॅरिस येथे शामजी कृष्णवर्मांनी इंडियन होमरूल लीग काढली; १९०७ च्या ऑगस्टमध्ये जर्मनीतील स्ट्रूटगार्ड येथे कम्युनिस्टांच्या सभेत मॅडम कामांनी स्वतंत्र भारताचे निशाण फडकविले, जर्मन कैसरने मिशीला पीळ भरून " ज्याच्यावर सूर्य मावळत नाही असे साम्राज्य भोगण्याचा जर्मनीला का अधिकार असू नये ? " असा प्रश्न केला; हिंदुस्थान स्वतंत्र व्हावा म्हणून " प्राणादपि धनादपि " अशा निकरावर येऊन गुप्तचर झालेले काही हिंदुस्थानचे बेफाम तरुण आपापल्या संघटना उभारून परदेशांशी संधाने बांधण्याचा प्रयत्न करीत होते; या सर्व घटनांची संकलित परिणती मानव्याला हादरे देणाऱ्या स्वरूपात होईल अशी बातमी ब्रिटिश चारचक्षूंनी मिळवल्यामुळेच इंग्लंडचे सरकार बिचकले, म्हणून हिंदुस्थानचेही सरकार बिचकून अर्थसचिव " भयकृत "च्या कल्पनेने चाचपडू लागले होते की काय ? प्रसंगच उद्भवला तर बादशहाचा प्रतिनिधी शत्रुहल्ल्यापासून सुखरूप असावा म्हणून राजधानी दिल्लीस आणली व रंगरूटभरती सोपी व्हावी म्हणून वंगभंग रद्द झाला ही " किं-वदन्ती " खरी की खोटी, हे तो दूरदृष्टीचा मुत्सद्दी अकाली कसे काय सांगणार ?

" ना. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या हातून वरिष्ठ विधिमंडळातील काम इतक्या उत्कृष्ट रीतीने झाले याचे एक कारण त्यांची बुद्धिमत्ता हे तर आहेच; परंतु त्यांचे लक्ष जगाच्या बहुमतापेक्षा कर्तव्याकडे होते. हे कारण पहिल्याहून अधिक महत्त्वाचे आहे. विधिमंडळात जाणे म्हणजे केवळ सरकारची मर्जी आपणावर बसावी यासाठी जावयाचे अशी त्यांची बुद्धी नव्हती. " असा अभिप्राय केसरीने व्यक्त केला आहे. देशाची तरफदारी करणाऱ्यांना सर्व खडान खडा माहिती असली पाहिजे असे ना. गोखले मानीत. ना. जगन्नाथ शंकरशेटनंतर हिंदी वरिष्ठ विधिमंडळात आणीबाणीच्या प्रसंगी व राजकीय अस्वस्थेमुळे क्षुब्ध झालेल्या वातावरणात कायद्याच्या प्रतिगामी स्वरूपाला आळा घालण्याचे काम ना. गोखल्यांनी केले. ज्यांच्यावर लोकांनी मदार ठेवू नये अशा अर्थाने ना–मदार गोपाळ कृष्ण गोखले नव्हते; पण नावापुरते म्हणजे कीर्ती वा प्रसिद्धी होण्यापुरतेच विधिमंडळातील जागेचे धनी, या अर्थानेही ते नाम-दार नव्हते. तर बहुजनसमाजाच्या जीवनाचा सूक्ष्म अभ्यास करून त्याच्या अव्वल हिताच्याच प्रगतीसाठी आपल्या ' अकलेचा पवाड ' गोपाळ कृष्णांनी विधिमंडळातून व विधिमंडळाबाहेर एवढा घातला की, आखीव, रेखीव, कापीव आणि आदबशीर शब्दांनी गोपाळ कृष्ण गोखल्यांनी जनतेची आणि भारताची मांडलेली बाजू परकीय सत्तेला कडू कोयनेलासारखी मुकाट्याने गिळावीच लागे. शास्त्रीय पुस्तकी पांडित्याला जनतेच्या प्रत्यक्ष सुखदुःखांच्या छाननीची जोड दिल्याशिवाय विशाल

आमजनतेचे नि हिंदुस्थानच्या जागतिक प्रतिष्ठेचे खऱ्याखुऱ्या अर्थाने प्रतिनिधी कोणाही देशभक्तास होता यावयाचे नाही, असाच ना. गोखल्यांच्या मनाचा पिंड असल्याकारणाने, त्यांनी धीम्या धोरणाच्या मुत्सद्देगिरीने आपले व भारताचे जगात नाव केले. पारतंत्र्यातही हिंदुस्थान आपली नाम-प्रतिष्ठा प्राणपणाने जपतो हे गोखल्यांनी सिद्ध केल्यामुळेच भारताचे नामंदार म्हणजे नामदार गोपाळ कृष्ण गोखले हे समीकरण रूढ होऊन बसले. लॉर्ड कर्झन यांनी नामदारांच्या १९१५ तील मृत्यूनंतर असे उद्‌गार काढले की, " जगातील कोणत्याही प्रातिनिधिक संस्थेस ना. गोपाळराव गोखले ललामभूत झाले असते. इंग्लंडच्या हाऊस ऑफ कॉमन्स-मध्येही त्यांनी उच्च प्रतीचा गौरव मिळवला असता. "

१६ : न्या. रानडे स्मारक

ना. गोपाळ कृष्ण गोखले यांचे विधिमंडळातील संपूर्ण तेजस्वी कतृत्व पहावयास त्यांचे आध्यात्मिक आणि राजकारणी गुरू न्या. रानडे हयात नव्हते. मुंबई विधिमंडळातील गोखल्यांची कामगिरी तेजस्वीपणे चालल्याचे त्यांनी पाहिले–ऐकले होते; पण विसाव्या शतकाला सुरुवात होऊन एक पंधरवडा लोटताच ता. १६ जानेवारी १९०१ रोजी त्यांना देवाघरचे बोलावणे आले. " रावसाहेबांच्या मृत्यूपासून एखाद्याच्या सर्वच जीवनावर सगळीकडून अंधार पसरावा तसे मला झाले आहे; आणि नवनवे सन्मान (सिटिझन् ऑफ दि इंडियन् एम्पायर C. I. E. सारखे) जरी मजकडे चालून येत असले, तरी त्यांनी माझ्या मनाला समाधान होत नाही; सुख तर नाहीच नाही. ज्या वेळी अभिनंदनांचे वर्षाव मजवर मित्रमंडळी करतात, तेव्हा जिव्हाळ्याच्या माणसाच्या स्मशानयात्रेहून परतलेल्या माणसाला मेजवानीचा आग्रह चालल्यासारखे मला भासते. अर्थात आपल्याला होणारी केवढीही न आवरणारी दुःखे अलग राखूनच अंगीकृत कर्तव्ये पार पाडलीच पाहिजेत. कर्तृत्वांचे आधारस्तंभ गेल्यामुळे, ते कर्तव्यपालन कितीही दुबळेपणाने होत राहिले तरी ते धीमेपणाने, निष्ठेने पुढे रेटलेच पाहिजे." ना. गोखल्यांच्या या उद्गारांत प्रतिबिंबित झाल्याप्रमाणे न्या. रानड्यांचा वारसा चालविणे सर्वांशी गोखल्यांच्या अंगावर पडले होते. रानडे वारल्याने देशभरच अंधार पडल्यासारखे झाले होते. देशातील सर्व कर्त्या माणसांना देशाच्या कामी, शक्य तर एकसूत्री गुंफून, त्यांच्या कर्तृत्वाचा फुलोरा देशाच्या उन्नतीच्या चरणी लावावयाचा, परिस्थितीचा पूर्ण विचार करून लोकांचे पाऊल भलत्या दिशेला पडू नये आणि कार्यकर्त्यांच्या सहकार–समन्वयाने जी काही राष्ट्राची एकजिनसी प्रगती निश्चित होईल, ती चढत्या वाढत्या पदवीने होते आहे, यावर लक्ष ठेवावयाचे आणि आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेमुळे सगळ्या हिंदुस्थानचे पुढारीपण करावयाचे–या व्रताची आपली गुरुमाउली आपणास सोडून जाताच त्या जगाचे रूपच पालटल्यासारखे गोपाळरावांस होऊन गेले. सूर्य मावळला, आणि त्यावर लावलेल्या दिव्यावर गुजराण करण्याची वेळ आली ! ! तरीही त्यांच्या कानांत तीच गुरुवाणी सांगत होती की, " कामाचे डोंगर पडले आहेत, खोरीकुदळी घेऊन कामास लागा.

अहर्निश देशकार्याचा ध्यास घेणारी खरी निष्ठावंत माणसे हवीत.'' त्यामुळेच डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नौकरीनंतर स्वतंत्रपणे देशकार्याला स्वतःस पूर्ण वाहून घेण्याचे गोखल्यांनी ठरविले, त्याकडेच आता गोपाळरावजी वळले.

रावसाहेब रानड्यांच्या उद्योगाचे स्वरूप सर्वव्यापी होते, तरी हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीसंबंधाने त्यांना विशेष काळजी वाटे. अर्थशास्त्राची तत्त्वे हिंदुस्थानास लागू करताना उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांचा सशास्त्र अभ्यास करण्याची, इंग्लंडास मान्य होणारे कित्येक अर्थशास्त्रसिद्धान्त हिंदुस्थानास का लागू पडणार नाहीत हे सिद्ध करण्याची आणि हिंदुस्थानसरकारच्या सांपत्तिक धोरणाचे त्या दृष्टीने परीक्षण करण्याची त्यांना मोठी आवड होती. रावसाहेबांचे स्मारक म्हणून पुणे येथे '' रानडे एकॉनॉमिक इन्स्टिट्यूट '' स्थापन करण्यासाठी गोपाळराव गोखल्यांनी एक लाख रुपये उभारण्याचे १९०५ साली ठरविले, ते त्या दृष्टीने योग्यच होते.

ती स्मारकसंस्था दुहेरी स्वरूपाची होती. तीत हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीचा व तदनुषंगिक इतर विषयांचा अभ्यास करण्यास साधने मिळावीत असा एक उद्देश होता. हे त्या संस्थेचे शैक्षणिक रूप होय. व्यवहाराच्या दृष्टीने, हिंदुस्थानची सांपत्तिक प्रगती होण्यास ज्या शोधांची मदत होईल असे शोध लावण्यास व प्रयोग करण्यास सापडावे म्हणून जोडलेली प्रयोगशाळा हे तिचे दुसरे स्वरूप. ' रानडे एकॉनामिक इन्स्टिट्यूट ' सन १९१० साली साकार झाली आणि पुढे काळाच्या ओघात पुणे विद्यापीठ स्थापन झाल्यावर त्याने ती आपल्या संपूर्ण अखत्यारात घेतली.

न्यायमूर्ती रानड्यांचे दुसरे एक वाङ्मयस्मारक स्वतः त्यांचे जीवनचरित्र लिहून उभारावे अशी नामदार गोपाळराव गोखल्यांची तीव्र इच्छा होती. न्यायमूर्तींच्या गृहलक्ष्मी श्री. रमाबाई रानडे यांनी भक्तिभावाने '' आमच्या आयुष्यातील आठवणी '' हे आत्मवृत्त लिहून काढल्यावर त्याला ना. गोखल्यांनी प्रस्तावना लिहिली आणि मद्रास वगैरे ठिकाणी रानड्यांची स्मारके उभारली गेली, त्यांची उद्घाटनेही गोपाळराव गोखल्यांनी रानड्यांचे गुणगान करून व जीवनरहस्य सांगून केली. पण वरिष्ठ विधिमंडळात प्रवेश केल्यापासून, देशकार्याचा लकडा जो गोखल्यांच्या पाठीमागे लागला व जो त्यांनी जबाबदारीच्या कर्तव्य-बुद्धीने लावून घेतला, त्यातून त्यांना न्या. रानड्यांचे चरित्र लिहिण्याइतके स्वास्थ्य शेवटपर्यंत सापडले नाही, हे खरे ! कीर्ति-प्रवचनापेक्षा कर्मयोगी आचरणाने शिष्याकरवीची पूजा गुरूंच्या आत्म्यालाही अधिक पसंत पडली असेल ! पण गोपाळराव गोखल्यांच्या लेखणीतून साकार होणाऱ्या रानडे-चरित्राच्या प्रत्यय-बोधाला मराठी-इंग्रजी भाषा आणि रानडे-गोखल्यांच्या मागील पिढ्या मुकल्या हेही काही खोटे नाही.

☒ ☒ ☒

१७ : भारत-सेवक-समाजाची स्थापना

रानडे चरित्राची देणगी आपल्या मागील पिढ्यांस देणे ना. गोपाळराव गोखल्यांना जमले नाही तरी स्वतः गोखल्यातील गोखलेपण प्रत्ययाला आणून देणारी जी महान् देणगी गोपाळराव गोखल्यांनी हिंदुस्थानच्या स्वाधीन केली आहे, ती म्हणजे १९०५ च्या १२ जूनला त्यांनी केलेली आपल्या "भारत-सेवक-समाजाची" संस्थापना होय. "भूतमात्रांचे ठायीं । आपपर नेणोचि कांहीं ॥" अशा वृत्तीने "जो खांडावया घाव घाली । की लावणी जयानें केली । दोघा एकाचि सावली । वृक्ष दे जैसा॥" तसे वागून देवसेवा आणि लोकोपकार करण्याची भारतीय परंपरा व त्यासाठी मठा–आश्रमांच्या स्थापना–संचालना हजारो वर्षे हिंदुस्थानात होत असल्या तरी आधुनिक अर्थाने लोकसेवा आणि तिच्यासाठी संस्था-संगोपन आपल्याकडे फारसे घडत नव्हते. सगळ्या राष्ट्राच्या कल्याणाचा सूक्ष्मपणे एकजिनसी विचार करून "उदंड समुदाय करावे । युक्तिबुद्धिनें भरावे ॥" व "बहुत जनास चाळवी । नाना मंडळें हालवी ॥" असा समर्थ पुढारी होऊन देशाच्या राजकारणापासून तो जीवनाच्या सर्व अंगोपांगांत तेज भरीत रहावे, असा व्याप, आटोप, खटाटोप समर्थ रामदासांनी आपल्या काळी केला. "पुढीलांस" तो सांगून ठेवला हे खरे; पण त्यांच्या समकालीन शिष्यांनी जसा तो केला अगर त्यांच्यामागे ब्रह्मेंद्रस्वामींनी पहिल्या बाजीरावाच्या कारकीर्दीअखेर जसा तो गिरवला, तसा सातत्याने तो या राष्ट्रात घर धरून राहिलेला आढळला नाही. पण ब्रिटिशांची राजवट येथे सुरू झाल्यानंतर बरीक, राष्ट्राचे ऐहिक जीवन समृद्ध करण्याकरिता आपले जीवनही सेवाव्रताने बरबाद करून घेण्यासाठी लोक स्फूर्ती घेऊ लागले आणि जगाच्या जीवनप्रवाहात आपले राष्ट्र मागे पडू नये म्हणून, त्याच्या सेवेसाठी सेवावृत्तींच्या संस्था संघटित करण्याकडे हिंदुस्थानातील विचारवंत दक्षतेने लक्ष पुरवू लागले.

न्यायमूर्ती रानड्यांच्या एक वेळच्या शब्दांनी आणि 'येशूचे सेवक' या संस्थेचा वृत्तान्त वाचून ज्या विचाराचा उदय गोपाळराव गोखल्यांच्या चित्तात झाला होता, त्याला मूर्तस्वरूप देऊन गोपाळराव गोखल्यांनी भारत-सेवक-समाजाची–सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीची–स्थापना केली, त्याच्या पायाचा दगड

न्या. रानडे यांचे स्नेही आणि पुणे सार्वजनिक सभेतील स्वतः गोखल्यांचे " वडीलपण धरून " झालेले सहकारी, आबासाहेब साठे यांच्या हस्ते बसवून त्याच्या संवर्धनाचा भार स्वतः गोखल्यांनी आपल्या अंगावर घेतला तो १२ जून १९०५ रोजी ! फर्ग्युसन कॉलेजच्या जवळील टेकडीवर उगवल्या सूर्याला साक्षी ठेवून दशदिशांच्या देखत प्रथम स्वतः गोपाळराव गोखल्यांनी भारतसेवाव्रताचा शपथविधी केला आणि मग तीच भारतसेवाव्रताची शपथ त्यांनी आपल्या मागोमाग श्री. नटेश अप्पाजी द्रविड, गोपाळ कृष्ण देवधर व अनंत विनायक तथा वामनराव पटवर्धन यांस दिली. आपले सर्व आयुष्य भारतभूमी-(हिंदुस्थान)-च्या सेवेस अर्पण करण्याची ती शपथ होती. आज या संस्थेत हिंदुस्थानच्या राजकीय, सांपत्तिक, सामाजिक स्थितीसंबंधीच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी एक मोठे ग्रंथालय आहे. भारतसेवेची ती खरी शाळा आहे. गोपाळराव गोखले दर पावसाळ्यात नवीन होतकरू सेवकास तेथे जमवून इष्ट कार्याचे वळण घालून देत असत. काँग्रेसची स्थापना होण्यापूर्वी बंगाली तरुणास उद्देशून ह्यूमसाहेबांनी काढलेल्या पत्रकाप्रमाणेच भारत-सेवक-समाजाचे ध्येय बहुतांशाने होते असे फिरोजशहा मेहतांचे चरित्रकार सर होमी मोदी सांगतात. ब्रिटिश–साम्राज्यान्तर्गत वसाहतीचा दर्जा हिंदुस्थानास शक्य तेवढ्या ताबडतोब प्राप्त करून देणे, त्यासाठी अविश्रांत श्रम व देशाची संघटना करणे, संकटे व मोह टाळून आपले कर्तव्य करीत राहणे, या सर्व गोष्टींची जाणीव जनतेस देण्याकरिता ऐहिक– सर्वसंगपरित्याग करून देशप्रेमाने जीवन व्यतीत करणाऱ्या " राजकारणी संन्याशांची " संस्था म्हणजे भारत-सेवकसमाज.

(१) आपल्या स्वतःच्या उदाहरणाने लोकांत खरीखुरी देशभक्ती उत्पन्न करणे आणि तदर्थ त्यांस स्वार्थत्याग करण्यास शिकविणे. (२) लोकांस राजकीय शिक्षण देणे आणि समाजात चळवळ करणे व लोकमत तयार करणे. (३) निरनिराळ्या धर्म-जातिजमातींतील विरोध काढून टाकून तेथे सलोखा व प्रेमभावना निर्माण करणे. (४) मागासलेल्या मंडळींत शिक्षणाचा फैलाव करणे, विशेषतः औद्योगिक व धंदेशिक्षणासंबंधी जास्त सुसंघटित प्रयत्न करणे. (५) पूर्वास्पृश्यांचा सर्वतोपरी सुधारणा करणे– या पाच उद्देशांनी विद्यार्थी, साधारणसभासद आणि प्रमुख, त्याचप्रमाणे संलग्नसभासद यांनी निष्काम कर्मयोगी होऊन देशसेवा करीत रहावयाचे ! प्रत्येक विद्यार्थ्यास पाच वर्षे शिक्षण मिळावयाचे; तीन सभासदांच्या सल्लागारमंडळाच्या सहकाराने प्रमुख (सभासद प्रमुख) संस्थेचे सर्व नियम व नियमन करणार; त्याच मंडळाच्या शिफारशीने कोणालाही सभासद होता येईल मात्र त्याने शपथ घ्यावयाची ती—

(अ) माझ्या डोळ्यापुढे सदैव देशाच्या कल्याणाची गोष्ट प्रथम राहील,

मजमध्ये जे काही उत्कट, भव्य आहे ते सर्व मी आपल्या देशाच्या सेवेस अर्पण करीन.

(आ) देशाची सेवा करताना स्वार्थ-लोलुपता मनाला येऊ येणार नाही.

(इ) सर्व हिंदी लोकांस मी भाऊ समजेन व सर्वांच्या उन्नतीसाठी पंथ, जाती वगैरे बाजूस ठेवून मी प्रयत्न करीन.

(ई) माझ्या किंवा माझ्या कुटुंबाच्यासाठी भारत-सेवक-समाज जे काही देईल त्यातच मी आनंद मानीन. स्वतःसाठी त्याहून अधिक पैसा मिळवण्याच्या भरीस मी पडणार नाही.

(उ) मी आपले वैयक्तिक आचरण पवित्रच पवित्र ठेवीन.

(ऊ) मी कोणाबरोबर खाजगी, व्यक्तिगत भांडणे भांडणार नाही.

(ऋ) भारत-सेवक-समाजाचे ध्येय मी सदोदित डोळ्यासमोर ठेवीन. शक्य तितक्या कळकळीने व उत्कटतेने मी समाजाच्या अभिवृद्धयर्थ प्रयत्न करीन. समाजाच्या ध्येयाला प्रतिकूल असे मी काहीसुद्धा करणार नाही.

अशा शपथबद्ध सभासदांच्या संघटनेची व तिच्याकडून निरलसपणे होणाऱ्या विधायक, शिस्तबद्ध आणि शास्त्रशुद्ध सेवाकार्याची गोपाळराव गोखल्यांना जवळ-जवळ गेले दशकभर आवश्यकता जाणवत होती. कारण, हिंदुस्थानच्या सार्वजनिक उभारीत १८९३ पासून जी नवजीवनाची आणि नवीन नवीन कृतिप्रणालींची उकळी सारखी फुटत होती, तिचे ध्येय हिंदुस्थानची प्रतिष्ठापूर्वक उन्नती हे एकच असले, तरी तिच्या साध्यासाठी देशात चार सरळ सरळ राजकीय पंथप्रणाल्या निर्माणच झाल्या होत्या त्या अशा :

(१) प्रस्तुतच्या हीन स्थितीचे परकी सत्ता हेच सर्वस्वी कारण असून स्वातंत्र्याखेरीज आपले दैन्य नाहीसे होण्यास दुसरे कोणतेही साधन नाही. हिंदुस्थानच्या तेहत्तीस कोटी लोकांपैकी प्रत्येक मनुष्याने आपापल्यापरी उद्योग केल्यास मूठभर राज्यकर्त्यांचा पाड तो काय ? स्वार्थत्यागाच्या फुलबागेतील वेचक कर्तृत्वाच्या फुलांचा हार तयार झाला की, स्वातंत्र्यदेवीची भारताच्या मंदिरातील सिंहासनावर प्रतिष्ठापना व्हावयास विलंब नाही. "साधना-नामनेकता" या नात्याने वाटेल त्या मार्गांनी आपली जीवघेणी परसत्ता उलथून पाडलीच पाहिजे. त्यासाठी गुप्तमंडळ्या, राजकीय खून, बॉम्ब यांचाही वापर करावयास हरकत नाही. या मताच्या लोकांना सत्ताविध्वंसक, अराजक, अनार्किस्ट, अत्याचारी अशी नावे मिळाली होती.

(२) दुसरा वर्ग क्रांतिकारकांचा. पहिल्या वर्गाचे हे गुरू वा ब्रह्मदेव. आपल्या अंगच्या विद्वत्तेच्या जोरावर, धूर्ततेने वागून, पहिल्या वर्गासारखे

ब्रिटिश रियासतीचे उघड शत्रुत्व हा वर्ग पतकरीत नव्हता. आपल्या भाषणांनी आणि लेखांनी तरुण उत्साही आणि भावनाप्रवाही पिढीवर उपदेशाने, व्यंजनेने, लक्षणेने, सादृश्याने, अनुमानाने, स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी जीवाच्या करारावर वा जीवाची कुरवंडी करून प्रयत्न करण्याचे महत्त्व, निकड आणि सामर्थ्यसंपन्नतेची साधने यांचा ठसा हा वर्ग उमटवीत असे. गंभीर आणि तात्त्विक विचारांचा पेहराव, पहारा आणि फेर त्याच्या शिकवणीत सदैव आढळावयाचा. हिंदुस्थानात प्रचलित असलेले सरकार आणि त्याशी संलग्न असणाऱ्या संस्था व व्यक्ती यांच्यावरील बहिष्कारापासून सर्व जालीम अशा उपायांचा पुरस्कार, परकीयांकडून स्वकीयांकडे द्रुततम सत्तान्तर होण्यासाठी, हा वर्ग वेळी-अवेळीसुद्धा करीत असे.

(३) तिसरा वर्ग असंतोषवाद्यांचा. स्वराज्य म्हणजे निर्भेळ स्वातंत्र्य प्राप्त झाल्याखेरीज देशाचे पाऊल कोणत्याही तऱ्हेने पुढे पडणारच नाही, असे याचे मत असे. पहिल्या दोन वर्गांपेक्षा हा वर्ग अधिक व्यवहारवादी. परकीय सत्तेशी जीवनव्यवहारासाठी प्रजेला अपरिहार्य तेवढा सगळा सहकार करावाच लागतो; तेव्हा तेवढाच काय तो करावा; बाकी सर्व ठिकाणी, ज्याला जितका जमेल त्याने तितका परकीय सत्तेला विरोधच विरोध प्रगट करावा, अशी या वर्गाची विचारसरणी. पहिल्या दोन वर्गाप्रमाणेच पण स्वतःचा आटोप सांभाळून परकीय सत्तेच्या तिरस्काराने, धिक्काराने आणि निदान नाखुषीच्या संदर्भाने सर्व व्यवहार चालविले पाहिजेत, असा या वर्गाचा कटाक्ष. परकीय सत्तेमुळे लोकांचा पदोपदी तेजोभंग होतो. तेव्हा राजकीय उन्नतीशिवाय औद्योगिक, सामाजिक व नैतिक उन्नती होणे शक्य नाही असा त्याचा ठाम सिद्धान्त. स्वावलंबन शक्य नसेलच तर मग परावलंबनाचा प्रतिकार आणि परावलंबन सुलभ किफायतीचा बहिष्कार ही या वर्गाची साधना. प्लेग, दुष्काळादि सार्वजनिक आपत्काली देखील ही साधना ढळता कामा नये, असा या वर्गाचा कडक दंडक !

(४) या तीन वर्गांशिवाय आणखी एक जो वर्ग होता तो हिंदुस्थान देशाची हीनदीन स्थिती गेली– घालविलीच पाहिजे, असेच मानणारा होता. त्यासाठी परकीय सत्ता गेली पाहिजे, पण ती जावयासाठी करावयाच्या प्रयत्नात, अगर प्रयत्नांती प्रतिष्ठित होणारी स्वकीय सत्ता सबल, शहाणी, शीलसंपन्न असली तरच ती टिकाव धरील, म्हणून ज्या कारणाने पारतंत्र्य आले त्याचे निर्मूलन होईल असे जनतेला शिक्षण देण्यात, समवायाने संघशक्ती निर्माण करीत करीत, परकीय सत्तेला " लोक राजी राखण्याचे सोंग " तरी करणे भाग असते, ते सजविण्याच्या (परसत्तेच्या) धडपडीत, स्वकीयांची सत्ता स्थापित व्हावी अशा अनुकूलतेचा, आपले ध्येयावर नजर देऊन, फायदा

उठविण्यास चुकू नये असे या वर्गाचे सरळ सरळ म्हणणे होते. जगाच्या नवीन जमान्यात, परकीय सत्ता गेल्यावरची नवी स्वदेशी राजवट लोकसंमत लोकशाहीचीच होणे अपरिहार्य असल्याकारणाने, समवायाने संघशक्ती वाढविण्यास अवसर मिळावा– मिळवावा म्हणून परकीय सत्तेचे नर्मसचित्व न करताच, तिच्या चुका तिच्या गळ्यात बांधून, तिला लोकानुकूल करीत जावे व प्रगतीची धीमी पावले खंबीरपणे दिवसेदिवस ठाम करीत असावे. असा विकास साधावा की, जागतिक घडामोडीत परकीय सत्तेने येथील आपला गाशा गुंडाळताच, भारतीयांना आपल्या देशाचा कारभार आपली छाप जगावर ठेवून खंबीरपणे करता यावा.

या चौथ्या वर्गाच्या प्रथाप्रणाली चालविणारे असे राजकारण प्रभावीपणाने करण्यासाठी व त्या द्वारा देशसेवा करण्यासाठी, भारतसेवक समाजाची गोखल्यांनी स्थापना करून पोटच्या पोरापेक्षाही गोपाळराव गोखल्यांनी त्या संस्थेला प्रिय मानले आणि तिला चालती, बोलती, कर्ती करून जणू स्वतःच स्वतःचे स्मारक करून ठेवले. आपले सर्व विवेकशुद्ध जीवन ओतून ना. गोपाळराव गोखल्यांनी सार्वजनिक जीवनाच्या व्यावहारिक अध्यात्मीकरणाचा एक आदर्श विष्णुबुवा ब्रह्मचाऱ्या–(१८२५–७१)-प्रमाणे निर्माण करून ठेविला. इंग्लंडमधील एका गरीब बाईच्या एका गिनीपासून भारतातील सर्व प्रांतीय समंजस धनिकांकडून गोपाळराव गोखले दरसाल त्या संस्थेसाठी निधी आणीत. आपल्या हयातीच्या शेवटच्या दहा वर्षांत आणि संस्थेच्या पहिल्या दशकात चोवीस सभासदांना दीक्षा देऊन त्यांना आंतरराष्ट्रीय राजकारणात व संघटनांत नावारूपाने विधायक कार्य करण्याची पात्रता गोपाळराव गोखल्यांनी प्राप्त करून दिली होती.

भारत-सेवक-समाजाच्या कार्यास गोपाळराव गोखल्यांच्या स्नेहल चाहत्यांनी सढळ हाताने मदत केली. म्हणूनच सुमारे तीन लाख रुपये खर्चून समाजासाठी इमारती, सभासदांना राहण्याच्या जागा, ग्रंथसंग्रह, छापखाना व वृत्तपत्रे एवढी साधने अस्तित्वात आली. भारत-सेवक-समाजाचा पात्रतासिद्ध सभासद होणारा गृहस्थ सामान्यपणे पदवीधर तरी असावा लागतोच. शिवाय त्यास देशहितासाठी झटण्याची तळमळ आणि स्वार्थत्यागाची ऊर्मी लागते. एखाद्या विशिष्ट जीवन-शाखेचा अभ्यास तितिक्षा व तपस्या करून आपल्या निष्काम–कर्मयोगाने लोकसेवा त्या सभासदास बजावावयाची असते. त्याच्या जीवनात देशभक्ती व धर्मश्रद्धा एकजीव होऊन बसल्या पाहिजेत. ना. गोखल्यांच्याच शब्दांत सांगावयाचे तर– " एखादे धर्मकृत्य करावयाचे झाल्यास ज्या चैतन्याने माणसे त्या कामास पुढे सरसावतात, त्याच चैतन्याने या ऐहिक देशकार्याच्याही कामी आपल्या देशबांधवांपैकी पुरेशा संख्येने तरुण मंडळींनी पुढे सरसावले पाहिजे ही एक आवश्यक

गोष्ट आहे. सार्वजनिक जीवनाचे अध्यात्मीकरण होणे जरूर आहे. सर्वांची अंतःकरणे देशप्रेमाने इतकी गच्च भरली पाहिजेत की, त्याच्यापुढे बाकी सर्व गोष्टी अगदी तुच्छ तुच्छ भासल्या पाहिजेत. मायभूमीसाठी यज्ञ करावयाची जी जी वेळ येईल, त्या त्या प्रत्येक वेळी आनंदच आनंद मानणारा जिव्हाळ्याचा देशाभिमान, अडचणीने किंवा संकटाने देखील स्वतःच्या ध्येयापासून यत्किंचितही माघार न घेणारे अंतःकरण, ईश्वरी इच्छामात्रावरील असा सखोल विश्वास की जो कशानेही डगमगणार नाही– या अशा गुणांनी सज्ज असणाऱ्या कार्यकर्त्याने आपल्या जीवन-कार्यास आरंभ करून स्वदेशाच्या सेवेत स्वतःला झिजण्यात आनंद मानला पाहिजे."

तात्पर्य, " सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचें । परंतु तेथें परमेश्वराचें । अधिष्ठान पाहिजे ॥ " या समर्थवचनात फार तथ्य आहे. परमेश्वर जसा " आहे तरी सर्वा ठायीं । पाहो जाता कोठेंच नाहीं ॥ " असा आहे, तसेच आपल्या कार्याने सर्वत्र असणारे पण सिद्धीवर नजर ठेवून प्रसिद्धिपराङ्मुख असे कार्यकर्ते उत्पन्न व्हावेत म्हणून भारत-सेवक-समाजाची निर्मिती होती व आहे.

नामदार गोपाळराव गोखल्यांच्या या उदाहरणावरून त्यांचे शिष्य जे महात्मा गांधी यांनीही पुढे आपल्या राजकारण-साधनेत असेच आश्रम काढले. त्याचप्रमाणे पंजाबचे प्रभावी देशभक्त लाला लजपतराय यांनी विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकाचे प्रारंभी लोकसेवक संघ – सर्वंट्स् ऑफ् दि पीपल् सोसायटी – काढला. भारत-सेवक-समाजाची घटना आणि त्या घटनेनुसार आवश्यक ती वर्तननियमावली किंवा आचारसंहिता बनवून गोखल्यांनी ती सर फिरोजशहा मेहता आणि प्रि. सेल्बी यांच्या अभिप्रायार्थ पाठविली होती. एक प्रकारे या महत्त्वाच्या पण व्यक्तिपसंतीच्या गोष्टी बाजूला ठेवल्या तरी भारत-सेवक-समाजाची स्थापना ही एक अपूर्वाईच होती. कारण, भारत-सेवक-समाजाच्या घटक सभासदांनी आदिवासींची सेवा केली आहे; आंतरराष्ट्रीय क्षेत्रातही कामकऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे हाताळले आहेत; नद्यांचे पूर, अन्नांचे दुष्काळ आणि रोगांच्या साथी व धरणीकंप यांनी रंजल्या-गांजल्या जनतेची नम्रपणे जिवापाड सेवा केली आहे; स्त्रियांना शिक्षणाची क्षेत्रे उपलब्ध करून दिली आहेत; गोरगरीबांच्या नित्य जीवनातील आर्थिक विवंचना सहकारी पतपेढ्यांच्या द्वारा दूर केल्या आहेत. ना. श्रीनिवास शास्त्री, ठक्करबाप्पा, नारायण मल्हार जोशी, गोपाळ कृष्ण देवधर, आर. आर. बखले, श्रीधर गणेश वझे, नटेश अप्पाजी द्रविड, वामनराव पटवर्धन, हृदयनाथ कुंझरू, कोंडाप्पा राव, कृष्णाजी गणेश लिमये, ए. डी. मणी ही भारतसेवकांची नावेच अशी आहेत की, त्यांच्या बहुमोल भारतसेवेचे स्मरण होऊन कोणाही विचारवंताची मान आदराने लवलीच पाहिजे.

मुंबई, नागपूर, मद्रास आणि अलाहाबाद येथे भारत-सेवक-समाजाच्या शाखा स्थापन झालेल्या असून सातारच्या रा. ब. रावजी रामचंद्र काळे यांनी पुण्याच्या मुख्य कचेरीतच ना. गोखल्यांच्या पुण्यस्मरणार्थ " गोखले स्कूल ऑफ पॉलिटिक्स अँड एकॉनॉमिक्स " ही संस्था आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ प्रा. धनंजयराव गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाखाली चालू केली. तीही दिगंतकीर्त आहे. " सदा कर्मयोगाचिया रे पदासी । रमा सेविते होउनी नित्य दासी ॥ " असाच या सर्व भारतसेवक योग्यांचा अनुभव आहे.

ना. गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या भारत-सेवक-समाजास जाऊन मिळावे असे महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, राजेंद्र प्रसाद अशा भल्याभल्यांच्या मनात आले यातच भारत-सेवक-समाजाच्या जीवनहेतूचे रहस्य साठविलेले आहे. टिकाऊपणाने सतत राष्ट्रसेवावृत्ती प्रवाहित ठेवणे ही भारताची मोठी गरज गोखल्यांच्या भारत-सेवक-समाजाने ओळखली आणि ती भागवली. भारत-सेवक-समाजाच्या आवश्यकतेसंबंधी गोखल्यांनीच नमूद केले आहे की :

हिंदुस्थानातील राष्ट्रबांधणीच्या कार्याच्या प्रगतीसाठी, त्याच एका कार्याला मिशनरी वृत्तीने वाहून घेणाऱ्या खास दीक्षित मंडळींच्या निष्ठावन्त परीश्रमांची नितान्त आवश्यकता आहे. आतापर्यंत झालेले कार्य हे खरोखरच मौलिक आहे. समसमान परंपरा आणि संबंध, समसमान आशा आणि आकांक्षा, फार काय, समसमान उणीदुणी यांच्या पायावर उभारलेल्या एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेची गेल्या पन्नास वर्षांतील वाढ नवलाचीच म्हणावी लागेल. आम्ही प्रथम भारतीय आहो आणि हिंदू, मुसलमान, पार्शी वा ख्रिस्ती (असे कोणी तरी) मागाहून आहोत ही गोष्ट धीमे धीमे वाढत्या प्रमाणात प्रत्ययाला येत आहे; आणि जगाच्या राष्ट्रांत आपल्या महान भूतकाळाला साजेशा प्रतिष्ठेप्रत पोहोचू पाहणाऱ्या (संयुक्त व पुनर्जागृत अशा) हिंदुस्थानची कल्पना हे आता मूठभर कल्पक मनांचे केवळ एक वृथा स्वप्न राहिलेले नाही, तर उलट, ते (आता) समाजाचे मानले जावे अशा सुशिक्षित वर्गाचे – निश्चितपणे अंगीकारलेले ब्रीद आहे. शिक्षण (प्रसार) व स्थानिक स्वराज्य (संस्था) यांच्याबाबत शुभंकर प्रारंभ होऊन चुकला आहे; आणि उदारमतवादी कल्पनांच्या कक्षेत धीरेधीरे पण निश्चितपणे लोकातील सर्व थर येऊ लागले आहेत. सार्वजनिक जीवनाचे मोहरे दिवसेंदिवस विस्तृत होऊन मान्यता पावत आहेत. राष्ट्रीय सभांच्या आणि परिषदांच्या वार्षिक बैठकी, सार्वजनिक संस्थांचे व सभांचे कार्य, भारतीय वृत्तपत्रांच्या रकान्यांतील लेखने,—ही सर्व लोकांच्या नसानसांतून वाहणाऱ्या नवजीवनाची साक्ष देत आहेत. आतापर्यंत झालेली परिणती निःसंशय समाधानकारक आहे. पण त्याचा अर्थ एवढाच आहे की, जंगल साफसूफ झाले आहे, पाया बसला आहे. वरची इमारत उभाण्याचे महान कार्य अजून हाती घ्यावयाचे आहे. त्या

दिव्याच्या महतीला शोभेशा प्रमाणात प्रत्येक कार्यकर्ता त्यागास प्रवृत्त झाला आहे. जणू काही परिस्थितीची तीच एक भूक बनली आहे.

परिस्थितीच्या गरजा, जबाबदाऱ्या काही प्रमाणात पुऱ्या करण्याकरिता, पार पाडण्याकरिता भारत-सेवक-समाजाची स्थापना आहे. देशाचे कल्याण मनाशी धरूनच भारत-सेवक-समाजाचे सभासद ब्रिटिश-संबंधाला नियतीची गूढ लीला मानतात. आपल्या देशाला ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य मिळावे, आपल्या देशबांधवांना सर्वत्र उच्चतर जीवन लाभावे हे त्यांचे ध्येय आहे. हे ध्येय, त्याकारणी साजेशा त्यागवृत्तीशिवाय व वर्षानुवर्षे कळकळीने व धीमेपणाने केलेल्या प्रयत्नाशिवाय साध्य होणारे नाही, हे ते जाणतात. आता, सर्वसाधारणपणे आढळते त्यापेक्षा उच्च दर्जाचे शील आणि कर्तृत्व यांची निर्मिती व्हावी म्हणून अवश्य तो कर्मयोग आचरावाच लागणार. प्रगतिही प्रथम आस्ते कदमच होणार. भरीला मार्ग मोठ्या अडीअडचणींनी भरलेला आहे, परत फिरावे म्हणून अनेकदा मोह होईल, कार्याला हात घालणारांच्या निष्ठा कडवट निराशांनी वरचेवर कसाला लागतील, पण जर का कार्यकर्ते आपल्या वाटेने जाताना दुबळ्या छातीचे ठरले नाहीत, तर त्या साऱ्या दमचक्कीच्या परिश्रमांची परिणती यश ही एकच एक आहे. या कार्यातील यशाची एक एक नस म्हणजे धर्मकार्य ज्या वृत्तीने हाती घेण्यात येते त्याच वृत्तीनें या कार्याला वाहून घेण्यासाठी आमच्या देशबांधवांपैकी जरूर तेवढे संख्याबळ पुढे सरसावले पाहिजे. त्यांनी सार्वजनिक जीवनाला अध्यात्माची जोड दिलीच पाहिजे.

१८ इंग्लंडात शिष्टाई

पुण्यातील प्लेगव्यवस्थेतील सरकारी अत्याचारांबद्दल आपल्या मित्रांच्या पत्रांवरून केलेली विधाने पुराव्याच्या अभावी गोखल्यांना सिद्ध न करता आल्याने, त्यांनी जी जाहीर माफी मागितली तिने त्यांना "लोक हा ओक धरिता धरवेना।" असाच अनुभव आला. काँग्रेसमध्ये १८८९ पासून त्यांची जी काही चढतीवाढती पदवी होती तिची बैठकच जणू ढासळली! १८९७ च्या अमरावती काँग्रेसच्या व्यासपीठावर तर त्यांना कोणी घेतले नाहीच; पण त्यांच्याकडे एखादा ठराव मांडण्याचे वा ठरावावर बोलण्याचेही आले नाही. आपल्यावाचून काही काँग्रेसचे नडत नाही याचीही खूणगाठ गोखल्यांनी आपल्या मनाशी बांधून ठेवलीच होती. सुमारे अर्धे तप त्यांना या "उभ्या-उभ्या वाट पहा आणि त्यातच सेवाभावी रहा" अशा अवस्थेत काढावी लागली. तथापि, प्रत्येक वर्षी काँग्रेसची विषय-नियामक समिती त्यांचा सल्ला घेतच असे.

सन १९०४ मध्ये लॉर्ड कर्झन यांनी बंगालची फाळणी करावयाचे ठरविल्यावर काँग्रेसश्रेष्ठींना आपोआपच ना. गोखल्यांकडे लक्ष द्यावेसे वाटले. हिंदुस्थानातील आणि इंग्लंडातील सरकारकडे जर कोणाचे हात पोचण्यासारखे असतील तर ते ना. गोपाळ कृष्ण गोखल्यांचेच आहेत, हे गोखल्यांच्या वरिष्ठ विधिमंडळातील कामगिरीवरून सर्वच काँग्रेसश्रेष्ठींना पटले आणि कर्झन करीत असलेला अन्याय हाणून पाडता आला नाही तरी त्यातून ओढवणाऱ्या जाचक अनर्थपरंपरा कमीत कमी तापदायक करणे, एवढे तरी नामदार गोखल्यांच्या वजनाने साधता येईल, असा विचार काँग्रेसश्रेष्ठींमधे उत्पन्न झाला होता. हा नेमस्ताग्रणींतील होतकरू वजनदार पुढारी असा बाजूला टाकला, तर आपलीच शक्ती त्या प्रमाणात कमी होत असल्याचा अनुभव सर फिरोजशहा प्रभृतींनाही आला असावा. म्हणून १९०४ च्या जुलै महिन्यात ना. गोपाळ कृष्ण गोखल्यांना काँग्रेसचे दुय्यम चिटणीस या स्थानावर घेऊन त्या साली होणाऱ्या काँग्रेस-अधिवेशनाचे "सूत उवाच" करावयास त्यांना धाडण्यात आले.

मुंबई विधिमंडळात दुष्काळग्रस्त लोकांची गोपाळराव गोखल्यांनी सांगितलेली कहाणी, नगरपालिका-कायद्यासंबंधी त्यांनी तेथे केलेले विवेचन,

वरिष्ठ विधिमंडळात सरकारी–गुपितांच्या कायद्यासंबंधी त्यांनी स्वीकारलेली निषेधपूर्वक विरोधाची भूमिका, विद्यापीठ–कायद्यात लोकपक्षीय सात्त्विक विचार-सरणीचा त्यांनी पाडलेला प्रभाव– यांमुळे हा लोकनेता, लोकांच्या हक्कांचा समर्थक, जेव्हा मद्रासेत गेला, तेव्हा त्याचे मद्रासी मंडळींनी आनंदभराने स्वागत केले. मैलपुरास न्या. रानडे–स्मारकाची इमारत उघडताना गोखल्यांचे झालेले भाषण हृदयस्पर्शीच होते. पुढे त्या सालच्या प्रत्यक्ष काँग्रेस अधिवेशनात ना. गोपाळराव गोखल्यांनी हिंदुस्थान सरकारच्या खजिन्यात सहा वर्षांत जी तीस कोटी रुपये शिल्लक पडली, त्या शिलकेच्या उपयोगासंबंधी असा ठराव मांडला की, निरनिराळ्या शास्त्रांचा सांगोपांग अभ्यास विद्यापीठातून व्हावा म्हणून त्यांना सरकारने नेमस्त देणग्या द्याव्यात. लॉर्ड कर्झन यांना हा ठराव असा झोंबला की, त्यांनी काँग्रेसला ही नसती उठाठेव कोणी सांगितली, अशी टीका तर केलीच, पण गोखल्यांनाही त्यांनी टोला दिला की "विद्यापीठे सरकारच्या ताब्यात द्यावयास काकू करणारांनी आता सरकारी खजिन्यावर का डोळा ठेवावा ? देशातील धनिकांकडे त्यांनी का पाहू नये ?" जणू सरकारी खजिन्यातील पैसा लोकांनी दिलेल्या करातील नव्हेच !! सरकारी तिजोरीत भरमसाठ शिलका उरतात तर कर कमी का करीत नाही ? असा सवाल करून विषयतज्ज्ञतेमुळे आपणास असे विचारण्याचा अधिकार थोडाफार आहेच आहे असे सांगून ना. गोखल्यांनी सरकारास असा फेर सवाल टाकला की, आधीच बेजबाबदारपणे अधिकार गाजविणारे सरकार हातात पैसा खुळखुळू लागताच जास्तच बेजबाबदारपणे वागू लागेल ना ? मद्रासच्या काँग्रेसमध्ये असे भाषण करताना आपल्या विधिमंडळातील ठरावाप्रमाणेच त्या काँग्रेसमधील ठरावाचीही वासलात सरकार लावील याची जाणीव गोपाळराव गोखल्यांस होतीच.

वेल्बीकमिशनपुढील आपल्या बाणेदार साक्षीमुळे आपले अभिनंदन काँग्रेसने करावयाचे ते आपल्या प्लेगसंबंधित माफी प्रकरणामुळे केले नाही, याचे ना. गोखल्यांना जेवढे वाईट वाटत नव्हते, त्याच्या किती तरी पट आपले साक्षीदार दिनशा एदलजी वाच्छा यांचे अभिनंदन विनाकारणच राहून गेले होते याबद्दल गोपाळरावांना वाईट वाटत होते आणि तरीही आपुलकीने काँग्रेसला प्रसंगानुसार सल्ला देण्यात त्यांनी कधीही कुचराई केली नाही. त्यांच्या अशा या तितिक्षेने चालणाऱ्या अखंड सेवावृत्तीमुळे १९०५ सालाने गोपाळराव गोखल्यांवर मागील सर्व वर्षांस मागेच टाकण्याची ईर्षा धरली असे दिसते ! सर दिनशा एदलजी वाच्छा यांच्या-बरोबर ते काँग्रेसचे सेक्रेटरी झालेच. तेव्हा तिकडे इंग्लंडात ब्रिटिश काँग्रेस कमिटी व तिने चालविलेले वर्तमानपत्र इंडिया यांच्या नाड्या १९०५ च्या सुमारास संपुष्टात आल्या होत्या, त्यांना संजीवनीचे घुटके–घोट पाजण्यासाठी हिंदुस्थानात त्या पत्राला वर्गणीदार मिळवून, जमवून देण्याचे काम गोखल्यांनी पत्करले आणि

ती जबाबदारी पार पाडली. इंग्लंडातील जनतेत हिंदुस्थानाबद्दल असलेले अज्ञान दूर करावे आणि हिंदुस्थानातील प्रचलित विषयांची माहिती इंडिया पत्रात छापून तिचा प्रसार पार्लमेंटातील सभासदांमध्ये करणे, सभांच्या व व्याख्यानांच्या द्वारे हिंदुस्थानातील चालू राज्यकारभाराच्या उणीवा ब्रिटिश जनतेस समजावून द्याव्या व ब्रिटिश पार्लमेंटातील उदारमनस्क प्रतिनिधींकडून हिंदुस्थानातील आणि हिंदुस्थानावरील अन्यायाबद्दल मंत्रिमंडळास प्रश्न विचारावे अशी बरीच सेवा ब्रिटिश काँग्रेस कमिटी करीत असे. तिच्या आर्थिक मजबुतीकडे मग दहा वर्षे ना. गोपाळराव गोखल्यांनी लक्ष पुरविले.

मुंबई येथे १९०४ च्या शेवटी काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन भरले असता, सर विल्यम वेडर्नबर्न यांनी असा ठराव मांडला की, हिंदुस्थानच्या प्रांताप्रांतातून प्रतिनिधी निवडून त्यांचे एक शिष्टमंडळ इंग्लंडास पाठवावे. आगामी (१९०५) वर्षात तेथे सार्वत्रिक निवडणुकी व्हावयाच्या असून तेथील लोकमताला हिंदुस्थान-संबंधी जागृती देण्याने, ब्रिटनमधील निवडणुकीवर हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीने परिणाम होईल. सदर ठरावास लो. टिळकांनी पाठिंबा दिला होता. त्या ठरावास अनुसरून ता. ३ मे १९०५ रोजी मुंबईस जाहीर सभा भरून मुंबई इलाख्याच्या तर्फे ना. गोपाळ कृष्ण गोखले यांस विलायतेस पाठविण्याचे ठरले. तेव्हा हिंदुस्थानातील काम बाजूस सारून (१९०५) सप्टेंबरात गोखले विलायतेस गेले. या वेळी बालफर मंत्रिमंडळाची सत्ता इंग्लंडमध्ये संपुष्टात आली होती.

ना. गोपाळराव गोखले यांच्या चरित्रातल्याप्रमाणेच हिंदुस्थानच्या इतिहासातही १९०५ हे वर्ष धांदलीचेच ठरले. पुढे पाच-सहा वर्षे हिंदुस्थानभर जी खळबळ व धुसफूस पसरली, तिचा प्रारंभ याच साली झाला. कर्झनसाहेबांनी करून ठेवलेल्या बंगभंगामुळे, बंगालमध्ये जे जे म्हणून ब्रिटिशकृत व परदेशी, ते बहिष्कृत मानण्याची मनोवृत्ती दृढ झाली. ब्रिटिश सरकार बोलून-चालून परदेशी, स्वतःचा फायदा आणि सत्ता बुडेल अशी गोष्ट ते कशी करतील ? हिंदी लोकांना निःशस्त्र, नेभळे ठेवणे हाच त्यांचा दंडक. 'बळी तो कान पिळी' हाच न्याय ते आचरणार. तेव्हा त्यांच्याजवळ "घाल गे बाई जोगवा" म्हणून जोगवा कसा मिळणार ? रेल्वे, तारायंत्रे, टपाल वगैरे सोयी त्यांनी मूलतः व मुख्यतः स्वतःच्या सुखरूपतेकरिता, सैन्य हवे तेव्हा हवे तेथे नेता यावे म्हणूनच केलेल्या ! असे विचार हळूहळू बंगीयच काय, पण अखिल भारतीय तरुणांच्या मनी दृढावले. त्यामुळे सरकारी यंत्रणेशी तिळ्याने-संघर्षाने वागणे आणि त्यातून होईल ती शिक्षा भोगणे हा एक पराक्रम आहे असे भारतीय तरुणांना वाटू लागले. वारा प्याली-खाल्लेली ती वासरे मग आटोक्यात थोडीच राहतात ? त्यामुळे वडीलधारे पुढारीपण निकामी ठरले. जिकडे तिकडे पुंडावा, निदान असंतोष हाच राष्ट्रीय

दिनक्रम होऊन चुकला. जहांबाज कर्झनशाहीची ही फलिते भारतीय जनसामान्यांच्या व ब्रिटिशांच्या दंडेली राजवटीच्याही अंगावर शेकल्याशिवाय राहिली नाहीत.

भारतीय तरुणांच्या मनी पेटलेल्या प्रक्षोभास दुखंड बंगालचे छोटे शहा सर ब्रूमफील्ड फुल्लर आणि इमर्सन यांच्या दडपशाहीतील खुळेपणाने इन्धन पुरवले. मग संपूर्ण निर्भेळ स्वातंत्र्याशिवाय तरणोपाय नाही, हा एकच धोशा तरुण मनांनी घेतला. तेव्हा सरकारने दडपशाहीचा कायदेशीर रोड-रोलर सुरू केला. म्हणून १९०४ च्या काँग्रेसने ठरविल्याप्रमाणे इंग्लंडात शिष्टाईस जाऊन कर्झनशाहीने घातलेला धुमाकूळ, हिंदुस्थानच्या वाढत्या राजकीय आकांक्षा आणि ताबडतोब व्हावयास पाहिजेतच त्या राजकीय सुधारणा यांचा प्रचार आणि प्रतिष्ठा, इंग्रज जनतेच्या मनावर ठसविण्यासाठी ता. १६ सप्टेंबर १९०५ रोजी म्हणजे भारत-सेवक-समाजाच्या स्थापनेनंतर तीनच महिन्यांनी आणि लॉर्ड कर्झन यांनी आपली वंगभंगाची राक्षसी कल्पना सार्थपणे साकार केल्यानंतर थोड्याच दिवसांनी गोपाळराव गोखले इंग्लंडात गेले. तेथे त्यांना पंजाबचे प्रतिनिधी देशभक्त लाला लजपतराय हे साथ व सहकार देण्यासाठी आलेच होते. इंग्लंडातील आपल्या पन्नास दिवसांच्या मुक्कामात गोपाळराव गोखल्यांनी पंचेचाळीस जाहीर व्याख्याने दिली. त्यांत हिंदुस्थानच्या हलाखीचे, दारिद्र्याचे, अज्ञानाचे व सरकारच्या अमानुष दडपेगिरीचे त्यांनी यथार्थ चित्र रेखाटले. ते पाहून–ऐकून इंग्लिश लोक चकित झाले. शंभर वर्षे राज्यकारभार केला आणि रयतेपैकी एक टक्काही मनुष्य लिहू–वाचू शकत नाही हे आठवे आश्चर्य नव्हे तर काय? असे प्रश्नचिन्ह ना. गोखल्यांनी इंग्लंडच्या विचारवन्तांपुढे उभे केले. गोपाळराव गोखल्यांचे ते सर्व विचार इंग्लंडमध्ये शान्तपणे ऐकले गेले याचे कारण मुंबई–कलकत्त्याच्या विधिमंडळांतून त्यांनी जबाबदारीनेच सरकारवर टीका केली, सरकारचा व लोकांचा विश्वास संपादन केला, असा लौकिक संपादन केला होता. 'सिटिझन् ऑफ दि इंडियन् एम्पायर' (C. I. E.) ही पदवी त्यांनी मिळविली होती. साहजिकच इंग्लंडमध्ये गोखले आत्मविश्वासाने बोलत होते. त्यांच्या विधिमंडळातील कामगिरीने वेल्बीकमिशनपुढे फर्डी साक्ष देणारे गोखले लोकांना आठवले व प्लेग अत्याचारां-बाबतच्या विधानाबद्दल माफी मागणारे गोखले लोकविस्मृतीत गेले. गोखल्यांना हे साधावयाचेच होते. फिरोजशहा मेहतांना १५ जानेवारी १९०१ रोजी लिहिलेल्या पत्रात गोखल्यांनी म्हटलेच होते की— "१८९७ च्या वावटळीत माझ्या डोक्यावर टीकांचा वर्षावच झाला! पण इंग्लंडमधील लोकसभेत जबाबदारांनी मजविषयी उच्चारलेले शब्द ज्या वेळी मी वाचले, त्या वेळी तापलेल्या सळईप्रमाणे ते माझ्या हृदयात घुसले आणि मनाचा आगडोंब उडाला. त्याच वेळी मी माझ्या मनाशी अशी खूणगाठ बांधली की, आपल्या करणीने ज्या इंग्लंडमधील हिंदुस्थानविषयक

चळवळीस धक्का बसला आहे, तीच चळवळ डे. ए. सोसायटीतील आजन्म सेवा-व्रताची परिपूर्णता होताच हाती घ्यावयाची. "

ना. गोपाळराव गोखल्यांचा हा संकल्प साकार व सार्थ व्हावयाचा तर कर्झन-शाहीची दडपशाही, तिने प्रक्षुब्ध झालेली भारतीय तरुणांची मने, वंगभंगामुळे ब्रिटिश राजवटीला व जुन्या भारतीय नेतृत्वाला बसणारा धक्का हे सारेच इंग्लंडच्या लोकांपुढे मांडणे अपरिहार्य होते. त्याप्रमाणे हिंदुस्थानातील रावणराज्याचा पाढा गोखल्यांनी ब्रिटिश जनतेच्या हृदयात आणि मेंदूत चांगलाच भिनवला. तेव्हा त्यावर उपाय काय, असा ब्रिटिश जनता प्रश्न करील हे जाणून हिंदुस्थानात कोणत्या राजकीय सुधारणा तूर्त, पण तातडीने हव्यात व त्या व्यवहारशुद्ध कशा करता येतील हेही गोखले वेळोवेळी स्पष्ट करीत गेले. त्यामुळे त्यांच्या भाषणांचा इंग्लंडमध्ये निकोप परिणाम झाला. गोखले ब्रिटिश संसदीय सभासदांपु उदारमतवादीयांपुढे आणि लोकांमधील विचारी निवडकांपुढे भाषणे करीत; याउलट लाला लजपतराय सर्वसाधारणपणे बहुजनसमाजापुढे बोलत. त्यामुळे त्या दोघांचे प्रचार एकमेकांना पूरकच ठरले. त्यासाठी त्यांनी दिवसातून अठरा अठरा तास कामे केली. परिणामतः स्वदेशी परत येताना गोखल्यांना बोटीवरच आपल्या घशाचे ऑपरेशन करून घ्यावे लागले. हिंदुस्थानची बाजू नेटसपणाने आपण लहान-थोर ब्रिटिश जनतेपुढे स्वच्छ स्वच्छ मांडली, एवढेच गोखल्यांचे समाधान होते. ब्रिटिश मालावर हिंदुस्थानकडून पडू पाहणाऱ्या बहिष्काराची कल्पना मँचेस्टरच्या मजुरांना देताना गोखल्यांनी सांगितले की, त्याचा तुम्हांला राग येणारच, मात्र तो विनाकारण हिंदुस्थानच्या लोकांवरती काढू नका, तर बंगालची फाळणी करून भारतीयांवर अन्याय करणाऱ्या लोकांवर तो राग तुम्ही काढा.

अशा प्रकारे हिंदुस्थानची शिष्टाई करून ५ डिसेंबर १९०५ रोजी ना. गोपाळ कृष्ण गोखले सुखरूप हिंदुस्थानात परतले. लो. टिळकांनी एक भव्य जाहीर सभा भरवून पुण्यास त्यांचे हार्दिक स्वागत केले. त्याचप्रमाणे ना. गोखल्यांचा एक रंगीत फोटो केसरी-मराठ्याच्या तत्कालीन अंकाबरोबर लोकमान्यांनी जनतेत वाटला. सार्वजनिक व राष्ट्रीय जीवनात दिव्यता कशी ठेवावी हे लोकमान्यांनी स्वतःच उदाहरण घालून देऊन शिकवले ते असे. नाकारलेला न्याय किंवा लादलेला अन्याय याच्याविरुद्ध झगडणारा देशभक्त, आपला पक्ष कोणता का सांगेना, तो आपल्या जीवाभावाचा देशबंधू होय, हेच खरे.

✕ ✕ ✕

गोखल्यांनी चार दिशा आखल्या होत्या. त्यांनाच पुढील १९०६ च्या कलकत्ता येथील काँग्रेसमध्ये मुख्य ठरावांचे महत्त्व आले. असे डॉ. पट्टभीसीतारामय्यांनी आपल्या काँग्रेसच्या इतिहासात (१९३५) म्हटले आहे.

वाराणसी-काँग्रेसमध्ये भारत-सेवक गोखल्यांनी आणखी एक विशेष साधला. तो म्हणजे भारतातील नौकरशाहीच्या अहंमन्य मनोवृत्तीचे प्रतिबिंब असलेला लॉर्ड लिटन्‌चा " गुह्यात् गुह्य " खलिता जगजाहीर करून टाकला. १८८९ च्या आपल्या विधिमंडळांच्या सुधारणांवरील भाषणात गोखल्यांनी त्याचा ओझरता व सूचक असा उल्लेख केलाच होता. त्या खलित्यात राणीच्या जाहीरनाम्यासंबंधी लॉर्ड लिटन्‌ने म्हटले होते की, " आपण सर्व जाणतोच की, (भारतीयांच्या) या सर्व हक्कांच्या मागण्या व अपेक्षा कधीच पुऱ्या होऊ शकणार नाहीत. त्यांना प्रतिबंध करणे आणि वंचित करणे या दोहोंमधील निवड आपणास करावी लागत आली आहे. आणि आपण त्यातून अगदीच संकुचित असा सरळ मार्ग काढला आहे, ज्या अर्थी मी गुह्यात् गुह्य म्हणून लिहितो आहे, त्या अर्थी मला चुळबूळ न करता स्वच्छच म्हणावयाचे की, इंग्लंडचे सरकार व भारत सरकार या दोघांनाही प्रस्तुत परिस्थितीत समाधानकारक रीतीने ज्या आरोपांचे उत्तर देता येणार नाही, तो आरोप म्हणजे कानाला लागून दिलेल्या आपल्याच वचनांचे शब्द, जीवाला लागेसे मोडून टाकावयाचे. आपल्या हातातील प्रत्येक साधन आपण वापरत असतो." खरेच ! लिटन्‌शहांनी या " गुह्यात् गुह्य " खलित्यात म्हटल्याप्रमाणेच १८३३ आणि १८५८ ची आश्वासने मोडून टाकून ढोंग (Hypocracy) व दगाबाजी (Treachery) यांच्यामधील कडेवर राज्यकारभार चालल्याचा उल्लेख ज्या वेळी १८८९ साली गोखल्यांनी केला होता, त्या वेळी अँग्लो-इंडियन पत्रांनी त्या भाषणास Indignant speech असा शेरा मारला होता हे लक्षात असणारांना अरेराव कर्झनशाहीच्या तिटकाऱ्याने भारत-सेवक गोखल्यांनी नौकरशाहीच्या प्रवाही मनोवृत्तीचा स्फोट करून आपल्या देशबांधवांना जाग आणली हे यथायोग्यच केले, असे वाटल्याशिवाय राहिले नाही.

सर ब्रुमफील्ड फुल्लरच्या बेगुमान कारभारामुळे बेताल झालेला बंगाल फुल्लरला इंग्लंडला परत बोलावल्यामुळे थोडासा शान्त झाला तरी १९०६ साली काँग्रेस शान्तदान्त वातावरणात भरली नाही, हे लक्षात घेता वाराणसी काँग्रेसमध्ये गोखल्यांनी राखलेल्या गांभीर्याचे महत्त्व वाटावे हे स्वाभाविकच होते. हिंदुस्थानातील घोरत पडलेल्या राष्ट्रीयत्वास कर्झनशाहीने खडबडून जागे केले आणि बंगालच्या तरुणांनी ब्रिटिश रियासतीच्या विरुद्ध जो लढाऊ मर्दाईचा उठाव केला त्याने लॉर्ड कर्झन एवढा चिडला की, हिंदुस्थानच्या राष्ट्रीयत्वाचा जरासंध करण्याकरताच त्याने मुख्यतः बंगालच्या फाळणीचा डाव रचला. पूर्व बंगालमध्ये मुस्लीम वसाहत अधिक आहे हे पाहून बंगभंग करावा म्हणजे तेथे

हिंदु-मुसलमानांचे उभे दावे उभारण्यास सोपे जाईल या उद्देशाने, पण राज्य-कारभाराची सोय अशी सबब पुढे करून लॉर्ड कर्झनने तो उपद्व्याप केला. वास्तविक ऐतिहासिक परंपरेच्या धाग्यादोऱ्यांनी बोलाव्याचे तर लो. टिळकांनी ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरेच्या उत्थानासाठी जो शिवाजी-उत्सव सुरू केला होता त्याला कर्झनचा तो उतारा होता. चंद्रगुप्तानंतर अखिल हिंदुस्थानला अखंड राष्ट्र मानून त्याचा संजीवक झालेला शिवाजी, त्याचे कार्य पुरे करीत आणलेला पहिला बाजीराव आणि महादजी शिंदेप्रभृतींची परंपरा टिळक पुनरुज्जीवित करू पाहत होते. त्याला धक्का देण्याकरितांच भारतीय राष्ट्रीयत्वाच्या एकजिनसीपणाला भेग पाडण्याकरितांच मुस्लीमांची नवी वेगळेपणाची आळ्यता निर्माण करण्याचा तो कर्झनचा फासा होता. "फोडा–झोडा"च्या ब्रिटिश धोरणातील तो एक पवित्रा होता. हे न समजण्या–ओळखण्याइतके हिंदुस्थानचे लोक मूर्ख नव्हते. बंगालचे लोकही बेगुमान वा बेसावध नव्हते. त्यांनी वंगभंगाच्या विरुद्ध पाचशे निषेधसभा भरवल्या होत्या आणि वंगभंग रद्द व्हावा म्हणून पन्नास-साठ हजार सह्यांचा अर्ज इंग्लंडकडे पाठविला होता. तरीही १९०५ च्या ऑगस्टमध्ये विधिमंडळाच्या सिमला-बैठकीत वंगभंगाचे विधेयक संमत करून घेऊन लॉर्ड कर्झनने ऑक्टोबरपासून त्याची अंमलबजावणीही सुरू केली होती. लोकांचा प्रक्षोभ एवढा भयंकर होता की, वंगभंगाचा दिवस हा सर्वत्र सुतकासारखा पाळला गेला होता. अशा प्रक्षोभाच्या माऱ्यात काँग्रेसची नौका हाकारण्याचे कौशल्य गोखले यांना दाखवावयाचे होते आणि हिंदुस्थानातील सर्व दिशांकडून तेथे आलेल्या देशहितेच्छूंनी माना डोलवाव्या असेच कौशल्य ना. गोखल्यांनी दाखविले. "लोकांचे खच्चीकरण करून त्यांना असहाय्य करून सोडावयाचे असेच सरकारने म्हटल्यावर, नौकरशाहीशी कसल्याही तऱ्हेच्या सहकार्याचे नुसते नाव काढणेही चूकच ! लोकहित तेथे दिसणारच नाही, मग मिळणार कोठून ?" नामदार गोखल्यांच्या अशा अर्थाच्या उद्‌गारात राष्ट्राचे मनच स्पष्ट झाले असे सर्वांना वाटले. स्वदेशी व बहिष्कार यांचा त्यांनी केलेला पुरस्कार हाही तसाच वाटला. बाकी सर्व उपाय पार थकल्यावर बहिष्काराचा शस्त्र म्हणून उपयोग करावयाचा असे स्पष्ट करून ते सनदशीर साधन असल्याचे त्यांनी जाहीर केले. बहिष्काराचे शस्त्र पाजळण्यापूर्वी सर्वसामाईक संकटाची जाणीव सगळ्यांना हवी आणि ते शस्त्र पाजळणारांत चुकूनही दुजाभाव असता कामा नये, असेही आपले मत भारत-सेवक गोखल्यांनी स्वच्छ स्वच्छ मांडले होते. शेतकऱ्यांच्या झोपडीझोपडीतून पूर्वीसारखे हातमागाचे स्वसंपादित कापड निघावे हा एक उपाय गोखल्यांनी त्या वेळेस सुचविला होता. पण राष्ट्राची सर्वांत मोठी आवश्यकता प्रत्येक माणसाच्या बुद्धिस्वातंत्र्याची, कर्तव्यसाधनेची उंची वाढविण्याची आणि आपली सर्व सामर्थ्ये भरघोस करून एकंदर जीवनाचे नूतनीकरण, अध्यात्मीकरण आणि परिपूर्तीकरण या गोष्टींमध्ये

सामावलेली आहे, असे गोखल्यांनी सर्वांच्या मनावर ठसविले होते. ठरावांच्या बाबतीत रोमेशचंद्र दत्त, सुरेंद्रनाथ बानर्जी, लो. टिळक, लाला लजपतराय यांची एकमेळ संमती मिळवून मार्ग काढावयाचा होता. टिळक-लजपतरायांनी बहिष्काराच्या ठरावावर ताणून धरावयाचे नाही आणि तो ठराव बहुमताने पसंत झाल्याचे गोखल्यांनी अध्यक्ष या नात्याने जाहीर करावयाचे, अशी त्यातून वाट काढून सर्वांनी तसे केले. हे झाले युवराजांच्या आगमनावरील बहिष्कारासंबंधीच्या ठरावाबद्दल. पण तो वंगभंग रद्द करणाऱ्या मागणीचे ठरावाचाच एक पोटविभाग असल्यामुळे त्याची कड आपोआपच लागली.

२० : कलकत्ता येथील काँग्रेस

बंगालच्या तरुणांनी १९०५ साली काँग्रेसच्या वेळेस कमालीचा संयम पाळला तरी निर्भेळ स्वराज्याचा व ब्रिटनवरील निःशेष बहिष्काराचा त्यांचा पक्ष बंगाल्यात कमालीचा जोर धरून होता. नामदार दादाभाई नवरोजींच्या अध्यक्षतेखालील १९०६ च्या कलकत्ता येथील काँग्रेस-अधिवेशनात टिळकांची स्वराज्यचतुःसूत्री ठरावरूपांनी पसंत झाली. त्यात बहिष्काराच्या ठरावावर बोलणाऱ्या एका वक्त्याने बहिष्काराची व्याप्ती शाळा, माणसे वगैरेपर्यंत देखील पोहोचविल्याने ना. गोखल्यांनी बहिष्कार फक्त ब्रिटिश–मालापुरताच आहे, असे उठून सांगितले. पण अशाने कलकत्त्याच्या बैठकीत पक्षभेद विशेषच स्पष्ट झाला. नव्या पक्षाचा जोर तेथे बराच प्रभावी ठरला. मतभेदापेक्षा मार्गभेदाच्या भयंकरपणामुळे गोखल्यांना चिंता वाटू लागली. शान्तिब्रह्म दादाभाईंनी स्वराज्याचा सोज्ज्वळ मंत्र राष्ट्राला आपल्या अध्यक्षीय भाषणातून दिल्याकारणाने, आगीत तेल ओतल्याचा आरोप त्यांच्यावर इंग्लिशमन पत्राने केला. राष्ट्रीय शिक्षणाचा ठराव एकदम सर्वसंमत झाला. " खिशाला चाट लावून स्वदेशी " असा स्वदेशीचा ठराव घेण्याबद्दल लो. टिळकांचा आग्रह चालू असता, तो न मानला जाता, एतद्देशीय कुशलतेला उत्तेजन, स्वजनांचे बेकारी-निवारण आणि इतर देशांच्या बरोबरीने हिंदुस्थानलाही जीवन–साधना–निर्मिती करता येते, यांची सिद्धी म्हणून स्वदेशी व्रत पाळण्याची शिफारस करणारा सीधा ठराव पास झाला. बहिष्काराचा ठराव विलायती–मालाविरुद्धचा प्रमुखतः असून बंगालच्या फाळणीने आणि इतरत्रही दडपशाहीने जागृत झालेल्या भारतीयांच्या स्वाभिमानाच्या दृष्टीने तो यथायोग्य असल्याचा निर्वाळा सर्वच देत होते. पण बंगालने एकट्यानेच तेवढा बहिष्कार अमलात आणावा, इतरांनी नुसती तोंडी सहानुभूती दाखवावी, हे काही भारतीय एकजिनसीपणाचे व बंधुत्वाचे लक्षण नव्हे; बंगालची फाळणी हे एकच कारण बहिष्काराला असते, तरीही बंगालबद्दल कृतज्ञता व बंधुभाव इतर सर्व प्रांतीयांनी दाखविण्यातच राष्ट्राच्या एकीचे विश्वरूपदर्शन परकीय जुलूमशाहीला होणार आहे, असे म्हणणारेच बरोबर नव्हते काय? अगदी " यथायक्षस्तथा बलिः । " असे मोजकेपणाने चालावयाचे म्हटले तरी, फाळणी बंगालपुरती मर्यादित धरूनही, राष्ट्रीय गीतास व मिरवणुकीस बंदी वगैरे जुलूम

इतरत्र काय कमी होते ? पण १९०६ च्या काँग्रेसच्या ठरावात राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी, बहिष्कार व स्वराज्य यांचा तत्त्व म्हणून पुरस्कार करून प्रत्येक व्यक्तीने आणि प्रांताने आपापल्यापरी (म्हणजेच सर्व राष्ट्राने) आचरणाची झेप घ्यावी असा आदेश दिला गेला हे उघड आहे.

वाराणसी–काँग्रेसमध्ये जेथपर्यंत मजल गेली तेथून एक इंचभर परतावयाचे नाही या दृढ निश्चयाने कलकत्त्याच्या (१९०६) काँग्रेसचे अध्यक्षपद लाला लजपतराय यांना द्यावे, असे राष्ट्रीय पक्षाच्या जहालांचे मत होते. देशातील तरुणांना ते मनपसंत होते. पण तेवढ्याचमुळे काँग्रेसच्या जुन्या श्रेष्ठींना ते नापसंत होते. राष्ट्रांत वीरवृत्तीचा होऊ लागलेला आविष्कार हे सुचिन्ह मानणारे लो. टिळक महाराष्ट्राला पाठीशी घेऊन बंगालला पाठिंबा देत होते. कलकळीच्या राष्ट्रीयत्वाच्या भूमीकेवर बंगाल, महाराष्ट्र व पंजाब जिवात जीव घालून चालत होते. महाराष्ट्राचा मर्द इतिहास आणि शिवाजी यांचे पवाडे बंगाल गात होता. बंगालची विक्रम वैभवगीते महाराष्ट्र आळवीत होता आणि पंजाबच्या हौतात्म्याचे कौतुक सर्वत्र होत होते. लाल (लाला लजपतराय), बाल (बाळ गंगाधर टिळक), पाल (बाबू बिपिनचंद्र पाल) ही राष्ट्रीय त्रिमूर्ती तरुण मनांची आराध्यदेवता बनली होती. या भक्तिभावाने वाहून न जाता सुरेंद्रनाथ बानर्जी आणि सर फिरोजशह[1] मेहता सांगत होते की, ब्रिटिश लोकमत आणि ब्रिटिश सरकारमधील हिंदुस्थानचे सहानुभूतिक यांना आपलेसे करून घेण्याचे सारे प्रयत्न लालाजींच्या अध्यक्षपदाने नष्टप्राय होतील, अफलदायी होतील आणि काँग्रेसच्या स्वागतसमितीत पाल बाबूंपेक्षा सुरेंद्रांचा शब्द प्रमाण असल्यामुळे लालाजींचे नाव मागे पडले, मग टिळकांचे नाव काढणार कोण, कशाकरिता ? प्रागतिकांनाही आपण सुचवू ते नाव सर्वसंमत होईल असा आत्मविश्वास मुळीच वाटेना. तेव्हा त्यांनी इंग्लंडात असलेल्या राजकीय पितामहांचा धावा केला, आणि दादाभाई नवरोजींच्या प्रसन्नतेचे प्रसाद-फळ म्हणून कलकत्त्यास काँग्रेसची बैठक यशस्वी झाली. ना. गोपाळराव गोखले यांना दादाभाईंनीं स्वागतसमितीची तार दाखविली होती आणि दादाभाईंनी अध्यक्षपदास संमती दिली म्हणूनच कलकत्त्यास " सर्वेषामविरोधेन " सगळे काही भागले.

स्वागतसमितीचे अध्यक्ष डॉ. राशबिहारी घोष हे होते. त्यांनी बंगालमधील सर्व जुलूमशाहीचा धिक्कार करून स्वदेशीच्या चळवळीला राजद्रोही म्हणणारांना बजावले की, " इंग्लंडच्या उण्यापुऱ्यासुद्धा इंग्लंडवर आमचे प्रेम असले तरी हिंदुस्थानवर आमचे सर्वाधिक प्रेम आहे. याला राजद्रोह म्हणावयाचे असेल तर, आम्ही राजद्रोही आहोत, हे म्हणण्यात आम्हांला अभिमान वाटतो." अध्यक्ष दादाभाई नवरोजींनी तर काय, वसाहतीच्या किंवा युनायटेड किंग्डमच्या धर्तीचे " शिष्ट ध्येयं स्वराज्यस्य " जाहीरच करून टाकले.

ब्रिटिश मुत्सद्द्यांच्या उदारमतवादित्वावरील दादाभाईंचा विश्वास या वेळी मावळत आला होता म्हणून त्यांनी हिंदुस्थानात उदय पावणाऱ्या नवचैतन्याचे हर्षभराने स्वागत केले. तरीही १९०६ मध्ये झालेला बहिष्काराचा ठराव १९०५ च्या ठरावाप्रमाणे वंगभंगाच्या निषेधाचा भाग म्हणूनच पास झाला आणि म्हणूनच ना. गोखले व पं. मदनमोहन मालवीय यांनी समाधान मानले. सर फिरोजशहा मेहतांस बहिष्कार हा शब्दच काँग्रेसच्या ठरावात नको होता. ते वाराणसी काँग्रेसला हजरच राहिले नव्हते आणि कलकत्ता काँग्रेसमधील ठराव दादाभाईंच्या नेतृत्वाखाली झाला, म्हणूनच ते काही बोलले नाहीत !!

कलकत्ता काँग्रेसच्या ठरावाप्रमाणे मग ब्रिटिश मालावर बहिष्कार पडू लागला. ब्रिटिश व्यापाराला त्याने झळ लागली तरी म्हणावी तशी झळ बिलकुल लागलेली दिसली नाही. स्वदेशीच्या शपथांबरीक सर्वत्र झाल्या आणि ब्रिटिश किंवा विलायती मालावरील बहिष्कार याचा अर्थ त्या मालाशिवाय आपण जीवन निभावू शकतो, एवढ्या थराला गेला ! तोडीस तोड म्हणून परदेशी मालाच्या जागी हिंदुस्थानात उत्पादन झाले नाही, कारखाने अगदीच अल्प निघाले, पण ते सरकारी अवकृपेने चालू शकले नाहीत. राष्ट्रीय शिक्षणाच्या संस्थाही फारच थोड्या निघाल्या, पण ज्या हाताच्या बोटांनीच मोजता येण्याजोग्या निघाल्या त्यांनी राष्ट्रीयत्वाची जोपासना सक्रस केली आणि एकंदर समाजाच्या मनोवृत्तीत पारतंत्र्याची चीड दिवसेंदिवस फोफावत गेली. भारतसेवक नामदार गोपाळ कृष्ण गोखले आणि त्यांचे प्रागतिक सहकारी यांची तरीही मनोमन खात्री होती की, हिंदुस्थान अजून स्वराज्याचा उघडउघड लढा द्यावयास समर्थ झाला नाही. असमर्थावस्थेत तो लढा दिला तर ते अवघड जाईल. म्हणून अजूनही ब्रिटिश-जनतेच्या सहानुभूतीवर आणि ब्रिटिश मुत्सद्द्यांच्या उदारमनस्कतेवर भर देऊन काही वर्षे तरी हिंदुस्थानने आपली स्वराज्याची चळवळ सनदशीर मार्गाने चालविली पाहिजे.

पण या मताला तरुण मंडळीत मान नव्हता. मग, भारतीय तरुण उत्साह-भराने स्वाभिमानपूर्वक स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय-शिक्षण आणि स्वराज्य या चतुःसूत्रीचा पुरस्कार करू लागले तर सरकारनेही आपली जुनी–नवी जुलूम-शाहीची धोरणे आणि हत्यारे पाजळण्यास सुरुवात केली !!

☒ ☒ ☒

२१ : इंग्लंडची तिसरी सफर

दादाभाई नवरोजींना कलकत्त्याच्या काँग्रेसचे मार्गदर्शक अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल स्वागत समितीची आलेली तार त्यांनी ना. गोखल्यांना दाखविली होती, याचे कारण गोखले त्या वेळी इंग्लंडमध्ये थोरा-मोठ्या ब्रिटिश मुत्सद्द्यांच्या गाठीभेटी घेण्यासाठी फिरत होते. वंगभंग आणि कर्झनशाही यांच्यामुळे भारतीय तरुण मने काय वळण घेत आहेत हे त्यांनी सामुदायिकरीत्या १९०५ च्या शिष्टाईत ब्रिटिश विचारवन्तांपुढे मांडले होते. या वर्षी (१९०६) ब्रिटिश पार्लमेंटाच्या दीडशे वजनदार सभासदांच्या गाठीभेटी घेऊन आणि हिंदुस्थानचे अंडरसेक्रेटरी एलिस व इंग्लंडचे मुख्य प्रधान सर हेन्री कॅंबेल-बॅनरमन यांसारख्या राजमंत्र्यांना व्यक्तिशः भेटून हिंदुस्थानला तातडीने कोणत्या राजकीय सुधारणा हव्यात, हे त्यांच्या मनावर बिंबवण्याचा नामदारांचा हेतू होता.

पण इकडे हिंदुस्थानात, वंगभंगाने चिडलेले बंगालचे अनभिषिक्त राजे सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्यासारखे पुढारी गिरफदार करण्यात आले; बंगाल प्रांतिक-परिषदेस मनाई करण्यात येऊन प्रतिनिधींवर पोलिसांनी लाठ्यांचा मुबलक प्रयोग केला; फुल्लरपुरस्कृत दडपशाहीमुळे, फाळणीने आधीच वेडा झालेला बंगाल अधिकच खवळला आणि गोपाळराव गोखल्यांना इंग्लंडमध्ये बंगालसंबंधी कित्येक सभांतून बोलावे लागले. ते गोखले बोललेच, पण वर त्यांनी सेक्रेटरी ऑफ् स्टेट फॉर इंडिया असलेल्या लॉर्ड मोर्ले यांच्या गाठी घेऊन परिस्थितीला स्फोटकता येऊ देऊ नका, असे कळकळीने बजावले. मोर्लेसाहेबही काही कमी नव्हते. त्यांनी हिंदुस्थानातील तरुणांनी अत्याचार थांबवले तर आपले सरकार हिंदुस्थानला राजकीय सुधारणा देईल, असे सांगितले. ना. गोखल्यांनी त्याबाबत आपण खटपट करू असे मोर्ले यांना आश्वासन दिले व आपल्या भारत-सेवक समाजातील सहकारी नटेश अप्पाजी द्रविड यांना तरुणांना शक्य तेवढे आवरण्याची खटपट टिळक-प्रभृतींनी करावी, अशी प्रयत्नांची दिशा आखण्यास लिहिले.

स्वतः गोखल्यांनी आपल्या खटपटीने व वजनाने सभाबंदीचा जारी झालेला कायदा रद्द करवला, राष्ट्रीय गीते व मिरवणुका यांवरील बंदी काढविली आणि स्वदेशी-बहिष्कारादि चळवळीच्या उपक्रमाने ज्या विद्यार्थ्यांना शाळा-

कॉलेजास मुकावे लागले होते, त्यांना फिरून विद्यार्जनाच्या संस्थांत प्रवेश मिळवून दिला. एवढेच नव्हे, तर सर बी. फुल्लरला इंग्लंडला परत बोलावण्याची व्यवस्था होईल हेही गोखल्यांनी पाहिले. तेणेकरून थोडा प्रक्षोभ कमी झाला. याशिवाय, ईस्ट इंडिया असोसिएशनपुढे इंपीरियल इन्स्टिट्यूटमध्ये ना. गोपाळराव-गोखल्यांनी "भारताच्या स्वराज्यावर" व्याख्यान देऊन ब्रिटिश राजवट, तिची वचने आणि ब्रिटिश राजवटीने आणलेले हिंदुस्थानचे दारिद्र्य इंग्लिश जनतेला उघडे करून दाखविले. गोखल्यांची इंग्लंडची तिसरी सफर अशा प्रकारे कारणी लागली व ते १४ सप्टेंबर १९०६ ला हिंदुस्थानात परतले.

२२ : उत्तर हिंदुस्थानात दौरा

कलकत्त्याच्या काँग्रेस अधिवेशनापूर्वी (१९०६) इंग्लंडमध्ये ना. गोखले गेले आणि तेथील विचारवन्त पार्लमेंट सभासदांच्या व लॉर्ड मोर्लेसारख्यांच्या भेटी घेऊन हिंदुस्थानात ताबडतोब करावयाच्या राजकीय सुधारणांचे महत्त्व पटवीत बसले. दादाभाई नवरोजींच्या अध्यक्षतेखाली कलकत्त्याचे काँग्रेस-अधिवेशन पार पडल्यावर ना. गोखले यांचे मन दुहेरी अर्थाने व्यथित झाले होते. एक तर ब्रिटिश जुलूमशाहीने तरुण मंडळींचा तोल सुटल्यामुळे ते बहिष्काराच्या चळवळीपासून गुप्त संघटना उभारून ब्रिटिश राजवट नेस्तनाबूद करण्याची भाषा करीत होते— आणि हे ना. गोखलेप्रभृतींच्या मते, आवाक्याबाहेरचे उत्थान होते. दुसरे असे की, ब्रिटिश रियासत नुसता वंगभंग करून थांबली नव्हती, तर ना. गोखले ज्या राजकीय सुधारणांसाठी खटपट करीत होते त्या सुधारणांत मुसलमानांना प्रत्येक लहानमोठ्या संस्थेत स्वतंत्र मतदारसंघ आणि स्वतंत्र प्रतिनिधित्व मिळावे, अशी मुस्लीम नेत्यांच्या मुखानेच जोराची मागणी व्हावी, असा डाव ब्रिटिश नोकरशाही रचीत असल्याचा कानोसा ना. गोखल्यांना लागला होता; त्यायोगे हिंदुस्थानातल्या हिंदुस्थानात ग्रामपंचायतीपासून वरिष्ठ विधिमंडळापर्यंत (कलकत्ता) सगळीकडे " हिंदु हिंदुस्थान " आणि " मुस्लीम हिंदुस्थान " असे सवते सुभे निर्माण होऊन हिंदुस्थानचे राष्ट्रीयत्व जरासंधासारखे दुभंगण्याचा रंग दिसत होता. बंगालप्रमाणेच पंजाबची फाळणी " कॉलनायझेशन बिलाच्या " नावाखाली प्रांतिक सरकारने करावयास घातली होती, एवढेच नव्हे तर त्या कॉलनायझेशन बिलाविरुद्ध पंजाबात सरदार अजितसिंग आणि लाला लजपराय यांनी उठाव करताच, ती जणु १८५७ च्या उठावाची पुनरावृत्ती असल्याचा धसका घेऊन पंजाबसरकारने अजितसिंग व लाला लजपतराय यांना १८१८ च्या रेग्युलेशनाखाली ता. ९ मे १९०७ रोजी मंडालेस हद्दपारही केले. आपल्या बेचाळिसाव्या वाढदिवसादिवशी लाला लजपतराय यांजवर झालेल्या त्या सरकारी रोषाने ना. गोखल्यासारख्या लालाजींच्या चाहत्यांना उद्वेग आणि संताप आल्याशिवाय कसा राहणार ?

पण काही झाले तरी हिंदुस्थानच्या लोकांनीच हिंदुस्थानवर येणाऱ्या

प्रसंगाला तोंड दिले पाहिजे म्हणून न्यायप्रिय लालाजींच्या हद्दपारीबद्दल विधिमंडळात ना. गोखल्यांनी जशी सरकारची सडेतोड हजेरी घेतली, तशीच आपल्याच तरुण देशबांधवांची व हिंदु-मुस्लीम जनतेची हिंदुस्थानच्या एकजिनसी राष्ट्रीयत्वाबद्दल खात्री पटवून, जनजागरण करण्याची प्रेरणाही कलकत्त्याची काँग्रेस संपल्यापासून ना. गोपाळराव गोखले सतत देत होते.

म्हणून १९०७ साली गोपाळराव गोखल्यांनी हिंदु-मुसलमानांच्या संख्येचा व भांडणाचा प्रश्न जेथे तीव्रतेने उभा राहणे शक्य आहे आणि बंगभंग नि कॉलनायझेशन बिलाचे परिणाम भोगावा लागणारा पंजाब ज्या उत्तरेकडील हिंदुस्थानात आहे, तेथे लोकांच्या ज्ञानजागरासाठी अभ्यासपूर्ण व्याख्यानांची मोहीम काढली. तरुण पिढीस उद्देशून प्रस्तुत व भावी हिंदुस्थानच्या राजकीय परिस्थितीसंबंधी व्याख्याने द्यावी व तरुणांच्या विचारास इष्ट वळण लावावे असा त्यांचा इरादा होता. बंगभंगामुळे ब्रिटिश राजवटीत मुसलमानांना "लाडक्या बिब्बीची" प्रतिष्ठा आल्याकारणाने, हिंदु-मुसलमानांतील दुहीने गोपाळराव गोखल्यांना कष्टी केले होते. गोखले यांनी मोहीम फेब्रुवारी १९०७ मध्ये सुरू केली आणि तेथपासून त्यांच्या व्याख्यानांचा इतका परिणाम होत गेला की, जेथे जेथे ते जात तेथे तेथे एखाद्या लोकप्रिय राजालाही मिळणार नाही असा मान त्यांस मिळत गेला. त्याबरोबर मुसलमानांच्या मनांतील अढीही बरीच कमी कमी होत गेली. पंजाब व संयुक्तप्रांत यांतून फेब्रुवारी महिन्यापासून, देशाची सद्यःस्थिती, स्वदेशी, हिंदु-मुस्लीम-ऐक्य आणि सुशिक्षितांचे कर्तव्य अशी त्या व्याख्यानांची चतुःसूत्री होती. आपण सर्व, प्रथम भारतीय आहोत आणि मग वाटले तर हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती, पारशी, शीख वगैरे आहोत ही वृत्ती प्रत्येक सुजाण अंतःकरणात बाणली गेली पाहिजे असे गोखले व्याख्यानांतून लोकांना सांगत होते. हिंदुस्थानला जगाच्या संस्कृतीत एक कार्य करावयाचे आहे व ते महत्त्वाचे कार्य म्हणजे जगाला प्रेम आणि सत्य यांचा धडा द्यावयाचा, आध्यात्मिक ज्ञान व्यवहार-शुद्ध करण्यास सर्वांस शिकवावयाचे! न्या. रानडे, स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ यांनी हेच उच्च स्वराने सांगितले आहे. आपण नवीन जगात-जमान्यात-शिरत असताना, औद्योगिक, शैक्षणिक, व्यापारविषयक कोणत्याही चळवळीत शिस्त, स्वार्थत्याग आणि कुशलता हे आपले गुण प्रामुख्याने चमकले पाहिजेत असा ना. गोखल्यांच्या व्याख्यानांचा रोख होता. अलाहाबादच्या व्याख्यानात ते स्पष्टच म्हणाले की, "युद्ध, परकीय राष्ट्राबरोबर युद्धविषयक संधान, बंड व अत्याचार या गोष्टी वगळून, बाकी अर्ज-विनंत्यांपासून तो थेट 'कर' न देण्या-पर्यंत सर्व काही सनदशीर आहे."

कलकत्त्याच्या काँग्रेसने पास केलेल्या ठरावांचे मर्म व अर्थ आपल्या श्रोत्यांना समजावून देऊन ना. गोखले जहाल मार्गाकडे जाण्यापासून तरुणांना

परावृत्त करीत होते. गोपाळराव गोखले त्या वेळी काँग्रेसचे सेक्रेटरी असल्याकारणाने त्यांच्यावर कामाचा बोजा जसा होता तशीच काँग्रेस शाबूद व सबल राखण्याची जबाबदारीही होती. राजकीय सुधारणा करण्याची जेवढी जलदी करता येईल तेवढी सरकारने करावी असा तगादाही सरकारच्या पाठीमागे त्यांना ठेवावयाचा होताच. त्याचबरोबर परकीय सत्तेने चालविलेल्या दडपशाहीने प्रक्षुब्ध झालेल्या लोकमतालाही गोखल्यांना तोंड द्यावयाचे होते आणि हे सर्व करताना आपली प्रकृती सांभाळून " राजपथ सोडुनी आडपथ धरावयाचा " नव्हता. थोडक्यात म्हणजे ते एक दिव्यच होते. ते नामदार गोखल्यांनी केले. गोपाळराव गोखल्यांच्या या दौऱ्यात हजारो लोक त्यांची मिरवणूक त्यांच्या गाडीचे घोडे सोडून व गाडी स्वतः ओढून काढीत. मुसलमान लोकांनीदेखील राजासारखे त्यांचे थाटाचे स्वागत केले. ना. गोपाळराव गोखले हे असे पहिलेच पुढारी होते खरे; पण या बडेजावाने ते फुगले नाहीत की चढेल झाले नाहीत.

✕ ✕ ✕

२३ : सुरतेला सुरत गेली !

पंजाबमधील व बंगालमधील दडपशाही व क्रांतिकारक अशा लोकांच्या चळवळी चालू असता मुंबई इलाख्याची प्रांतिक सभा सुरतेस (१९०७) झाली. पंजाबमध्ये जमीन-महसुलात वाढ कारण्यात आल्यामुळे, बारीदोआब या कालव्याच्या पाण्याचे दर वाढविण्यात आले. त्यास लोकांनी नकार दर्शविल्यामुळे, कॉलनायझेशन बिल माघारी घेण्यास लावण्याऐवजी लॉर्ड मिंटो यांनी सरदार अजितसिंग व लाला लजपतराय यांना मंडालेस हद्दपार केल्यामुळे, पंजाबमधील तरुणांना " मिंटो हिंदुस्थानात रहातो कसा ? " असे होऊन गेले होते. सिव्हिल अँड मिलिटरी गॅझीटने भारतीय सुशिक्षितांचा धिक्कार केला होता व एतद्देशीय पत्रांवर खटलेच-खटले भरण्याचा सरकारने सपाटा चालविला होता. त्यामुळे रावळपिंडी येथे दंगली झाल्या ! बंगालमध्ये त्या चालूच होत्या. शान्त डोक्यांतसुद्धा खळबळवून सोडणाऱ्या त्या अवस्थेत लो. टिळक हे सुरतेच्या प्रांतिक परिषदेस हजर राहू शकले नाहीत. आणि ता. २९ मार्च १९०७ रोजी सर फिरोजशहा मेहतांनी बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण हे दोन्ही ठराव मोठ्या शिताफीने वगळले. वऱ्हाडच्या प्रांतिक परिषदेत " वन्दे मातरम् "—सारख्या सर्वमान्य राष्ट्रगीतावर रणे माजली, अलाहाबादच्या प्रांतिक सभेत पं. मदनमोहन मालवीय यांनी दोनशे प्रतिनिधींस जागेच्या अभावी परवानगी दिली नाही. संयुक्तप्रांताच्या प्रकृतीस बहिष्कार मानवणार नाही असे त्यांचे मत होते. या सर्व घटनांवरून कलकत्ता काँग्रेसचे ठराव हाणून पाडण्यासाठी हे सर्व खटाटोप होते असे लोकमत होऊन बसले ! ! कारण कलकत्ता काँग्रेसचे सगळेच चक्कर आपण फिरवून टाकणार आहोत, असे फिरोजशहा मेहतांनी कलकत्ता काँग्रेस संपल्यावर लो. टिळकांना स्वच्छ सांगून टाकले होते.

कलकत्त्यानंतरची काँग्रेस लाहोरचे आमंत्रण येऊनही नागपुरास भरावयाची असे ठरले होते. पण नागपूरच्या स्वागतसमितीच्या बैठकीत जे " अश्लाघ्य वाक्पांडित्य " झाले त्यावरून तेथे काँग्रेस सुखरूप पार पडणार नाही म्हणून मुंबईस पुढाऱ्यांची एक सभा झाली. लो. टिळक तेथे हजर होते. त्या सभेत १९०७ ची काँग्रेस सुरतेस भरावयाची, असे जाहीर झाले. लो. टिळक व

दादासाहेब खापर्डे यांनी त्या गोष्टीस विरोध केला. परंतु नागपूरच्या प्रागतिकांनी केलेल्या तारातारीवरूनच सुरतेचा निर्णय बहुमताने घेण्यात आला होता. अध्यक्ष म्हणून राशबिहारी घोष यांचे नावही जाहीर झाले.

प्रागतिक आणि राष्ट्रीय पक्षातील या दुरंगी व तीव्र मतभेदाचा कानोसा असलेल्या इंग्रज सरकारने विधिमंडळातील गोखल्यांनी केलेल्या कानउघाडणीचा आदर राखण्याचे सोंग वठवून, इंग्रजी राजवटीच्या बंगाल्यात कोमिताला वगैरे ठिकाणी दंगे चालू असतानाच लाला लजपतरायांना ११ नोव्हेंबर १९०७ रोजी मोकळे केले.

सरकारची अपेक्षा साकार होऊ लागली. लालाजींची सुटका झाल्यावर काँग्रेसच्या अधिवेशनाला निराळाच रंग चढू लागला. सुरतेच्या राष्ट्रीयांनी लाला लजपतराय अध्यक्ष हवेत असा हट्ट धरला. ना. गोखल्यांनी प्रयत्न केला आणि दिलदार लालाजींनीच अध्यक्षस्थान नाकारले. मग राष्ट्रीय पक्षाने पूर्वनियोजित अध्यक्ष राशबिहारी घोष यांच्याबद्दलच्या नापसंतीची चळवळ सुरू केली. वरिष्ठ विधिमंडळात बिहारींनी राष्ट्रीयांच्या पुरोगामीपणाबद्दल अनुदार उद्‌गार काढले होते, ते त्यांना आता बाधू लागले. लालाजींच्या स्थानबद्धतेचा निषेध एकमुखी झाला पाहिजे असे सगळ्यांचेच म्हणणे. तेवढ्यासाठीच लालाजींना एकमुखाने अध्यक्ष निवडावे असे तरुण राष्ट्रीयांचे म्हणणे. पण स्वतः लालाजींची अध्यक्ष म्हणून निषेध-ठरावाच्या वेळी कुचंबणा होईल, ती टाळण्यासाठी त्यांच्या अध्यक्ष-पदाचा आग्रह धरू नये, असे ना. गोखलेप्रभृतींचे म्हणणे. तेव्हा वादाला आपणच कारणीभूत होऊ नये म्हणून स्वतः लालाजींनीच नकाराचा निकाल घेतला.

काँग्रेसपुढे यावयाच्या ठरावांची पत्रिका छापून झाल्यावर तिची एक प्रत लालाजींना व एक लो. टिळकांस देण्यात आली. कलकत्त्याचे (१९०६) ठराव जसेच्या तसे पास होणार असतील तर टिळक-लजपतरायांची काहीच तक्रार नव्हती. अध्यक्ष कोणी व्हावे याबद्दलही मग विरोध नव्हता. पण काँग्रेसचे सेक्रेटरी ना. गोखले हे त्याबद्दल सर्व सोळाशे प्रतिनिधींच्यातर्फे आगाऊ आश्वासन कसे देणार ? त्यांनी तसा प्रयत्न करू असेही आश्वासन देऊन स्वतःची सुटका वा गुंतवणूक करून घेतली नाही.

यथाक्रम ता. २७ डिसेंबर १९०७ ही उजाडली. दुपारी अडीच वाजता काँग्रेसच्या अधिवेशनास रीतसर सुरुवात झाली. स्वागताध्यक्ष श्री. मालवी यांचे भाषण झाल्यावर, अंबालाल सक्करलाल यांनी अध्यक्षांची सूचना मांडताना डॉ. राशबिहारी घोष यांचे नाव काढताच, " ना, ना " असा एकच आवाज चोहोकडून उठला ! या गलग्यातच सुरेंद्रनाथ बानर्जी दुजोऱ्याचे भाषण करू लागले. त्यांच्या तोंडच्या पहिल्याच वाक्यापासून गोंगाट सुरू झाला. स्वागताध्यक्षांनी

" शांति, शान्ति " म्हणून आर्जव– विनंती– काकुळती केली. पण व्यर्थ ! " गोष्टी या थराला आल्या अँ ! " असे सुरेंद्रांनी तेवढ्यात वाक्य उच्चारताच, " हो, हो, हो ! " असे प्रतिसाद आले. सभा बरखास्त झाली. " रात्रौ लो. टिळक गोखल्यांच्याकडे गेले पण गोखल्यांनी त्यांना झिडकारले," अशी खोटीच आवई दुसऱ्या दिवशी कोठून तरी पिकली. मग काय ? ता. २८ डिसेंबर रोजी फिरून काँग्रेस सभेस एक वाजता सुरुवात झाली. लो. टिळक यांनी स्वागताध्यक्ष मालवी यांजकडे एक चिठ्ठी दिली. ती न वाचताच, काँग्रेस बंद ठेवा या वा अशा अर्थाचीच ती आहे असे समजून, ती मालवींनी नियमबाह्य ठरविली ! आदले दिवशीचे अर्धवट राहिलेले सुरेंद्रांचे भाषण झाले. पं. मोतीलाल नेहरूंनी पाठिंबा दिला. मग अध्यक्षांच्या निवडीचा ठराव स्वागताध्यक्षांनी मतास टाकला. " ना, ना, ना !! हो, हो ! " च्या घोळात नकारघंटा फिकी पडल्याचे जाहीर करून राशबिहारी अध्यक्ष निवडले गेले, असे मालवींनी जाहीर केले.

डॉ. राशबिहारी घोष अध्यक्षस्थानापन्न होऊन आपल्या भाषणासाठी तोंड उघडणार तोच लो. टिळक मुख्य व्यासपीठावर एकदम ताठपणे चमकू लागले. मालवींनी चिठ्ठीची वासलात सांगितली. टिळक म्हणाले, " आपल्या बेगुमानीला मी काय करू ! मी अध्यक्षांच्या निवडणुकीसाठीच चिठ्ठी लिहिली होती तेव्हा मी हक्क बजावणार आहे. "

तेव्हा अध्यक्ष म्हणाले की, " आपण बेकायदेशीर वागत आहा, आपण जाग्यावर बसा ! " टिळकांनी उत्तर केले की, " प्रतिनिधींच्या न्यायबुद्धीपुढे मी माझे म्हणणे मांडणारच ! "

झाले ! मग एकच धुमाकूळ माजला ! एकदम लाव्याकाव्या सरसावून हाणामारी सुरूच झाली म्हणाना ! लो. टिळकांच्यावरही एक मनुष्य धावून आला असे दिसताच, ना. गोखले तडक पुढे झाले, मध्ये पडले व धावत्याला वारून उभे राहिले. तेवढ्यात कोणी तरी खुर्ची फेकून मारण्याचा प्रयत्न केला. तिच्या मागोमाग एक पुणेरी लाल जोडा फिरोजशहा मेहतांस चाटून सुरेंद्रनाथांना लागला. या वेळी ना. गोखले सात्त्विक संतापाने थरथर कापू लागले होते. इतक्यात पोलीस आले. मेहता, गोखलेप्रभृती मंडळी मागच्या दरवाजांनी बाहेर गेली. मंडपातून सगळ्या स्त्रिया बाहेर पडेपर्यंत टिळक जागेवर उभे होते. मग ते स्वपक्षीयांत गेले. पोलिसांनी काँग्रेस-मंडपाचा ताबा घेतला. ता. २८ डिसेंबर १८८५ ला मुंबई येथे जन्माला आलेल्या काँग्रेसची तिच्या २२ व्या वर्षी सुरत येथे ' सुरत ' पार गेली !

तरीही २८ डिसेंबरच्या सायंकाळी पुष्कळसे पुढारी एकत्र जमले. दादासाहेब करंदीकरांच्यासारखे अपवाद सोडले, तर राष्ट्रीयांतील बहुसंख्य मंडळींना

त्या सम्मेलनात मज्जावच होता. नऊशे काँग्रेस प्रतिनिधींच्या त्या सभेत संकट-काळाची तरतूद म्हणून " कन्व्हेन्शन् "ची स्थापना होऊन एक समिती नेमण्यात आली आणि तिने सर्व घटना, नियम वगैरे करून एप्रिल १९०८ मध्ये कन्व्हेन्शन्ची सभा बोलवावी असा ठराव पास करण्यात आला.

मग सुरतेची काँग्रेस मोडली कोणी ? असाच एक वाद पिकला. सुरेन्द्रनाथ बानर्जीप्रभृती प्रागतिकांनी व नेमस्तांनी आग्रहपूर्वक प्रतिपादिले की, टिळकांनी काँग्रेस मोडली. का ? तर म्हणे, बंगालमधून " Blow up " अशी तार आली होती ! आपणास ब्रिटिश साम्राज्यात राहणेच आहे, तेव्हा हिंदुस्थानात लोकमत तयार करून व इंग्लंडमध्येही शिष्टमंडळ पाठवून वसाहतीचा दर्जा मिळवण्याच्या व्यवहारशुद्ध राजकारणाबद्दल कोठेच मतभेद नव्हता. लोकमान्यांना काँग्रेसची गोगलगाय पद्धतीची चाललेली प्रगती मान्य नव्हती. पण हे सगळे म्हणण्यात अगर काँग्रेस कोणी मोडली, टिळकांनी की हट्टी मेहतांनी या ऊहापोहातही कार्य-निष्पत्ती काही नव्हती. शेवटी ता. १८ व १९ एप्रिल १९०८ रोजी अलाहाबादेस घटना-नियम नव्याने तयार होऊन प्रागतिकांच्या कन्व्हेन्शन्चा नवा जमाना सुरू झाला.

सुरतेस १९०७ मध्ये काँग्रेस सभेत दंगल माजली व हिंदुस्थानचे जगात हसे झाले. काँग्रेसही नामशेषच व्हावयाची, पण धुरीणांच्या प्रसंगावधानाने ती वेळ कशी तरी निभावली. भारत-सेवक गोखल्यांना मात्र टोचणी लागून राहिली की, देशातल्या तरुणांचा जोम, उत्साह व थोर वृत्ती यांचा भलत्याच कारणी वेच होत राहिला तर, अगर अकाली ऊत ओसंडू लागला तर, या देशाचे भवितव्य काय होणार ? सुरतेला झालेल्या प्रकारावरून जगभरचे हिंदुस्थानचे हिताचिंतक कोणत्या फिकीरीत पडतील ? पहिल्याच सहानुभूतीने ते भारतीयांना सहाय्य करतील की " भोगा आपल्या कर्माची फळे ! " म्हणतील अशी एक रुखरुखच गोखल्यांना लागून राहिली. अधू मनाच्या आईवडिलांप्रमाणे ते काँग्रेसविषयी मोठे जागरूक राहू लागले व आपल्या एकाही लहान-मोठ्या कृतीने तिचे नुकसान होऊ नये याविषयी जपू लागले.

एप्रिलमध्ये (१९०८) काँग्रेसचे कुंपण-मांडणीचे काम संपल्यावर, खुद्द लॉर्ड मिंटो यांनीच गोपाळराव गोखल्यांना इंग्लंडमध्ये जाऊन लॉर्ड मोर्लेसाहेबास सहाय्य करण्यास सुचवले.

कलकत्त्याच्या काँग्रेसनंतर नागपूरला (१९०७) काँग्रेस भरविण्याचे ठरविताना फिरोजशहा मेहतांना असा विश्वास होता की, नागपूरकडील प्रागतिकांच्या वजनदारीचा उपयोग १९०५ सालापासून काँग्रेसमध्ये शिरलेल्या स्वदेशी-बहिष्कारादि वेडांना बाहेर काढून लावण्यात होईल. पण अनुभव उलटा आला. नागपूरकडील राष्ट्रीय काँग्रेसचे (१९०७ चे) अध्यक्ष लो. टिळक व्हावेत असा आग्रह धरू लागले

आणि मेहतांचे तिकडील पाठीराखे यांचे त्यांच्यापुढे काही चालेना. म्हणून मेहतांनी मुंबईस १० नोव्हेंबर १९०७ रोजी आपल्या येथे ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची सभा बोलावली होती. तीत ना. गोखले, वाच्छा, मेहता, महंमदअल्ली जिन्ना, अम्बालाल साखरलाल, टिळक, विजय राघवाचारीअर वगैरे तेरा मंडळीही हजर होती. त्या सभेकडे सुरतेहून एक शिष्टमंडळ येऊन बसले होते, म्हणत होते की, कॉंग्रेस नागपूरला न भरवता सुरतेस भरवावी. नागपूरची बाजू मांडावयास डॉ. मुंजे, अळेकर वगैरे आले होते. पण त्यांची रवानगी करून देऊन सुरतेचे निमंत्रण स्वीकारण्यात आले. बंगालमधील राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा काढण्यास " उदारहस्ते देणग्या देणारा तो कमलावर " राजकारणाची धुरा घेण्यासाठी त्याच वेळी मुक्रर झाला होता. ११ नोव्हेंबरलाच (१९०७) सरकारने मोकळे केलेले लाला लजपतराय मंडालेहून हिंदुस्थानात येताच त्यांना अविरोध सुरत कॉंग्रेसचे अध्यक्ष करावे, म्हणून ताराच तारा सगळीकडून स्वागत-समितीकडे येऊ लागल्या होत्या. लालाजींच्या नकारानेच तो मुद्दा बाजूला सरला, तरी स्वागतसमिती आणि कॉंग्रेसश्रेष्ठी उमलत्या तरुणांच्या भावनांना व मतांना मानावयास तयार नाहीत, हे कवित्व उरलेच ! तेव्हा लालाजींप्रमाणे डॉ. घोषनीही नकार द्यावा म्हणून खटपट राहिली नाही. जमले नव्हते तरीही हे सर्व किरकोळच होते. मुद्द्याची गोष्ट होती ती ही की, कलकत्त्यापर्यंत कॉंग्रेसने केलेली प्रगती पुसली जाणार की काय ? सुरतेस व्हावयाच्या ठरावांच्या निश्चित स्वरूपावर ते अवलंबून होते. पण ठरावाचे मसुदे करण्याचे काम कॉंग्रेसचे सेक्रेटरी गोखले यांच्याकडे एवढ्या छोट्या मुदतीने सोपविण्यात आले होते की, विचारविनिमयाचा मांड मांडावयास मुळी वावच नव्हता. तरीही गोखल्यांनी तयार केलेल्या मसुद्यांत तसे फारसे कलकत्त्याच्या कॉंग्रेस ठरावांना सोडून काही नव्हते. पण आपण केलेल्या स्वरूपातच ते पास होतील असे हमीपूर्वक आश्वासन गोखल्यांसारख्या जबाबदारीच्या जागेवर असलेल्यांस लोकशाहीचा मान राखावयाचा तर, आगाऊ कसे देता येणार ? तेव्हा टिळक व अरविंद घोष यांनी सुरतेस व्याख्यानांची सत्रेच चालू केली. अगोदरच नागपूरहून कॉंग्रेसचा मुक्काम सुरतेस हलण्याचे ठरताच, दादासाहेब खापर्डे-प्रभृतींनी आपल्या राष्ट्रीय पक्षातर्फे सुरतेस तंबू ठोकून लोकांत ज्ञानजागराचे कार्य चालविले होतेच. त्यात टिळक-अरविंदांची भर पडली. त्यानंतर ता. २७ डिसेंबर रोजी अधिवेशन तहकूब झाल्यावरही मध्यरात्रीपर्यंत राष्ट्रीय प्रागतिकांच्या तडजोडीचा प्रयत्न पराकाष्ठेने झाला होता. पण सगळे पालथ्या घड्यावरील पाणीच ठरले. ता. २८ डिसेंबरला टिळक अध्यक्षस्थानाबद्दल बोलावयास व्यासपीठावर चढले असता त्यांना प्रतिनिधींच्या न्यायबुद्धीला आवाहन करू न देता परत जावयास सांगितल्यावर टिळकांचा स्वाभिमान सहजच गरजला होता की " गला ढकलून काढल्याशिवाय ते शक्य नाही. "

सुरतेच्या बखेड्यातील वाइटातून चांगले एवढेच निघाले की, राष्ट्रीयांना व प्रागतिकांना आपल्यामागील लोकमताचा पाठिंबा कळून चुकला. सुरतेची काँग्रेस मोडल्याबद्दल अनेकानेक लहानथोर पुढाऱ्यांच्या वैयक्तिक इज्जती पणाला लागल्यासारख्या झाल्या. टिळक–गोखले हे लोकपुढारी मात्र या सर्व तुफान-लाटांच्यावर शुद्ध मन आणि शुद्ध डोके ठेवून राहिले. सुरतेस राष्ट्रीय–प्रागतिकांचे न जुळण्याचे एक कारण पुढे बाहेर आले ते असे की, डॉ. घोष यांच्या भाषणात राष्ट्रीयांच्यावर पुष्कळ प्रलाप उधळले होते ते काढून टाकण्यास त्यांनी नकार दिला. वृत्तपत्रांनी घोषांचे न झालेले भाषण छापले त्यावरून त्यांनी प्रलाप काढले होते, हा आरोप सिद्ध करणे अभ्यासकांना भागच आहे. बखेड्यानंतर, काँग्रेसचे जनरल सेक्रेटरी या नात्याने ता. ८ जानेवारी १९०८ रोजी ना. गोखले यांनी एक लांबलचक पण नम्र निवेदन काढले. त्यात सुरतेच्या स्वागत-समितीत लाला लजपतरायांना काँग्रेसचे अध्यक्ष निवडणारे बहुमत नव्हते, म्हणून त्यांच्या-सारख्या देशभक्ताचे अवमूल्यन होऊ नये म्हणून, त्यांच्या नावाची वाटाघाटच केली नाही, असे सांगून, ठरावांच्या मसुद्याविषयी गोखल्यांनी जनतेला कळविले की, स्वागत-समितीने स्वतःच ठराव-मसुदा करावयाचा असता ता. १५ डिसेंबर रोजी आपल्याकडे कागद लावून देऊन मसुदे करावयास सांगितले. कामाच्या गर्दीमुळे आपण ठरावाचे विषय मुकर केले तरी ता. २४ डिसेंबरअखेर मसुदे तयार करू शकलो नाही; कलकत्त्यासदेखील अगदी शेवटच्या घटकेलाच ठरावाचे मसुदे तयार होऊन आले; तेथे तकारी झाल्या नाहीत मग सुरतेसच का व्हाव्यात? आयत्या वेळी गडबडगुंडा करून कलकत्त्यापेक्षा मागे पाऊल घेतल्याचे ठराव लोकमताने पास झाले, असा बभ्रा करावयास वाव का देता? असा सुरतेला आगाऊ मसुदे मागण्याची घाई करणारांचा सवाल होता. कारण प्रांतिक परिषदांच्या ठरावांनी तशा संशयास जागा केली होती. गोखल्यांनी म्हटल्याप्रमाणे, स्वागत-समितीचे मसुदे म्हणजे फर्माने नव्हत, हे खरेच आहे. त्या मसुद्यात बदल, पुरवणी किंवा होत्याचे नव्हते व नव्हत्याचे होते करण्याचा सर्व अधिकार ऐन सभेचाच आहे. पण घाईने काही दामटले जाऊ नये हा टिळकांच्यासारख्या आक्षेपकांचा हेतू होता. ता. २४ डिसेंबरला टिळकांनी ठरावांचा मसुदा पाहिल्यावर स्वराज्या-संबंधीच्या ठरावात टिळकांनी सुचविलेले शब्दबदल गोखल्यांनी स्वीकारले होते आणि "खिशाला चाट लावून घेऊन" हे शब्द स्वदेशीवरील ठरावात नजर-चुकीने राहून गेले होते, तेही घालण्यात आले होते. कलकत्त्यास पास झालेल्या बहिष्काराच्या ठरावाचा अर्थ सरकारी संस्था व शासन यांचाही बहिष्कार इतका व्यापक केल्याने त्याला फुकट स्वप्नरंजनाची उग्रता यावयाची, ती येऊ नये, म्हणून तो बहिष्कार कापडापुरताच मर्यादित केला तो ठरावाच्या स्पष्टार्थासाठी केला, असेही आपल्या निवेदनात गोखल्यांनी सांगून टाकले होते. येथेच मतभेदाला

वाव मिळाला. कारण कलकत्त्यास बहिष्काराच्या ठरावाच्या वेळी गोखल्यांनी अर्थ-व्यापकतेला आक्षेप असल्याचे निदर्शनास आणले असूनही, त्यांच्या म्हणण्यास साथ मिळाली नव्हती. त्यामुळे "न निश्चय कधी ढळो।" म्हणून उभयपक्ष आपापल्या तत्त्वार्थास चिकटून बसले यावद्दल कोणीच कोणाला दोष देणार नाही; तिन्हाईतही कोणाला दोष चिकटवीत नाहीत. पण "कुजन–विघ्न–बाधा टळो।" या सात्त्विक भूमिकेवरून मतभेद असणारांना ज्यांनी जितक्या बेफिकिरीच्या पद्धतीने वागविले, त्यांना तितक्या प्रमाणात दोष येणारच. लो. टिळकांनीही गोखल्यांच्या निवेदनावर सविस्तर भाष्य करून आपली आणि आपल्या पक्षाची बाजू खरी असल्याची खातरजमा करण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि, राष्ट्रीय जीवनात मनास लागून राहणाऱ्या सुरतेसारख्या बनावाबद्दल दोषांची वाटणी कोणाकडे किती हा हिशेब करीत बसण्यापेक्षा, काँग्रेसमधील एकजिनसी शक्ती अशी काही भंग पावली की, पक्की सांधेजोड पुन्हा केव्हाच होऊ शकली नाही, हा विचार अभ्यासकाला अस्वस्थ केल्याशिवाय रहात नाही.

ता. २८ डिसेंबर १९०७ रोजी सुरतेत दोन्ही पक्षांच्या निरनिराळ्या सभा झाल्या आणि ता. २७ रोजीच आपल्या पक्षाच्या म्हणून काढलेल्या जाहीरनाम्याप्रमाणे, त्यांचे सवते सुभेही तयार झाले. लक्षात भरण्यासारखी गोष्ट अशी आहे की, सुरतेच्या काँग्रेसला आल्यानंतर सम्राटाच्याही स्वागताला लाजवील असे मिरवणुकीने, जयजयकाराने व हारांनी ज्या लाला लजपतरायांचे स्वागत झाले होते त्यांची सही एकाही जाहीरनाम्यावर नव्हती. दोनही जाहीरनाम्यांत "स्वराज्य" हा ध्येयवाचक शब्द समान असला तरी "तो रामाचा चंद्राकरिता हट्ट" असल्याचाच प्रकार आहे, अशी हिंदुस्थानची कुचेष्टा करण्यापर्यंत ब्रिटिश सत्ताधारी मुत्सद्द्यांना आनंद व्हावा, एवढा परिणाम सुरतेच्या त्या बखेड्याने केला होता. ना. गोपाळराव गोखल्यांच्या मनाने तर गणित मांडले होते की, सुरतेला काँग्रेसची सुरत सरल्याकारणाने, हिंदुस्थानास अन्यथा मिळाल्या असत्या त्या सुधारणांवरही नौकरशाही आता बोळा फिरवणार.

ꕥ ꕥ ꕥ

२४ : मोर्ले–मिंटो सुधारणा

लॉर्ड मिंटोंनी ना. गोपाळराव गोखल्यांना इंग्लंडात जाऊन लॉर्ड मोर्ले-साहेबांस मदत करण्याबद्दल सुचविले होते. कारण हिंदुस्थानाला काही तरी राजकीय सुधारणा दिल्याशिवाय हिंदुस्थानातील असंतोष व असंतोषाच्या पोटी निर्माण झालेला दहशतवाद शमणार नाही याची दिवसेंदिवस ब्रिटिश सरकारचीही खात्री वाटू लागली होती. पं. श्यामजी कृष्णवर्मा यांनी १९०५ मध्ये पॅरिसमध्ये स्थापलेली इंडियन होमरूल लीग आणि पुण्यास स्वा. सावरकर प्रभृतींनी केलेल्या विदेशी कापडाच्या होळ्या, इंग्लंडात १९०७ मध्ये मदनलाल धिंग्राने सर वायलीला दाखवलेले यमसदन आणि बंगालमध्ये निर्माण झालेल्या अनुशीलनप्रभृति संस्था, स्टूटगार्ड येथे मॅडम कामाने उभारलेले स्वतंत्र हिंदुस्थानचे निशाण आणि जर्मनीत असलेल्या हिंदी विद्यार्थ्यांना विश्वासात घेण्याचा जर्मन नेतृत्वाचा प्रयत्न, सेनापती महादेव पांडुरंग बापट प्रभृतींनी रशियन क्रांतिवीरांकडून मिळवून हिंदुस्थानात प्रसृत केलेले बॉम्बचे अभ्यासतंत्र या सर्व गोष्टींचा विचार करता, काँग्रेसमधील राष्ट्रीय प्रागतिकांच्या मतभेदावर भिस्त ठेवून आपले फोडा–झोडाचे धोरण फारसे इष्ट फलदायी होणार नाही, हे राज्यकर्त्यांपैकी अनुभविकांना कळून चुकले होते. उलट वर वर्णिलेले सगळे दाखले जमेस धरून राज्यकर्ते दबले असा बदलौकिक करून घेण्यापेक्षा हिंदुस्थानच्या लोकांना दडपशाहीने प्रथम दाबून काढावे आणि मग फार तर जगापुढे आपला उदारपणा मिरवीत मिरवीत दया म्हणून राजकीय सुधारणांचा एखादा तुकडा हिंदी लोकांच्या अंगावर टाकला तर टाकावा अशी वृत्ती इंग्रजी जनतेत बळावण्याची भीतीही या विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात निर्माण झाली होती. म्हणून कर्झनसारख्या अरेरावापासून इंग्रजी राजवंटीतील मातबर बरकंदाजांना ज्यांचे लोकनेतृत्व "गंभीर आणि शहाणे" वाटत होते, त्या ना. गोखल्यांनीच मोर्लेसारख्या उदारमतवादी मुत्सद्द्याला साथ द्यावी, असे लॉर्ड मिंटोच्या तोंडून इंग्रजांची कारभारकुशलता बोलली. शान्तपणे सनदशीर चळवळ करणाऱ्या काँग्रेसचे तर ते एकवेळचे अध्यक्ष व बहुत वर्षांचे जनरल सेक्रेटरी म्हणून विश्वस्तच होते. त्यामुळे उभयसंधिस्थानावरील "दुर्लभः कार्यकर्ता" असे कालौघसुगम स्थान ना. गोखल्यांना प्राप्त झाले होते. त्यांनाही

वाटत होते की, नवीन राजकीय हक्क लोकांना ताबडतोब मिळतील तर समाज-स्वास्थ्याच्या सेवेला पुष्कळच लोकांना लागता येईल. म्हणून स्वतःच्या सदसद्विवेक-बुद्धीशी आणि भारत-सेवक म्हणून घेतलेल्या व्रताशी निष्ठावंत राहून " कोणाही जीवाचा न घडो मत्सर । " हे सर्वेश्वरपूजनाचे मर्म कर्तव्यबुद्धीने आचरावयाचे त्यांनी ठरविले.

इंग्लंडची राज्यसूत्रे या काळी उदारमतवादी पक्षाच्या हाती होती. ता. १४ एप्रिल १९०६ रोजी जेव्हा गोखले यांनी इंग्लंडची तिसरी सफर केली त्या वेळीच त्यांनी अनेक मुत्सद्द्यांच्या गाठी घेतल्या होत्या आणि लिव्हरपूलसारख्या ठिकाणी व्याख्याने देऊन जनमनावर ठसविले होते की, इंग्रजी राज्यात गेल्या दहा वर्षांत दोन कोटी हिंदी लोक उपाशी मेले आणि सात कोटी लोकांना पोटभर अन्न म्हणजे काय, हेही धड ठाऊक झाले नाही ! हिंदुस्थानवरील इंग्रजी राजवटीचे दुष्परिणाम आता १९०८ सालीही गोखल्यांनी ब्रिटिश जनतेला समजावून सांगितले आणि " सेक्रेटरी ऑफ् स्टेट फॉर इंडिया " असलेल्या लॉर्ड मोर्ले यांना बजावले की, " हिंदुस्थानातील लोकांचा ब्रिटिशांवरचा विश्वास उडत चालला आहे. एकदा मन तुटले की मग ते ब्रह्मदेवासही सांधता येणार नाही. म्हणून राजकीय हक्क वाढत्या प्रमाणात देणे प्रसंगोचित ठरणार आहे."

जून १९०७ मध्ये अर्थसंकल्पावर भाषण करताना ब्रिटिश पार्लमेंटास लॉर्ड मोर्ले यांनी हिंदुस्थानास द्यावयाच्या सुधारणेचा सर्वमान्य आराखडा सांगितला होता. हिंदुस्थान सरकारच्या ठिकाणी अतिकेंद्रित झालेल्या सत्तेचा अभ्यास करण्याकरिता एका रॉयल कमिशनची आपण नेमणूक करणार असून मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारातील विधिमंडळांचा विस्तारही साधावयाचा; सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया यांच्यासाठी प्रतिष्ठितांचे एक सल्लागारमंडळ निर्माण करावयाचे असून त्यातील दोन सभासद भारतीयच ठेवावयाचे; या रूपरेषेप्रमाणे सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या कौन्सिलवर ताबडतोब सर के. जी. गुप्ता आणि सय्यद हुसेन बिलग्रामी यांची नेमणूक झाली सुद्धा ! तथापि, मोर्ले यांच्या या घोषणेने हिंदुस्थानच्या राष्ट्रीयांत फारसा उत्साह निर्माण झाला नाहीच; प्रागतिकांना मात्र असे वाटत होते की, मोर्ले यांच्या त्या कोरडवाहू शब्दसृष्टीतून कोठे तरी पाणीदारपणा चमकेल ! गोखले आता १९०८ मध्ये इंग्लंडमध्ये आल्यावर त्यांनी मोर्ले यांना सूचना केल्या त्या अशा :

> " कायदेमंडळात लोकनियुक्त प्रतिनिधींची वाढ करावी; गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळांत एतद्देशीय प्रतिनिधी असावेत; स्टेट सेक्रेटरीच्या कौन्सिलमध्येही निदान दोन तरी एतद्देशीय प्रतिष्ठित असावेत."

लॉर्ड मिंटो हे कारभाराच्या कार्यकारी मंडळात एतद्देशियांना घेण्याच्या

अगदीच विरुद्ध होते. परंतु मोर्लेनी सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या कौन्सिलात दोन एतद्देशीय घेऊन उदाहरणच घालून दिल्याकारणाने त्यांना गप्प बसावे लागले.

इंग्लंडात जर काही ठळक रीतीने गोपाळराव गोखल्यांच्या हृदयात बाणले असेल, तर हिंदुस्थानातील जातिजातींच्या वैमनस्याने राष्ट्रीय कार्याला होणारी अडचण ! १९०६ साली मुस्लीम लीगच्या स्थापनेने स्वतंत्र मतदारसंघाची मागणी लॉर्ड मिंटोच्या कारकीर्दीत घडविण्यात आली, तिचे प्रेरक कर्झन–फुल्लरांचे दिल्ली–कलकत्त्यातील व इंग्लंडमधील देशबांधवच असता आणि त्यांनीच जाती-जातीतील वैमनस्य पेटविण्याचे व धुमसविण्याचे पाप केले असता, नेमकी तीच सबब पुढे करून अडवणूक व्हावी, यालाच उलट्या काळजाचा कारभार म्हणावयाचा नाही काय ? रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनाच नव्हे तर स्वतः मोर्ले यांना, हिंदुस्थानातील हिंदु-मुसलमानांची तेढ आणि त्यांतही स्वतःचा म्हटलेला मुसलमानांचा अलगपणाबद्दलचा हट्ट ही सारी किमया लॉर्ड मिंटोची असल्याबद्दल जाणीव असून व आपल्याला ती जाणीव असल्याचे लॉर्ड मिंटोला ६ डिसेंबर १९०९ च्या पत्रात लॉर्ड मोर्लेनी स्पष्ट कळवले असूनही, प्रत्यक्ष राज्यकारभारात, स्थानिक पदाधिकाऱ्याच्या मताला महत्त्व देण्याच्या रिवाजाच्या नावाखाली, मोर्ले मिंटो मतापुढे नांगी टाकीत ! ! मोर्ले–मिंटो या दोघांनाही गोखल्यांच्याबद्दल आदर वाटे; पण गोखले हे शेवटी हिंदू आहेत हे शल्य मिंटोच्या मनास टोचे ! ! म्हणून " फोडा आणि झोडा " च्या पूर्वापार चालत आलेल्या ब्रिटिशांच्या राजनीतीचे पवित्रे कसेही पडले तरी हिंदुस्थानातील राजकारणाच्या जाणकारांनी त्याला का बळी पडावे अथवा स्वतः विवश होऊन त्या " फोडा–झोडा " धोरणाचीच साथ करून परकीय सत्तेच्या स्थायीभावाला का हातभार लावावा हेही एक कोडे गोखल्यांना पडत असे. म्हणून हिंदु-मुसलमानांच्याच काय, पण काँग्रेसमध्ये उत्पन्न झालेल्या दोन पक्षांतसुद्धा फूट न ठेवता, सर्वांनी एका निशाणाखाली यावे आणि जे काही मिळवावयाचे ते एकजुटीने मिळवावे असे गोपाळराव गोखल्यांस फार फार वाटे.

पण त्या वाटण्याचा त्या वेळी फारसा उपयोग झालाच नाही. ब्रिटिश पार्लमेंटने मोर्लेनी मांडलेला सुधारणा-कायदा पास केला, पण त्याच्या अंमल-बजावणीसाठी करावयाचे कानू लॉर्ड मिंटो यांच्याकडे सोपविले. लॉर्ड मिंटोनी त्या कामी करामत करून हिंदुस्थानला इंग्लंडने उजव्या हाताने जे दिले होते ते डाव्या हाताने काढून घेतले जाण्याची व्यवस्था केली. त्यामुळे गोखल्यांना हिंदुस्थानचे हितशत्रू लंडनच्या मुत्सद्द्यांत नसून हिंदुस्थानातील नोकरशाहीतच आहेत हे कळले आणि हिंदुस्थानचा पगार खाऊन त्यांचे ते बेइमानी खेळ चालतात, याच्या प्रखर जाणिवेने गोखल्यांच्या अंतःकरणाला इंगळ्या लागल्या-सारखे झाले. सुधारणा-कायद्याच्या कानूखाली हद्दपार केलेल्या लोकांना आणि राजकीय गुन्हेगारांना निवडणुकी लढविण्यास बंदी घालण्यात आली त्याविरुद्ध

गोखल्यांनी ओरड करताच, "गोखल्यांच्यासारख्या सर्वसामान्य निरीक्षणाने बोलणाऱ्या सदिच्छेच्या माणसाचे शब्दावरून, हिंदुस्थानात आम्ही धोके पत्करावयास तयार नाही" असे लॉर्ड मोर्ले हे सुद्धा त्यांच्याच सुरात सूर मिळवून बसले!! गोखल्यांना या सर्वांचे काहीच नव्हते. आपल्या भारतभूमीचे प्रागतिक कल्याण एवढाच त्यांच्या बुद्धीचा अखंड ध्यास होता. हिंदुस्थानातील प्रजेबद्दल राज्यकर्त्यांचा अविश्वास, लोकांच्या दारिद्र्याबद्दल व हाल-अपेष्टांबद्दल राज्यकर्त्यांची बेगुमानी यांमुळे परकीय सत्तेबद्दलचा कडवटपणाच गोखल्यांच्या मनात हळूहळू रुजू लागला.

मोर्ले-मिंटो सुधारणांची घोषणा १९०८ च्या उत्तरार्धात झाली आणि त्यानंतर १९०९ पासून त्या अमलात आल्या. लोकशाहीचा छाया-प्रकाश तरी हिंदुस्थानला त्या सुधारणात मिळेल, अशी जी अपेक्षा होती ती फुकट गेली. अधिकारांचे केंद्रीकरण सर्वथैव मध्यवर्ती सरकारात होऊन राहिले होते ते तसेच राहिले! कारभारी–कार्यकारी मंडळाची हुकुमत विधिमंडळावर रहावयाची, हिंदुस्थानातील एकंदर राज्यकारभाराची अंतिम जबाबदारी ब्रिटिश पार्लमेंटच्या खुंटाळ्याला टांगलेली आणि प्रांतिक सरकारावर हिंदुस्थान सरकारची हुकुमत राखलेली; नाही म्हणावयास, विधिमंडळाच्या निवडणुकीत लोकांचे अधिकार वाढले, विधिमंडळात कारभारविषयक प्रश्न करण्याची आणि ठराव मांडण्याची मुभा लोकप्रतिनिधींना मिळाली, पण हिंदु-मुसलमानांचे स्वतंत्र मतदारसंघ निर्माण झाल्याने एकजिनसी राष्ट्रीयत्वाने होणाऱ्या सर्व प्रगतिवर पाणी पडले! नामदारांच्या इंग्लंडमधील चौथ्या फेरीत एवढेच साध्य झाले!!

* * *

२५ : मानापमान

भारतसेवक ना. गोपाळ कृष्ण गोखले सुरतेच्या घोटाळ्यानंतर राजकीय सुधारणांच्या प्रगतीला हातभार लावण्यासाठी इंग्लंडला गेले असता, इकडे हिंदुस्थानात ब्रिटिश राजवटीबद्दलचा असंतोष प्रगट करणाऱ्यांना जन्माजन्माचे धडे देण्याचा दडपशाही झपाटा ब्रिटिश राजवटीने चालविला होताच. त्यात लो. टिळकांना १९०८ साली मंडालेस हद्दपारीची शिक्षा झाली. लोकमान्यांना ती शिक्षा देणारे न्या. दावर हे जसे महाराष्ट्रातील तरुण क्रांतिकारकांच्या रागाचा विषय होऊन बसले, तसाच प्रसंग ना. गोपाळराव गोखल्यांनीच मोर्लेसाहेबांच्या कानाशी लागून टिळकांच्यावर सुरतेच्या बखेड्याचा सूड घेण्यासाठी तो सरकार-कडून खटला भरवला, अशी एक कंडी उगाचच पिकल्यामुळे, गोखल्यांच्यावर ओढवला ! ती कंडी पिकवणारांना आधार काय तर लोकमान्यांना झालेल्या त्या शिक्षेचा निषेध करण्याकरिता जी सभा इंग्लंडात झाली तिला ना. गोखले हजर राहिले नव्हते.

वस्तुतः इंग्लंडात हिंदुस्थानला मिळावयाच्या राजकीय सुधारणांसाठी खटपट करावयास गेलेले गोखले, टिळकांच्या शिक्षेचा नुसता निषेध करीत बसण्यापेक्षा, त्यांची सुटका करण्याचा प्रयत्नाला लागले होते. ना. गोखल्यांची टिळकखटल्यासंबंधी मनोवृत्ती कशी होती हे गोखल्यांनी ना. श्रीनिवासशास्त्री यांना लिहिलेल्या पत्रावरून सहज प्रतीत होण्यासारखे आहे. ता. १७ जुलै १९०८ च्या या पत्रात गोखले लिहितात : " टिळकांच्या बचावाच्या भाषणाचे सार येथे समजले. तेवढ्यानेही येथे चांगलाच ठसा उमटविला आहे. ते निर्दोषी सुटले तर आम्हा सर्वांना अंतःकरणापासून आनंदच वाटेल. त्यांचे प्रॉसीक्यूशन ही एक सरकारची भयप्रद चूक आहे, असे मला वाटते. आपण सनदशीर सुधारणावादी असल्याची भूमिका टिळक आपल्या बचावात मांडत असल्याचे त्या तारेवरून समजते. ती भूमिका अगदी स्वच्छपणे ते मांडतील आणि जर त्यांची निर्दोष मुक्तता होईल, तर हिंदुस्थातील सनदशीर राजकारणी पक्षाला त्यायोगे मूठभर मांस चढेल. "

त्यानंतर ता. २३ जुलै १९०८ च्या पत्रात गोखले लिहितात—

" टिळकांना झालेल्या शिक्षेच्या निर्णयासंबंधीच्या तारांनी आजची

सकाळची वृत्रपत्रे भरली आहेत. जेव्हा केव्हा चालू गडबडी शान्त होतील, तेव्हा टिळकांना मंडालेहून परत आणण्यात येऊन मुक्त करण्यात येईल याविषयी, अर्थातच शंका नाही; तरीही त्यांना झालेली शिक्षा व तीसंबंधीचा निर्णय आपल्या पक्षाला मोठाच धक्का देईल; कारण सरकारविरुद्ध होणाऱ्या प्रक्षोभाची काही उसळी आमच्याही विरुद्ध उठेल. तथापि, त्याला इलाज नाही. आणि म्हणून होईल तितके करून आपले कर्तव्य आपण नेकीने करीत राहिलेच पाहिजे. "

यापुढील ना. गोखल्यांचे तिसरे बोलके पत्र ता. १३ ऑगस्ट १९०८ चे आहे, ते असे :

" टिळकांच्यासंबंधाने बोलावयाचे तर माझ्या मनात एवढासुद्धा किंतू नाही. थोडा काळ गेल्यावर त्यांना प्रत्येक बाबतीत अदबीने वागवण्यात येईल, आणि पुढल्या वर्षी संकल्पित राजकीय सुधारणा अमलात आल्यावर, हिंदुस्थानात शांतता असल्यास त्यांची मुक्तता होईल, याबाबत मला जे काही करता येईल, ते शक्य तेवढे मी जरूर करीन याबाबत तुम्ही खात्री बाळगा; पण मला त्याची वाच्यता करणे पसंत नाही. कारण की, आमचे जहाल मित्र ' अर्थाचा विपर्यास 'ही करतील. वर्षाऋतु सुरू होईपर्यंत येथे इंग्लंडमध्ये आता काही करता येण्याजोगे नाही; आणि त्यानंतरसुद्धा सर जॉर्ज क्लार्क (लॉर्ड सिड्नहॅम) यांच्याच हाती खरोखर सर्व काही आहे. कारण त्यांच्याच न्यायविवेकाबद्दल लॉर्ड मोर्लेना विशेष आदर आहे. वर्षाऋतूच्या काळातील माझ्या इंग्लंडमधील मुक्कामात मी भूमिका साफसूफ करून ठेवीन आणि डिसेंबरात हिंदुस्थानात परत आल्यावर, जरी देशात व विशेषतः मुंबई इलाख्यात पुढील काही महिने साधारणपणे नांदणाऱ्या वस्तु-स्थितीवर प्रत्येक गोष्ट अवलंबून राहिली नाही तरी सर जॉर्ज क्लार्क यांच्याजवळ व्यक्तिशः शब्दावर शब्द टाकण्याच्या कामास लागेन. "

ना. गोखल्यांच्या या पत्रावरून त्यांचे निर्मळ अंतःकरण स्पष्ट होते. पण त्यांनी या पत्रातून केलेले सर्व अंदाज सरकारने सपशेल पालथे पाडले ! मोर्लेकडील आपली शिष्टाई यशस्वी झाली, मिंटोस एतद्देशियांना बड्या पगाराच्या जागांवर घेण्याबद्दल मोर्लेनी सुचविले. तेव्हा विलायतेतील कामगिरी संपवून गोखले मायभूमीस परत आले. हिंदुस्थानात मुझफरपूर वगैरे ठिकाणचे दंगे चालूच होते. त्या अत्याचारांचा अडसर मी सुधारणांस येऊ देणार नाही असे मिंटोंनी गोखल्यांना आश्वासन दिल्यावर त्यांचा जीव भांड्यात पडला. पण कुत्र्यांच्या शेपट्या आपल्या वळणावर गेल्याशिवाय राहिल्या नाहीत. १९०९ साली मोर्ले-मिंटो सुधारणा जारी होऊनही राजकीय कैदी तुरुंगातच कुजत पडले होते. दडपशाहीचे धोरण दणकेबाज होते, आणि बंगालच्या फाळणीने झालेला राजकीय अन्याय वज्रलेपच होता !

मोर्ले-मिंटो सुधारणा १९०८ च्या उत्तरार्धात राणीच्या राज्याला ५० वर्षे होतात म्हणून जाहीर झाल्या. तेव्हा सर्वच हिंदुस्थानचे राजकीय वातावरण गुदमरून गेले होते. बिपिनचंद्र पॉल, अरविंद घोष वगैरेंच्या भाषणांनी व लेखांनी नवीन पक्षाचा, नवीन पिढीचा असंतोष दृढतर झाला होता; पंजाबातून लाला लजपतराय व अजितसिंग यांची उचलबांगडी झाली होती; मद्रासकडे भयंकर दंगे झाले; मेमनसिंग येथे मुसलमानांच्या धर्मवेडाला ऊत येऊन अनन्वित प्रकार घडले; राजकीय पुढाऱ्यांतील फूट अधिकच फोफावली; अराजकपंथाची प्रणाली हिंदुस्थानात पसरली व बॉम्ब या देशात वाहेरून आला नि तयारही होऊ लागला.

आणि तरीही देशसेवेचा स्वबुद्धिदृष्ट मार्गावरील कर्मयोग गोपाळराव गोखल्यांनी सोडला नाही. राजकीय घडामोडींत त्यांच्याच प्रयत्नामुळे झालेल्या सुधारणांत विशेष म्हणजे सरकारच्या कार्यकारी मंडळात एका हिंदी सभासदाचा समावेश हा भावी स्वराज्याच्या कारभाराचा चंचुप्रवेश होय. त्याशिवाय, स्टेट-सेक्रेटरीच्या कौन्सिलपासून प्रांतोप्रांतीच्या कारभारी मंडळातील लोकप्रतिनिधींचा समावेश गोखल्यांच्याच परिश्रमाने झाल्याकारणाने मोर्ले-मिंटो-सुधारणांच्या पार्श्वसंगीतात गोखल्यांचे नाव जपले जाण्यासारखे झालेच आहे.

सन १९०९ च्या प्रारंभी गोपाळराव गोखल्यांस अमेरिकेत व्याख्याने देण्यासाठी मोठ्या मानाचे निमंत्रण आले होते. आपणही स्वामी विवेकानंदांसारखे व्हावे अशी एक वेळ इच्छा करणाऱ्या गोखल्यांना ही एक पर्वणी होती. पण मोर्ले-मिंटो सुधारणांचे कायदेकानू या वर्षी व्हावयाचे असल्याने गोखले अमेरिकेस गेले नाहीत. पुढे झालेल्या कानूंनी सुधारणांचा जीवच खाल्ल्यासारखे झाल्यामुळे गोखले संतापले! बंगाल व नाशिक येथे क्रांतिघोष चालू असता गोखले मुंबई-पुणे येथे ज्ञानदीप पाजळीत बसले. साहजिकच लोकनिंदा त्यांच्या वाट्यास आली. काँग्रेसच्या वा कन्व्हेन्शनच्या संघटनेने शांतिपूर्ण आघाडी उभारून करबंदीसुद्धा करा, पण निरर्थक व भपकेबाज स्वार्थ-प्राण-त्यागात अर्थ नाही असा गोखल्यांचा लोकांना उपदेश होता. सर्व देशात एकच सूर निघण्यावर गोखल्यांचा भर होता. पण तरीही सरकार-पक्षपाती म्हणून गोखल्यांची हेटाळीच झाली. अर्थात "निन्दन्तु नीतिनिपुणा। यदि वा स्तुवन्तु। लक्ष्मीः समाविशतु, गच्छतु वा यथेष्टम्॥" आपण आपल्या न्याय्य कर्तव्यापासून ढळावयाचे नाही एवढेच गोखले जाणत होते. सुरतेला काँग्रेसची गेलेली सुरत सावरून आणण्याचा प्रयत्न गोखल्यांच्या प्रागतिक पक्षातर्फे चालू असता, लोक त्यांच्या प्रयत्नापासून दूरच होते. महत्त्वाकांक्षी तरुणांना योग्य मार्ग लावणारा पुढारीच समाजांत नव्हता. जे होते ते सरकारने बंदीशाळेत कोंबले होते. सर्वसामान्य जनता "भयचकित" होती. सरकारच्या दडपशाहीने व कायद्यांच्या करकोचांनी "येता अशुभसा काळ नवा। स्वकर आवरा, कूर्म गुरु करा॥" असे लोक परस्परांस सांगत तर

ज्ञानजागराकरिता व लोकशिक्षणाकरिता अवतरलेल्या वृत्तपत्रांना सरकारने वेसण लावून ठेवली होती.

मुझफरपूर येथे ३० एप्रिल १९०८ ला खुदीराम बोसने तेथील डिस्ट्रिक्ट-जज किंग्जफोर्ड याला मारण्यासाठी म्हणून दोन बॉम्ब उडविल्यापासून स्वामी विवेकानंदांचे बंधू भूपेंद्रनाथ दत्त उघडउघड बंडाचा प्रचार करीत होते. त्याबद्दल त्यांना भयंकर शासन करण्याचे सरकारी सत्र सुरू झाले. 'केसरी'कार टिळक व 'काळ'कर्ते परांजपे यांनाही "कारागृही वास" करावा लागला आणि हिंदुस्थानातून राजद्रोह कोठच्या कोठे पळाला !! भारतीय असंतोष "गुप्ते" बनला. तो २१ डिसेंबर १९०९ ला नाशिकच्या कलेक्टरला उडविणाऱ्या अनंत कान्हेरेसारख्याच्या रूपाने कोठे कोठे उमट्ट लागला. याचे कारण गोखले सारखे सांगत होते ते एक होतेच, "सुधारणांच्या चालढकलीने त्यांची किंमत निम्मीशिम्मी आणिक गंमतगोडी झिम्मीझिम्मी" होऊन बसते, हेच खरे.

एप्रिल १९०८ मधील कन्व्हेन्शन् अलाहाबादला व डिसेंबरमध्ये मद्रासला काँग्रेस झाल्यावर १९०९ ची काँग्रेस लाहोरला झाली. पं. मदनमोहन मालवीय अध्यक्ष होते. धार्मिकतेच्या पायावर मोर्ले-मिंटो-सुधारणांतं उभारलेल्या सवत्या मतदारसंघाचा व जातवार प्रतिनिधित्वाचा निषेध, संयुक्तप्रांत – पंजाब पूर्व बंगाल, आसाम आणि ब्रह्मदेश या प्रदेशात राज्यपालांची कारभारीमंडळे निर्माण करण्याची मागणी, पंजाबमध्ये जारी केलेल्या जुलमी कानूंचा निषेध वगैरे ठराव तेथे पास झाले. १९१० व १९११ च्या काँग्रेसमधून लाहोर-(१९०९)च्या काँग्रेस-ठरावांचीच बहुधा पुनरावृत्ती झाली आणि नगरपालिका व लोकल-बोर्डे या "खराट्याच्या स्वराज्यात" देखील जातीय मतदारसंघ व जातीय प्रतिनिधित्व लादल्याबद्दल सरकारच्या मतलबी वृत्तीचा निषेध करण्यांत आला. १९१२ व १९१३ च्या काँग्रेसमधून मध्यवर्ती आणि प्रांतिक विधिमंडळांतून लोकनियुक्त प्रतिनिधींची बहुसंख्या असावी अशी मागणी करण्यात येऊन मोर्ले-मिंटो सुधारणांतील तत्त्वांच्या अंमलबजावणीच्या दोषाबद्दल निषेध व्यक्त होत होते. ना. गोखले यांपैकी १९१३ च्या काँग्रेस अधिवेशनाला आजारीपणामुळेच जाऊ शकले नाहीत; एरवी ते नियमित हजर राहिले. १९०९ च्या लाहोर काँग्रेसमध्ये त्यांनी निःशस्त्र प्रतिकारावर म्हणजे सत्याग्रहावर केलेले भाष्य त्यांच्या तोंडून निघालेली "गांधीगीता"च आहे. १९१२ च्या बंकीपूर येथील काँग्रेसमध्ये ना. गोखल्यांनी दक्षिण आफ्रिका व इतर वसाहतींतील एतद्देशियांसंबंधीं ठराव मांडला. "हिंदी लोकांचे कोणतेही हक्क आम्ही सोडले नाहीत किंवा हिंदी लोकांनी तिकडे जाण्याबद्दल प्रतिबंध तितकासा कबूल केला नाही; परंतु मुत्सद्देगिरीच्या दृष्टीने, सध्या जे लोक तेथे आहेत त्यांच्या गैरसोयी व गाऱ्हाणी दूर करण्याचा प्रयत्न आधी

केला पाहिजे असे गांधी-गोखले या दोघांनाही वाटले; काही अडचणीशिवाय येणे जाणे, मन मानेल तेथे वसती करणे, अगदी अप्रतिहत उद्योग उभारणे, शिक्षणास सरकारी मदत सरकारी नौकरी व सार्वजनिक कामे करण्यास अडकाठी नसणे, या सर्व गोष्टींचा 'गाऱ्हाणी नाहीशी करणे' यात समावेश होतो. म्हणून भारतवासीयांनी दक्षिण अफ्रिकेतील हिंदवासीयांना आपुलकीने व सर्वोपयोगित्वाने सहाय्य देणे कर्तव्य आहे" असे ना. गोखल्यांनी त्या ठरावावरील आपल्या भाषणात विनविले. काँग्रेसच्या बंकीपूर अधिवेशनात गोखल्याच्या दक्षिण अफ्रिकेतील कामगिरीचा गौरव करणारा व त्यांचे आभार मानणारा ठराव पास झाला.

या कोणत्याच गोष्टीकडे राष्ट्रातील उमलत्या पिढीचे लक्ष नव्हते. सुशिक्षितांत कडवटपणा आला होता. गरीबीने गांजलेल्यांना जीवनात आशेचा व प्रकाशाचा किरणही दिसत नव्हता. उद्योगधंद्यांना अवकळा आली होती. जमीन पिकवावयास शेतकऱ्यास सुचत नव्हते. विद्यार्थी-शिक्षकवर्गावर अनेक बंधने पडल्यामुळे महत्त्वाकांक्षाच काय, पण विद्याही शृंखलांनी जखडल्यासारखी झाली होती. त्यातूनही काळाची शैंडी धरून त्याला वाकविण्याचे धाडस करणारे तरुण "राष्ट्राचे भाग्य", "राष्ट्रीय वळण" आणि "राष्ट्रीय हुकुमत" हे परवलीचे शब्द वापरून नवीन राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा काढीत होते; गुप्त ठिकाणी लष्करी शिक्षण घेऊन ऐतिहासिक वीरवरांचे आदर्श डोळ्यापुढे ठेवून समर्पणबुद्धीने "स्वसुखनिरभिलाष" असे कर्मयोगी आयुष्य काढीत होते. हे तरुण आणि त्यांच्या पाठामागे आशीर्वादाचे हात उभारून व कृतज्ञतेची पूजा लावून असणारा समाज वरवर अकर्तृक दिसला तरी वंगभंग करून राष्ट्रात चैतन्य भरल्याबद्दल लॉर्ड कर्झनचे आभार मानात पारतंत्र्याशी सामना मांडून होता. ब्रिटिश नौकरशाहीदेखील चळवळीने न दबता उलट बाजूने, दडपशाहीचा जबडा उघडून बसली होती!!

आखाड्यात दोन पहेलवान घुमून राहिले म्हणजे त्यांची चीतपट कुस्ती तरी व्हावी लागते किंवा कोणी उस्तादाने त्या दोघांनाही बाजूस सारून अगर दोघांनाही गुंतवून ठेवील अशा विषयाकडे त्यांना न्यावे लागते. जगाच्या बदलत असलेल्या जमान्यातील वातावरणाने ते उस्तादाचे काम येथे केले. जर्मनीच्या कैसरने मिशीला पीळ भरून व ब्रिटिश साम्राज्यास आव्हान देऊन जागतिक युद्ध पेटविण्याची तयारी केली. तिला तोंड द्यावयाचे तर ब्रिटनच्या बाजूने लढणारे रंगरूट बहुसंख्येने हिंदुस्थानात ब्रिटिश-साम्राज्याला मिळवता येतील आणि या हिंदी रंगरूटांतील बहुसंख्य हिंदू असणार, तेव्हा वंगभंग रद्द झाल्याची घोषणा बादशहा पंचम जॉर्ज यांचे हस्ते मुद्दाम त्यांना १२ डिसेंबर १९११ रोजी, राज्यारोहणासाठी दिल्लीस आणून ब्रिटिश-साम्राज्यशाहीने करवली आणि हिंदुस्थानातील प्रक्षोभ शान्त होण्याच्या मार्गाला लागला. बादशहांचा प्रतिनिधी असलेला व्हाइसरॉय,

संभाव्य महायुद्धात शत्रूच्या बोटीवरील कप्तानाला एकाएकी युद्धकैदी करता येऊ नये, म्हणून हिंदुस्थानची राजधानी कलकत्त्याहून ऐतिहासिक परंपरेच्या दिल्ली शहरात आणल्याची घोषणाही पंचम जॉर्ज बादशहांच्या मुखातून ब्रिटिश साम्राज्य-शाहीने करवली. पण हा कावा ओळखणाऱ्या भारतीय तरुणांनी लॉर्ड हार्डिंज नव्या दिल्लीत शिरत असता १९१२ साली एका बॉम्बचा चटका दिलाच ! तरीही अगदी वरील संभाव्य महायुद्धाच्या वेळी सर्वत्र ब्रिटिश-साम्राज्याला अनुकूलता असावी, या धोरणाच्या अंमलबजावणीचा भाग म्हणूनच लॉर्ड हार्डिंज यांनी ना. गोखल्यांच्या शब्दाला मान देऊन ट्रान्सवालमधील भारतीयांचा प्रश्न सोडविण्यासाठी आपल्या वजनाचा उपयोग केला हे विसरता येण्याजोगे नाही.

मद्रासच्या काँग्रेसमध्ये (१९०८ च्या) ना. गोखल्यांनी, मोर्ले-मिंटो सुधारणांमुळे लोकप्रतिनिधीचा कारभारी मंडळात समावेश झाल्याने, त्या सुधारणा लोकांनी प्रयत्नपराकाष्ठेने राबवाव्यात अशी विनंती केली होती. स्थानिक स्वराज्य-संस्था सर्वस्वी लोकांच्या अखत्यारात आल्या होत्या. प्रांतिक सरकारात आणि मध्यवर्ती सरकारात कायदेशीरपणे नव्हे, पण व्यवहारतः लोकपक्षाचे बहुमत साधण्यासारखी योजना होती. मध्यवर्ती सरकारची कार्यकारिणी व सेक्रेटरी ऑफ् स्टेट यांचे अधिकार जरी अबाध राहिले असले तरी लोकप्रतिनिधींनी मनात आणल्यास, लोकशाहीचा श्री ग णे शा करण्यास वाव निर्माण झाला आहे, असे गोखल्यांचे प्रतिपादन होते. त्या दृष्टीनेच ते स्वतः वागले आणि म्हणूनही कदाचित दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांचा प्रश्न सोडविण्यात लॉर्ड हार्डिंज यांनी लक्ष घातले व ना. गोखल्यांच्या मागणीप्रमाणे सरकारने पब्लिक सर्व्हिस कमिशन नेमून त्यात ना. गोखल्यांचीही एक सभासद म्हणून योजना केली.

दरम्यान १९११ साली युनिव्हर्सल रेसिस काँग्रेसपुढे ना. गोपाळ कृष्ण गोखल्यांनी " पूर्व-पश्चिम-संस्कृतीवर " एक निबंध वाचला होता. दुसरे महत्त्वाचे त्यांचे कार्य म्हणजे देशभर हिंडून त्यांनी शैक्षणिक-संघ सर्वत्र स्थापन केले. हे संघ जनमत-शिक्षणासाठी होते. ते करताना त्यांना जी मुख्य गोष्ट साधावयाची तळमळ होती ती हिंदु-मुसलमानांचे ऐक्याबद्दल होती. त्यासाठी दफ्तरदाखला नसलेली पण गोपाळराव गोखल्यांनी या कालखण्डात केलेली महत्त्वाची राष्ट्रसेवा म्हणजे मुसलमान बांधवांच्या राजकीय धोरणाची दिशा स्वजातिप्रवणतेपासून सुटून राष्ट्रप्रवणतेकडे बदलण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न होय. मुंबईच्या सभेत ना. आगाखानांनी प्रकट केल्याप्रमाणे मुस्लीम लीगच्या ध्येयांचा आणि हेतूंचा काँग्रेसच्या ध्येयाशी आणि हेतूशी अखेरीस मेळ बसला त्याचे श्रेय ना. गोखल्यांनाच द्यावे लागेल. " मी सर्वांआधी भारतीय आहे, हिंदु वा मुसलमान नाही." या गोपाळराव गोखल्यांच्या वृत्तीचा, त्यांच्या शुद्ध देशभक्तीचा आणि निरपेक्ष राष्ट्र-

सेवेचा परिणाम महमदी बांधवांवर होऊन त्यांना ना. गोखले आपलेच पुढारी आहेत, असे वाटावयास लागले.

तथापि, घटकाभर डोळ्यात भरलेल्या अशा देखाव्यांना गोखले भुलले नव्हते. नौकरशाहीतील काही खमंग गणंगांच्या प्रेरणेने चालणारे सर सय्यद महंमद हिंदु-मुसलमानात द्वेषाचे जे विष पेरीत त्याने हिंदु-मुस्लीम-एकीची गोखल्यांची आशा सुटत चालली होती. १९१२ च्या मुस्लीम लीगच्या लखनौ बैठकीनंतर सरोजिनीदेवी नायडूंना गोखल्यांनी तसे बोलून दाखविले होते.

✕ ✕ ✕

२६ : तोतयाचे बंड ! आफ्रिकेतील हिंदी

ता. १६ नोव्हेंबर १८६० रोजीं हिंदी मजुरांचे जहाज आफ्रिकेत गेल्यापासून चालू झालेली वेठमजुरी ही एक मोठी समस्या बनली होती. फेब्रुवारी १९१० मध्ये मुदतबंदीची ती वेठमजुरी बंद करण्याचे ना. गोखल्यांचे विधेयक मंजूर झाले होते. इंग्लंडमध्ये दक्षिण आफ्रिकन कमिटी व लॉर्ड ॲम्प्टहिल यांनी जोराची चळवळ केली, पण आफ्रिकेत हे सर्व पालथ्या घड्यावर पाणी ठरले. १८९६ पासून बॅ. मोहनदास करमचंद गांधी ब्रिटिश आफ्रिकेत हिंदुस्थानी असहाय्य लोकांसाठी झगडत होते. ब्रिटिश प्रजाजन म्हणून साम्राज्यात इतरांच्या बरोबरीने भारतीयांना हक्क मिळाले पाहिजेत, निदान अपमानास्पद, बिनमाणुसकीच्या वागवणुकीचे कायदे रद्द झालेच पाहिजेत, असा त्यांचा दावा होता. वेठीच्या मजुरांवर वार्षिक तीन पौंडांची डोईपट्टी, हिंदी लोकांना विवक्षित जागेची व शिष्टाचाराची बंधने आणि हरएक प्रकारची क्रूर पिळवणूक सोसावी लागे. म्हणून हजारो लोकांना घेऊन (महात्मा) गांधींनी तेथे सत्याग्रह सुरू केला. हिंदुस्थानचा लौकिक सात्त्विक तेजाने तळपू लागला. छळाचा कळस करणाऱ्या गोऱ्या लोकांस कलंक लागला. या सुमारास (१९१२ साली) गांधींनी ना. गोखल्यांना आफ्रिकेत बोलावले. त्याचप्रमाणे हिंदुस्थान सरकारनेही गोखल्यांना शिष्टाईसाठी तेथे जाण्याची विनंती केली. मित्रमंडळी नको नको म्हणत असताही गोखले निघाले. साऊथ आफ्रिकन सरकार आपणास सर्वमान्य शिष्टाचारास धरून वागवील या शर्तीवरच ते निघाले होते. आफ्रिकेकडे जाणाऱ्या बोटीवर विशेषतः आशियाटिक घ्यावयाचे नाहीत असा कटाक्ष असे; पहिल्या वर्गातून प्रवास करावयाचा झाल्यास, त्यास सर्व केबीन भाडे भरून ती मिळावयाची ! ! गोपाळरावांना ही गोष्ट कळविण्यात आल्यावर, एकच तिकिट घेऊन मला प्रवास करण्याचा हक्क आहे, सर्व केबीनचे भाडे मी साफ देणार नाही आणि जर मार्गावर न याल तर कायदेशीर इलाज करीन, असे गोखल्यांनी जेव्हा उग्र स्वरूप धारण केले तेव्हा त्यांची एका तिकिटावर प्रवास करण्याची सोय झाली. एवढेच नव्हे, तर खाण्यापिण्याच्या बाबतीत आशियाटिकांना हिंदी अंत्यजासारखे वागवीत, त्याचा त्यांच्या बाबतीत कोठे मागमूसही न दिसता, गोखल्यांच्या जेवणाची व्यवस्थासुद्धा कप्तानाच्याजवळ, राखून ठेवलेल्या जागेवर झाली.

युरोपियन स्त्री-पुरुषांनी त्यांचे मग आनंदाने स्वागत केल्याने त्यांचा प्रवास सुखाचा झाला. २२ ऑक्टोबर १९१२ रोजी ते केपटाऊन येथे उतरले. युनियन-सरकारचे सेक्रेटरी त्यांच्या स्वागतार्थ आले होते. एखाद्या स्वतंत्र राष्ट्राच्या वकिला-प्रमाणे त्यांचे स्वागत झाले. एक सेक्रेटरी, एक आचारी व एक स्पेशल "सलून" त्यांना पुरवण्यात आले. आशियाटिक हिंदी लोकांनी आपल्या प्रतिनिधीची ही बरदास्त पाहून मिटक्या मारल्या. गांधींनी सांगितले, "बोटे चाटू नका!!"

गोपाळराव गोखले आफ्रिकेत तीन आठवडे होते. सर्व प्रांतभर ते हिंडले. प्रत्येक महत्त्वाच्या शहरी जाऊन त्यांनी व्याख्याने दिली. संपूर्ण स्थिती डोळ्यांनी पाहिली. प्रत्येक सभेस गावचा मेयर हा अध्यक्ष असावयाचा. हिंदी लोकांनी बहुमोल करंडकातून गोखल्यांना मानपत्रे दिली. गोखल्यांच्याबरोबर गांधीजी त्यांचे खाजगी चिटणीस म्हणून असत. गोखल्यांस तेथील एकंदर परिस्थितीचा संपूर्ण विचार करता यावा म्हणून सर्व सोयी युनियन-सरकारनेही करून दिल्या होत्या. गोखलेही शाही-मुत्सद्द्यांस साजेल अशाच गांभीर्याने वागत होते. प्रिटोरिया येथे मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर गोखल्यांनी मोठ्या जबाबदारीने शिष्टाई केली. त्या वेळी डोईपट्टी काढून टाकण्याचे त्यांस निश्चित आश्वासन मिळाले. दर्बानच्या मेजवानीच्या प्रसंगी व चेंबर्स ऑफ् कॉमर्सपुढे त्यांस तशी वचने देण्यात आली. किंबर्लेपासून जोहान्स-बर्गपर्यंतची ना. गोखल्यांची मोहीम टोलेजंग स्वागतांनी सजली. मुत्सद्दी म्हणून त्यांची छाप पाडून त्यांचा दौरा यशस्वी झाला. जोहान्सबर्गच्या दगडी दिवाण-खान्यातील मेजवानीच्या प्रसंगीचे ना. गोखले यांचे भाषण महत्त्वपूर्ण ठरले. त्या भाषणातून गोखले स्पष्ट म्हणाले की, "दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना आपण सर्वसमान कायद्याच्या संरक्षणाखाली राहतो आहो, अशी भावना झाली पाहिजे. दक्षिण आफ्रिका आपलीच मत्ता आहे असे मानणाऱ्या युरोपियनांचे लाकूडतोड्ये व पाणक्येच भारतीय होत, अशी दृष्टी ठेवली, तर हिंदुस्थान आपल्या हाती ठेवणे इंग्लंडला जड जाईल."

मग केपटाऊन, बेचुआनालँड, प्रिटोरिया ब्ल्यूमफाऊंट् वगैरे शहरे करून ना. गोखले ३० नोव्हेंबर रोजी मुंबासा येथे गेले. तेथे जीवनजी हॉलमध्ये हिंदी लोकांनी दिलेल्या मानपत्रास उत्तर देताना गोखले यांनी सूचक संदेश दिला की, "साम्राज्याचे प्रच्छन्न गुलाम, लाचार म्हणून राहण्याचे भारतीय कधीच पतकरणार नाहीत."

डोईपट्टी रद्द होण्याची अभिवचने जरी ना. गोखले यांस मिळाली तरी "वचने किम् दरिद्रता?" एवढाच त्यांचा अर्थ होता. दरवर्षी काही लोकांना धर्मोपदेशक म्हणून किंवा शिक्षक म्हणून आफ्रिकेत येण्याची परवानगी दिली, तरी लेखीटाकी काही नव्हते. एका जनरल बोथाच्या हातात काही नव्हतेच!!

ऑरेंज रिव्हर कॉलनी या फ्री स्टेटचा मुख्य प्रधान फिश्चर हा सर्वोच्या विरुद्ध होता. दुसऱ्यासाठी, त्यातूनही हिंदुस्थानी लोकांसाठी आपण झीज सोसावी अशी त्याला मुळीच इच्छा नव्हती. म्हणून गोखले-गीता "कालचा गोंधळ बरा होता" असेच म्हणून संपेल, असा अंदाज २१ नोव्हेंबर १९१२ रोजी 'स्टँडर्ड' या पत्राने प्रसिद्ध केला होता. आणि ८ जानेवारी १९१३ च्या लंडन टाइम्सने गोखल्यांची सूक्ष्म मुत्सद्देगिरी व युनियन-सरकारने त्यांना दिलेली माननीय वागणूक यांची प्रशंसा करून गोखल्यांची ही आफ्रिकेतील शिष्टाई चिरस्मरणीयच होईल असा निर्वाळा दिला असला तरी आफ्रिकेतील दि स्पेक्टेटरसारख्या प्रमुख पत्रापासून सर्वच नियतकालिके गोखल्यांच्या शिष्टाईला लुडबुडीच्या मोलाने मोजून उघड उघड संताप व हेटाळणी व्यक्त करीत होती. गोखल्यांनी एकच गोष्ट आफ्रिकेत स्पष्टपणे मांडली की, "ब्रिटिश साम्राज्याचा हिंदुस्थान हा एक महत्त्वाचा घटक आहे. हिंदुस्थानात राष्ट्रीय जागृती व ऐक्यभावना उत्पन्न झाल्या आहेत. जर भारतीयांस येथे (आफ्रिकेत) मज्जाव होईल तर हिंदुस्थान बिथरेल. दुसरी गोष्ट अशी की, आता हिंदुस्थानात नवीन नवीन कारखाने निघत असल्यामुळे तेथेच अधिकाधिक मजूर लागू लागले आहेत; तेव्हा इकडे आफ्रिकेत येणारा मजुरांचा प्रवाह आपोआपच आटेल. अर्थात हिंदी लोकांनी आफ्रिका गजबजेल ही भीती केवळ अनाठायीच आहे. म्हणून सध्या आहेत त्यांस योग्य व रास्त हक्क युरोपियनांच्या बरोबरीने देण्यास कोणती अडचण आहे ?"

ना. गोपाळराव गोखल्यांनी मुत्सद्दीपणास शोभेसे धोरण धरून आपल्या देशबांधवांची बाजू, स्वाभिमान व सदसद्विवेक जागृत ठेवून चोखपणाने मांडली होती, हे मॉर्निंग पोस्ट या पत्राने देखील मान्य केले. हिंदुस्थानचा प्रमुख पुढारी, सकल जनतेचा विश्वासपात्र नेता अशा दृष्टीने तिकडील लोकांनी गोखल्यांच्याकडे पाहिले. गोपाळराव दक्षिण आफ्रिकेत मुत्सद्दी या नात्याने व्यावहारिक तडजोड करण्यासाठी गेले होते. डच व हिंदी लोक या उभयतांकडून त्यांचे स्वागत होत होते. हिंदी बांधवांची यत्किंचितही नाउमेदी होऊ न देता, त्यांची स्वाभिमानाने तरफदारी करणे आणि युनियन सरकारपुढे व डच लोकांपुढे न्यायाची बाजू ठेवणे हे एका तारेवरून पाऊलटाक करून समुद्राची खाडी ओलांडण्याइतके कठीण होते. ना. गोखल्यांनीच ते एका व्याख्यानात विशद केले आहे. ना. गोखले आपली आफ्रिकेतील कामागिरी आटोपून हिंदुस्थानास परत आले तेव्हा मुंबईस त्यांच्या अभिनंदनार्थ जाहीर सभा भरली होती. त्यानंतर थोड्याच दिवसांनी गोखले बंकीपूरच्या काँग्रेसला (१९१२) गेले आणि तेथे त्यांनी आपल्या आफ्रिकन शिष्टाईचे वृत्त देशबांधवांना निवेदन केले. त्यांचा तेथे साहजिकपणेच गौरव झाला.

नुसती तीन पौंड वार्षिक डोईपट्टी बंद करणे म्हणजे काही शतकृत्य नव्हे, अशीही टीका ना. गोखले यांच्या आफ्रिकन शिष्टाईवर होण्यास चुकली नाही.

पण सर्वच अन्याय दूर होईपर्यंत आफ्रिकेतील आपल्या देशबांधवांना सत्याग्रहाने ओढवलेल्या तुरुंगात रखडत, खितपत ठेवावयाचे की काय? असा प्रश्न होता म्हणून सुधारणेचा चंचुप्रवेश साधून व बंदीमुक्ततेने मुसलप्रवेशास वाव करून गोखले-शिष्टाई संपली होती. पण...!

पण पुढे भारत-सेवक नामदार गोपाळ कृष्ण गोखले पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या आघाडीवर गुंतले असे पाहून १९१३ च्या ऑक्टोबर महिन्याच्या उत्तरार्धात गोखले लंडनमध्ये असताना, त्यांच्या आफ्रिकन शिष्टाईचे श्रेयही युनियन-सरकारने हरपविण्यास सुरुवात करून ते शून्याकार करून सोडले. त्या सरकारने फक्त स्त्रियांवरची डोईपट्टी उठविली! परंतु नवीन कायद्याने प्रतिवर्षी स्त्रियांस आफ्रिकेत राहण्याचा परवाना काढावा लागेल असे ठरविण्यात आले. तात्पर्य, डोईपट्टीऐवजी दुसरा एक कर आला. ही बातमी विजेसारखी सर्वत्र चमकली! ना. गोपाळराव गोखले चकले, त्यांची मुत्सद्देगिरी मातीमोल ठरली! ढोंगी वसाहत-सरकार धूर्त ठरले! १९१३ च्या एप्रिलमध्येच युनियन सरकारने नवीन विधेयक आणले, त्याने (म.) गांधी-गोखले (ना.) यांना दिलेली वचने रसातळाला गेली. आफ्रिकेतील हिंदी पुढाऱ्यांनी गोपाळराव गोखल्यांना विलायतेत तारा करून विचारले, "स्त्रियांच्या डोईपट्टीबद्दल तेवढे तुम्ही अभिवचन घेतले होते काय?" ना. गोखले उत्तरले की, "हा सगळा कायदाच रद्द करण्याचे वचन मला मिळाले होते." युनियन-सरकारने त्यावर "मौनं सर्वार्थ साधनम्" चालविले. प्रजाजनांना दिलेली वचने राज्यकर्त्यांनी पाळली पाहिजेत, ही बर्कची शिकवण ते सरकार आचरीत नव्हते, कारण वेठमजुरीस आलेले भारतीय व त्यांची बायकांमुले आणि स्नेहांकित यांना ते सरकार गुलामी राष्ट्रातील उपरे मानीत होते. त्यांना ते "प्रजा नव्हे, प्रजेचा तोतया" समजे. पण त्याचे भारतीय अभ्यासकांना नवीन असे काहीच वाटले नाही. कारण वचनभंगाचे ते शिरस्ते हिंदुस्थानच्या लोकांना ब्रिटिश राजवटीपासून अंगवळणीच पडले होते.

भारतसेवक गोपाळराव गोखल्यांशी मग गुफ्तगूं करून लॉर्ड ॲम्प्टहिल् यांनी लॉर्डांच्या सभेत शिरजोर झालेल्या वसाहत सरकारवर जोरदार हल्ला चढविला. पण निगरगट्टास त्याचे काय होय? आफ्रिकेत गांधीजींनी तडजोड करण्याचा प्रयत्न केला; "मुदतबंदी संपल्यानंतर तरी हिंदी मजुरांस स्वतंत्रपणे रहावयास मिळाले पाहिजे— जे लोक त्या काळपर्यंत तेथे होते त्यांचे हक्क हिरावून घेणे अन्याय्य होय." गांधीजींच्या मागण्या रास्त होत्या. पण संपत्ति-सामर्थ्य – सत्तेची धुंदी चढलेले युनियन-सरकार कशाला न्याय पाहते? ता. १३ जून १९१३ रोजी युनियन-सरकारने आपले विधेयक पास करून घेतले आणि आशियाटिक लोकांचे मानवी हक्क पायातळी तुडवून टाकले.

शेवटी पुन्हा ता. १२ सप्टेंबर १९१३ रोजी गांधीजींनी सत्याग्रहाचे रणशिंग फुंकले. आपण सत्याग्रह करणार असल्याचे स्मट्स्साहेबांस गांधीजींनी आगाऊ कळविले होते. खाणीतील मजुरांचे थवेच्या थवे मग संप पुकारीत चालले. अंगभर धड वस्त्र नाही, पोटात अन्नाचा गोळा नाही, अशा मजुरांची शान्तिसेना न्यू कॅसलच्या मैदानावर तळ देऊन होती. गांधीजींच्या या सत्याग्रहाला दरमहा तीस हजार रुपये पाठविण्याच्या निश्चयाने पब्लिक सर्व्हिस कमिशनचे काम सोडून हिंदुस्थानात परतलेल्या गोपाळराव गोखल्यांनी जंग जंग पछाडून गांधीजींस पैशाची ददात पडू दिली नाही. ना. गोखल्यांनी गांधीजींच्या सत्याग्रहासाठी हिंदुस्थानातून तीन-चार लाख रुपये गोळा करून धाडले, व्हाइसरॉय हार्डिंज यांची गाठ घेऊन गोखल्यांनी त्यांची सहानुभूती आपल्या व गांधीजींच्या कार्यास मिळविली !

इकडे आफ्रिकेत सत्याग्रह सुरू केल्यामुळे गांधीजींना अटक झाली. त्या अटकेमुळे नाताळातील आणखी वीस हजार लोकांनी संप पुकारला. गोळीबार झाला, कित्येक मजूर प्राणास मुकले आणि सत्याग्रहाच्या त्या प्रचंड मोहिमेकडे हिंदुस्थानचे डोळे लागून राहिले. त्यामुळेच हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंज यांनी २३ नोव्हेंबर १९१३ रोजी मद्रासला स्पष्ट उद्घोषले की, "जर वसाहत सरकारास उजळ माथ्याने जगात व हिंदुस्थानसमोर वावरावयाचे असेल, तर त्यांने निःपक्षपाती चौकशी-समिती नेमावी व तीत हिंदुस्थानचे प्रतिनिधी असावेत." हार्डिंजसाहेबांच्या या उद्घोषाने मग युनियन-सरकारचा पारा अधिकच चढला. हार्डिंजनी युनियन-सरकारच्या कायद्यांना अन्याय्य व विद्वेषमय म्हटले होते. ना गोखले व लॉर्ड हार्डिंज या दिवसांत तारांनीच बोलत होते. शेवटी ११ डिसेंबर १९१३ रोजी चौकशी-समिती नेमल्याचे जाहीर झाले व १९ डिसेंबर रोजी चौकशी—समितीच्या कामास सुरुवात झाली.

(म.) गांधी, पोलक, कालेनबेक वगैरे सत्याग्रहाचे पुढारी मग सुटले. बंधमुक्त होताच, चौकशी-समितीची रचना समाधानकारक नसल्याने तिजवर बहिष्कार घालण्याचा सल्ला गांधीजींनी दिला. ना. गोखल्यांनी तसे न करण्याबद्दल परोपरींनी गांधींना सांगूनही "तत्त्वाचा बंदा जीवं। व्यक्तीला कोण विचारील ? ॥" असाच अनुभव आला. गांधीजींनी ना. गोखल्यांस लिहिले की, "आपल्यासाठी आम्ही प्राण देऊ, पण आफ्रिकेतील सालोमन-समितीपुढे साक्ष देणे आमच्या हातून होणार नाही." पण मग सर बेंजामिन् रॉबर्टसन् यास हिंदुस्थान सरकारने सालोमन-समितीपुढे साक्ष द्यावयास पाठविले. त्यांस मात्र गांधीजींनी योग्य व जरूर ते सहाय्य दिले. या वेळी दीनबंधू अँड्रयूज आणि पीअर्सन् हेही आफ्रिकेत गोपाळराव गोखल्यांच्या सांगण्यावरून गेले. त्यांच्या आगमनाने आफ्रिकेतील वातावरण शान्त शान्त झाले ! सालोमन-

समितीने अखेर प्रत्येक मुद्द्यावर गांधींच्यासारखाच निर्णय दिला. मग युनियन-सरकारने सर्व शिफारशी मान्य केल्यावर जनरल बोथा यांनी इंडियन रिलीफ ॲक्ट पास करून घेतला. त्यायोगे तेथल्या तक्रारी तात्पुरत्या तरी संपल्या !

आफ्रिकेतील लढा लढविण्यास ना. गोखल्यांचे किती सहाय्य झाले हे गांधीजींनी पुढे दक्षिण हिंदुस्थानात जेव्हा दौरा केला, तेव्हा ठिकठिकाणी विशद केले : " गोखल्यांच्या स्फूर्तीने, त्यांच्या प्रोत्साहनाने व सहाय्याने आम्ही इतके दिवस सत्याग्रह लढविला, ज्या निःस्वार्थतेने भारत-सेवक गोखले काम करतात, ती निःस्वार्थतता अंगी बाणवून घ्या." असे प्रत्येक व्याख्यानात गांधीजी सांगत असत.

बिगरयुरोपियनाला धिक्काराने वागविण्याची दक्षिण आफ्रिकेची सवय विसाव्या शतकाला प्रारंभ होण्याच्या सुमाराला सुदृढच झाली होती. आफ्रिका खंड हे युरोपियन राष्ट्रांचे किती तरी शतके अगोदर क्रीडांगण होऊन राहिले होते. मूळ आफ्रिकी म्हणजे आपल्या करमणुकीसाठी परमेश्वराने निर्मिलेल्या चीजा, अशीच युरोपियनांची समजूत होती. सतराव्या शतकापासूनचा दक्षिण आफ्रिकेचा इतिहास पाहिला तर तेथील युरोपियन आफ्रिकेतील इतर भागामधील युरोपियनांपेक्षा उर्मटच आढळतात. आफ्रिकेतील पहिल्या वसाहतवाल्यांचे वंशज स्वतःस " आफ्रिकान्डर्स " म्हणवीत. १७९५ मध्ये " केप " ब्रिटनने हस्तगत केल्यावर आफ्रिकान्डर्स इंग्रजांत मिसळू लागले. इंग्रजांच्या खास समुद्रकिनारी वसाहती केप व नाताळ तर आफ्रिकांडर्सच्या ऑरेंज फ्री स्टेट व ट्रान्सवाल या ! या दोहोंत लोकसत्ताकेच होती. बोअर युद्धात (१८९९) आफ्रिकांडर्सचा पराभव संपूर्ण झाल्यावर ती लोकसत्ताके १९१० पासूनच काय ती " युनियन-सरकार " म्हणून एकजीव झाली होती. त्यांच्यावर ब्रिटिशांचाच वरचष्मा असे. बोअर-युद्धापूर्वीपासून–(१८९३) च गांधीजी तेथील दुःखितांमध्ये वसती करून राहिले होते. दक्षिण आफ्रिकेतील नाताळ भागात हिंदुस्थानातून सुमारे दीड-लाख लोक वेठमजुरीच्या निमित्ताने रहात होते. आफ्रिकेतील जमीन नांगरून आफ्रिका ऐहिक वैभवाला चढविण्यासाठी वेठबिगारीचा घाम गळत आला होता. तसे लोक निकामी झाले, म्हणजे त्यांच्याबद्दल " गरज सरो, वैद्य मरो " ही वृत्ती प्रगट होई. विसाव्या शतकाच्या प्रारंभी ' हिंदी हमाला 'चा ताबूत थंडा करण्याचा मामला सुरू झाला होता. ट्रान्सवॉलमध्ये १८८५ पासून आणि ऑरेंज फ्री स्टेटस्मध्ये १८८८ पासून खास कायदे करून, हिंदी लोकांना तेथे जगणे म्हणजे जिवावरचे दुखणे करून सोडण्याचा पद्धतशीर उद्योग सुरू झाला होता. ट्रान्स्वॉलमध्ये प्रवेश करणाराला दर डोई ३ पौंड कर द्यावयाची सक्ती झाली होती. १८९३ मध्ये लोकांना जबाबदार असे सरकार मिळाल्याचा आनंदोत्सव प्रत्येक " काळ्या आदमी "वर २५ पौंड कर लादून साजरा झाला होता.

अवर्णविद्वेषी देशात हिंदुस्थानातून वेठमजूर नेण्यात येत ते अर्थातच हिंदुस्थान सरकारच्या संमतीनेच. त्यांना रेल्वेच्या पहिल्या वर्गाने प्रवास करण्यासच बंदी होती; युरोपियनांच्या वसतीमध्ये त्यांना घरे करून राहण्यास प्रतिबंध होता; फराळाच्या दुकानात त्यांना शिरूही देत नसत ! फार काय, युरोपियनांच्या वाहतुकीच्या रस्त्यावरून हिंदी मजुरांची जा-ये होणे हे महापातक मानले जाई ! मग राज्यकारभाराच्या कसल्याही निवडणुकीत त्यांना मतदानाच्या हक्काचे नाव तरी कसे काढता येणार ? दक्षिण आफ्रिकेच्या ऐहिक उन्नतीसाठी हिंदी मजुरांचे रक्त, घाम, श्रम आणि अश्रु उपयोगी येऊनसुद्धा, ब्रिटिश साम्राज्याचे नागरिक म्हणून त्यांना फक्त आपल्या हमालीवर हक्क सांगता येत होता ! तेव्हा या माणुसकीस मुकलेल्या आपल्या देशबांधवांची वकिली करून त्यांना माणसात आणण्यासाठी बॅ. गांधी तेथे जाऊन ठाण मांडून बसले होते. बोअर-युद्धाचा शेवट झाल्यावर राज्यकर्ते हिंदी मंडळींना नागरिकांचे सरळ हक्क देतील, असा गांधीजींना भरवसा वाटत होता. पण अनुभव उलटाच आला !

चारही वसाहतींना जसे नवजीवन आले तसेच हिंदी माणसांना कुत्र्याच्या मोतीने वागण्याच्या कायद्यांनाही ते मिळाले ! प्रत्येक भारतीयाने आपले नाव आशियाटिकांच्या नोंदवहीत नोंदवून घेण्याचा वटहुकूम जारी झाला !! या विद्वेषमय वागणुकीबद्दल सर्वत्र असंतोष पसरला होता. माणुसकीवरील जुलूमशाही-विरुद्ध सत्याग्रहाचा लढा देण्यासाठी दक्षिण आफ्रिकेतील हिंदी जनतेचे नेतृत्व पत्करून गांधीजींनी कंबर कसली. प्रथम पाचशे सत्याग्रहींनिशी गांधीजींची मोहीम सुरू झाली. तेव्हा ३० जानेवारी १९०८ रोजी जनरल स्मट्स व गांधीजींची बोलणी होऊन नोंदणीचा कायदा सरकारने परत घ्यायचा व हिंदी मंडळींनी स्वयंस्फूर्त नोंदणी करायची अशी तडजोड ठरली.

सत्याग्रही मंडळींनी आपल्या शब्दास जागून स्वयंस्फूर्त नोंदणी केली; पण स्मट्सने कायदा मागे घेतला नाही. स्वप्नात दिलेलाही शब्द खरा करावयास तो हिंदुस्थानचा हरिश्चंद्र थोडाच होता ? दक्षिण आफ्रिकेतील वसाहतकरांची गट्टी करून बोअर व ब्रिटिश यांनी संघ केला तर ब्रिटिश साम्राज्यात एक चढती वाढती पदवी प्राप्त होईल म्हणून वसाहतीची मंडळी इंग्लंडमध्ये ब्रिटिश मंत्रिमंडळाकडे गेली. तेव्हाच, भारतीयांच्या सुखरूपतेची हमी मिळविण्यासाठी गांधीजी व शेठ हाजी हाबीब यांनीही इंग्लंडची सफर मारली. लॉर्ड क्यू व मोर्ले यांनी सहानुभूती दाखविली. पण शेवटी गोऱ्यांच्या नगाऱ्यापुढे काळ्या भारतीयांची टिमकी वाजली नाही !

तथापि, गांधीजींची मायभूमी आणि तिचे थोर सुपुत्र भारतसेवक ना. गोपाळ कृष्ण गोखले यांनी दक्षिण आफ्रिकेतील हिंदीजनांची पाठराखणी केली. १९०९ च्या लाहोर काँग्रेसमध्ये केलेल्या संस्मरणीय भाषणात गांधीजींच्या

महात्मेपणाबद्दल व निःशस्त्र सत्याग्रहाबद्दल विवेचन सादर करून आफ्रिकेतील हिंदी जनांचा गांधीजी तारण-हार असल्याचे गोखल्यांनी लोकमतावर ठसविले आणि त्याचा जादूसारखा उपयोग होऊन आफ्रिकेतील सत्याग्रहाला मदत म्हणून सोने नि चलनी नोटा यांचा गोखल्यांच्याकडे अक्षरशः वर्षाव झाला. रतन टाटा, हैदराबादकर निजाम, आगाखान व त्यांची मुस्लीम लीग यांनीही गांधीजींच्याकडे सत्याग्रह-निधी पाठविले. या सर्व निधीचे बारीकसारीक हिशोब आणि आपले व इतर सत्याग्रहींचे वरचेवर होणारे तुरुंगवास नि एकंदर सत्याग्रह-चळवळीची प्रगती, गांधीजी ना. गोखल्यांना वरचेवर कळवीत राहिले. या सर्वांचा संकलित परिणाम म्हणून गोखल्यांच्या १९१० च्या वेठबंदीच्या कायद्यापासून सुरुवात होऊन, प्रारंभापासून सांगितल्याप्रमाणे दक्षिण आफ्रिकेत "तोतया प्रजाजन" म्हणून गोऱ्या युरोपियनांनी मानलेल्या हिंदी जनांच्या त्या "तोतया बंडा"चा शेवट झाला, तीन वर्षांच्या तपस्या-तपश्चर्येनंतर !

दक्षिण आफ्रिकेतील ना. गोखल्यांच्या दौऱ्यात हिंदी लोकांच्या सभेत गोखले मराठीतून भाषणे करीत व त्यांचा हिंदी तर्जुमा करून गांधीजी लोकांना सांगत. दोघांच्या संगनमताने ती श्रमविभागणी ठरली होती आणि भारतीयांच्या सभा भारतीय भाषांत चालविल्याचे सार्थ समाधान उभयतांना होत होते. शेवटी दक्षिण आफ्रिकेत सत्याग्रह-संग्रामाचा सात्त्विक विजय झाला हे खरे; पण त्यासाठी काही सत्याग्रहींना सरकारी गोळीबाराचे बळी व्हावे लागले ! कराची येथे भरलेल्या १९१३ च्या काँग्रेसने त्या सत्याग्रहींच्या वीरमरणाला अभिवादन केले. गांधीजींनी केलेल्या शुद्ध सत्याग्रहाबद्दल त्यांचे व त्यांच्या अनुयायांचेही कराची काँग्रेसने हार्दिक अभिनंदन केले. त्याबाबत खरे हे की सत्याग्रहसंग्रामाच्या यशावर गांधी-स्मट्स-करार २१ जानेवारी १९१४ रोजी होऊन, मग ता. २६ जानेवारी १९१४ रोजी विधिमंडळाने आपले शिक्कामोर्तब केले, तेव्हाच सगळ्यांना समाधान झाले. त्या दिवशी "दि इंडियन्स रिलीफ् बिल्" पसार झाले व ३ पौंडांची डोईपट्टी कायमची लुप्त झाली; हिंदुस्थानात ज्या विवाहांना मान्यता असते, ते सगळे विवाह दक्षिण आफ्रिकेतही मान्यता पावले. युनियन सरकारच्या परिसीमेत प्रवेश करावयास नि नांदावयास स्वतःच्या निशाणी अंगठ्याचे रहिवासनोंदणी दाखले असले म्हणजे पुरे हे सर्वसंमत ठरले.

अशा रीतीने विजयश्री मिळवलेले सत्याग्रही गांधी मग मायभूमीस परत येण्याचा विचार करीत असता त्यांचे राजकीय गुरू भारतसेवक गोखले पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या कासासाठी इंग्लंडात होते त्यांच्या बोलवण्यावरून गांधीजी २ ऑगस्ट रोजी लंडनला गेले व गोखल्यांच्या मागोमाग १९१५ च्या प्रारंभी हिंदुस्थानात येऊन दाखल झाले.

✕ ✕ ✕

२७ : पब्लिक सर्व्हिस कमिशन

महात्मा गांधींची इंग्लंडमध्ये दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह-संग्रामानंतर भेट झाल्यावर ना. गोपाळराव गोखले हे हिंदुस्थानास २० नोव्हेंबर १९१४ रोजी परतले. इंग्लंडातून आता ते सातव्या सफरीची समाप्ती करून परतले होते. त्या सात सफरींपैकी शेवटच्या दोन सफरी भारतसेवक गोखल्यांनी पब्लिक सर्व्हिस कमिशनकरिता केल्या होत्या.

हे पब्लिक सर्व्हिस कमिशन १९१२ च्या जुलै महिन्यात सरकारने नेमले होते. या कमिशनचे अध्यक्ष लॉर्ड इस्लिंग्टन् हे होते. कमिशनमध्ये रॅम्से मॅक्डोनाल्ड; सर व्हॅलेंटाइन चिरोलप्रभृति एकंदर बारा सभासद असून त्यात सर महादेव चौबळ, ना. गोखले व मद्रास हायकोर्टाचे न्यायाधीश अब्दुल रहीम असे तिघे एतद्देशीय होते. या कमिशनला तीन गोष्टींची चौकशी मुख्यतः करावयाची होती : (१) जे सनदी नोकर निवडले जातात, त्यांना शिकवण्याची पद्धति आणि पसंतीसाठी काही दिवसांची उमेदवारी. (२) नौकरीच्या अटी, पगार, रजा पेन्शन वगैरे, आणि (३) युरोपियनेतर लोकांना सनदी नौकरीवर जाण्यास अडथळे काय व प्रांतिक नि वरिष्ठ अशी विभागणी. १८३३ साली ब्रिटिश पार्लमेंटने नौकऱ्या देण्यात युरोपियन व हिंदी असा भेद करू नये, असा ठराव केला होता. १८५४ मध्ये सिव्हिल सर्व्हिस परीक्षेस हिंदी लोकांना परवानगी मिळाली. १८५८ व १८६१ त्याच मान्यतेची पुनरावृत्ति झाली. १८७० त दादाभाईंनी समान हक्काबद्दल इंग्लंडात चळवळ केली. १८८६ च्या पब्लिक सर्व्हिस कमिशनचे काम झाले त्या वेळी रानडे सभासद होते. त्यानंतर पंचवीस वर्षांनी नेमलेल्या या पब्लिक सर्व्हिस कमिशनचे काम गोखले दक्षिण आफ्रिकेहून येण्यासाठी जणू खोळंबले होते ! काम अत्यंत दगदगीचे व फार जिकीरीचे होते. रोज सहा सहा तास साक्षी ऐकून नंतर घरी त्यावर विचार करून साक्षीदारांची उलट तपासणी करायची ! रात्रौ दोन दोन वाजेपर्यंत नामदार गोपाळराव गोखल्यांनी ते काम केले ! १९१२-१३ च्या हिवाळ्यात हे कमिशन सर्वत्र हिंदुस्थानभर व ब्रह्मदेश वगैरे ठिकाणी हिंडले. कलकत्त्याच्या अमृतबझार पत्रिकेच्या संपादकाजवळ ना. गोखले म्हणाले की— "मला बिलकुल विश्रांती मिळत नसून कमिशनमधील माझ्या प्रतिपक्षाशी कसे

झगडावे हाच विचार रात्रंदिवस माझ्या डोळ्यापुढे घोळत असतो. प्रतिपक्षीय पुष्कळ, त्यांना तोंड देण्यास मी एकटाच. तरीही माझे कर्तव्य मला करावयाचे असून त्यात मला मरण आले तरी चालेल." कलकत्त्यात पहिली महत्त्वाची साक्ष कमिशनपुढे झाली ती न्यायमूर्ती कार्नडुक यांची. त्यांच्या उलट तपासणीत सरकारची बाजू लंगडी पडली आहे हे गोपाळरावांनी कमिशनच्या स्पष्टपणे निदर्शनास आणले.

१९१३ च्या पूर्वार्धात म्हणजे मे महिन्याच्या मध्यास हिंदुस्थानातील निम्मे काम संपवून कमिशन ऑक्टोबरमध्ये इंग्लंडमध्ये गेले. इंग्लंडमध्ये काम चालले असता, दक्षिण आफ्रिकेतील युनियन-सरकारने गोखले आणि गांधी यांना दिलेली वचने मोडून आणि माणुसकीलाच पायाखाली तुडवून, आशियाटिकांना जीवन्मृत करणारे नवीन विधेयक पास करून घेण्याचा घाट घातल्यामुळे ना. गोखले यांनी पब्लिक सर्व्हिस कमिशनचे काम हातावेगळे केले व ते लंडनहून परत आले. नाताळ वगैरेमधील गांधीजींच्या सत्याग्रहाला पैशापासून वजनदार शान्तिदूतापर्यंत आणि व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंजपासूनच्या मध्यस्थीपर्यंत सहाय्य उभे करून, गांधीजींच्या सत्याग्रह धवल यशाचा कसा होईल, याची गोपाळराव गोखल्यांनी काळजी वाहिली.

एवढ्यात १९१३ च्या नोव्हेंबरमध्ये इंग्लंडहून पब्लिक सर्व्हिस कमिशन पुनः हिंदुस्थानात आले. दिल्लीस प्रथम ते जमले. तदनंतर, प्रांतिक सनदी नौकऱ्या आणि अखिल भारतीय सनदी नौकऱ्या, याशिवाय इतर अठ्ठावीस प्रकारच्या खात्यातील नौकऱ्यांविषयी चौकशी करण्यासाठी संयुक्त प्रांत, पंजाब, वायव्य सरहद्दीवरचा प्रांत, असे कमिशनला फिरावे लागले. मग कमिशन कलकत्त्याला आले ! बिहार, ओरिसा, बंगाल, ब्रह्मदेश येथील साक्षी डिसेंबर १९१३ च्या उत्तरार्धापासून १९१४ च्या फेब्रुवारीपर्यंत चालल्या. त्यात डॉ. जगदीशचंद्र बोस यांची साक्ष मोठी मजेची व महत्त्वाची झाली. त्यानंतर फेब्रुवारी (१९१४) मध्ये कमिशन मद्रासला व पुढे मुंबईस येऊन त्याने मध्यप्रांत व मुंबई इलाख्यातील साक्षी घेतल्या आणि १९१४ च्या वसंत ऋतूत कमिशन फिरून इंग्लंडला गेले. त्यात गोपाळराव गोखलेही कर्तव्यबुद्धीनेच (आपल्या प्रकृतीची पर्वा न करता) होतेच.

या वेळी गोपाळराव गोखल्यांची प्रकृती मधुमेहाने अशक्त झाली होती. १९१३ च्या फेब्रुवारीत लाहोरमध्ये गांधीजींच्या सत्याग्रहासाठी गोखल्यांनी पंचवीस हजार रुपये वर्गणी मिळविली, तेव्हाच त्यांच्या 'छातीचा आजार' जोराने वाढल्याचे आढळून आले होते. त्यातच पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या कामाचा फार मोठा बोजा गोपाळराव गोखल्यांवर पडत असे. चोवीसपैकी चार ताससुद्धा त्यांना विश्रांती मिळत नसे. पहाटे दोन वाजता उठून दुसऱ्या दिवशी होणाऱ्या साक्षीदारांच्या सर्व लेखी पुरव्याची मनाशी छाननी करून, हिंदुस्थानच्या इज्जतीला उंचावतील असे उलटतपासणीचे प्रश्न टिपून ठेवावे

लागत. सकाळी आठ वाजेपर्यंत हे काम चाले. सुमारे साडेदहा वाजता कमिशनच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात होई, ते थेट पाच वाजेपर्यंत ! त्यापुढे स्नेहीसोबती–चिकित्सक–हितचिंतक यांच्या गाठीभेठी व रात्रौ आणखी राजकीय मुलाखती व क्वचित् राजकारणी मेजवान्याही ! गोपाळराव गोखल्यांनी आपल्या जीवनाच्या प्रारंभापासूनच सनदी नौकऱ्यांचा अभ्यास केल्यामुळे, त्यास योग्य ती उत्तरे युरोपियन साक्षीदारांकडून घेता येत असत. काही काही प्रश्नांनी तर ते साक्षीदारास वर्णश्रेष्ठतेच्या घमेंडीपासून कर्तव्याचरणातील नैतिक जबाबदारीच्या समन्वयापर्यंत व्यवहार वदवावयास लावून चांगलेच पेचात धरीत.

हे सर्व व्हावे तसेच असले तरी गोपाळराव गोखले यांच्या शरीरावर व मनावर पडलेला कामाचा बोजा त्यांच्या प्रकृतीस सहन झाला नाही. ते थकले, दमले, झिजले. पण जिवंत माणसाला परिपूर्ण विश्रांती फक्त मृत्यूच्या मांडीवरच मिळते असे मनोमन वाटत, पटत असल्यासारखे जीवनिकाचे शूर शिपाई म्हणून ते काम करीत राहिले. " अकालो नास्ति धर्मस्य जीविते चंचले सति । " हा त्यांचा हिय्या होता. " जाते घडि ही आपुली साधा, करा काय ते आता करा ! " असे म्हणणाऱ्या गोपाळराव गोखल्यांना काही दिवस अंथरुणावर खिळून रहावे लागले. डॉक्टरांनी जपून वागण्यास सांगितले. सरोजिनीदेवी नायडू या वेळी इंग्लंडात होत्या, त्या गोखल्यांची काळजी घेऊ लागल्या. " आपला मरणकाळ जवळ आला आहे " असे देवींना सांगतानाही हिंदुस्थानदेशाच्या हितचिंतनाचेच विचार गोपाळराव गोखल्यांना घेरून होते. प्राथमिक शिक्षणाचा सक्तीने मोफत प्रसार, हिंदु-मुसलमानांचे ऐक्य, आपल्यापेक्षा पुढची पिढी सवाई कर्तबगार कशी निघेल याविषयीची योजना आणि आपला भारत-सेवक-समाज या विषयातच गोखल्यांचा मेंदू मग्न असे. सरोजिनीदेवींबरोबर या व इतर देशभक्तीच्या पुष्कळच गोष्टी बोलून ते मन मोकळे करीत. पण त्यायोगेही श्रम होतात, असे आढळल्यावर गोखले यांना डॉक्टरांनी बोलायचीच बंदी घातली. ते मग रतन टाटाकडे राहिले. डॉ. जीवराज मेहता त्यांना औषधोपचार करीत. पण गोखल्यांना दिवसेंदिवस मायभूमीस परतण्याची ओढ लागली. उपनिषदांची वचने गोखल्यांच्या डोळ्यापुढे येत. त्यांचे हृदय शुद्धतर झाले. बुद्धी अचल झाली. ८ ऑक्टोबर १९१४ रोजी सरोजिनीदेवींची व गोपाळराव गोखल्यांची भेट झाली असता, वाळलेल्या तृणाप्रमाणे ते गळून गेले होते. पण डोळ्यात तेज होते. ते देवींना उद्देशून उदगारले की, " आता आपली पुन्हा भेट होईल असे दिसत नाही. तुम्ही आपले आयुष्य देशाला वाहिले आहे हे ध्यानात धरा. माझे कार्यभाग संपलेच आहेत म्हणायचे ! "

गोपाळराव गोखले १९१४ च्या नोव्हेंबरात हिंदुस्थानात परतले. हिंदुस्थानात आता नवा मनू उदयास आला होता. कैसरीक्रंदन ४ ऑगष्ट १९१४ ला सुरू झाल्यानंतरचा तो कालखण्ड होता. जुलै महिन्यातच लो. टिळक

मंडालेहून सुटून आले होते. हिंदुस्थानांतील सर्व लोकांनी सरकारास युद्धप्रसंगी सहाय्य करावे असे त्यांनी जाहीर केले. त्यानुसार देशात काही नवी घडी बसवीत असताच आणि पब्लिक सर्व्हिस कमिशनमधील काम अपुरे असताच ना. गोखल्यांना या जगाचा निरोप घ्यावा लागला.

पब्लिक सर्व्हिस कमिशनची नेमणूक गोरे व काळे यांच्यात तरतमभाव राखून सरकारी नोकऱ्या देण्यात येत, तो जमाना बंद करण्याचा विचार करण्याकरिता झाली होती. आपल्या अर्थसंकल्पीय भाषणांतूनही ना. गोखले दरसाल हिंदी पात्रतासिद्ध माणसांना कमी लेखले जात असल्याबद्दल तक्रार करीत आलेच होते. वरिष्ठ दर्जाच्या नौकरश्रेणीत हिंदी माणसावर संपूर्ण वाळीत असल्याबद्दलची तक्रार वेल्बीकमिशनपुढील साक्षीतही गोखल्यांनी मांडली होती. १७ मार्च १९१२ रोजी एन्. सुब्बाराव पंतुलु यांनी हिंदुस्थानच्या वरिष्ठ विधिमंडळात देशाच्या मुलकी राज्यकारभारातील व्यापक आणि उच्च दर्जाच्या नौकऱ्यावर भारतीयांची पात्रतासिद्धी पाळण्यासाठी सरकारी व बिनसरकारी सभासदांचे एक चौकशी मंडळ नेमावे, असा ठराव आणला. गोखल्यांनी तो उचलून धरला. विधिमंडळाने तो सरकारच्या गळ्यात बांधला. सरकार मात्र त्याबाबत अखेरपर्यंत टंगळमंगळच करीत होते !

त्यापूर्वी सुमारे पाव शतकाच्या मागे सरकारने जे पब्लिक सर्व्हिस कमिशन नेमले होते त्या कमिशनच्या शिफारशी स्वीकारावयाचे केंद्र सरकारच्या जिवावर आले होते. तोंडांनी 'नाही' म्हणता येत नाही ते हातांनी रद्दीबुट्टीत टाकावयाचा सरकारी धंदा चालूच होता. पण १९११ साली बादशहांचे राज्यारोहण आंतरराष्ट्रीय कारणाकरिता हिंदुस्थानात घडवावयाचे ठरले. हिंदी जनतेच्या राजनिष्ठ प्रवृत्तींचा फायदा उठवावयाचा असल्यामुळे व बादशहा हिंदुस्थानात यावयाच्या वेळेस कसल्याही चळवळीची कटकट नको म्हणूनच सुब्बारावांचा ठराव सरकारने मान्य केला आणि दीड वर्षाने त्याच्या अंमलबजावणीला हात घातला. डिसेंबर १९१२ त मद्रास येथे कमिशनच्या कामाला सुरुवात झाली आणि १४ ऑगस्ट १९१५ ला कमिशनचा रिपोर्ट झाला. गोखले रिपोर्ट लिहावयास नव्हते. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांवरील अन्याय दूर करण्याच्या खटपटीत आणि पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या कामात काळाने गोखल्यांच्या नऊ-दहा वर्षे आयुष्याचा ग्रास केला होता. पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या अल्पसंख्य व बहुसंख्य अशा दोनही निवेदनांत ना. गोपाळराव गोखल्यांच्या निरलस व दक्ष कामगिरीबद्दल कृतज्ञतेचे उद्‌गार आहेत. अल्पसंख्यांच्या विषयीच्या निवेदनात अबदुल रहिमान यांनी गोखल्यांच्याच टिपणांचा व अनुभवांचा बहुतांशाने अनुवाद केल्याचे दाखल आहे. ना. गोखलेंच रिपोर्ट लिहावयास असते तर त्याला काही निराळेच तेज येते ! ! आयुष्याच्या शेवटी गोखल्यांनी राजकीय सुधारणांचा जो आराखडा लिहून ठेवला होता तेच त्यांचे इच्छापत्र मानले जाते.

☒ ☒ ☒

२८ : ना. गोखल्यांचे राजकीय इच्छापत्र

जर्मनीच्या कैसरने १९१४ सालीच जागतिक युद्ध पेटविले होते. त्या कैसरीकंदनाच्या पुरोगामी छायेने दिल्लीचे राज्यारोहण व बंगभंगबंदी वगैरे बदल जर घडवून आणले होते तर प्रत्यक्ष कैसरीकंदन सुरू झाल्यावर ब्रिटिश सरकारच्या हिंदुस्थानविषयक वृत्तिप्रवृत्तीत बदल झाला तर काहीच नवल नव्हते. हिंदी लोकांच्या संपूर्ण हार्दिक सहकाराशिवाय संरक्षणसाधना यशस्वी व्हावयास कठीण जाईल, हे ब्रिटिश मुत्सद्द्यांना मनोमन कळून चुकले होते. नेक नामदार श्रीनिवासशास्त्री ज्याला "खरा उदारमतवादी" म्हणत, त्या मुंबईचे राज्यपाल असलेल्या लॉर्ड विलिंग्डन यांनी अशी इच्छा प्रगट केली की, हिंदुस्थानच्या लोकांनी काही चळवळ करण्याची वाट न पाहताच, ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानसाठी काही "नवलाचे" करावे. १९१५ च्या प्रारंभीच ही विलिंग्डन साहेबांच्या विचारसरणीची धारा उमटू लागली होती, त्या वेळी ना. गोपाळराव गोखले आजारीच होते. तरीही गोखल्यांनीच हिंदुस्थानसाठी कोणत्या कमीत कमी राजकीय सुधारणा केल्या असता, हिंदुस्थानचे समाधान राहील हे सुचविले असता, त्यांच्या सूचनेला वजन येईल. असे विलिंग्डनसाहेबांचे मत मोर्ले-मिंटो सुधारणांच्या अनुभवावरून (:१९ एप्रिल १९०९ चा लंडन-टाइम्स पहा.) झाले असल्याकारणाने गोखल्यांनी राजकीय आराखडा सुचवावा आणि तो सरकारने मान्य करून आपण होऊन हिंदुस्थानला द्यावा, अशाबद्दल विलिंग्डनसाहेबांचे प्रयत्न सुरू झाले. ब्रिटिश सरकार आणि हिंदुस्थानचे नेतृत्व व काँग्रेस यांच्यामध्ये कोणत्या कमाल परिसीमेपर्यंत देवाण-घेवाण होऊ शकेल याची गोखल्यांच्याइतकी नेमकी आणि नेटकी कल्पना कोणालाच नसणार आणि त्यांच्याइतक्या ब्रिटिश मुत्सद्द्यांच्या विश्वासातील पुढारीही दुसरा कोणी विलिंग्डनसाहेबांच्या मताने नसल्याकारणाने गोखल्यांनी त्या देशसेवेची कामगिरी स्वीकारावी म्हणून विलिंग्डनसाहेबांची पावले पडू लागली. "विलिंग्डनसाहेबांचाही बोलविता धनी वेगळाचि" असल्याची त्या काळात बोलवा होती!! पण तीबद्दल गोखल्यांनी का विधिनिषेध बाळगावा? ब्रिटिश सरकारपुढे ठेवावयाच्या राजकीय सुधारणांच्या आराखड्याला हिंदुस्थानातील विचारवंत व पुढारी यांचा एकमुखी पाठिंबा मिळण्यात त्यांचे जे समाधान होते ते दुसऱ्या कशातच नव्हते! म्हणून

लॉर्ड विलिंग्डन यांना ना. आगाखान आणि फिरोजशहा मेहता यांचा अंदाज घ्यावयास त्यांनी सुचविले. त्या दोघांशी काही महत्त्वाच्या राजकारणावर, आजारी असलेल्या गोपाळराव गोखल्यांना बोलावयाचे आहे म्हणून पुण्याचे निमंत्रण गेले. तथापि, पत्रव्यवहाराने सर्वांना सोयीची तारीख ठरविण्याच्या आतच गोखल्यांची प्रकृती घसरू लागली. तेव्हा गोखल्यांनी ता. १७ फेब्रुवारी १९१५ रोजी आपल्या कल्पना पेन्सिलीने कागदावर लिहून काढल्या :

" युद्धसमाप्तीच्या सुमारास हिंदुस्थानच्या लोकांस घ्यावयास योग्य अशी सुधारणा म्हणजे प्रांतिक स्वायत्ततेचे अनुदान होय, देशाच्या अंतर्गत कारभारासंबंधी हिंदुस्थान सरकार आणि सेक्रेटरी ऑफ स्टेट यांचा अखत्यार जो आज प्रांतावर चालतो, त्यांच्यातून त्यांची पुष्कळ प्रमाणात सुटका होईल हा एक भाग; शिवाय, अशा काढून घेतलेल्या अखत्यारीच्या जागी प्रांतिक विधिमंडळामार्फत कर भरणाऱ्यांच्या प्रतिनिधींचा अखत्यार सुरू होईल, हा दुसरा भाग. या कल्पनेच्या अंमलबजावणीसाठी निरनिराळ्या प्रांतांत राज्यकारभाराचे रूप कसे असावे याची थोडीशी रूपरेखा मी खाली लिहिल्याप्रमाणे सुचवितो :

प्रत्येक प्रांतात :

(१) राज्यकारभार:—प्रमुख म्हणून एक राज्यपाल इंग्लंडमधून नेमलेला असावा.

(२) त्याचे एक मंत्रिमंडळ वा कार्यकारी मंडळ सहा सभासदांचे रहावे; त्यात तीन हिंदी व तीन इंग्रज गृहस्थ असावेत. त्यांच्याकडील खातेवाटणी—(अ) कायदा व न्याय यासह गृहखाते, (आ) अर्थखाते, (इ) शेती, पाटबंधारे व बांधकाम खाते, (ई) शिक्षण, (उ) आरोग्य व दवाखाना धरून स्थानिक-स्वराज्यखाते, आणि (ऊ) उद्योग व व्यापार. कार्यकारी मंडळात नेमणूक व्हावयास सनदी नौकरास मुभा असली तरी विधिमंडळात त्याच्यासाठी कोणतीही जागा असू नये. कार्यकारी मंडळात घ्यावयाचे सभासद इंग्रज वा हिंदी गृहस्थ जे उत्कृष्ट मिळण्यासारखे असतील त्यांनाच घ्यावे.

(३) पंचाहत्तर ते शंभर सभासदांचे एक विधिमंडळ व्हावे व त्यांच्यापैकी चारपंचमांश तरी सभासद निरनिराळ्या मतदारसंघांतून निवडलेले असावेत. या तऱ्हेने मुंबई इलाख्यात, ठोकताळ्याने बोलायचे तर, एक नगरपालिका व दुसरा जिल्हा तालुका लोकल बोर्डांनी निवडलेला असे दोन सभासद प्रत्येक जिल्हानिहाय असावेत. मुंबई शहराला सुमारे दहा सभासद द्यावेत. मुंबईबाहेरील कराची चेंबर, अहमदाबाद–गिरणी मालक, दख्खन–सरदार अशा संस्थांना एक-एक प्रतिनिधी मिळावा. मुसलमानांना स्वतंत्र प्रतिनिधित्व लाभेलच ! पण कोठे कोठे लिंगायतां-

सारख्या जमातींना, त्या बहुसंख्य असतील तेथे स्वतंत्र प्रतिनिधी द्यावा लागेल. तज्ज्ञ म्हणून व्यावयाचा सभासद नोडा, पण कोणीही बिनसरकारी (सरकार)-नियुक्त असू नये. राज्यपालांनी काही सरकारी अधिकारी तज्ज्ञ म्हणून किंवा अंमलबजावणीसरकारचे प्रतिनिधी म्हणून अधिक घेतले तरी चालतील.

(४) अंमलबजावणी सरकार आणि विधिमंडळ यांचे संबंध जर्मनीतील साम्राज्यसरकार व रीचस्टॅग यांच्या सर्वसाधारण धर्तीवर असावेत. सर्व प्रांतिक कायदे मंडळात सम्मत व्हावे लागतील आणि प्रांतिक करात भर घालावयाची असल्यास वा बदल करावयाचा असल्यास, त्या सगळ्याला विधिमंडळाची संमती आवश्यक लागेल. अर्थसंकल्पसुद्धा विधिमंडळापुढे चर्चेसाठी आला पाहिजे आणि त्याच्या संबंधातील विधिमंडळाचे ठरावास तसेच सर्वमान्य राज्यकारभाराचे संबंधीच्या प्रश्नोत्तरास कार्यवाहीत आणावे लागेल; अर्थात राज्यपालांनी त्यास ' टिचकी ' दिली तर तो भाग निराळा ! (विधिमंडळाच्या) वरचेवर बैठकी वा बैठकींच्या कालखण्डाचा विस्तार यांच्यासंबंधी आखणी करावी लागेल. तथापि, अंमलबजावणी—सरकारच्या सभासदाला व्यक्तिशः वा सामूहिकरीत्या आपली अधिकारसूत्रे चालविण्यासाठी विधिमंडळाच्या बहुसंख्य पाठिंब्यावर राहण्याचे कारण नाही.

(५) अशा तऱ्हेच्या घडणीचे प्रांतिक सरकार विधिमंडळाच्या अखत्यारा-खाली वर सांगितल्याप्रमाणे कारभार करीत असता, त्याच्याकडे प्रांताच्या अंतर्गत कारभारी व्यवस्थेचा संपूर्ण अधिकार हवा. त्यासाठी त्याला अर्थव्यवहाराचे स्वतंत्र अधिकार हवेत. तसे होण्यासाठी प्रस्तुत प्रांतिक सरकार आणि हिंदुस्थान सरकार यांमध्ये असलेले अर्थसंबंध पुष्कळसे उजळावे लागतील. मीठ, जकाती, रेल्वे, टिब्यूट्स्, पोस्ट व टांकसाळ यातून होणारे उत्पन्न सर्वस्वी हिंदुस्थान सरकारचेच राहिले पाहिजे; कारण ती हिंदुस्थान सरकारमार्फतचीच (लोक)—सेवा खाती आहेत. पाटबंधारे, अबकारी, जंगले, संकलित कर, स्टँप्स, नोंदणी ही प्रांतिक सरकारमार्फतची लोकसेवा खाती असल्याकारणाने त्यापासून होणारे उत्पन्न प्रांतिक सरकारास मिळावे, यातून मिळणारे उत्पन्न प्रांतिक सरकारच्या आजच्या गरजेपेक्षा अधिक असल्यामुळे आणि हिंदुस्थान सरकारकडे लावून दिलेले उत्पन्न त्या सरकारच्या प्रस्तुत खर्चाला अपुरे ठरणारे असल्यामुळे, प्रांतिक सरकारांनी आपल्या उत्पन्नापैकी किती हिस्सा हिंदुस्थान सरकारला द्यावा, हे दर पाच वर्षांनी ठरवून तो पोहोचता करण्यात यावा. ही व्यवस्था लक्षात बाळगून हिंदुस्थान सरकारने व प्रांतिक सरकारांनी आपापल्या अर्थोत्पत्तीच्या स्वतंत्र योजना वाढीस लावाव्यात. (त्यासाठी) प्रांतिक सरकारांना कर-उभारणीचे व कर्जउभारणीचे अधिकार काही मर्यादेपर्यंत देण्यात येतील.

(६) प्रांतिक स्वायत्ततेचा असा हा आराखडा अपुराच राहील, तो राहू नये म्हणून खालील गोष्टींची जोड दिली आहे :

(अ) जिल्हा-कारभाराची प्रस्तुत रुळी अधिक सैल केलीच पाहिजे व

(आ) स्थानिक स्वराज्याचा विस्तार वाढविला पाहिजे. सिंधसारख्या प्रांतात प्रांताधिकारी ठेवावयास तशीच कारणे आहेत म्हणून तेथे प्रांताधिकारी ठेवले तरी विभागनिहाय प्रांताधिकाऱ्यांच्या जागा काढून टाकणेच आवश्यक आहे. मात्र कलेक्टरसाहेबांना काही निवडलेल्या आणि नियुक्त सभासदांची जिल्हा मंडळे प्रथम तरी सल्लामसलतीसाठी देऊन तसे केल्यावरच, प्रांताधिकाऱ्यांची पुष्कळशी कामे त्यांच्यावर सोपविता येतील. दुसरी महत्त्वाची वाटचाल म्हणजे काही निवडलेल्या व काही नियुक्त अशा सभासदांच्या ग्रामपंचायती किंवा ग्रामसमूह-पंचायती, शहरातून नगरपालिका व तालुका बोर्डस् यांची उभारणी करावयाची. तालुका बोर्डे सर्वस्वी निवडलेल्या सभासदांची व्हावीत; मात्र त्यावर कडक हुकुमत चालविण्याचा अधिकार स्वतांकडे ठेवण्याचा आणि तो बजावण्याचा (अधिकार) अखत्यार प्रांतिक सरकाराकडेच असावा. जकात-उत्पन्नाचा काही हिस्सा या संस्थांना देण्यात यावा म्हणजे त्यांच्या कर्तव्यपालनाच्या व्यवस्थाखर्चासाठी तो उपयुक्त ठरेल. जिल्हा बोर्डाची कामे मर्यादित राखूनच त्याचा पदसिद्ध अध्यक्ष कलेक्टर रहावा.

हिंदुस्थान सरकार :

(१) प्रांतांना अशा-तऱ्हेने व्यवहारतः स्वायत्तता दिल्याने, तदनुसार व्हाइसरॉयांच्या कार्यकारी मंडळाची व मंत्रिमंडळाची फेर-रचना करणे आलेच ! तूर्त, गृह, शेती, शिक्षण व उद्योग आणि व्यापार—अशा खातेवाटणीने त्या (कार्यकारी) मंडळात चार सभासद असतात. आता ज्या अर्थी अंतर्गत कारभार व्यवस्था प्रांतिकसरकाराकडे सोपविण्यात येणार आणि हिंदुस्थानसरकार फक्त आपल्याकडे त्या—(अंतर्गत कारभारा)-वरील नाममात्र हुकुमत राखून ठेवून तिचा क्वचित-प्रसंगी अंमल करणार, त्या अर्थी (कारभारी मंडळाच्या) चार सभासदांच्या ऐवजी अंतर्गत व्यवस्था मंत्री म्हणून एकाच सभासदावर काम भागेल. तथापि, दुसरीही नवीन खाती उभारावी लागतील आणि माझ्या मते खालील खातेविभागणीप्रमाणे (व्हाइसरॉयांचे) कार्यकारी मंडळ सहा सभासदांचे राहील :— (१) अंतर्गत व्यवस्था, (२) अर्थ, (३) कायदा, (४) संरक्षण, (५) रेल्वे, पोस्ट, तारा—वाहतूक, आणि (६) परराष्ट्र खाते.

व्हाइस-रॉयकडील विधिमंडळास हिंदुस्थानची लोकसभा असे अभिधान द्यावे. आरंभी त्या सभेचे सभासद सुमारे शंभर करावेत. आणि तिचे अधिकार

विस्तृत करावेत. मात्र, तूर्त (कदाचित नियुक्त सभासदांची बहुसंख्या बदली घालूनही) प्रांतासाठी केलेल्या स्वयंसिद्धतेच्या कार्यक्षमतेचा भरपूर अनुभव येईपर्यंत, सरकारी बहुमताचे तत्त्व सांभाळावे. यायोगे आणीबाणीच्या प्रसंगी वापरता येईल अशी प्रांतिक कारभाराबाबत राखीव हुकुमत हिंदुस्थान सरकारला मिळेल. या रीतीने, जर एखाद्या प्रांतिक विधिमंडळाने त्या प्रांताच्या हितसंबंधास आवश्यक असलेला कायदेकानू मान्य करण्यास लागोपाठ नकार दर्शविला, तर तो हिंदुस्थान सरकाराला प्रांताच्या वरच्या आपल्या लोकसभेत सम्मत करून घेता येईल. अशे प्रसंग फारच क्वचित् उद्भवतील. परंतु राखीव हुकुमतीने अधिकाराला एक तऱ्हेच्या सुखरूपतेची जाग राहील आणि व्यापक तयारीने प्रांतिक स्वायत्ततेच्या विशाल प्रयोगात ते अधिकारी मन घालतील. तूर्त तरी हे सरकारी वा नियुक्त सभासदांच्या बहुमताचे तत्त्व सांभाळावयाचे, हे गृहीत धरून सैन्य व आरमार याबाबतची प्रश्नोत्तरी, इतर विषयासंबंधीच्या प्रश्नोत्तरी-बरोबरीने चालवून आणि चर्चा करून, सरकारच्या धोरणावर वजन पडत जाईल अशा संधी लोकसभेने वाढत्या प्रमाणात ध्यावयास हव्यात. अशा रीतीने चालणाऱ्या हिंदुस्थान सरकारला सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या हुकुमतीखालून आर्थिक बाबतीत मोकळीक मिळाली पाहिजे आणि त्याच्या (सेक्रेटरी ऑफ स्टेट्च्या) इतर हुकुमतींनाही मोठ्याच प्रमाणात आळा बसला पाहिजे. सेक्रेटरी ऑफ स्टेट्चे कौन्सिल रद्द व्हावे आणि त्याची प्रतिष्ठा धीरे धीरे वसाहतींच्या अंडरसेक्रेटरीच्या प्रतिष्ठेच्या बेतात आणून सोडावी.

सैन्यातील व आरमारातील कमिशने आता भारतीयांना मिळणे जरूर असून लष्करी आणि आरमारी शिक्षणाच्या सुयोग्य सोयीही झाल्या पाहिजेत.

जर्मनांच्याकडून जर जर्मन ईस्ट आफ्रिका जिंकून घेण्यात आलीच तर भारतीय वसाहत स्थापनेसाठी ती राखून ठेवण्यात येऊन ती हिंदुस्थान सरकारकडे सुपूर्द करण्यात यावी."

ना. गोखले यांनी अपेक्षित राजकीय सुधारणांचा हा आराखडा मृत्यूपूर्वी दोनच दिवस, आपल्या होत्या नव्हत्या तेवढ्या मानवी शक्ती एकवटून लिहून काढला. गोखल्यांच्या मृत्यूनंतर या आराखड्याच्या तीन प्रती करून एक लॉर्ड विलिंग्डन्, दुसरी फिरोजशहा मेहता व तिसरी ना. आगाखान यांच्याकडे पाठविण्यात आल्या असे नेक नामदार श्रीनिवासशास्त्रींनी एके ठिकाणी सांगितले आहे. विलिंग्डन्साहेबांच्या सूचनेवरून गोखल्यांनी तयार केलेला आराखडा मातबरांच्याकडे जाईपर्यंत सर्वच व्यवहार "विश्वास-निधी" म्हणूनच चालल्या कारणाने, या सर्वांना, मॉंटेग्यूसाहेबांनी १९१७ च्या ऑगस्टमध्ये हिंदुस्थानला राजकीय सुधारणा देण्याचे जाहीर करीपर्यंत कोणी जाहीर वाचा फोडलीच नव्हती.

ना. आगाखानांनी ना. गोखल्यांचा हा आराखडा इंग्लंडमध्ये प्रथम प्रसिद्ध केला. आणि ना. शास्त्रींनी हिंदुस्थानात ! गोखल्यांचा आराखडा हिंदुस्थानला कमीत कमी काय मिळाले पाहिजे याचाच निदर्शक होता आणि त्या सुधारणा ब्रिटिश सरकारने आपण होऊन एकदम द्यावयाच्या होत्या. युद्धोत्तर हिंदुस्थानच्या इतिहासात एक तेजस्वी प्रकरण सुरू करण्याचा तो श्रीकार होता. वास्तविक ना. गोखल्यांना वसाहतीच्या बरोबरीचे राजकीय हक्क असलेले स्वराज्य हिंदुस्थानसाठी हवे होते. शांततेने व प्रगतीची ठाम पावले टाकून स्वायत्त होणे हे गोखल्यांच्या धोरणाचे सूत्र होते.

* *

२९ : संयुक्त काँग्रेससाठी धडपड !

नामदार गोपाळ कृष्ण गोखले प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे पब्लिक सर्व्हिस कमिशनचे काम सोडून इंग्लंडहून १९१४ च्या नोव्हेंबरमध्ये परत आले. त्या वेळी त्या सालच्या काँग्रेसची तयारी मद्रास येथे जोरात चालूच होती. सुरतेला काँग्रेसमध्ये फूट पडल्यापासून काँग्रेसची एकजूट पुन्हा व्हावी अशी तळमळ पुष्कळांना होती. त्यांत प्रामुख्याने ना. गोखले होते. दक्षिण आफ्रिकेतील लढ्यासंबंधी शिष्टाई करावयास गोखले तिकडे गेले असता, एकमुखी मागणीचा प्रभाव त्यांच्या प्रत्ययाला आलाच होता. पब्लिक सर्व्हिस कमिशनवर (१९१३–१४) काम करताना, हिंदी कमिशनखेरीज इतर कमिशनरांशी गोखल्यांना झगडावे लागे आणि सर्व हिंदुस्थानतर्फे जे मत प्रतिपादावे त्याविरुद्ध आपसातील यादवीवरून इतर कमिशनरांकडून येणाऱ्या आक्षेपांचे खंडन करणे गोखल्यांना कठीण जावे, असा अनुभव असल्यामुळे, आपसातील दुही मोडण्याची तळमळच गोखल्यांना लागून राहिली होती. १९०९ सालच्या "मराठ्या"त संयुक्त काँग्रेस भरविण्याबद्दल त्या वेळचे स्वागत-समितीचे अध्यक्ष लाला हरकिसनलाल व काँग्रेसचे सेक्रेटरी ना. वाच्छा आणि दाजी आबाजी खरे यांच्याबरोबर झालेला त्यांचा पत्रव्यवहार प्रसिद्ध आहे. १९१० साली सर विल्यम् वेडर्नबर्न यांच्या अध्यक्षतेखाली अलाहाबाद येथे काँग्रेस भरली, त्या वेळी पुण्याच्या राष्ट्रीय पक्षातर्फे संयुक्त काँग्रेस भरविण्याबद्दल तार गेली होती. पण वेडर्नबर्न यांच्या सेक्रेटरीसारखे वागणाऱ्या गोखल्यांच्या प्रयत्नाला यश येऊ शकले नाही. १९१२ साली काँग्रेसच्या घटनेत गोखल्यांच्या प्रयत्नाने फेरफार होऊन काँग्रेसचे दरवाजे अधिक खुले करण्यात आले. त्यामुळे १९१४ सालच्या सातारा प्रांतिक परिषदेत नेमस्त-राष्ट्रीयांची संयुक्त काँग्रेस पुन्हा व्हावी असे मत प्रकट झाले आणि त्यासाठी मद्रासला काँग्रेसमध्ये जाऊन भाऊसाहेब सोमण आणि अप्पासाहेब आळतेकर यांनी त्या ठरावान्वये काही घडते का पहावे असेही ठरले. त्याबाबत हालचाली सुरू होताच अनुकूलतेचे वातावरण तयार होऊ लागले.

लो. टिळक मंडालेहून परत आल्यावर समेटाच्या प्रश्नाला खरे तोंड लागले. या प्रकरणात मध्यस्थी करण्याचा प्रमुख मान डॉ. ॲनी बिझांट या थिऑसॉफिस्ट

बाईनी उचलला. काँग्रेसचे ध्येय "वासाहातिक स्वराज्य" हे ज्यांना मान्य असेल त्यांनी काँग्रेसच्या क्रीडवर मान्यतादर्शक सही करून खुशाल काँग्रेसमध्ये यावे आणि प्रांतिक काँग्रेससमिती किंवा काँग्रेसने मान्य केलेल्या इतर संस्था यांच्याप्रमाणे सार्वजनिक सभा भरवून लोकांना काँग्रेससाठी प्रतिनिधी पाठवण्याचा हक्क असावा असा स्पष्ट दण्डक झाला. राष्ट्रीयांना काँग्रेसचे ध्येय व्यवहारशुद्ध म्हणून मान्य होते. पण प्रत्येकाने या क्रीडला लेखी मान्यता दिली पाहिजे अशी सक्ती त्यांना नको होती. प्रांतिक काँग्रेस-समित्या नेमस्तांच्या हाती असल्यामुळे त्यांच्यातर्फे काँग्रेसमध्ये जाण्यातही काही 'व्यक्ति-प्रतिष्ठित' राष्ट्रीयांना कमीपणाचे वाटत होते, वादाचे सल येथेच असावे ! १८९६ साली सार्वजनिक सभा टिळकांनी जिंकली १९०८ साली, टिळकांवर खटला झाला नसता तर, काँग्रेसकबजा करण्याचा प्रयत्न झालाच नसता असे नव्हे. पण वाहिली ती गंगा व राहिले ते तीर्थ असे समजून १९१४ साली काँग्रेस-मध्ये जाण्याचे त्यांनी ठरविले आणि म्हणून समेटाचे बोलणे करण्याचा उद्योग करणाऱ्या डॉ. बिझांटबाईंना त्यांनी रुकार दिला.

राष्ट्रीयांना स्वाभिमानाने काँग्रेसमध्ये प्रवेश करता यावा म्हणून काँग्रेस-घटनेमध्ये (२० व्या कलमात) बिझांटबाईंनी सुचविलेला फरक करण्यास गोखले तयार झाले. तेव्हा समेटाचे बोलणे करण्याकरिता पुण्यास येते, असे बिझांटबाईंनी लो. टिळकांस लिहिल्यावर टिळकांनी ठिकठिकाणच्या राष्ट्रीय पुढारी लोकांची पत्रद्वारे सल्लामसलत घेतली; काहींस पुण्यास बोलवून घेतले; अशा करता की, बिझांटबाईंस सर्वांच्या एकमताने काही तरी निश्चित जबाब देता यावा. त्याप्रमाणे सर्वांचे एकमत होऊन समेट कोणत्या शर्तींवर व्हावा तेही बिझांटबाई पुण्यास येण्यापूर्वी टिळक-पक्षीयांकडून ठरविण्यात आले. बिझांटबाई २९ नोव्हेंबर १९१४ च्या ऐवजी ७ डिसेंबर रोजी नेमस्त पुढारी सुब्बाराव पंतुलु यासह पुण्यास आल्या. त्या वेळी राष्ट्रीयांचे काय मत होते ते छापून त्यास देण्यात आले व तेच पुढे "मराठा" पत्रातही प्रसिद्ध झाले. मद्रासच्या काँग्रेसपुढे घटना-दुरुस्तीचा जो ठराव बाई आणणार होत्या त्याचा मसुदा ना. गोखले यांनीच तयार केला होता.

दरम्यान डॉ. बिझांट व सुब्बाराव पंतुलु हे टिळकांना भेटून गेल्यावर मद्रास काँग्रेसला सुरुवात होईपर्यंत यंदा समेट होऊन संयुक्त काँग्रेस होणार असाच भरवसा सर्वांना वाटत होता. कारण टिळकांचे निवेदन व गोखल्यांनी रेखाटलेला ठराव घेऊन बाई मद्रासेस गेल्या होत्या. परंतु आयत्या वेळी अगदीच अनपेक्षित उमटले. पुण्यास येण्यापूर्वी सुब्बाराव प्रथम मुंबईस नेमस्तांचे म्हणणे ऐकावयास गेले होते. तेथे समेटास यश येईल असे त्यांस फिरोजशहा मेहतांकडे अगर वाच्छांकडे दिसलेच नाही. मेहतांनी आपले सहकारी डी. जी. दळवी यांना गोखल्यांकडे पुण्यास

पाठविले, पण गोखल्यांच्या आजारीपणामुळे गाठ न झाल्याने ता. १ डिसेंबर रोजी दळवींनी गोखल्यांना पत्राने कळविले की, " संयुक्त काँग्रेसबद्दल चाललेली बोलणी लक्षात घेऊन सर मेहतांनी आपणास कळविण्यास मला सांगितले आहे की, " माझी याबाबत काही कल्पना नाही. मोठा गुंताडा चालू आहे. गोखल्यांनी कोणत्याही शब्दाने गुंतू नये; मी त्यांना लवकरच समक्ष भेटेन व त्यासंबंधी बोलेन " असे मेहतांचे म्हणणे आहे. गोखल्यांना सुब्बाराव ता. ८ रोजी मुंबईचा अहवाल देऊन आल्यावर सुब्बारावांचे व टिळकांचे बोलणे ता. ९ रोजी सकाळी झाले.. टिळकांच्या भाषणाचे टाचण सुब्बाराव करीत होते. ते त्यांनी टिळकांना दाखवून टिळकांनी एक-दोन दुरुस्त्या सुचविल्यावर सुब्बारावांचा लेख तयार झाला तो गोखल्यांच्याकडेच तयार झाला. त्यात " बहिष्कार " म्हणजे " सरकारवर बहिष्कार " असे कोठेही नाही. गोखल्यांसही ते मान्य होतेच. पण सुब्बारावांशी तोंडी बोलणे झाल्यावरून गोखले यांचे मत असे बनले होते की, सरकारवर बहिष्कार घालण्यापर्यंत टिळक आपल्या १९०७ च्या वेळची मते " काँग्रेसमध्ये पुढे रेटणार ! " शक्य तेथे सहकारिता व आवश्यक तेथेच फक्त विरोध, हे नेमस्तांचे धोरण पार बदलून शक्य तेथे तेथे विरोध व अपरिहार्य तेथेच सहकार, हे सरकारशी वागण्याचे राष्ट्रीयांचे धोरण काँग्रेसमध्ये प्रस्थापित करण्याकरिताच निर्बंध स्वीकारूनही राष्ट्रीय पक्ष काँग्रेसमध्ये येत आहे आणि त्या नव्या धोरणाचे अंतिम पर्यवसान म्हणजे बहिष्काराचा अर्थ ब्रिटिश शासनावरही बहिष्कार असा कसा होणे शक्य आहे असे काहीसे अनुमान निघणे अशक्य नव्हते ! मुंबईच्या नेमस्त-ग्रणींकडून आपले मत असे काही झाल्याची सूचना गोखल्यांस आली होती की काय, हे कोणासच निश्चित सांगता येण्यासारखे नव्हते, पण तसे काही झाले असावे असा संशय राष्ट्रीयांना तरी असावा, असे 'केसरी'तील त्या वेळच्या लिखाणावरून दिसत होते. ना. गोखले यांनी तसे कोठे व्यंजनेनेही व्यक्त केले नसल्यामुळे, सुब्बारावांशी झालेल्या बोलण्यावरूनच त्यांच्या मनावर " बहिष्कार " याचा अर्थ " ब्रिटिश शासनावरीलही बहिष्कार " असा राष्ट्रीय करीत आहेत आणि महायुद्ध सुरू झाले असता व स्वतः टिळकांनी " इंग्लंडची अडचण तीच हिंदुस्थानचे संधिसाधन " हे जाणून सर्व लोकांनी सरकारला सहाय्य करावे असा जाहीर मनोदय प्रकट केला असताही, " शक्य तेथे तेथे विरोध आणि अपरिहार्य तेथे सहकार " या धोरणानेच राष्ट्रीय काँग्रेसमध्ये येणार असतील, तर राष्ट्राला ते कल्याणप्रद ठरणार नाही, असे गोखल्यांच्या मनाने घेतले. लोकशाहीचा पुरस्कार या तत्त्वाने पाहिल्यास राष्ट्रीयांना बिझांटबाईंच्या सांगण्याप्रमाणे जर घटनेत दुरुस्ती करून काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा स्वाभिमानपूर्वक वाव काँग्रेस देणार तर जोपर्यंत ते (स्वतःची सही देऊन क्रीड मानून आल्यावर) त्या क्रीडशी विसंगत वागणार नाहीत तोपर्यंत, त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल दुरूनही शंका दाखविणे

गैरसावधगिरीचे ठरणार. पण आजारी असलेल्या व हळव्या मनाच्या झालेल्या गोखल्यांना ते भान राहिले नाही असे दिसते व पुढील संभाव्य मतभेदाच्या आगीला भिऊन लोकनिंदेच्या फुफाट्यात पडण्याचे कार्य त्यांच्या हातून घडले ! मागाहून रोगाच्या प्रतिकारक उपायांचा अवलंब करण्यापेक्षा अगोदरच प्रतिबंधक उपाय योजावा या सद्बुद्धीनेच कदाचित असेल पण जे घडले ते असे की, १५ डिसेंबर १९१४ चे सुमारास मद्रासच्या काँग्रेसचे नियोजित अध्यक्ष भूपेंद्रनाथ बसू यांना गोखल्यांनी एक " विश्वस्तगुह्य " म्हणून पत्र लिहिले व त्यात स्वतःच्या मते समेट मोडल्याचे कारण " टिळक हे सरकारवर बहिष्कार घालणारे आहेत व आयरिश लोकांचे मार्ग स्वीकारणारे आहेत " असे जे त्यांचे सुब्बारावाशी बोलण्यात मत झाले होते, त्याचेच प्रतिबिंब होते.

ना. गोखल्यांचे हे पत्र भूपेंद्र काँग्रेसच्या कामासाठी निघाले तेव्हा त्यांना मिळाले. ते विषयनियामक-समितीपुढे मांडण्यासारखे नाही असे त्या पत्राच्या " विश्वस्तगुह्य " स्वरूपामुळे भूपेंद्रांचे मत झाल्याकारणाने, विषयनियामक समितीत आपल्याला उजळ माथ्याने बोलता येऊन गोखल्यांचा दृष्टिकोन समजावून देता यावा म्हणून त्यांनी गोखल्यांच्याकडून दुसरे पत्र मागविले. तदनुरोधाने गोखल्यांनी दुसरे पत्र दिलेही. विषयनियामक समिती भरली; सर्व मंडळी समेटास अनुकूल होती. परंतु गोखल्यांच्या पत्रातील " सरकारवरील बहिष्कार " हा शब्द भूपेन्द्रांनी वाचल्याबरोबर सर्व मंडळी स्तिमित झाली ! बिझांटबाईंनी तार करून लो. टिळकांस खुलासा मागितला. " अरे जे बाप्पा झालेचि नाही, त्याची वार्ता पुससी काई ॥ " या मनोवृत्तीनेच टिळकांचे उत्तर गेले की, " सरकारवर बहिष्कार टाका, असे मी कधीच म्हटले नाही. राष्ट्रीय पक्षाचे लोक प्रमुखपणे नगरपालिकांत व विधिमंडळात कामे करीतच आहेत ! " भूपेंद्रांना मग साहजिकच अवघडल्यासारखे झाले. टिळकांवर न कळत आरोप केल्याबद्दल त्यांनी दोन-तीनदा दिलगिरीही व्यक्त केली आणि समेटाचा गाडा पुढे ढकलण्याचे काम एका समितीकडे सुपूर्द होऊन ते पुढल्या वर्षावर म्हणजे कालावधीवरच गेले ! आजारपणामुळे गोखले व काँग्रेसघटनेत दुरुस्ती होऊन प्रवेशद्वार खुले व्हावयाचे शिल्लक उरल्यामुळे टिळक त्या प्रसंगी मद्रासेस नव्हते. दोघेही हजर असते तर समेट कदाचित झालाही असता.

मग मात्र अमृतबझार पत्रिकेने या सर्व प्रकरणाचा स्फोट केला. केसरीने ९ फेब्रुवारी १९१५ च्या अंकात " चोराच्या उलट्या बोंबा " हा जळजळीत अग्रलेख लिहिला. त्यात ना. गोखल्यांच्यावर सणसणीत टीका होती. मग काय ? सुंदोपसुंदीचा जुना धुरळा पुन्हा उठला ! गोखल्यांनी बसूंना धाडलेले " विश्वस्त-गुह्य " पत्र प्रसिद्ध करावे असे आव्हान करण्यात आले. आपण ते टिळक किंवा त्यांचे प्रतिनिधी यांस दाखवण्यास तयार आहो आणि त्याला वृत्तपत्रात प्रसिद्धी न मिळावी, कारण त्याने मचमच फार माजेल, एवढाच आपला हेतू ते " विश्वस्तगुह्य "

आहे असे म्हणण्यात होता' असे ना. गोखल्यांनी कळवले. पण कुंभाराची सून उकिरड्यावरच रेऊ द्या, टिळकांना किंवा त्यांच्या प्रतिनिधींना ते पत्र खासगतात बघण्याची आवश्यकता नाही, कारण तो राष्ट्रीय पक्षाच्या इज्जतीचा प्रश्न होऊन बसला आहे, असे गोखल्यांना समजावण्यात आले.

झाले ! आपल्या हेतूचा, खटपटीचा आणि सावधगिरी म्हणून केलेल्या पत्रव्यवहाराचा " विपर्यास " व त्यायोगे देशात उठलेले वादाचे व गैरसमजाचे काहूर पाहून ना. गोखल्यांना मरणप्राय दुःख झाले. उबग आला. विश्वस्तगुह्य म्हणून जे पत्र भूपेंद्रांना गोखल्यांनी लिहिले होते ते सर होमी मोदी यांनी फिरोजशहा मेहतांच्या चरित्रात प्रसिद्ध केल्याप्रमाणे असे आहे : " तीन वर्षांपूर्वी कलकत्त्यास जेव्हा पं. मदनमोहन मालवीय, मी व इतरांनी आग्रह धरला की, प्रतिनिधी निवडण्याचा हक्क त्या सार्वजनिक संभांना द्यावा की, ज्यामध्ये भाग घेणारी मंडळी घटनेच्या ९ व्या कलमाला मान्यता देऊन राहतील; तेव्हा सर्वच निरनिराळ्या प्रांतांतील आमच्या जहाल मित्रांना आपल्या आपल्या वाटचालीतील चूक आढळून आली आहे आणि त्यांना कळून चुकले आहे की, देशाच्या चालू परिस्थितीत राजकीय कार्य करण्याचा एकमेव मार्ग काँग्रेसचाच तेवढा आहे, म्हणून त्यांना काँग्रेसमध्ये यावयाचे आहे आणि आपले विरोधक म्हणून ज्यांना आपण मानतो, त्यांच्याकडे निवडणुकीसाठी आपणास जावे लागण्याने आपल्या स्वाभिमानास धक्का बसतो एवढीच त्यांची अडचण आहे, अशी आमची समजूत झाली होती. म्हणून काँग्रेसमध्ये फिरून यावयास त्या आमच्या देशबांधवांना संकोच राहू नये यासाठी नियमांचा काटेकोरपणा थोडा सैल करणे इष्ट आहे असे आमचे मत झाले. १९०७ सालापासून सार्वजनिक जीवनात पडलेले भगदाड लवकरात लवकर भरून काढण्याची संधी घ्यावी या आत्यंतिक इष्टतेमुळे आम्ही आमच्या (पहिल्या) वृत्तीपासून ढळतो ते अशा करता की, वांध्याच्या परंपरेत देशाच्या उगवत्या पिढीने वाढीस लागू नये. गेल्या आठवड्याअखेर खरोखर माझा हा दृष्टिकोन होता आणि त्याच्या बेतालाच काँग्रेसमधील लोकमत आणून सोडण्यासाठी आपल्या कुवतीप्रमाणे झटण्यास मी तयार झालो होतो. मात्र ज्याच्या नेतृत्वाला मी मानतो अगर इतकी वर्षे ज्यांच्याबरोबर मी काम करीत आलो, त्यांच्याशी फाटण्याचा प्रसंग मला नको आहे !"

या पत्रातील शेवटच्या वाक्यातूनच जी वावटळ उठली असती ती उठू नये म्हणून आपल्या स्वतःच्या भावनांची सार्वजनिक चर्चा नको म्हणून गोखल्यांनी ते पत्र विश्वस्तगुह्य म्हणून हेतूने संबोधले. पण त्या संबोधनामुळेच गोखल्यांना नको असलेली वावटळ ती त्यांना उबग येण्याइतकी उठली. उपरोक्त पुढील मजकुराचा रोख असा होता की, टिळक स्वराज्याची मागणी तेवढी चिकाटीने करीत राहणार आणि ते मिळेपर्यंत ते बाकीच्या किरकोळ सुधारणांची फिकीर करणार नाहीत.

ता. २५ डिसेंबर १९१४ ला गोखल्यांनी जे दुसरें पत्र भूपेंद्रांना लिहिले त्यात असे म्हटले होते की, "काँग्रेसचा चालू कार्यक्रम आमच्या चालू पद्धतींनी शेवटास नेण्यासाठी आमच्याशी सहकार देण्यास जर ती (राष्ट्रीय) बाहेर पडलेली मंडळी येणार असतील, तर त्यांना आणावयास योग्य ती कोणतीही गोष्ट करावयास आपण तयार आहोत, अशी माझी थोडक्यात वृत्ती आहे. पण जर का त्यांना १९०६–०७ चा झगडाच पुन्हा (टिळकांनी सुब्बारावांस सांगितल्याप्रमाणे) सुरू करावयाचा असेल, तर त्याचा शेवट सुरतेस झाला आहे. तशा परिस्थितीत आपण काही बदल करावयाच्या विरुद्धच आहोत." या पत्रातील शेवटच्या भागाने, आपण जे नाही आहोत, तसे आहोत असे दाखविले गेल्याने टिळकांना रागच राग आला ! त्यामुळे पूर्वग्रह आणि गैरसमज यांच्या खडकावर तडजोडीचे तारू फुटले आणि उगीचच्या उगीच लोकप्रक्षोभाचा व सुज्ञांच्या शोकाचा विषय होऊन बसले ! !

मद्रासची काँग्रेस यथाक्रम पार पडली,तरी तिच्या विषयविनियामक समितीतील कवित्व बरेच दिवस लोकांस पुरले ! ते कवित्व लोकचर्चेतून चावले, चघळले जात असताच, ना. गोपाळराव गोखल्यांची प्रकृती नोव्हेंबर १९१४ पूर्वीपासून जी खालावत येत होती ती खालावतच राहिली. इंग्लंडमध्ये त्यांना डॉक्टरांनी इशारा दिला होता की, त्यांचा आता फार दिवसांचा भरवसा नाही. गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांच्या गीतांजलीत म्हटल्याप्रमाणे प्रेयसीच्या स्वागतासाठी हुरूपाने वाट पाहणाऱ्या प्रियकरासारखे ना. गोखले काळाची वाट पहात होते. त्यांच्या समाचाराला (म.) गांधी ता. १२ फेब्रुवारी १९१५ ला आले होते.

* * *

३० : संन्याशाचा संसार

१३ फेब्रुवारी १९१५ रोजी दुपारी भारत-सेवक-समाजातच गांधीजींचा सत्कार करण्यात आला. गोपाळराव गोखल्यांनी तो समाज स्थापन केल्यापासून त्यांचे वास्तव्य त्या संस्थेच्या वास्तूतच बहुशः असे.

जीवनाचे मांगल्यनिधान म्हणून डेक्कन एज्युकेशन सोसायटीतील आजन्म सेवक होण्याचे गोपाळराव गोखल्यांनी मुक्रर केल्यावर, पुण्यात त्यांनी घर करून रहावे हे मग क्रमप्राप्तच होते. गोपाळरावांचे लग्न त्यांचे पिताजी कृष्णराव १८७९ साली आपल्या वयाच्या बेचाळिसाव्या वर्षी वारल्यावर; त्यांचे चुलते अंताजीपंत यांनी, तत्कालीन रूढीप्रमाणे सन १८८० सालीच उरकून टाकले होते. वडीलधाऱ्यांचा अवमान करावयाचा नाही, म्हणूनच केवळ गोपाळराव लग्नास उभे राहिले होते. संसाराची जबाबदारी आपली आपल्याला पेलण्याचे सामर्थ्य येईपर्यंत हा "आणा" मागे लावून घ्यावयास गरीबीने हळवे झालेले त्यांचे मन तयार नव्हते. शिवाय, वयाने व शिक्षणाने त्या वेळी ते "लग्नाअजुनि लहान" होते. त्यातही बिरव्हाळच्या भागवतांच्या कन्येशी लग्न करून मोकळे झाल्यावर आढळून आले की, आपली अर्धांगी—सहधर्मचारिणी पण्डुरोगी आहे!— मग गोपाळरावांना साहजिकच "अनुदिनि अनुतापें तापलों रामराया।" असेच होऊन गेले यात नवल काय?

गोपाळरावांची जन्मतावित्री त्यांना "संसारदुःखें बहु शीणलों मी।" म्हणावयास कारणीभूत झाल्याकारणाने त्यांच्या जीवनाचा होऊ पाहणारा उन्हाळा त्यांच्या थोरल्या भावजयीस पाहवेना! गोपाळराव १८८६ पर्यंत कोणत्या ना कोणत्या व्यासंगात दंग राहून फटिंगासारखे चालत. ही सपत्निकाची विधुरावस्था गोपाळरावांच्या विशीपर्यंत चालण्यासारखी असली तरी ती पुढे वडील बंधू गोविंदराव अण्णांनाही मानवेनाशी झाली. गोपाळराव एकविशीला टेकण्याच्या बेताला, व्यवहारातील लौकिक दृष्टीचे ते पतिपत्नी, गोपाळरावांना दुसरे लग्न करण्याचे आर्जव करण्यास व आग्रह धरण्यास पुढे झाले. पण गोपाळराव सारखे नाही नाही करीत होते. कॉलेजमध्येच उच्च शिक्षण घेत असता त्यांच्या मनावर उत्तम संस्कार झाले होते; नवीन जग आणि उद्याचा हिंदुस्थान त्यांना, टिळक—आगरकरांच्या

उदाहरणांनी, अंधुकपणे का होईना, दिसू लागला होता; सार्वजनिक असलेल्या अज्ञानाच्या गाढतेमुळे होणारी राष्ट्राची हानी प्रतीत होऊन ती नाहीशी करण्याची तळमळ त्यांना लागलीसवरली नसली तरी त्या हानीत आपल्या कृतीची भर पडू नये असे त्यांना वाटत होते; राजकीय स्वावलंबनाच्या पूर्ण अभावामुळे राष्ट्राची वाढ खुजी व जोम नेभळा झाल्याने एकंदरीने होणारी पीछेहाट थांबविण्यासाठी स्वताच म्हणून काही करण्याचा आराखडा नसला तरी टिळक-आगरकरांच्या संस्थेत सामील झाल्याने आपल्या हातून त्या दिशेने काही सेवा व्हावी असा नियतीचा संकल्प असेल, असा त्यांना भास होऊ लागला होता; अशा अनेकानेक कारणांनी गोपाळरावांचा दुसऱ्या लग्नाला साफ नकार होता असे म्हणता आले नाही तरी होकारही साफ नव्हता. तरी पण आपल्या मनाची अशा दिशेची प्रेरणा वडिलधाऱ्यांच्या मनावर ठसविण्याइतकी कर्तृत्वाची पुण्याईही अजून तरी गोपाळरावांच्याजवळ नव्हती. डॉक्टरांनी पहिली पत्नी सौ. सावित्री संसार करू लागणे अशक्य असल्याचे निक्षून सांगितले होते. आणि आपल्यासाठी किती तरी त्रास आणि अर्थिक वगैरे सर्व तऱ्हेची सोनेमोल झीज सोसणाऱ्या वत्सल वहिनी सौ. सीताबाई आग्रह करीत होत्या, त्यांना दुखवणे गोपाळरावांच्या जिवावर येऊन " धोपट मार्गा सोडूं नको " असे आपल्या मनाला समजावून गोपाळराव दुसऱ्या लग्नाला तयार झाले. मग त्यांचा द्वितीय विवाह १८८७ च्या मे महिन्यात झाला तो पेंडसे कुलोत्पन्न वधूशी. ती सौ. राधाबाई गोखले झाली.

तरीही स्वताकरिता व कुटुंबियांकरिता कष्ट करणाऱ्या उदंड कुटुंब-काबाड्यांच्या गर्दीत घुसून ते " जनस्वभाव गोसावी " झाले नाहीत. उलट, फकिरी घेऊनही ते बसले नाहीत. तसे त्यांना करताच आले नसते. निदान घर तरी चालावयाला हवे होते ना ? १८८८ साली न्या. रानड्यांनी सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाचे संपादन गोखल्यांच्याकडे सोपविले. त्या कामाबद्दल महिना चाळीस रुपये पगार सार्वजनिक सभेच्या पूर्ववहिवाटीप्रमाणे द्यावा असेही रानड्यांनी सुचविले. परंतु आगरकरांच्या उदाहरणाने शक्य तेवढे निरपेक्ष लोककार्य करण्याचे तत्त्व गोपाळराव गोखल्यांच्या मनात बाणले असल्यामुळे त्यांनी संपादकीय कामाकरिता सार्वजनिक सभेकडून ठरलेला पगार " नको " म्हणून सांगितले व ते काम बिनमोबदल्याने केले. पैशासंबंधी गोखल्यांची स्थिती त्या वेळी फारशी समाधानकारक होती असे नाही. गोखले न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक झाल्यावर इतर व्यवसाय करून पगारात (१८८५–८६ साली) भर घालीतही. गरीबीत राहूनही होतकरू गोपाळरावांच्या शिक्षणाला मदत करणाऱ्या त्यांच्या वत्सल बंधुभावजयींचा संसार-पसाराही मोठा होता. त्यातच आता गोपाळरावांनी दुसरे लग्न केले होते. तथापि, लोककार्यासाठी उद्योग करताना " मागणे लई नाही बा, लई नाही, पोटापुरते देई । " अशीच भूक भागवावी असेच गोखल्यांच्या साधू मनाने घेतले व

सोसायटीत जर पोटापुरते मिळते तर अधिक नको, असे त्यांनी ठरविले. तत्कालीन वृद्धांना या त्यांच्या सदिच्छेचे फारच कौतुक वाटले. इतके, की दामोदर जनार्दन गोखले मुद्दाम गोपाळरावांच्या घरी आले व "शाबास आहे तुमची गोपाळराव, तुमच्या हातून असेच देशकार्य होत राहो!" असा आशीर्वाद देऊन गेले.

या वेळी गोपाळरावांच्याजवळ पुण्यात त्यांच्या आई, पत्नी सौ. राधाबाई व आणखी काही मंडळी होती. हरएक बारीकसारीक गोष्ट आपणच करावयाची व पहावयाची हेच जर घरधन्याचे अपरिहार्य कर्तव्य समजावयाचे असेल तर, गोपाळराव गोखले "उदासीन हा काळ कोठें न कंठे।" या सदरातच होते. घरातील हिशोबाच्या रुपये आणे पैंच्या बारीक तपशिलासंबंधात त्यांना फिकीरही वाटत नसे. १८९१ साली त्यांना मुलगा झाला. पण तो पंधरा दिवसांतच गेला. त्याच सुमारास त्यांच्या मातुःश्रीही देवाघरी गेल्या. तेव्हा सहजच गोपाळरावांच्या शोकाला पारावार नव्हता. आशीर्वादाचे छत्र आणि आशेचा तंतू एकदम तुटल्यावर त्यांची काय अवस्था झाली असेल, याची कल्पनाच केलेली बरी! आपल्या कुंडलीतील संसारसुखासंबंधीचा ग्रहयोग असा प्रत्ययाला आल्यामुळेच, त्यांचा ज्योतिषावर विश्वास बसला असावा आणि १८९८ साली गुरुदत्तकृपेने त्या शास्त्राचा अभ्यास व्हावा म्हणून प्रेरणा झाल्याचे त्यांच्या दैनंदिनीत जी नोंद आहे तिचे मूळ १८९१ च्या दुर्दैवयोगात व १८९७ साली वेल्बी-कमिशनपुढे झालेल्या साक्षीने राजकारणी नवनेतृत्वाचा योग जो कुंडलीत होता त्यास अनुसरून अमाप लोकप्रशंसेचे जे आहेर झाले त्यांतही असावे! काही का असेना, भावनाप्रधान गोपाळराव गोखले हे मात्र कसल्याही परिस्थितीत कायमच होते. गोपाळरावांच्या आई, ते सहकुटुंब शनिवारातील भाटवडेकरांचे वाड्यात बिऱ्हाडाने असताना वारल्या. तो वाडा पुढे गोखल्यांनी सोडला तरी, जेव्हा जेव्हा त्या वाड्यात जाण्याचा त्यांस प्रसंग आला, तेव्हा तेव्हा आई जेथे वारल्या त्या खोलीत गोपाळराव साष्टांग नमस्कार घालीत, असे सांगतात. त्यानंतर १८९३ साली (भाद्रपद शु॥ १ स) गोपाळरावांच्या थोरल्या मुलीचा—काशीताईचा—जन्म झाला. पहिल्या मुलाच्या मृत्यूने मन पोळले असल्यामुळे ही मुलगी दोन महिन्यांची होईपर्यंत, ते रोज कळकळीने चौकशी करून, सर्व काही ठीक आहे याची खात्री करून घेत. १९१० सालीही मुलीची प्रकृती बरी नाही अशी तार मद्रासेस मिळाल्यामुळे गोखले तिकडे प्राथमिक-शिक्षण-प्रसार-समिती स्थापण्यासाठी गेले होते ते ताबडतोब पुण्यास निघून आले होते. मुलीच्या प्रकृतीसंबंधी इतकी चिंता वाहणारा गृहस्थ घरगुती कर्तव्यात उदास कसा म्हणता येईल? एवढे खरे की, गृहसौख्य म्हणून बराच वेळ बायको-पोराशी खेळण्या-हसण्यात, गप्पा-गोष्टी करण्यात आणि वेळप्रसंगी घरकामास हातभार लावण्यात ते वेळ घालवीत नसत.

पैशाच्या दृष्टीने गोपाळरावांची स्थिती त्यांचे इंग्रजी अंकगणित १८९६ साली मॅक्मिलन् कंपनीने करार करून घेतल्यावर चांगलीच सुधारली. ओढाताण न होता त्यांचा उदारहस्तक प्रपंच चांगलाच चाले. गोपाळरावांचा स्वभाव टापटिपीच्या नेटक्या संसाराला आवश्यक तेवढा खर्चिक होता. कोणाला पैसा देत नाही असे म्हणावयाचे त्यांच्या जीवावर येई. त्यांच्या येथून याचक विन्मुख होऊन जावयाचा नाही. त्यामुळे गोपाळरावांना मिळे ते सारे संपे. काही उरलेच तर मग ते कागलास वडील बंधूंच्या सेवेस धाडीत. आपल्या शिक्षणासाठी स्वताच्या अंगावरील दागिने मोडून देणाऱ्या आपल्या मातृसदृश भावजयीबद्दल निन्तात कृतज्ञता वाटून, तिने आपले दागिने फिरून अंगाखांद्यावर घालावे, अशी गोपाळरावांची इच्छा होती. धन्य त्या वहिनी ! धन्य ते भाऊजी ! ! पण याबाबत गोपाळरावांची मनीषा पुरी व्हावी असा ईश्वरी संकेत नव्हता. कारण गोपाळरावांच्या सौ. सीतावहिनी (पोंक्षे कुलोत्पन्न) १८८८ च्या सुमारास दिवंगत झाल्या होत्या. तरी, त्यांच्याजागी कुरुंदवाडच्या लिमये-कुलोत्पन्न येसूताई सौ. लक्ष्मीवहिनी होऊन आल्या. त्यांनाही गोपाळराव फार मान देत.

सन १८९६ मध्येच गोपाळरावांना दुसरे कन्यारत्न झाले. गोदावरी हे तिचे शुभनाम. ती चार वर्षांची होते न होते तोच आणि वेल्बी-कमिशनच्या वेळी मँचेस्टर गार्डियनमध्ये सरकारच्या प्लेग–प्रतिबंधक अत्याचाराविषयी केलेल्या अघळ-पघळ विधानांबद्दल माफी मागितल्यामुळे झालेला उपहास अजून संपूर्ण ओसरला नसतानाच, गोपाळरावांच्या संसारसम्राज्ञीने १९०० साली इहलोकची यात्रा संपविली. आईवाचून दोन पोरक्या मुलींचा बाप अशी केविलवाणी अवस्था गोखल्यांच्या वाट्याला आली ! "कठिण स्वजनमाया तोडिता तोडवेना ।" अशी अवस्था असूनही आपल्याला वरिष्ठ विधिमंडळात काम करावयास संधी देण्याबद्दल फिरोजशहा मेहताना, ता. १५ जानेवारी १९०१ रोजी विनंतिपत्र लिहेतांना गोखल्यांनी लिहिले होते की : "माझ्या कौटुंबिक जीवनाचा आणि स्थावर घराचा मुख्य बंध नाहीसा झाला आहे !" पत्नीने परलोकी प्रयाण केलेले आणि गुरुदेव न्यायमूर्ती रानडे मृत्युशय्येवर, तेव्हा प्रा. गोखल्यांच्या डोळ्यापुढे कसले विश्व उभे राहिले असेल, याची कल्पनाच केलेली बरी ! कोणत्या जबाबदाऱ्या त्यांना वाढलेल्या वाटल्या असतील यांचे गणित कोण करणार ? पण सरकारी प्लेग अत्याचारांबद्दल केलेल्या विधानांबद्दल माफी मागावी लागल्यामुळे हिंदुस्थानचे पुढारी बेजबाबदार असतात, हा जो डाग त्यांच्यावर आला होता तो गोखल्यांना साफ धुऊन काढावयाचा होता. फर्ग्युसन कॉलेजातील निवृत्तीचे दिवस जवळ येत होते. तेव्हा निःसंगत्वाची त्यांनी तयारीच चालविली होती. १९०२ च्या सप्टेंबर १९ ला ते निवृत्तिपूर्व रजा घेऊन बसले ! ते प्राध्यापक म्हणून काम करीत असता स्वताच्या कष्टाने ते स्वताकरिता पाऊणशे रुपये मिळवीत होते. तेही मिळवावयाचे

सोडून दिल्यावर १९०४ च्या व्यावहारिक संपूर्ण निवृत्तीनंतर कॉलेजातून मिळणाऱ्या तीस रुपयांच्या निवृत्तिवेतनावरच संतुष्ट राहून स्वतःकरिता काही मिळावयाचे नाही, जे काही मिळवावयाचे ते देशाच्या कारणी लावावयाचे, असे व्रत त्यांनी धारण केल्यामुळे म्हणजे पूर्वी संसारान्तर्गत संन्यास होता तो आता संन्याशाचा संसार (१९०५) झाल्याकारणाने, राष्ट्राच्या हृदयात त्यांना कायमचे स्थान मिळाले. अवलंबून असलेल्या मंडळींसाठी अंकगणिताचे वर्षासन होतेच !

लॉर्ड कर्झन यांनी गोखल्यांना १९०४ सालीच 'सिटिझन ऑफ दि इंडियन एम्पायर' (सी. आय्. ई.) ही पदवी दिली होती आणि आपल्या जबाबदारीने विधिमंडळातील खास विरोधी पक्षाच्या केलेल्या नेतृत्वाचा तो जगापुढे मांडण्यासारखा दाखला म्हणून गोखल्यांनी ती स्वीकारली होती. त्यानंतर १९०५ साली इंग्लंडात गोपाळराव गोखल्यांनी काँग्रेसतर्फे शिष्टाई करून, वंगभंगामुळे उद्भवलेल्या परिस्थितीतून भारतीय आकांक्षांच्या व्यवहार्य तृप्तीची उपाययोजना सुचविताना जे व्याख्यान-सत्र केले, त्याच्या श्रमांनी त्यांचा घसा दुखू लागला व त्यावर हिंदुस्थानात परत येत असता, बोटीवर शस्त्रक्रिया करावी लागली. याच (१९०५) साली १२ जून रोजी गोपाळराव गोखल्यांनी भारत-सेवक-समाजाची स्थापना करून ती संस्था पोटच्या गोळ्याप्रमाणे संगोपावयास सुरुवात केली. कामाचा असा व्याप वाढल्यामुळे पुणे शहर म्युनिसिपालिटीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन ते आता त्या जबाबदारीतून जाणूनबुजून मोकळे झाले होते. १८९७ साली ते वेल्बी-कमिशनचे काम आटोपून आल्यावर, सुदैवे सरकार-नियुक्त म्हणून ते म्युनिसिपल सभासद झाले होते आणि १९०२ साली त्यांची सर्वानुमते अध्यक्ष म्हणून निवड झाली होती. अध्यक्ष या नात्याने गोपाळरावांनी आपले काम फार काळजीने केले होते. म्युनिसिपालिटीच्या सभा नियमित भरू लागल्या. कामाचा निकाल शिस्तीने व जलदीने होऊ लागला. सभासदांनी कार्यकारी मंडळास प्रश्न विचारण्याचा प्रघात याच वेळी पडला व कमिटीच्या कामाचा अहवाल छापून तो सभासदांना वाटण्याचा क्रम सुरू झाला. अशा तऱ्हेने लोकशाही संस्थेची गोपाळरावांनी चालविलेली "लोककल्याण" कार्यवाही पाहून त्यांच्या कारभारकुशलतेबद्दल जे. एस्. हॉयलँड (J. S. Hoyland) यांनी प्रशंसोद्गार काढले होते. गोखले हिंदुस्थानचे परदेशी वकील होण्यापेक्षा हिंदुस्थानातच अधिक कार्यक्षम गृहमंत्री ठरतील, असे लो. टिळक म्हणत असत. ते गोखल्यांच्या शिस्तशीर कामे उरकण्याचा उरक त्यांच्याजवळ होता म्हणूनच.

गोपाळराव गोखल्यांना लोक मवाळ समजत तर सरकार व इंग्लंडचे लोक प्रच्छन्न जहाल मानीत. १९०४ च्या काँग्रेसचे अध्यक्ष सर हेन्री कॉटन् असताना सर वेडर्नबर्न यांनी ठराव मांडून व लोकमान्यांनी अनुमोदन देऊन १९०५ च

१९०६ साली काँग्रेसतर्फे जे शिष्टमंडळ विलायतेस गेले होते, त्यातील गोखल्यांच्या कामगिरीने वरील प्रत्यय जो वेल्बी-कमिशनपासून आला होता तो दृढ झाला. डॉ. रामकृष्ण हरी भांडारकरांनी नमूद करून ठेवले आहे की, १९०६ साली पंढरपुरास जे स्वदेशी प्रदर्शन भरले होते ते ना. गोखल्यांचे हस्तेच उघडले होते. आणि कलकत्ता-काँग्रेसच्या वेळी जे स्वदेशी संमेलन झाले त्यात टिप्पू सुलतानाचे वंशज नबाब सय्यद महंमद यांच्या अध्यक्षतेखाली सुरेन्द्रनाथ बानर्जी, टिळक, लजपतराय, पॉलप्रभृतींची जी भाषणे झाली तीत गोपाळराव गोखल्यांचेही भाषण झाले. तेव्हा ते म्हणाले की, "कोणाची अर्थशास्त्रीय कशीही मते असोत, ती सर्व एका बाजूस ठेवून केवळ राजकारणाकरिता मँचेस्टरचे कापड विकत घेऊ नका." असा उपदेश १८९४ साली गोखले यांनी न्या. रानडे यांच्याच सल्ल्याने सार्वजनिक सभेत पुण्यातील लोकांसही केला होता. रूसो-जपानी युद्धात जपान विजयी झाल्यामुळे, चीन, इराण, तुर्कस्थान लोकायत्त सत्तेच्या प्रयत्नास १९०५ सालीच लागले होते. मग हिंदुस्थानातील तरुणांची मने तसा काही विचार साहजिकच करू लागली होती.

भारत-सेवक-समाजाला दोन वर्षांत रंगारूपाला आणून १९०७ च्या जूनमध्ये त्याच्या वार्षिक वर्धापन दिनाचे संमेलन संपते न संपते, तोच देशात बिपिनचंद्र पॉल वगैरेना मद्रासकडे अटक झाल्याची बातमी आली. बंगालच्या फाळणीने सात्त्विक संताप आलेला राष्ट्रपुरुष वक्तृत्वाचा गडगडाट आणि ओजस्वी व तेजस्वी लेखणीचा धडधडाट चमचमाटाने चालवून धामधूम उडवीत होता. गोपाळराव गोखले आता तिकडे लक्ष घालू लागले. इतक्यात गोपाळरावांचे पितृतुल्य बंधु गोविंदराव अण्णा २१ जून १९०७ रोजी इहलोक सोडून गेले! आणि तरीही देशाच्या उध्वस्त परिस्थितीने उद्वेग पावलेल्या मनःस्थितीत वडील बंधूंचे स्मरणी चार अश्रू ढाळण्यापलीकडे गोपाळरावांना काही विशेष करू दिले नाही!! पुण्याच्या प्लेगचा कहर लोकांना जाचक होऊ नये म्हणून प्लेग-कमिटी स्थापून लोकांस गावाबाहेर झोपड्या बांधून दिल्या. त्यासाठी पुणे नगरपालिकेमार्फत तीस हजार रुपयांची सरकारी मदतही त्यांनी मिळविली. कलकत्त्यास बहिष्काराचा ठराव झाला असता गोखल्यांनी आपल्या भूतपूर्व अध्यक्षपदाचे वजन खर्चून पुणे म्युनिसिपालिटीस परकीय सरकारच्या दारी जावयास गोखल्यांनी लावले अशी गोखल्यांवर टिळकांसुद्धा सर्वांनी प्रखर टिका केली. पण सरकार मदत करते, तो पैसा इंग्लंडहून आणीत नाही, हिंदी कर-भरणाऱ्याकडूनच तो तिजोरीत आलेला पैसा असतो; तोच आपण लोकसेवेस आणला, अशी गोखल्यांची बाजू होती. बहिष्कार कमालीने परकीय सत्तेचा करावयाचा तर एकमुखी करबंदीनेच तो लोकांनी करावयास हवा असे गोखल्यांचे म्हणणे होते. कलकत्ता-काँग्रेसने मान्य केलेला बहिष्काराचा ठराव येवढ्या परिसीमेने आचारणशुद्ध राखावयाचा असेल तर तो फक्त बंगालपुरता

शक्य होईल असे मानूनच स्वतः गोखल्यांनी त्या ठरावाला पाठिंबा दिला होता. बहिष्काराला बंगालच्या बंधुभावाने आंखिल भारतीय स्वरूप द्यावयाचे तर ते वस्तु-मर्यादांनीच दिले असता व्यवहार्य होईल असे गोखल्यांचे मत असल्याकारणाने तसा स्पष्ट ठराव त्यांनी सुरत काँग्रेससाठी आखलाही होता. एवढेच नव्हे, तर १९०८ च्या एका व्याख्यानात त्यांनी निःशस्त्र प्रतिकारात मालावरील बहिष्कारापासून कर न देण्यापर्यंतच्या सर्व गोष्टींचा समावेश होतो, असे स्वच्छ सांगितलेही होते. पण नुसते तत्त्वज्ञान काय उपयोगी ? १९०७ साली बंगाल, महाराष्ट्र, मध्यप्रांत, पंजाब, व आंध्र येथे राष्ट्रीय शाळा भराभर निघाल्या आणि त्यांमधून निघणारे तरुण व त्यांचे स्नेही व सहानुभूतिक बहिष्काराचा अर्थ परकीय सत्ता सर्वस्वी वाळीत, एवढा व्यवहार्य झालाच पाहिजे, अशा बेफाम भावना व्यक्त करू लागले. गोपाळराव गोखल्यांना त्याची जाणीव असल्यामुळेच, एका बाजूने त्या भावनांतील तीव्रपणाने प्रतीत होणारी देशभक्ती स्वागतार्ह मानून ते स्वदेशी-बहिष्काराचे सर्वांना शक्य असलेले व्यवहारी मार्गदर्शन दुसऱ्या बाजूने करीत होते. आणि सरकारला बजावीत होते की, राजकीय सुधारणा जितक्या दिरंगाईने होतील, तितकी त्यामधील जादू पार नाहीशी होईल व त्यांचे मूल्य अर्ध्यामुर्ध्यावर येऊन बसेल ! गोखल्यांच्या या वृत्तीमुळेच ऑगस्ट १९०७ मध्ये लॉर्ड मिंटो उद्‌गारले की, " गोखले अंतः-करणाने प्रामाणिक आहेत, पण अलिकडे ते जे वागतात, त्याने मला त्यांचा वीट आला आहे. "

गोखल्यांच्या अशा मृदंगावस्थेत सुरत काँग्रेसमधील बाका प्रसंग उद्‌भवला ! " मुंबईच्या राजाला दादाभाईंचे स्वराज्य नको होते आणि बहिष्कार नको होता ! " पण फिरोजशहांची मते चुकीची आहेत असे उघडपणे गोखल्यांना तरी कोठे म्हणता येत होते ? त्यांनी वरिष्ठ विधिमंडळात आपल्याला जागा करून दिली म्हणून गोखल्यांना जशी त्यांच्याबद्दल कृतज्ञता वाटत होती, तसेच लो. टिळकांच्या उदाहरणाने आपण देशसेवेकडे वळलो, याची जाणीवही गोखल्यांना होती. म्हणून नेव्हिन्सनने म्हटल्याप्रमाणे त्या दोघा वाघ-सिंहांच्या झटापटीत, सुरतेच्या काँग्रेसमध्ये गोष्टी भलत्या थराला जाऊन, स्वयंसेवकांच्या कप्तानाने टिळकांना अध्यक्षांच्या व्यासपीठावरून जबरदस्तीने दूर करण्याचा प्रयत्न जेव्हा करू पाहिला, तेव्हा गोपाळराव गोखले पुढे येऊन त्यांनी त्या कप्तानाचा निषेध करून आपल्या हातांनी तो हल्ला परतविला, असे जमखिंडीच्या माधवराव व्यंकटेश लेले यांनी आठवणीत सांगितले आहे.

गोपाळराव गोखल्यांचे वैयक्तिक जीवन व संसार हा असा होता. १९०७ नंतरचे त्यांचे सप्तवार्षिक जीवन सर्वस्वी सार्वजनिक होते असे म्हणावयास काहीच हरकत नाही.

१९०८ साल हे हिंदुस्थानच्या इतिहासातील ब्रिटिश राज्य-कर्त्यांनी कळसास नेलेल्या दडपशाहीचे साल म्हणूनच प्रसिद्ध आहे. कारभारातील-प्रजाहितदक्षतेने हिंदुस्थानच्या लोकांना राणीच्या जाहीरनाम्याप्रमाणे, आपल्या हितासाठीच इंग्रजी कारभार चालला आहे, अशी भावना निर्माण होण्या-बद्दल राज्यकर्त्यांस १९०५ पासून गोखले सारखे बजावत आले. पण सर्व व्यर्थ ! तेव्हा इंग्लंडात जाऊन त्यांनी स्वराज्याकरिता हिंदुस्थानात लोकोत्साह केवढा आहे हे ब्रिटिश मुत्सद्द्यांना पटविले व मोर्ले–मिंटो–सुधारणा १९०८ च्या उत्तरार्धात जाहीर करावयास लावल्या. हिंदुस्थानातही " राजद्रोहात्मक सभांचा कायदा " (Sedition Meetings Act) ही लोकांना विश्वासात घेऊन कारभार न करता लोकद्रोहाने दडपशाही टिकवण्यासाठी व खोट्या इज्जतीला बळी पडून सत्ता चालविण्यासाठीची धडपड असल्याचे विधिमंडळात आणि बाहेरही गोखले बजावून सांगत होते. आणि असे असूनही लो. टिळकांना मंडालेचा झालेला कारावास हा गोखल्यांनी मोर्लेच्या कानाला लागून घडविला असे गोखले विलायतेस असताना गणपति-उत्सवाच्या मेळ्यांच्या पद्यांमधूनही भासविण्यात येण्यापर्यंत लोकप्रक्षोभ इंग्रजी राज्याबरोबर कसलाही सहकार पतकर-णारांच्याविरुद्ध उभा राहिला होता, हे लक्षात ठेवले पाहिजे.

ज्या लो. टिळकांच्या उदाहरणाने आपण देशसेवेकडे आकर्षिलो गेलो, न्या. रानड्यांच्या राष्ट्रनेतृत्वाबद्दल आपल्याइतकाच ज्या टिळकांना आदर आहे, अशी आपली खात्री होती, कॉफर्ड-प्रकरणात राज्यपालांच्या शब्दास जागून प्रामाणिकपणे साक्षी देण्यास पुढे आलेल्या मामलेदारांना संरक्षण देण्या-मिळवण्यात ज्या टिळकांचे व आपले नितान्त सहकार्य होते, १८८९ पासून आपण केलेल्या राजकीय कामगिरीबद्दल वेळोवेळी शाबासकी देऊन १९०५ सालची विलायते-तील शिष्टाई करून आल्यावर ज्या टिळकांनी आपला सार्वजनिक गौरव केला, कर्झनला औरंगजेबालाही मागे टाकणारा जुलूमशहा म्हणण्यापर्यंत ज्या टिळकांची व आपली मनोवृत्ती एकतान आहे, त्या टिळकांशी सामाजिक सुधारणेच्या काही बाबतीत मतभेद झाला म्हणून अगर त्या टिळकांच्या " बहिष्कारा "च्या व्यापाइतका व्याप राष्ट्राला आज झेपणारा नाही म्हणून आपण सांगताच, त्यांना परकीय सत्तासूत्रधारांच्या कानाला लागून देशातून हद्दपार करावयास लावण्या-इतके आपण " फितवे " आहोत, असे हिंदुस्थानातील नसले, तरी महाराष्ट्रा-तील लोकमत व्हावे, याबद्दल गोखल्यांना जिव्हारी जखम झाल्यासारखे दुःख होत होते आणि " लोक हा ओक धरता धरवेना ! " असा अनुभव येत होता. इतका की, १९०८ साली विधिमंडळाच्या बैठकीसाठी पुण्याहून कलकत्त्याकडे आगगाडीने निघाले असता, लोणावळा-खंडाळा यांच्या दरम्यान त्यांच्याःसत्काराचे सोंग करून त्यांच्या हाती मोठ्या पुष्पगुच्छातून स्फोटक बॉंब देण्याचा व जमेल

तर त्यांना पिस्तुलाने उडविण्याचा घाट रघुनाथ विद्याधर भावे व कृष्णाजीपंत खरे अशा मातबर क्रांतिकारकांनी घातला होता. तो दैवयोगे जमला नाही, हा भाग वेगळा ! ! तरीही त्यांनी संयमच संयम केला आणि १९०९ च्या काँग्रेस-मध्ये निःशस्त्र प्रतिकारावर जे भाषण केले, त्यात बंड, फितुरी आणि गुन्हेगारी याशिवाय सर्व गोष्टी सनदशीर चळवळीत बसतात आणि (म.) गांधींप्रमाणे शूराच्या अहिंसेने अगर प्रह्लादसम सहनशीलतेनेच सार्वजनिक जीवनाचे श्रेष्ठतम अध्यात्मीकरण होऊ शकेल, हे लोकमानसावर ठसविले व विवेकबुद्धीपर्यंत नेऊन पोचविले. १९१० साली क्रिमिनल लॉ अॅमेंडमेंट अॅक्टला त्यांनी कसून विरोधच केला आणि विद्यार्थ्यांनी चालू राजकारणाचा सखोल अभ्यास राजकीय सभांना समक्ष हजर राहूनही करावा, प्रत्यक्ष राजकारणात भाग मात्र घेऊ नये, अशा निकोप मर्यादांनी ते लोकमताला वळण लावीत होते. पण त्याचा अर्थ तरुण उत्साहाचे ते खच्चीकरण करताहेत असा होऊन त्यांच्या हेतूंचे व जीवनांचे विडंबन करण्या-शिवाय चैनच न पडणारा एक वर्ग निर्माण झाला आहे, असे गोखल्यांना तीन वर्षांच्या कटुतम अनुभवाने कळून चुकले. त्यामुळे, देशाच्या सार्वजनिक जीवनाचा त्या तसल्या प्रवृत्तीच्या स्थायी भावाने, सत्यानाश होईल अशी मनोमन खात्री झाल्यावरच, त्या देशघातक प्रवृत्तीला आळा घालण्याकरिता आणि निकोप मतस्वातंत्र्याच्या संरक्षणाकरिता ना. गोखल्यांनी हिंदुपंचाच्या संपादकावर व कलकत्त्याच्या "वन्दे मातरम्" च्या चालकावर बेअब्रूची फिर्याद देऊन त्यांना धडा दिला व सहनशीलता, लोकेषणा आणि सार्वजनिक शील यांच्या मर्यादा राखण्या-तील दक्षता दाखवून दिली. हिन्दुपंचाच्या संपादकाची गरिबी लक्षात आल्यावर, त्याला झालेली शिक्षा त्याच्याने झालेल्या टीकास्वातंत्र्याच्या अमर्याद वापराने झाली तरी, त्याच्या कुटुंबियांस मासिक अर्थसहाय्य देण्यास गोखले स्वयंप्रेरणेने प्रवृत्त झाले.

या (१९१०) वर्षापासून गोखले बहुजनापर्यंत ज्ञानगंगेचा ओघ पोचविण्याच्या एकमेव छन्दातच होते. हिंदुस्थानात व्हावयाची ती लोकशाही, पुढे-मागे का होईना सुबुद्ध झाली पाहिजे म्हणून, बहुजनसमाजात तळापर्यंत शिक्षण-प्रसार झाला पाहिजे अशी तळमळ त्यांना लागलेली होती. आणि त्यासाठी त्यांनी १९१० व १९११ ही वर्षे तन-मन-धनाने खटपटीत घालविली. लोकमान्य टिळकांनी म्हटल्याप्रमाणे "ना. गोखले यांनी आपल्या भाषणातून व लेखांतून आणि मृत्युसमयी करून ठेवलेल्या स्वराज्य-योजनेतून, बहुजनसमाजाच्या हक्कांचे संरक्षण करणे योग्य आहे, असे ठिकठिकाणी प्रतिपादिले असल्याचे प्रसिद्धच आहे." त्याच छन्दाने ते शिक्षण-प्रसार-समित्या निर्माण करण्याची खटपट सर्व देशभर करीत असताच, त्यांना (म.) गांधींनी दक्षिण आफ्रिकेतील हिंदी बांधवांच्या प्रश्नात लक्ष घालण्यास बोलावले.

गोखले तिकडे गेले व थोडेफार यश मिळवून परत आले. तोच त्यांना पब्लिक-सर्व्हिस-कमिशनवर काम करण्यास पाचारण करण्यात आले. ती जबाबदारी पतकरताना, ते दरमहा दोन हजार रुपये कमिशनर म्हणून तनखा घेणार तर, त्यांना वरिष्ठ विधिमंडळाचे सभासद कसे राहता येईल, असा प्रश्न उत्पन्न झाला असता, त्या तनख्यावर पाणी सोडून गोखल्यांनी ती प्रश्नशंका धुळीला मिळविली ! पण हिंदुस्थानात काही साक्षी घेऊन इंग्लंडास कमिशनबरोबर गोखले गेले असता, गांधींनी फिरून त्यांना पूर्वप्राप्त यशावर दक्षिण आफ्रिकेतील अधिकारप्रतिष्ठितांनी बोळा फिरवला म्हणून, सहाय्यास बोलावले. तेव्हा गोपाळराव गोखले गांधीजींच्या सत्याग्रहास आर्थिक आणि राजकीय वजनदारीचे बहुमोल सहाय्य देण्यास धावले. त्यायोगे, सोसावी लागलेली दगदग आफ्रिकेतील प्रश्नाच्या गोड शेवटामुळे, गोखल्यांना काहीच वाटली नाही. पब्लिक-सर्व्हिस-कमिशनबरोबर प्रकृती नादुरुस्त असताही १९१४ साली ते विलायतेस गेले. १९१३ सालच्या कराची-काँग्रेसला हजर राहण्याबद्दल लोक आग्रह करीस असता, प्रकृतिस्वास्थ्यासाठी जे गोखले तेथे हजर झाले नाहीत, तेच पब्लिक सर्व्हिसच्या कामासाठी विलायतेस गेले हे पाहून त्यांच्या आप्तस्वकीयांना तो एक चिंतेचाच विषय होऊन बसला.

गोखले इंग्लंडात असतानाच १९१४ च्या ऑक्टोबरच्या आधीच इंग्लिश डॉक्टरांनी गोपाळरावांच्या प्रकृतीबद्दल भीती प्रदर्शित केली होती; इतकेच नव्हे तर ' फारफार आणखी सहा महिने तुमचे आहेत ' असे डॉक्टरांनी सुचविले होते. वेल्बी-कमिशनपुढील साक्षीला जाताना सव्वा तपापूर्वीच आगबोटीच्या कॅबिनच्या दाराचा त्याच्या हृदयास जो धक्का बसला होता, तीच यमदरबारची घंटा होती म्हणे ! तेव्हापासून त्यांच्या हृदयाचे दुखणे कधी कमी कधी जास्त होत होत इतक्या थराला आले ! त्यातच मधुमेहाची भर पडल्याने शरीर आतून पोखरून जात असता, त्यांच्या उत्कट देशभक्तीने त्यांना स्वस्थ बसू न दिल्यामुळे दोहो टोकांनी पेटलेल्या मेणबत्तीसारखी त्यांची अवस्था झाली होती. तरीही गोपाळरावांचा आशावाद जबर होता. पब्लिक-सर्व्हिस-कमिशनचे तरी काम पुरे करू आणि कैसरीकंदनाच्या समाप्तीनंतर सर्व देशाने मिळून करावयाच्या चळवळीची दिशा ठरवू, असे ते स्वताशी व स्नेहांकितांशी म्हणत असत.

गोखले विलायतेहून प्रकृतिस्वास्थ्यासाठी हिंदुस्थानात इतर कमिशनरांच्या अगोदर आणि गांधीजींच्याही अगोदर आले. ते पुण्यास भारत-सेवक-समाजातच आले. १९०५ पासून तरी पुण्यास असताना गोखले सर्वदा भारत-सेवक-समाजाच्या आपल्या बैठकीच्या जागी असावयाचे. जेवणखाण सर्व तेथेच ! फक्त दीपावलीत आपले स्नेहीमंडळींबरोबर घरी जाऊन फराळ करावयाची त्यांची पद्धती होती. त्या नित्य वहिवाटीप्रमाणे भारत-सेवक-समाजाच्या आवारात राहूनच राष्ट्रीय पक्ष

काँग्रेसमध्ये येऊन काँग्रेसचे सामर्थ्य कसे वाढेल याचे चिंतन गोखले करू लागले. बिझांटबाई पुण्यास आल्या होत्या तेव्हा गोखले यांनी एक मसुदा तयार करून त्यांच्यापाशी दिला होता, तो लो. टिळकांनी व राष्ट्रीय पक्षाने मान्य केला होता. तरीही १५ डिसेंबरच्या सुमारास गोखल्यांचे भूपेंद्रनाथांना–मद्रास १९१४ चे काँग्रेस-अध्यक्ष यांना–एक पत्र गेले, त्यावरूनच समेट मोडला असे सर्वत्र गाजले व गोखल्यांच्यावर एवढा गहजब झाला की, बोलावयाची सोय नाही ! मद्रास काँग्रेसचे अध्यक्ष भूपेंद्रबाबू हे समेटाला मनातून अनुकूल होते, याची वार्ता लागताच सर दिनशा एदलजी वाच्छा यांनी सुरेंद्रनाथ बानर्जी व भूपेंद्रनाथ यांना तारा पाठवून आणि फिरोजशहा मेहता यांनी पत्र पाठवून नेमस्तपक्षाचा घात होत असल्याचे कळविले होते. याची दखल कलकत्त्याच्या अमृतबझार पत्रिकेने आणि लो. टिळकांनी अप्रत्यक्षतः सूचनेने घेतलेली होती. बाकीच्या सर्वांनीं फक्त गोखल्यांनाच झोडण्याचा एवढा अट्टाहास केला की, गोखले हे टिळकांचे, राष्ट्रीय पक्षाचे व राष्ट्रीय तेजोवर्धनाचे शत्रू गणले जाऊन फेब्रुवारी १२ सन १९१५ च्या आसपास त्यांना " आम्ही तुमचा जीव घेऊ " अशा धमकीची पत्रे आली होती असे प्रा. वासुदेव बळवंत पटवर्धनांनी (मनोरंजन मासिकातील आपल्या लेखात) उल्लेखून ठेवले आहे.

अंगलट साधारण बरी, वर्ण गौर, चेहऱ्यावर एक प्रकारचे मार्दव, डोळ्यात स्निग्धता व पावित्र्य अशी गोखल्यांची मूर्ती आता सुकत चालली होती ! तेज हरपले, रक्त आटले, मांस नाहीसे झाले ! १९१४ साली इंग्लंड-मध्ये गोखले आजारी असता जसे गांधीजी समाचाराला आले होते तसेच १२ फेब्रुवारी १९१५ रोजी ते आपल्या गुरूस भेटण्यास आले. गोखले नुकतेच मूर्च्छनेतून उठले होते; डॉक्टर देव काळजी करीत होते.

कारण आजारातही गोखल्यांचा नित्यक्रम चालूच होता. १३ तारखेस गांधींच्या सत्कारास गोखले आपल्याच भारत-सेवक-समाजात असूनही मूर्च्छनेमुळे जाऊ शकले नाहीत. तरी बुधवारी १७ तारखेस रात्रौ त्यांनी युद्धोत्तर–अपेक्षित राजकीय सुधारणांचा मसुदा लिहून संपविला. गुरुवार ता. १८ फेब्रुवारी रोजी त्यांनी सर्वांस पत्रे लिहिली. शुक्रवार ता. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी त्यांची प्रकृती जास्तच ढासळली. थोड्या तासांन्याच आपला भरवसा आहे, असे त्यांचे त्यांनाच वाटू लागले. सर्व कुटुंबांतली मंडळी बिछान्याभोवती जमली होती. मित्रमंडळीही खिन्न बसली होती. डॉ. देव गोखल्यांची प्रकृती पाहत, वरचेवर पहात ! दुसऱ्यांनी आपली सेवाशुश्रूषा करावी, याचा गोखल्यांना तिटकारा होता. पण शुक्रवारी सकाळी त्यांना स्वतःच्या हातांनी बस्ती (एनेमा) घेववला नाही. ग्लिसरीनची बस्ती डॉ. देवांनी दिली, ती लागू पडली नाही ! गॅसब्लॅडरने सर्व

छाती वगैरे तपासण्यात आले. तेव्हा गोपाळरावांनी बिऱ्हाडघरची सर्व मंडळी दुपारी भेटावयास बोलावली. त्रास होईल म्हणून डॉक्टर गोपाळरावांस बोलू वा बोलवू देत नव्हते. पण गोपाळरावांनी ऐकले पाहिजे ना? ते दुपारी एक वाजता व्हरांड्यात येऊन बसले. घरची मंडळी आली. दोन तास त्यांच्याशी गोपाळराव मनमोकळे नीट बोलले. ३ वाजता म्हणाले, "ठीक आहे. घाबरण्याचे कारण नाही."

नंतर आत बिछान्यावर जाऊन गोपाळराव पहुडले. घरची मंडळी गेल्यावर काही वेळाने गोपाळरावांच्या घशाशी घुर्रघुर्र असा आवाज होऊ लागला. आता बोलण्याची शक्तीच लोपत जाऊ लागली. सायंकाळी त्यांचे भाचे पोंक्षे भेटीस आले. ते गोपाळरावांना पाहून रडूच लागले. "रडावयाचे असेल तर येथून निघून जा!" असे गोपाळरावांनी त्यास अवसान आणून सांगितले.

सर्वत्र खिन्नता पसरली. रात्र झाली. ८ वाजले. आठवण झाल्यासारखा काळ सरसावून येऊ लागला. हरिभाऊ आपटे (कादंबरीकार) यांना निरोप गेला. ते आनंदाश्रमा-(पुणे)-हून टांग्यातून आले. त्यांना पाहून गोपाळराव गोखल्यांना समाधान झाले. 'मला आता आरामखुर्चीवर बसवा' असे गोपाळरावांनी म्हणताच, त्यांना अलगद उचलून आरामखुर्चीवर बसविण्यात आले. पाचच मिनिटांनी त्यांनी आकाशाकडे डोळे केले. "या लोकची मजा पाहिली, आता दुसऱ्या!" असे क्षीण स्वराने ते सर्वांकडे पाहून उद्‌गारले— "हरिभाऊ, येतो आता, नमस्कार!" झाले! गोपाळरावांनी डोळे मिटले व इहलोकचा शान्तपणे निरोप घेतला!! जगत्कारण अशा चैतन्यात गोखल्यांचे चैतन्य विलीन- विलीन- विलीन झाले!!!

तो देखावा करुणास्पद होता. दगड आणि कठोर वृत्ती जेथे पाझरू लागल्या, तेथे इतरांचे पाणी पाणी झाले, हे कशास सांगावयास हवे? रात्रौ ११ वाजलेले, शांतपणे आकाशातून तारा आपल्या किरणांचे अश्रू गोखल्यांच्या पार्थिव देहाशी व त्यांच्या आप्तेष्ट चाहत्यांच्या अश्रूंत मिळवीत होत्या. कैसरी-कंदनानंतर हिंदुस्थानने करावयाच्या उठावाची आखणी व पब्लिक-सर्व्हिस-कमिशनचे काम करीत असताच, गोपाळ कृष्ण गोखल्यांना देवाघरचे बोलावणे आले, तेव्हा वेचली तेवढी फुले घेऊनच ईश्वरपदी सादर होणे त्या नामदार भारत-सेवकाला सहज आले!

सर्वत्र तारा गेल्या. देशात हाहाःकार झाला. पुण्यात शनिवार ता. २० फेब्रुवारी रोजी दुपारी मग शवयात्रा निघाली. सरकार-विरोधी म्हणून परकीय सत्तेने शापलेल्या महाराष्ट्राच्या जुन्या राजधानीतील भारत-सेवक गोखल्यांच्या शवयात्रेस आजूबाजूचे आणि मुंबईचेही लोक आले. गोपाळरावांचा देह

पुष्पहारांनी मंडित होऊन भारत-सेवक-समाजातून ॐकारेश्वरी नेण्यात आला. देशभर हिंदु, मुसलमान, यहुदी, जैन, लिंगायत, स्मार्त, वैष्णव, पारशी देशी खिस्ती आणि अँग्लो-इंडियन—सर्वां—सर्वांना गोपाळराव गोखल्यांच्या मृत्यूने देशाची मोठी हानी झाली, असेच वाटले. तोच भाव लकडीपुलावरून सदाशिव-पेठेच्या रस्त्याने, बुधवारातून नानावाड्यावरून, गोखल्यांची शवयात्रा चालली असता पुण्यातही प्रकट होत होता. फर्ग्युसन कॉलेजच्या प्राध्यापकादि सर्व डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे लोक, ना. कामत, डॉ. भांडारकर व लो. टिळक अशी पुढारी मंडळी, शहरातील ठळक ठळक व सार्वजनिक कार्यकर्ते, संस्थासंस्थांचे चालक ॐकारेश्वरी वाळवंटात जमले होते. डॉ. भाण्डारकर, लो. टिळक, रँग्लर र. पु. परांजपे यांची देशपूज्य गोखल्यांसंबंधी आदरयुक्त भाषणे झाली. मग गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या देहास मंत्राग्नी देण्यात आला!! आणि पुण्यातच नव्हे, तर सगळ्या हिंदुस्थानला व हिंदुस्थानच्याबाहेर जगभर पसरलेल्या हिंदुस्थानच्या हितचिंतकांना चटका लावून गेलेल्या गोपाळराव गोखल्यांचे— "हिंदुस्थानातील हिरा, महाराष्ट्रातील नररत्न व कर्तृत्वशाली पुरुषांचा वीर गेला!" हे लोकमान्यांनी सांगितलेले गोखल्यांचे चरित्ररहस्य मनात व मेंदूत घोळत असताच, व्यथित अंतःकरणाने सर्वांनी गोखल्यांना शेवटची मानवंदना दिली!!!

✕ ✕ ✕

३१ : भारत-सेवकाचे सम्यग्दर्शन

कैसरीकंदनाला साडेसहा महिने लोटावयाच्या सुमारास ना. गोपाळराव गोखल्यांना शेवटच्या दोन दिवसांत श्वास लागून विश्रांतिशय्या ही मृत्युशय्या होत असताना त्यांनी युद्धोत्तर-अपेक्षित राजकीय सुधारणांचा आराखडा लिहून काढला व राष्ट्रीय सेवेच्या कर्तव्याच्या खोगिरात बसूनच स्वर्गाची झेप घेणे आले, तेव्हा ती घेतली ! काँग्रेसची स्थापना बहात्तर पुढाऱ्यांनी १८८५ झाली केली आणि १८८९ पासून गोखले तीत भाग घ्यावयास लागून १८९५ पासून काँग्रेस-मधील पुढारीपण त्यांच्याकडे आशेने डोळे लावून बसले. सन १९०० पासून त्यांची गणना काँग्रेसश्रेष्ठींत होऊ लागली. सनदशीर राजकारण व मुत्सद्दीपणा या दोन बाबतीत १९०९–१० साली गोखले अति थोर विवेकाचे म्हणून गणले जाऊ लागले. दक्षिण आफ्रिकेतील लढ्यांत त्यांनी (म.) गांधींना बिनमोल सहाय्य केले व त्या लढ्याला लॉर्ड हार्डिंजच्या कारकीर्दीत सर्वत्र सहानुभूती मिळवून दिली. स्मट्स-गांधी करारांचे श्रेय सर्वस्वी गोखल्यांचेच ! पब्लिक सर्व्हिस कमिशनवरील त्यांची (१९११–१२) कामगिरी बिनमोल झाली, तिचे प्रतिबिंब सर महादेव चौबळ व अबदुल रहीम यांच्या भिन्न मतपत्रिकेत निरीक्षकांना आढळते.

अशा तऱ्हेने गोपाळ कृष्ण गोखले न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक झाल्या-पासून त्यांच्या राष्ट्रसेवेची तीस वर्षे मोजता येत असली, तरी सार्वजनिक राजकारणी सेवा दोन तपांचीच आणि त्यातही कर्तृत्वाची देशसेवा वीस वर्षांचीच हिशोबात येते. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात गोखल्यांनी डे. ए. सोसायटी व फर्ग्युसन कॉलेज यांची सांपत्तिक स्थिती सुधारण्याकरिता अविश्रांत परिश्रम केले व इतिहास-अर्थशास्त्रांचा उत्कृष्ट प्राध्यापक म्हणून लौकिक संपादला. विसाव्या शतकाच्या प्रारंभीची तेरा वर्षे म्हणजे गोखल्यांच्या सार्वजनिक जीवनातील उज्ज्वल-मंगल कालखण्ड होय. या काळात त्यांना घरचा व्याप व संसार–आटोप नव्हताच !

सरकारचे लाङ्गूलचालन न करता व लोकांची दिशाभूल न करता, लोकेषणा, वित्तेषणा, सत्तेषणा व राज्यकृपा यांचा लोभ न करता, निःस्पृहतेने,

समंजसपणे व जनहितपोषक असे राजकारणी राष्ट्रकार्य गोखल्यांनी केले. त्यालाच नेमस्त राजकारण म्हटले गेले. बंडखोरी, गुप्त कट व बाँब-प्रकरण यातील तरुण उत्साहाची देशभक्ती त्यांना दिसली तरी आतताईमार्गाला ते प्रतिकूलच होते. जग आणि स्वदेश यांचे त्यांनी जे निरीक्षण केले होते त्यावरून त्यांनी आपले मत विचारपूर्वक बनविले होते. तरीही अत्याचार-अनाचार-प्रवृत्ती राजकारणी तरुणांत वाढण्याचे कारण सरकारची लोकमताविषयीची बेमुर्वत हे होय, हे भर विधिमण्डळात सांगण्यास ते डगमगले नाहीत. किंबहुना, लोकमताची कदर हाच इंग्लंड व हिंदुस्थान या दोन देशांच्या कल्याणाचा मार्ग आहे, हेही त्यांनी बजावले. मिंटोच्या कारकीर्दीत " हालते बोट लिहिते आणि लिहून पुढे जाते " हे सूचक वाक्य उच्चारून, बायबलातील " भिंतीवरचा लेख " या प्रसंगाची आठवण करून दिली होती. बर्कच्या म्हणण्याप्रमाणे जुलूम आणि जुळती (Force and Conciliation) याची गाठ घातली तर दुसरी निर्माल्यवत् ठरते आणि पहिला यशस्वी होतच नाही, हा धडा त्यांनी राज्यकर्त्यांपुढे ठेवला.

गोपाळराव गोखले असे स्पष्ट स्पष्ट विधिमंडळात आणि इंग्लंडमध्ये शिष्टाईला गेल्यावर बोलत; बाहेर प्रचारात्मक व्याख्याते देऊन बोलत नसत असा आरोप ठेवून त्यांना " पिंजऱ्यातील पोपट " असेही निर्भर्त्सण्यात येई. पण स्थल-काल-विषय या तिहींच्या बिनचूक संदर्भत्रिकोणात " सदसि वाक्पटुता, युधि विक्रमः । " यातील रहस्य जागरूकतेने जाणूनच, ती निर्भर्त्सना गोखले सहन करीत. गोखल्यांच्या पुढारीपणाच्या यथार्थाची थोरवी व तिचे चिरंजीवित्व यथातथ्यत्वात आहे. ना. गोखले सच्चे लोकमित्र होते. प्रतारणा व आत्मश्लाघा यांना त्यांच्याजवळ थारा नव्हता. राजकारणात अखेरचे असे काय आहे ? असा प्रश्न करून ते स्पष्ट सांगत की, राजकारण हे अन्वयानुयायी व संदर्भसापेक्ष असते. त्या धकाधकीच्या मामल्यात गोपाळराव गोखल्यांची स्पृहणीय कामगिरी, मोठेपणाचे बीज आणि त्याची शाखा-पल्लव-पुष्पे डवरून आली. वयाच्या विशीच्या आत पदवीधर होऊन, वयाच्या पन्नाशीच्या आत परकीय सरकारच्या दरबारी प्रजापक्षाचा खंदा वीर म्हणून त्या सरकारची आदब सांभाळून तडाखे देत देत, त्याजकडूनही " धन्य ! धन्य ! " म्हणवून घेणे ही कामगिरी असामान्य कोटीतली आहे, यात काय संशय ?

ना. गोपाळराव गोखले यांच्या सर्व कार्यात भारत-सेवक-समाजाची (Servants of India Society) स्थापना ही सर्वांत मोठी कामगिरी होय. अशीच संस्था पुढे पंजाबात दे. भ. लाला लजपतराय यांनी काढली, एवढे या संस्थेचे वळणदार कित्त्यासारखे उदाहरण आहे. राजकारणाला अध्यात्माची जोड देण्याकरिता ही संघटना गोखल्यांनी उभारली. " लायोला " किंवा समर्थ

रामदास यांच्याप्रमाणे गोखले त्या संस्थेचे संस्थापक महंत होते. एच्. डब्ल्यू. नेव्हिन्सन् याने म्हटल्याप्रमाणे " अनुषंगाने कृति होत नसेल तर नुसत्या भाषणांनी काही होत नाही, हे त्यांना (गोपाळराव गोखल्यांना) ठाऊक असल्याकारणानेच, त्यांनी भारत-सेवक-समाजाची स्थापना केली. " डॉ. व्ही. एच्. रुदरफोर्ड यांनी सांगितल्याप्रमाणे, " आपली मुत्सद्दी बोटे आपल्या देशभक्तीच्या सतारीवरून गोखले अशा सफाईने फिरवीत की, त्या तन्तनानाने परकी सत्तेच्या कानाला झिणझिण्या आल्या तरी कपाळाला आठ्या पडण्याची सोय नव्हती ! वासाहतिक स्वराज्याचा त्यांचा उघड पुरस्कार ही राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या वाटचालीतील शांतिमय प्रवेशिका होती. " खरे म्हटले तर ती सफाईने व समर्थपणे चालविणारे निष्काम कर्मयोगी तरबेज करण्याकरिताच भारत–सेवक-समाजाचा अवतार होता.

भारत-सेवक-समाज अशा राजकीय कामाकरिता तर आहेच, पण दुष्काळ-पीडितांस मदत करणे, रोगांच्या साथी आल्या तर स्वयंसेवक पथके उभारून लोकशुश्रूषा करणे, शिक्षण व धंदेशिक्षण देणे याही बाबी भारत-सेवकाच्या कार्यक्षेत्रात येतात. स्त्रीशिक्षण फैलावून स्त्रियांनी राजकारणात भाग घ्यावा आणि हिंदु-मुसलमानांत तंटे न होता त्या दोन जमातींनी गुण्यागोविंदाने नांदावे म्हणूनही ना. गोखल्यांनी व त्यांच्या भारत-सेवक-समाजाने एवढे काम केले की ना. आगाखान म्हणाले, " ना. गोखले हे एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचे मूर्त स्वरूप होते. "

गोखल्यांना तशी योग्यता अभ्यासाने मिळाली होती. त्यांनी इतिहासापासून धडे घेतले होते. इंग्रजांच्या एकछत्री अमलाखाली आलेला हिंदुस्थान पुन्हा आपल्या एकजिनसीपणाने जागतिक प्रतिष्ठा असलेले स्वातंत्र्य उपभोगावयास समर्थ झाला पाहिजे; त्याच्या तेहतीस कोटी प्रजेतील मतभेदाला मतस्वातंत्र्यासाठी वाव दिला तरी त्यातून यादवी डोकावू देता कामा नये आणि काळाच्या ओघात चालत आलेली यादवी मोडून काढली पाहिजे; कारण तीच पारतंत्र्यापासूनच्या मुक्ततेस, मिळवावयाच्या स्वराज्यास आणि एकंदर सामूहिक सबल स्थैर्यास विघातक ठरते, असे गोखल्यांच्या एकंदर विवेक–विवंचनेचे पडसाद होते. म्हणूनच, हिंदुस्थानच्या कोणत्याही प्रश्नाच्या बाबतीत प्रजाजनांनी आपण आर्य-मातेचे सुपुत्र व सुकन्या सर्वप्रथम आहो या बुद्धिभावनेस अग्रस्थान दिले पाहिजे, जातीविषयक किंवा धर्मविषयक भेदाला बिलकुल अवसर देता कामा नये, असे गोखल्यांचे मार्गदर्शक तत्त्व होते. अल्पसंख्यांक किंवा मागासलेले म्हणून बहुसंख्यांकांच्या समानपातळीत समंजसपणे येण्यासाठी न्यायबुद्धीने जरूर त्या सवलती त्यांना द्याव्यातच, असे व्यवहारोपयुक्ततेच्या दृष्टीने गोखले म्हणत; तरी देशोन्नतीच्या दृष्टीने अल्पसंख्यांकांनी आणि मागासलेल्यांनी त्या सवलती काल-

मर्यादित आहेत, तो जन्मसिद्ध हक्क नव्हे, हे लक्षांत वागवून राष्ट्रीय आकांक्षांत समरसतेने जास्तीत जास्त सहकार दिलाच पाहिजे, असा गोपाळरावांचा आग्रह असे. या त्यांच्या मतप्रणालीमुळेच समंजस मुसलमानबंधूंनी अलिगड-विद्यापीठात वगैरे गोखल्यांचा जाहीर सत्कार केला होता.

अशा थोर गोखल्यांची प्रकृती भावनाप्रधान होती. ते लवकर रागावत, चिडत, पण शान्तही लवकर होत. अविचाराने गडीमाणसांस बोलून गेले तर उच्च-भावनेला वश होऊन सपशेल माफीही खुल्या दिलाने मागत ! बर्क, ग्लॅडस्टन, मोर्ले इत्यादिकांच्या लेखांमुळे त्यांच्या उच्च भावना सुलभतेने जागृत होत व उच्चबळत शान्त विवेचनाला आणि समंजस व्यवहारज्ञानाला राजकारणात व समाजकारणात प्राधान्य देणारे गोखले हे असले भावनावश की 'केसरी'तल्या टीकांनी त्यांचे मन प्रमाणाबाहेर दुखे ! या भावनावशतेमुळेच एकदा त्यांनी लॅटिनचा अभ्यास तर एकदा बंगालीचा अभ्यास सुरू केला व बरे म्हणण्याइतके ते प्रगतही झाले; पण पुढे त्याचे ते छंद सुटले. संगीत (१९००), योग (१९०७–८) आणि ज्योतिष यांचीही तऱ्हा तीच. पण हे सारे छंद गवगव्यावाचून चालावयाचे ! तात्पर्य, गोखले तापट नसले तरी त्रासिक, हळवे आणि थोडे चिरचिरे. ॲरिस्टॉटलच्या व्याख्येप्रमाणे अवगुण व गुणातिरेक यामधील सुवर्णबिंदूचा त्यांनी बरोबर वेध घेतला होता. त्यांच्या अंगी साहस नव्हते, पण सहनशक्ति व धैर्य होते. तीव्र मतभेदपात्रता होती, पण भांडखोरपणा नव्हता. शब्दात गोडवा होता, पण तोंड-देखलेपणा किंवा तोंडपुजेपणा नव्हता. शब्दांनी मधुर पण तत्त्वाला कठोर; सुविनीत पण बेडर; देशभक्ति, कर्तव्यनिष्ठा आणि स्वार्थत्याग जनतेवर तेज पाडणारे आणि प्रतिपक्षासही मान्य; परिश्रम करण्याच्या अनिवार हौसेमुळे " आराम हराम " मानण्याची कमाल प्रवृत्ती. कष्टाळूपणाचे जोडीस नेमस्तपणा हा गोखल्यांचा ठळक विशेष होता. राजकारणींचा हा समर्थपुरस्कृत सद्गुण कार्यवश ठेवून आपणास बर्क वा ग्लॅडस्टन यांच्या पंक्तीत लोकांनी बसवावे अशी कामगिरी गोपाळराव गोखल्यांनी केली.

गुरुजनांबद्दल आदर, वडीलधाऱ्यांविषयी आदब, शिष्य व मित्र यांच्यावरील अकृत्रिम प्रेम, आप्तजनांबद्दल कळकळ, आणि उपकारकर्त्यांबद्दल व हितचिंतका-बद्दल कृतज्ञता हे गुण गोपाळराव गोखल्यांच्या प्रकृतीत इतके मुरले होते की, त्याविरुद्ध वागणे त्यांना कधीही रुचत नसे की, सुचत नसे. प्रा. अण्णासाहेब विजापूरकर व गोखले यांचा परस्पर स्नेहभाव याच वृत्तीचा होता. कादंबरीकार हरिभाऊ आपटे, रँग्लर परांजपे यांच्यावरील गोखल्यांचे प्रेम अकृत्रिम होते. गोपाळराव देवधर, वामनराव पटवर्धन, ना. शास्त्रीप्रभृति भारत-सेवक-सभासदां-बद्दलची गोखल्यांची आपुलकी उदाहरणीय होती. अपकार करणारावरही उपकार

करण्यात ते मागे नव्हते, ते हिंदुपंचावरील प्रकरणाने स्पष्टच आहे. तथापि, ते लहानपणापासूनच हट्टी व उतावीळ नव्हते काय ? एखादी गोष्ट मनात आली की, तिची अंमलबजावणी सुरू ! एखादी शंका आली की " सावधानतेची " गडबड. पुणे-काँग्रेसमंडपाच्या वादनिमित्ताने वाच्छांस पाठविलेली तार आणि १९१४ च्या मद्रास-काँग्रेसचे अध्यक्ष भूपेंद्रनाथ बसू यांना संयुक्त काँग्रेससाठी तडजोडीच्या वाटाघाटी चाललेल्या असताना पाठविलेले " खासगत " पत्र, ही गोखल्यांच्या शेवटपर्यंत टिकलेल्या उतावीळपणाचीच उदाहरणे होत. या दोषातूनच प्रकट होणारा गोखल्यांच्या मनाचा सीधेपणा वा सरळपणा एवढा कमालीचा होता की, त्याची भोळसटपणात जमा होई. आफ्रिका-शिष्टाईतील आश्वासनावर गोखल्यांनी ठेवलेला विश्वास तेच दाखवतो.

लोकांत मिळूनमिसळून वागताना लोकसंग्रहाच्या तोंडपुजा कल्पना कधी-कधी, न कळतणी, मनास चिकटतात; त्या लक्षात येत नाहीत; पण त्यांचे परिणाम थोडेच चुकतात ? " न कळत पद आग्निवरीं पडे । न करि दाह असे न कधी घडे ॥ " म्हणून स्वत्वाच्या मर्यादा खंबीरपणे तणाव्यावर लक्ष देऊन सांभाळाव्या लागतात. प्रत्येक खेपेला गोपाळराव गोखल्यांना ते जमले नाही. आपल्या ठाक-ठाकठिकीच्या पोशाखात ते १८९७ व १९०५ साली इंग्लंडमध्ये ते तांबडे पागोटे वापरीत. (" पाय पाश्चात्याळले तरी डोके भारतीय राखले " अशी विनोदगर्भ चित्ररेखा होऊनही !) पण १९१३-१४ साली गोपाळराव गोखले अगदी तारीख तागायत युरोपियन पोशाखात ! ! ! कपड्याची घडी, इस्तरी, बिघडू नये म्हणून ते जपू लागले. भारतकोकिळा सरोजिनीदेवी नायडूही त्याने थक्क झाल्या. तरीही एकंदरीने गोखले " साधी राहणी व उच्च विचारसरणी " हाच दण्डक अनुसरत, दिमाख नको, पण रेखीव देख हवी, असा त्यांचा कटाक्ष असे त्यांना व्यसन म्हणून कसे ते नसे. १८९७ मध्ये इंग्लंडला जाऊन ते चहाही घेत नसत.

शिष्टाचारास गोपाळराव प्राधान्य देत. देश तसा वेशच नव्हे, तर रीती-भातीसुद्धा बेश, असा त्यांचा खाक्या असे. स्त्रियांना पत्रे हस्ताक्षरातच पाठवि-ण्याचा शिष्टाचार. सरोजिनी नायडू, बिझांटबाई यांसारख्यांना पत्रे लिहिताना गोखले तो शिष्टाचार कसोशीने पाळीत. " अलौकिक होऊ नये लोकाप्रति । " हेच त्यात धोरण होते. आणि तरीही गोखल्यांचेकडील राबता सुशिक्षितांचाच असे. आपण गुरुजनांना, गुणी लोकाला व अनुभवी पुढाऱ्यांना मानतो, तसेच आपणासही लोकांनी मानावे, अशी कर्तृत्वोत्तर गोखल्यांना आकांक्षा निर्माण झाली नव्हती. " गुणी गुणान् वेत्ति " या तंत्रावर त्यांचा लोकसंपर्क चाले. डॉ. र. पु. परांजपे लिहितात की, " त्यांच्या मित्रमंडळींत आणि अनुयायांत गोखल्यांचा शब्द हाच कायदा, त्यांचा सल्ला अत्यंत स्वागतार्ह आणि त्यांची

एवढीशी इच्छादेखील अनुल्लंघनीय शिस्त मानली जाई." महात्मा गांधींनी म्हटल्याप्रमाणे सन्तसदृश गोखल्यांचा त्या प्रतिष्ठेत "अहंकाराचा वारा" बिलकुल नव्हता. पण सामान्यांच्या दृष्टीला महात्माजींचा स्वप्रत्ययी पोहोच व बारकावा कोठला ?

गोपाळराव गोखल्यांच्या स्वार्थत्यागाला त्यांच्या गुणग्रह-मालेतील सूर्यच म्हटले पाहिजे. गरीबीस आपखुषीने कवटाळून तनमनधन, प्रयत्नपुरुषार्थ आणि चिकाटी वगैरे सगळे गुण देशाचरणी त्यांनी वाहिले. आपल्याला सत्य दिसलेल्या मार्गांनी ते कर्मयोगी राहिले, लोकेषणाही न धरता ! आपल्या आत्मिक आणि नैतिक सामर्थ्याने, प्रेमाने आणि प्रामाणिकपणाने आपल्या देशबांधवांची जीवनिका जगाच्या जमान्यात नेहमीच चढत्यावाढत्या पदवीने प्रगत रहावी असा निश्चय करून गोखल्यांची देशसेवा झाली; सामान्य माणसांच्या प्रगल्भ विचारांनी आणि शीलवंत आचारांनी राष्ट्रे रसरशितपणे जगतात. हिंदुस्थान तसा व्हावा म्हणून गोखल्यांनी जीवनाचे मंगल अर्घ्य सातत्याने दिले.

धार्मिक दृष्ट्या गोपाळराव गोखले थिऑसॉफिस्ट होते असे त्यांच्या ७ मार्च १८९८ च्या थिऑसॉफिकल सोसायटीकडील अर्जावरून त्यांना २ ऑगस्ट १८९८ रोजी मिळालेल्या ४८२५ व्या डिप्लोमावरून म्हणावयाचे असेल तर ते १९०७ पर्यंतच खरे ठरेल ! १९०८ साली त्यांनी विवेकानंदांच्या-सारख्या ध्यान-धारण-योगसाधना करण्याचे मनाने घेतले होते. खरे म्हणजे इतर अनेक गोष्टींप्रमाणे येथेही या थोर पुरुषाने मुग्धताच स्वीकारली होती. लहानपणी दत्तभजनाचा नाद असावा, असे अनुमान १८८९ तील दैनंदिनीतील "गुरु दत्तात्रय"च्या उल्लेखावरून व दत्ततसबिरीपुढे लावलेल्या उदबत्तीवरून होते; पण जाणकार आयुष्यात उत्पत्ति-स्थिति-लय-कर्ता परमेश्वर एवढाच त्याला अर्थ राहिला. गोखल्यांच्या कालखण्डातील पदवीधर अज्ञेयवादी, मिल्-स्पेन्सरांचे भक्त, अगर सुधारक म्हणविण्यात भूषण मानीत. पण प्रार्थनासमाजाच्या भक्तिरंगात समरस होणाऱ्या न्यायमूर्तींच्या सहवास–शिक्षेत असलेले गोखले आपल्या आस्तिकवादाचे प्रदर्शन करताना जसे आढळत नाहीत, तसाच नास्तिकवादाचा वा आज्ञेयवादि-त्वाचा टेंभाही मिरवताना दिसत नाहीत. त्याच्या प्रकृतीत त्याग पक्का मुरला होता आणि टिळक–आगरकर–रानडे या उदाहरणांवरून, जर्मन कवी गटेच्या व्याख्ये-प्रमाणेच त्याग, ध्येय आणि सत्कार्य म्हणजेच धार्मिक जीवन असे गोखले मानीत असावेत. गोखले समाजसुधारक होते. त्यांनी १८९१ मधील टिळकप्रणीत सुधारप्रतिज्ञापत्रकावर सही दिली होती. महर्षी कर्वे यांच्या स्त्री-शिक्षणसंस्थांना ते मदत करीत होते व सामाजिक परिषदेत वा अन्य प्रसंगानुरोधाने अस्पृश्यता-निवारणासंबंधी वा मद्यपानबंदीविषयी त्यांनी आपली मते स्पष्ट व स्वच्छ मांडली

आहेत. पंचहौद-मिशन-प्रकरणी प्रायश्चित्त न घेणारांत ते होते. पण रानडे–आगरकरांच्या मताप्रमाणे देशाच्या सर्वांगीण सुधारणेचा प्रयत्नपुरुषार्थ व्हावा असे त्यांना वाटत असले तरी इमर्सनच्या सांगीप्रमाणे आपल्या भवितव्याचा व्याप संताप होण्यासारखा न वाढविता आपल्या आटोपाप्रमाणे श्रमविभागणीच्या सिद्धान्ताने सहकार–समन्वयाचे धोरण राखून राज्यापुरतेच गोखल्यांनी आपले कर्तृत्वक्षेत्र मर्यादित केले. "जो जो कोणी देशात ऐक्याचा प्रसार करतो, स्वार्थत्यागाचे धडे शिकवतो आणि कोणत्याही स्वरूपाने का होईना, आपल्या राष्ट्राचे सामर्थ्य वाढीस लावतो, तो आपला सहकारी व बांधव होय." एवढ्या दिलदारीने गोखल्यांनी हिंदुस्थानचे "विश्व मोहिरे करून" आपला नित्याचा सेवाकर्मयोग चालविला होता. "आपल्यापुढील कार्य" व "स्वदेशी चळवळ" या दोन व्याख्यानांत त्यांनी आपल्या मनाचे कप्पे उघडे करून दाखविले आहेत. संकुचित, निषेधक व 'आपल्या मताचा नाही तो आपला विरोधकच होय' असल्या असहिष्णू वृत्तीने आपले कार्य करू नका. अधिक विस्तृत, व्यापक, 'आपल्या विरोधकांत जो बसत नाही तो आपल्याजवळचाच आहे' अशा प्रकारच्या उदार हृदयाने काय करावयाचे ते करा. आजच्या हिंदी बांधवांत अगदी सूक्ष्म मतभेददेखील प्रमाणाबाहेर महत्त्वाला चढविण्याची प्रवृत्ती दिसून येते; ती त्यांचा देहस्वभावच बनली आहे; तिला उत्तेजन देऊ नका. तिला कह्यात ठेवण्याचा प्रयत्न करा. एकदिल, एकी आणि सहकार यांच्याच केवळ बळावर आपल्या आजच्या परिस्थितीत आपल्याला काही तथ्याचे यश मिळणे शक्य आहे. असा उपदेश गोपाळराव गोखल्यांनी आपल्या देशबांधवांस केला आणि तोच त्यांचे आचरणसूत्र होता.

माणूस चुकीला पात्र असतो. पण चूक कबूल करण्यात कमीपणा मानतो. गोखल्यांचे तसे नव्हते. स्वतःची चूक कबूल करण्यास मनाचे फारच मोठे धैर्य लागते. ते गोखल्यांच्यामागे शिष्यवर महात्मा गांधीच करू जाणे ! दिलसफाईच्या या गुणाने त्यांना सामान्यबुद्धीचे असे मानण्यात येई. तथापि, सामान्य बुद्धिमत्तेचा प्रयत्नशील पुरुष चिकाटीच्या उद्योगाने असामान्य बुद्धिमंतांना थक्क करू शकणाऱ्या उत्कर्षाच्या उंचीवर जाऊ शकतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे गोखलेच. सर्व बाजूंनी खुंट्या मारून जागा व्यापून टाकली पाहिजे, हा धडा ब्रिटिश रियासतीत ज्या न्यायमूर्तींनी हिंदुस्थानास दिला त्याचेच उदाहरण हरहमेश डोळ्यांपुढे ठेवून ज्यांनी आपला सारा जन्म मायभूमीच्या उद्धारासाठीच खर्च केला, सुखाची कास धरली नाही, दुःखाची पर्वा केली नाही, जे स्तुतीने मोहित झाले नाहीत, ज्यांनी निंदेमुळे "निश्चितार्थात्" मुरड घेतली नाही, दुसऱ्याच्या अंतःकरणास धक्का न लावता, परंतु स्वकर्तव्य व स्वकार्य न सोडता, ज्यांनी जनताजनार्दनाची आमरण सेवा केली असे भारतसेवक नामदार गोपाळराव गोखले होते. सन

१९०६-०७ च्या सुमारास एकदा इंडियन सोशल रिफॉर्मरचे संपादक कलकत्त्यास गोखल्यांच्या बिऱ्हाडी भेटावयास गेले असता, " ईश्वर म्हणजे प्रेम " असे एका पेपरवेटवर त्यांना शब्द आढळले. चौकशी करता, गोखल्यांनी भूतदया म्हणजेच ईश्वर या मतास मी आलो आहे, असे स्पष्ट केले. १९०२ पासून गोखले विधिमंडळाकरिता कलकत्त्यास जाऊ लागले. तेव्हापासून तिकडील ब्राह्मणसमाजाचा त्यांच्यावर परिणाम झाला आणि विवेकानंदांचे ग्रंथ वाचल्यावर त्यांच्या विचारसरणीने गोखले भारून गेले. ओज आणि मार्दव यांचे रम्य संमेलन गोखल्यांच्या स्वभावात त्यामुळेही झाले असेल ! दादाभाई, रानडे व गांधी या तीन व्यक्तींच्या चरित्रांचा माझ्या मनावर आध्यात्मिक परिणाम झाला असे गोखले नेहमीच म्हणत.

२१ व्या वर्षी सार्वजनिक सभेचे चिटणीस, २२ व्या वर्षी सुधारकपत्राचे सहसंपादक, २५ त प्रांतिक परिषदेचे कार्यवाह, २९ व्या वर्षी काँग्रेसचे चिटणीस, ३१ व्या वर्षी वेल्बी-कमिशनपुढील कुशल साक्षीदार, ३४ व्या वर्षी प्रांतिक विधिमंडळाचे सभासद, ३३ व्या वर्षी वरिष्ठ विधिमंडळातील विरोधी पक्षाचे नेते, ४० व्या उंबरठ्यावर काँग्रेसचे अध्यक्ष, ४० व्या वर्षी भारत-सेवक-समाजाचे ब्रह्मदेव व भारताचे इंग्लंडमधील प्रतिनिधी, ४६ व्या वर्षी भारतातर्फे दक्षिण आफ्रिकेत वकील आणि ४९ व्या वर्षी पब्लिक-सर्व्हिस-कमिशनचे सभासद, अशा चढत्या वाढत्या पदवीने जगभर नेमस्त कीर्ती पावलेले नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या निधनाने बादशहा पंचम जॉर्ज यांच्यापासून तो खेड्यातील जाणकार रंकापर्यंत प्रत्येकास हळहळ वाटली ! जगातील यच्चयावत् हिंदी समाजांनी विद्युत्संदेशाने, जाहीर सभांनी, खाजगी पत्रांनी व वृत्तपत्रीय लेखांनी आपापल्या परी त्या महापुरुषाबद्दलचा आपला पूज्यभाव व्यक्त केला. ना. गोपाळराव गोखल्यांच्या मृत्यूसंबंधी ब्रिटिश साम्राज्यात प्रकट झालेले अनेक मुत्सद्द्यांचे, राज्यकार्यधुरंधरांचे विचार लक्षात घेता, गोखले केवळ हिंदुस्थानचेच राजकारणी नसून सर्व साम्राज्यातील राजकारण्यांत त्यांची गणना होत होती हे स्पष्ट होते.

देशाच्या स्थितीचा कालखंडोचित विचार करून लोकांत हक्कांची जाग्रती निर्माण करणे, अन्यायांचे आविष्करण करणे व स्वराज्याची चळवळ चालविणे, त्याचबरोबर राज्यकर्त्यांशी सहकाराने वागून राजनीतीच्या सर्व साधनांनी देशोन्नतीस मूर्त स्वरूप आणणे, अशी जबाबदारी महत्त्वाची व उपयुक्ततेची, परतंत्र हिंदुस्थानच्या राजकारणी मुत्सद्द्यांना करावी लागे. तेव्हा उत्कृष्ट हिंदी राजकारणी मुत्सद्दी होण्यास अनेक गुण अंगी आणावे लागत, —लागतात. देशाच्या स्थितीचे व राजनीतिशास्त्राचे यथार्थ ज्ञान प्रथम हवे. राजनीतिशास्त्र हे एक स्वतंत्र शास्त्र आहे; त्याची अभ्यासपरंपरा आहे; त्यासाठी विशिष्ट पात्रतासिद्धी व्हावी लागते; पाहिजे त्या मनुष्यास राजकारणातील कोणत्याही विषयाबद्दल मत देता येते, अशी

सामान्यपणे समज आहे. वकिली, वैद्यकी, तंत्रविद्या, संपादकी यात विशिष्ट प्रकारचे ज्ञान लागते, पूर्वतयारी आवश्यक असते, पण राजकारण हे " जातीच्या सुंदरांना काहीही चालते। " असा खेळ हिंदुस्थानात चालत आलेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांपासून प्रांतिक व वरिष्ठ विधिमंडळांपर्यंतच्या कामकाजाच्या पद्धती, अर्थसंकल्प, सांपत्तिक ओढ, राष्ट्रीय कर्ज, करांचा बोजा, चलन, चलनविनिमय, परदेशातील वसाहती, शेतकी, धनोत्पादक व पोटपुजे उद्योगधंदे, लोकसंख्येची वाढ, बाजारभाव, सहकार– हे व इतर राजनीतिशास्त्राचे अंगोपांग असलेले विषय सम्यक्‌पणे आपलेसे केल्याशिवाय राजकारणी म्हणवून घेणे " चित्रीच्या राजहंसा "-सारखे किंवा " निर्जीव लेपा "सारखेच होय. ना. गोखले तप, सव्वा तप न्या. रानड्यांच्या पायाशी अशा विषयांचे सोपपत्तिक अध्ययन करण्यात रस घेत होते त्यामुळेच वेल्बी-कमिशनपुढे व विधिमंडळात त्यांची अधिकारवाणीने केलेली टीका सफल झाली. मॉडर्न रिव्हयूने अभिप्राय दिला आहे की, गोखल्यांचे उदाहरण विस्तृत प्रमाणावर गिरवले गेल्याशिवाय भारतीय राजकारणाचे यश सुस्थिर होणार नाही.

आपला विषय नुसता माहितीपूर्ण असून भागत नाही; तर त्याची सुगम मांडणी होऊन तो लोकांच्या व शासकांच्या अंतःकरणास भिडावा लागतो. श्रोत्यांची चित्तवृत्ती गुंग करून त्यांना आस्था व जिज्ञासा निर्माण व्हावी असे, नीरस आकडेसुद्धा कर्णमधुर भासविण्याची गोखल्यांची तोंडोटी प्रभावी होती. याबाबत सर जेम्स मेस्टन यांनी गोखल्यांची तुलना ग्लॅडस्टन्‌शी केली आहे. कोथीपासून सफल आम्रवृक्षापर्यंत जादू करणाऱ्या गारुड्याची करामत गोखल्यांच्या भाषणात असल्याचा निर्वाळा ते देत.

आपले अभ्यासपूर्ण मत ते हृदयमिळवू व बुद्धिबहरू भाषेने मांडताना ते मोजक्या वेळात मांडता यावे लागते. प्रवास व शिक्षणप्रयास यांच्या वाहतुकीप्रमाणे समंजस विचारप्रचारालाही वेळापत्रक आवश्यक आहे; आणि ते ध्वनिकाव्य करणाऱ्या कवीच्या कौशल्याने राजकारण्याने वापरावयाचे असते. हे सर्व करताना स्वाभिमानसंरक्षणाची दक्षताही आवश्यकच ! राजकारणी मुत्सद्द्याने सार्वजनिक सेवाव्रताप्रमाणेच अपमानास्पद प्रसंग निर्माण होऊ नयेत म्हणून काळजी घ्यावयाची असते व न जाणो झालेच तर लगेच तेथे बाणेदार वागणे त्यांचे कर्तव्य ठरते. सिमला येथील विधिमंडळाच्या एका बैठकीत एतद्देशीय सभासदांबद्दल अपमानास्पद शब्द उच्चारताच गोपाळराव गोखल्यांनी उघडपणे त्या कृत्याचा निषेध केला, तो एवढा पराक्रमी ठरला की, विधिमंडळातील युरोपियन सभासदांनी गोपाळरावांची तारीफ केली. खुद्द लॉर्ड मिंटोंनी जेंकिन्सच्या त्या कृत्याबद्दल नापसंती व्यक्त केली. व जेकिन्सही पश्चात्ताप पावून गोखल्यांची माफी मागून बसला ! ! पण स्वाभिमान-

संरक्षणार्थ राजकारणींना पथ्य पाळावे लागते ते हे कां, आपल्या योग्यतेचा निंद्य व स्वार्थपरायण अशा उपयोग कोठेच करावयाचा नाही, की कोणतेही याचना करावयाची नाही. ना. गोखले यांनी हे पथ्य काटेकोरपणाने पाळले होते. त्यांच्या अशा इभ्रतीच्या वागण्यामुळेच, त्यांच्या सहवासाची भूक विचारविनिमयाकरिता अनेक युरोपियन्स देखील प्रकट करीत.

आपल्या सामनेवाल्यावर करावयाची टीका त्या सामनेवाल्यास वा त्याच्या पक्षास धिक्कारणारी न होता त्याची तत्त्वच्युती वा तत्त्वाभाव यांची दर्शक राखणे राजकारणीला कर्तव्यप्राप्त असते. त्याबाबत, वैयक्तिक मर्मभेद हा गोखल्यांनी नेहमीच अपवित्र पवित्रा मानला. मद्रासच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सभासद सर हॅरॉल्ड स्टुअर्ट यांनीच त्याबद्दल ग्वाही दिली आहे. या सर्वांच्या भरीला जबाबदारीची जाणीव प्रामुख्याने ठेवावी लागते ती निराळीच. प्रतिपक्षाचे हेतू व अडचणी त्याला एवढ्या लक्षात घ्याव्या लागतात की, त्यांच्या जागी आपण असतो अगर आलो तर काय केले असते वा काय करू, याचा पडताळाही द्यावा लागतो. त्यायोगे टीका विधायक व निरुत्तर ठरते. ना. गोखल्यांनी ही कसोटी नेहमीच सांभाळली. स्वतंत्र लोकशाही देशात सत्तान्तर होऊन टीकाकाराच्या पक्षास अधिकारसूत्रे हाती घ्यावी लागतात. ही कसोटी गोखल्यांनी सांभाळली याचे कारण उद्या-परवा हिंदुस्थान हे स्वतंत्र लोकशाही राष्ट्र व्हावयाचे आहे ही तर त्यांच्या अंतरीची जाणीव होतीच; पण लोकशाहीच्या कसोट्या सांभाळण्यास हिंदुस्थानचे नेते पात्रतासिद्ध आहेत हे जगाला पटवावयाचे होते आणि तसे हिंदुस्थानातही लोकशिक्षण साधावयाचे होते.

तात्पर्य, सर चिंतामणींच्या 'लीडर' पत्राने म्हटल्याप्रमाणे, दयामय उत्साह आणि तत्त्वनिष्ठ शान्ती यांचा सहकार-समन्वय ज्या सार्वजनिक पुरुषांत यथायोग्य असेल, त्यालाच हर्बर्ट स्पेन्सर आदर्श मानी; त्या मानदण्डास धरून, एकोणिसाव्या शतकाच्या उदयाचलावर आपल्या कर्तृत्वकिरणांनी तळपणाऱ्या भारतीय तपस्वीयांत भारत-सेवक नामदार गोपाळ कृष्ण गोखले हे एकटेच तसे आदर्श पुरुष होते असे म्हणावे लागते. जशी शिस्तीची तशीच प्रगतीची आस्था गोखल्यांच्या व्यक्तिमत्त्वात वैशिष्ट्याने नांदत असून, नेक राजनिष्ठा आणि रोखठोक देशभक्ती यांचा सुरेख संगम कसा घडू शकतो हे भारतसेवक नामदार गोपाळ कृष्ण गोखल्यांनी दाखवून दिले आहे.

* * *

३२ : लोकदृष्टीतून भारत-सेवक गोखले

मृत्युशय्येवर असताना त्या महात्म्याने (गो. कृ. गोखले यांनी) आपले मनोध्येय प्रकट केले होते. आपल्या मृत्यूनंतर जरी आपले चरित्र लिहिले गेले किंवा आपले एखादे स्मारक उभे राहिले अथवा इहलोकातून परलोकी आपण गेल्याबद्दल दुःखप्रदर्शनाच्या सभाच सभा झाल्या, तरी आपल्या आत्म्याला शांति मिळणार नाही असे ते म्हणाले होते. त्यांची इच्छा केवळ एकच होती की, आपण व्यतीत केले तसेच जीवन हिंदुस्थानने व्यतीत करावे आणि आपण स्थापन केलेल्या भारत-सेवक (आता हिंद-सेवक) समाजाने प्रगती करीत राहून राष्ट्राच्या सेवेच्या जीवनकार्यातच उत्कटता साधावी.

महात्मा गांधींनीच हे सांगितले आहे. शिष्यवराजवळ उघडे केलेले हे हृदगत लक्षात घेतले म्हणजे भारत-सेवक ना. गोखल्यांनी आपले आत्मचरित्र लिहिले नाही किंवा एखाद्या लेखातून वा व्याख्यानौघातून स्वतःसंबंधी फारसे काही सांगितले नाही, किंबहुना तसे करणे आपल्या विनयहीनतेचे लक्षण ठरेल, असेही त्यांनी मानले असावे, हे साहजिक वाटते; तथापि, कोणी स्वतःसंबंधी काही सांगो, न सांगो, समकालीनांच्या आणि मागीलांच्या मनामेंदूवर ज्याच्या कर्तृत्वाचा जेवढा ठसा उमटलेला असेल, त्याला तेवढेच स्थान समाजाच्या स्मृतीत आणि त्याच्या कर्तृत्वाच्या तेजोराशीप्रमाणे, राष्ट्राच्या इतिहासात मिळतच असते. या दृष्टीने लोकदृष्टीतील भारत-सेवक नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे दर्शन अभ्यासूंना उद्‌बोधकच ठरेल. हे पहा :

१. ना. व्ही. एस्. श्रीनिवास शास्त्री

आपल्याला शिक्षण देणाराबद्दल आदर आणि कृतज्ञता, देशकारणासाठी कर्तबगारी करणाऱ्या व उत्कट दिव्यातून जाणाऱ्याविषयी निःसंदिग्ध गौरवभावना यांचे महान मूलतत्त्वच गोखले यांच्या स्वभावधर्मात होते. स्वतः महत्पदाला चढल्यावरही ज्या वेळी ते रानडे, जोशी किंवा फिरोजशहा मेहतांसंबंधी बोलत, तेव्हा कमालीच्या विनम्रतेचे कसे शब्द वापरीत, हे आश्चर्यचकित करणारे असे. त्यांच्यावर एकसारखे हल्ले चढविणाऱ्या आणि स्वतःची म्हणून ज्याविरुद्ध आपली बाजू वारंवार मांडीत अशा टिळकांसारख्या पुरुषाबद्दल, जेव्हा आम्ही वाटाघाट

करीत असू, तेव्हा त्याच्या-(टिळकांसारख्या)-विषयी आम्हांपैकी कोणालाच ते (गोखले) अनादराचा शब्द काढू देत नसत. ते म्हणत टिळकांपुढे तुम्ही कोण ? ते (टिळक) एक महापुरुष आहेत. त्यांच्या अंगचे स्वाभाविक गुण हे पहिल्या प्रतीचे ' देणे ईश्वराचे ' आहे. देशासाठी एवढा त्याग करणारा दुसरा पुरुष नाही. आपल्या जीवनात सरकारच्या सर्वसमर्थ विरोधाला तोंड द्यावे लागलेला, टिळकांच्याइतक्या योग्यतेचा दुसरा पुरुष नाही.

२. पं. मदन मोहन मालवीय

गोखले हे असा एक उदात्तात्मा होते की, सर्वग्राही देशभक्तीने तो धगधगलेला होता. स्वतःपुढे ठेवलेल्या आणि देशबांधवांपुढे धरलेल्या प्रत्यक्ष आदर्शाप्रमाणेच त्यांचे स्वतःचे जीवन होते. मातृभूमीच्या सेवेत त्यांनी दाखविलेली निष्ठा इतिहासाच्या कपाळी कोरलेली आहे.

३. महात्मा गांधी

गोखल्यांनी मला हे शिकविले की, जो जो कोणी माझे देशावर प्रेम आहे म्हणतो त्या प्रत्येक भारतीयाचे स्वप्नरंजन शब्दांच्या आतषबाजीत न होता, देशाच्या राजकीय जीवनाच्या अध्यात्मीकरणात झाले पाहिजे. मी त्या साधू राजकारण्याचा त्याच्या अंतसमयीही शेजारी होतो. मला त्यांच्यामध्ये ' अहंतेचा वारा ' आढळलाच नाही. आपल्यातील प्रत्येक विशेष गुणाची वाढ जी त्यांनी केली ती स्वतःला जगाची वाहवा जिंकता यावी म्हणून नव्हे, तर त्यायोगे आपल्या देशाला लाभ व्हावा म्हणून.

४. बॅ. महंमदअली जिना .

गोखल्यांच्या जीवनाचा व कार्याचा मोठ्यात मोठा हा धडा आहे की, एकाकी एकच व्यक्ती, पण काय करू शकते, देशाच्या भवितव्याला समर्थपणे व व्यवहारतः काय मदत करू शकते आणि वळण देऊ शकते, याचे गोखले हे एक मूर्तिमंत उदाहरण आहेत. त्यांच्यापासून लाखो लोकांनी खरे नेतृत्व आणि स्फूर्ती घ्यावी.

५. एम्. विश्वेश्वरय्या

अलीकडे गोखल्यांनी आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळविली. कोणत्याही देशातील पुरुषोत्तमाच्या रांगेत बसण्याची लायकी प्राप्त करून घेऊ शकतो, असे आपल्या देशबांधवांपैकी उदाहरण म्हणून, गोखल्यांच्याकडे बोट दाखविण्यात, हरएक देशातील भारतीय उघड उघड भूषण मानतील.

६. ना. आगाखान

गोखले नुसत्याच विशाल अंतःकरणाचे नव्हते, तर उदार हाताचेही होते.

७. लॉर्ड हार्डिंज

मी त्यांना (गोखल्यांना) विधिमंडळातील नुसते महत्त्वाचे सभासद म्हणूनच मानीत नसे, तर एक मित्र मानीत असे.

८. लॉर्ड कर्झन

ते (गोखले) विरोधी पक्षाचे नेते होते आणि त्या नात्याने त्यांनी दिलेल्या दणक्याखाली मला पुष्कळ वेळा कष्टी व्हावे लागले. गोखल्यांइतक्या संसदीय कुवती असलेला पुरुष मला दुसऱ्याही राष्ट्रीयत्वाचा भेटला नाही. जगातील कोणत्याही पार्लमेंटात, अगदी ब्रिटिश पार्लमेंटातसुद्धा, गोखल्यांना प्रतिष्ठेचेच स्थान प्राप्त झाले असते.

९. ई. एस्. मॉंटेग्यू

त्यांचे (गोखल्यांचे) मन मुत्सद्देगिरीला चिकटल्या-बिलगलेल्या सर्व गुणांनी संपन्न होते; पण त्या मनाच्या उत्साहाची धग अथवा मानव्याच्या जिव्हाळ्याचा उबारा मुळीच कमी झालेला नव्हता.

१०. रॅम्से मॅक्डोनाल्ड

त्यांना (गोखल्यांना) पश्चिमेचा, तिच्या सामर्थ्यांचा आणि राज्यांचा चांगलाच परिचय होता. पश्चिमेच्या कर्तबगारीला त्यांच्याइतक्या अंतःकरणपूर्वक कोणीच मुजरा केला नाही. पण त्याचबरोबर त्यांचा पूर्वेशीही चांगलाच परिचय होता. आपली मायभूमी जी हिंदुस्थान, त्याचा श्वासनिःश्वास हाच गोखल्यांचा श्वासनिःश्वास होता. हिंदुस्थानच्या प्रतिष्ठेला ते दुर्मिळतेच्या जिवा-भावाने जपावयाचे आणि त्याच्या उण्यादुण्यांना दूर करावयास निष्ठेने झटावयाचे.

११. एच्. डब्ल्यू. नेव्हिन्सन

गोखल्यांच्याइतका सौम्य, शांत आणि स्वयंसंयमी वक्ता मी पाहिलाच नाही. त्यांचे वक्तृत्व पूर्ण माहितगारीचे, आपल्या कार्यकारणाशी संपूर्ण निष्ठेचे आणि स्वार्थाचा अथवा दुसऱ्या कसल्या लाभाचा लवलेशही नसलेले, असेच असे. तथापि, त्यांचे भाषण कितीही शांत असले तरी त्यामागील खड्याखंब निश्चितीची आणि वाहवा होण्याच्या वैभवाबद्दलच्या किंवा स्वार्थाबद्दलच्या बेफिकिरीची जाणीव श्रोत्यांना सारखी होत असे. गोडव्या युक्तिवादाखालील धीर हा त्या पुरुषाचा व त्याच्या भाषणाचा एक विशेष होता. त्यांना (गोखल्यांना) ठाऊक होते की, शब्दाप्रमाणे कृती होत नसेल, तर शब्द कवडीमोल ठरतात- म्हणूनच त्यांनी भारत-सेवक-समाज निर्माण केला.

१२. डॉ. व्ही. एच्. रूदरफोर्ड

गोखले मला अभिजात असे चतुर राजकारणी वाटले. सत्ताधारी आणि विरोधी अशा दोन्ही लोकविभ्यांतून ते उत्तम तेवढे सर्व उचलत.

१३. लो. टिळक

इंद्रियशक्ती शाबूत आहेत, स्वार्थासाठी उद्योग करण्यास, शरीर समर्थ आहे, वार्धक्य अजून दूर आहे आणि संसारातील सुखाचे स्वरूप अद्याप मनोहर असून, तिकडे चित्ताची प्रवृत्ती होणे साहजिक आहे, अशा वेळी आणि विशेषेकरून या दिशेने गेले असता, आपणास यश मिळण्याचा संभव इतरांपेक्षा काकणभर अधिक आहे, अशी मनास खात्री वाटत असतानाही, या सर्व मनोहर देखाव्यावरून दृष्टी मागे ओढून, यथाशक्ती आपल्यास देशकार्यास वाहून घेणे, त्यात आलेली संकटे सोसण्यास कबूल असणे, किंबहुना त्यातच आनंद मानून त्यासाठी सतत परिश्रम करण्यास तयार होणे याला एक प्रकारचा बळकट मनोनिग्रह लागतो आणि तो मनोनिग्रह ज्याने दाखविला व नुसता दाखविला नव्हे, तर आमरणान्त कायम ठेवला तोच पुरुष धन्य होय. देश वर येण्यास लोकांच्या ठायी अनेक सद्गुणांचा प्रभाव झाला पाहिजे, असे जे गोपाळरावजींनी (गोखल्यांनी) निदान केले होते ते अक्षरशः खरे आहे. विद्यार्थीदशेत असल्यापासून मनापुढे उच्च ध्येय ठेवल्याने बुद्धिमान पुरुषास काय करता येणे शक्य आहे याचा धडा गोपाळरावजींच्या चरित्रापासून पुढच्या पिढीने घ्यावा.

✕ ✕ ✕

३२ : स्नेहशील भारत-सेवक गोखले

भारतीय इतिहासात अत्यंत नामवंत झालेल्या ब्रिटिश रियासतीतील महाशयांपैकी नामदार गोखल्यांचा कालखंड हा एक महती पावलेला कालखंड आहे. त्या कालखंडाने प्रथम गोखल्यांना वळण लावले व मग गोखल्यांनीच त्या कालखंडाला वळण लावले. परकीय सत्तेकडून स्वकीय सत्तेकडे धाव घ्यावयाच्या त्या काळात दमदार उत्साहाची, दक्षतेची व साहसाची आवश्यकता होती. आपल्या रेशमी हातमोजाखालील पोलादी पंजाच्या बिनचूकपणाने परकीय सत्तेच्या सूत्रधाराशी अभ्यासू वृत्तीणक सामना देणारे गोपाळराव गोखले स्वकीय गुरुजनांशी व समकालीनांशी शालीन सहकाराने वा विनम्र विरोधाने चालले हे पाहण्यात त्यांचे सम्यग् दर्शन घेता येते. प्रसंगाप्रसंगाने संपर्कं आलेल्या व्यक्तिमात्राशी मनुष्य कसा वागतो व त्या वागण्यात तो किती स्नेहशीलता संभाळतो, यावरूनही माणसाचे मूल्यमापन, त्याच्या मित्रमंडळावरून होणाऱ्या मूल्यमापनाप्रमाणेच करता येते. भारतीय इतिहासात ज्यांची पावले उमटलेलीच राहतील, अशा मंडळींशी गोखले कसे होते हे पाहणे खरोखरच उद्‌बोधक आहे.

१. आगरकर आणि गोखले

कष्टदशेतून आणि दारिद्र्याच्या चटक्यातून गोपाळ गणेश आगरकर व गोपाळ कृष्ण गोखले हे दोघेही देशास लाभले होते. आमरण गरीबीतच जन्म काढून अध्यापकवृत्तीने पुरातन ऋषीच्या व्रताप्रमाणे जाणारा आगरकरांचा उज्ज्वल जीवनपथ अनुसरण्यास योग्य असा डे. ए. सोसायटीत आल्यावरच्या सहवासोत्तर गोखल्यांना वाटला. तरुणांचे वाटाडे न्या. रानडे यांच्याकडे आगरकरांनीच गोखल्यांची शिफारस केली. अशा रीतीने आगरकर-रानड्यांचा सहवास-सहकार होऊनही टीकेच्या व खळबळीच्या वर तरंगणारी (लो. टिळकांच्याप्रमाणेच) त्या दोघांची मने गोपाळराव गोखल्यांना आकलन करता आली तरी अनुसरता वा आत्मसात करता आली नाहीत. मनाचा मऊपणा आप्तसुहृदांच्या समूहात मात्र आगरकरांमध्ये दृग्गोचर होई; एरवी नाही. ज्याने वेड्या समजुतीवर कोरडे ओढण्याचे व्रत पत्करले, त्यास लोकांच्या पोटात शिरून सहृदयतेने काटा थोडाच काढता येतो ? पण गोखल्यांचे तसे नव्हते. गोखल्यांच्या मनाची कोवळीक

इतकी विकसत गेली होती की, एकदा गाडीचे चाक लागून दुखावलेल्या कुत्र्याला त्यांनी आपली गाडी थांबवून दवाखान्यात पाठविले.

सामाजिक अन्यायाविषयी राजकीय अन्यायाइतकेच समाजाला जागे करून, समाजाचा आध्यात्मिक अधिकार वाढविण्याच्या कामीच आगरकरांचे श्रम खर्ची पडले. गोखल्यांच्या कार्यक्षेत्राचा परीघ मोठा होता. आगरकरांपासूनच 'विश्व मोहिरे' करण्याचा पाठ गोखल्यांनी घेतला होता. आगरकरांच्या 'सुधारका'-तील इंग्रजी विभाग चार वर्षे गोखल्यांनी सांभाळला तो अशा लेखांनी की, राज्यपालसुद्धा सुधारकाचे वर्गणीदार झाले. या सुधारकाच्या संपादकीय कारकीर्दीत आगरकरांना 'आम्ही तुमचा खून करू' म्हणून आलेली पत्रे गोखल्यांनी पाहिली होती व त्या पत्रांनी दबून न जाता, आगरकरांनी आपला कार्यक्रम चालूच ठेवला हेही गोखल्यांच्या लक्षात होते; म्हणूनच १९०९ साली अत्युत्साही क्रांतिकारकांपैकी रघुनाथ विद्याधर भावे व खरे हे रेल्वेप्रवासात, गोखले हेच टिळकांच्या मंडालेशिक्षेस कारणीभूत आहेत अशा समजुतीने, लोणावळा-खंडाळा स्टेशनांच्या दरम्यान, गोखल्यांचा सत्कार करण्याच्या मिषाने गोखल्यांच्या जिवावर उठले असता; विवेकाच्या जोरावर आपला कर्तव्यपूत कार्यक्रम चालू ठेवून, त्या आततायींच्या प्रयत्नास गोखल्यांनी वाव दिला नाही. स्वतःच्या मृत्यूपूर्वी आठच दिवस खुनाच्या धमकीची पत्रे आली असताही, गोखले तसेच धीम्या कर्तव्यनिष्ठेने वागले.

आपले कितीही दारिद्र्य असले, तरी आपल्या प्रेतसंस्काराचा बोजा आपल्या आप्तेष्ट-मित्रांवर पडू नये म्हणून, आपल्या पेटीत वीस रुपयांची एक पुरचुंडी आगरकरांनी ठेवलेली, गोखल्यांनी पाहताच, त्यांना एकदम रडूच कोसळले. आगरकरांचा तो पीळ डोळ्यांपुढे असल्यामुळेच, १९१३ साली ज्या वेळी पब्लिक सर्व्हिस कमिशनवरील दरमहा दोन हजारांच्या तनख्यामुळे, वरिष्ठ विधिमंडळाचे सभासद गोखल्यांना राहता येणार नाही, असा आवाज विधिमंडळाच्या आवारात उमटू लागला, तेव्हा एक पैही तनखा आपण घेणार नसल्याचे गोपाळराव गोखल्यांनी स्पष्टपणे जाहीर केले.

कोल्हापूर-बर्वे प्रकरणी टिळक-आगरकरांस शिक्षेचे शेलापागोटे सरकार देऊ निघाले असता, त्या दोघांवर सक्रिय सहानुभूतीची पुष्पवृष्टी करण्याकरिता राजाराम कॉलेजातील विद्यार्थ्यांनी 'भ्रांतिकृत चमत्कार' केला होता व त्यात गोखल्यांनी गोसाविणीची भूमिका केली होती. भोळ्या भावाची ही प्रशालेय विद्यार्थ्यांची देशभक्ती गोखल्यांच्या सार्वजनिक जीवनाची पहिली पाऊलटाक होती; पण देशाभिमानाने प्रेरित होऊन, ज्यांनी पुढे चकाकत असलेल्या, ऐहिक वैभवाला, अधिकारसंपत्तीला रामराम ठोकला होता, त्या निःस्पृह आगरकरांची

छाप गोखल्यांवर पडली; ती "प्रतिपच्चंद्रलेखेव" विकसत गेली आणि १८८७ साली डे. ए. सोसायटीला मिळून आगरकरांच्या ओळीला गोखले बसल्यावर, "आग्ऱ्याहून सुटून आलेल्या शिवाजीची" लोकप्रिय झालेली गोष्ट लिहिता लिहिता, आगरकरांच्या सुधारकाचे सहसंपादक गोखले न्या. रानड्यांच्या कृपेने, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भारत-सेवक नामदार गोखले होऊन बसले. आगरकर सामाजिक सुधारणेचे शंकराचार्य ठरले असले तरी त्यांची कर्तबगारी व कीर्ती महाराष्ट्राच्या चतुःसीमा फारशी ओलांडू शकली नाही. १८९५ साली वयाच्या अवघ्या ३९ व्या वर्षी आगरकर वारल्यावरच, गोखल्यांची कर्तबगारी जगाच्या डोळ्यात भरली. आपण हाती धरलेला तरुण, आपल्या किती तरी पटीने श्रेष्ठ ठरला याबद्दल आगरकर जिवंत असते; तर त्यांना आनंदच आनंद झाला असता. त्यांच्या आत्म्याला—तो कोठेही असला तरी—गोखल्यांच्या कीर्तिसुगंधाने समाधानच वाटले असेल.

२. आपटे आणि गोखले

हरी नारायण आपटे हे मराठीचे आद्य कादंबरीकार. यांना एकदा मुंबई विधिमंडळाच्या निवडणुकीस उभे राहण्याचा सल्ला गोपाळराव गोखल्यांनी दिला; पण हरिभाऊंना निवडणूक जमली नाही. आपले स्नेही पुढे यावेत ही गोखल्यांची इच्छा होतीच, पण हरिभाऊंसारखा समाजाभ्यासू देशकारणी लागावा ही त्यांची खरी ओढ होती. १८८७ मध्ये हरिभाऊंचा व गोपाळराव गोखल्यांचा स्नेह जमला. समाजास मार्गदर्शक कादंबरीकार होण्याची आपटे यांची महत्त्वाकांक्षा होती व आपल्या देशाच्या भल्याची सर्वोत्कृष्ट राजकारणी करणी करावी असे गोखल्यांच्या मनात होते. दोघेही कामनासिद्धी पावले; किंबहुना, 'मी' मधील भावानंदाची ऊर्फ पोलिटिकल संन्याशाची मूळ कल्पना हरिभाऊंची की, भारत—सेवक समाजाची स्थापना करणाऱ्या गोपाळराव गोखल्यांची असा एक सुखसंवाद साहित्यिकांत चालत असतो. आपल्या कादंबरीतील पात्रे हरिभाऊ वास्तवावरून रेखाटतात, म्हणून "तुमच्याकडे राबता ठेवण्याची सोय नाही, माझेही चित्र कदाचित् काढाल." असा संवादविनोद त्या दोघा स्नेहांकितांत एकदा झाल्याचेही प्रसिद्ध आहे.

सन १८९७ मध्ये रामदासी पंथाप्रमाणे एखादा राजकीय पंथ निर्माण करावा असे गोपाळराव गोखल्यांच्या मनात होते. त्याला हरिभाऊ आपट्यांची साथ होती. बारा वर्षांची बुद्धिमान व पाणीदार मुले आपल्याजवळ ठेवावयाची, त्यांच्या पालकांपासून "आम्ही मुलास परत नेणार नाही" असा करार करून घ्यावयाचा, नंतर या मुलांस सर्व प्रकारचे राजकीय शिक्षण द्यावयाचे, आठ, दहा वर्षे दृढ अध्ययन झाल्यावर, निरनिराळी कामे करण्यासाठी हे राजकीय

संदेश-प्रसारक म्हणून पाठवून, एकीकरण व एकजिनसीपण साधावयाचा, असा त्यांचा मानस होता. तो अनुभवांती पुढे १९०५ मध्ये भारत-सेवक-समाजाच्या स्वरूपात परिणत झाला. हरिभाऊंच्या 'मी' कादंबरीतील भावानंदाच्या आश्रमाच्या रूपाने आणि उषःकालमधील रामदासी मारुती-मंदिरातील गुप्तगूंच्या रूपाने त्या कल्पना पुढे हरिभाऊंनी मांडल्या. त्यायोगे एका बाजूने त्यांची प्रसिद्धी झाली, तर दुसऱ्या बाजूने तशा नव्या संस्थेला लोकमताची कितपत अनुकूलता मिळेल याची चाचपणीही त्या काळी झाली. कवी आणि कादंबरीकार 'होणारे' असेल त्याचे उद्घोषक असतात ते असे.

हरिभाऊंचा व गोपाळरावांचा स्नेह जिव्हाळ्याचा होता. हरिभाऊंनीच १९०९ साली गोखल्यांना आगाऊ इशारा दिल्यामुळे, विधिमंडळाच्या बैठकीस जाताना, गोखल्यांवर येऊ घातलेला जिवावरचा प्रसंग टळला होता. १९१५ साली इहलोकचा निरोप घेताना, हरिभाऊंना मुद्दाम बोलावून घेऊन, गोखल्यांनी त्यांना सांगितले की, " एकूण पन्नास वर्षे इथली मजा पाहिली, आता परलोकची... आणि हरी नारायणांना नमस्कार करून गोखले गेलेसुद्धा ! !

३. लॉर्ड कर्झन आणि गोखले

आपण म्हणू ते करू आणि जे करू तेच शहाणपणाचे, दुसऱ्यास त्यात सुधारणा सुचविण्याची किंवा ढवळाढवळ करण्याची योग्यता अगर अक्कल नाही असे लॉर्ड कर्झन यास वाटत असे. जे काही करावयाचे ते सर्व देशात व्यवस्था रहावी म्हणून करावयाचे अशी त्यांची समजूत होती. अशा या अनाठायी बाणेदारपणा बाळगणाऱ्या अरेरावासमोर गोखले विरोधी पक्षाचे नेते म्हणून उभे असत.

१८९९ पर्यंतच्या सर्व गव्हर्नर जनरलांत आपण वयाने लहान,—अवघा त्रेचाळीस वर्षांचा—असा त्यास अभिमान होता. गोखले अवघे छत्तीस वर्षांचे होते. कर्झन तडफदार होते, तर गोखल्यांच्याजवळ अभ्यासाचे तेज होते. कर्झन ताठर तर गोखले मनमिळाऊ पण तत्त्वनिष्ठेत भीडभाड न ठेवणारे. आणि असे असूनही कर्झन यांनी दिलेला सी. आय्. ई. हा किताब इंग्लंडमध्ये उजळमाथ्याने आपणास काम करता यावे, म्हणून गोखल्यांनी स्वीकारला. तोंडाबाहेर काढलेल्या आपल्या शब्दाशब्दाला ना. गोखले आत्मविश्वासाने इतके मोल आणीत की, लॉर्ड कर्झन-सारख्यासही गोखल्यांच्या अंतःकरणशुद्धतेबद्दल नितान्त आदर वाटे. संसदीय वाक्चातुरीचा आदर्श म्हणून, लॉर्ड कर्झन गोखल्यांच्याकडे बोट करीत आणि हे कोणत्या अवस्थेत तर १९०५ च्या वाराणसी काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून, गोखल्यांनी कर्झन यांना औरंगजेबापेक्षा अरेराव म्हणून संबोधिले असताना ! !

४. महर्षी कर्वे आणि गोखले

धोंडो केशव तथा अण्णासाहेब कर्वे यांची आणि गोपाळराव गोखले यांची प्रथम ओळख व स्नेह एल्फिन्स्टन् कॉलेजमध्ये मुंबईस बी. ए. च्या अभ्यासाच्या वेळी झाला. १८९० साली लो. टिळकांनी डे. ए. सोसायटी सोडल्यावर, फर्ग्युसन कॉलेजमध्ये गोखले गणित शिकवू लागले खरे; पण त्याच वेळी ते कर्वे यांना डे. ए. सोसायटीस मिळण्याबद्दल विनंती करू लागले. तिला यश येऊन १८९१ नंतर कर्वे यांच्याकडे फर्ग्युसनच्या गणिताची खुर्ची सोपविण्यात आली.

राष्ट्राची मातृदेवता सुजाण आणि कार्यक्षम असली पाहिजे. महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्व कर्तबगार पुरुष आणि महाराष्ट्रीय संस्कृतीची अस्मिता प्रस्थापित करणारे सर्व संत आपापल्या आईचे "केले" आहेत. तेव्हा हिंदुस्थान पुन्हा सतेज इतिहासाने नटावयाचा असेल तर आजच्या कन्या, उद्याच्या गृहदेवता आणि परवाच्या माता या सुजाणपणे कार्यक्षम केल्या, झाल्या पाहिजेत. या अंतरोत्थित ऊर्मीमुळे, महिला समाजातील 'रंजल्या-गांजल्या' विधवांच्या प्रश्नास हात घालून अनन्यभक्तीने कर्वे समाजसुधारणादेवीचे क्रियाशील उपासक झाले. आणि महर्षिपदाला चढले. कर्वे यांचे ते महत्पद आपली किरणे सार्वजनिक जीवनात टाकावयास सुरुवात करीत असताच, गोपाळराव गोखले त्रिखंड कीर्तीने आपले नाव मागे ठेवून दिवंगत झाले. पण कर्वे यांच्या कार्याचा 'गड अवघड' रचला जात असता, गोपाळराव गोखल्यांनी त्यांच्या कार्याला आपल्याकडून देता आला तितका सारा मदतीचा हात दिला होता. आपापल्या कार्यक्षेत्रात स्वतंत्र तेजाने तळपणारे हे दोघे राष्ट्रसेवक जीवाभावाचे स्नेही होते आणि व्यवहारशुद्ध असे निर्मळ जीवनाचे सहकारी होते. आपल्या शिक्षणासाठी आपल्या मातृसदृश भावजयीने केवढा स्वार्थत्याग केला—याची कृतज्ञ जाणीव असलेले नामदार गोखले महर्षी कर्वे यांच्या महिलोद्धाराच्या कार्यात रस घेत हा सहजधर्मच झाला.

५. महात्मा गांधी व गोखले

नामदार गोखल्यांच्याकडे भारत-सेवक म्हणूनच मोहनदास करमचंद गांधी गुरुभावाने पहात. सरळपणा, सर्वत्र नैतिक वर्तन अशा गुणांमुळे गोखले हे गांधीजींस निर्मळ गंगाप्रवाहासारखेच दिसले. अस्पृश्योद्धार व हिंदु-मुसलमान-ऐक्य यांवर दोघांचाही भर होता. आपल्यामागे गांधीजी हे भारत-सेवक समाजाचे अध्यक्ष व्हावे अशी गोखल्यांची फार इच्छा होती; पण देशभर हिंडून, परिस्थिती पाहिल्यावर, विवेकदृष्ट्या पटले तरच भारत-सेवक समाजात या, असे गोखल्यांनी बजावले होते. गांधीजींनी देश-दौरा केला, पण भारत-सेवक समाजाला ते मिळाले नाहीत; तरी भारत-सेवक समाजात गांधीजींना वडील बंधूचाच मान होता आणि तेही त्याच्या सेवेला वेळप्रसंगी धावत येत.

' अहंतेचा वारा ' गोखल्यांना कधीच लागला नाही, असा गांधीजींचा अनुभव होता. कीर्तीसुद्धा जे काही मिळवावयाचे ते देशाकरता, जे काही करावयाचे ते देशसेवेसाठी, असा गोखल्यांचा शिरस्ता असल्याचे गांधींनी सांगितले आहे. स्वतःची चूक कबूल करण्यास मनाचे फारच मोठे नीतिधैर्य लागते. गोखल्यांत आणि गांधींत हा गुण उत्कटत्वाने वास करी. " सर्व देशाकडे आपलेपणाने पाहणारा महात्मा " असे गांधीजी गोखल्यांना संबोधीत. लोक पुढे गांधीजींनाच ' महात्मा ' म्हणू लागले. प्रभू रामचंद्राला रामदास स्वामी ' समर्थ ' म्हणत, पण पुढे रामदासांनाच लोक समर्थ म्हणू लागले नाहीत काय ?

राजकारण म्हणजे धूर्तांची कारस्थाने व कारवाई नि कारखानदारी असे सर्व जगभर मानले जात असता, राजकारणाला अध्यात्माची जोड दिली पाहिजे असे प्रतिपादन करून, त्याप्रमाणे आचरण करणारा विसाव्या शतकातील पहिला-वहिला भारत-सेवक महात्मा गांधींचा " गुरू " होता.

गोपाळ कृष्ण गोखले किंवा मोहनदास करमचंद गांधी यांना ' बावळट राजकारणी ' म्हणणारा टीकाकारांचा एक वर्ग आहे. भीतीसारखी मंथरा नाही, पण निर्भयतादेखील शिवराळपणाची शूर्पणखा होऊन कशी चालेल ? म्हणून आखीव-रेखीव कार्यक्रमांनी, ध्येय व तत्त्वनिष्ठा न सोडता, संयम, शिस्त आणि शहाजोगपणा यांच्या नेमाने, व्रताने प्रत्येक पाऊल प्रगतिपथावर टाकावयाचे व होता होईल तो घसर होऊ द्यावयाची नाही, हे या गुरुशिष्यांचे अविचलित वैशिष्ट्य होते. नेमस्त धोरण ते हेच.

" माझ्या देशबांधवांच्या आकांक्षांना मी मर्यादाच मानीत नाही. " नामदार गोखल्यांच्या जातिवंत देशभक्तीचे हे मनमोकळे उद्‌गार आहेत. राष्ट्रीय-सभेकडून निर्भेळ स्वातंत्र्य-प्राप्तीचे एकमुखी ध्येय महात्मा गांधींनी जगापुढे जाहीर केले. नारायणनामापुरताच नारदाला गुरू करून स्वतःच्या दिव्योपभोगांनी प्रह्लादाने ज्याप्रमाणे निर्जीव खांबातून नरसिंह प्रकट व्हावयास लावला; त्याचप्रमाणे भारतोन्नतीचा निदिध्यास व राजकारणाचे अध्यात्मीकरण यांची स्फूर्ती गोखल्यांच्या-कडून घेऊन, गांधींनी आपल्या सत्याग्रहाने जगाच्या शांतियुगाची अरुणप्रभा फाकविण्याचा चमत्कार करून, विसाव्या शतकाचा खिस्त म्हणून, पश्चिमेकडील बुद्धिसागरांच्याकडून वाहवा मिळविली. गांधींच्याइतका विशुद्धात्मा सार्वजनिक जीवनाच्या धकाधकीत आपल्या आढळात आला नाही असा निर्वाळा दक्षिण आफ्रिकेतील गांधींच्या सत्याग्रह-संग्रामाच्या वेळीच गोखल्यांनी दिला होता. गोखले-गांधीजींच्या हृदयवीणांच्या तारा एकसुरी स्पंदनाच्या होत्या. प्रतिपक्षाशी अगर त्यासंबंधी बोलताना सडेतोड बोलावे, पण सादर व स्वाभिमानपूर्वक बोलावे; जिभेने उच्चारलेला शब्द ओठांनी चुंबित परत घेण्याचा अगर हातांनी लिहिलेला शब्द डोळ्यांनी धुण्याचा प्रसंग स्वप्नातसुद्धा येऊ देऊ नये; टाकलेले पाऊल

हृदयाच्या भावनेने आणि मेंदूतील अकलेने खडेखंब असावे आणि त्यातूनही अनाकलनाने वगैरे घसर झाल्यास, ती चूक मोकळ्या मनाने कबूल करण्याइतकी बालसुलभता राखावी; हाती घेतलेल्या कामाचा पिच्छा एकनाथांच्या एकनिष्ठेने पुरवावा व त्यासाठी वेळ पडल्यास कॅसाबँकाचा कस दाखवावा ! पतितांच्या पावनतेसाठी झटावे. गोखले-गांधींच्या चरित्र-सरितांचे तीर्थ पारखताना असे एकजिनसी दिसते. या समानधर्मामुळेच गांधीजींच्या आफ्रिकेतील सत्याग्रह-संग्रामाला गोखल्यांनी द्रव्यसहाय्य तर केलेच, पण सरकार-दरबारी असलेले आपले वजन कामी लावून, स्वतःच्या सौजन्याचा सर्वस्वी सहकार दिला. दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाला गोखल्यांच्या व्यक्तिमत्त्वाने यशाचे निशाण लाभले हे गांधीजीही ठिकठिकाणी सांगत आले. असे हे गुरु-शिष्य असले तरी गुरू उगमाजवळची तर शिष्य बहुजनसमाजाची तारवे वाहणारी सागरमाप बहुमुखी गंगा होय, हे अभ्यासू दृष्टीतून सुटत नाही.

६. ग. व्यं. जोशी व गोखले

अर्थशास्त्राच्या तात्त्विक व व्यावहारिक अभ्यासात न्या. रानड्यांच्या खालोखाल गोपाळराव गोखल्यांना शिक्षणसहाय्य देणारे व " अभ्यासेचि प्रगट " होणारे गुरू म्हणजे अर्थशास्त्राचे हातखंडे गणेश व्यंकटेश जोशी हे विद्वान शिक्षक होत. न्यायमूर्तींची व त्यांची मैत्री. ता. १६ फेब्रुवारी १८९० रोजी रानड्यांनी जोशांना पत्र लिहून, " गोखले गेले सहा महिने माझ्या हाताखाली काम करतात; त्यांच्या कुवतीसंबंधी व गुणासंबंधी माझे फार चांगले मत झाले आहे. परिस्थिति-सापेक्ष प्रयत्नपराकाष्ठा करणारा तो विद्यार्थी असून बुद्धीने व नीतीने शुद्ध आहे," असे कळविले आणि त्यास आकडेशास्त्र शिकवा म्हणून विनंती केली. जोशांनी त्याप्रमाणे शिकविले व गोखले दहा-बारा वर्षे शिकले. वेल्बी-कमिशनपुढील साक्षीच्या वेळी व विधिमंडळातील अर्थसंकल्पांची वर्षानुवर्ष चिकित्सा करताना गोखल्यांना त्या शिक्षणाचा गुण दाखवता आला. सुरतेच्या काँग्रेसनंतर शिक्षकीतून निवृत्त झालेले जोशी राष्ट्रीय पक्षास मिळून, धुळ्याच्या प्रांतिक परिषदेचे अध्यक्षही झाले. तरीही त्यांच्या मृत्यूनंतर गणेश व्यंकटेशांचे अर्थपांडित्यपूर्ण सर्व लेख छापून काढण्याचे गोखल्यांनीच मनावर घेतले व कृतज्ञतेने त्यांची स्मृती अक्षर केली. गोखल्यांनी एकपरी हे गुरुऋण फेडले. पण गणेश व्यंकटेशांच्या लेखाची पुस्तके गोखल्यांनी त्यांच्या चाहत्यांकडे धाडली असता, गणेश व्यंकटेश आपल्यात आले म्हणून आपणच राजकारणी खरे देशभक्त आहोत असा ज्यांनी ' गौरीचा मांड ' मांडला होता त्यांच्यापैकी कित्येकांनी ती आपल्याकडे आलेली जोशी-लेखांची पुस्तके न स्वीकारता गोखल्यांना " चांगलाच प्रसाद " दिला व गोखल्यांनी तो मुकाट घेतला.

७. लोकमान्य टिळक व गोखले

गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या मनाच्या गोडवेपणामुळे लो. बाळ गंगाधर टिळक म्हणत की, गोखले परराष्ट्री वकील होण्यापेक्षा, हिंदुस्थानात गृहमंत्री होण्यास अधिक पात्र होत. लो. टिळक राष्ट्रीय पक्षाचे अध्वर्यू तर गोखले नेमस्त पक्षाचे. पण दोघेही अखिल भारतीय पुढारी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे. दोघांची कामगिरी एकमेकास पूरक ठरली. लोकांचा "असंतोषः श्रियो मूलम्" हा टिळकांचा खाक्या, तर गोखल्यांना निराशा कधी शिवतच नसे. त्यामुळेच टिळक अखंड चळवळ्ये तर "राजकारण म्हणजे राष्ट्राची समुन्नती" या लाला लजपतरायांच्या व्याख्येप्रमाणे गोखले राजकारणी. सरकारशी "शक्य तेथे सहकार व जरूरच तेथे विरोध" ही गोखल्यांची प्रथा तर टिळक लोकमताचा जोर उत्पन्न करून सरकारशी "शक्य तेथे तेथे विरोध आणि अपरिहार्य तेवढाच सहकार" करीत राहणार. सरकारच्या कारभारयंत्रणेला कधी चुचकारून, कधी शाबासकी देऊन, कधी चिमटा घेऊन तर केव्हा तरी चपराक लावून, गोखले तिला लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न करणार; तर, एका बाजूने परकीय सत्तेमुळेच देशातील सर्व दुःखे नांदत आहेत, तेव्हा लोकांचे, लोकांनी स्वतःच्या पायावर हिंमतीने उभे राहून, आम्ही या देशाचे सुपुत्र व सुकन्या हेच खरे येथल्या कारभारी यंत्रणेचे अंतिम मालक आहोत, या आत्मविश्वासाचे तेज लोकांनी प्रगट करावे, म्हणून टिळक प्रयत्न करणार. हिंदुस्थानचे स्वराज्य लोकशाही स्वराज्य होणार ह्या दोघांच्या एकदृष्ट ध्येयास, त्या दोन प्रवृत्तींचा सुखसंगम सहाय्यकच होणार हे दोघेही अंतरी जाणून होते.

टिळकांचा स्वभाव तल्लख; आवेश त्यांच्या अंगी ताबडतोब संचरे. न्या. रानड्यांच्या पावलावर पाऊल टाकून चालणारे गोखले मनातून जहाल होते. गोखल्यांनी सुशिक्षित समाजात देशसेवेची जागृती केली, तर टिळकांनी देशाच्या स्थितीबद्दल खेड्यापाड्यांतही सामान्य जनतेपर्यंत सगळ्यांना राजकीय जाग आणली. सुबुद्ध लोकशाहीसाठी विद्वत्ता लोकसेवासन्मुख व्हावयास हवी व विद्वानांचा आदर जनसामान्यांनी राखावयास हवा. दोहोंच्या सहकार-समन्वयानेच हिंदुस्थानची लोकशाही शहाणी व सकस ठरावयाची, हाच त्या सहकार-समन्वयाचा इष्टांक. तदनुसार जनजागृतीसाठी आवश्यक असलेल्या स्वार्थत्याग व देशभक्ती या गुणांत टिळक व गोखले यात कोणीच कमी नव्हते. दोघांसही परस्परांची प्रतिष्ठा कळत होती. १८९३ ची सातारा जिल्ह्यातील वाळवे येथे भरलेली 'छोटी कॉंग्रेस' आटोपून, ताकारी स्टेशनमार्गे रेल्वेच्या सेकंड क्लासातून पुण्यास परत येत असता, आपापल्या गुणदोषांची ओळख एकमेकांनी करून घेतली होती. डोंगरीच्या तुरुंगातील टिळक-आगरकरांच्या वादसंवादाचीच

आठवण त्यायोगे डब्यात असलेल्या, बार्शीच्या सानेप्रभृती मंडळींना झाली. सुरतेच्या प्रसंगात नेव्हिन्सन्ने म्हटल्याप्रमाणे, टिळकांच्या पुढे आपले हात करून, त्यांच्यावर धावून येणाऱ्या आतताईला गोखल्यांनी परतविले. त्यापूर्वी १९०५ साली हिंदुस्थानची शिष्टाई इंग्लंडमध्ये करून आलेल्या गोखल्यांचा सत्कार टिळकांनी जाहीरपणे केलाच होता.

कार्य करणाराला चिकाटी, मनोधैर्य व बुद्धिमत्ता लाभत असतात. ते गुण टिळक-गोखले या दोघांजवळही होते. राजकारणात या गुणांच्या जोडीला बेदरकारवृत्ती, डावपेच, कर्तव्यकठोरता, प्रतिस्पर्ध्यास चीत करण्याची प्रवृत्ती, विजगीषुता लागते. टिळक हे सर्व साधीत. गोखले राजकारणातही साधे व साधू. "ठकासि व्हावे ठक । उद्धटासि उद्धट ॥" हे गोखल्यांना मानावयाचे नाही. टिळकपंथीयांचा बाऊ दाखवून गोखले सरकारास धाक दाखवीत. आपापल्या निधनकालापर्यंत दोघेही एकाच ध्येयासाठी झगडले. फुशारकी मिरवण्यासाठी या धीरोदात्तांपैकी एकानेही देशभक्तीचा पेशा स्वीकारला नव्हता; म्हणूनच टिळकांप्रमाणेच गोखल्यांच्या हालचालींवर (क्रमांक ६२ या संकेताने) गुप्त हेरखात्याची नजर होतीच. "इंग्लंडची अडचण तीच हिंदुस्थानचे संधिसाधन" अशी टिळकांची भूमिका होती तर "जे काही मिळेल त्याचा जास्तीत जास्त उपयोग करून घेणे हे आता सर्वांचेच कर्तव्य आहे; कारण ब्रिटिश राजवटीला पर्याय नाही." असे गोखले म्हणत.

आपण अशक्त असलो तरी आपणास पारतंत्र्यात ठेवणाऱ्या चोराला आपण दरडावलेच पाहिजे, असे टिळक सांगत; तर आपली दरडावणी आचरण शुद्ध राखण्याचे सामर्थ्य नसेल तर ती निरुपयोगीच नव्हे, तर दुरुपयोगी ठरेल असे लाला लजपतराय व गोखले यांचे मत होते. नेव्हिन्सन्ने नमूद केल्याप्रमाणे मवाळ म्हणवून घेणे गोखल्यांना आवडत नसे. करबंदींसारखी चळवळसुद्धा हाती घ्यावयास हरकत नाही, असे गांधीजींच्या दक्षिण आफ्रिकेतील चळवळीच्या वेळी सांगणारे व आपल्या देशबांधवांच्या आकांक्षांना मर्यादाच न मानणारे गोखले प्रागतिक होते. सामूहिक मन विकारवश असते. त्याला प्रगतीची निश्चित पावले टाकीत जाण्यापेक्षा झेप घेण्यात पराक्रम वाटत असतो. त्यामुळे "प्रकर्षे करून अगतिक ते प्रागतिक" अशी टवाळी गोखल्यांच्या विरोधकांकडून होऊ लागली हेही यासंबंधात लक्षात ठेवण्यासारखे आहे. तेव्हा समर्थ रासदासांचा पंथ जसा नेमस्त तसाच गोखल्यांचाही पंथ होय, असे विचारवंत संबोधू लागले. जग आहे तसेच घेतले पाहिजे व आपण विवेकपूत आपले कर्तव्य करीत राहिले पाहिजे, हाच दंडक मग गोखले-टिळक आगरकरांच्या उदाहरणावरून जीवनात मानीत राहिले.

तात्पर्य, टिळक व गोखले या दोघांच्याही धोरणात खोल अर्थ असून ती

धोरणे परस्परपूरक होती. म्हणूनच दोघांच्या सुवर्णमध्यावर जनतेची तयारी होत गेली व जनतेला दोघेही पूज्य ठरले.

८. दादाभाई नवरोजी व गोखले

दादाभाई हे देशासाठी सर्व आयुष्य संतोषाने घालविणारे, राजकारणी महर्षी. गोखल्यांच्या चरित्रावर त्यांच्या चारित्र्याची छाप होती. दादाभाई नवरोजी म्हणजे शांतिब्रह्म. १८९३ साली ब्रिटिश पार्लमेंटात निवडून जाऊन "हिंदुस्थानच्या घोर दारिद्र्याला" ब्रिटिश राजवट कारण आहे हे अधिकृत चौकशीने सिद्ध करून घेण्यासाठी त्यांनी वेल्बी-कमिशन नेमून घेतले तेव्हा त्यांची कामगिरी प्रथम जगाच्या डोळ्यात भरली. त्याच वेल्बी-कमिशनपुढील अतुल साक्षीमुळे गोपाळ कृष्ण गोखल्यांचा लौकिकही कलाकलांनी जगाचा चित्तवेध करू लागला. "शिष्टं ध्येयं स्वराज्यस्य यत्नैः संस्थाप्य भारते।" १९०६ सालापासून दादाभाईंनी आपले सर्वपक्षमान्य स्थान भारतीय इतिहासात "भले बुद्धीचे वृद्ध आजोबा" म्हणून अमर केले. त्याच स्वराज्याच्या सिद्ध्यर्थ विधिमंडळाच्या आणि शिष्टाईच्या क्षेत्रात गोपाळराव गोखले इंचाइंचाने अभ्यासपूर्ण वक्तृत्वाची फैर झाडून झगडत राहिले.

स्वार्थत्याग आणि सार्वजनिक जीवनातील नीती यांची अजब छाप दादाभाईंनी अनेकांवर ठेवली; तीतच गोखले हे एक होते. १० जुलै १८९२ रोजी पुण्याच्या आनंदोद्भव नाटकगृहात दादाभाईंना द्यावयाचे मानपत्र गोखले यांनी वाचले, त्यात कृतज्ञतादर्शनाचा वैयक्तिक भाग होताच. वेल्बी-कमिशनपुढील साक्षीच्या वेळी गोखल्यांना काही ठिकाणी दादाभाईंनी सावरून घेतले, तेही गोखले हे रानडे-शिष्य म्हणून झालेल्या पूर्वपरिचयामुळेच. १८५३ सालीच निघालेल्या बॉबे असोसिएशनच्या संस्थापकांपैकी दादाभाई एक असलेले, ते आपल्या साक्षीने खूष झाले म्हणून गोखल्यांना श्रमसार्थकता वाटली.

इंग्लंडात असता दादाभाईंच्या सान्निध्यात राहूनही गोखले आदबीच्या अंतरानेच चालत, वागत. पुण्यातील प्लेगप्रतिबंधक उपाययोजनेतील सरकारी अत्याचारांबाबत आपण केलेली विधाने पुराव्यानिशी सिद्ध करता येत नाहीत म्हणून आपण जी माफी मागितली, तिने दादाभाईंना व त्यांनी इंग्लंडात प्रस्थापित केलेल्या भारतीय नेतृत्वाच्या उंचीला कमीपणा आला असेल या भावनेने गोखल्यांनी पत्रद्वारा दादाभाईंची क्षमा मागितली; तेव्हा त्या उदारात्म्याने गोखल्यांस आपले कर्तव्य चिकाटीने करीत राहण्याचा सल्ला देऊन आशीर्वाद दिले. त्या आशीर्वादांच्या बळावर गोखले काम करीत राहिले. आणि १९०५ मधील इंग्लंडातील शिष्टाईने व वाराणसी काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून भारतीय नेतृत्वाचा उजाळा गोखल्यांनी कायम राखल्याचेच दादाभाईंच्या प्रत्ययास आणून

दिले; म्हणूनच गोखल्यांनी प्रगट केलेल्या राजकीय ध्येयाला १९०६ च्या कलकत्ता काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून दादाभाईंनी ठामपणे परिणतावस्था आणली व "वृद्धोऽपि तरुणायते।" ही हिंदुस्थानच्या ऐतिहासिक परंपरेतील तेजस्विता लोकप्रत्ययास आणून दिली. त्याच तेजस्वितेचा निरलस वारसा आपण चालवू शकतो हे पुढील दशकभर गोखल्यांनी दादाभाईंना व जगाला दाखवून दिले, आणि मग त्या आपल्या थोर मार्गदर्शकाचे जणू स्वागत करण्याकरिता, त्याच्या अगोदरच गोखले परलोकी हजर झाले!

९. देवी सरोजिनी नायडू व गोखले

सौ. सरोजिनीदेवी नायडू व गोपाळराव गोखल्यांची प्रथम ओळख १९०६ च्या कलकत्त्याच्या सामाजिक परिषदेत झाली. त्यानंतर १९११ पर्यंत मुंबई, पुणे, मद्रास, दिल्ली येथे त्यांच्या गाठी पडत गेल्या. १९१२ च्या प्रारंभी कलकत्त्यास सौ. नायडूंच्या वडिलांकडेच (चट्टोपाध्याय) गोखले उतरले असता, एक दिवस गोखले खिन्न बसले होते. तेव्हा सौ. नायडू म्हणाल्या—"का काळजी करता? पाच वर्षांत हिंदु-मुसलमानांचे ऐक्य होईल." त्यांच्या म्हणण्याप्रमाणे १९१६ साली लोकमान्यांनी लखनौ-करार घडवून आणल्यामुळे ते ऐक्य काही काळ झालेही. पण गोखले म्हणाले होते, "आपण कवयित्री आहात. आपला आशावाद पण दांडगाच दिसतो. ते (ऐक्य) आपल्या किंवा माझ्या हयातीत येणार नाही. आपली निष्ठा ठेवा आणि शक्य असेल; तर कर्तव्य करा." त्यानंतर २२ मार्चला मुस्लिम लीगची बैठक संपून गेल्यावर ता. २६ मार्च रोजी सौ. सरोजिनी नायडू पुण्यास गोखल्यांना भेटून हिंदु-मुस्लीम ऐक्याचा आशावाद सांगू लागल्या. "काँग्रेसने मात्र मुस्लीम लीगकडे सहानुभूतीची दृष्टी ठेवली पाहिजे. मी मुसलमानांना तसे वचन दिले आहे." या सरोजिनीदेवींच्या बोलण्यावर गोखले एवढेच म्हणाले की, "माझ्या हातात जेवढे आहे, तेवढे करण्यास मी कमी करणार नाही."

एवढ्या संवादानंतर देवी निघाल्या; तेव्हा त्यांना नामदारांनी फिरून दुपारी यावयास सांगितले. त्या आल्या, एखाद्या 'चंडोला' प्रमाणे ते देवींना आनंदी दिसले. हिंदु-मुस्लीम-ऐक्य होण्याची आशा उत्पन्न झाली या सौ. नायडूंच्या संदेशाने गोखल्यांना नवा उत्साह व आशावाद उत्पन्न झाला होता. गोखले-नायडूंचा वाद-संवाद संपत आला. सायंसमय होऊन शेवटचा रक्तिमा आजूबाजूच्या टेकड्यांवर पसरला होता. तो कमी कमी होत जाऊन तारे चमकू पहात होते. अशा प्रशान्त, गंभीर प्रसंगी दशदिशांस साक्ष ठेवून, आपले तनमनधन देशास अर्पण करा, असे सौ. सरोजिनीदेवी नायडूंस ना. गोखले यांनी उपदेशिले. "राष्ट्रीय ध्येये कवीशिवाय अन्य कोण शिकवणार? कविस्तु क्रांतिदर्शी" असे

गोखले उद्‌गारले. ते लक्षात वागवून सौ. सरोजिनी नायडूंनी देशसेवा केली. तिच्यापायी गांधींच्या चळवळीत जसा त्यांनी बंदीखाना भोगला, तसेच स्वतंत्र भारतातील राजपालपदही शोभविले. उपदिष्टेचे हे सौभाग्य पहावयास गुरु मात्र उरले नव्हते. ना. गोखले त्यांच्या भेटीस येत, तेव्हा सरोजिनीदेवी त्यांना 'चेरी' फळांची भेट नेत. कारण ती फळे गोखल्यांची आवडती असत. ती सादर करताना देवी गोखल्यांना म्हणावयाच्या, "प्रत्येक माणूस कसे ना कसे तरी वस्तुप्रसन्न असते. आपल्या प्रसन्नतेची वस्तू चेरी फळे होत."

१०. रँ. (डॉ.) र. पु. परांजपे व गोखले

हिंदुस्थानातील गरीब लोकांच्या कर्तबगारीबद्दलचे आणि स्वार्थत्यागाबद्दलचे अत्यंत उज्ज्वल उदाहरण म्हणून डेक्कन एज्युकेशन सोसायटी हेच आहे. ही गोष्ट पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या (१९१२-१९१५) निदर्शनास आली. रँग्लर (डॉ.) रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे यांच्यासारख्या शिक्षणाच्या बाबतीत नैपुण्य संपादन केलेल्या स्वार्थत्यागी प्राचार्यास जे मत अधिकाराने देता आले, जो पुरावा कमिशनपुढे मांडता आला व जी ओजस्विता प्रकट करता आली त्या सर्वांचे रहस्यही कमिशनर गोपाळराव गोखले व साक्षीदार रँ. र. पु. परांजपे यांच्यामधील गुरु-शिष्य संबंधातच आहे.

गुरुदेव रामभाऊ रानडे आणि रँ. परांजपे यांची जोड डेक्कन ए. सोसायटीला मिळवण्यात गोपाळराव गोखले यांचा मोठा वाटा आहे. डे. ए. सोसायटीचा निरोप १९०२ सप्टेंबर १९ ला घेताना, रँ. परांजपे यांच्या स्वार्थत्यागाचा विशेष उल्लेख गोखल्यांनी केला होता. कारण आपण केम्ब्रिज-पदवीधर व्हावयास जातानाच आजन्म सभासदत्वाचे रीतसर बंधन घेऊन, केम्ब्रिजच्या पदवीप्रतिष्ठेमुळे होणाऱ्या सर्व संभवनीय सुखात्मक वैभवावर परांजपे यांनी पाणी सोडून आपल्या मनाला देखील मोहमुक्त केले होते. गोखले शिकवताना प्रत्येक बारीकसारीक तपशिलाचीही विद्यार्थ्यांना समजूत देत आणि थोडीसुद्धा चालढकल न करिता परीक्षार्थीला खास उपयोगी पडणारी सर्व बिनचूक माहिती देत, हे परांजप्यांनी पाहिले होते आणि इतिहास शिकवताना गोखले चटकन् आपल्या देशाकडे वळून तुलनात्मक वास्तवाने तसा देशविचार विद्यार्थ्यांना करावयास प्रवृत्त करीत, हे पराजप्यांनी अनुभविले होते. त्या बारकावे टिपण्याच्या गोखल्यांच्या शिस्तीचा परिणाम परांजप्यांच्या विचारधारेवर झाल्या कारणानेच ते जसे गोखल्यांचे शिष्य होते, तसेच सार्वजनिक जीवनात, त्यांच्या उदारमतवादी पक्षाचे अनुयायी झाले. आणि अखिल भारतीय नेमस्त परिषदेचे अध्यक्षही झाले.

११. सर फिरोजशहा मेहता व गोखले

मुंबईचा सिंह म्हणून ज्यांचा लौकिक जन्मभर होता, त्या सर फिरोजशहा

मेहतांचा शब्द त्यांच्या अनुयायांना तर प्रमाण असेच; पण त्यांचा राग आपणावर ओढवून घेऊ नये याची काळजी त्यांचे विरोधकही दक्षतेने घेत. फिरोजशहा मेहता व गोपाळराव गोखले यांची युती व परस्परांबद्दलची आपुलकी, वेल्बी-कमिशनपुढील गोखल्यांच्या साक्षीआधीपासूनच 'प्रतिपच्चंद्रलेखेव' वाढू लागली. १९०२ साली स्वतः मागे राहून मेहतांनी वरिष्ठ विधिमंडळात गोखल्यांची निवड करून दिली. त्यायोगेच गोखल्यांचा प्रवेश उच्च राजकारणात झाला. गोखल्यांना मेहता आपल्या एखाद्या मुलाप्रमाणे वागवीत. पण राजकीय विषयांच्या अभ्यासात, परिश्रमात आणि विशेषतः स्वार्थत्यागात गोखले यांची मजल आपल्या-पुढे पुष्कळच आहे, हे ते जाणून होते. उलट "मेहतांना सोडून बिनचूक ठरण्यापेक्षा, त्यांना बरोबर घेऊन चुकलो तरी मला चालेल" हे मुंबई विधि-मंडळातून बहिर्गमन करण्याच्या वेळी काढलेले उद्‌गार गोखल्यांनी जन्मभर सार्थ केले, यावरून त्यांची मेहतांच्याविषयीची कृतज्ञता केवढ्या पराकोटीची होती ते स्पष्ट होते. वरिष्ठ विधिमंडळाचे सभासद झाल्यावर, सर मेहतांनी सांगितल्याप्रमाणे गोखल्यांनी कायद्याचा अभ्यास फिरून केला व त्यात पद्धतशीरपणे घटनात्मक निर्बंधाच्या (Constitutional Law) अभ्यासाला प्राधान्य दिले. अशा अभ्यासू तयारीमुळे गोखल्यांची झडप पुढे पुढे सर फिरोजशहा मेहतांना झेपेनाशी झाली. वर्षातून एक वेळ जमून राजकारणाचा आढावा घ्यावा, हीच त्यांची काँग्रेसची कल्पना. गोखले यांना ती मान्य नव्हती. शांतता आणि सुव्यवस्था राखण्याच्या कामी सरकारी सोंगाला आम्ही मदत करता कामा नये, असे मेहतांचे म्हणणे असे. पण काँग्रेसच्या ध्येयाला व्यवहारशुद्धी देणारी, राजकीय संन्याशांची संस्था गोखल्यांनी काढली तर मेहतांना तो विशिष्ट पंथाचा व वर्गाचा सवता सुभा वाटला. मेहता व गोखले यांनी विधिमंडळात आपल्या तेजस्वी बाण्याने आणि बुद्धिवाणींच्या ओजाने हिंदुस्थानातील सुशिक्षित वर्गामधून लोकजागृतीचे कार्य सतत केले. १९०३ च्या विद्यापीठ विधेयकासाठी झालेल्या रॅले-इतिवृत्ताविरुद्ध मेहतांनी युरोपियनांसुद्धा मुंबई विद्यापीठातील सर्वांना स्वमताकडे खेचून एकमताचा ठराव केला तेव्हा गोखल्यांनी त्यांस अभिनंदनपत्र पाठविले. नमून न वागता, स्वाभिमानाने व देशहितैक दृष्टीने सरकारच्या बेमुर्वतखोरपणाला ताबडतोब जेथल्या तेथे आळा घालण्याचा प्रयत्न करणे आणि सरकारवर तशा कामी जरूर तर टीका करण्यास न भिणे, हे गुण विधिमंडळातील लोकप्रतिनिधींच्या अंगी असले पाहिजेत, असे मेहतांनी स्वतःच्या आचरणाने दाखविले, त्यायोगेच त्यांना 'नवीन वारे निर्माण करणारा' असा सरकारी अधिकाऱ्यांच्याकडून किताब मिळाला होता. विधिमंडळात काम करताना गोखल्यांच्या डोळ्यासमोर मेहतांचे हे उदाहरण निःसंशय होते. त्याला संपूर्ण सरळपणाची जोड देण्यात गोखल्यांनी आपले न्यायी व्यक्तिमत्त्व राखले होते.

त्यामुळेच (१९१० साली) प्रेस ॲक्टला संमती देताना, गोखल्यांनी सरळपणाच्या सद्‌गुणाचा अतिरेक केला, म्हणून मेहतांनी गोखल्यांस दोष दिला. तसेच दक्षिण आफ्रिकेतील शिष्टाई गोखले यशस्वी करून आले, तरी बोथा-प्रभृतींनी गोखल्यांनी लेखी आश्वासने मागूनही, त्या मुत्सद्द्यांची टाळाटाळ सज्जनपणाने सहन करून, गोखले लेखी आश्वासनाशिवायच परत आले, म्हणून मेहतांनी त्यांना दोष द्यावयास सोडले नाही. मोर्ले-मिंटो–सुधारणा झाल्यावर सर सत्येंद्रप्रसाद सिंहांच्या इज्जतीखातर, सरकारने सादर केलेल्या वृत्तपत्रीय उतार्‍यांचे निमित्त सापडल्यावर गोखल्यांनी प्रेस ॲक्टला संमती दिली ते मेहतांना कसे पसंत पडणार ?

फेराजशहा मेहता मनाचे कठीण तर गोखले मृदू. पण त्या दोघांनीही आपल्या तेजस्वी बाण्याने आणि बुद्धीच्या व वाणीच्या प्रभावाने हिंदुस्थानातील सुशिक्षित वर्गांमधून, त्याचप्रमाणे विधिमंडळातून, प्रत्यक्ष अधिकार्‍यांच्या बरोबर वाग्युद्ध केले आणि कारभारी मंडळीचे दोष निर्भीडपणे मांडून, निरनिराळ्या प्रसंगी निराळ्या युक्तिवादांनी व कुशलतेने लोकजागृतीचे कार्य अत्यंत स्पष्ट व जोमदार असे सतत केले.

फिरोजशहा मेहता मुंबई कॉर्पोशनचे मेयर झाले, तर पुण्यपत्तनात तसलाच मान गोखल्यांना मिळाला. शिष्टाचारात व रुबाबात दोघेही ठाकठिकीचे; आपले कपडे व वास्तविक चालीरीती रुबाबाने पाळणारे ते होते, तरी त्यांची राहणी साधीच, पण विचारसरणी मात्र उच्च होती. दोघेही नेमस्तांतील बिनीचे राजकारणी होते. डोक्याने आखणी व हाताने करणी झाली तरच कोणत्याही कार्याची आणि संघटणेची पूर्तता होते, नेमस्त पक्षात श्रमविभागणी-तत्त्वावर मेहता व गोखले यांनी अनुक्रमाने तो तो भाग कर्तव्य म्हणून उचलला होता.

१२. सुरेंद्रनाथ बानर्जी व गोखले

सुरेंद्रनाथ बानर्जी यांची योजना बंगालतर्फे वेल्बी-कमिशनपुढील साक्षीसाठी झाली होती. त्या वेळीच गोखल्यांचा व त्यांचा दृढ परिचय झाला. पुण्यास १८९५ साली झालेल्या काँग्रेसचे ते अध्यक्ष आणि गोखले दुय्यम चिटणीस असा योग आला होता; पण सामाजिक परिषद काँग्रेसच्या मंडपात भरू नये म्हणून, पुण्याहून अनेक तारा सुरेंद्रबाबूंना गेल्यामुळे, मतभेदाच्या दंगली उठल्यामुळे, काँग्रेसचे अध्यक्षस्थान आपणास नकोच, असे बाबूजींनी कळविले होते, त्यामुळे आणि सुरेंद्रनाथ हे बंगालमधील आपल्यापेक्षा किती तरी जुने पुढारी, म्हणून वाटणाऱ्या निरतिशय आदरामुळे, गोखले त्यांच्याशी सलोखा-सलगी करण्यास धजले नव्हते.

वाराणसी काँग्रेस-अधिवेशनात युवराजांच्या स्वागतावरील व ब्रिटिश मालावरील बहिष्काराचा ठराव पुढे आला असता, सुरेंद्रनाथ त्या दोन्ही ठरावांच्या

विरुद्ध होते. गोखल्यांनी कौशल्याने काँग्रेसमधील मतभेदातून वाट काढल्यामुळे, सुरेंद्रनाथ गोखल्यांच्याबद्दल विशेष जवळीक बाळगू लागले. वंगभंगानंतर सुरेंद्रनाथांनी चळवळीचा जो उठाव केला, त्यामुळे ते वंगीय जनतेचे 'अनभिषिक्त राजे' म्हणून गणले जात असता, त्यांना सरकारने पकडले. तेव्हा शिगेला पोहोचलेल्या दडपशाहीची न्यायाधिष्ठित चौकशी तरी करा, म्हणून गोखले विधिमंडळात व विधिमंडळाचे बाहेरही सरकारच्या पाठीमागे लागले. "मोडलेल्या वचनांचे अखंड दप्तर म्हणजे सनदी नोकरांचा इतिहास" अशी प्रखर टीका सुरेंद्रनाथ करीत असल्याकारणाने त्यांना प्रागतिकांतील उग्र आणि नेमस्तातील ज्वलज्जहाल असेच लोक मानीत. गोखल्यांना त्या सिंहाचा फार दवदबा वाटे.

१३. लॉर्ड मोर्ले व गोखले

लॉर्ड जॉन् मोर्ले सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया झाल्यावर, गोपाळराव गोखले हिंदुस्थानच्या भवितव्यासंबंधी आशावादी बनले. मोर्लेसाहेबांचे राजकीय तत्त्वज्ञानावरील ग्रंथ गोखल्यांनी अभ्यासले होते. म्हणून इंग्लंडला गोखले प्रथम १८९७ त गेले, तेव्हा मोर्लेची समक्ष गाठ घेऊनही आले होते. "आधी केले मग सांगितले" असा हा तत्त्ववेत्ता नसला तरी "बोले तैसा चाले" असा तरी तो ठरेल, असे गोखल्यांना वाटे, पण अधिकारसूत्रे हाती आल्यावर, भोवतालच्या मुत्सद्द्यांच्या मेळाव्यात तत्त्ववेत्ता मोर्ले कोठच्या कोठे लोपला आणि व्यवहारवादी असा ब्रिटिश साम्राज्याचा जरा लवचिक भक्त मोर्ले प्रत्ययाला येऊ लागला. मोर्ल्यांनी गोखल्यांना आपल्याबद्दल असलेल्या आदराचा फायदा बरोबर घेतला. "हिंदुस्थानात बंडाळी माजेल तर काही सुधारणा मिळणार नाहीत." असे तत्त्वज्ञानी शिक्षकाच्या तोऱ्यात मोर्ले गोखल्यांना बोलून गेले. गोखल्यांनी मग आपले नटेश अप्पाजी द्रविडप्रभृति मित्रमंडळींस हिंदुस्थानात शांतता राखण्याची पराकाष्ठा करण्याबद्दल लिहिले. वास्तविक वंगभंगादि जुलूमशाहीने हिंदुस्थानात अशांतता झाल्यामुळेच, इंग्लिश पार्लमेंटातील रॅडिकल लोक गोखल्यांच्या शब्दाला वजन देत होते. त्यावर मात करण्याकरितांच गोखल्यांच्या सरळपणाचा फायदा, आपली अधिकारी-इज्जत राखण्याकरिता मोर्ले यांनी पुरेपूर घेतला किंवा उठवला.

बंगालच्या फाळणीमुळे हिंदुस्थानील तरुण विद्यार्थिवर्ग बंड उभारून ब्रिटिश रियासत उडवून लावण्याच्या उसळीत आला होता. त्याची नोंद मोर्लेच्या मेंदूने घेतल्यामुळेच, त्यांच्याशीच विचारविनिमय करून राजकीय सुधारणा घडवून आणणे गोखल्यांना साध्य वाटले. स्वतःचे मन हिंदुस्थानबद्दल कितीही उदारपणाचे जॉन मोर्लेनी केले, तरी व्यवहारी जगात इंग्लंडच्या साम्राज्याची इज्जत आणि हिंदुस्थानातील अधिकारी असलेले आपले जातभाई यांना सर्वस्वी डावलणे, लॉर्ड मोर्ले यांना राजकारणात इष्ट व शक्य वाटले नाही, असाच

अनुभव गोखले यांस आला. गोखले व मोर्ले यांच्या पाच मुलाखती राजकीय सुधारणा हिंदुस्थानला देण्याबद्दल झाल्या व जे काही उदारमतवादित्व मोर्ले यांना दाखविता आले ते केवळ गोखले यांच्या वजनदारीमुळेच आहे, हे मोर्लेसाहेबांनीही नमूद केले आहे.

लो. टिळकांना १९०८ साली राजद्रोहाबद्दल शिक्षा झाली. पण त्यांच्यावर ज्या 'केसरी'तील लेखाबद्दल खटला भरला होता त्या लेखांच्या समजुतीवरून खटला भरण्याच्याच आपण विरुद्ध आहोत, असे स्टेट सेक्रेटरी मोर्ले यांनी हिंदुस्थानचे व्हाइसरॉय मिंटो यांना लिहिले होते. त्यामुळेच मोर्ले-मिंटो सुधारणा सुरू झाल्यावर लो. टिळक सहजच सुटतील अशी आशा गोखले बाळगून होते.

१४. न्यायमूर्ती रानडे व गोखले

न्यायमूर्ती रानडे हे आधुनिक काळातील अखिल भारताला वंदनीय वाटणारे सिद्धपुरुष होते. त्यांनी गोपाळराव गोखल्यांना आपल्या तालमीत तयार करून, राजकारण व राजकीय चळवळ या क्षेत्रात आपल्यासारखे सिद्ध केले. लॉर्ड मिंटो आणि लॉर्ड हार्डिंज यांच्या कारकीर्दीतच वरिष्ठ विधिमंडळात लोकनियुक्त सभासद आणि डफरीनच्या भाषेत बोलावयाचे तर, विरोधी पक्षाचे अध्वर्यू म्हणून गोखल्यांचे कार्य पराकोटीने श्रेष्ठ ठरले व त्या काळच्या नियतीप्रमाणे आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा पावून बसले. कर्झनसाहेबांच्या अरेरावी साम्राज्यमदाचा खरपूस समाचार गोखल्यांनीच प्रथम घेतला. लॉर्ड मिंटो यांची दृष्टी गोखल्यांनीच साफ उघडली व लॉर्ड हार्डिंज यांना गोखल्यांनीच मार्गदर्शन केले. लॉर्ड मोर्ले आणि मॉंटेग्यू त्याचमुळे गोखल्यांना फार मानीत.

न्यायमूर्तींनी गोखल्यांकडून जे अध्ययन करून घेतले व लोकस्थितीचे निरीक्षण करविले, त्याचे चीज प्रथम लो. टिळकांनी म्हटल्याप्रमाणे वेल्बी-कमिशनपुढील साक्षीत झाले. तेथून न्यायमूर्तींच्या या नामदार आध्यात्मिक पुत्राने आपला व आपल्या गुरूंचा झेंडा तिन्ही लोकी लावला. नम्रता, निःस्पृहपणा, स्वार्थत्याग, सेवाव्रत, देशाभिमान, बाणेदारपणा व तत्त्वनिष्ठा यांबाबत गोखले-रानड्यांचे उत्कट व उत्कृष्ट शिष्य ठरले. टापटीप, वक्तशीरपणा, दीर्घोद्योग, चिकाटी, धीमेपणा, कोणताही विषय पूर्णपणे आत्मसात करण्याचा दृढनिश्चय, वरवर पाहून वक्तृत्व गाजविण्याचा तिटकारा, कोणाही उथळ वृत्तीच्या माणसाला थारा न देण्याचा दृढ संकल्प हे गुण गोखल्यांनी रानड्यांचे शिष्यत्व पतकरून आत्मसात केले व राजकारण, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशासनपद्धती यांचा सखोल व व्यापक अभ्यास करून त्यात ते पारंगत बनले. सरकारी कारभारावर वेळोवेळी प्रसिद्ध होणारी नीलपुस्तके बारकाईने वाचून त्या कारभारातील, अनेक चुकांचे व दोषांचे माप सरकारच्या पदरात घालावयाचे, वास्तव आणि आकडे यांचे योग्य मापन

केल्याशिवाय बोलावयाचे नाही, अशी शिस्त गोखल्यांच्या बुद्धीला व विचार-सरणीला रानड्यांनीच लावली.

वेल्बी-कमिशनपुढील साक्षीच्या वेळी पुण्यातील प्लेग–अत्याचारांसंबंधी पुराव्याच्या अभावी गोखले यांनी इंग्लंडात केलेल्या विधानांबद्दल माफी मागावी असे न्यायमूर्तींनीच त्यांना समजाविले व लोकप्रवादाची पर्वा न करता, सरळपणे वागावे हा धडा त्यांनीच गोपाळरावांना दिला. मर्मी झोंबणारी टीका असली तरी आपला गुरू किती गंभीर असतो हे गोखल्यांनी अनेक वेळा पाहिले असल्या-कारणाने ते माफीचे दिव्य करावयास तयार झाले. "त्यांच्या (रानड्यांच्या) संपर्कात जे जे तरुण आले, त्यांना आपण पावित्र्यमूर्तीच्या सान्निध्यात असल्या-सारखे वाटे आणि काही गचाळ उच्चार तर राहोच, पण त्यांच्या सान्निध्यात अविहित विचार मनात येऊ देण्याचीही धास्ती तरुणांना वाटे असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही." असा आपला नितांत आदर गोखल्यांनी रानड्यां-विषयी प्रकट केला आहे. १८९६ च्या कलकत्ता काँग्रेसच्या वेळीच रानड्यांनी गोखल्यांविषयी म्हटले होते की, "हा एक होतकरू तरुण असून हिंदुस्थानच्या पुढाऱ्यांत त्याची गणना होईल." नेहमी जबाबदारपणाने बोलणाऱ्या व कधीच अवास्तव स्तुती न करणाऱ्या रानड्यांचे ते शिफारसपत्र हिंदुस्थानच्या इतिहासातील एक वास्तव सत्य होऊन बसले.

रानड्यांसंबंधी बोलताना गोखले म्हणत की, "त्यांच्या शब्दकोशात प्रथम पुरुषी एकवचन नव्हतेच मुळी!" अगदी हेच शब्द जवळजवळ, गोखल्यांना गुरू मानणाऱ्या ना. श्रीनिवासशास्त्री, म. गांधी यांच्यासारख्या मातबरांनी गोखल्यांसंबंधी काढले आहेत. म्हणून गुरुदेव न्यायमूर्तींपासून प्राध्यापक गोखले शिकले तो सर्वांत मोठा धडा तोच होता व तोच त्यांनी आपल्या चरित्र-चारित्र्याने मागीलांसाठी ठेवला आहे हे स्पष्ट होते. "निंदकाचें घर असावें शेजारीं!" या न्यायाने आत्मनिरीक्षणाकरिता व आत्मसुधारणेकरिता त्या विरोधकांचा व निंदकांचा गुरुसदृश रानडे उपयोग करीत; कारण कुत्री चावली तरी माणसांनी कुत्र्याला चावायचे नसते, तर अपरिहार्यपणे जरूर असेल, तेव्हा त्यांना लगुड-प्रहर करावयाचा असतो. गोखल्यांनी रानडे यांचा हा कित्ता पुष्कळसा आत्मसात केला, पण त्यांच्यातील मूळचे भावनाविवश सात्त्विक संतापाचे वळण सर्वस्वी सुटले वा सुधारले नव्हते.

रानड्यांची एक पगडी गोखल्यांच्या कपाटात होती. तिचे भक्तिभावाने गोखले दर्शन घेत. असा भाववत्सल शिष्य रानड्यांनी आपल्या स्वतःच्या सर्वगामी राष्ट्रसेवेबरोबरच राष्ट्रास दिला, ही न्यायमूर्ती चंदावरकरांनी म्हटल्याप्रमाणे, न्या. रानड्यांची चिरस्मरणीय देणगी आहे. मायभूमीच्या चरणी कार्य व त्याग यांची

सुमने वाहणे हे न्यायमूर्ती रानड्यांचे जीवनरहस्य असल्याचे गोखल्यांनी एके ठिकाणी सांगितले आहे. तेच त्यांनी स्वतःही आचरून दाखविले.

१५. लाला लजपतराय व गोखले

पंजाबचे संजीवक लाला लजपतराय आणि गोखले हे स्नेही होते. इंग्लंडात १९०५ साली जेव्हा गोखले मुंबई प्रांतातर्फे चळवळ करण्यास गेले होते. त्या वेळी तेथे पंजाबतर्फे लाला लजपतराय होते. त्या वेळचा परस्पर सहकार व पूरकपणा देशास उपकारकच ठरला. पंजाबातील कलोनायझेशनच्या बिलाविरुद्ध अजितसिंह व लालाजी यांनी उत्थान केल्याबरोबर १९०७ साली सरकारने त्यांना मंडालेस हद्दपार केल्याबद्दल वरिष्ठ विधिमंडळात गोखल्यांनी सरकारचा तीव्र निषेध करून त्यांच्या सुटकेची खटपट गोखले यांनीच केली. ११ नोव्हेंबर (१९०७) रोजी लालाजी परत आल्यावर, त्यांनाच सुरत काँग्रेसचे अध्यक्षपद देऊन, त्यांचा मान करावा असे राष्ट्रीय पक्षाचे म्हणणे होते. तसा मान व्हावयास गोखल्यांना एवढीच अडचण वाटली की, सरकारी जुलूमशाहीचा निषेध करताना आपल्याच हद्दपारीचा उल्लेख करणे लालाजींस अध्यक्षपदावरून व्यवहारदृष्ट्या अवघड वाटेल, म्हणून नेमस्त पक्षाच्या व राष्ट्रीय पक्षाच्या सम्मतिसलोख्याने एखाद्या सम्राटाच्या सत्काराला लाजवील अशी लालाजींची मिरवणूक काढून काँग्रेस प्रतिनिधीसह सर्वांनी त्यांना मानवंदना दिली. आपल्यामुळे काँग्रेसमध्ये मतभेद वाढू नयेत म्हणून लालाजींनी अध्यक्षपद नाकारले. पण " होणारे न चुकेल होईल जरी ब्रह्मा तया आडवा । " असा अनुभव सुरतेस आला.

लाला लजपतरायांनी राजकारणी कोणास म्हणावे याची एक व्याख्या १९०५ सालच्या एका लेखात सांगितली आहे. ती अशी– "अतिगंभीर स्वरूपाचे सामाजिक दुखणे अगर अनीती ज्याला निरीक्षणाने प्रतीत झाली आहे, ज्याला विवेक-विचक्षणेने त्या गंभीर दुखण्यावरील वा अनीतीवरील उपाय-योजना सुचली-सापडली आहे आणि इहलोकच्या मानवी जीवितकार्याच्या धर्मकल्पनेने तेजाळलेल्या विवेकाची हाक येऊन त्या उपाय-योजनेला आणि त्या व्यसन-निर्मूलनाला आपण स्वतःच वाहून घेतलेच पाहिजे, हे आपले अपरिहार्य कर्तव्यकर्म असल्याचे उघड झाले आहे, तोज एक राजकारणी होय. " राजकारण्याचे ध्येय नेहमीच पायाभरणी असते. अन्यथा वागणारांचे ध्येय 'धूळधाण' असते. पहिला (राजकारणी) प्रगति-पुरुष असतो. तर दुसरा विरोधवीर असतो. लालाजींच्या या व्याख्येप्रमाणे गोपाळराव गोखल्यांचे मत व वर्तन होते आणि या प्रकाशात ते खरेच राजकारणी होते.

देशभक्त कोणास म्हणावे यासंबंधीही लालाजींचे व गोखल्यांचे एकमत होते. " धर्माची गोष्ट बाजूला ठेवा, पण आपल्या देशापेक्षा दुसरी कोणतीही गोष्ट प्रिय

नाही; अशाच वृत्तीच्या माणसाला देशभक्त म्हणता येईल इतरांना नाही असे आमचे विनम्र मत आहे." असे लालाजींनी सांगितले आहे. गोखले तर हिंदुस्थान हाच देव मानीत होते आणि त्याची सेवा हाच त्यांचा धर्म होता.

लाला लजपतराय यांचा एक सुप्रसिद्ध आलेख आहे की, "देशकाल-परिस्थितीची चिकित्सा केली असता, लोकशिक्षण–समस्येवरच आपण येतो. धार्मिक, नैतिक, बौद्धिक, सामाजिक वा औद्योगिक कोणत्याही दृष्टीने तुम्ही पाहिले तरी हिंदुस्थानची उन्नती हा 'शहाणे करूनि सोडावे सकळ जन ॥' असाच प्रश्न आहे. तसेच म्हणावयाचे झाले तर ही एक समस्यातील समस्या असून, तिच्या बिनचूक उकलीनेच राष्ट्राची भवितव्ये नीट होणार आहेत. उदाहरणार्थ, राष्ट्रा-राष्ट्रांच्या, संघ-संघटनांत भारतीयांना साजेशी समान प्रतिष्ठा ज्या कर्तव्यपूर्तीमुळे प्राप्त होईल, अशा कर्तव्यांची शिकवण देऊन, लोकांना पात्रता सिद्ध होण्यासारखे मार्गदर्शन झाले पाहिजे. या कार्याचा रथ जाडजूड आहे. तो ओढून न्यावयाचा म्हणून जे मनावर घेतील ते पुरुष निश्चितार्थाचे हवेत, अजिंक्य इच्छाशक्तीचे हवेत, अप्रतिहत उत्साहाचे हवेत आणि दमचक्की न होणाऱ्या चिकाटीचे हवेत; एवढेच नव्हे, तर ते पुरुष दानतीचे कृतिवीर हवेत." अगदी याच ध्येयाने नामदार गोपाळ कृष्ण गोखल्यांनी १९०५ साली भारत-सेवक-समाजाची स्थापना केली आणि पुढे सव्वा तपानंतर लालाजींनीही लोक-सेवक-समाजाची उभारणी केली. "घालोनी अकलेचा पवाड । ब्रह्मांडाहूनि व्हावें जाड ॥" अशी या दोन्ही संस्थांच्या सभासदांकडून अपेक्षा आहे आणि ती त्या संस्थांच्या सेवा-कार्यांनी साकार होत असल्याचा अनुभव आहे.

१६. सर दिनशा एदलजी वाच्छा व गोखले

वाच्छा हे गोपाळराव गोखल्यांचे काँग्रेस सेक्रेटरी या नात्याने सहकारी. वेल्बी-कमिशनच्या साक्षीच्या वेळी गोखल्यांना त्यांच्या भावासारखे सहाय्य व शुश्रूषा-व्यवस्था त्यांनी केली. वेल्बी-कमिशनचे सभासद केन यांनी वाच्छा आणि गोखले यांच्या अभ्यस्त साक्षीबद्दल मोठे समाधानाचे उद्‌गार काढले होते. पुण्याच्या काँग्रेसच्या वेळी टिळक पक्ष व गोखले पक्ष यांची एकी व्हावी म्हणून जी मंडळी मुंबईहून आली होती त्यात दाजी आबाजी खरे आणि सेटलवाड यांच्याबरोबर वाच्छा होतेच. त्यांना यश आले नाही हा भाग वेगळा. पुण्यातील प्लेग-संबंधी 'मँचेस्टर गार्डियन'ला गोखल्यांनी जे पत्र लिहिले, ते त्यांनी लिहावयासच नको होते, असे वाच्छांचे मत होते. १९०७ ची सुरत काँग्रेस संपल्यावर नेमस्तांनी आपली कन्व्हेन्शन् काढली, तेथेही वाच्छा गोखल्यांचे सहकारी होतेच. दक्षिण आफ्रिकेत गोखल्यांनी जी तडजोड केली ती फिरोजशहा मेहतांना व वाच्छांना

आवडली नाही. आणि असे काहीं मतभेदाचे भाग असूनही वाच्छा व गोखले यांचा जिव्हाळा अतूट होता.

१७. सर विल्सन व गोखले

हिंदुस्थान सरकारचे अर्थमंत्री सर गायफ्लीटवुड विल्सन ता. १९ सप्टेंबर १९१० रोजी भारत-सेवक-समाजात आले असता, सहज विनोदाने म्हणाले— "एकटे गोखले आमचे धाबे सारखे दणाणून सोडतात; त्यांच्यासारखे आणखी काही लोक तयार होत आहेत, हे पाहिल्यावर मग आम्ही काय करावे?" दुसऱ्या एका प्रसंगी ते उद्‌गारले— "गोखल्यांच्याशिवाय हे (वरिष्ठ) विधिमंडळ म्हणजे हॅम्लेटच्या पात्राशिवाय हॅम्लेट नाटकाइतकेच नीरस आहे. कारण नेहमी आपल्या टीकेने विधिमंडळात रसिकता व सजीवता गोखल्यांनी आणली." सन १९१२ साली त्यांनी आणखीही सांगून टाकले की,— "प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याच्या प्रश्नाचे महत्त्व ब्रिटिश पार्लमेंटापर्यंत मान्य व्हावयाचे श्रेय सर्वस्वी ना. गोखल्यांचेच आहे."

गोखल्यांच्या भारत-सेवक-समाजाच्या स्थापनेतील रहस्यच सर गायफ्लीटवूडना आकलन झाले नव्हते. ते ती संस्था म्हणजे गोखल्यांचे एक स्वप्नरंजनच मानीत. लॉर्ड कर्झनप्रमाणेच त्यांना भारतीय मनाची ठेवण उमगली नव्हती. तथापि, गोखल्यांना पाहिल्यावर आपल्याला ग्लॅड्‌स्टनची आठवण होते; मात्र त्यांच्यात ग्लॅड्‌स्टनचा पुष्कळसा मोठेपणा आणि कित्येक तरी दोष उतरले आहेत, असे गायफ्लीटवुड विल्सन नेहमीच म्हणत असत.

१८. विल्यम् वेडर्नबर्न आणि गोखले

प्रा. गोपाळराव गोखले प्रथम ज्या काँग्रेसला १८८९ मध्ये हजर राहिले, तिचे आणि १९१० सालच्या काँग्रेसचे हे अध्यक्ष. पहिल्या वेळी विधिमंडळाच्या सुधारणांवर गोखले बोलले होते, तर दुसऱ्या वेळी प्रेस ॲक्टला कोणत्या परिस्थितीत आपण संमती दिली याचा त्यांनी खुलासा केला. दोनही वेळा सरसाहेबांनी गोखल्यांचे जेवढे कौतुक केले त्याच्यापेक्षा शंभर पटीने त्यांनी गोखल्यांचे कौतुक वेल्बी-कमिशनपुढील उत्कृष्ट साक्षीबद्दल केले होते. पुण्याच्या प्लेग-अत्याचारांबाबत, पार्लमेंटच्या काही सभासदांना विश्वासात घेऊन जाहीर निवेदन गोखल्यांनी करावे, म्हणून मँचेस्टर गार्डियनमध्ये गोखल्यांना लिहावयास सांगणारांपैकीच ते एक. ती विधाने पुराव्याने लंगडी पडू लागल्यावर गोखल्यांनी दिलसाफ माफी मागितल्यामुळे गोखल्यांचा जिव्हाळा सरसाहेबांमध्ये वाढलाच होता. १९०४ च्या काँग्रेसमध्ये ठराव मांडून काँग्रेसच्या शिष्टमंडळाकडून हिंदुस्थानच्या राजकारणाबद्दल ब्रिटिश जनतेला शिक्षण देण्याची कल्पना सरसाहेबांचीच. १९०५ साली गोखले

व लजपतराय त्यासाठीच शिष्टमंडळात गेले होते. १९१० च्या काँग्रेसचे अध्यक्ष वेडर्नबर्न झाले ते गोखल्यांच्या खटपटीनेच.

१९. ए. ओ. ह्यूम व गोखले

गोखल्यांच्या १८९७ च्या माफी प्रकरणी वेडर्नबर्नप्रमाणेच ह्यूम हे काँग्रेसचे पहिले सेक्रेटरी गोखल्यांना म्हणाले की, "सार्वजनिक जीवनातील असल्या प्रकारांना आम्ही दोन ढब्बू पैशाइतकीही किंमत देत नाही. आपल्याबद्दलची आमच्याजवळील आपुलकी त्या प्रकाराने यत्किंचित जाईल असे मुळीच मानू नका. त्या प्रकारातील एक हुतात्मे म्हणून आम्ही तुम्हांला मानतो आणि सदैव तुमच्या पाठीशी राहण्याचे अभिवचन देतो." ह्यूमना गोखल्यांच्याबद्दल एवढे प्रेम वाटण्याचे कारण म्हणजे ह्यूमना हिंदुस्थानच्या सेवेला ज्या तोलाची पन्नास माणसे अपेक्षित होती त्यात ते गोखल्यांची गणना करीत. सन १८८९ मध्ये प्रथमच गोखल्यांना पाहिल्यापासून गोखल्यांच्याबद्दल ह्यूम यांचे चांगले मत झाले होते.

आतापर्यंत दिलेल्या विविध षोडशोपचारांनी गोपाळराव गोखल्यांचे सम्यक् दर्शन घेतले, म्हणजे स्पष्ट उद्‌बोधन होते ते असे की —

"नव्या भारताच्या उभारीस दिव्य ।
हवे संग्रही, संयमी आणि भव्य ।।
जयांची असे संतवृत्ती सदैव ।
जना वागवाया, कराया स-दैव ।। १ ।।

तयांची कृती आणि वाणी प्रभावी ।
पुढीलांस तेजाळुनी काळ भावी ।।
प्रतिष्ठा जगी भारती संस्कृतीची ।।
शिरोधार्य व्हायास ही वृत्ति साची ।। २ ।।

प्रतिष्ठा-पदी ध्यास की आस नाही ।
स्वत:ला, जना सांगता शिस्त व्हावी ।।
जनांच्या मना कान देवोनि चित्ता ।
भले वागणे लाधल्या स्थान-सत्ता ।। ३ ।।

३४ : ना. गोखले यांचे विवेकदर्शन.

"आता देशात्मका देवा। वाग्यज्ञे तोषवावा॥" म्हणून नामदार गोपाळ कृष्ण गोखल्यांनी हिंदुस्थानातील व इंग्लंडातील लोकांसमोर हिंदुस्थानच्या प्रतिष्ठा-प्रगति-साधना म्हणून व्याख्यानेच व्याख्याने दिली; त्यामधून "सहज बोलणे हित, उपदेश। साहे ओझे त्यास तेचि द्यावे॥" हे धोरण असलेली, त्यांची वाक्सुधा येथे उतरून घेतली आहे. तीमधून त्यांचे विवेकदर्शन घेणे, हा एक रम्य अभ्यास आहे. 'जशी वाणी तसा प्राणी', घाटणीतून घाट, शैली हाच मनुष्य अशा जगाच्या प्रचलित भाषांतून किती तरी म्हणी आहेत त्या कसावर गोखल्यांचे व्यक्तिमत्त्वही येथे स्पष्ट होईल. पहा की —

(१) **वृत्तपत्रसृष्टीने आमच्या राष्ट्रव्यापक विवेकाला स्फुरण दिले आहे.** "केवळ माणसामाणसातीलच नव्हे, तर वर्गातील न्याय आणि समानतेच्या कल्पनांचा प्रसार देशभर तिने केला आहे. आमच्या लोकसन्मुख वृतीला तिने प्रेरणा दिली आहे. आणि सार्वजनिक कर्तव्याची उंची-प्रमाणे घालून दिली आहेत.

— वृत्तपत्र-कायदा-भाष्य–१९१०

(२) विधिमंडळात किती हिंदू व किती मुसलमान आसन ठोकतात याला काय महत्त्व आहे? सर्वांत महत्त्वाचा प्रश्न असतो तो आपल्यापैकी कितीजण काम करतात. आणि कोणत्या वृत्तीने काम करतात?

— विधिमंडळ-नियमावली १९११

(३) सर्व देशात सर्वकाळी खुल्या व्यापाराच्या तत्त्वाचा मी पुरस्कर्ता नाही. मानवा-मानवाची बंधुता या सर्वसुंदर तत्त्वाइतकेच खुल्या व्यापाराचे तत्त्व सर्व जगभर तूर्त टिकण्यासारखे आहे; अधिक नाही. एक दिवस विश्वबंधुत्वाचे प्रवचन सोडून बडीबडी राष्ट्रे आठवड्यातील बाकी सहा दिवस दुसराच काही धर्म पाळतात. आणि त्यांची शस्त्रसाधना सर्वत्र उठावानेच होत असते. खुला व्यापार सर्व देशांत असावा हे तत्त्व सांगावयास ठीक आहे. पण सर्वत्र ते आचारणात आणून दाखविण्यास आपणास फार फार काळ लागेल.

— कापसावरील करभाष्य १९११

(४) आपले कार्य यशस्वी व्हायचे असेल, तर आपले सर्वांचे प्रयत्न-परिश्रम एकवटले पाहिजेत; व सर्वांचे प्रयत्न-परिश्रम एकवटावयाचे तर पुढाऱ्यांच्या शब्दाला अनुयायांची शिस्तबद्ध साद मिळाली पाहिजे.

— आपली राजकीय अवस्था १९०४

(५) काटेकोर काटकसर, राज्यकारभाराच्या सर्व शाखांतून खर्चिकपणाला कठोर कातरा, मात्र कार्यक्षमतेच्या योग्य मानदंडाची निगा राखण्याच्या धोरणाशी विसंगत न होईल इतक्या बेतानेच, हाच खरोखर भारतीय अर्थखात्याचा डोळ्यात भरणारा विशेष असला पाहिजे; खरे नियामक तत्त्व हवे, त्यातील हेतू इतकाच की, लोकांवरील कर-आकारणी शक्य तेवढी कमी प्रमाणाची रहावी, ती अशा बेताने की, राष्ट्रीय उद्योगधंद्यांचे निर्माणोगम मोकळेपणाने वाहून, त्याची गती अकुंठित रहावी.

— अर्थसंकल्प भाषण १९०२

(६) **राष्ट्राची लष्करी सुरक्षितता हा निःसंशय सर्वप्रथम विचाराचा विषय असा आहे की. ज्यापुढे बाकी प्रत्येक विचार बाजूसच सरला पाहिजे;** पण लष्करी सज्जता याला निश्चित असे काही कोष्टक नाही. आणि असेल-नसेल त्या मिळवण्यासारख्या मार्गाने येणारे वसुलाचा अमर्याद स्वाहाकारही तेथे होऊ शकेल. म्हणून लष्करी समर्थता सदैव सापेक्षच असली पाहिजे. ती प्रत्येक राष्ट्राच्या संरक्षण-साधनाच्या गरजा आणि त्या पुऱ्या पडण्यासाठी न्याय्यरीतीने वसूल करता येणारे उत्पन्न यांच्या एकमेळ विचाराने मुक्रर करावी लागेल.

— अर्थसंकल्प भाष्य १९०३

(७) हे स्पष्टच आहे की, **अज्ञानी आणि अक्षरशत्रू राष्ट्र कसल्याही नव्हेची भरीव प्रगती कधीच करू शकणार नाही** आणि साहजिकच त्याला जीवनाच्या शर्यतीत मागे पडावे लागते.

— अर्थसंकल्प भाष्य १९०३

(८) **अनुत्पादक कर्ज हेच शेवटी खरेखुरे कर्ज ठरत असते.**

— अर्थसंकल्प भाष्य १९०६

(९) विश्वासानेच विश्वास निर्माण होईल आणि लोकांच्या राजनिष्ठेवर धीटपणे विश्वास ठेवण्यानेच राजनिष्ठेला प्रत्यक्ष परिश्रमास प्रवृत्त करता येईल.

— अर्थसंकल्प भाष्य १९०६

(१०) कालानुरूप घडणाऱ्या सामाजिक पलटीचा बुद्धिवादी आगाऊ अंदाज येण्यातच खरी मुत्सद्देगिरी असते.

— अर्थसंकल्प १९०६

(११) कर-आकारणीचे उंची दराने, गरीबवर्गाच्या लोकांची उपासमार आणि हालअपेष्टा गंभीरपणे वाढतात.

— अर्थसंकल्प भाष्य १९०७

(१२) **बहुजन समाजाला शहाणे करून सोडल्याशिवाय, कोणत्याही राष्ट्राचा ऐहिक असा सामाजिक अगर अर्थसंपन्न विकास होणे शक्यच नाही.** बहुजन समाजाचे शिक्षण हाच शेतकी, छोटेखानी उद्योगधंदे, व्यापारउदीम वगैरे राष्ट्रीय उत्पादनाच्या सर्व शाखांतून वाढत्या मिळकतीचे प्रयत्न होणाचा मूलभूत पाया आणि आवश्यक तो पुरोगामी वाटाड्या आहे. परिश्रमाने होणाऱ्या मिळकतीची समान वाटणी जास्तीत जास्त न्यायाने होईल. तर बहुजन समाजाच्या शहाणपणानेच. त्यानेच बुद्धिवादाची सामुदायिक उंची वाढणार आहे आणि परस्परांतील जिव्हाळा वाढावयास व त्यास स्थायीभाव यावयास हमी म्हणून काही असेल तर बहुजन समाजाचे शहाणपणच.

— अर्थसंकल्प भाष्य १९०७

(१३) ज्याची शिकवण तोलामोलाने उंचीची, ज्याचे नाव दूरदूरच्या देशांतून देखील मोठ्या आदरयुक्त भावनेने घेतले जाते. तो इतर सामान्य माणसासारखा रूढींचा गुलाम आणि परिस्थितीचा बंदा असतच नाही.

— अर्थसंकल्प भाष्य १९०९

(१४) सरकारी यंत्रणा केवढी का सामर्थ्यसंपन्न असेना, तिच्याकडून होणाऱ्या जुलूम जबरदस्तीने कोणत्याही राष्ट्राच्या आकांक्षा कधीच दडपल्या जावयाच्या नाहीत, पुढेही कधी दडपल्या जाणार नाहीत.

— अर्थसंकल्प भाष्य १९०९

(१५) लोक प्रगतीच्या बाजूने आपल्या कर्मयोगाचे झुकते माप टाकणाऱ्या महाशयांचीच राज्ययंत्रणेत अतिशय गरज कोणत्याही राष्ट्राला असते. सहानुभूतीचा उबारा, निश्चयाची स्वतंत्र वृत्ती आणि लोकांचे अस्सल आणि उत्तमोत्तम कल्याण करण्यावर भर देणारी भावनिक निष्ठा असणारी मंडळीच राज्ययंत्रणेचे सूत्रधार हवेत.

— अर्थसंकल्प भाष्य १९१२

(१६) **लोककल्याणाचे विश्वासू पहारेकरी म्हणजे वृत्तपत्रे.** दुसऱ्या कोणत्याही तऱ्हेने लोकमतास जबाबदार नसणाऱ्या सरकारास दैनंदिन कारभाराला, दुरून व थोडा दुबळा का असेना, कोणाचा नियंत्रक धाक असेल तर तो वृत्तपत्रसृष्टीचाच !

— सरकारी गुपितांचा कायदा भाष्य १९०३

(१७) कोणत्याही राष्ट्राचे जीवन–मग ते सामाजिक, अथवा राजकीय वा औद्योगिक अगर बौद्धिक, कोणत्या का क्षेत्रातील असेना का ? हे एकजिनसीच असते, असा माझा विश्वास आहे. कोणत्याही एखाद्या क्षेत्रातील डोळ्यात भरण्यासारखी प्रगती व्हावयाची तर सर्व क्षेत्रातील लोकांच्या उत्साहपूर्ण उद्योगास मोकळेपणाने वाव असला पाहिजे.

— भारतीय विद्यापीठांचा कायदा १९०३

(१८) मूलगामी स्वतंत्र संशोधनास उत्तेजन देण्यासाठी उदार हस्ते निधीची तरतूद, उच्च शिक्षणाची योजना, पुरोगामी अभ्यासक्रमास जन्मच्या जन्म वाहून घेणाऱ्या आमच्या अभिजात तरुणांच्या योगक्षेमासाठी भरपूर विद्यावेतनाची पुरेशा प्रमाणात संस्थापना, शिक्षण-खात्यात नोकरीसाठी भरती करण्याच्या पात्रता-सिद्धीची व निवड-कसोटीची अशी सुधारणा की, जिच्यायोगे मिळवता येण्याजोग्या उत्कृष्ट माणसांना आकर्षण वाटावे, आणि घोकंपट्टीलाच केवळ उत्तेजन मिळणार नाही अशा बेताने सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या परीक्षा सहजसाध्य ठेवून शेवटची एकच एक परीक्षा कडक ठेवण्याची दक्षता–अशा या सुधारणा अगदी नजरेसमोर आहेत.

— भारतीय विद्यापीठांचा कायदा १९०३

(१९) परिस्थितिसापेक्ष अडचणी तर मोठ्याच, पण त्यांच्यावर मातच करावयाची झाली तर करता येईल, फक्त उपाय योजून–ते शहाणपणाने निश्चित करून, लोकसहानुभूतीने ते उपाय हाती घेऊन आणि तात्पुरता पराभव किंवा अनुत्तेजना यांना न डरता, ते उपाय धीमेपणाने व खंबीरपणाच्या चिकाटीने चालवून.

— सहकारी पतपेढी-विधेयक भाष्य १९०४

(२०) अशक्याची प्राप्ती व्हावयाचा प्रयत्न शेवटी फक्त दुःखच वाढून ठेवावयाचा.

— हिंदुस्थानसंबंधी इंग्लंडचे कर्तव्य १९०५

(२१) शुद्ध तत्त्वे ही युगानुयुगांच्या संकलित शहाणपणाने व अनुभवाने प्रत्ययास आलेली प्रमेयेच बहुधा असतात; आणि उदात्त भावनांना प्रेरणा देण्यास उच्च ध्येयांचा टिकाव लागण्यास व अंधारलेल्या नि अवघड अवस्था ओलांडून जावयाच्या जीवनपथावर प्रकाशच प्रकाश टाकण्यास, ती (तत्त्वे) अमाप मोलाची ठरतात. तथापि, नुसत्या शुद्ध तत्त्वांचा, अवलंब ज्या परिस्थितीत करावयाचा, त्याच्या संदर्भाचा विचार न होताच, त्यांनी (त्या तत्त्वांनी) आपले मार्गदर्शन होत रहावे, असे कोणत्याच विचारवंताने केव्हाच प्रतिपादिले नाही.

— राजद्रोही सभांचा कायदा भाष्य १९११

(२२) लोकांनी ठेवलेल्या विश्वासावर आणि लोकांच्या आपुलकीवर भर देऊनच राज्यकारभार करावयाचा, अशी सरकारची धोरणधारा आहे व हवीही.

— सार्वजनिक खर्चात वाढ–भाष्य १९११

(२३) सरकार प्रागतिक आहे की नाही, आणि त्याहीपुढे जाऊन, सरकार सातत्याने प्रागतिक आहे की नाही, यासंबंधी माझे चार कस आहेत. बहुजन समाजाच्या नैतिक आणि ऐहिक उन्नतीकरिता ते (सरकार) कोणत्या उपाययोजना करते, हा मी पाहिला कस लावतो. नैतिक व ऐहिक उन्नतीच्या उपाययोजनांत सरकार लोकशिक्षणासाठी काय करते ? आरोग्य, स्वच्छतेसाठी काय करते ? शेतकीविकासासाठी सरकार काय करते ? औद्योगिक विकासासाठी सरकार काय करते ? आणि अशाच दुसऱ्या गोष्टींकडे मी लक्ष पुरवतो. दुसरा माझा कस असा की, नगरपालिका आणि लोकल बोर्डे यांच्यासारख्या स्थानिक स्वराज्यसंस्थांत कारभाराचा अधिकाधिक अखत्यार लोकांना सरकार देते की नाही ? तिसरा कस म्हणजे विधिमंडळात आम्हा लोकप्रतिनिधींच्या आवाजाला म्हणजे कारभाराची धोरणे ठरविताना लोकांच्या बुद्धिवादाला सरकार किंती मानते ? आणि चवथा म्हणजे कारभाराच्या नशीच्या ठिकाणी भारतीयांना कितीसा वाव आहे ?

— सरकारी यंत्रणेत भारतीय १९११

(२४) भारतीय स्त्रियांत उच्च शिक्षणाचा फैलाव होत जाण्याबरोबर, प्रौढ-विवाह अधिकाधिक रूढ होत जातील तसे–आणि प्रौढ-विवाह म्हणजे वधूवरांच्या परस्परसंमतीची स्वयंवरे होत जातील तशी–या गोष्टी व्यक्तिस्वातंत्र्याची प्रतिष्ठा समजून उमजून येऊन होत गेल्यावर आणि शेवटी अगदीच क्षुल्लक नव्हे, तर आमच्यातील नियंत्रक राष्ट्रीयत्वाच्या प्रभावामुळे, निरनिराळ्या पंथांचा आणि वंशांचा जो धीम्या व स्थायी स्वरूपात एकंकार होत जाणार आहे त्यामुळे, माझे असे म्हणणे आहे की, वरील सर्व कारणांनी आपल्याकडे आलेल्या या (कायद्याच्या) मसुद्याप्रमाणे (सिव्हिल मॅरेज बिल) कायदा होऊन तो आपल्या कायदे पुस्तकात स्थान पटकावून बसण्याचा दिवस आता फारसा दूरवर नाही.

—सिव्हिल मॅरेज बिल भाष्य १९१२

(२५) भूतकाळाला परत बोलावता येत नाही. खरोखर भूतकाळ परत फिरतच नाही.

—जिल्हा-सल्लागार मंडळे १९१२

(२६) परिस्थितीच्या आवश्यकतांचे मूल्यमापन करण्यात आणि वस्तुस्थितीच्या निरीक्षणात आम्ही चुकीचे असू किंवा बरोबर असू ! आम्ही

आमच्या बुद्धिप्रकाशाप्रमाणे आमच्या मायभूमीची सेवा करण्याचे व्रत घेतले आहे आणि त्या व्रताच्या अंगीकारापायी होणारे सर्व परिणाम साहण्याची आमची तयारी आहे. आणि जर का सरकारच्या गुप्तहेर खात्याला आमच्या हालचालींची जवळूनच दखल घ्यावयाची असेल तर त्याने ती सर्वथैव घ्यावी; पण या देशाचे शांतिप्रिय नागरिक या नात्याच्या हक्काने, नसता विनाकारण त्रास त्याने (खात्याने) आम्हांस करू नये, असे आमचे म्हणणे आहे.

—पोलिशी कारभार-भाष्य १९१२

(२७) **स्थानिक स्वाज्यसंस्थांच्या यशाची आमची** अस्सल **गुरुकिल्ली अशी आहे की, त्यात (स्थानिक स्वराज्यात) भाग घेणारांना आपल्या अखत्यारीतील क्षेत्राचे प्रत्यक्ष ज्ञान असले पाहिजे** अथवा निदान त्यांनी विनासायास ते ज्ञान मिळण्याची समर्थता तरी दाखविली पाहिजे.

—स्थानिक स्वराज्याची उत्पन्न स्थाने १९१२

(२८) व्यक्तिव्यक्तींची वाढती कार्यक्षमता, सर्वसामान्य समाजाची वाढलेली बौद्धिक उंची, समाजाच्या मोठमोठ्या वर्गांचा बळकटीस आलेला नैतिक पाठकणा—या (समाजधारणेस लागणाऱ्या) गोष्टींपैकी एकही शिक्षण-प्रसारा-शिवाय साध्य होणार नाही.

—प्राथमिक शिक्षण १९१०

(२९) दुसऱ्या आपत्तीही आहेत आणि माझ्या मनाने सर्वांत मोठी आपत्ती म्हणजे आपल्या राजवटीखाली आमच्या वंशाचे सातत्याने चाललेले वामनीकरण, वाढीची खुंट; विश्वासाच्या आणि जबाबदारीच्या सर्व सत्तास्थानां-पासून व प्रतिष्ठा-स्थानांपासून आमची कडेकोट बहिष्कृती आणि तीही आमच्या राष्ट्रीय गुणांचा हटकून दुरुपयोग व्हावा अशा बेताने ! मानव्याच्या इतिहासात कोणीच आजवर केली नव्हती एवढ्या प्रचंड प्रमाणात हीच आमच्या वंशाच्या सर्वनाशास कारणीभूत होत आहे. आणि हाच, मी विचाराचे धाडस करून सांगतो, की हाच आमच्यावर आपण (इंग्रजांनी) केलेला क्रूर व अविचारणीय अन्याय आहे.

—हिंदुस्थानसंबंधी इंग्लंडचे कर्तव्य १९०५

(३०) परिस्थितीची एक फार मोठी गरज, जी मी या विधिमंडळात गेली कित्येक वर्षे फिरून फिरून निदर्शनास आणीत आलो आहे ती ही की, सरकारने आमच्यात अशी भावना निर्माण केली पाहिजे की ते (सरकार) व्यक्ति-विशेषांनी पुष्कळच परकीय असले तरी चैतन्य-भावनांनी ते राष्ट्रीयच आहे आणि

हे त्याला करता येणे फक्त एवढ्याने होईल की, दुसऱ्या देशातील राष्ट्रीय सरकारे आपल्या लोकांसंबंधीच्या ज्या जबाबदाऱ्या अंगावर घेतात, त्याच जबाबदाऱ्या हिंदुस्थानच्या लोकांसंबंधी (ब्रिटिश) सरकारने अंगावर घ्याव्यात.

—प्राथमिक शिक्षण विधेयक १९११

(३१) जिथे कर्तव्याची हाक स्पष्ट असेल, तेथे मुळीच दगदगीत न पडण्यापेक्षा, परिश्रमांती आलेले अपयशसुद्धा फार चांगले.

—प्राथमिक शिक्षण विधेयक:१९११

(३२) मला हे नेहमीच वाटत आले आहे आणि मी ते पुष्कळ वेळा बोलूनही दाखविले आहे की, हिंदुस्थानातील प्रस्तुत पिढीच्या आम्हा मंडळींना आपल्या देशाची सेवा करावयाची आशा, फक्त आपल्या खाऊनच आहे. आपल्या यशोमालिकेने मातृभूमीची सेवा करण्याचे भाग्य लाभणारे स्त्री-पुरुष भविष्यकाळात उदय पावतील. आमच्या पुरोगामी वाटचालीत, आमच्या वाट्याला येईल ते स्थान आम्ही मोठ्या आनंदाने गोड करून घेतले पाहिजे.

—प्राथमिक शिक्षण विधेयक १९११

(३३) जेव्हा माणसांचे घोळकेच्या घोळके एकाकी उसळीने हालू लागतात,—विशेषतः चळवळ, जेव्हा अंधारातून उजेडाकडे, शृंखलाबंधनातून स्वातंत्र्याकडे मोहरा करून चालते, तेव्हा थोडे-फार अतिरेक व्हावयाचेच !—आणि त्यांच्या योगाने आपण आपल्याला अगदीच चिंतातुर जंतु करून सोडू नये.

—वाराणसी काँग्रेस अध्यक्षीय भाषण १९०५

(३४) धुतल्या पाटीवर रेघ ओढण्यासारखे जीवन कधीच नसते. पाटीवर लिहिलेले शब्द जमेस धरून आपणास असे नवे शब्द लिहावयाचे असतात, की ज्यायोगे वाक्ये पुरी व्हावीत आणि एकजिनसी अर्थ निर्माण व्हावा. आहे त्या वस्तुस्थितीवर खूष होऊन राहणे आपल्यापैकी कोणालाच नको आहे, पण नवीन नवीन जबाबदाऱ्या अंगावर टाका अशी मागणी करताना, आहेत त्या जबाबदाऱ्या आपण पेलू शकतो हे दाखवून दिले पाहिजे. मी अनेक वेळा म्हटले आहे व आताही फिरून म्हणतो की, आमच्या लोकांची मोकळेपणाने विकासवृद्धी व्हावयास कसल्याही तऱ्हेच्या मर्यादा, कसल्याही तऱ्हेच्या अडवणुकी मला नको आहेत. आमच्या देशातील लोकांनी, स्त्रियांनी आणि पुरुषांनी, दुसऱ्या देशातील स्त्रियांनी व पुरुषांनी जेवढी उंची गाठली असेल, तेवढी उंची गाठावयास समर्थ झाले पाहिजे, हे मला हवे आहे. पण आपला विकास जबाबदाऱ्या पार पाडल्यानेच होणार आहे.

—सुधारणेसाठी मागण्या : मद्रास काँग्रेस, १९०८

(३५) निःशस्त्र प्रतिकार स्वभावतःच संरक्षणगर्भ असून नैतिक आणि आध्यात्मिक शस्त्रांनी तो झगडत असतो, निःशस्त्र प्रतिकारक हा जुलूमशाहीला स्वतःच्याच शरीराचे हाल करून घेऊन तोंड देत असतो. पाशवी बळाच्या विरुद्ध तो आत्मिक बळाने खंदक लढवितो. माणसातील पशूला माणसातील "दिव्याने" तो खंदक लढवितो. जुलमाशी सहनशक्तीची तो लढत देतो. धटिंगणपणा-विरुद्ध विवेकाला तो लढवतो. अन्यायाविरुद्ध श्रद्धा तो उभी करतो आणि अन्यायाविरुद्ध न्यायाला दोन हात करावयास लावतो.

—**ट्रान्सवाल प्रश्न, लाहोर काँग्रेस १९०९**

(३६) दादाभाई जहाल शब्द वापरून राष्ट्राचे नुकसान करीत आहेत असे म्हणण्यास न कचरणारी मंडळी जी आमच्याच देशबांधवांतील आहेत की, ज्यांनी आपल्या देशाकरिता काही केले नाही किंवा केवळ शून्यप्रायच काही केले आहे, त्यांच्याबद्दल मला खरोखरच काहीही वाटत नाही.

—**दादाभाई नवरोजी–१८९३**

(३७) जगाच्या इतिहासात आणि हिंदुस्थानच्याही असे सुधारक—फार थोर सुधारक–होऊन गेले आहेत की, ज्यांनी सुधारणेचे प्रतिपादन केले आणि सत्यासाठी व विवेकशुद्धीसाठी छळच छळ सोसले. कारण कसल्याही आपदा सोसून ते सत्य जाहीर करावयाची ईश-प्रेरणाच त्यांना ऐकू येत असे. मला वाटते अशी माणसे आपल्याच असलेल्या व्यासपीठावर उभी असतात, की जे मनुष्य उभा राहू शकेल असे उंचच उंच असते. **सत्याचा प्रचार सत्यासाठी म्हणून जी माणसे करतात,** ती जरी विशिष्ट काळी व विशिष्ट जागी लोकांपुढे शब्द उच्चारीत असली तरी ती **सर्व मानवजातीसाठीच आपले जीवन जगत असतात.**

—**महादेव गोविंद रानडे १९०३**

(३८) एका प्राचीन मानववंशाचा दुसऱ्याशी संपर्क आला; थोडीशी ऐहिक-भोगी संस्कृती असलेल्या पण अधिक नेटक्या, आणि आपण जर सर्वस्वी रसातळाला जावयाचे नसेल अथवा आपल्यावर कुरघोडी करून घ्यावयाची नसेल तर, आपणाला आपल्यावर परिणाम करणाऱ्या नव्या वंजनदारीतील जे जे काही उदात्त व नेटके असेल ते आपल्यात सामावून घेणेच आले ! मात्र त्याच वेळी आपल्या परंपरेतील जे जे काही भव्य आणि भले असेल त्याचा त्याचा सांभाळ करूनच हे केले पाहिजे.

—**महादेव गोविंद रानडे १९०३**

(३९) गंभीर अशा आणीबाणीच्या प्रसंगी खटकातोड बोलणे कर्तव्यच होऊन बसते, मग त्याबद्दल केवढा का गैरसमज होईना.

—**महादेव गोविंद रानडे १९०१**

(४०) राष्ट्रीय जीवन पूर्णतेस जावयाचे तर बहुरंगी असलेच पाहिजे. आणि **भारताच्या नावाला जो मनुष्य प्रतिष्ठा आणतो, मग ते कोणत्याही कार्यक्षेत्रात असेना का, तो आपले राष्ट्रकार्यच उंचावत असतो** म्हणून त्याचा गुणगौरव राष्ट्रीय विचारकारणांनीच आपल्याकडून व्हावयास हवा.

—डब्ल्यू. सी. बानर्जी १९०६

(४१) ज्यांच्याकडे अर्ज करावयाचा ते त्या अर्जाकडे ढुंकूनही बघणार नसले, तर तो अर्ज करण्यात अर्थ काय ?

—मुंबई जमीन महसूल विधेयक १९०१

(४२) आताच्या क्षणी या देशाची अत्यंत मोठी गरज जर कोणती असेल, तर आमच्या सुशिक्षित तरुणांनी स्वार्थत्यागाचे चैतन्य दाखविण्याची आणि त्यांनी माझ्या शब्दावर विसंबून राहावे की या असुखी, पतित जातीची नैतिक आणि बौद्धिक पातळी वाढविण्यापेक्षा, त्यांचा सर्वसामान्य कल्याणकार्याला चालना देण्याच्या कार्याइतके त्यांना आपले जीवन व्यतीत करावयास दुसरे उत्तम कार्य नाही.

—अस्पृश्य १९०३

(४३) तुमच्या स्वतांच्या देशाच्या नियंत्रक–सत्तेत तुमच्या स्वतःच्या कामकाजाच्या कारभारात, तुमच्या स्वतःच्या करवसुलीच्या खर्चवेचात जोपर्यंत अधिक परिणामकारक व अधिक सत्त्वगर्भ आवाज तुम्हांला उठविता येत नाही, तोपर्यंत औद्योगिक विकासाच्या मार्गाने तुम्हांला काही फारसे साधता येणार नाही अशी माझी खात्री होऊन चुकली आहे.

—आपली राजकीय अवस्था १९०४

(४४) कित्येक बाबतीत परिस्थिती अशी आहे की, देशावर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाला तिच्याबद्दल खोलवर समाधानच वाटावे. पूर्वेस नव्या शतकाने प्रारंभ तर चांगलाच केला आहे. आपण आपल्या डोळ्यांसमोर एक भले नाटक रंगलेले पाहिले की, ज्याचा परिणाम पूर्व व पश्चिम यांच्यामधील संबंधावर त्याचे धीरगंभीर परिणाम होत आहेत. आपल्या भोवतालचे वायुमंडळच नव्या विचारधारांनी दुमदुमून राहिले आहे. सामर्थ्याची एक नवी जाणीव आपल्यात उसळत असून– जीवनाचा एक नवीनच अर्थ आपल्या मनी घर करीत आहे. लॉर्ड कर्झन यांची जुलमी कृत्ये एक गुप्त वरदानच ठरली आहेत. सर्व देशभर स्वदेशीची भावना झपाट्याने वाढ धरीत आहे—आणि स्वदेशी व्रतधर्म म्हणजे मायभूमीवरील कळकळीची, भावपूर्ण सर्वसंकर्षक प्रीती. त्या स्वदेशीच्या भावनेने प्रत्येक हिंदी अंतःकरणास स्वानंदाचे व स्वाभिमानाचे तेज चढले पाहिजे. एकंदरीने विचार

करता, नव्या उषःकालाचे पहिले फिकट किरण आपणास दिसू लागले आहेत असे दिसते. ईश्वरी सत्तेने काळाच्या ओघात त्यांचा परिपूर्ण दिवस होईल.

—आपल्यापुढील कार्य १९०७

(४५) **जगाच्या मोठ्या राष्ट्रांत हिंदुस्थानने आपले प्रतिष्ठेचे स्थान संपादावे 'असे' मला पाहिजे आहे**— राजकीय दृष्ट्या, औद्योगिक दृष्ट्या, धर्मात, साहित्यात, शास्त्रात आणि कलाकुसरीत ! मला हे सर्व हवे आहे. शास्त्रसिद्धान्ताने काय परिपूर्ण आहे असा येथे प्रश्न नसून व्यवहारतः काय शक्य आहे असा हा प्रश्न आहे. ही स्वप्नरंजनाची समस्या नसून, स्नायूंच्या आणि शीलाच्या, कुवतीच्या आणि संघटनेच्या, त्याचप्रमाणे त्यागाच्या तयारीचा हा प्रश्न आहे. कानडातील फ्रेंच आणि दक्षिण आफ्रिकेतील बोअर यांच्या प्रकरणावरून स्वाभिमानी हिंदुस्थानाला साम्राज्यात स्थान आहे याचा प्रत्यय आला आहे.

— आपल्यापुढील कार्य १९०७

(४६) बंड, परकीय आक्रमणास सहाय्य वा उचल आणि गुन्हेगारीची साधना, या तीन गोष्टी वगळून अनमानधपक्याने बोलावयाचे तर सर्व काही सनदशीरच आहे. प्रत्येक सनदशीर म्हटलेली गोष्ट शहाणपणाची वा सर्वोत्कृष्ट असेलच असे निःसंशय म्हणता यावयाचे नाही. पण तो भागच निराळा ! न्यायबुद्धीस आवाहन आणि प्रार्थना ही एक बाजू. आपले दुःख वा अन्याय दूर होईपर्यंत कर न भरण्याच्या जहाल उपायासुद्धा निःशस्त्र प्रतिकार ही दुसरी बाजू. या दृष्टीनी विचार करता कोणास काही आपापल्या पद्धतीने म्हणावयाचे असले तरी देशात प्रस्तुत जे चालू आहे ते सर्व सनदशीरच आहे.

— आपल्यापुढील कार्य १९०७

(४७) प्रत्येक गोष्टीस काळवेळ व भरती–आहोटी असतेच. राजकीय हक्क हे नुसते मागून मिळत नसतात. दुसऱ्या देशात लांबच लांब काळपर्यंत चाललेल्या चळवळींनी त्यांची किंमत मोजावी लागलेली आहे.

— आपल्यापुढील कार्य १९०७

(४८) जो जो कोणी देशात एकी साधीत राहील, जो जो स्वदेशीचा प्रसार करील, जो जो स्वार्थत्यागाचे धडे देत राहील, जो जो राष्ट्राचे सामर्थ्य कोणत्याही रूपाने वा आकाराने वाढवीत राहील— मग ते राजकीय, सामाजिक, औद्योगिक, नैतिक (कोणत्याही क्षेत्रातील का असेना)— तो तो आपला सहकारी कार्यकर्ता आहे, बंधू आहे.

— आपल्यापुढील कार्य १९०७

(४९) **राष्ट्राची बांधणी ही कोठेच हातचा मळ नसते.**

(५०) सभ्यहो, रानड्यांनी एकदा सांगितल्याप्रमाणे एखाद्या देशाचे दुसऱ्या देशावरील औद्योगिक आधिपत्य राजकीय आधिपत्याइतके लोकवेध करीत नाही. औद्योगिक आधिपत्य कमी नजरेत भरते आणि अधिक कुरतड्या पद्धतीने आपले कार्य साधीत असते. एका राष्ट्राचे दुसऱ्या राष्ट्रावरील औद्योगिक आक्रमण आकर्षक दिमाखाने येते आणि ते जर दैनंदिन जीवनाच्या वस्तूबाबत होत असेल तर, त्याच्या मोहाला तुम्ही बळी पडून, नकळत का होईना, तुम्ही त्याचे स्वागतच करता आणि ही आपत्ति विशिष्ट मार्यादेपलीकडे गेली, म्हणजेच तुमचे लक्ष तिच्याकडे लागते. हेच नेमके हिंदुस्थानच्या प्रकरणी घडले आहे.

—स्वदेशी चळवळ १९०७

(५१) **आजचे विद्यार्थी हे उद्याचे नागरिक आहेत. हे एक कालपरिपक्व सत्य आहे.** म्हणूनच त्यांच्या मनाला निश्चित वळण लावणाऱ्या कल्पना आणि आकांक्षा या देशाच्या दृष्टीने अथांग महत्त्वाच्या गोष्टी होऊन बसतात; आणि त्यांच्यावर ओघाओघाने ज्या जबाबदाऱ्या येणाऱ्या आहेत त्यासाठी त्यांची तयारी करावयास त्यांचे (कल्पना–आकांक्षा) गुणोत्तर कितपत येईल याची गंभीरपणे चिकित्सा करणे हे आपणास शोभूनच दिसेल.

—विद्यार्थी व राजकारण १९०९

(५२) स्वयंशासित लोकांत राजकारणाने देशाभिमानाची भावना व्यवहारी होऊ लागते, एवढेच नव्हे, तर जबाबदारीचीही जाणीव होऊ लागते.

—विद्यार्थी व राजकारण १९०९

(५३) सार्वजनिक जीवनाचे अध्यात्मीकरण झाले पाहिजे. देशप्रेमाने अंतःकरण असे व्यापले पाहिजे की, त्याच्या तोलाने, बाकी सर्व काही बिगर महत्त्वाचेच वाटावे. मायभूमीसाठी त्याग करण्याची संधी आली रे आली की, आनंदाची उकळी फुटणारा उत्साहपूर्ण देशाभिमान, अडचणीने वा आपत्तीने आपल्या ध्येयापासून चुकूनही च्युत न होणारे निर्भय अंतःकरण, कशानेही विचलित न होणारी भाग्य-भगवतीच्या धारणेवरील निष्ठा यांनी (गुणांनी) सज्ज अशा कार्यकर्त्याने आपल्या जीवनकार्याचा श्रीगणेशा केला पाहिजे व मायभूमीच्या सेवेपायी आत्मार्पण करण्याने होणाऱ्या आनंदासाठी आदराने आतुर राहिले पाहिजे.

(५४) माझ्या देशबांधवांच्या महत्त्वाकांक्षांना मी मर्यादाच मानीत नाही.

(५५) थंड्या फराळापेक्षा अर्धी भाकर बरी.

(५६) इतर देशांतील लोक आपापल्या देशांत जसे असतात, तसेच भारतीयांनी आपल्या आवाक्याची सर्वश्रेष्ठ उंची गाठावी आणि आपल्या देशात नांदावे.

(५७) जे काही करावयाचे असेल ते पूर्णत्वाने करा. तुम्ही गाढवच व्हायचे ठरवलेत तरी पहिल्या दर्जाचा गद्धा होण्यावर लक्ष असू दे.

(५८) **माझ्या मायभूसंबंधात माझ्या आकांक्षांना मी मर्यादाच मानीत नाही. दुसरे लोक स्वतःच्या देशात जसे असतात तसे आपले लोकही आपल्या देशात असले पाहिजेत, हें मला हवे आहे.** जातपात वा नेमधर्म यांचा विचारच न करता, आमचे पुरुष व आमच्या स्त्रिया आपापल्यापरी परिपूर्ण वाढल्या पाहिजेत. त्यांची खुंट होता कामा नये की, अनैतिक बंधनांनी त्यांचा बीमोड होता कामा नये. राजकीय, औद्योगिक, धार्मिक, वाङ्मयविषयक, शास्त्रीय आणि कलाविषयक बाबतीत जगातील मोठमोठ्या राष्ट्रांच्या मालिकेत भारताने आपली योग्य जागा पटकवावी असे मला वाटते.

(५९) सामाजिक स्नेहसंबंधाचा आत्मा परस्परगुणग्राहकता आणि आदर हा आहे. तो सर्वसामान्यपणे असमानतेच्या जाणीवेशी सहजीवन काढताना आढळणारा नव्हे.

(६०) आपला कर्मयोग ही देशाची सेवा आहे. छे, छे, ती मानवतेची सेवा आहे.

(६१) नाकारलेला न्याय असो अगर लादलेला अन्याय असो, लक्षात ठेवा की, तुम्ही जो शीलवंतपणा प्रगट कराल, त्याच्यावरच तो मुद्दा मोठ्या प्रमाणात धर धरणार आहे.

(६२) मानवाचे हृदय ज्यामुळे उचंबळून येते अशा सर्व कल्पनांत स्वदेशी ही सर्वांत भव्य व उदात्त कल्पना आहे. स्वदेशी या शब्दात आमच्या मातृभूमीचे प्रियतम मातृमंदिर साकार झाले आहे. स्वदेशी या मंत्राचा प्रभाव इतका जबरदस्त आहे, त्याचा नाद इतका वेडावणारा आहे की, त्याबद्दल मनात यत्किंचितही विचार आला तरी सर्व शरीर रोमांचित होते. त्याचा प्रत्यक्ष स्पर्श तर अहंकाराचा अस्त करतो व भक्तीने भारावून टाकतो. आपल्या देशातील उच्चनीच प्रत्येक व्यक्तीस, रावास व रंकास, राजपुत्रास व शेतकऱ्यास, शहरवासीयास व खेडुतास हा मंत्र शिकविला पाहिजे व त्यायोगे मातृभूमीच्या सेवाभावात प्रत्येकास रंगवून टाकले पाहिजे.

— वाराणसी काँग्रेस १९०५

* * *

३५ : ना. गोखले यांची कर्तृत्वप्रतिष्ठा

ना. गोपाळ कृष्ण गोखले यांचे आतापर्यंत अनेकांगांनी दर्शन घेतल्यावर, त्यांची कर्तृत्वप्रतिष्ठा मूर्तिमंत होते ती अशी :

प्रत्येक व्यक्ती जीवनाच्या प्रारंभी परिस्थितीचा परिपाक असते तर तीच स्वतःच्या कर्तबगारीने परिस्थितीला असे वळण लावते की, तिच्यावर त्या व्यक्तीचा छाप उमटून जातो. अशा असामान्य व्यक्तींपैकीच नामदार गोपाळ कृष्ण गोखले हे एक होत.

कोतळूक येथे १८६६ त गरीब माता-पितरांच्या पोटी जन्माला आलेल्या गोपाळ कृष्णांना लहानपणीच आपल्या वडिलांना मुकावे लागले. दरमहा अवघे पंधरा रुपये पगार मिळविणाऱ्या त्यांच्या वडील भावावर मग साहजिकच गोपाळ-मधील पुरुषार्थाला वळण लावण्याची जबाबदारी पत्करावी लागली. त्यासाठी गोविंदरावांना कमालीचा त्याग करावा लागला. गोपाळचे शिक्षण कोल्हापूर, पुणे व मुंबई येथे झाले. आपल्या स्मरणशक्तीची कमालीने वाढ करीत राहण्या-पलीकडे गोपाळच्या कॉलेज-शिक्षणासंबंधी विशेष सांगण्यासारखे नाही. ती स्मरण-शक्ती हीच गोपाळराव गोखल्यांची शेवटपर्यंत असामान्य शक्ती होती– ठरली. शिक्षणसमाप्तीनंतर गोपाळने इंजिनियर होण्याची व मुलकी सनदी नोकर होण्याचीही धडपड केली. पण शेवटी टिळक-आगरकरांसारख्या देशभक्तांच्या उदाहरणाने स्फूर्ती घेऊन न्यायमूर्ती रानड्यांनी महाराष्ट्रात सुरू केलेल्या लोक-शिक्षणाच्या नवोत्थानाचे आकर्षण गोखल्यांना अनिवार्य झाले. म्हणून डेक्कन एज्युकेशन सोसायटीत ते लाइफ-मेंबर म्हणून आले. अशा तऱ्हेने स्वार्थत्याग व कर्तव्यनिष्ठा यांची बिरुदावली अंगीकारून गोखले नव्या पिढीच्या शिक्षणाला लागले. बंधूंनी आपल्यासाठी त्याग केला तर आपण आपल्या देशबांधवांसाठी त्याग करावा; कुटुंबाची उपासमार होऊन आपले शिक्षण झाले तर त्याची शेकडो पटीने फेड आपण आपल्या गरीब देशबांधवांना द्यावी अशाच जणू विचार-सरणीने शिक्षण–पेशात असलेल्या आपल्या तारुण्याचा उपयोग गोखल्यांनी विद्यार्थी-बुद्धीने असा केला की, त्यांच्यातील मुत्सद्दी जागा झाला व सन १९०५ साली त्यांनी भारत-सेवक-समाजाची स्थापना केली. त्या भारत-सेवक-समाजा-

मार्फत सामाजिक व राजकीय मिशनऱ्यांची एक फळीच्या फळी निर्माण होऊन भारताची सेवा शास्त्रशुद्ध, अभ्यस्त व व्यवहारवादी मूळ धरून भरीवपणे करावयास सिद्ध झाली. त्यामुळेंच भारतात गोपाळ कृष्ण गोखल्यांचे नाव राजकारणी अगर मुत्सद्दी म्हणून जेवढे घेतले जाते त्यापेक्षाही सर्वस्वी आपल्या देशबांधवांच्या एकमेव कल्याणाकरिताच हाती-तोंडी गाठ घालून काढलेले सत्त्वशील जीवन हे अगदी राजकीय क्षेत्रातसुद्धा दुसऱ्या कसल्याही तऱ्हेच्या जिवनापेक्षा श्रेष्ठतर होय, या सिद्धान्ताचे मूर्तिमंत उदाहरण म्हणूनच गोखल्यांच्या नावाची मातब्बरी भारतीय मानीत आले आहेत.

आपल्या कोणत्याही समकालीनांपेक्षा गोपाळ कृष्णांनी राजकारण आणि मुत्सद्देगिरी या क्षेत्रात अधिक नाव केले आहे. याबाबत न्यायमूर्ती रानड्यांशी त्यांचा जो संबंध सार्वजनिक सभेचा व डेक्कन सभेचा सेक्रेटरी म्हणून आला त्याला एवढी भरघोस फळे आली की, उभयतांच्या संगतीची तुलना फक्त सूर्यकिरण व कमल, जनार्दन स्वामी व एकनाथ अगर रामकृष्ण परमहंस व विवेकानंद अशा जोडींनीच होणारी आहे. हाती घेतलेल्या विषयाचे तपशील आणि आकडेवारी आत्मसात करण्यात गोखल्यांचा उत्साह अतुल बनल्यामुळे प्रतिपक्षीयांवर मात करण्याचा आवाका त्यांना आला. आपल्या अभ्यस्त मताचा आविष्कार कसा जबाबदारीने करावा याचेही वळण गोखल्यांना सार्वजनिक सभेचे त्रैमासिक व आगरकरांच्या 'सुधारका'ची इंग्रजी बाजू संपादिताना साध्य करता आले. त्यामुळे जबाबदारी ओळखून रेशमी हातमोजे चढविलेल्या पोलादी मनगटांनी पुढे उभे ठाकलेल्या सामर्थ्यवंताशी दोन हात कसे करावे याची विद्या गोखल्यांना साध्य झाली. परतंत्र राष्ट्राला आपल्या डोक्यावर बसलेल्या शाही शक्तीशी पुष्कळशा बहुविध क्षेत्रांत सातत्याने सामना द्यावा लागतो. जेथे जेथे व जेव्हा जेव्हा शक्य होईल तेथे तेथे व तेव्हा तेव्हा आपल्या अभ्यासू, धीरगंभीर व धिम्या धिटाईच्या सुपुत्रांकडून व सुकन्यांकडून तो सामना ते राष्ट्र देत असते. सुधारलेल्या जगात इंग्लंड हे पहिल्या प्रतीचे राष्ट्र मानले जाई. आणि राजाकडून प्रजेचे हक्क सनदशीर रीतीने प्रस्थापित करण्याबद्दल त्या राष्ट्राचा लौकिक अलौकिक! त्यामुळेच १८५७ च्या उठावानंतर तरी सामाजिक, राजकीय अगर आर्थिक क्षेत्रात भारतीय लोकांनी मागितलेल्या हक्कांना नकार दाखविणे इंग्लंडला थोडे कठीणच होते. हिंदुस्थानावरील इंग्रजशाहीला ज्यांनी सनदशीर सामना मांडला त्यांचे दोन तळ होते. एक तळ सार्वजनिक सभांमधून सामना देई. दुसरा विधिमंडळातून अमलात असलेल्या कायदेकानूंच्या चौकड्यात राहूनच. दोन्हीही तळ आपले पाणी चाखवीत. राज्यकर्त्यांच्या दृष्टीने कायद्याच्या काटेकोरपणाला एखाद्या वेळी थोडासा बाध आला तरी लोकांचे हक्क प्रस्थापित करण्यासाठी त्या गोष्टीची परवा न करणारा असा एक सनदशीर समूह होता. त्याला जहाल हे नाव होते. लोकांच्या

हक्क–जपणीच्या बाबत तितकीच न्यायनिष्ठुर चिकाटी धरणारा पण कायद्याच्या काटेकोरपणात दक्षतेने सांभाळणारा दुसरा समूह होता त्याला नेमस्त म्हणत.

वयांत येईपर्यंत भारताची काँग्रेस नेमस्त संस्था म्हणूनच प्रगतीची पावले टाकीत होती. त्यानंतर तिला जहाल संस्थेचे रूप आले. तथापि, १९२० पर्यंत नेमस्त विचारसरणीचा प्रभाव तीमध्यें दृग्गोचर होतच होता. १९१५ पर्यंत म्हणजे आपल्या मृत्युशय्येपर्यंत सतत १५ वर्षे विधिमंडळातील आपल्या बैठकीवरून ब्रिटिशशाहीशी चकमक करून आपल्या अभ्यासू मांडणीने भारतीय प्रश्न जगाच्या चव्हाट्यावर मांडणारा एकमेव पुढारी म्हणून ना. गोपाळ कृष्ण गोखल्यांइतके दुसऱ्या कोणाही पुढाऱ्याचे नाव ठामपणे घेणे कठीण आहे. गोखल्यांचे राजकीय गुरू न्यायमूर्ती रानडे म्हणत त्याप्रमाणे गोखल्यांचा नेमस्तपणा म्हणजे वंशीय, पंथीय, जातीय, रागलोभापासून सर्वस्वी अलिप्त आणि माणसां–माणसांच्या परस्पर व्यवहारांत न्याय आणि न्यायच व्हावा म्हणून प्रयत्नांची पराकाष्ठा करणारी धिमी निष्ठा होय. त्या निष्ठेमुळें ज्या कायद्याची अंमलबजावणी करणे राज्यकर्त्यांचे कर्तव्य आहे त्या कायद्याच्या पालनाबाबत राज्यकर्त्यांना प्रामाणिक सहकारही मिळेल, पण त्याच वेळी त्या कायद्याने प्रजाजनाला जे हक्क दिले असतील त्याचा उपभोग प्रजाजनाला बरोबर घेता आला पाहिजे, ही दक्षताहि त्या सहकाराची सहचरी राहील. अशक्य-प्राय गोष्टीच्या पाठीमागें व्यर्थ उड्या मारीत रहाण्यापेक्षां अथवा "प्रांशुलभ्ये फले मोहादुद्बाहुरिव वामनः।" होण्यापेक्षा सहजसाध्य प्रगतीचे एकेक पाऊल दिवसानुदिवस पुढे पुढे टाकीत, हाताशी असलेले कर्तव्य समन्वयबुद्धीनें आणि न्यायप्रवृत्त करीत रहावयाचे हा नेमस्तपणाचा कटाक्ष असतो. नेमस्तपणाचा हा दंडक गोपाळ कृष्ण गोखल्यांनी निष्ठावंतपणें व परिणामकारक रीत्या आपल्या "मुहुर्तं ज्वलितं श्रेयः।" अशा सार्वजनिक जिवनांत व्रत म्हणून कशोसीने पाळला.

डेक्कन सभेच्या वतीने १८९७ सालीं वेल्बी-कमिशनपुढें साक्ष देण्यासाठी गोखल्यांना इंग्लंडास पाठविण्यात आले होते. भारतीय लष्करी खर्चाच्या वाढीचा प्रश्न प्रमुख होता. गोखल्यांनी तो नाव घेण्यासारख्या चतुराईने हाताळला. १९०१ साली ते विधिमंडळाचे सभासद झाले. तेथे आपल्या वास्तववादी वाद-पटुत्वाने गोखल्यांनी अशी छाप पाडली की, दोन वर्षांतच सहकाऱ्यांनी त्यांची निवड भारताच्या वरिष्ठ विधिमंडळावर (साम्राज्य–कौन्सिल) केली. त्या व्हाइसरॉयच्या कौन्सिलमध्येंच गोखल्यांचे जणू जीवन-कार्य होते. तेथील एक तपाच्यावर झालेल्या गोखल्यांच्या कामगिरीत तात्काल करावयाच्या पुष्कळच कारभार-दुरुस्त्या साधता आल्या. गोखल्यांच्या पहिल्याच अर्थसंकल्पीय भाषणाने हिंदुस्थानला कर-आकारणी हलकी झाली. लॉर्ड कर्झनसारखा अरेराव सत्ताधारी

असता भारतीय पुढाऱ्यांच्या टीकांकडे होत असे तो बहिऱ्या कानाचा मामला गोखल्यांच्या पहिल्याच वर्षाच्या संसदीय कामगिरीने संपुष्टात आणला. आपल्या बाजूने एकही मत नाही, आपल्या अक्कलहुषारीशिवाय आपला पाठीराखा कोणी नाही अशा स्थितीत गोखले आपल्या तर्कवादाने, वास्तविक माहितीगिरीने, आपल्या अंकशास्त्राने आणि या सर्वांपेक्षांही आपल्या साधेपणाने, सच्चेपणाने परकीय शाही-शासनाशी असा चतुरस्र सामना देत होते, की एका तपाच्या अवधीत त्या शाही-शासनाला भारतीय अर्थव्यवस्थेचे धोरण गोखल्यांच्या टीका-सूचनांशी जुळते करून व्यावे लागले. गोखल्यांनी त्या परकीय शाही-शासनावर ठसंविलेच ठसविले की, आपल्या भोवतालचे जग समजून वाचावयास जोपर्यंत बहुजन-समाजाला येत नाही तोपर्यंत राजकीय दिमाखाचे सारे नाटक व्यर्थ व्यर्थ व्यर्थच ठरेल.

भारतीयांच्या सनदशीर राजकीय प्रगतीला गोखल्यांचे श्रम कारणीभूत झाल्याचा दाखला विसाव्या शतकाचे पहिले दशक तरी देईल. १९०५ मध्ये वाराणसी येथे झालेल्या काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून गोखल्यांनी जगाच्या निदर्शनास हिंदुस्थानवर ब्रिटिश केवढी जुलुमशाही गाजवितात ते स्पष्ट आणून दिले. लोकांचे हार्दिक सहकार्य मिळावे म्हणून बिलकूल प्रयत्न न करण्याचा जो हट्ट ब्रिटिश सरकार चालविते आणि प्रत्येक बाबतीत हिंदुस्थानच्या लोकांबद्दल अविश्वास प्रकट करते त्या वृत्तीमुळेच भारतीय असंतोष पेट घेतो ते इंग्लंडच्या लोकांस पटविण्याचे आणि भारतीय आशा-आकांक्षा, गरजांचे खरे स्वरूप हिंदुस्थानचे सेक्रेटरी ऑफ स्टेट असलेले लॉर्ड मोर्ले यांच्या गळी उतरविण्याचे कार्य गोखल्यांनी इतक्या सफाईने केले की, बहिष्काराच्या चळवळीबाबत आपला भारतीय जहालांशी झालेला मतभेद व परिणामतः सुरतेची भंगलेली काँग्रेस यांचा काही परिणाम गोखल्यांनी आपल्या देशसेवा-बुद्धीवर होऊ दिला नव्हता. " माझ्या देशबांधवांच्या आकांक्षांना मी मर्यादाच मानीत नाही " असा निर्वाळा कळकळीचा राजकारणी म्हणून गोखले जसा ठामपणे देत तसाच व्यवहारचतुर मुत्सद्दी म्हणून धोरणाचा आराखडा असा आखीत की, शक्य तेथे सहकार व जरूर तेथे विरोध ! त्याच धोरणाने त्यांनी इतिहास-प्रसिद्ध मोर्ले-मिन्टो सुधारणा हिंदुस्थानात आणल्या. १९१४ च्या ऑगस्टमध्ये लोकमान्य टिळकांनी अभिप्राय दिल्याप्रमाणे देशाच्या प्रगतीचा एक टप्पा म्हणजे या सुधारणा होत. तथापि, याच सुधारणांखाली १९१० च्या प्रेस-ॲक्टला नाइलाजाने संमती देण्याचा प्रसंग गोखल्यांच्यावर आला होता हे विसरून चालणार नाही.

गोपाळ कृष्ण गोखल्यांनी सदर मोर्ले-मिंटो सुधारणांचा जास्तीत जास्त उपयोग आपल्या देशबांधवांसाठी करून घेतला. आणि जगाला दाखविले की,

कायदेमंडळाच्या चिमुकल्या रणक्षेत्रांतही कारभारकुशलतेतील अनिष्टांशी यशस्वीपणे झगडा करून त्यांवर मात करता येते. गोखले शक्य तेथे सहकार करणारे असल्यामुळे त्यांच्या देशबांधवांकडून अज्ञानाने किंवा जाणकारी विपर्यासाने त्यांच्यावर प्रखर टीका झाल्याशिवाय राहिली नाही. आणि सरकारही त्यांना राजद्रोही समजत नसे असे थोडेच आहे? (मोर्ले यांच्या आठवणी पहा) आणि अशा चोहोबाजूंनी पेटलेल्या अवस्थेतही गोपाल कृष्ण गोखले आपल्या सत्त्वशुद्ध वाटचालीपासून किंचीतही डगमगले नाहीत.

हिंदुस्थानात आणि हिंदुस्थानसाठी गोखले जसे झटत होते तसेच इतर देशांत राहणाऱ्या भारतीयांच्या सेवेसाठी ते झटत होते. दक्षिण आफ्रिकेत भारतीयांना स्वाभिमानाने रहता यावे म्हणून महात्मा गांधी हे जे प्रयत्न करीत होते त्यांना गोखल्यांनी जीवेभावे मदत केली. तिजवरून त्यांचा दृष्टिकोन जसा समजून येतो तसाच भारतीयांच्या स्वातंत्र्योत्थानात त्यांची सेवा नेमकी कोठे रुजू आहे हेही स्पष्ट होते. राजकारणाला कधीकाळी अध्यात्माची जोड मिळावयाची असली तर ती फक्त महात्मा गांधींसारख्या महाभागाच्या हातूनच मिळेल, एवढेच नाही, तर जगात शांतियुग प्रस्थापित व्हावयाच्या राजकाणांतीलच भारताची स्वातंत्र्यप्राप्ती हे एक महत्त्वाचे प्रकरण आहे. या गोष्टी गोखल्यांनी जागतिक विचारवंतांच्या मेदूंवर चमकाविल्या. भारताच्या सनदशीर राजकारणी स्वातंत्र्याचा पाया गोखले असा भरीत होते असा निर्णय इतिहास देईल.

हिंदुस्थानच्या नेमस्त राजकारणात न्यायमूर्ती रानड्यांच्यानंतर गोखल्यांनाच मोजावे लागते. परंतु गोखल्यांचा खरा मोठेपणा त्यांच्या महात्मा गांधींनासुद्धा गंगेसारखा पवित्र वाटलेल्या विचारसरणीत आहे. महात्माजी गोखल्यांना आपले राजकीय गुरू मानीत. आणि नामदार श्रीनिवासशास्त्री गोखल्यांना आपले राजकारणी मार्गदर्शक मानीत. या गोष्टीचे कोणाला कल्पना नसेल एवढे महत्त्व हिंदुस्थानच्या इतिहासात आहे. गोपाळ कृष्ण गोखले यांनी १९ फेब्रुवारी १९१५ रोजी इहलोकचा निरोप घेतला. ऐन उमेदीतच ते वारले. कारण त्यांचे आयुष्यच कष्टासायासात गेले. त्यांनी कष्टासायासात आयुष्य काढले. कारण देशाची सेवा करताना अंगचोरपणा म्हणून कसा तो करावयाचा नाही असे त्यांचे व्रत होते. असे अल्पायू मरण म्हणजे रणवीराचे रणांगणावरील मरण किंवा एखाद्या तत्त्वज्ञाचे तत्त्वनिष्ठेसाठी मरणच होय. अभ्यासयुक्त पद्धतशीर अशी कर्तव्यनिष्ठा, साधीच साधी रहाणी, राजकारण व देशाभिमान यांना अध्यात्माची जोड, आपल्या देशबांधवांच्या आकांक्षांना मर्यादाच न मानण्याची विशालता, त्याबरोबर भारतात आणि भारताबाहेर आपल्या देशवांधवांचे निश्चितपणें प्रगति-पथावरील उन्नत पाऊल पडत राहावे अशी दक्षता, अशा कर्मयोगाची पूजा भारताच्या स्वातंत्र्याराधनेसाठी गोपाळ कृष्ण गोखले यांनी केली.

शब्दाने चूक करावयाची नाही, रंगसफेतीने वा शिष्टाचाराच्या अवडंबराने सत्य लपवावयाचे नाही, सरळ कामाला सरळ सरळ हात घालावयाचा हा गोखल्यांचा स्वभावविशेष असल्याचे ता. २९ एप्रिल १८९३ च्या 'फोएनिक्स' या वृत्तपत्राने नमूद केले आहे. निःस्वार्थी वृत्ती, विचार-आचारांच्या शुचिपणाने राजकारणाची हाताळणी, तपशिलांच्याबाबत तडजोडीच्या वृत्तीबरोबरच अभंग तत्त्वनिष्ठा, कर्तृत्वाच्या चढत्या-वाढत्या पदवीबरोबरच पराकाष्ठेची प्रसिद्धी-पराङ्मुखता, सार्वजनिक कार्यकर्त्यांबद्दलचा जिव्हाळा, जेव्हा आणि जर झालीच असली, लक्षांत आली वा आणून दिली तर व तेव्हाच चूक कबूल करण्याचा दिलदारपणा, इत्यादी गोपाळ कृष्ण गोखले यांचे गुण असे आहेत, की जे स्वतंत्र भारताच्या फेररचनेच्या काळात व पुढेही भारतीयांना उपयुक्त ठरतील.

✕ ✕ ✕

३६ : ना. गोपाळराव गोखले यांस अभिवादन

राष्ट्रीय उन्नतीच्या शिखरावर आज आपण जेथवर चढलो आहोत तेथपर्यंतच आपण आक्रमण केलेला मार्ग अत्यंत खडतर होता. ब्रिटिश सत्तेच्या बाह्य भपक्याखाली आणि सुखसोयीखाली देशाचा नैतिक आणि भौतिक अधःपात जोराने सुरू झाला ही गोष्ट प्रथम महर्षी दादाभाई नौरोजी यांच्या लक्षात येऊन त्यांनी ती राज्यकर्त्यांस समजावून देण्याचा प्रयत्न केला, हिंदी बहुजन समाजांतही तशीच जागृती झाली पाहिजे ही गोष्ट लोकमान्य टिळकांनी ओळखून तो प्रयत्न केला. हे दोन्ही मार्ग अन्योन्याश्रित असले तरच यशस्वी होणार हे आमच्या पुढाऱ्यांपैकी ज्यांनी ओळखले होते त्यांपैकी नामदार गोपाळ कृष्ण गोखले हे एक अग्रेसर होते. त्यांनी म्हटलचे होते की :

" लोकांत करण्यात येणाऱ्या राजकीय चळवळीचा उद्देश लोकांची मते सुशीक्षित करून राजकीय बाबीवर लोकमत सुसंघटित करण्याचा असतो, तर हीच चळवळ सरकारात करण्याचा उद्देश या सुशिक्षित आणि सुसंघटित लोकमतांचे वजन सरकारी यंत्रणेवर पाडून तिच्याकरवी इष्ट ते फेरफार राज्यकारभारात घडवून आणण्याचा असतो. "

हे असे दुहेरी कार्य करण्याचे ज्यांच्या वाट्यास येते त्या " नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता । " होणारालाच आपली उज्ज्वल देशभक्ती, निग्रही स्वार्थत्याग व अविश्रान्त उद्योगशीलता यांचे चीज " याचि देही याच डोळा । " पहावयास क्वचितच मिळते.

नामदार गोखल्यांच्यासारखा अर्थशास्त्रज्ञ व राजनीतिशास्त्रज्ञ लोकशाहीच्या निकोप वाढीसाठी भारताला प्रत्येक कालखंडात आवश्यक आहे. अंगावर पडणाऱ्या जबाबदाऱ्या पेलण्यास लायक अशी कर्तृत्ववान, ज्ञानी, राजकारणाचे व राज्यकारभाराचे खडान् खडा अध्ययन केलेली आणि आपले सर्व आयुष्य त्या कामालाच वाहिलेली माणसे की ज्यांच्या टीकेचा लॉर्ड कर्झनसारख्या अरेराव घमेंडानंदनालाही धःक वाटावा– भारताच्या जागतिक संबंधात दिवसेंदिवस अधिकाधिकच लागणार आहेत.

नामदार गोखले यांच्या अडेचाळीस वर्षांच्या आयुष्यातून ते पदवीधर

होईपर्यंतची पहिली अठरा वर्षे ते म्हणजे "विद्यार्थिनः कुतः सुखम्" चा धडा असून पुढील तीस वर्षांपैकी फर्ग्युसन कॉलेजमधील प्राध्यापकी आणि विधिमंडळातील कामगिरी असे दोन स्थूल भाग अविश्रान्त देशभक्तीने भरलेले आढळतात. आणि सर्व आयुष्यक्रम "कष्टाविण फळ नाहीं। कष्टेविण होत नाहीं। कांहीं एक॥" चा कित्ता ठरतो. प्राध्यापकी करीत असतानाच न्यायमूर्तींच्या शिष्यत्वाने गोखल्यांनी राजकारणाचे धडे चौदा वर्षे आत्मसात केले होते. त्यामुळेच १८९७ मधील वेल्बी-कमिशनपुढे प्राध्यापक गोखल्यांची साक्ष उत्कृष्ट ठरून राजकीय चळवळीच्या आखाड्यात परकीय सत्तेशी कुस्ती खेळण्यासाठी १९०२ मधील अर्थसंकल्पावरील पहिल्या भाषणाने गोखले दंड थोपटू शकले. त्या दंडथोपटीचा आवाज हिंदुस्थानभर गरजला. त्यापुढे तेरा वर्षे हा क्रम चालू होता, तो व्यक्तिशः गोखल्यांच्या संबंधात अभिमानास्पद व राष्ट्राच्या दृष्टीने बोधप्रद ठरला.

नामदार गोखल्यांच्या केवळ राजकीय जीवनाचीही पाच प्रकरणे आहेत. वेल्बी-कमिशनपुढील साक्ष, प्रांतिक व विशेषतः वरिष्ठ विधिमंडळातील कामगिरी, स्वदेशातील काम, आफ्रिकेतील व इंग्लंडातील शिष्टाई आणि हिंदी-सेवक-समाजाची स्थापना हीच ती प्रकरणे होत. हिंदुस्थानातील वाढत्या खर्चाचा विचार करण्यासाठी १८९३ पासून ब्रिटिश पार्लमेंटचे निवडून आलेले नामदार दादाभाई नौरोजी यांच्या प्रयत्नाने १८९७ साली इंग्लंडच्या पार्लमेंटने लॉर्ड वेल्बी यांच्या नेतृत्वाखाली एक कमिशन नेमले. त्यात दादाभाई नौरोजी व सर विल्यम वेडर्नबर्न हे हिंदुस्थानचे हितचिंतकही होते. या कमिशनपुढे साक्ष द्यावयास इंग्लंडमध्ये गेलेले गोखले केवळ २९ वर्षांचे होते. त्यांनी तेथे दिलेला पुरावा, त्यावरून कसून झालेल्या उलट तपासणीच्या वेळी त्यांनी दाखविलेले अतुल धैर्य व चिकाटी यांचे इंग्लंडात व हिंदुस्थानातही फार कौतुक झाले. १८७६ पासून हिंदुस्थानात लिटनशाही सुरू झाली व तेथपासूनच हिंदुस्थानच्या राज्यकारभारावर ब्रिटिश साम्राज्यशाहीचा विशेष पगडा बसण्यास सुरुवात झाली. त्या सालचा मद्रास इलाख्यातील भयंकर दुष्काळ व चांदीचा उतरता भाव यांमुळे हिंदुस्थानच्या तिजोरीवर खर्चाचा बोजा फार पडू लागला. तथापि, अशा स्थितीतही केवळ ब्रिटनच्या हितसंबंधांत चाललेल्या अफगाण-युद्धाचा सर्व खर्च बिचाऱ्या हिंदुस्थानवर टाकण्यात आला. अफगाणयुद्ध १८८० मध्ये इंग्लंडचा फजिता होऊन संपले. त्या खर्चाच्या बोजाखाली हिंदुस्थान चिरडत असता १८७८ मध्ये मँचेस्टरवाल्यांच्या आग्रहावरून विलायती कापडावरील जकात साडेपाच टक्क्यांवरून साडेतीन टक्क्यांवर आणण्यात आली. लिटनशाही १८८० त संपली आणि चार निःश्वास हिंदुस्थान टाकतो आहे तोच १८८४ साली डफरीनशाही सुरू झाली. मध्य आशियातून रशियाचा हल्ला होईल या बाऊने सरहद्दीवर कडेकोट बंदोबस्त ठेवून इंग्लंडने ब्रह्मदेश गिळला व या सर्व खर्चाचे ओझे हिंदुस्थानच्या

माथ्यावर मारण्यात आले. आणि मग ? तूट भरून काढण्याकरिता १८७७ पासून स्थापन झालेल्या दुष्काळ-दुःख-परिहार निधीचा राजरोस उपयोग, आखलेल्या धोरणाच्या विरुद्ध होऊ लागला. शिवाय १८८६ मध्ये प्राप्तीकराची नवी टूम सुरू होऊन १८८७ साली मिठावरील कर वाढविण्यात आला. गरीबांची चिपाडे होऊ लागली. तरीही नवीन कर कोणते बसवावेत याचा विचार करण्यासाठी १८८६ साली एक अर्थसमिती नेमली, पण तिच्या शिफारशी ऐकतो कोण ? १८९०–९१ साली तर हिंदुस्थानच्या तिजोरीचे दिवाळे वाजण्याची वेळ आली. हिंदुस्थान सरकारने तक्कार स्टेट सेक्रेटरीकडे करताच हिंदुस्थानातील टंकसाळ बंद करून रुपयाची किंमत कृत्रिमपणे वाढविण्यात आली. जेथे हिंदुस्थानचा पैसा हिंदुस्थानातील लोकांच्याच हिताकरिता प्रथम खर्च केला पाहिजे अशी निश्चिती नाही, तेथे वरीलसारख्या दात कोरून पोट भरण्याचा काय उपयोग होणार ? म्हणून दादाभाई नौरोजींनी वेल्बी-कमिशनची योजना करून घेतली होती.

त्या कमिशनपुढे साक्ष देताना ना. गोखल्यांनी वरील सर्व आपत्तींच्या मुळाशी जे एक तत्त्व राजकारणात नेहमी बिनचूक सांभाळावे लागते, त्याची हेळसांड हे एकच कारण आहे; ते तत्त्व म्हणजे लोकांकडून करांच्या रूपाने वसूल केलेला पैसा त्याच लोकांच्या हिताकरिता प्रथम खर्च झाला पाहिजे. हिंदुस्थानच्या राज्यकारभारावर पार्लमेंटचा मुळीच दाब नसून तो सर्व राज्यकारभार केवळ इंग्लंडच्या हिताकरिता होतो हेही गोखल्यांनी साधार सिद्ध केले. लष्करी खर्चाचा हिंदहितविरोधी अवाढव्यपणा, इंग्रज लोकांचे अकारण गलेलठ्ठ पगार, चांदीच्या भावातील घटीमुळे त्यांना मिळणारा " हुंडावळीचा भत्ता " याबद्दल पुरावा मांड्रन १८८६ मधील बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्सच्या तक्कार-पत्राचा आधारही गोखल्यांनी आपल्या म्हणण्यास दिला होता. हिंदुस्थानातील रेल्वे इंग्लंडच्या व्यापाराच्या सोयीसाठी असून पाटबंधारे, शिक्षण, आरोग्य अशा हिंदुस्थान देशातील लोकांच्या गरजांकडे दुर्लक्षच करण्यात येते, हेही गोखल्यांनी साधार दाखविले. आणि अकारण खर्च व अनाठायी खर्च आटोक्यात आणण्यासाठी उपाय सुचविले की, हिंदुस्थानच्या खर्चावर पार्लमेंटचा दाब असावा; प्रांतिक सरकार व वरिष्ठ सरकार यांच्यात काही तत्त्वनिष्ठेने खाते-वाटणी व करपद्धतींची वाटणी व्हावी; लष्कराचा उपयोग पुष्कळसा इंग्लंडकरिताच होत असल्याने लष्करी खर्चेही पुष्कळ होतो तो इंग्लंडनेच सोसला पाहिजे; दिवसेंदिवस इंग्रजी नोकरशाहीची भरती कमी कमी करून " होमचार्जेस "चा हिंदुस्थानवरील बोजा कमी केला पाहिजे. हिंदुस्थानातील रेल्वे लोकांना हव्या असतील तर हिंदी भांडवलावरच त्या पसरल्या पाहिजेत, आणि शेवटी " हिंदी लोकांस देशात कोणतीच उच्च दर्जाची जागा देण्यात येत नसल्यामुळे हिंदी लोकांचा मानसिक अधःपात " कसा होत आहे याचे स्पष्टीकरण वेल्बी-कमिशनपुढे करण्यास गोखले कचरले नाहीत. " प्रज्ञाहतास्तु रिपवः सुहृता

भवन्ति। " हे इंग्लंडचे हिंदुस्थानसंबंधी धोरण आहे हेच त्यांना ठरवावयाचे होते.

वेल्बी-कमिशननंतर मुंबईच्या विधिमंडळात गोखले दीड वर्ष दिसतात. तेथे १९०१ साली शेतकऱ्यांना जमिनी गहाण टाकण्याच्या हक्कापासून परावृत्त करणारे विधेयक आले असता, गोखल्यांचे शेतकऱ्यांच्या मालकी हक्काबद्दल भाषण मुद्देसूद व प्रभावी झाले. आणि तरीही सरकार आपले विधेयक पास करवून घेणार असा रंग दिसताच ना. गोखले, फेरोजशहा मेहताप्रभृती मंडळींनी विधिमंडळातून सरकारच्या निषेधार्थ बहिर्गमन केले. परिणामतः सरकारने विधेयक केले; पण अमलात आणले नाही, अशी त्याची उपजतमृत मुलासारखी स्थिती झाली ! सन १९०२ पासून ना. गोखले वरिष्ठ विधिमंडळाचे सभासद झाले आणि तेव्हापासून तेरा वर्षे त्यांची अर्थसंकल्पावरील भाषणे लोकाकर्षणेच ठरली.

निर्भीड टीका, राजकीय व आर्थिक प्रश्नांचे सांगोपांग अध्ययन आणि व्यवहार्य व योग्य सूचना यायोगे गोखल्यांच्या विधिमंडळातील भाषणांनी गोखल्यांच्या प्रतिपक्षाकडूनही वाहवा मिळविली. त्यांनी वेळोवेळी केलेल्या सूचनांचा स्वीकार सरकारास नाखुषीने का होईना करणे भागच पडे ! कर्झनसाहेबापेक्षाही सात वर्षांनी तरुण असलेले केवळ छत्तीस वर्षांचे गोखले; पण त्यांनी आपल्या ज्ञानतेजाने व वाक्किरणांनी १९०२ सालीच सात कोटींची बचत (१९०१ सालची) दाखविणाऱ्या सरकारच्या आनंदाचे गर्द धुके क्षणात पार वितळवून टाकले ! सरकारच्या तिजोरीत सर्व खर्च भागून मोठी शिल्लक राहणे म्हणजे सरकार प्रजेकडून वाजवीपेक्षा अधिक कर घेते, हे तत्त्व गोखल्यांनी हिंदुस्थानच्या राज्यकारभारात प्रथम उच्चारले आणि बजावले की, असल्या लुटीची लाज सरकारला वाटली पाहिजे. १८८५ सालापासून चांदीच्या भावाची घट सावरून धरण्याकरिता बसविलेले कर १८९३ त रुपयाची किंमत सावरून धरल्यावर का कमी केले नाहीत, असा खडा सवालही त्यांनी टाकला. सरकारी अहवालातील आकड्यांवरून लोकांची स्थिती सुधारण्याऐवजी उलट दरिद्रीच होत चालल्याचे त्यांनी निर्विवाद सिद्ध केले व सरकारची लष्करी खर्चातील उधळपट्टी त्यांनी खरडपट्टीखाली घेतली. गोखल्यांच्या अशा या भाषणांस व्हाइसरॉयसकट चकित झालेल्या सरकारने कसलेही उत्तर दिले नाही, ही विधिमंडळाच्या इतिहासातील अपूर्व घटना घडली.

विधिमंडळाच्या कामाचे तत्पूर्वस्वरूप गोखले तेथे गेल्यापासून त्यांच्याच भाषणांनी पार बदललेच ! रमेशचंद्र दत्त गोखल्यांच्या भाषणासंबंधी १९०५ साली बोलून गेले की, " हाच हिंदुस्थानचा नवा वीर ! तो वक्तृत्वाचा जोर, ती वाद करण्याची शक्ती, नेमस्तपणा, मुद्दे स्पष्टपणे मांडण्याची कुशलता या गुणांनी राजप्रतिनिधींच्या विधिमंडळातील त्या भाषणांनी असे दाखविले की, आपल्या देशाला आणि देशबांधवांना न्याय मिळवून देईल असा वीर आपणास मिळाला आहे."

मिठाचा कर कमी झाला, प्रातीकराची पायाभूत मिळकत-मर्यादा वाढली, असे गोखल्यांच्या टीकेचे परिणाम सालोसाल होत गेले. १९०५ च्या अर्थ-संकल्पात लॉर्ड किचनेर यांच्या आग्रहावरून सैन्याची पुनर्घटना करण्याकरिता पंधरा कोटी रुपयांची तरतूद करून त्याबद्दल दरसाल तीन कोटी रुपये द्यावेत असे सरकारने ठरविले. यावर गोखल्यांनी इतकी जोराची टीका केली की, त्यामुळे सरकार चवताळले. मध्य आशियातील ब्रिटिश साम्राज्याच्या हितसंबंधांचा खर्च हिंदुस्थानवर का ? असा गोखल्यांचा प्रश्न होता. त्यांनी असेही विचारले की, रूसो–जपानी युद्ध जिंकणाऱ्या " जपानच्या स्वतःच्या पुत्राच्या हातात त्या देशाचे भवितव्य असून, आपल्या राष्ट्राचे यश अधिक कसे वाढेल, आणि आपल्या देशबांधवांची हरएक प्रयत्नांची उन्नती कशी होईल, हीच त्यांची सर्व महत्त्वाकांक्षा असून तदर्थ त्यांचे प्रयत्न अहर्निश चालू असतात. या हिंदुस्थान देशाच्या राज्यकारभाराचा सर्व शाखांतून जपानचे अनुकरण करू देण्यास सरकार तयार आहे काय ? "

हिंदी राजकारणात विधिमंडळातील आपल्या उत्कृष्ट कामाने गोखल्यांनी इतके महत्त्वाचे स्थान मिळविले की, हिंदी राजकारणाचा व अर्थशास्त्राचा अभ्यास करणाऱ्यांपैकी कोणासही गोखल्यांच्या भाषणाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

मोर्ले-मिंटो सुधारणा आल्यावर विधिमंडळात ठराव आणण्याचा अधिकार लोकनियुक्त सभासदांस मिळाला. त्याचा उपयोग गोखल्यांनी फार चांगला करून घेतला. १९११ साली सरकारी खर्चाची छाननी करण्याकरिता समिती नेमण्या-बद्दलचे गोखल्यांचे म्हणणे सरकारने मान्य केले. त्याच साली गोखल्यांनी प्राथमिक शिक्षण देशात सक्तीचे आणि मोफत करण्याचे विधेयक मांडले. शिक्षणाबाबत त्यापूर्वी गोखले सारखे सरकारला डिवचत होते. १९०२–०४ सालात तर आशुतोष मुखर्जींप्रमाणेच विद्यापीठाचे स्वातंत्र्य अबाधित राखण्याबद्दलही त्यांनी खटपटच खटपट केली होती. ' गोखल्यांच्या शिवाय अर्थसंकल्पावरील वाद-विवाद म्हणजे हॅम्लेटच्या भूमिकेशिवाय हॅम्लेट नाटक होय. " असे उद्‌गार १९१३ साली त्या वेळचे फडणीस सर गाय विल्सन यांनी काढले होते. रुक्ष आकडे मनोरंजक करण्याची कला व तीतील संजीवनी गोखल्यांच्या जवळ असल्या-कारणाने त्यांना हिंदुस्थानचे ग्लॅडस्टन म्हणत असत.

राज्यकारभाराच्या शास्त्रातील गोखल्यांच्या आश्चर्यकारक प्रावीण्याविषयी स्टेट सेक्रेटरी मॉंटेग्यू हे सुद्धा म्हणाले की, " हिंदी अर्थशास्त्राच्या आणि जमा-खर्चाच्या गुंतागुंतीबद्दल एखाद्या मनुष्याला गोडी वाटावी ही गोष्टच त्याच्या उत्कृष्ट बुद्धीमत्तेचा पुरावा आहे. ज्या वयात या विषयाकडे कोणी ढुंकूनसुद्धा पाहणार नाही त्या वयात ना. गोखल्यांनी या विषयात अलौकिक प्रावीण्य संपादले होते. तोच त्यांच्या देशसेवेचा पाया होता. "

गोखल्यांच्या सर्व चरित्राचे रहस्य स्वदेशसेवा हे होते. इंग्लंडात १९०५ साली पंचेचाळीस दिवसांत छप्पन्न-व्याख्याने देऊन हिंदुस्थानात परकीय सत्ता केवढा जुलूम करते हे त्यांनी स्पष्ट केले. लोकमान्यांनी खास सभा भरवून त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले होते. त्यांनी इंग्लिश लोकांस स्पष्ट केले होते की, "तुम्ही हिंदुस्थानातील तरुणांस जे पाश्चिमात्य शिक्षण दिले त्यानेच हिंदी लोक अधिकाधिक हक्कांची मागणी करू लागले. हे हक्क देण्यास तुमचा अधिकारीवर्ग नालायक असल्यामुळे इंग्लंडवरील हिंदी तरुणांचा विश्वास डळमळू लागला आहे. देशाचा राज्यकारभार परकीयांच्या हिताच्या दृष्टीने चालला असल्यामुळे दारिद्र्य सर्वत्र मूर्तिमंत अवतरले आहे." १९०६ व १९०८ मध्ये पार्लमेंटमध्ये सभासदांस भेटून राजकीय सुधारणांना लोकहितवादी स्वरूप येण्यासाठी त्यांनी खटपट केली. १९०९ च्या मोर्ले-मिंटो सुधारणांतील अस्सलपणाचे श्रेय ना. गोखल्यांच्या खटपटीला आहे हे सर्वविश्रुत आहे. (रमेशचंद्र दत्त व मोर्ले यांच्या आठवणी पहा.) मोर्ले यांनी लिहिलेले आहे की, "गोखल्यांना मुत्सद्द्याचे डोके आहे, अधिकाऱ्यांच्या जबाबदारीची जाणीव आहे आणि व्यवहारज्ञानाच्या खुब्याही त्यांना कळतात."

दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांचा वर्णविद्वेषाने जो छळ झाला, त्याचे निराकरण करण्याकरिता महात्मा गांधींनी सत्याग्रह केला होता. तो लढा मिटविण्यासाठी गोखल्यांनी केलेल्या परिश्रमाबद्दल गांधीजींनी लिहिले आहे की, "सत्याग्रहाच्या लढ्याचा गोखल्यांच्या मनावर इतका खोल परिणाम झाला की, त्यांची प्रकृती नादुरुस्त असताही दक्षिण आफ्रिकेचा प्रवास करून ते केप टाऊनमध्ये उतरले. त्याच्या दुसऱ्याच दिवशी त्यांनी टाऊनहॉलमध्ये सभा घेतली व ठरलेला प्रत्येक कार्यक्रम पार पाडला... १९१३ साली, स्मटसनी दिलेले वचन पाळविण्यासाठी गोखल्यांनी जे परिश्रम केले त्यामुळे त्यांच्या आयुष्यातील निदान दहा वर्षे कमी झाली असली पाहिजेत. दक्षिण आफ्रिकेच्या प्रश्नावर हिंदुस्थानला जागृत करण्यासाठी व पैसे जमविण्यासाठी गोखल्यांनी जी दगदग केली तिने हिंदुस्थान हादरून गेले. मद्रास येथे लॉर्ड हार्डिंज यांनी ऐतिहासिक महत्त्वाचे भाषण आफ्रिकेबाबत केले ही महतीही गोखल्यांचीच. आपली प्रकृती जोराने ढासळत चालली होती तरी गोखल्यांनी देशसेवेत अंतर पडू दिले नाही."

स्वार्थत्यागी देशभक्तांनी अभ्यासपूर्वक स्वदेशाच्या उन्नतीसाठी आणि प्रगतिपर प्रतिष्ठेसाठी झटत रहावे ही गोखल्यांची तळमळ होती. तो देशभक्तीचा ओघ अखंड चालत रहावा म्हणून त्यांनी १९०५ साली भारत-सेवक-समाज (सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी) स्थापला आणि तो आपल्या स्वतःच्या आविष्कार आपल्या "मागीलांना" वारसा हक्क म्हणून दिला. त्या भारत-पुत्र-स्मृतीस शतशः अभिवादन !

☒ ☒ ☒

३७ : नामदार गोखले यांचा जीवनवृत्तान्त

[नामदार गोखले यांच्या जीवनाचे दृष्टिक्षेपात हे समालोचन आहे.]

१८६६ मे ९	जन्म, कोतळूक येथे.
१८७१	कागल येथे प्राथमिक शिक्षण सुरू.
१८७५	कोल्हापुरास प्रशालेय शिक्षण सुरू.
१८७९	पिताजी कृष्णरावांचा स्वर्गवास.
१८८०	प्रथम विवाह, भागवत कन्येशी. —सौ. सावित्री.
१८८१	मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण.
१८८२	टिळक–आगरकरांवरील बर्वे–प्रकरणात त्यांच्या बचावासाठीचे निधीकरिता झालेल्या नाटकात भूमिका.
१८८४	गणित विषय घेऊन मुंबईच्या एल्फिन्स्टन् कॉलेजचा विद्यार्थी म्हणून मुंबई विद्यापीठाची बी. ए. परीक्षा उत्तीर्ण.
१८८५ जानेवारी	(१) डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या पुणे न्यू इंग्लिश-स्कूल मध्ये शिक्षक
	(२) फर्स्ट एल्एल्. बी. उत्तीर्ण.
१८८६ जून	(१) डेक्कन एज्युकेशन सोसायटीत आजीव सभासद.
,,	(२) 'मऱ्हाटा' या इंग्रजी पत्रात लेख.
१८८७	(१) अंकगणित प्रसिद्ध झाले.
	(२) फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकवू लागले.
,, मे	(३) द्वितीय विवाह पेंडसे कन्येशी. —सौ. राधाबाई.
,,	(४) न्या. रानडे यांच्याशी परिचय आणि त्यांचे शिष्यत्व.
१८८८	(१) पुणे सार्वजनिक सभेचे कार्यवाह–सन १८९६ पर्यंत.
,,	(२) 'सुधारका'च्या इंग्रजी विभागाचे संपादक— सन १८९२ अखेर.
,,	(३) पहिल्या मुंबई प्रांतिक परिषदेचे टिळक, नामजोशी यांचे सहकार्यवाह.

१८८८	(४) पहिलेच सार्वजनिक भाषण. (लिहिले होते ते झाले असे गृहीत धरून) प्रसिद्ध.
१८८९	मुंबई येथील काँग्रेसच्या (५ व्या अधिवेशनात) प्रत्यक्ष भाग घेतला.
१८९०	सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाचे संपादक सन १८९६ पर्यंत.
१८९१	(१) प्रथम पत्नी सौ. सावित्रीबाईंचा स्वर्गवास.
,,	(२) मुंबई प्रांतिक दरिषदेच्या चिटणिसीचा राजीनामा.
१८९२	डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी सन १८९८ पर्यंत.
१८९३	(१) सुकन्या काशीताईंचा जन्म.
,,	(२) मातोश्रींचा स्वर्गवास.
,,	(३) डे. ए. सो. साठी निधी जमविण्यास सुरुवात.
१८९५ जुलै १४	(१) सार्वजनिक सभा– पुणेच्या वार्षिक निवडणुकीत गोखले पक्षास अल्पमत.
,,	(२) मुंबई विद्यापीठाच्या सीनेटवर फेलो म्हणून निवड.
,,	(३) पुणे काँग्रेस अधिवेशनाचे दुय्यम सेक्रेटरी.
,,	(४) राष्ट्रीय सभा–समाचाराचे संपादक.
१८९६ ऑगस्ट	(१) सार्वजनिक सभा सोडली.
,, नोव्हेंबर ४	(२) डेक्कन सभा स्थापन झाली; तिचे सेक्रेटरी.
,,	(३) मोहनदास करमचंद गांधीजींशी पहिली भेट.
१८९७	(१) मार्चपासून जुलैअखेर–इंग्लंडमध्ये वेल्बी-कमिशन-पुढील साक्षीसाठी.
,,	(२) पुणे-प्लेग-शामक उपायांत सरकारने अत्याचार केल्याचे आरोप इंग्लंडात मँचेस्टर गार्डियनमधून केले. त्या प्रकरणी माफी मागावी लागली.
,,	(३) मोर्लेसाहेबांची पहिली भेट.
१८९८	(१) पुण्याच्या प्लेगच्या कहरात स्वयंसेवक म्हणून रुग्ण-शुश्रूषादि सेवा.
,,	(२) पुणे नगरपालिकेचे सरकारनियुक्त सभासद.
१८९९	(१) लॉर्ड सँडर्स्ट यांनी प्लेग रुग्णसेवेबद्दल मनमोकळेपणाने प्रशंसा केली.
,,	(२) मुंबई-विधिमंडळात निवडून आले.
,,	(३) सरकारी 'दुष्काळ-निवारण-योजने'वर टीका.
१९००	(१) प्लेग-कमिशनवर नेमणूक.
,,	(२) द्वितीय पत्नीचा स्वर्गवास.

१९०१ जानेवा. १६ (१) गुरू न्या. रानडे यांचा मृत्यू.
,, (२) जमिनीबाबत कायद्याच्या निषेधार्थ विधिमंडळातून बहिर्गमन.
,, (३) जिल्हा नगरपालिकांतील जातीय प्रतिनिधित्वास विरोध
,, (४) वरिष्ठ विधिमंडळात निवड.
१९०२ (१) कलकत्त्यास वरिष्ठ विधिमंडळात अर्थसंकल्पावरील पहिले भाषण.
,, सप्टेंबर १९ (२) फर्ग्युसन कॉलेजमधून निवृत्तिपूर्व रजेवर.
,, (३) पुणे नगरपालिकेचे अध्यक्ष– १९०५ पर्यंत.
१९०३ गांधी-गोखले एक महिनाभर कलकत्त्यास.
१९०४ (१) सी. आय्. ई. पदवी मिळाली.
,, (२) डेक्कन एज्युकेशन सोसायटीतून रीतसर निवृत्ती.
१९०५ जून १२ (१) भारत–सेवक–समाजाची (हिंद–सेवक–समाजाची) स्थापना.
,, (२) पुणे नगरपालिकेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा.
,, (३) काँग्रेसतर्फे इंग्लंडमध्ये सप्टेंबर ते डिसेंबर शिष्टमंडळात.
,, ऑक्टो. १६ (४) इंग्लंडातच बंगभंग झाल्याचे समजले.
,, (५) लोकमान्यांनी पुण्यास जाहीर सत्कार केला.
,, (६) वाराणसी-काँग्रेसचे अध्यक्ष.
१९०६ (१) एप्रिल ते सप्टेंबर काँग्रेसतर्फे राजकीय सुधारणांसाठी इंग्लंडमध्ये शिष्टमंडळात.
,, (२) कलकत्त्याच्या काँग्रेसमध्ये स्वराज्याची चतुःसूत्री संमत.
१९०७ (१) उत्तर हिंदुस्थानात व्याख्यान-सत्र.
,, (२) जूनमध्ये वडील बंधूंचा स्वर्गवास.
,, (३) सुरतेची काँग्रेस.
१९०८ (१) सत्ता-विकेंद्री-करणाबाबत रॉयल-कमिशनपुढे पुरावा.
,, (२) इंग्लंडमध्ये मोर्ले-मिंटो सुधारणांबाबत शिष्टाई.
,, (३) 'हिंदु-पंच' व 'वंदे मातरम्' वर बेअब्रूची फिर्याद.
,, (४) रानडे अर्थशास्त्र-संस्था स्थापन.
१९०९ मोर्ले-मिंटो सुधारणा अमलात आणण्यास सुरुवात.
१९१० (१) नाताळ-वेठबिगार बंदीचा ठराव.
,, (२) सक्तीचे व मुक्तद्वार प्राथमिक शिक्षण करण्याचा ठराव.
,, (३) मुद्रण-वृत्तपत्र-विधेयकावर टीका.

१९११ (१) दक्षिण आफ्रिकेसंबंधात वरिष्ठ विधिमंडळात ठराव.
,, (२) प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यासंबंधी वरिष्ठ विधिमंडळात विधेयक.
,, (३) राजद्रोही-सभाबंदी-विधेयकास विरोध.
,, (४) युनिव्हर्सल रेसेस काँग्रेसपुढे अलाहाबाद येथे 'पूर्व व पश्चिम' हा निबंध वाचला.

१९१२ (१) सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण करण्यासंबंधीचे विधेयक हाणून पडले.
,, (२) मे ते डिसेंबर इंग्लंडात सफर.
,, (३) इंग्लंड-सफरीवर असतानाच ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये दक्षिण आफ्रिकेत बिनसरकारी वकील (अंबॅसेडर).
,, (४) त्यापूर्वीच ५ सप्टेंबर रोजी ब्रिटिश पार्लमेंटने पब्लिक-सर्व्हिस कमिशन नेमले होते त्यात समावेश.
,, (५) भूपेंद्रनाथ बसूनी भारतातील पोलिसी कारभारासंबंधी विधेयक मांडले, त्यावर भाषण.
,, (६) इंग्लंडमध्ये गांधींची भेट.

१९१३ एप्रिल ते ऑक्टोबरमध्ये पब्लिक सर्व्हिस कमिशनसाठी इंग्लंडमध्ये.

१९१४ (१) के. सी. आय्. ई. पदवीस नकार.
,, (२) पब्लिक सर्व्हिस कमिशनसाठी पुन्हा इंग्लंडात.
,, (३) दरम्यान ४ ऑगस्ट रोजी 'कैसरीकंदन' (पहिले जागतिक महायुद्ध) सुरू.
,, (४) गांधी–स्मट्स कराराचा संतोष.
,, (५) संयुक्त काँग्रेस होण्यासंबंधीच्या प्रयत्नातील झटापटी आणि अपयशाचे पूर्वचिन्ह.

१९१५ (१) शिमगा गेला कवित्व उरले.
,, (२) गांधीजींची भेट.
,, (३) गोखल्यांचे राजकीय इच्छापत्र.
१९१५ फेब्रुवारी १९ (४) शुक्रवारी भारत-सेवकाचे **स्वर्गारोहण.**

* * *

NATIONAL LIBERAL CLUB.
Whitehall Place, S.W.

Dear Dattopant,

12th July 1912

I have not had time this week to discuss the question of the paper with Mavlankar, but I will send for him this week & by next mail, I hope to be able to tell you definitely what we arrange. I am glad the Union Company of Norway has, by raising the rate unduly, made it possible for us to withdraw from the Contract. I think Mavlankar's terms will be better. And in any case it will be easier for us to deal with him than with a Company in Norway. I hope your health is good & that Kashi & the Children are doing well.

Please hand over the enclosed to Dwarkadas & Co. Yours affly
Company. Letter to Dwarkadas & Co. V. K. Joshi.
of the postcard to Kasha

[नामदार गोखले यांचे इंग्रजी हस्ताक्षर]

श्री.

NATIONAL LIBERAL CLUB.

Whitehall Place, S.W.

पु. रेंडत.
ता. २ डिसेंबर १९०५

अनेक आशीर्वाद विशेष. तुमचें ता. १२ रोजचें पत्र पोंचलें. ता. ८. अगोदरचें ता. १४ रोजचें पत्रही पोंचलें. पार्टी मजबूत करीत आहे. व्यवस्थाही चांगली करीत आहे. आपलें पंधरा दिवस अगोदर यावयास पाहिजे. पुढें कसें होईल. आपण महिनाभर मजबूतीसाठीं मी म्हणतों तोंपर्यंत दिवस खर्च करून राहावें. पुढें एक आठवडा फारतर देशांत राहून ता. ३१ आपण लोकांनीं पार्टी मजबूत आणण्याचे दृष्टीनें निघणें. हें पत्र तारेअगोदर पोंचवावें. बाकी सर्व आपणांस ते आशीर्वाद.

गो. कृ. गोखले.

[नामदार गोखले यांचे मराठी हस्ताक्षर]



[नामदार गोखले यांचे मोडी हस्ताक्षर]

सूची

[आकडे पृष्ठांकाचे आहेत.]

अजितसिं(ग)ह (सरदार) ९६, ९९, ११२, १८५
अधिकार-विभागणी-कमिशन ६५
अनुशीलनसमिती १०६
अमृतबझार-पत्रिका ६४, १२५, १३८, १५१
अय्यर जी. सुब्रह्मण्यम् ४७
अलिगड-विद्यापीठ १५७
अळेकर १०३
अंबालाल सक्कर-(साखर) लाल १००, १०३
ॲनी बिझांट (डॉ.) १३५ ते १३८, १५१
ॲंड्र्यूज (दीनबंधू) १२१
ॲप्ट्हिल् (लॉर्ड) ११७, १२०
आगरकर गोपाळ (राव) गणेश १५ ते १९, २६ ते ३०, ३४ ३५, ५३, ५५, १४१, १४२, १५९, १६०, १६८ ते १७०, १७५, १७६, २०१, २०२
आगाखान (नामदार) ११५, १२४, १३०, १३३, १३४, १५६, १६५
आपटे (प्रा.) वामन शिवराम १५, २२, २९
आपटे (कादंबरीकार) हरि नारायण १५२, १५७, १७०, १७१
आफ्रिकन सरकार ६६
आफ्रिका (दक्षिण) ११३ ते ११५, २१७ ते १२३, १३५, १५०, १५४, १५८, १६१, १७३, १७४, १८१, १८६, १९८, २०५, २०८, २१२
आफ्रिका (ब्रिटिश) १२४ ते १२६, १२८
आयर्स्ट ५३
आळतेकर अप्पासाहेब १३५
ऑफिशिअल् सीक्रेट्स् ॲक्ट (सरकार गुपितांचा कायदा) ६१, ६३, ८२, १९१
ऑरेंज फ्री स्टेट १२२
ऑरेंज-रिव्हर कॉलनी ११९

इंग्लंड २, ३, १९, ४३, ४७, ते ५५, ७०, ७२, ७७, ८१, ८५, ८७ ते ८९, ९४ ते ९६, १०२, १०६, ते १११, ११७, ११८, १२३, १२५ ते १२७, १३०, १३४, १३५, १४०, १४५, १४६, १४८, १५०, १५१, १५५, १५८, १६१, १७१, १७६, १७७, १८२, १८४, १८५, १८९, १९२, १९४, २०२ ते २०४, २०८, २०९, २१२
'इंग्लिशमन' ६३, ९१
इंडियन नॅशनल काँग्रेस १, २६, ३७, ३९, ४० ते ४४, ५३, ५६, ६७, ७४, ८१ ते ८४, ८६ ते ८९, ९१, ९४, ९६, १०६, १०८, ११२ ते ११४, ११९, १२३, १२४, १२९, १३५,

१३६, १४०, १४५ ते १५०, १५१, १५४, १५८, १६१, १७१, १७४, १७७, १७८, १८१, १८२, १८४ ते १८८, १९५, २०३, २०४
इंडियन सोशल रिफॉर्मर १६१
इंडियन होमरूल लीग ६९, १०६
'इंडिया' ८२, ८३
इंपीरिअल इन्स्टिट्यूट ९५
इमर्सन् ८४, १६०
इंस्लिंग्टन् (लॉर्ड) १२५
ईस्ट इंडिया असोसिएशन् ९५
ईस्ट इंडिया कंपनी १, २, ४८
एकनाथ ३५, २०२
एडवर्ड (सातवे) ८७
एल्जिन् (लॉर्ड) १९
एल्फिन्स्टन् कॉलेज १७, १७२
एल्फिन्स्टन् मौंट स्टुअर्ट ४
ए स्टेप् इन् दि स्टीमर ५५
ओक गणेश भास्कर ७
ओक निळू (नीळकंठ भास्कर) ७
ओक भास्करपंत ७
ओक वालुताई ७, ८
ओक हरि भास्कर ७
कन्व्हेन्शन् १०२, ११२, ११३, १८६
करंदीकर दादासाहेब ५७, १०१
करमरकर १७
कर्झन् (लॉर्ड) जी. एन्. ३१, ४७, ६० ते ६५, ६८, ७०, ८१, ते ८३, ८७ ते ८९, १०६, १०८, १४५, १४८, १६६, १७१, १८३, १८७, १९७, २०३, २०७, २१०
कर्झन्शाही ८४ ते ८८, ९४
कर्वे (महर्षि) धोंडो (अण्णासाहेब) केशव १७, २५, १५९, १७२
कलकत्ता असोसिएशन् ५
कॅंबेल बॅनरमन् (सर) हेन्री ९४
कॅले ४७
कान्हेरे अनंत ११३
कामत (नामदार) १५३
कामा (मॅडम्) ६९, १०६
कार्नड्युक् (न्यायमूर्ती) १२६
कालेनबेक १२१
काश्यप नदी ६
काळ ११३
काळे (रा. ब.) रावजी रामचंद्र ७९
कॉटन् (सर) हेन्री १४५
कॉलनायझेशन् बिल् ९६, ९७, ९९, १८५
कॉसग्रीव (श्रीमती) ४८
कॉंग्रेस (इंडियन् नेशनल् कॉंग्रेस पहा.)
क्रॉफर्ड प्रकरण ३६, ५३, १४८
किंग्जफोर्ड ११३
किंबर्ले ११८
कुंझरू (डॉ.) हृदयनाथ ७८
केन डब्ल्यू. एस्. ४७, ५१, १८६
केपटाऊन ११८, २१२
केम्ब्रिज ४८, १७९
केसरी १५, २१, २२, २७, ५४, ५५, ६९, ८५, ११३, १३७, १३८, १५७, १८३
केळकर गोविंदराव २१
केळकर न. चिं. ४३
केळकर (प्रा.) वासुदेव (राव) बा. २५, ३०
कैसर ६९, ११४, १२९

कैसरीकंदन १२७, १२९, १५२, १५४
कोतळूक ७, ९, २०१
कोमिताला १००
कोरिया ६४
क्रग (कर्नल्) ५६
क्रिमिनल् लॉ अमेंड्मेंट ॲक्ट १४९
क्रयू (लॉर्ड) १२३
क्लार्क (सर) जॉर्ज (लॉर्ड सिड्नहॅम्) ३१, १११

खरे कृष्णाजीपंत १४९
खरे दाजी आबाजी ५९, १३५, १८६
खापर्डे दादासाहेब १००, १०३

गटे १५९
गणपति–उत्सव ३९, ५५
गदर ६९
गाडगीळ (प्रा.) ध. रा. ७९
गांधी मोहनदास करमचंद (महात्मा) ७८, ७९, ११४, ११७, ११८, १२० ते १२६, १४०, १४१, १४९ ते १५४, १५९, १६१ ते १६५, १७२ ते १७४, १७६, १७९, २०५, २१२
गांधी-स्मट्स्-करार १५४
गायकवाड मल्हारराव ३
गीतांजली १४०
गुप्ता के. जी. १०७
गोखले अनंताजी (अंताजी) श्रीधर ७, ११, १८, १४१
गोखले काशीताई १४३
गोखले कृष्ण (कृष्णाजी, कृष्णराव) श्रीधर ४, ७, ८, ९, ११, ३४, १४१
गोखले गोदावरी १४४
गोखले गोविंद (राव, अण्णा) कृष्ण १० ते १४, १८, २१, २३, १४१, १४६, २०१
गोखले जगन्नाथ दादाजी ६
गोखले जयराम श्रीधर ७
गोखले दामोदर जनार्दन १४३
गोखले बाळाजी महादेव ६
गोखले भास्कर बाळाजी ७
गोखले माधव श्रीधर ७
गोखले रघुनाथ वासुदेव ६
गोखले राधाबाई १४२, १४४
गोखले लक्ष्मीबाई १४४
गोखले विठ्ठल गणेश ६
गोखले शंकर वासुदेव ६
गोखले श्रीधर भास्कर ७
गोखले सत्यभामाबाई ७ ते १०, १८
गोखले सावित्रीबाई १४२
गोखले सीताबाई (वहिनी) १४, १८, १४२, १४४
गोखले स्कूल ऑफ एकॉनॉमिक्स अँड पॉलिटिक्स ७९
गोफण्या मारुती क्लब ५३
गोळे (प्रा.) २२
ग्रे (कवी) १९
ग्लॅड्स्टन् ४, २०, ३८, १५७, १६२, १८७, २११

घोष अरविंद १०३, ११२
घोष पीयूषकान्त ५५
घोष मोतीलाल ५५
घोष (डॉ.) रासबिहारी ९२, १००, १०१, १०३
घोष लालमोहन ४

चंदावरकर (न्या.) १८४
चंद्रगुप्त ८९
चाफेकर दामोदर ५९
चाफेकर-बंधू ५३
चिंतामणी (सर) सी. वाय्. ६७, १६३
चिपळूण ६, ७
चिपळूणकर कृष्ण (थोरले) शास्त्री १४
चिपळू(ळो)णकर विष्णुशास्त्री ४, ११, १५, २२, २६, ३०
चिरोल (सर) व्हॅलेंटाइन् १२५
चीन १४६
चौबळ (ना., सर) महादेव (भा.) १२५, १५४

जगन्नाथ शंकरशेठ ६९
जपान १४६, २११
जमखिंडी २, १४७
जमीन-तबदिली-बंदी (लँडअॅलिनिएशन) ५७ ते ५९, ६१
जर्मनी ६८, ६९, १०६, ११४, १२९, १३१
जॉर्ज (पंचम) बादशहा ६८, ८७, ११४, ११५, १६१
जिन्ना महंमदअल्ली १०३, १६५
जेकब (मेजर) ४
जेन्किन्स् (सर) लॉरेन्स ६७, १६२
जोशी गणेश वासुदेव (सार्वजनिक काका) ३
जोशी गणेश व्यंकटेश ४७, ४८, ५०, १६४, १७४
जोशी गोविंद बाबाजी ३
जोशी नारायण मल्हार ७८
जोशी (कुमठेकर) वासुदेवराव ११

टाइम्स ३६, ५५, ८७
टागोर (डॉ.) रवींद्रनाथ १४०
टाटा रतन १२४, १२७
टिप्पू सुलतान १४६
टिळक (लोकमान्य) बाळ गंगाधर १५ ते १९, २० ते ३०, ३७ ते ४०, ४२ ते ५०, ५४, ५७, ८३, ८५, ८९, ९० ते ९२, ९४, ९९, १००, १०१ ते १०४, ११० ते ११३, १२७, १३५ ते १३९, १४१, १४५ ते १५१, १५३, १५९, १६४, १६७, १६९, १७२, १७५, १७६, १७८, १८३, १८६, २०१, २०४, २०७, २१२

ठक्कर बाप्पा ७८

डफरीन ४७, १८३, २०८
डॉर्फ एरिच् फॉं. लुडेन् ६८
डिग्बी ३८
डिस्ट्रिक्ट् म्युनिसिपल् बिल् ५९
डेक्कन एज्युकेशन सोसायटी २२ ते २५, २६, ३४, ५४, ७२, ८५, १४१, १४३, १५३, १५४, १६८, १७०, १७२, १७९, २०१
डेक्कन कॉलेज १७, १९, ३०
डेक्कन सभा ४५, ते ४७, २०२, २०३
डोंगरी (तुरुंग) २६, १७५

तांबे ३४
ताह्मनमळा ६, ७, ९, ११
तुर्कस्थान १४६

दख्खन ३७
दत्त भूपेंद्रनाथ ११३

दत्त रमेशचंद्र ५०, ९०, २१०, २१२
दत्त गुरू १४३
दर्बान ११८
दळवी डी. जी. १३६, १३७
दावर (न्यायमूर्ती) ११०
दिल्ली-दरबार ४, ५२, ६६
दुष्काळ (निवारण)-कानू ५७
देव (डॉ.) १५१
देवधर गोपाळ कृष्ण ७४, ७८, १५७
देशपांडे मास्तर २१
देशपांडे सीताराम २०
द्रवीड नटेश अप्पाजी ७४, ७८, ९४, १८२

धिंग्रा मदनलाल १०६

नगरपालिका (म्युनिसिपल) कायदा ८१
नव (नौ) रोजी दादाभाई ३८, ४७, ४८, ५१, ५३, ५८, ९१ ते ९४, ९६, १२५, १४७, १६१, १७७, १७८, १९६, २०७ ते २०९
नामजोशी (माधवराव) २२, २५, २९, ३०
नायडू सरोजिनीदेवी ११६, १२७, १५८, १७८, १७९
नॉर्थब्रुक (लॉर्ड) ३
निजाम १२४
निबंधमाला ४, १५
निःशस्त्र-प्रतिकार ११३, १२४, १९६, १९८
नेल्सनचरित्र २४
नेव्हिन्सन् एच्. डब्ल्यू. १४७, १५६, १६६, १७६
नेहरू (पं.) जवाहरलाल ७९
नेहरू (पं.) मोतीलाल १०१
नौरोजी फर्दुमजी ४३
न्यू इंग्लिश-स्कूल १५, १६, १९, २१, २५, १४२, १५४
न्यूकॅसल १२१

पटवर्धन (महर्षि) अण्णासाहेब ४३
पटवर्धन अनंत (वामनराव) विनायक ७४, ७८, १५७
पटवर्धन गणपतराव १७, १९, २१, २२, २४
पटवर्धन वासुदेव बळवंत ५३, ५४, १५१
पंतुलु एन्. सुब्बाराव १२८, १३६, १३७
पब्लिक सर्व्हिस कमिशन ६८, ११५, १२०, १२४, १२५, १२६, १२८, १३५, १५०, १५२, १५४, १६१, १६९, १७९
परांजपे (डॉ., रँग्लर) र. पु. ३३, १५३, १५७, १५८, १७९
परांजपे शिवराम महादेव ४४, ११३.
पारेख गोकुळदास ५९
पार्लमेंट (ब्रिटिश) ३४, ३८, ४८, ६६, ९४, १०७, १०९, १२५, १६६, १७७, १८२, १८७, २०८, २०९, २१२
पाल बिपिनचंद्र ९२, ११२, १४६
पॉल् हर्बर्ट ३८
पिट् ३७
पीअर्सन् १२१
पूना असोसिएशन् ३
पेटिट् बम्मनजी ६०
पोलक १२१

पोंक्षे १५२
प्रतापसिंह २
प्रसाद (डॉ.) राजेंद्र २३, ७९
प्राथमिक शिक्षण–ठराव ६६, १९४,
प्राथमिक-शिक्षण–विधेयक ६६, ६८, १९५, २११
प्रार्थनासमाज १५९
प्रिटोरिया ११८
प्रेमजी-कॉवसजी इन्स्टिट्यूट् ३८
प्रेस-ॲक्ट (वृत्तपत्र-छापखाने-नियंत्रण) ६६, १८१, १८७, २०४

फर्ग्युसन् कॉलेज २०, २५, ३० ते ३३, ४८, ७४, १४४, १५३, १५४, १७२, २०८
फल्गु नदी ६
फिश्चर ११९
फुले ज्योतिराव १४, ६६
फुलर (सर) ब्लूमफील्ड ८४, ८८, ९४, ९५, १०८

बखले आर्. आर्. ७८
बनारसचे महाराज ८७
बर्क २०, १२०, १५५, १५७
बर्वे-प्रकरण १५, २६, ५५, १६९
बहिष्कार ६४, ८५, ८७, ८९, ९० ते ९४, ९६, ९९, १०२, १०४, १३७, १४६ ते १४८, १८१, २०४
बंकीपूर ११३, ११४, ११९
बंगाल ८१, ८३, ८८, ९१, ९२, ९४, ९६, ९९, १००, १०२, १०३, १०६, १११, ११२, १२६, १४६, १४७, १८१ १८२
बसू भूपेंद्रनाथ १३८ ते १४०, १५१, १५८
बाजीराव (पहिला) ८९
बानर्जी सुरेंद्रनाथ ४२, ४७, ९०, ९२, ९४, १००, १०१, १०२, १४६, १५१, १८१, १८२
बापट (सेनापति) पांडुरंग महादेव १०६
बॉम्बे गॅझीटिअर ३६
बॉम्बे (मुंबई) ग्रॅज्युएट्स् असोसि. ३१
बॉम्बे (प्रेसिडेन्सी) असोसिएशन् ४, ४७, १७७
बारीदोगाव ९९
बार्शी १७६
बाल्फर मंत्रिमंडळ ८३
बिल्ग्रामी सय्यद हुसेन १०७
बिहार १२६
बुचमन् टी. आर्. ४७
बेचुआनालँड ११८
बेळगाव ३८, ५१, ५६
बोआरयुद्ध १२२, १२३
बोथा (जनरल) ११८, १२२
बोस खुदीराम ११३
बोस (डॉ.) जगदीशचंद्र १२६
ब्रह्मदेश ११३, १२६, २०८
ब्रॅडलॉ (सर) चार्लस् ३५, ३७
ब्राइट जॉन् २०
ब्राह्मोसमाज १६१
ब्रिटन ८३, ९१, १२२
ब्रिटिश काँग्रेस कमिटी ८२, ८३
ब्रुइन्स ५३
ब्लूमफाउंट ११८
भागवत १४१
भाटवडेकर (सर) भालचंद्र ५९

भाटे गोविंद चिमणाजी ३०
भारत ३२, ७०, ८८, १६१, २०३, २०५, २०७
भारत-सेवक-समाज ७३, ७४, ७७, ७८, १२७, १४१, १४५, १४६, १५०, १५३, १५५, १५६, १६१, १६४, १६६, १७० ते १७२, १८६, २०१, २०८, २१२
भांडारकर (डॉ.) रामकृष्ण गोपाळ ६०, १४६, १५३
भावे रघुनाथ विद्याधर १४९
भिडे नाना १५
भ्रांतिकृत चमत्कार १६, १६९

मंडलिक विश्वनाथ नारायण ४
मंडाले ९६, ९९, १०३, ११०, १११, १२८, १३५, १४८, १८५
मणि ए. जी. ७८
मराठा १५, २१, २२, २७, ८५, १३५, १३६
महाभारत १०
महाराष्ट्र ३, ४, ६, १४, १५, २२, ३४, ३५, ३७, ३९, ४०, ५२, ९२, ११०, १४७, १४८, १७२, २१०
महाराष्ट्र कॉलेज ४४
मॅक्डोनाल्ड रॅम्से १०८, १२५, १६६
मँचेस्टर ८५, १४६, २०८
मँचेस्टर-गार्डियन ५३ ते ५५, १४४, १८६, १८७
मालवीय (पं.) मदनमोहन ८७, ९३, ११३, १३९, १६५
मॉट-फोर्ड सुधारणा ३७
मॉटेग्यू इ. एम्. ६६, १३३, १६६, १८३, २११
मॉडर्न रिव्हयू १६२
माळवी १००, १०१
मिंटो (लॉर्ड) ६१, ६४ ते ६८, ९९, १०२, १०६ ते १०८, १११, १४७, १५५, १६२, १८३
मिल्टन २०
मुकर्जी (सर) आशुतोष ६३, २११
मुक्ताबाई ५६
मुंजे (डॉ.) ११३
मुझफरपूर १११, ११३
मुंबई ४, ५, १५, १७, २१, ३१, ३२, ३५, ३६, ३७ ते ३९, ४०, ५१, ५३, ५४, ५७, ७०, ८१, ८३, ८४, ८९, ९९, १००, १०३, १११, ११२, ११५, ११९, १२६, १३६, १३७, १४७, १५२, १७८, १७९, १८५, १८६, २०१, २१०
मुंबई विद्यापीठ १३, १७, ३१, ६३, १८०
मुंबासा ११८
मेमनसिंग ११२
मेस्टन् (सर) जेम्स् ६१, १६२
मेहता (डॉ.) जीवराज १२७
मेहता (सर) फिरोजशहा १५, ३७ ते ३९, ४५, ५९, ६०, ६२, ६३, ६७, ७४, ७८, ८१, ८४, ९२, ९३, ९९, १०१, १०२, १०३, १३०, १३३, १३६, १३७, १३९, १४४,

१४७, १५१, १६४, १७९, १८०, १८१, १८६, २१०
मैलपुरा ८२
मोदी (सर) होमी पी. ७४, १३९.
मोरोपंत ६०
मोर्ले (लॉर्ड) जॉन् ४८, ६१, ६५, ते ६७, ९४, ९६, १०२, १०६, १०७ ते ११०, १२३, १४८, १५७, १८५, १८६, २०४, २०५, २१२
मोर्ले-मिंटो-सुधारणा ६५, ६६, १०६, १०९, १११ ते ११३, ११५, १२९, १४८, १८१, १८३, २०४, २११, २१२
मोहडा बिल ३५
म्हस्के सखाराम भाऊ ६०

युनिव्हर्सल रेसिस कॉंग्रेस ११५
येशूचे सेवक ७२

रमाबाई (पंडिता) ३९
रशिया ४७, ६२, १४६, २०८, २११
रहिमतुल्ला (सर) इब्राहीम ६०
रँड ५२, ५३
रॅले (सर) थॉमस ६३, १८०
राजवाडे (प्रा.) वैजनाथ काशीनाथ ३०, ३३
राजाराम कॉलेज १४ ते १७, २२, १६९
रांणीचा जाहीरनामा १ ते ३, ६४, ८७, ८८, १४८
रानडे इकॉनॉमिक इन्स्टिट्यूट ७२
रानडे (न्या., रावसाहेब) महादेव (माधव) गोविंद २, ३, ७, १४, ३४, ३५, ३७ ते ३९, ४० ते ४३, ४५, ४७, ५०, ५४ ते ६०, ७०, ७२ ते ७४, ८२, ८६, ९७, १२५, १४२, १४४, १४६, १४८, १५९, १६०, १६१, १६२, १६४, १६८, १७०, १७४, १७५, १७७, १८३, १८४, १८५, १९६, १९९, २०१, २०२, २०३, २०५, २०८,
रानडे (गुरुदेव) रामभाऊ १७९
रॉबर्टसन् (सर) बेंजामिन् १२३
रामकृष्ण परमहंस ३५, २०२
रामतीर्थ (स्वामी) ९७
रामायण १०
राव कोंडाप्पा ७८
राष्ट्रसभासमाचार ४१
राष्ट्रीय शिक्षण ११, ८७, ९१ ते ९३, ९९, १०३, ११४, १४७
रॉयल कमिशन् १०७
रिफ्लेक्शन्स ऑन् दि फ्रेंच रेव्होल्यूशन् १७
रुदरफोर्ड (डॉ.) व्ही. एच्. १५६, १६७
रूसोजपानी युद्ध १४६, २११
रे (लॉर्ड) ३५, ३६, ३९
रेडमंड जॉन् ४८
रोकबी १६
लखनौ-करार १७८
लजपतराय (लाला) ६८, ७८, ८४, ८५, ९०, ९२, ९६, ९७, ९९, १००, १०३ ते १०५, ११२, १४६, १५५, १७५, १७६, १८५, १८६, १८८

लंडन टाइम्स ११९, १२९
लँड ॲलिनिएशन् बिल (जमीन-तबदिली बंदी पहा)
लाहोर ४, ९९, ११३, १२३
लिटन् (लॉर्ड) ४, ५२, ८८, २०८
लिमये कृष्णाजी गणेश ७८
लिव्हरपूल १०७
लीडर ६७, १६३
ली वॉर्नर २१
लेले माधवराव व्यंकटेश १४७
लोकसेवक संघ (समाज) ७८, १८६
लोकहितवादी २, १४
वंगभंग ६१, ६४, ६८, ८३, ८५, ८७, ८८, ८९, ९३, ९४, ९६, ९७, ११४ १२९, १४५, १८२
वझे श्रीधर गणेश ७८
वंदे मातरम् ९९, १४९
वर्डस्वर्थ (डॉ.) १७
वऱ्हाड ५६, ९९
वाच्छा (सर) दिनशा एदलजी ३९, ४०, ४७, ४८, ८२, १०३, १३५, १३६, १५१, १५८, १८६, १८७
वायली (सर) कार्सन् १०६
वायव्य सरहद्दीवरचा प्रांत १२६
वॉरन् हेस्टिंग्ज २०
वाराणसी ८६ ते ८८, ९२, ९३, १७१, १७७, १८१, १९५, २०४
वासुदेव बळवंत (फडके) ४, ५, १३
विजय राघवाचारीअर १०३
विजापूकर (विष्णु गोविंद) अण्णासाहेब ११, १४, १५७
विद्वांस (बाबासाहेब) ४२
विद्यापीठ—कायदा (युनिव्हर्सिटी ॲक्ट) ३१, ६१, ६३, ८२, १८०, १९२
विलिंग्डन (लॉर्ड) १२९, १३०, १३३
विल्सन् (सर) गायफ्लीटवूड ६१, १८७, २११,
विवेकानंद (स्वामी) ३५, ९७, ११२, ११३, १५९, १६१, २०२,
विश्वेश्वर अय्या १६५
विष्णुबुवा ब्रह्मचारी ७७
वेडर्नबर्न् (सर) विल्यम् ५, ५०, ५१, ५३, ८३, १३५, १४५, १८७, १८८, २०८
वेल्बी (लॉर्ड) ४७, ४९, ५०, २०८
वेल्बी-कमिशन् ४६ ते ४८, ५४, ५६, ५७, ८२, ८४, १२८, १४३ ते १४६, १५०, १६१, १६२, १७४, १७७, १८०, १८१, १८४, १८६, १८७, २०८, २०९, २१०
वेस्टलंड (सर) जेम्स ३९
वेळणेश्वर ६
वैद्य विष्णु परशुराम ११
व्हॅलिडे-(टिंग)-शन् ॲक्ट ६१, ६३
व्हिक्टोरिया राणी १, ३, ५२, ८७
व्हिन्सेंट ५४
शामजी कृष्णवर्मा ६९, १०६
शारदासदन ३९

शास्त्री (ना.) व्ही. एस्. श्रीनिवास ७८, ११०, १२९, १३३, १३४, १५७, १६४, २०५
शिंदे महादजी ८९
शिराळकर आणि मंडळी २४
शिवाजी ४२, ९२, १७०
शिवाजी-उत्सव ८९
शिवाजीराजे १५
शेक्स्पीअर १५
शेरिडन् ४८
सत्याग्रह ११३, १२१, १२४, १५०
सभाबंदीकायदा ६५, ६८, ९४
समर्थ विद्यालय ११
सय्यद महंमद (सर) १६, १४६
संयुक्त प्रांत ९७, ११३, १२६
सँडर्स्ट (लॉर्ड) ५३, ५६
साठे आबासाहेब (शिवराम हरि) ३, ८, ७४
साने १७६
सार्वजनिक सभा ३, ४, २५, ३१, ३५ ते ३८, ४३ ते ४६, १३६, १४२, १६१, २०२
सावरकर (स्वातंत्र्यवीर) १०६
सॉलोमन समिती १२१
सिडिशस मीटिंग्ज ॲक्ट ६१, १४८, १९२
सिव्हिल ॲंड मिलटरी गॅझीट ९०
सिंह (सर) सत्येंद्रप्रसन्न ६७, ६८, १८१
सीतारामय्या (डॉ.) पट्टाभि ८८
सुधारक १६, ३०, ३५, ५३, ५४, १६१, १६९, १७०, २०२
सेटलवाडा १८६
सेल्बी (प्रिं.) ३०, ४४, ५४, ६२
सोमण भाऊसाहेब १३५
सौदे २४
स्कॉट् (सर) वॉल्टर १६
स्टँडर्ड ११९
स्टुअर्ट (सर) हॅरॉल्ड १६३
स्टेट्स्मन् ३९
स्ट्रटगार्ड ६९, १०६
स्पेक्टेटर ११९
स्पेन्सर हर्बर्ट १६३
स्मट्स् (जनरल) १२१, १२३, १२४, १५४, २१२
स्वदेशी ८७, ८९, ९१ ते ९४, ९७, १०२, १०४, १४७, १६०, १९७, १९९, २००
स्वराज्य ९१, ९२, ९३, ९५, १०४, १०५
स्वर्गच्युती (पॅरडाइज लॉस्ट) २०

हबीब शेठ (हाजी) १२३
हॅम्लेट ५३, १८७
हरकिसनलाल (लाला) १३५
हॅरिस (लॉर्ड) ३९
हाथॉर्नवेट (प्रा.) १७
हार्डिंज (लॉर्ड) ११५, १२१, १२६, १५४, १६६, १८३, २१२
हॉयलेंड जे. एस्. १४५
हिंदु पंच १४९, १५८
हिंदुविद्यापीठ ८७
हैदराबाद १२४
ह्यूम ए. ओ. ५, ७४, १८८

ज्ञानप्रकाश २
ज्ञानोदय २

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
३३	४	आहे. संस्थेचा	आहे. हाच या
३८	१८	आनंदोत्सव	आनंदोद्भव
४९	१	बंद करावयाची	बंद करावयास हवी;
५१	३	तीन सभासद सत्ताधाऱ्यांचे	तीन सभासद व सत्ताधाऱ्यांचे
६१	२६	गोखल्यांचा	गोखल्यांची
६८	२३	पडू !!	पडू !!"
८२	२५	साक्षीदार	साथीदार
१०४	९	सिद्ध करणे	सिद्ध धरणे
१०९	३	त्यांच्याच सुरांत	नोकरशाहीच्या सुरांत
१२९	१४	सुचविले असतां	सुचविले तर
१३१	१३	आणखी करावी लागेल	आणखी चर्चा करावी लागेल.
१४४	८	निन्तात	नितान्त
१४६	३	डॉ. रामकृष्ण हरि	डॉ. रामकृष्ण गोपाळ
१५४	१४	(१९११–१२)	(१९१३–१४)
१५५	१०	आठवण करून	आठवण त्यांनी करून
१६०	५	राज्यापुरते	राहण्यापुरते
१६१	५	ब्राह्मण समाजाचा	ब्राह्मो समाजाचा
१८१	४	प्रभृतींनी	प्रभृतींना
२०९	१३	गोखल्यांनीं वरील	गोखल्यांनी स्पष्ट केलेली,

* * *